राजवाडे विचारदर्शन

प्रल्हाद नरहर जोशी
एम. ए; पीएच्. डी.

मूल्य : रु. १० : ००

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली
फेब्रुवारी १९६५

मुखपृष्ठ : अनंत सालकर

ब्लॉक्स : धारगळकर प्रोसेस प्रा. लि.

प्रकाशक :
सदाशिव कृष्ण पाध्ये
व्हीनस प्रकाशन
तपश्चर्या, ३८१ क, शनिवार पुणे २

मुद्रक :
ना. म. भिडे
विमा मुद्रक आणि प्रकाशक लि.
सातारा, यांचा विमा छापखाना
सातारा

माझें मनोगत

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं इतिहास व इतिहास-संशोधन या मोठ्या कार्याबरोबर समाजशास्त्र, भाषा व व्याकरण, वाङ्मयचिकित्सा इत्यादि विविध क्षेत्रांत फार मोलाची कामगिरी करून ठेविली आहे. राजवाडे यांनीं या निरनिराळ्या क्षेत्रांत जे विचार प्रकट केले त्यांची संक्षेपानें ओळख या ग्रंथांत करून देण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. प्रत्येक ठिकाणीं महत्त्वाच्या विषयासंबंधीं राजवाडे यांचे काय विचार आहेत हें सांगून झाल्यावर त्या विचारांचें परीक्षण शक्य तों आजचें संशोधन ध्यानांत घेऊन करण्याचा प्रयत्नहि येथें आहे. चाळीसपन्नास वर्षांपूर्वी राजवाडे यांनीं जो विचार सांगितला त्याचें महत्त्व त्या काळीं कोणतें होतें, त्याची प्रतिक्रिया कशी झाली, तो मुळांतच दुर्लक्षित कसा राहिला, आज त्याला किती महत्त्व आहे, आजच्या नव्या संशोधनानें तो कितपत परिपुष्ट झाला वा क्षीण झाला याची चिकित्सा उद्बोधक असल्यानें तिचा संक्षेपानें कां होईना पण या ग्रंथांत प्रपंच केलेला दिसून येईल.

इतिहासाचार्य राजवाडे यांना मी कांहीं पाहूं शकलों नाहीं. कारण ते दिवंगत झाले तेव्हां मी दोन वर्षांचा होतों. पण त्यांचें नांव आमच्या घरांत सतत निघत असे. त्यांनीं संपादित केलेला व तीर्थरूपांना दिलेला ‘ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें: १७५० पासून १७६१ पर्यंत ’ हा पहिला खंड लहानपणींच मी पाहिलेला होता. याच्या पहिल्या पानावरील ‘ आपल्यांत दुही पडते, तेव्हां शत्रूस बळ फावतें ’ व ‘ सर्वांचें एकचित्त असतें, तेव्हां कार्य होतें ’ या दोन वचनांखेरीज मला त्या पुस्तकांत फारसें महत्त्वाचें पहिल्यानें अर्थात्च वाटलें नाहीं. ‘ सन १८९९, ज्येष्ठ, वाई ’ अशी नोंद या पुस्तकावर तीर्थरूपांनीं केलेली आहे. याच सुमारास माझे तीर्थरूप कै. नरहरशास्त्री खरशीकर हे इतिहासाचार्य राजवाडे यांच्या सहवासांत वाई येथें होते. अनेक प्रसंगीं ते राजवाडे यांच्या आठवणी सांगत. राजवाडे यांचें नांव आणखी एका कारणामुळें लहानपणींच मनांत ठाण देऊन होतें. जीं अनेक मासिकें घरीं येत, त्यांत ब्राह्मणपत्रिकेचा ‘ राजवाडे-तिलांजलि अंक ’ हा एक स्मरणांत राहिला; त्यावेळीं अर्थात्च त्याचें मुखपृष्ठ व थोडें चमत्कारिक वाटणारें नांव यांखेरीज इतर बाबींची जिज्ञासा मला नव्हती.

उच्च शिक्षणाच्या निमित्तानें इतिहास, वाङ्मयचिकित्सा, वाङ्मयेतिहास, समाजशास्त्र, भाषा व व्याकरण इत्यादि विषयांचें अध्ययन वाढीस लागलें तसें

राजवाडे यांचें महत्त्व ध्यानांत येऊं लागलें. घरीं असलेल्या राजवाडेपरिचयाचा धागा बळकट होऊं लागला. तीर्थरूपांचें एक विस्तृत असें अप्रकाशित आत्मवृत्त आहे. त्याच्या पहिल्या वहींत पान १३१ वर त्यांनीं लिहिलें आहे; 'रोजनिशी कां लिहितों ?– शके १८२१, सन १८९९ सालीं मी वाईस होतों. द्रवीड वकिलाकडे हुसेनशहा गैबीशहा यांचीं कामें करीत असे. तेथें इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे बी. ए. होते; त्यांचें इतिहासलेखन मी करीत असे. ते म्हणत कीं रोजनिशा आपल्या पूर्वजांनीं न लिहिल्यामुळें इतिहास समजण्यास मार्ग नाहीं. या आपत्तीमुळें परकीय लोकांनीं आमचे पूर्वजांविषयीं, धर्माविषयीं, तिरस्कारित केलेलीं विधानें खोडून काढतां येत नाहींत. मग मी रोजनिशी लिहूं लागलों. त्यामुळें सत्याकडे प्रवृत्ति झाली. दुराचरण, असत्य, अनीति, अधर्म इत्यादीकडे प्रवृत्ति झाली तर माझी रोजनिशी मला थांबवून तशी प्रवृत्ति होऊं देत नव्हती.—" कांहीं थोडा विद्याव्यासंग आपल्या कुवतीप्रमाणें करावा ही प्रेरणा मला तीर्थरूपांकडून सतत मिळत राहिली; तीर्थरूपांना राजवाडे यांचें सान्निध्य उपकारक झालें. हें अनुसंधान या ग्रंथाच्या निर्मितीस सतत प्रोत्साहक ठरलें यांत शंका नाहीं.

या ग्रंथांत राजवाडे यांच्या विचारांचें दर्शन प्रामुख्यानें आहे. त्यांच्या विचारांची समीक्षा थोडीफार आहे. त्यांचें संपूर्ण चरित्र, त्यांच्या आठवणी, त्यांच्या विक्षिप्त लहरी, त्यांचा संतापी स्वभाव, त्यांची शिवराळ भाषा, त्यांची अपार कष्ट करण्याची वृत्ति, त्यांना वाटणारा कमालीचा देशाभिमान, भौतिक शास्त्रांवरील त्यांचें प्रेम, फटिंगपणें राहून त्यांनीं जमविलेलें पर्वतप्राय साधनभांडार, त्यांनीं केलेला उभ्या महाराष्ट्राचा प्रवास, त्यांनीं उभारलेल्या संस्थांचा व्याप इत्यादि त्यांच्या विविध कर्तबगारीची संपूर्ण नोंद घ्यावी व त्यांचें चरित्र तपशीलानें सजवावें असा हेतु नाहीं. कामापुरती स्थूल चरित्ररेखा उभी केली आहे ती त्यांच्या विचारदर्शनार्थ पुरेशी आहे. राजवाडे यांच्या सर्व साहित्याचा वा कार्याचा आढावा घ्यावा असाहि हेतु नाहीं. त्यांचें इतिहाससंशोधन, त्यांचें सामाजिक चिंतन, त्यांचें भाषा, व्याकरण, साहित्य यांविषयींचें मूलगामी विवेचन, त्यांची इतिहासमीमांसा, त्यांचें विविध प्रकारचें ग्रंथलेखन इत्यादींच्या निमित्तानें मराठी भाषेंत त्यांनीं जो नवविचार उभा केला तेवढाच धागा घेऊन त्याचा विस्तारानें प्रपंच या ग्रंथांत केलेला आहे. चाळीसपन्नास वर्षांपूर्वींचा राजवाडे यांचा विचार समाजास किती उपकारक झाला याची चिकित्सा करितांना आज आपण १९६४–६५ मध्यें आहोंत, शास्त्रें व संशोधनें कांहीं क्षेत्रांत फार पुढें गेलेलीं आहेत हें ध्यानांत घेऊन राजवाडे यांना अन्याय होणार नाहीं याची दक्षता घेतली आहे; पण जेथें राजवाडे यांचा विचार प्रथमपासून बरोबर मानणें कठिण होतें त्याचाहि परामर्श शक्य तितक्या वस्तुनिष्ठ दृष्टीनें घेतलेला आहे. थोडक्यांत म्हणजे राजवाडे यांच्या विचारसंपत्तीचें हें

दर्शन व समीक्षण नव्या पिढीस विविध विषयांच्या अभ्यासास प्रेरक ठरावें या हेतूनें ग्रंथाची रचना केलेली आहे.

या ग्रंथांतील उणिवा व अपुरेपणा यांची जाणीव मला पुरेपूर आहे. इतिहास, इतिहाससंशोधन, इतिहासमीमांसा, सामाजिक विचार, वाङ्मयसंशोधन व साहित्यचिकित्सा, भाषा व व्याकरण, लिपि व शिलालेख इत्यादि विविध क्षेत्रांत राजवाडे यांनीं जे अति प्रगल्भ विचार प्रकट करून ग्रंथनिर्मिति केली, स्फुट लेखन केलें त्यांचा सर्वांगीण परामर्श घ्यावयाचा म्हणजे प्रत्येक विषयावर एक एक स्वतंत्र ग्रंथ लिहावा एवढी प्रत्येकाची योग्यता आहे. महाराष्ट्रांतील कर्त्या पुरुषांची मोजदाद, विकारविचारप्रदर्शनाचीं साधनें, हिंदु समाजांत हिंद्वितरांचा समावेश यांसारखे त्यांचे स्फुट लेख इतके विचारप्रवर्तक आहेत कीं आजचें संशोधन ध्यानांत घेतां प्रत्येक विषयावर एक मोठा ग्रंथ लिहिण्याची प्रेरणा नव्या दमदार अशा व्यासंगी माणसास व्हावी. राजवाडे यांनीं केलेली इतिहासमीमांसा एवढ्या तोलाची आहे कीं जन्मभर याच विषयाचा व्यासंग वाढवून इतिहासाचें शास्त्र व तत्त्वज्ञान यांचें चिंतन करावें. स्वभाषा, स्वदेश यांच्या विषयींचा राजवाडे यांचा अभिमान त्यावेळीं अतिरेकाचा वाटत असला तरी आज त्याचें महत्त्व अनन्य साधारण आहे. व्युत्पत्तिशास्त्र, भाषाशास्त्र, व्याकरणशास्त्र यांची मांडणी आज नव्यानें होत असली व वाङ्मयसंशोधनाचें नवें संकेत रूढ होत असले तरी निर्मळ दृष्टीच्या अभ्यासकास राजवाडे यांचें कर्तृत्व डावलून चालणार नाहीं. आज उत्खननशास्त्र, पुराणवस्तुसंशोधन यांची प्रगति फार मोठी झाली असली तरी या क्षेत्रांत राजवाडे यांची कामगिरी महत्त्वाची मानावी लागेल. लोकवाङ्मयास आज कितीतरी महत्त्व मिळालें आहे; पण याहि विषयाशीं राजवाडे यांचा संबंध आहे. राजवाडे यांची विलक्षण प्रतिभा व चिकित्सक बुद्धि विद्याव्यासंगाच्या सर्व क्षेत्रांस स्पर्श करून गेली आहे. कोशवाङ्मयापासून भोंडल्याच्या गाण्याची नोंद करण्यापर्यंत त्यांची संशोधक दृष्टि व्यापक होती. या प्रत्येक अंगाचें एका ग्रंथांत जेवढें दर्शन घडविण्याची शक्यता होती तेवढें शक्य तितकें त्यांच्याच शब्दांत प्रथम उभें करून त्या विचाराची स्थूल चिकित्सा केलेली आहे. महाराष्ट्राच्या विचारपरंपरेच्या आधुनिक इतिहासांत राजवाडे यांची कामगिरी नेमकी किती व केवढ्या योग्यतेची आहे हें स्पष्ट करण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

या ग्रंथाची मर्यादा सांगतांना आणखी हें स्पष्ट करावयास हवें कीं राजवाडे यांनीं आपलें जें जें वाङ्मय प्रसिद्ध केलें त्या सर्वांची नोंद घ्यावी व त्याची वाङ्मयदृष्ट्या परीक्षा करावी असा हेतु नाहीं. विविध क्षेत्रांत राजवाडे यांच्या विचारबळाचें जें महत्त्व आहे त्याचाच आविष्कार करावा असा प्रयत्न या ग्रंथांत आहे. राजवाडे यांचा अतिरेकी स्वभाव, स्वच्छंदी लहर, विक्षिप्त वर्तणुक, संतापी वृत्ति, तुसडेपणा, व चरित्रांतील सूक्ष्म धागेदोरे यांची चर्चा अर्थात्‌च या ग्रंथांत नाहीं.

त्यांच्या या विशिष्ट स्वभावरचनेमुळें त्यांच्या विचारांवर जर परिणाम झाला असेल, त्यांचें संशोधन जर एकारत गेलें असेल तर मात्र त्याचा जरूर तेथें निर्देश केलेला आहे. परंतु राजवाडे यांचें विस्तृत चरित्र व त्यांच्या काळाचा अथवा कामगिरीचा विस्तृत आढावा घ्यावा यापेक्षां त्यांच्या विविध क्षेत्रांतील व्यासंगांतून निर्माण झालेल्या विचारधनाची चर्चा करावी हें मला महत्त्वाचें व अगत्याचें वाटल्यानें तसा प्रयत्न या ग्रंथांत आहे.

राजवाडे यांच्या बहुविधतेनें संपन्न असणाऱ्या वैचारिक व्यक्तित्वाचा अभ्यास करितांना इतिहास, संशोधन, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, भाषा, व्याकरण, वाङ्मय इत्यादि विविध क्षेत्रांतील विचारांचा सतत पाठपुरावा करीत राहिल्यानें मन सदोदित उल्हसित व कार्यप्रवृत्त होत राहिलें. अनेकांचा हातभार मला नेहमींच उपकारक होत असतो. त्या सर्वांचा निर्देश करणें त्यांनाच आवडणार नाहीं. ग्रंथांतील कांहीं प्रकरणांचा भाग राजवाडेजन्मशताब्दीच्या निमित्तानें किर्लोस्कर व वसंत या मासिकांत प्रसिद्ध झालेला होता. कांहीं वैचारिक धन आपल्या वाचकांना द्यावें अशी सतत जागृति मनांत बाळगणाऱ्या या दोन मासिकांच्या संपादकांचा उल्लेख येथें आवर्जून करणें अगत्याचें आहे. ग्रंथ लिहितांना मला सर परशुरामभाऊ कॉलेजचें ग्रंथालय, नू. म. वि. प्रशालेचें ग्रंथालय, जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, केसरी-मराठा ग्रंथालय यांचा अत्यंत उपयोग झाला आहे. ग्रंथाचें मुद्रण सातारा येथें चालू होतें. मुद्रितें येण्याजाण्यात बराच वेळ गेला तरी मुद्रणाचें काम 'विमा प्रेस'च्या चालकांनीं मन लावून केलें आहे. 'व्हीनस प्रकाशन' चे श्री. स. कृ. ऊर्फ भाऊसाहेब पाध्ये यांनीं नेहमींच्या जिद्दीनें व हौसेनें याहि ग्रंथाचें प्रकाशन करून राजवाडे यांच्या विचारांची ओळख नव्या पिढीस करून देण्याची संधि मला दिली याचें महत्त्व मी विशेष मानतों. आर्थिक दृष्ट्या फलदायी होणारेच ग्रंथ प्रसिद्ध करावेत अशी श्री. पाध्ये यांची भूमिका नाहीं. समाजाचें कांहीं एक ऋण आहे. तें ध्यानांत घेऊन त्यांनीं या ग्रंथाच्या प्रसिद्धीसाठीं जें जें करणें अगत्याचें आहे तें तें केलें आहे; त्यांचे आभार मानून आतांच मुक्त न होता आणखी फार मोठीं कार्यें त्यांच्या उमेदीवर उभीं करावयाचीं असल्यानें नुसत्या निर्देशावरच थांबणें इष्ट आहे.

विविध प्रकारच्या व्यासंगांस व अभ्यासप्रवृत्तींस प्रेरणा देणारा असा हा ग्रंथ नव्या पिढीस वाटला तर माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें मला वाटेल.

'रेणुका,' लक्ष्मीपार्क
नवी पेठ, पुणें ९

— प्र. न. जोशी
२६ जानेवारी, १९६५

अनुक्रमणिका



इतिहासाचार्य, विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

(सन १८६३–१९२६)

१ : चरित्ररेखा

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे या विचारी पुरुषाचा जन्म आषाढ शु. ८ शके १७८५, दि. २४ जून १८६३ या दिवशीं वरसईस झाला. नवलाची बाब अशी कीं इतिहासपुरुषांच्या जन्मतिथीबद्दलचे वाद जसे चालतात तसाच वाद इतिहासाचार्य राजवाडे यांच्याहि जन्मदिनानिमित्त होण्यासारखा आहे. शके १७८५ कीं १७८६ एवढ्यापुरताच हा वाद मर्यादित आहे. सन १९२७ मध्यें राजवाडे यांच्या निधनानंतर त्या वेळच्या ब्राह्मणपत्रिकेनें राजवाडे तिलांजलि अंक प्रसिद्ध केला होता. ब्राह्मणपत्रिकेचे संपादक वा. दा. मुंडले यांनीं राजवाडे यांची जन्मपत्रिकाच प्रसिद्ध केली आहे. त्यांत 'अथ स्वस्तिश्रीनृप शालिवाहनशके १७८५ रुधिरोद्गारीनाम संवत्सरे। उदगयने। ग्रीष्मऋतौ। आषाढमासे शुक्लपक्षे। अष्टमी बुधे' वगैरे उल्लेख असल्यानें शके १७८५ सन १८६३ हाच सन राजवाडे यांच्या जन्माचा मानणें युक्त होणार आहे. ४ जानेवारी १९२७च्या केसरींत दत्तो वामन पोतदार यांनीं विसुभाऊ राजवाडे यांचा जन्म शके १७८६ दिला असल्यामुळें कांहींच्या मनांत संभ्रम निर्माण झाला. राजवाड्यांचे निकटवर्ती अनुयायी भास्कर वामन भट यांनीं आपल्या राजवाडेचरित्रांत शक १७८६ हाच जन्मकाळचा म्हणून दिला आहे. याच चरित्रांत मुंडलेकृत जी कुंडलीचर्चा आहे तींत मात्र जन्मशक १७८५ आहे.

राजवाडे या चित्पावन घराण्याचें मूळचें नांव जोशी. परंतु श्रीशिवाजीराजे वा श्रीसंभाजीराजे यांच्या काळापासून राजवाड्यांशीं संबंध या जोशी घराण्याचा असल्यानें जोशी राजवाडे झाले अशी आख्यायिका. कोकणांतील राजवाडी या गांवाशीं या नांवाचा संबंध असावा अशी शंका अहिताग्नी शंकर रामचंद्र राजवाडे यांनीं प्रदर्शित केली आहे. शिवशाहीच्या नंतरच्या काळांत जीं अनेक चांगलीं घराणीं नशीब काढण्यास देशावर आलीं त्यांत राजवाड्यांचें एक होतें. विसूभाऊ राजवाड्यांचे वडील काशीनाथ, आजे बापजी व पणजे वैजनाथ. राजवाड्यांचे वडील काशीनाथपंत पुण्यास वकीली करीत. विसुभाऊंच्या जन्मानंतर तीनच वर्षांत त्यांचे वडील काशीनाथपंत दिवंगत झाले. यानंतर राजवाड्यांची आई आपल्या दोनहि मुलांना—वैजनाथ व विश्वनाथ यांना—बरोबर घेऊन आपल्या वडिलांकडे वरसईस गेली. राजवाडे यांचे चुलते जगन्नाथ बापजी हे वडगांवीं वकील होते. त्यांच्याकडेहि हीं मुलें मधून मधून राहात होतीं.

राजवाडे बंधु शिक्षणासाठीं मात्र पुण्यास आले. शनिवार पेठेंतील रामभाऊ जोगळेकर यांच्या तीन नंबरच्या शाळेंत राजवाड्यांचें प्राथमिक शिक्षण झालें. दुय्यम शिक्षण वामनराव भावे, बाबा गोखले इत्यादींच्या शाळांतून झालें. विष्णु-

शास्त्री यांच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्येंहि कांहीं दिवस राजवाडे होते. शालेय अभ्यासक्रमाकडे राजवाड्यांनीं फारसें लक्ष कधींच दिलें नाहीं. सन १८८२ मध्यें राजवाडे प्रवेशपरीक्षा पास झाले. मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें जेमतेम पहिली सहामाही झाल्यावर द्रव्याच्या अभावीं त्यांना कॉलेज सोडावें लागलें. पुढें कांहीं दिवस पुण्यास येऊन त्यांनीं पब्लिक सर्व्हिस सेकंड ग्रेड परीक्षेचे उमेदवार तयार करण्याचा एक वर्ग चालविला. थोडी द्रव्याची सोय झाल्यावर राजवाडे यांनीं डेक्कन कॉलेजांत नांव घातलें. अभ्यासपत्रकाप्रमाणें परीक्षेची तयारी करणें, प्राध्यापकांची व्याख्यानें ऐकणें हे उद्योग राजवाडे यांना कधींच मानवले नाहींत. कॉलेजच्या ग्रंथालयांतील ग्रंथांना त्यांनीं गुरु मानलें आणि इतिहास, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, समाजशास्त्र इत्यादि विषयांवरील अवांतर ग्रंथांचा अभ्यास त्यांनीं मनापासून केला. वनस्पतिशास्त्राचीही थोडीफार ओळख त्यांनी करून घेतली. फारसी, फ्रेंच भाषांची जुजबी ओळख त्यांनीं याच सुमारास करून घेतली. नियमित व्यायाम करून त्यांनीं शरीरसंपदाहि याच काळांत कमावली. राजवाडे सन १८९१ मध्यें बी. ए. ची परीक्षा पास झाले. बी. ए. झाल्यानंतर नौकरी करावी कीं स्वतंत्र उद्योग आरंभावा या संभ्रमांत राजवाडे होते. त्यांतून त्यांनीं मार्ग कसा काढला हें पाहण्यापूर्वी राजवाडे यांनीं स्वतःस मिळालेल्या शिक्षणाविषयीं पुढें सन १९०४ मध्यें जूनच्या 'ग्रंथमाला' मासिकांत 'कनिष्ठ, मध्यम व उच्च शालांतील स्वानुभव' या नांवाची दीर्घ हकीगत दिली आहे जी आजही साठ वर्षांनंतरच्या काळांत उद्‌बोधक वाटण्यासारखी आहे. तिचा थोडक्यांत परिचय करून घेऊं

आपल्या प्राथमिक शिक्षणाविषयीं राजवाडे लिहितात, "दीड वर्षें मी दोनचार खेडेगांवांतील व शहरांतील शाळांत होतों, तेवढ्या अवधींत मला एकहि पंतोजी शास्त्रीय रीत्या शिक्षण देणारा भेटला नाहीं. येथून तेथून सर्व पंतोजी आडमुठे, पोटभरू, इकडची पाटी तिकडे उचलून टाकणाऱ्यांपैकीं होते... त्या अवधींत अत्यंत उच्च प्रतीचें शिक्षण मिळालेला व द्रव्यावर दृष्टि न ठेवितां केवळ स्वदेशांतील मुलें उदात्त विचारांचीं, उदात्त कृति करणारीं व स्वदेशावर प्रेम करणारीं निपजावीं एवढ्याच हेतूनें अध्यापकाचा धंदा आयुष्यभर नम्रपणें करणारा असा एखादा गुरु जर मला मिळाला असतां तर ह्या तीन वर्षांच्या अभ्यासांत माझी प्रगति मुंबईतील विश्वविद्यालयाच्या बी. ए. च्या इतकी झाली असती असें मला आतां वाटतें... माझ्या आयुष्यांतील आठ वर्षांपासून पंचवीस वर्षांपर्यंतचीं सतरा अठरा वर्षें देश, धर्म, स्वभाषा, स्वजन यांच्याविषयींच्या अनास्थेनें जीं गुदरलीं तीं असा उत्तम गुरु मिळता तर खचित गुदरलीं नसतीं... माझ्या आयुष्यांतील अडीच वर्षें नूतन ज्ञानसंपादनाच्या दृष्टीनें अगदीं फुकट गेलीं. शिवाय नैतिक व धार्मिक दृष्ट्या माझा किती तोटा झाला तो तर सांगवतच नाहीं.... "

इंग्रजी शिक्षणासाठीं राजवाडे प्रथम बाबा गोखले यांच्या शाळेंत सन १८७६ मध्यें गेले. त्या वेळीं केवळ धंदा म्हणून चालणाऱ्या खाजगी शाळा कशा होत्या याचें चित्र त्यांनीं यथातथ्य रेखाटलें आहे. राजवाडे लिहितात, "त्या वेळीं या शाळेची स्थिति अगदींच खालावलेली होती. पूर्वीं शाळा बऱ्या स्थितींत होती. परंतु अलीकडे बाबांचें लक्ष शाळेवरून उठून वकिलीकडे लागलें होतें.... मास्तरांना दुपारीं इतर धंदे करतां यावेत म्हणून शाळा सकाळीं सहा वाजल्यापासून दहा वाजल्यापर्यंत भरत असे.... घरांतील वर्गांच्या ज्या खोल्या असत त्या ओलसर, दमट, अंधुक, पडक्या, गटारपायखाने वगैरेंच्या घाणीनें भरलेल्या अशा असत.... वर्गांत पन्नाससाठ मुलें असत. हा वर्ग मिश्र असे; म्हणजे कांहीं मुलें इंग्रजी मातृका शिकणारीं, कांहीं हावर्डच्या पहिल्या पुस्तकाचा प्रथमार्ध शिकणारीं, कांहीं द्वितीयार्ध शिकणारीं, व कांहीं हावर्डचें दुसरें पुस्तक शिकणारीं, या एकाच वर्गांत असत व ह्यांना शिकविणारा एकच मास्तर असे. यामुळें प्रत्येक तासांतील पांच चार मिनिटें माझ्या तुकडीच्या वाट्यास व त्यांपैकीं अर्धें मिनिट माझ्या वाट्यास येई—"

यानंतर राजवाडे वामनराव भावे, काशीनाथपंत नातू, यांच्या शाळांतून व कधीं मिशन स्कूलमधून शिक्षण घेत होते. तेथील सर्व अनुभव वर्णन करून राजवाडे लिहितात, "खाजगी शाळांतून जसे कित्येक अनीतिमान मास्तर असत, तसेच हायस्कुलांतहि अपेयपान, अभक्ष्यभक्षण, चारगटपणा, बाहेरख्यालीपणा वगैरे गुणांनीं मंडित असे गुरुजी थोडेफार होते. अशा स्थितींत नीतिमत्तेचा धडा मुलांच्या मनांवर ठसविण्याचें काम सरकारी व खाजगी शाळांतील मास्तरांच्या हातून फारच गचाळपणानें यत्किंचित्हि साधलें न जावें हें साहजिकच आहे. ही परिस्थिति स्वानुभवानें लक्षांत आणून विष्णुशास्त्री चिपळोणकरांनीं लोकशिक्षणार्थ एक नवीन शाळा काढली. देशभक्त, विद्वान्, कार्यकर्ते, विचारवंत, आचारवंत, उद्योगी, साहसी असे लोक निर्माण करण्याचा उदात्त हेतु या विद्वान् चालकाच्या नव्या शाळेच्या प्रथमारंभीं होता. प्रचलित लोकशिक्षण सरकारच्या धोरणानें चालल्यामुळें त्या शिक्षणांत भासमान होणारे दोष, नव्या शाळेच्या धोरणानें चालणाऱ्या लोकशिक्षणांत न यावे या हेतूनें सरकारी इन्स्पेक्टर, डिरेक्टर, परीक्षक वगैरे कोणाचाहि स्पर्श आपल्या शाळेस होऊं द्यावयाचा नाहीं असा बाणा शास्त्रीबोवांनीं, उन्हाळ्याच्या सुटीच्या वेळीं मुलांना निरोप देतांना व इतरत्र प्रदर्शित केला होता.—"

शास्त्रीबोवांच्या मूळ धोरणांत पुढील संस्थाचालकांनीं जो बदल केला तो राजवाडे यांना पसंत नाहीं. न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व यांच्या अनुकरणानें निघालेल्या अनेक शिक्षणसंस्था यांचीं ध्येयें व धोरणें सरकारी मर्जी सांभाळण्यासाठीं व सरकारची आर्थिक मदत मिळविण्यासाठीं सतत बदलत गेलीं याबद्दल राजवाडे यांनीं तीव्र विषाद प्रकट केला आहे. राजवाड्यांची ही टीका

एकतर्फी अतएव थोडी अवास्तवच म्हणावी लागेल. "राष्ट्रांतील तरुणांना नवें वळण लावण्याचें सामर्थ्य, बुद्धीनें, नीतीनें, विद्येनें, विचारानें, व कर्तृत्वशक्तीनें मागें राहिलेल्या मंडळींच्या आंगीं फारच थोडें होतें, किंबहुना मुळीच नव्हतें... या मंडळींपैकी बहुतेकांची मोठी महत्त्वाकांक्षा म्हटली म्हणजे एखादें कॉलेज काढून तींत प्रोफेसर होणें, व परीक्षांकरितां पोरें तयार करणें ही होती. देशभक्त, स्वातंत्र्येच्छू, उद्योगी, व साहसी व करारी जवान तयार करण्याचा या मंडळीचा बिलकुल हेतु नव्हता; व तसा हेतु असता तरी, तो हेतु तडीस नेण्यास जी गुलामगिरीची शिक्षणपद्धति त्यांनीं अवलंबिली होती तिनें तो साध्य होणें केवळ अशक्य होतें... राजमान्यत्व मिळविण्यासाठीं सरकारी रजिस्ट्रेशन ऑफिस, पैशाची मदत मिळविण्याकरितां विद्याधिकाऱ्यांची कचेरी व गव्हर्नरादि बड्या मंडळीची पायधरणी आणि कॉलेज काढण्यासाठीं युनिव्हर्सिटीच्या सिनेटसिंडिकेटादि सभांची विनवणी, ह्यांकडे ही मंडळी धांव घेऊं लागली." या सारख्या उद्गारांपाठीमागें थोडीफार वास्तवता व कळकळ आहे पण या शिक्षणसंस्थांनीं कांहींच साधलें नाहीं हा राजवाडे यांचा दावा इतिहासास कसा मंजूर होईल?

अशा शिक्षणसंस्थांत काम करणाऱ्या उच्च पदवीधरांचा स्वार्थत्यागहि राजवाडे यांना निर्मळ वाटत नाहीं. या सेवक मंडळींचा स्वार्थत्याग असत्कारणीं लागून सरकारी नोकरशाहींतील असंख्य कारकून व अधिकारी निर्माण करणारे कारखानेच शिक्षणाच्या द्वारें सरकारी काम अल्प पगारावर करू लागले. या शिक्षण संस्थांच्या उदार शिक्षणप्रणालीनें देशाचें नुकसानच झालें असें त्यांनीं आवर्जून सांगितलें आहे. "लहानमोठ्या नोकऱ्या मिळवूं इच्छिणारे उमेदवार ह्यांच्या व ह्यांच्याचसारख्या इतरांच्या वीसएकवीस वर्षांच्या खटपटीनें इतके स्वस्त झाले कीं बी. ए. ला पंधरा रुपयांला कोणी विचारीनासें झालें; आणि मुंबईच्या एका गव्हर्नराच्या भाकिताप्रमाणें ग्रॅज्युएटांना पट्टेवाल्याचीहि नोकरी मोठ्या मिनतवारीनें मिळण्याचा प्रसंग जवळ येऊन ठेपला... राष्ट्रांतील तरुणांना इतर कोणत्याहि स्वतंत्र धंद्यानें पोट भरण्याचें माहित नसल्यामुळें, हें एक मोठें राष्ट्रीय संकटच ओढवलेलें आहे. ह्या संकटाच्या मुळाशीं पुण्यांतील डेक्कन एज्युकेशन सोसायटी आहे... पुण्यांतील शाळापुढारी चुकले, त्यानें सर्व महाराष्ट्राचीहि फसगत झाली—"

डेक्कन एज्युकेशन सोसायटी व तिच्या वळणावर निघालेल्या इतर संस्था यांनीं निर्माण केलेल्या विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान माणसांची नामावली राजवाडे यांच्या मताला एक समर्पक उत्तर आहे. मूळ हेतु राहिला नाहीं, परिस्थितीप्रमाणें त्यांत बदल होत गेला, पण या शिक्षणसंस्थांनीं राष्ट्रीय संकट महाराष्ट्रावर ओढवून घेतलें हें सिद्ध करणें अवघड आहे. राजवाडे यांनीं प्रस्तुतच्या निबंधांत आपल्या कॉलेजच्या शिक्षणाविषयींहि मनोरंजक आठवणी दिल्या आहेत.

मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमधील वर्डस्वर्थ, मॅकमिलन, ऑलिव्हर, हॅथार्नथ्वेट, इत्यादि प्राध्यापकांच्याविषयीं मोजकी माहिती देऊन राजवाडे पुण्याच्या डेक्कन कॉलेजकडे वळले आहेत. राजवाडे यांचा अभ्यास कसा रेंगाळत होता याचेंहि मोठें गंमतीचें चित्र आपणांस पाहावयास मिळेल. डॉ. भांडारकर व प्रा. सेल्बी यांच्याविषयी राजवाड्यांना आपुलकी वाटत असावी. आपण ज्ञानार्जनासाठीं शिकावें, देशासाठीं, समाजासाठीं कांहीं करावें ही शिकवण राजवाडे यांनीं विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यापासून घेतली. पण कॉलेजमधील आपलीं पांच वर्षे फुकट गेलीं असेंच त्यांनीं नमूद केलें आहे. "नोकर तयार करणाऱ्या डेक्कन कॉलेजबद्दल व त्यांतील शिक्षकांबद्दल माझ्या मनांत तिरस्कार उत्पन्न झाला. बारा आणि बारा चोवीस वर्षे शिक्षण द्यावयाचें नोकरीचें आणि युनिव्हर्सिटीच्या पदवीदान समारंभाच्या वेळीं परीक्षा पास झालेल्या सेवार्थी उमेदवारांना उपदेश करावयाचा स्वतंत्र धंदा करण्याचा किंवा सरस्वतीच्या एकान्त उपासनेचा, ह्या मानभावीपणाचाहि मला बहूत तिटकारा आला. वाजवीच आहे कीं, ह्या भाडोत्री शिक्षकांच्या गुलामगिरीच्या नोकऱ्यांचा व कंटाळवाण्या परीक्षांच्यापासून मी पराङ्मुख झालों व पुस्तकालयांतील ग्रंथांकडे एक दिलानें वळलों.–" विद्याभ्यासंगाकडे वळण्याची प्रेरणा अशी ही शिक्षणांतील अनास्थेमधून आहे हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे.

शाळा कॉलेजांतील अध्यापकांपासून प्रत्यक्ष असा फायदा राजवाडे यांना झाला नाहीं. इंग्रजींत बोलणें व इंग्रजींत विचार करणें ही एक दुष्ट खोड त्यांना लागली. या दुष्ट खोडीपायीं राजवाडे यांचें नुकसान कोणतें झालें व तीपासून कोणी वाचविलें यासंबंधीं ते लिहितात, "शाळेंत व कॉलेजांत प्राचीन व अर्वाचीन मराठी ग्रंथांशीं शिक्षकांनीं व परीक्षकांनीं माझी क्षणभरहि ओळख करूं दिली नाहीं. त्यामुळें स्वभाषेंत कांहीं प्रासादिक व नामांकित ग्रंथच नाहींत असें इतर परीक्षार्थ्यांप्रमाणें माझेंहि मत व्हावयास हरकत नव्हती. तशांत कुंटे, रानडे वगैरे विद्वान लोकहि मोठमोठीं व्याख्यानें इंग्रजींत झोडीत. कॉलेजांत बहुतेक सर्व विद्यार्थी इंग्रजींत बोलत. अशा स्थितींत मीहि बहुतेक सर्व व्यवहार इंग्रजींत करूं लागलों. बंधूंना व मित्रांना पत्रें लिहावयाचीं तीं इंग्रजींत. आचाऱ्यांशीं व गड्यामाणसांशीं बोलावयाचें तेंहि मराठीमिश्रित इंग्रजींत; डिबेटिंग सोसायटींत मोठमोठीं अद्वातद्वा व्याख्यानें द्यावयाचीं तीं इंग्रजींत; देशी कपडे वापरणारी मंडळी कॉलेजांत काढली, तिचें सर्व काम इंग्रजींत, व्यायामाचे सर्व प्रकार करावयाचे ते इंग्रजींत; सारांश, सतत पंधरा वर्षे बारा आणि बारा चोवीस तास सर्व कामें मी इंग्रजींत करूं लागलों. ह्या एवढ्या अवधींत मी मराठी बहुधा विसरून जावयाचा, परंतु दोघांतिघां गृहस्थांनीं मला ह्या विपत्तींतून वाचविलें. विष्णुशास्त्री चिपळोणकरांच्या टीकात्मक निबंधांनीं इंग्रजीच्या ह्या खग्रासापासून माझा बचाव केला. काव्येतिहाससंग्रहकारांच्या ऐतिहासिक पत्रांनीं स्वदेश म्हणून कांहीं आहे हें मला कळलें, परशुरामपंततात्या गोडबोले

ह्यांनीं छापिलेल्या काव्यांनीं महाराष्ट्र सारस्वताचा मला अभिमान वाटूं लागला.—"

राजवाडे १८९१ मध्यें बी. ए. पास झाले. नोकरी करावी असें त्यांच्या मनांत मुळांतच नव्हतें, त्यामुळें त्यांना या पदवीची किंमत वाटेना, शिवाय एवढें शिक्षण घेऊन शेवटीं स्वार्थत्याग, देशाभिमान इत्यादि सद्‌गुणांना पारखे व्हावें हेंहि त्यांच्या मनांत बोंचत राहिलें. ज्या माळावर डेक्कन कॉलेज उभें होतें तेथील वास्तूच्या ऐतिहासिक माहात्म्यानें त्यांच्या मनांत लहानसें कां होईना पण वादळ निर्माण केलें असावें. आपल्या या अवस्थेचें वर्णन करतांना राजवाडे यांनीं लिहिलें आहे, "१८९० त जेव्हां मी कॉलेज सोडलें तेव्हां त्या कॉलेजविषयीं माझ्या मनांत प्रेमबुद्धि बिल्कूल राहिली नाहीं. एकाहि शिक्षकानें मला तेथें कांहींच शिकविलें नसल्यामुळे, त्या शिक्षकांबद्दल किंवा त्या शिक्षणपद्धतीबद्दलहि मला फारसा प्रेमभाव उत्पन्न झाला नाहीं.... एक क्षुद्र परीक्षा सहजासहजी पास झालों असें मला वाटलें. नोकरीकरितां मीं परीक्षा दिली नव्हती व तिच्या हवाल्यावर मला कोठे भिकार अर्जहि करावयाचे नव्हते. तेव्हां द्रव्यदृष्टीनेंहि मला ह्या पदवीचें काडीमात्र कौतुक वाटलें नाहीं. सारांश द्रव्याच्या किंवा विद्येच्या किंवा गुरुशिष्यां-संबंधाच्या नात्यानें, ह्या कॉलेजविषयीं माझ्या मनांत आदरबुद्धि किंवा प्रेमबुद्धि लवमात्रहि जागृत झाली नाहीं. उलट, एक प्रकारची तिरस्कारबुद्धि मात्र प्रकट झाली; शिवाय ज्या स्थळावर डेक्कन कॉलेज बांधलें आहे त्या स्थळाचें माहात्म्यच असें आहे कीं त्या स्थळीं येणाऱ्या प्रत्येक मराठ्याला एक प्रकारचें औदासीन्यच प्राप्त व्हावें! १८१७ सालीं मराठ्यांचें राज्य जाण्याच्या सुमाराला खडकीची जी लढाई झाली म्हणून म्हणतात ती ह्याच स्थळीं झाली. होळकराचा पूल, खंडोबाचा माळ, व पलीकडील टेकाड हीं ह्या लढाईचीं मुख्य स्थळें होत. कॉलेजभोंवतील माळावर अद्यापहि मनुष्यांचीं हाडें कधींमधीं सापडतात म्हणून म्हणतात. ह्या ठिकाणीं मराठ्यांचा मोड झाला आणि मराठी राष्ट्राचा अंत झाला! अशा ह्या अपशकुनी जागेवर बांधलेल्या इमारतींत कोण्या मराठ्याचें मन रमेल?—"

कॉलेज सोडतांना राजवाडे यांच्या मनांत ही अशी खळबळ होती. कॉलेजांतून मुक्त झाल्यावर त्यांनीं म्हटलें कीं नोकरीच्या व गुलामगिरीच्या तुरुंगांतून सुटून, स्वतंत्र जगांत प्रामाणिकपणें संसारयात्रा क्रमण्यास आपण मोकळे झालों! असें असलें तरीसुद्धां राजवाडे दोनतीन वर्षें संभ्रमांतच होते. सन १८८८ मध्यें राजवाड्यांचें लग्न झालें. पुण्याचे विष्णु नारायण गोडबोले यांची मुलगी मथु ही राजवाडे यांची बायको अन्नपूर्णा. राजवाडे यांना सन १८९१ च्या सुमारास एक मुलगा झाला पण तो दोन महिन्यांचा होऊन मरण पावला. दुसऱ्या खेपेस मुलगी अपुऱ्या दिवसांची जन्मली व ती आणि तिची आई या दोघी स्वर्गवासी झाल्या. राजवाड्यांची लौकिक अर्थाची संसारयात्रा येथेंच संपली. प्रपंच कसाबसा का होईना पण चालावा म्हणून त्यांनीं कांहीं कालपर्यंत न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाची

नोकरी धरली होती. तीहि सन १८९३ मध्यें सोडून दिली. पुनः लग्न करण्याचें वय असतांना राजवाडे यांनीं त्या विचारास मनांत जागा दिली नाही.

राजवाडे आतां खऱ्या अर्थानें मुक्त होते. स्वदेशप्रीति, स्वार्थत्याग, कष्टाचे जीवन, अपरिग्रह वृत्ति इत्यादि गुणांचा जो कांहीं थोडा संस्कार योगायोगानें त्यांच्या मनावर झालेला होता त्यांच्या विकासास संधि येथून पुढें मिळत गेली. राष्ट्राच्या उद्धाराचें साधन म्हणून इतिहाससंशोधन हा विषय आपल्या जीवितकार्याचा प्रमुख म्हणून त्यांनीं ठरविलें तें आणखी पांचसात वर्षांनीं. याच्याहि आधीं म्हणजे सन १८९३ च्या सुमारास 'भाषांतर' मासिक काढण्याचें त्यांनीं ठरविलें. सन १८९४ मधोल जानेवारींत या मासिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. मराठी भाषेंत इंग्रजी भाषेंतील जोरदार विचार आणून जागृति निर्माण करावी, राष्ट्राच्या उद्धाराची दिशा दाखवावी या हेतूनें कांहीं प्रेरक ग्रंथांचें भाषांतर देण्याचा राजवाडे यांचा विचार होता. पहिल्याच अंकांत राजवाडे यांनीं आपला उद्देश स्पष्ट केला आहे.

"आपला हा देश प्रौढावस्थेप्रत पोहोचून स्वतंत्र व्हावा अशी आपली सर्वांची इच्छा आहे. परंतु त्या उत्तमोत्तम स्थितीचा अनुभव घेण्यास अद्याप आपण पात्र नाहीं. कारण स्वतःचा कारभार चालविण्याची योग्यता अंगीं येण्यास जें सामर्थ्य हवें आहे त्याचा आपल्यापाशीं हवा तसा संचय होण्यास अजून दहा पांच पिढ्या गेल्या पाहिजेत.

"ह्या सामर्थ्याभावाचें मूळ आपल्या राष्ट्राचें मन हें होय. तें अति कोतें व दुर्बल झालें आहे. त्याला स्वतःच्या स्थितीचें व परिस्थितीचें ज्ञान मुळींच नाहीं. ...... हें अज्ञान अशिक्षित वर्गांतच तेवढें आहे असें नव्हे. सुशिक्षित ह्या दिखाऊ नांवाखाली मोडणाऱ्या लोकांच्या ठायीं देखील ह्याचें वास्तव्य प्रबल आहे. दुर्गुण व दुष्ट विचार ह्यांचा पगडा सार्वत्रिक बसलेला आहे, आणि पोकळ डौल व नसती प्रौढी मिरविण्याची कोणालाच खंत वाटत नाहींशी झालेली आहे.

"ही अविद्या व हें अज्ञान ह्यांचा परिणाम कर्तव्यपराङ्मुखताहि आहे. आपला देश, आपला धर्म, आपली भाषा व आपले विचार ह्यांना सर्वांनींच सोडलें आहे. ज्या बंधांच्या योगानें राष्ट्रत्व प्राप्त होतें त्यांचा आम्ही अव्हेर करतों व ज्यांच्या योगानें तें नष्ट होतें त्या कर्मांचा आम्ही स्वीकार करतों. अशिक्षितांना अज्ञानामुळें राष्ट्रत्वाची कल्पनाच झालेली नाहीं म्हणून, शिक्षितांच्या गैरसमजानें त्यासंबंधीं खोट्या कल्पना झाल्या आहेत म्हणून, देशाभिमानाचा, धर्माभिमानाचा, भाषाभिमानाचा, व आचाराभिमानाचा सर्वत्र सारखा लोप झालेला दिसतो. तेव्हां त्याचा प्रतिबंध करण्यास योग्य उपायाची योजना केली पाहिजे. ती वेळीं न झाल्यास यहुदी राष्ट्राप्रमाणें आपण कदाचित् ह्या भूतलावरून नष्ट होऊं.

"देशाचा, धर्माचा, व आचारांचा खरा अभिमान जागृत राहण्यास बोलणें,

चालणें, लिहिणें, शिकणें व विचार करणें मराठींत झालें पाहिजे. त्याशिवाय कर्तव्याचा पक्का व कायमचा ठसा आपल्या मनावर उमटावयाचा नाहीं. जगतावर जे विचार आज प्रचलित झालेले आहेत, ते सर्व मराठी भाषेंत उतरल्यास मात्र लोकांस ते यथास्थित समजतील असें आमचें ठाम मत आहे. हा हेतु सफल करण्याचे मार्ग दोन आहेत. स्वतंत्र लेख लिहिणें हा पहिला व अन्य भाषांतील उत्कृष्ट विचारांचे तर्जुमे मराठींत करणें हा दुसरा. ह्यांपैकीं दुसऱ्याचें अवलंबन प्रस्तुत स्थलीं केलें आहे.— ”

आपला हेतु सांगून उत्तमोत्तम विचारप्रवर्तक ग्रंथांनीं राष्ट्राचा स्वाभिमान कसा वाढीस लागतो याचें विवेचन करतांना राजवाडे लिहितात,

“ लोकस्थिति सुधारावयाची असेल तर ती आंतून सुधारली पाहिजे. लोकांतील परस्पर संबंध काय आहेत, त्यांनीं स्थापिलेल्या संस्थांचे हेतु काय असतात, राजाचा अधिकार किती असावा आणि प्रजेचे हक्क कोणते आहेत, ते इतकेच कां असावेत आणि जास्त कां नाहींत, धर्म, नीति, जाति, इत्यादि बंधनें अस्तित्वांत कां आलीं व कशीं आलीं, हे व असले आणीक प्रश्न जे लाखों आहेत, त्यांवर समाजाची इमारत रचलेली आहे. तेव्हां या विषयांचें विवेचन ज्या ग्रंथांत येणार त्यांचे परिशीलनानें लोकस्थितींत अंतर पडेल यांत नवल तें कोणतें ? उदात्त विचार, दूरदृष्टि, बुद्धीची कुशाग्रता, स्वातंत्र्याची प्रीति आणि गुलामगिरीचा तिरस्कार, डामडौलाचा आळस आणि सुधारणेची आवड, आपल्या देशाचा, भाषेचा आणि लोकांचा अभिमान, सत्याची चाड आणि लांगूलचालनाचा द्वेष इत्यादि असंख्य सद्‌गुणांची स्फूर्ति अंतःकरणांत उत्पन्न होण्यास उत्तम ग्रंथांचे अध्ययनासारखा दुसरा मार्ग नाहीं. — ”

राजवाड्यांचें हें मासिक सदतीस महिने चाललें. या अवधींत पुढील ग्रंथ कांहीं पूर्ण, कांहीं अपूर्ण स्वरूपांत मराठी भाषेंत आले. १ प्लेटोकृत फीडो अथवा आत्म्याचें अमरत्व, २ प्लेटोकृत क्रीटो अथवा कर्तव्यकर्म, ३ तर्कभाषा, ४ बर्ककृत वसाहतींशीं सख्य, ५ बिशप बटलरचीं व्याख्यानें, ६ पेनकृत सारासार विचार, ७ झेनामनकृत हीरो अथवा राजांची दैन्यावस्था, ८ युरोपांतील गुप्तमंडळ्या ९ प्लुटार्ककृत लायकरगसाचें चरित्र, १० मिल्लकृत जनपदहितवाद, ११ सॉक्रेटिसाचें, स्वमतसमर्थन, १२ अरिष्टोफेनिसाची लिसीस्ट्राटा, १३ बेकनकृत विद्यांची वृद्धि, १४ ऐने अकबरी, १५ फेरिस्ताचा हिंदुस्थानचा इतिहास. यांखेरीज शांकरभाष्य, मानवीबुद्धि, इंग्लंडची राजनीति, ॲरिस्टॉटलची राजनीति, माधवांचा सर्वदर्शन-संग्रह, रोमन पातशाहीचा ऱ्हास व नाश, प्लेटोचें स्वराज्य याहि ग्रंथांचें भाषांतर या मासिकांत सुरू होतें. हा सर्व उद्योग एवढ्या प्रमाणावर राजवाडे यांनीं कां सुरू केला हें वर आलेंच आहे “ पश्चिमेकडे जें निरनिराळ्या शास्त्रांतील अगाध

ज्ञान निर्माण होत आहे अशा तऱ्हेचें स्वतंत्र ज्ञानभांडार निर्माण करण्याची कुवत तूर्त आपणांस नसल्यामुळें तूर्त तेंच आपण मराठी भाषेंत आणण्याचा प्रयत्न करावा" असें राजवाड्यांचें मत होतें. या मतास अनुसरून आपल्या मासिकाचें प्रथम वर्ष संपताच राजवाडे यांनी 'गतवर्ष' म्हणून जो आपल्या उद्योगाचा आढावा घेतला आहे त्यांतहि राजवाडे यांची देशहिततत्परता व स्वभाषाप्रीति दिसून येते. आपण करावयाच्या कर्तव्याबद्दल तर ते फारच तळमळीनें लिहितात. प्रस्तुत निबंधांत ते लिहितात,

"सरकारच्या मानभावी कळकळीवर विशेष भिस्त न ठेवितां व महाराष्ट्रांतील उच्च मंडळीच्या पूर्व वयांतील अनास्थेकडे दुर्लक्ष न करतां आपल्याला आपलें कर्तव्य बजावलें पाहिजे. त्याची हलगर्जीपणानें आपण हेळसांड केली तर पुढील पिढ्यांचे अभिश्राप आपल्याला घ्यावे लागतील आणि आपल्या कर्तव्यशून्यतेबद्दल व मनाच्या दुबळेपणाबद्दल इहलोकीं आपला विशेष बोजा न राहतां परलोकी आपल्याला झाडा द्यावा लागेल. दुनिया अबादी अबाद असतांनाही मनुष्याला आपल्या कर्तव्याला जपावें लागतें. मग सर्व बाजूनें कालचक्र फिरलें असतां, राष्ट्रांतील एकोन एक लोक देशोधडीला लागेल असतां, उलट्या काळजाच्या शत्रूनें सर्वतोपरी नागविलें असतां, मतलबी लोकांच्या गोड बोलण्याला उच्च मंडळी भुलून गेली असतां परकीय मंडळींनीं सुचविलेल्या अश्रुतपूर्व विषयांची निष्फल वाटाघाट करण्यांत सर्व लोक गुंग होऊन गेले असतां, निष्कामबुद्धीनें व एकतानतेनें कर्तव्य बजावण्याची आवश्यकता विशेषच असते हें निर्विवाद आहे. अशा वेळीं लहानसहान संकटांना भिऊन जाऊन किंवा जुजबी व अल्पकालीन फायद्याकडे नजर देऊन, जो मनुष्य कर्तव्याला विसरेल त्यानें आत्मघात केला येवढेंच नव्हे, तर देशघात केला असेंही होईल.

"ह्यावर कोणी असा प्रश्न विचारील कीं, हें असें खडतर कर्तव्य तरी कोणतें? तर तें स्वत्वरक्षण हें होय, असें आम्हीं उत्तर करतों. हें स्वत्व म्हणजे काय? तर तें फार मिश्ररूपी आहे. त्यांत देशाचा, भाषेचा, धर्माचा, आचाराचा, विचाराचा, विकाराचा, गोत्राचा, हवेचा, पूर्ववृत्ताचा, सुधारणेचा व खोडींचा अंतर्भाव होतो. या सर्व गोष्टी हजारों वर्षांच्या अनुभवाचें फल होत. ह्या आपल्या राष्ट्राच्या शरीरांत इतक्या कांहीं खिळून गेलेल्या आहेत कीं ह्यापैकीं कोणत्याहि एकीचें स्वरूप बदलूं म्हटलें तर तें मोठें अपायकारक होईल. आपल्याला जें काय करावयाचें असेल तें ह्या गोष्टींच्या अनुसंधानानें करून घेतलें पाहिजे. महाराष्ट्रासारखा सर्व वस्तूंनीं संपन्न असा देश, भगवंतांनीं अर्जुनाला सांगितलेला सर्वांत श्रेष्ठ असा सनातन धर्म, शरीरास सुखावह होतील असे शुद्ध आचार, सर्वदेशीं व सर्वकाळीं विद्वानांना संमत होतील असे रामदासांच्यासारख्यांचे विचार, गोहत्येला पाहून संतप्त होणारे विकार, सत्ययुगांतील वेदर्षींशीं संबद्ध असलेले गोत्र, मनाला व

शरीराला उत्साह देणारी डोंगरी व मैदानी हवा, छत्रपति शिवाजीराजाच्या पराक्रमाचें पूर्ववृत्त, सर्व जातींना सारखा मान देण्याची सुधारणा आणि मद्यपी व मांसाहारी लोकांचा द्वेष करण्याची खोडी, इत्यादि अनुपम वस्तूंचे वारसदार आपल्या परमपूज्य पूर्वजांनीं आपल्याला करून ठेविलें आहे. परंतु, भगवति भवितव्यतेच्या पुढें कोणाचीहि मात्रा चालत नाहीं. ह्या सर्व वस्तू दूरदेशच्या तोतयांकडे गहाण पडलेल्या आहेत. आपलीशी म्हणावयाला टीचभरही जागा राहिली नाहीं; सनातन धर्माचा असद्धर्मापुढें लोप होत चालला; अर्यांचा आचार जाऊन बुटणेरी रिवाजांची गोडी लागली; परभाषेंतील शब्दांचा अभ्यास कर करून विचाराला वाव राहिली नाहीं; खुद्द कसाईखाने बघूनही विकार थंड होऊन बसले; गोत्राचा नामनिर्देशही आठवेनासा झाला; डोंगरपठारांवर व मुलखमैदानांवर कांपांची स्थापना झाली; पूर्वजांच्या इतिहासाचीं साधनें गेलीं; दुर्धारणा अतिशय माजली; व मद्यमासांवर उत्तरोत्तर प्रेम जडत चाललें. येणेंप्रमाणें सर्व गोष्टींची थोडीफार विल्हेवाट लागत चालली आहे. फक्त तोंड मात्र बिचारें मोकळें राहिलेलें आहे व त्याच्यावर आपल्या भावी ऐश्वर्याची सर्व मदार आहे !

"आणि, तें कांहीं खोटें नाहीं. भाषा ही समाजाचें बंधन आहे; भाषा ही विचाराचें वाहन आहे, भाषा ही धर्माचें पुरस्करण आहे. भाषेशिवाय मनुष्यप्राणी संभवत नाहीं. भाषा व मनुष्य ह्या दोन वस्तूंचें सामान्याधिकरण्य आहे. ह्या ईश्वरी देणगीच्या द्वारें एकमेकांचीं सुखदुःखें आपण एकमेकांस कळवितों. ही मायादेवी जें जें स्वरूप धारण करील त्याप्रमाणें निरनिराळ्या उच्च नीच विकारांची मोहनी मनुष्यमात्रावर पडते. सर्व मानवी शक्यता हिच्या कृपाकटाक्षावर अवलंबून आहे. उदार विचारांचे अंकूर ह्या अमृतवल्लीलाच तेवढे फुटतात. हिच्या अभावी सर्वत्र स्तब्धता व शून्यता राज्य करते. ह्या देवतेची मनोभावेंकरून आराधना केली असतां सर्व कांही प्राप्त होतें. व वर सांगितलेले बहुरूपी जें स्वत्व त्याचेंही रक्षण हिच्याच साहाय्यानें होतें."

राजवाडे यांनीं 'भाषांतर' मासिक नेटानें चालविलें होतें. पण पुढें प्लेगच्या संकटामुळें पुण्याच्या सार्वजनिक जीवनांत मोठेंच संकट निर्माण झालें आणि त्यांत हें मासिक समाप्त झालें. राजवाडयांच्या या मासिकाबरोबरच कोल्हापुरास 'ग्रंथमाला' नांवाचें मासिक प्रो. वि. गो. विजापूरकर काढीत असत. त्यांतहि राजवाडे लेखन करीत. 'भाषांतर' मासिक बंद पडलें तरी राजवाडे यांचें चित्त त्यांना स्वस्थ बसूं देईना. कॉलेजांत असल्यापासूनच इतिहास व त्याचें अध्ययन आणि त्यांतून स्वदेशप्रीति हा एक विषय त्यांचा आवडता बनला होता. रावबहादुर काशीनाथपंत साने यांचा 'काव्येतिहास संग्रह,' विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा 'इतिहास' हा निबंध व मराठ्यांच्या इतिहासावरील इंग्रज लेखकांचे ग्रंथ वाचून राजवाडे यांच्या मनांत कल्लोळ निर्माण झाले असावेत.

राजवाडे यांच्या इतिहाससंशोधनाच्या कामगिरीस प्रारंभ झाला तोहि प्रसंग थोडया विस्तारानें निवेदन करण्यासारखा आहे.

वाई येथील काकाराव पंडित हे राजवाडे यांचे न्यू इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थी. सन १८९५।९६च्या सुमारास रावबहादुर काशीनाथपंत साने यांचें पुण्यास 'महाराष्ट्र इतिहासाचें महत्त्व' यावर एक व्याख्यान झालें व त्याचा वृत्तान्त केसरींत प्रकट झाला. तो वाचून मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें आपण खटपट करून शोधावींत अशी इच्छा पंडित यांना झाली. काकाराव पंडित यांनीं लिहिलें आहे, 'आम्ही हल्लीं ज्या वाड्यांत राहात आहों त्यांतील तिसऱ्या मजल्यावरील एका अंबारींत एक जुन्या कागदांचें मोठें पेटार सांपडलें. तें मालकानें त्यांत कांहीं लभ्यांश नाहीं असें समजून कसें तरी अस्ताव्यस्त टाकिलें होतें. त्यांत असलेले जुने कागदपत्र एकदां वांचून पाहावें, असें वाटून मीं व त्या वेळीं मजबरोबर कायद्याचा अभ्यास करीन असलेले माझे अत्यंत सन्मान्य मित्र कै. रंगो वासुदेव बोपर्डीकर यांनी तें दप्तर सहज चाळून पाहण्यास सुरुवात केली. पहिलेंच पत्र पानपतचे लढाईचे आधीं गोविंदपंत बुंदेले यांनीं लिहिलेलें सांपडलें. तें इतिहासमय पत्र पाहून मजला व माझे मित्र कै. बोपर्डीकर यांना जो आनंद झाला त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. आम्ही उभयता सर्व धंदे सोडून तेंच काम हातीं घेतलें व सर्व दप्तर चाळून त्यांतून आमचे बुद्धीप्रमाणे जो जो महत्त्वाचा म्हणून कागद असेल तो तो एके बाजूस ठेवला. याप्रमाणें एक पुस्तक तयार होईल इतकी सामग्री तयार केली.[१]" ही सर्व हकीगत प्रो. आबासाहेब काथवटे यांच्या-मार्फत राजवाडे यांच्यापर्यंत आली. आणि लागलीच "निरलस विसुभाऊ त्याच रात्रीं पुण्याहून वाईस येण्यास निघाले व दुसरे दिवशीं सकाळीं माझेकडे आले व एकदम सर्व दप्तर पाहण्यास सुरुवात केली. कांहीं एक विश्रांति न घेतां एकसारखे सर्व कागद आणि कागद अथपासून इतिपर्यंत वाचावयाचा, याप्रमाणें त्यांनीं काम केलें व दोन महिन्यांत सर्व दप्तर तपासून इतिहाससंबंधीं सर्व कागद घेऊन ते पुण्यास रवाना झाले. तेथे श्रीविठ्ठल छापखान्यात ते कागदपत्र छापण्यास त्यांनीं सुरुवात केली. दुर्दैवानें श्रीविठ्ठल छापखाना जळून गेला. राजवाडे यांचें भयंकर नुकसान झालें व ते तणतणत वाईस आले. व आम्हीं मी व रा. बोपर्डीकर यांनीं सर्व दप्तर फिरून बालबोधींत लिहून काढलें. तें छापण्याची व्यवस्था वाईस राजवाडे यांनीं मोदवृत्त छापखान्यांत केली. त्या वेळीं राजवाडे यांची त्या दप्तराशीं इतकी तन्मय वृत्ति झाली होती कीं, त्यास आहारनिद्रादि कोणताहि व्यवहार बिलकुल सुचत नसे. रात्रीं, दिवसां, पहाटें, संध्याकाळीं, ज्या वेळेस पहावें त्या वेळीं राजवाडे दप्तराचा अभ्यास करीत असलेले दिसावयाचे.[२]"

१–ब्राह्मण मासिक पत्रिकेचा राजवाडे तिलांजलि अंक, पृष्ठ ५५.

२–कित्ता, पृष्ठ ५५.

याप्रमाणें दीर्घ प्रयत्नांतून 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड १ ला' सिद्ध झाला. खरें म्हणजे हें पुस्तक छापण्याचा हा तिसरा प्रयत्न. राजवाडे यांच्या प्रयत्नांस अडचणीच फार. पहिले फॉर्में श्री विठ्ठल छापखान्यांत जळाले व राजवाडे यांचें एक हजार रुपयांचें नुकसान झालें. दुसऱ्यांदा सापकरांच्या छापखान्यांत छापणें सुरू झालें पण त्यांत अशुद्धें फार राहिलीं म्हणून सर्व काम वांईस मोदवृत्त छापखान्यांत करावें असें ठरलें. हा पहिला खंड मोदवृत्त छापखान्यांतून सन १८८९ मध्यें छापून तयार झाला. या संग्रहांत पानिपतच्या युद्धासंबंधींचीं ३०४ पत्रें सन १७५० पासून १७६१ पर्यंतचीं आहेत. हा खंड डेमी आकाराचा ४०९ पृष्ठांचा आहे. या खंडास राजवाडे यांनीं लिहिलेली १२७ पृष्ठांची विवेचक प्रस्तावना महाराष्ट्रांत फारच गाजली. खंड छापखान्यांतून बाहेर पडतांच दीडशें प्रती ताबडतोब खपल्या. सूक्ष्म अशा विवेचनबुद्धीचा व प्रखर प्रतिभेचा एक श्रेष्ठ इतिहाससंशोधक म्हणून राजवाडे यांची कीर्ति महाराष्ट्रांत एकदम पसरली. या खंडांतील पत्रांसंबंधीं राजवाडे यांनीं लिहिलें आहे,

'लेखांक ३ पासून लेखांक २५ सुद्धां पत्रें पैठणास वाण्याच्या दुकानीं मिळालीं. लेखांक २६ पासून (लेखांक ४८ खेरीज करून) लेखांक ५० सुद्धां पत्रें मिरज येथील वासुदेवशास्त्री खरे ह्यांनीं दिलीं. लेखांक १, २, ४८ व लेखांक ५१ पासून लेखांक १२२ सुद्धां पत्रें वाई येथील गोविंदराव भानु यांच्या येथील आहेत. लेखांक १२२ पासून लेखांक ३०४ सुद्धां सर्व पत्रें वांई येथील दादासाहेब येरंडे यांच्या दप्तरांतील आहेत. दादासाहेब येरंडे यांचे पूर्वज जनार्दनपंत येरंडे ह्यांना नानासाहेबांनीं गोविंद बल्लाळ बुंदेलखंडांतील पेशव्यांचे मामलतदार यांजवर दरखदार म्हणजे तपासनवीस म्हणून पाठविले होते. येरंडे हे १७५७ पासून १७६१ पर्यंत बुंदेलखंड व अंतरवेद ह्या प्रदेशांत होते. त्या अवधींत हीं पत्रें त्यांच्याजवळ आलीं तीं त्यांनीं देशीं परत आल्यावर वांई येथें आपल्या वाड्यांत ठेवून दिलीं. तीं १७६१ पासून १८९७ एप्रिलपर्यंत त्यांच्या वाड्यांतील एका अंबरांत एका कातड्यानें मढविलेल्या पेटाऱ्यांत शाबूत, कोरींकरकरीत, जशीं त्या तशींच पडून होतीं—'

या पडून राहिलेल्या पत्रांचा राजवाडे यांनीं उद्धार केला व इतिहाससंशोधनास एक नवी दिशा लावून दिली. राजवाडे यांनीं या खंडांत पानपतच्या संग्रामाच्या यशापयशाची कारणमीमांसा विस्तृतपणें केली असून महाराष्ट्र—धर्म, मराठ्यांच्या राज्यविस्ताराची धोरणमीमांसा यांसारख्या अनेक महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा केली आहे. राजवाडे यांनीं आपलें आयुष्य इतिहाससंशोधन व तत्सम विषय यांच्या उपासनेंत घालविण्याचा निश्चय यानंतर कायम केला; व त्या दिशेनें इतिहासाचीं साधनें शोधण्यासाठीं त्यांची उभ्या महाराष्ट्रांत भ्रमंती सुरू झाली. पुढील पंधरावीस वर्षांत म्हणजे सन १९१७–१८ पर्यंत राजवाड्यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचे बावीस खंड प्रसिद्ध केले. या खंडांचीं एकूण पृष्ठें पांच साडेपांच हजार

पर्यंत असून कांहीं भागांना लिहिलेल्या विवेचक प्रस्तावनांचीं पृष्ठेंहि पांचशें साडेपांचशेंपर्यंत आहेत! हीं सर्व साधनें प्रसिद्ध करण्यांत राजवाडे यांना अण्णासाहेब विजापूरकर व त्यांचें 'ग्रंथमाला' मासिक यांचा फार मोठा उपयोग झाला.

राजवाडे यांचें भ्रमण आतां या एकाच विषयासाठीं सर्वत्र होऊं लागलें. सन १९०३ मध्यें धुळेकर मंडळीशीं राजवाडे यांचा संबंध आला. शंकर श्रीकृष्ण देव, भास्कर वामन भट, गोविंद काशीनाथ चांदोरकर यांचेशीं राजवाडे यांचा संबंध आल्यानंतर राजवाडे यांचें दरवर्षी धुळ्यास जाणें येणें सुरू झालें. राजवाडे यांचें इतिहाससंशोधन साधनखंडांच्या द्वारां चालू असतांनाच भाषा, व्याकरण, समाजविचार, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, राजकारण इत्यादि विषयांवरहि मूलगामी संशोधन राजवाडे यांनीं त्या वेळच्या प्राचीप्रभा, राष्ट्रोदय, सरस्वतीमंदिर, ग्रंथमाला, विश्ववृत्त इतिहाससंग्रह, विद्यासेवक इत्यादि मासिकांतून निरनिराळे लेख लिहून केलें. धुळ्याहून प्रसिद्ध होणाऱ्या इतिहास व ऐतिहासिक या मासिकांतहि राजवाडे यांचें अनेक लेख प्रसिद्ध झाले. इतिहाससंशोधनकार्यास स्थायी व बळकट स्वरूप यावें म्हणून त्याला सामुदायिक स्वरूप म्हणजे संस्थात्मक जीवन प्राप्त करून देण्याचा प्रयत्न राजवाडे यांनीं केला. सुशिक्षित लोकांनीं एकत्र येऊन निरनिराळ्या विषयांवर सामुदायिक पद्धतीनें विचार करावा व निरनिराळ्या कार्यांसाठीं निरनिराळ्या संस्था स्थापन कराव्यात असा राजवाडे यांचा आग्रह होता. राज्यकर्त्यांच्या इतकें सर्व प्रकारचें बल आपणांस यावयास पाहिजे व त्यासाठीं भौतिक ज्ञानाची उपासना, यंत्रकलेची वाढ, हत्यारांची प्रगति यांसारख्या उपक्रमांकडे आपण लक्ष द्यावयास हवें असें राजवाडे यांना निश्चयानें वाटूं लागलें होतें.

'संशोधक' मासिकांत राजवाड्यांच्या नोंदी प्रसिद्ध झाल्या आहेत. ती यादी वाचल्यानंतर राजवाडे यांची दृष्टि किती चौफेर होती याची साक्ष पटते. केमिकल सोसायटी, फिजिकल सोसायटी, बॉयॉलॉजीकल सोसायटी, अँथ्रॉपॉलॉजिकल सोसायटी, जिऑग्रॅफिकल सोसायटी, येथपासून आरोग्यमंडळ, रेल्वेसुधारणा मंडळ, वेदान्त सोसायटी, भक्ति सोसायटीपर्यंत मंडळें महाराष्ट्रसमाजाच्या उद्धारार्थ असावींत असें राजवाड्यांना वाटें. स्वतःचा जो आवडता उद्योग इतिहाससंशोधन यासाठींहि एखादें मंडळ असावें असें राजवाडे यांच्या मनानें घेतलें. अमेरिकन हिस्टॉरिकल असोशिअन व तिचें कार्य यांविषयीं राजवाडे यांच्याजवळ बरीच माहिती होती. राजवाडे, गणेश व्यंकटेश जोशी, काशीनाथ नारायण साने, तात्यासाहेब मेहेंदळे या सर्वांनीं इतिहास संशोधनासाठीं एखादें मंडळ असावें अशी एकत्र चर्चा केली व राजवाडे यांच्या प्रेरणानें पुण्यास शके १८३२ मध्यें आषाढ शु. प्रतिपदेस भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना झाली. खंडेराव चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब मेहेंदळे हे मंडळाचे पहिले चिटणीस झाले. साधनें जमा करणें, लेखांचा करणें, तो रक्षण करणें, त्यांची प्रसिद्धी करणें, ऐतिहासिक संग्रहग्रंथ जमविणें, ताम्रपट

शिलालेख, जुने नकाशे, नाणीं इत्यादींचा संग्रह वाढविणें इत्यादि कार्यास यापुढें सामुदायिक स्वरूप यावयाचें होतें. मंडळाचे सभासद प्रथमपासूनच कार्यास उत्सुक होते. पहिलीं कांहीं वर्षें मंडळाच्या सभा सरदार मेंहेंदळे यांच्या वाड्यांतच भरत असत. पहिल्या पांच वर्षांत पांचशेंवर निबंध वाचले गेले, त्यांतील दोनशें एकट्या राजवाड्यांचेच होते. मंडळाचीं पहिलीं पांचसहा वर्षें मोठ्या प्रगतीचीं व उत्साहाचीं गेलीं, परंतु पुढें अनेक कारणांनीं राजवाडे व मंडळाचे इतर सभासद यांचें बिनसलें. राजवाडे यांचे संशोधनपर लेख वेळोवेळीं प्रसिद्ध न होणें, मंडळाचा जमाखर्च बरोबर न ठेवणें इत्यादि बाबींवरून मतभेद सुरू झाले. धुळेकर व पुणेकर असाहि संघर्ष वाढूं लागला. शके १८३८ म्हणजे सन १९१६ मध्यें राजवाडे यांनीं गागाभट्टकृत शिवराजप्रशस्ती व कायस्थधर्मप्रदीप या नांवाचा एक निबंध वाचला. यायोगें चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंत एकच खळबळ उडाली. दोन पक्ष यांतून निर्माण झाले. आघातप्रत्याघात रागावून संतापून वृत्तपत्रांतून होत राहिले. आणखी कांहीं क्षुल्लक कारणें झालीं आणि राजवाडे यांचा संबंध १९१८ या वर्षापासून मंडळापासून कायमचा संपला! पुढील आठ वर्षांत म्हणजे निधन समयापर्यंत राजवाडे भारत इतिहास संशोधक मंडळाच्या कोणत्याहि कार्यांत सहभागी झाले नाहींत.

अनेक आपत्तींना तोंड देऊन स्वार्थत्यागावर एखादा उद्योग जवळ पैसा नसतांना उभा करावा पण त्यास म्हणावेसें साह्य मिळूं नये हें भाग्य सर्व अचाट कर्तृत्वाच्या लोकांच्या वाट्यांस आलें आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाशीं राजवाडे यांचा संबंध संपल्यावर त्यांचें लक्ष केवळ इतिहासावर केंद्रित न राहतां वेदकालीन इतिहास, सामाजिक घडामोडी, महाराष्ट्राचा वसाहत काळ, व्याकरण, भाषेची निर्मिति, व्युत्पत्ति यांसारख्या विषयांकडे वळलें. कोणताहि विषय ऐतिहासिक दृष्टीनें पाहणें व त्याचा देशोद्धाराकडे उपयोग करणें हें त्यांचें सूत्र कायम होतें. 'संस्कृत भाषेचा उलगडा,' 'भारतीय विवाहपद्धति' या त्यांच्या लेखमाला यानंतरच्या काळांत विशेष गाजल्या. धातुकोश व नामादिशब्दव्युपत्तिकोश हीं राजवाडे यांचीं आवडतीं व प्रचंड कार्यें याच वेळीं चालू होतीं. 'राधामाधव विलासचंपू' हें जयराम पांड्ये विरचित काव्य सन १९२२ च्या सुमारास राजवाडे यांनीं संपादून प्रसिद्ध केलें. यास जोडलेली विस्तृत प्रस्तावना पुनः एकदां राजवाडे यांच्या पल्लेदार विवेचनशक्तीची द्योतक ठरली. शहाजीराजे यांचें कर्तृत्व, त्यांचेवेळचा महाराष्ट्रसमाज व शहाजीच्या मर्यादित कामगिरीची मीमांसा राजवाडे यांनीं विस्तृतपणें केलेली आहे. मराठ्यांच्या समाजाविषयीं राजवाडे यांचा अभ्यास या निमित्तानें जो प्रगट झाला त्याचा इष्ट व समर्पक परिपाक आणखी दोन वर्षांनीं म्हणजे १९२४ मध्यें त्यांनीं जी महिकावतीची उर्फ माहीमची बखर प्रसिद्ध केली तिच्या प्रस्तावनेंत आकारास आला. कोंकणच्या इतिहासाचें अगदीं नवें पर्व राजवाडे यांनीं या प्रस्तावनेच्या निमित्तानें उभें केलें व महाराष्ट्रांतील आदिवासी,

आर्य, अनार्य राजांच्या मनोवृत्तींची विवेचक व उद्‌बोधक चर्चा केली आहे.

मराठी वाङ्मय, मराठी भाषा, कोश, व्याकरण हेहि राजवाड्यांचे आवडते विषय होते. सन १९०२ सालीं त्यांनीं लिहिलेला 'कादंबरी' हा निबंध आजहि टीकाकारांना विचारप्रवर्तक वाटेल. मोरो केशव दामले यांच्या शास्त्रीय मराठी व्याकरणावर परीक्षणात्मक म्हणून राजवाडे यांनीं जे लेख लिहिले ते सुबंत विचार, तिङन्त विचार या नांवांनीं प्रसिद्ध असून राजवाडे यांची चिकित्सक वृत्ति, मूलग्राही संशोधन करण्याची दृष्टि व ऐतिहासिक दृष्टि यांचा उत्कृष्ट बोध त्यांच्या या व्याकरणविषयक लेखांनीं होतो. सन १९०९ मध्यें धुळ्याहून राजवाड्यांनीं आपली 'ज्ञानेश्वरी' एकनाथपूर्वकालची म्हणून प्रसिद्ध केली. "ज्ञानदेवांच्या समकालीन कवि मुकुंदराज नांवाचा होता. त्याची स्वतःची एक ज्ञानेश्वरीची प्रत त्यानें आपला शिष्य विद्याधर यास दिली. त्याजपासून ती 'विश्वनाथु कोनेर धोलर-देवनुरकर यास मिळाली; व या पुरुषापासून परंपरेनें ती जात जात बालेघाटीं बीड शहरात पाटांगण नांवाचे देवस्थानांत आली! या संस्थानचे सांप्रतचे मठाधिपती मथुरानाथ गोसावी यांनीं ही प्रत प्रसिद्ध संशोधक रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांस पांच वर्षांपूर्वी दिली. व सांप्रतचा ग्रंथहि त्यांनीच संपादित केला आहे. प्रस्तुतची ज्ञानेश्वरी म्हणजे खुद्द ज्ञानेश्वरांनीं नेवाशास भाषेच्या ज्या स्वरूपांत ती सांगितली, त्याच स्वरूपांत तंतोतंत छापलेला हा महाराष्ट्र वाङ्मयांतील बहुमोल ग्रंथ होय." असा अभिप्राय लो. बाळ गंगाधर टिळक यांनीं राजवाडेकृत ज्ञानेश्वरी विषयीं दिलेला आहे.[१] या ज्ञानेश्वरीस राजवाडे यांनीं १०६ पानांची विस्तृत प्रस्तावना लिहिली असून तींत मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाची विस्तारानें मीमांसा केली आहे. शेवटीं एक विस्तृत शब्दकोशहि देण्यांत आलेला आहे. याच सुमारास राजवाडे यांचें 'ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण' प्रसिद्ध होऊन अभ्यासकांना निरंतरचें एक खाद्य मिळालें.

शेवट आठदहा वर्षे राजवाडे धुळे येथेंच वास्तव्य करून होते. मधून मधून उन्हाळ्याच्या वेळीं ते तळेगाव दाभाड्यास येत असत. शेवटचीं कांहीं वर्षे धातुकोश व नामादि शब्दांच्या व्युत्पत्तीचा कोश हीं दोन प्रचंड कार्यें उभीं करण्यासाठी राजवाडे अहोरात्र श्रम घेत होते. त्यांचा स्वभाव तापट होता, शीघ्रकोपी व लहरी म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या विक्षिप्तपणाच्या अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. त्यांची तामसी वृत्ति सांभाळून घेणारीं कांहीं जिवलग माणसें धुळ्यास होतीं. त्यामुळें 'सर्व शरीर विटेसारखें भाजून निघतें' अशी अवस्था असली तरी धुळ्याची हवा त्यांना मानवली होती. पण अखंड परिश्रम, एकसारखें चिंतन व आहाराबद्दल बेफिकीरी यांमुळे राजवाडे यांची प्रकृति क्षीण बनली. राजवाडे स्वतःच्या

१ केसरी, २५ ऑगस्ट १९०८.

प्रकृतीस फार जपत. दीर्घ काळ जगण्याची त्यांची मनीषा होती. आहाराबद्दल व प्रकृतीबद्दल त्यांच्या कल्पना थोड्या विक्षिप्तच होत्या. त्यांना प्रत्येक बाबीचा संशय वाटे. पण स्वभावांतील हे सारे दोष त्यांच्या व्यासंगापुढे कमकुवत वाटत. शेवटचे कांहीं दिवस राजवाडे पुण्यास आणखी एका थोर व तशाच विक्षिप्त वाटणाऱ्या माणसाच्या शेजारीं येऊन पाच सहा महिने राहिले होते. धातुकोशाच्या चिठ्ठया तयार करण्याचें काम चालू होतें. ज्ञानकोशकार केतकर यांनीं आपल्या या थोर शेजाऱ्याची आठवण देतांना लिहिलें आहे, 'निःशस्त्रांचें राजरकाण हें पुस्तक वाचून ते म्हणाले कीं तुमचा या प्रकारच्या राजकारणावर विश्वास आहे. माझा नाहीं. माझी ही समजूत आहे कीं इंग्रजांना लाथ मारण्याची शक्ति आपल्यांत आल्याशिवाय इतर सर्व राजकारणें व्यर्थ आहेत. आणि ही लाथ मारण्याची शक्ति जर शास्त्रांचा अभ्यास आणि संशोधन यांच्या बाबतींत आपण इंग्रजांच्या पुढें गेलों तरच उत्पन्न होईल. आणि ही शक्ति उत्पन्न झाल्याशिवाय कांहीं एक होणार नाहीं. इंग्रज येथें चरण्यासाठी आला आहे."[१]

सन १९२६ च्या मार्च महिन्यांत आपल्या टांचणांच्या सर्व ट्रंका व स्वयंपाकाच्या भांड्यांची टोपली हें सामान घेऊन राजवाडे धुळ्यास आले. या वेळीं राजवाडे यांची प्रकृति खालावली होती. आपल्यास एखाद्या दुर्धर रोगानें ग्रासलें असल्याचें राजवाडे यांनीं मनांत घेतलें होतें. 'सर्व दिवसभर डोळ्यांपुढें चक्कर येते. व सायंकाळ झाली म्हणजे थोडें बरें वाटतें' असें ते म्हणत. त्यांची शरीरयष्टि पूर्वायुष्यांतील व्यायामानें तशी चांगली होती. पण अखंड परिभ्रमण व सतत चिंतन त्यांना बाधलें असावें. त्यांना हाय ब्लड प्रेशरचा विकार झाला होता. डोक्यांत चक्कर येते, आपणांस सनस्ट्रोक झाला आहे अशी त्यांची कल्पना झाल्यानें उपचारासाठीं ते नाशिकला गेले. तेथें दोन महिने राहून परत ते धुळ्यास आले. धातुकोश नीट-पणें पुरा करण्याचा मानस त्यांना स्वस्थचित्त होऊं देत नव्हता. याच मानसिक अवस्थेंत असतांना मंगळवार ता. २८–१२–१९२६ रोजीं भोजनानंतर ते हात आंच-वीत असतांता मोरीवर चक्कर येऊन पडले; कांहीं औषधोपचार झाला, पण उपायाचा इलाज न चालून शुक्रवार दि. ३१ डिसेंबर १९२६ रोजीं महाराष्ट्राच्या या महान इतिहाससंशोधकाचें, व्याकरणाचार्याचें, समाजशास्त्रज्ञाचें थोडें आकस्मिक असें निधन झालें! हें वर्ष मोठें चमत्कारिक व आपत्तीचेंच म्हणावें लागेल. कारण याच वर्षाच्या आगेमागे मराठीच्या आणखी कांहीं इतिहासकारांचा स्वर्गवास झाला. सन १९२६ सालीं रा. ब. द. ब. पारसनीस यांना मृत्यु आला. आणि त्यांच्या आधी दोन वर्षे म्हणजे सन १९२४ साली वासुदेवशास्त्री खरे यांचें निधन झाले!

१–राजवाडे तिलांजलिअंक–ब्राह्मण पत्रिका, पृष्ठ ६७.

२ : राजवाडेपूर्व विविध संशोधन

इतिहास, समाजघटना, भाषा व व्याकरण, पुराणवस्तुसंशोधन इत्यादि क्षेत्रांत राजवाडे यांनीं जें कर्तृत्व उभें केलें त्याचें यथार्थ दर्शन व्हावें म्हणून या विषयीं त्यांच्या आधीं संशोधनाच्या वाटा कोणी निर्माण केल्या, कोणाच्या प्रयत्नानें त्या रुंदावल्या, कोणाच्या आळसामुळें त्या संकोचल्या, याचा थोडा आढावा प्रथम घेणें अगत्याचें आहे. दक्षिणापथ अथवा महाराष्ट्र या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या भारताच्या या भूभागांत प्रथम वसति कोणी केली, त्यांच्या आधीं मानववंश येथें होते काय, असल्यास त्यांची जीवनपद्धति कशी होती, नंतर येणाऱ्या लोकांच्या संस्कृतींचे परिणाम त्यांच्यावर काय झाले, आर्य अनार्य यांचा झगडा कितपत होता, नाग द्रविड यांच्याशीं मीलन कोणत्या प्रमाणांत झालें, ब्राह्मणमराठे यांचें कर्तृत्व कसें उभें राहिलें, आंध्रभृत्य, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, शिलाहार इत्यादि राजकुळें कशीं निर्माण झालीं, या राजसत्तांनीं महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनांत कोणते बदल घडवून आणले, भोसले, पेशवे यांचें नेमकें कर्तृत्व कोणतें, शिंदे, होळकर गायकवाड, यांसारख्या राजपुरुषांच्या विकासाचें मर्म कोणतें, या सर्वांची जीवनपद्धति कोणती होती, कोणत्या हेतूनें यांना स्फुरण येई, मुसलमानांशीं संघर्ष कसा व कोणत्या स्वरूपाचा झाला, मराठ्यांना यांत कितपत यश आलें, यांसारखे शेकडों प्रश्न इतिहास या एका शब्दांत उपस्थित होतात.

'असें असें मागें घडलें' असें नुसतें इतिहास सांगत नाहीं, तर सर्व घटितांचा बरोबर अर्थ म्हणजे कारणमीमांसा बसवून देण्याचें कामहि इतिहास करतो. त्यासाठीं नाना प्रकारची सामग्री त्यास जमवावी लागते. घटितांचें प्रत्यक्ष वर्णन, पुराणें बखरी सारखें साहित्य, तहनामें, ऐतिहासिक पत्रें, चरित्रें, आत्मचरित्रें, राजदरबारांतील पत्रव्यवहार, कथावाङ्मय, काव्यनाटकादि ललितकला, शिलालेख, ताम्रपट, दानपत्रें येथपासून वस्त्रालंकार, भांडींकुंडीं, हत्यारें, पाळीव प्राणी, धनधान्यें, गृहरचना, शेतीपद्धति, दागदागिने, देवदैवतें, स्मशानविधि यांसारख्या लोकव्यवहारांतील महत्त्वाच्या बाबी यांचाहि उपयोग इतिहासांत प्रामुख्यानें केला जातो. मानववंशशास्त्र, उत्खननशास्त्र, पुराणवस्तुसंशोधनशास्त्र यांसारखीं शास्त्रेंहि इतिहासाशीं निगडित अशीं आहेत. राजवाडेपूर्व काळांत या दृष्टीनें इतिहाससंशोधनाचे प्रयत्न कोणी केले याचा शोध घेणें अगत्याचें आहे. हा शोध घेणें महाराष्ट्राच्या इतिहासापुरतें मर्यादित असलें तरी प्रसंगीं महाराष्ट्राचा राज्यविस्तार

सर्व भारतभर पसरला असेल तर त्याचीहि दखल इतिहासानें घ्यावयास हवी. अशी दखल घेण्याचें काम कोणीकोणी केलें आहे तें संक्षेपानें पाहूं.

इतिहास लिहिण्यासारखे सर्व पराक्रम ज्या देशांत होतात तेथें या नाहीं त्या स्वरूपांत इतिहासलेखन निर्माण होतेंच. प्राचीन भारतीय परंपरेंत इतिहासास पांचवा वेद मानिलें आहे. पुरावृत्त म्हणजे पूर्वी हें असें होतें येथपासून दंतकथा, गोष्ट यांसारखे अर्थ इतिहास या शब्दास आले तरी धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांची उपासना कशी करावी यासंबंधीं सांगितलेला वृत्तांत असाहि इतिहास शब्दास पुढे पारंपारिक अर्थ प्राप्त झाला. राजानें नित्याचा कार्यक्रम म्हणून रोज थोडा वेळ इतिहास ऐकावा व आपलें शिक्षण पूर्ण करावें असें कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत म्हटलें आहे. महाभारत, रामायण यांसारख्या ग्रंथांतून एकेका घराण्याच्या अनेक पिढ्यांचे इतिहास आपणांस योग्य अशा निरीक्षणावरून मिळतील. ऐतिहासिक चिकित्सेनें पाहिल्यास पुराणांतूनहि इतिहास शुद्ध स्वरूपांत मिळण्याजोगा आहे. तेव्हां इतिहास या नाहीं त्या स्वरूपांत लिहिण्याची व ऐकण्याची व त्यायोगें जतन करून ठेवण्याची प्रवृत्ति फार पूर्वीपासून आपणाकडे होती. परंतु अर्वाचीन काळांत ज्याला इतिहासशास्त्र अथवा इतिहासमीमांसा म्हणतां येईल किंवा असें शास्त्र ज्या इतिहासग्रंथांवरून सिद्ध होईल असे इतिहासग्रंथ आपणाकडे जवळ जवळ नाहींतच. 'राजतरंगिणी' सारख्या ग्रंथांत काश्मीरचा इतिहास सांगितलेला दिसतो; पण असे ग्रंथ अपवादात्मकच. पुढे आपल्याकडे शिवशाहीनंतर व उत्तर पेशवाईत मुसलमानी धर्तीवर बखर म्हणजे वृत्तान्त सांगणाऱ्या पुष्कळ बखरी निघाल्या. बखरीच्या साह्यानें इतिहासाची एक स्थूल कल्पना आपणांस येऊ शकेल एवढेंच. महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें झाल्यास या देशाचा व लोकांचा सुसंगत असा इतिहास, सर्व प्रकारचीं साधनें पडताळून, त्यांचा खरेखोटेंपणा पाहून सामग्र्यानें असा अजून कोणी लिहिलाच नाहीं. राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें प्रचंड उद्योग उभारून प्रसिद्ध केली, त्यांपैकीं कांहीं खंडांना विद्वत्तापूर्ण अशा विवेचक प्रस्तावना जोडल्या, पण त्यांच्याहि हातून महाराष्ट्राचा समग्र इतिहास लिहिणें झालें नाहीं. फारसी, इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीज, गुजराथी, बंगाली, कानडी वगैरे संबंधित भाषांतील सर्व साधन-साहित्य उपलब्ध झाल्यावर त्यांचें यथासांग आलोडन करून कोणी इतिहासकार आपल्या प्रतिभासामर्थ्यानें महाराष्ट्राचा इतिहास पुढें कदाचित लिहीलहि; पण राजवाडेपूर्व काल तरी साधनें जमविण्याचा वा प्रसंगीं तुटपुंजा इतिहासग्रंथ निर्माण करण्याचाच मानावा लागेल.

महाराष्ट्राच्या इतिहासलेखनाचे तुजबी प्रयत्न अव्वल इंग्रजीच्या काळांत पाश्चात्य लेखकांनीं केले हें येथें ध्यानांत घ्यावयास हवे. इंग्रज मनुष्य हा राज्यकर्ता तर होताच, पण प्रखर ज्ञानोपासना हा त्याचा मुख्य गुण होता. आमची

भाषा, तिचे कोश, तिचें व्याकरण, तिचें वाङ्मय, आमचे रीतिरिवाज यांची माहिती आमच्यापेक्षांहि अव्वल इंग्रजींत पाश्चात्य पंडितांना अधिक असावी. त्यांनीं व्याकरणें रचिलीं, हिंदुस्थानांतील भाषांची पाहणी केली, लोकरिवाजांची नोंद केली आणि इतिहासलेखनाची सुरुवातहि केली. त्यांची माहिती त्रोटक होती, त्यांचें ज्ञान मर्यादित होतें, पुढील संशोधनानें त्यांच्या प्रयत्नांतील दोष स्पष्ट झाले हें सर्व खरें मानूनहि असें म्हणावें लागतें कीं, अगदीं आरंभींच्या काळांत आमची आम्हांस जेवढी ओळख होती त्यापेक्षां इंग्रजास वा युरोपियनांस आमच्याविषयींचें ज्ञान अधिक होतें. परदेशच्या प्रवाशांनीं लिहिलेले वृत्तान्त याची साक्ष देतील. मराठ्यांचा संपूर्ण इतिहास प्रथम प्रकाशित करण्याचें श्रेय स्प्रेंगेल या जर्मन इतिहासकाराला द्यावयास हवें. इ. स. १७८२ मध्यें त्यानें मराठ्यांचा प्रथम इतिहास प्रसिद्ध केला. यांत तपशीलवार हकीगत अर्थातच नव्हती. समकालीन कागदपत्रें पाहून सुसंगत असा इतिहास मराठ्यांचें राज्य बुडाल्यावर सहाच वर्षांनीं प्रसिद्ध झाला, तो ग्रँड डफचा इतिहास. सन १८२६ मध्यें ग्रँट डफनें 'ए हिस्ट्री ऑफ् दि मराठाज' या नांवानें आपले तीन खंड प्रसिद्ध केले. याआधीं सन १८१० मध्यें स्कॉट वेअरिंग यानें एक लहानसा मराठ्यांचा इतिहास लिहिला होता. पण पुढें ज्याचा सतत अनुवाद होत राहिला व त्यामुळें ज्याचा प्रभाव पडत राहिला तो इतिहास ग्रँट डफ याचाच. म्हणून ग्रँट डफ हा मराठ्यांचा आद्य इतिहासकार मानावा लागेल.

ग्रँट डफ हा खरें म्हणजे मूळचा शिपाई गडी. लेखन हा कांहीं त्याचा व्यवसाय नव्हे, पण त्याची जिज्ञासाबुद्धि बलवत्तर, चिकाटी थोर म्हणून त्यानें त्या वेळचीं अनेक साधनें जमा करून आपल्या मायदेशीं गेल्यावर शारीरिक कष्ट सहन करून, सांपत्तिक तूट सोसून मराठ्यांचा इतिहास लिहिला. ईस्ट इंडिया कंपनींत नोकरी मिळाली म्हणून ग्रँट डफ सन १८०२ मध्यें मुंबईस आला. मुंबईच्या सैनिकी पथकांत त्याला नोकरी मिळाली. अंगच्या हुषारीमुळें तो कॅप्टन झाला. या वेळीं माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन नांवाचा एक हुषार, कर्तबगार व विद्याप्रेमी रेसिडेंट पुण्यास होता, त्यानें आपल्या साह्यास ग्रँट डफला घेतलें. खडकीच्या लढाईचा प्रसंग डफनें समक्ष पाहिला होता. सन १८१८ मध्यें सातारा येथील रेसिडेंट म्हणून डफची नेमणूक झाली. चारपांच वर्षांत साताराचे छत्रपति प्रतापसिंह भोसले व बाळातीपंत नातू यांचा त्यानें स्नेह संपादन केला. प्रतापसिंहानें रोजनिशी लिहिली ती डफच्या आग्रहानें. चांगली लोकप्रियता संपादून सन १८२३ मध्यें रजा घेऊन डफ मायदेशांत, स्कॉटलंडमध्यें गेला. आणि तीनचार वर्षें परिश्रम घेऊन त्यानें मराठ्यांचा इतिहास सिद्ध केला. त्याच्या इतिहासामागे एल्फिन्स्टनची प्रेरणा, प्रतापसिंहाचा स्नेह व बाळाजीपंत नातूची मदत इतक्या गोष्टी होत्या. बाळाजीपंत नातूनें त्यास कांहीं कागदपत्रें पुरविलीं. कांहीं सरदारांचीं दप्तरें ग्रँट डफनें चाळलीं होतीं.

रावबाजीची कारकीर्द डफनें प्रत्यक्ष पाहिली होती. सातारा येथील वास्तव्यांत तो रमून गेला होता. प्रतापसिंहाचें व त्याचें सूत चांगलें जमत असे. मराठ्यांच्या गुण-दोषांचीहि त्याला चांगली कल्पना होती. त्यामुळें ग्रँट डफचा मराठ्यांचा इतिहास पुष्कळच सुसंगत व परिपूर्ण असा झाला असें त्या वेळच्या संशोधनास अनुलक्षून म्हणावें लागतें. स्वतः प्रतापसिंहानें ग्रँट डफच्या इतिहासाचें मराठी भाषांतर करवून घेतलें होतें पण तें प्रसिद्ध झालेलें दिसत नाहीं. पुढें सन १८२९ मध्यें केपन साहेब व बाबा साने यांनीं डफच्या इतिहासाचा अनुवाद मराठ्यांची बखर या नांवानें केला व त्याच्याच सहा आवृत्त्या सन १९१६ पर्यंत निघाल्या. ग्रँट डफच्या इतिहासांत कांहीं चुकीचीं विधानें असतील, त्याची दृष्टि थोडी विकृतहि असेल, तपशीलाच्या कांहीं चुका त्याच्या लिखाणांत असतील, महत्त्वाचे कागदपत्र त्याला उपलब्ध नसल्यामुळें कांहीं उणीवा त्याच्या इतिहासांत उरल्या असतील, पण सामग्र्यानें लिहिलेला मराठ्यांचा पहिला इतिहास म्हणून त्याच्याच ग्रंथाचा उल्लेख करावा लागेल. प्रसिद्ध इतिहासविवेचक दत्तो वामन पोतदार यांनीं या संबंधीं म्हटलें आहे.

"ग्रॅण्ट डफनें आपल्याकडून मेहनत चांगली केली आणि जरी त्याचा इतिहास हल्लींच्या मताला चालण्यासारखा नाहीं, तथापि पहिला प्रयत्न आणि तोहि मराठ्यांच्या प्रतिपक्षांतील एका लष्करी माणसानें केलेला, म्हणून जर त्याकडे पाहिलें तर ग्रॅण्ट डफचें कोणीहि कौतुकच करील. खुद्द महाराष्ट्रांत देखील बरीच वर्षें ग्रँट डफचाच इतिहास प्रमाण मानण्यांत येत असे."[1]

ग्रँट डफच्या इतिहासाची महती अशी कीं त्याच्या टीकाकारांनाहि त्याची गुणवत्ता मान्य करावी लागते. ज्या प्रखर-टीकेमुळें सुशिक्षितांचें लक्ष मराठ्यांच्या इतिहासाकडे वळले ती नीळकंठ जनार्दन कीर्तने यांची होय. कीर्तने यांनींहि डफचे गुण मान्य करतांना म्हटलें आहे, "या ग्रंथांतील कांहीं व्यंग्यें आम्हीं दाखविलीं म्हणून त्या ग्रंथाविषयीं पूज्यबुद्धि कोणापेक्षांहि आमची कमी आहे असें कोणी काडीमात्र समजूं नये. या ग्रंथकर्त्यास ज्या ज्या अडचणी आल्या त्याही सर्व आमच्या लक्षांत आहेत. या विषयावर ग्रंथ लिहिण्यास प्रथम त्यांनींच प्रयत्न केला व कोणत्याहि प्रथम प्रयत्नाशीं ताडून पाहिलें असतां हा त्यांचा ग्रंथ चांगलाच झाला आहे असेंही कदाचित म्हणणें भाग पडेल. त्यांनीं ग्रंथ करून आज बरीच वर्षें झालीं असून या विषयावर दुसरे कोणीही ग्रंथ करण्यास धजले नाहींत ही गोष्टही साहेबाच्या विद्येची साक्ष आहे."[2] ग्रँट डफचा इतिहास सन १८२६ मध्यें तयार झाला आणि नीळकंठराव कीर्तने यांची टीका चाळीस वर्षांनीं म्हणजे १८६८ मध्यें प्रसिद्ध झाली. म्हणजे परकीयानें लिहिलेल्या इतिहासांतील उणीवा आम्हांस समजण्यासहि

१–अर्वाचीन मराठी साहित्य, पृ. ३२१

२–नी. ज. कीर्तने : ग्रँट डफकृत मराठ्यांच्या बखरीवरील टीका, १९२६ पृ. ७

अर्धें शतक लागलें! ग्रँट डफनें हा इतिहास आपल्या बांधवांसाठीं लिहिला होता हेंहि ध्यानीं घ्यावयास हवें. 'ज्या मराठ्यांकडून भारत जिंकून घेतला त्यांची स्वबांधवांस माहिती करून देणें' हा डफचा प्रधान हेतु होता.

ग्रँट डफनें मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीनें एक अपूर्व कामगिरी केली. त्याच्या आधीं कांहीं तुरळक प्रयत्न झाले, नाहीं असें नाहीं. पण सामान्य इतिहास या नांवासहि शोभण्यासारखे ते नव्हते. ग्रँट डफनंतर चाळीस पन्नास वर्षें कांहीं शालोपयोगी इतिहास ग्रंथ तयार झाले. जांभेकर बाळ गंगाधर यांचा हिंदुस्थानचा इतिहास, १८४६, पंडित विष्णु परशुराम यांचा हिंदुस्थानचा इतिहास, सन १८६१, मंडलिक विश्वनाथ नारायण यांचा हिंदुस्थानचा इतिहास, सन १८६२, लोकहितवादी यांचा हिंदुस्थानचा इतिहास, सन १८७८, ओक नरसिंह विनायक यांचा हिंदुस्थानचा इतिहास, सन १८६०, ओक विनायक कोंडदेव यांचा हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास, सन १८७०, सरकारतर्फें प्रसिद्ध झालेला हिंदुस्थानचा इतिहास, सन १८६१, यांसारखे छोटे प्रयत्न होत राहिले. हिंदुस्थानच्या इतिहासाच्या निमित्तानें कांहीं थोडीफार मराठ्यांची हकीगत या पुस्तकांतून येई. १८५७ मध्यें मुंबई विद्यापीठ स्थापन झाल्याकारणानें निरनिराळ्या युरोपीयन देशांचे इतिहास थोर इतिहासकारांनीं लिहिलेले कांहीं थोडक्या पदवीधरांच्या वाचनांत आले असतील. त्या धर्तीवर मराठ्यांचा इतिहास असावा ही वृत्तीहि फार लौकर निर्माण झाली नाहीं. सन १८६६ मध्यें विष्णुपंत भिडे यांनीं अष्टप्रधानांचा इतिहास लिहिला होता. आंग्रे घराण्याचा इतिहास, सन १८८४, विंचुरकर घराण्याचा इतिहास, सन १८८३, डफळे देशमूख व जहागिरदार यांच्या घराण्याचा इतिहास, सन १८६७, सातारचे छत्रपती यांचे प्रतिनिधि यांचे घराण्याचा इतिहास, सन १८८८, दाभाड्यांच्या घराण्याचा इतिहास, सन १८८८, शिंद्यांचे घराण्याचा इतिहास, सन १८६४, गायकवाड सरकारचे दिवाण फणसे घराण्याचा इतिहास, शिंदे अलिजाबहादर ह्यांचे घराण्याचा इतिहास सन १८७२, यांसारखे वैयक्तिक प्रयत्न आपापल्या पुरते होत होते. पण राष्ट्रीय दृष्टींतून मराठ्यांचा व महाराष्ट्राचा इतिहास लिहावा अशी ऊर्मि मात्र कुठेहि नव्हती. अशा इतिहासाचीं साधनें जमवावींत हाहि संकल्प फारसा नव्हता. लोकहितवादी यांच्या ऐतिहासिक गोष्टी गोष्टीच राहिल्या.

राष्ट्रीय दृष्टीनें महत्त्वाचें असें पहिलें इतिहाससंशोधनाचें स्फुरण विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या 'इतिहास' या निबंधानें समकालीन शिक्षितांना दिलें. आज विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या कर्तृत्वाला कोणी कितीहि गौणत्व देण्याच्या प्रयत्नांत असले तरी पुढें विद्येच्या विविध क्षेत्रांत महाराष्ट्रांत जें प्रचंड कर्तृत्व निर्माण झालें त्यांतील प्रत्येकानें चिपळूणकरांना आपलें स्फूर्तिस्थान मानिलें आहे. चिपळूणकर यांचा देशाभिमान, स्वाभिमान स्वधर्माभिमान, त्यांच्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून त्यांच्या 'इतिहास' या निबंधांतहि प्रकटला.

आपल्या निबंधमालेंत चिपळूणकरांनीं 'इतिहास' या विषयावर एकूण तीन निबंध लिहिले. त्यांची नेहमींची पल्लेदार विषयव्याप्ती येथेंहि दिसून येते. इतिहास शब्दाचा अर्थ विशद करून त्यांनीं आपल्याकडे शास्त्रशुद्ध इतिहास-लेखनाची निर्मिति कां झाली नाहीं याची कारणमीमांसा केली आहे. एक तर आपलें भारतीय जीवन सदोदित युद्धप्रसंगांनीं वा राज्यक्रांतींनीं व्याप्त असें नसल्यानें इतिहासास योग्य असें स्फुरण युरोप वा ग्रीससारखें येथें नाहीं. दुसरें कारण कीं येथील एकंदर मानवी प्रवृत्तीहि निवृत्तिमार्गीच असल्यामुळें मानवी पराक्रमांचें वृत्तांत लिहिण्यास फारशी उत्सुकता कोणी दर्शविली नाहीं. यानंतर ज्या ग्रीस देशांत इतिहासशास्त्र खऱ्या अर्थानें उदयास आलें त्याचा थोडक्यांत परामर्श चिपळूणकर यांनीं घेतला आहे. यानंतर मालाकार लागलीच इतिहासाचा उपयोग काय या विषयाकडे वळले आहेत. जिज्ञासातृप्ति, नीतिबोध, मानसिक प्रसन्नत्वाची प्राप्ति, मनोरंजन, नीतिज्ञान व मनाचें पोषण इत्यादि उपयोग इतिहासवाचनापासून आपणांस होण्यासारखे आहेत असें चिपळूणकरांनीं म्हटलें आहे.

"निरनिराळ्या देशांतील लोकस्थिति, राज्यव्यवस्था, रीतरिवाज, धर्मादि विषयांवर समजुती, वगैरे कळल्या असतां मनुष्याची नजर दूरवर फांकते. त्यामुळें बुद्धीची पोंच वाढून एकंदर वस्तुमात्राविषयीं त्यास पहिल्याहून विशेष यथार्थ ज्ञान होऊं लागतें."—असा इतिहासवाचनापासून होणाऱ्या फायद्यांचा निष्कर्ष काढून चिपळूणकर आपल्या देशाचा इतिहास लिहिणारे जे परकीय वा स्वकीय लेखक आहेत त्यांचेकडे वळले आहेत. सर्व दोषांचें आगर म्हणजे हिंदुस्थान म्हणून वर्णन करणाऱ्या अर्धवट इतिहासकारांची हजेरी चिपळूणकरांनीं नेहमीप्रमाणें यथास्थित घेतली आहे. आपल्या देशाचा चांगला इतिहास निर्माण व्हावा म्हणून लोकांना त्यांनीं सूचना केल्या आहेत, "यास्तव ज्यांस तशी माहिती मिळण्याचा संभव असेल त्यांनीं ती बुडून न देतां तिचा संग्रह ठेवावा. आमचीं जुनीं लहान-मोठीं राज्यें अजून साऱ्या देशभर पुष्कळ आहेत. तर त्यांचा स्वाहाकार जोंवर झाला नाहीं तोंवर तरी लोकांनीं सावध होऊन आपल्या नुकत्या होऊन गेलेल्या पराक्रमी पूर्वजांची येवढी तरी सेवा करावी."—इतिहासलेखनासाठीं आपणच जाणूनबुजून प्रयत्न नेटानें केला तरच आपल्या देशाचा यथार्थ इतिहास तयार होईल असें त्यांना वाटत होतें.

विष्णुशास्त्री चिपळूणकर नुसतेच लेखणीबहादुर नव्हते. आपल्या ध्येय-पूर्तीसाठी त्यांनीं केसरी, मराठा, न्यू इंग्लिश स्कूल, चित्रशाळा, आर्यभूषण छापखाना, किताबखाना हे जसे नवे उद्योग सुरू केले तसेच सन १८७८ मध्ये कांही मंडळींच्या सहकार्यानें त्यांनीं 'काव्येतिहाससंग्रह' मासिक जन्मास घालून खऱ्या इतिहास-संशोधनाचा पाया दृढ केला. शालिग्राम, साने व मोडक हे त्यांचे या वेळचे सहकारी

होते. विशेषतः रावबहादुर काशीनाथ नारायण साने (१८५१–१९२७) यांनी या मासिकाची जोपासना निरनिराळ्या बखरींचें शास्त्रशुद्ध व टापटीपीचें संशोधन करून केली. सर्वसामान्य माणसास इतिहासाची गोडी स्वाभिमानपूर्वक अशा स्वरूपांत 'काव्येतिहाससंग्रह' या पुस्तकानें लाविली. सभासदकृत शिवाजीची बखर, मल्हारराव चिटणीसकृत शिवाजीचरित्र, भाऊसाहेबांची बखर, पानिपत बखर, चिटणीसकृत संभाजी, राजाराम यांचीं चरित्रें, मल्हार रामराव चिटणीसकृत राजनीति, पेशव्यांची बखर, नागपूरकर भोसलेप्रभृति मराठा मंडळांतील राजपुरुषांच्या बखरी, साष्टी बखर, राज्यव्यवहार कोश, इत्यादि संशोधनकर्तृत्व रा. ब. का. ना. साने यांचें मोठेंच म्हणावें लागेल. साने यांची दृष्टि विवेचक असून त्यांच्या टीपा मार्मिक व अर्थनिर्णायक अशा असल्यानें अभ्यासकांस फार उपयुक्त ठरल्या.

बखरवाङ्मयास जरी तर्कशुद्ध इतिहासाची प्रतिष्ठा नव्हती तरी सर्वसामान्य लोकांना इतिहासाची गोडी या बखरींनीं लाविली. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची रसाळ वर्णनें स्वाभिमानपूर्वक सांगणाऱ्या बखरींची ओढ पुढील पिढीस कमालीची लागून राहिली. या बखरी पौराणिक पद्धतीच्या असल्या तरी ह्यांतील चटकदार-पणा व जिवंतपणा यांमुळें त्या लोकप्रिय ठरल्या. डौलदार व अस्सल मराठी भाषेचें आकर्षणहि कमी नव्हतें. या सर्व प्रेरणेचें श्रेय काव्येतिहाससंग्रह या मासिक पुस्तकास व रा. ब. का. ना. साने यांनाच द्यावें लागेल. या मासिकाच्या पहिल्याच अंकात आपल्या ध्येयाविषयी साने यांनीं लिहिलें आहे,

"आज आम्हां मराठ्याविषयीं ज्या कोणी जें लिहिलें तें सर्व डफकृत ग्रंथाच्या आधारें होय. स्वतंत्र निराळा ग्रंथ अद्याप कोणी लिहिला नाहीं. या गोष्टीबद्दल आम्ही कोणास फारसा दोष देतों असें समजूं नये. कारण आमच्या मतें महाराष्ट्र देशाचा स्वतंत्र इतिहास लिहिण्यास जीं साधनें असावीं तीं पूर्णपणें अद्याप मिळविणें उपलब्ध होईपर्यंत आमचे देशाचा इतिहास असावा तसा होणें मुष्कील आहे. हीं साधनें मिळवून प्रसिद्ध करण्याच्या कामांत कोणी आजपर्यंत फारसे हातपाय हलविले नाहींत हें पाहून मात्र दिलगिरी वाटते. हल्लींची वेळ हें काम करण्याची आहे. हे सर्व विचार मनांत आणून जुन्या माहितीचे इतिहासाच्या व पुरुषचरित्रांच्या उपयोगी पडणारे बखरी, वंशावळी, पत्रें, स्वाऱ्यांच्या मुक्कामांच्या याद्या, वगैरे जे लेख मिळतील ते मिळवून या सर्वांचा एकत्र संग्रह करण्याचें काम आम्हीं अंगीकारलें आहे. तें किती महत्त्वाचें आहे हें सुज्ञांच्या ध्यानांत सहज येईल," विशेष महत्त्वाची बाब म्हणजे काव्येतिहास-संग्रहांतून प्राचीन काव्यें, बखरी यांचेबरोबरच जुने कागदपत्र व जुना पत्रव्यवहार यांचीहि प्रसिद्धी होत राहिली होती. हें मासिक सुमारें बारा वर्षे चाललें. लहानमोठे २३ ग्रंथ, ५०१ कागदपत्रें, २० संस्कृत काव्यें, १० मराठी काव्यसंग्रह, इत्यादि ६३०० पृष्ठांचीं सामग्री मराठी भाषेंत प्रसिद्ध करून हें मासिक सन

१८९० मध्यें बंद पडलें. पण मराठी मनावर इतिहासप्रेमाचा ठसा उमटवून हें मासिक गेलें. या मासिकानें काशीनाथ कृष्ण लेले, कृष्णाजी विष्णु आचार्य, भगवंतराव तोडेवाले, शंकर तुकाराम शालिग्राम इत्यादि जिज्ञासु अभ्यासकांना प्रोत्साहित केलें. यानंतरच्या अभ्यासकांत मिरजेचे वासुदेवशास्त्री खरे, (१८५०–१९२४), वि. का. राजवाडे (१८६३-१९२६) गो. स. सरदेसाई (१८६५-१९५९) द. ब. पारसनीस (१८७०-१९२६) हे थोर इतिहासकार येतात. ऐतिहासिक कागदपत्रांची प्रसिद्धीहि पुढें मोठ्या प्रमाणांत झाली. पेशवे-दप्तर छापून प्रसिद्ध करण्यांत पारसनीस, वाड व सरदेसाई यांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

राजवाडेपूर्व इतिहाससंशोधनाची ही अशी परिस्थिति होती. बखरी, ऐतिहासिक पत्रें, घराण्यांचे इतिहास, हळूहळू प्रसिद्ध होण्याच्या मार्गावर ही सामग्री होती. राजवाडे यांनीं सन १८९८ मध्यें आपल्या मराठ्यांच्या इतिहासाचा साधनखंड खंड पहिला प्रसिद्ध केला त्या वेळीं प्रस्तावनेंत प्रारंभींच त्यांनीं आधींच्या संशोधनाचा आढावा घेतलेला आहे. त्यांत ते लिहितात,

"युनिव्हर्सिटी स्थापन होण्यापूर्वी दादोबा पांडुरंगादि जी मंडळी झाली त्यांचा काल शालोपयोगी लहानमोठीं पुस्तकें रचण्यांत गेला. इतिहासाचीं साधनें शोधून काढण्याच्या कामीं हळहळ दाखविण्यापलीकडे त्यांच्या हातून विशेष कांहीं झालें नाहीं...... डॉक्टर भाऊ दाजी, विश्वनाथ नारायण मंडलीक, उमाशंकर याज्ञिक, कृष्णशास्त्री गोडबोले, इत्यादि मंडळींनीं त्या कालीं हिंदुस्थानच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाविषयीं बरेंच लिहलें आहे. परंतु महाराष्ट्राच्या अलीकडील इतिहासाकडे, फार तर राहूं द्याच पण थोडें देखील, लक्ष देण्यास ह्या मंडळीला फुरसत झाली नाहीं. युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यानंतर, युरोप खंडांतील देशांचे प्राचीन व अर्वाचीन इतिहास वाचून इतिहासाविषयीं स्पष्ट व उदात्त कल्पना नव्या विद्वानांना याव्या हें साहजिक होतें. (१) ह्या नवीन कल्पनांचें प्रथम फल म्हटलें म्हणजे नीलकंठराव कीर्तने यांची ग्रँट डफवरील टीका होय ...... १८६७ पासून पुढे डेक्कन कॉलेजांत व कदाचित एल्फिन्स्टन कॉलेजांत मराठ्यांच्या इतिहासाची आस्था बाळगणारी कांहीं मंडळी निपजत चालली होती असें दिसतें. (२) कीर्तन्यांच्या टीकेनंतर विविधज्ञानविस्तारांतून एक बखर, एक राजनीति, व एक काशीराजाचें भाषांतर अशीं तीन जुनीं बाडें बाहेर पडलीं. (३) त्यानंतर रा. साने, मोडक, चिपळोणकर व ओक यांच्या अवाढव्य (काव्य) इतिहास संग्रहाला सुरुवात झाली. (४) पुढे लौकरच प्रभु लोकांच्या इतिहासाचीं साधनें थोडींबहुत जगापुढें आलीं. (५) नंतर कांहीं कालानें बडोदे येथें शिवराजाच्या दोन बखरी छापल्या गेल्या. (६) पुढें भारतवर्षाला प्रारंभ झाला व (७) अलीकडे वासुदेवशास्त्री खरे ह्यांनीं ऐतिहासिक

लेखसंग्रहाला सुरुवात केली आहे. येणेंप्रमाणें साठ पासष्टांत इतिहासाच्या आस्थेची जी एक लाट उसळली ती अजून म्हणजे १८९८ तहि चढत्या प्रमाणावर आहे व पुढेंहि अशीच चढती राहील असा तर्क आहे."

या इतिहासाच्या अभ्यासांतील एक प्रचंड लाट म्हणजे वि. का. राजवाडे यांचें संशोधनकार्य होय. त्यांच्या कार्याचें यथार्थ स्वरूप समजावून घेण्यासाठीं आपण त्यांच्यापूर्वींच्या संशोधनाचा इतिहासक्षेत्रापुरता परिचय करून घेतला. पण राजवाडे केवळ इतिहासवेत्ते नव्हते. इतिहाससंशोधनाशीं निगडित असणाऱ्या पुराणवस्तुसंशोधन, प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृति, समाजशास्त्र, मानव-वंशशास्त्र, उत्खननशास्त्र इत्यादि विषयांशींहि त्यांचा परिचय होता. तेव्हां याहि क्षेत्रांत त्यांचे आधीं काय काय प्रगति झाली होती हें पाहणें उपयुक्त होईल.

अव्वल इंग्रजीच्या काळांत ज्या अनेक नव्या शास्त्रांशीं हिंदी लोकांचा परिचय झाला त्यांत प्राच्यविद्यासंशोधना (Indology) ची एक शाखा प्रमुख आहे. कांहीं प्रतिष्ठित घरांतून संस्कृतचें अध्ययन खाजगी रूपांत होत होतें. कांहीं थोड्या पाठशाळाहि होत्या. प्राचीन संस्कृत, प्राकृत, मराठी हस्तलिखितें पडून होतीं, शिलालेख, ताम्रपट, यांचाहि फारसा तपास होत नव्हता. प्राचीन विद्या व प्राचीन साधनसंग्रह यांचें जतन व जोपासन यांचीहि फारशी कल्पना या देशाच्या लोकांना नव्हती. प्राच्य विद्यांच्या महत्त्वाकडे लक्ष वेधून राहिलें तें प्रथम इंग्रज अथवा युरोपीयन माणसाचेंच. ज्यांच्यावर राज्य करावयाचें त्यांची विद्या, त्यांची प्राचीन भाषा, त्यांचा धर्म, त्यांची सांस्कृतिक परंपरा इत्यादींचा अभ्यास करणें अगत्याचें असल्याचें पाश्चिमात्य पंडितांच्या ध्यानीं आलें. वॉरन हेस्टिंग्स, चार्ल्स विल्किन्स, हीं प्रारंभींचीं नांवें लक्षांत ठेवण्याजोगीं आहेत. १७८५ मध्यें भगवद्गीतेचें इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध झालें. सन १७८९ सालीं कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुंतल' या नाटकाचा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध झाला. विल्यम जोन्सच्या या कृतीमुळें भारतीय संस्कृत साहित्याचा बोलबाला युरोपमध्यें मोठ्या प्रमाणावर झाला. संस्कृतच्या अभ्यासाची एक लाट जर्मनीमध्यें उसळली. प्रसिद्ध श्लेगेल बंधु यांना संस्कृतच्या ओळखीमुळें 'जगाच्या आरंभकाळाचा इतिहास आतां-पर्यंत अज्ञात असलेल्या संस्कृत वाङ्मयांतून प्रकट झालेला आहे. सौंदर्य आणि प्रेम यांनीं रसरसलेल्या भारतीय रमणीय कलाकृतींतून आशियाच्या अंतरात्म्याचा साक्षात्कार घडून येत आहे' असे उद्गार विंटरनिझसारख्या वाङ्मयेतिहास-काराला काढावे लागले.[1] ऑगस्ट श्लेगेल हा बान विद्यापीठांत जर्मनींतील पहिला संस्कृत प्राध्यापक सन १८१८ मध्यें झाला. इकडे मराठी राज्य या वर्षीं लयाला जात होतें आणि तिकडे संस्कृत भाषेचें व विद्येचें प्रेम उफाळत होतें. फ्रान्समध्यें

1 M. Winternitz, History Indian Literatuer.

प्रोफेसर ए. एल. चेंझी यांच्या हाताखालीं फान्झ बॉल या जर्मन पंडितानें संस्कृत शिकून संस्कृतच्या व्याकरणावर ग्रंथ रचिला व तुलनात्मक भाषाशास्त्राचा पाया घातला. शॉपोनहॉवर, युजेन बुर्नोफ, रुडोल्फ रॉय, मॅक्समुल्लर यांचें भारतीय विद्यांचें प्रेम जगप्रसिद्ध आहे. सन १८४८–७५ या काळांत मॅक्समुल्लरनें सायण भाष्या-सहित समग्र ऋग्वेदाची संशोधित आवृत्ति प्रसिद्ध केली. येथूनच ऋग्वेदाच्या नव्या अभ्यासास प्रारंभ झाला. पाली आदि प्राकृत भाषांचा अभ्यासहि याच सुमारास युरोपमध्यें सुरू झाला.

हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकारी प्राचीन विद्यांच्या बाबतींत फारच जागे होते. हेन्री टॉमस कोलब्रुक या विल्यम जोन्सनंतर आलेल्या अधिकाऱ्यानें संस्कृत धर्म-शास्त्राचा अभ्यास करून ' ए डायजेस्ट ऑफ् हिंदु लॉ ' या नांवाचा ग्रंथ चार खंडांत सन १७९७ मध्यें प्रसिद्ध केला. भारतीय वेदवाङ्मय, शिल्प, शिलालेख ताम्रपट, नाणी, मूर्तिकला, हस्तलिखितें, प्राचीन वस्तु व वास्तू यांचा अभ्यास करून प्राचीन भारतीय लोकजीवनाचा इतिहास समजावून घेण्यासाठी विल्यम जोन्सच्या प्रेरणेनें सन १७८४ मध्ये कलकत्ता येथे ' रॉयल एशिॲटिक सोसायटी ' स्थापन झाली. याच सोसायटीची एक शाखा सन १८०४ मध्यें मुंबईसहि स्थापन झाली. या सोसायटीचा प्रमुख उद्देश खालीलप्रमाणें होता,

' या खंडप्राय देशांतील इतिहासाचा, त्यांतील समाजसंस्थांचा, लोकजीवनाचा विद्वानांनीं अभ्यास करावा. या देशांतील भूमीला व तेथील पाषाणांना बोलके करून त्यांनीं पाहिलेली भूतकालीन सांस्कृतिक व वैचारिक आंदोलनें त्यांना प्रकट करायला लावावींत, संशोधक विद्वानांनीं एकत्र जमून, एकत्र विचारविनिमय करून एकमेकास प्रोत्साहन द्यावें;' या हेतूस अनुसरून मुंबईस एक उत्तम ग्रंथालय निर्माण होऊन सोसायटीचें एक त्रैमासिकहि सुरू झालें. प्रिन्सेप यानें ब्राह्मी लिपी वाचण्याचा प्रयत्न केला व फर्ग्युसननें प्राचीन मूर्तींचा व शिल्पकृतींचा अभ्यास चालू ठेविला. भारतीय लोकांनींहि आपल्या परीनें या प्रकारच्या अभ्यासास हात-भार लावलेला दिसून येतो. महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें झाल्यास बाळशास्त्री जांभेकर (१८१०-१८४६) यांनीं प्रथम रॉयल एशिॲटिक सोसायटीच्या त्रैमासिकांत शिलालेखांचें विवरण केलें. डॉ. भाऊ दाजी लाड (१८२२–१८७४) यांनीं सर्व देशभर हिंडून हस्तलिखितें, नाणीं, ताम्रपट यांचा संग्रह केला. पं. भगवान-लालजी इंद्रजी (१८३०-१८८८) यांनीं प्रसिद्ध लेण्यांतील लेखांचें वाचन केलें. डॉ. भाऊ दाजी यांची मदत त्यांना होतीच. डॉ. भाऊ दाजींचा हा अधिकार फार मोठा असल्यामुळें पाश्चात्य संशोधकांनाहि त्यांची मदत घ्यावी लागे. न्या. का. त्र्यं. तेलंग (१८५०-१८९३) यांचे भगवदगीतेवरील व रामायणावरील संशोधनपर लेख त्यांच्या श्रेष्ठ बुद्धिमत्तेस शोभतील अशाच तोलाचे आहेत. ' सेक्रेड बुक्स ऑफ् दि ईस्ट ' या आपल्या विख्यात ग्रंथमालेच्या कांहीं ग्रंथांच्या अनुवादांस मॅक्समुल्लर

यांनीं तेलंग यांचेंच साह्य घेतलें होतें. ‘ हिंदुस्थानांतील आर्यसंस्कृतीचीं अवस्थांतरें ’ या सन १८८० मध्यें इंग्रजींत प्रसिद्ध झालेल्या म. मो. कुंटे (१८३५–१८८८) यांच्या ग्रंथांत ऋग्वेदकालापासून भारतीय संस्कृतीचें विशाल ऐतिहासिक समालोचन आहे. शं. पां. पंडित (१८४०–१८९४) यांचा ऋग्वेदाचा अभ्यास, आबाजी विष्णु काथवटे (१८४६–१९०७) यांचा अथर्व वेदाचा अभ्यास, राजारामशास्त्री भागवत (१८५०--१९०८) यांचा उपनिषदांचा अभ्यास, वा. शि. आपटे (१८५८--१८९२) यांचा संस्कृत-इंग्रजीकोश, का. बा. पाठक (१८५०-१९३२) यांचें संशोधनपर लिखाण, बाळ गंगाधर टिळक यांचा प्रसिद्ध ‘ ओरायन ’ ग्रंथ (१८९३) व ‘ आर्क्टिक होम इन दि वेदाज ’ (१९०३) हा प्रबंध इत्यादि नांवें याच संदर्भात उल्लेखण्यासारखीं आहेत.

शास्त्रीय, तौलनिक व ऐतिहासिक संशोधनाचा पाया घालून पुढच्या पिढीस मार्गदर्शन करणारे थोर प्राच्यविद्यापंडित डॉ. रा. गो. भांडारकर (१८३७-- १९२५) यांचा उल्लेख प्रामुख्यानें करावयास हवा. संस्कृत विषय घेऊन १८६३ मध्यें एम. ए. झाल्याबरोबर यांनीं प्राचीन वाङ्मयाबरोबरच ताम्रपट, शिलालेख, नाणीं यांचें अध्ययन चालू ठेविलें; रॉयल एशिॲटिक सोसायटीच्या ‘ इंडियन ॲंटिक्वेरी’ , या विख्यात त्रैमासिकांत त्यांचें मौलिक लिखाण प्रसिद्ध होऊं लागलें. पतंजलीचा काळ, महाभारताचा काळ, प्राचीन साहित्य, दख्खनचा प्राचीन इतिहास, शैव, वैष्णव इत्यादि पंथांचा क्रमविकास, भाषाशास्त्र, भारतीय इतिहास हे भांडारकरांच्या अभ्यासाचे खास विषय होत. डॉ. भांडारकरांच्या ८१ व्या वाढ दिवसानिमित्त स्थापन झालेली ‘ भांडारकर ओरिएंटल रीसर्च इन्स्टिटयूट ’ ही संस्था पुढील पिढीचें एक आशास्थानच बनून राहिली. राजवाडे यांचे बंधु वै. का. राजवाडे, डॉ. रा. द. रानडे, डॉ. पां. दा. गुणे, डॉ. श्री. कृ. बेलवलकर ही परंपरा पुढे अव्याहतपणें चालू आहे.

प्राच्यविद्यासंशोधनांत अंगभूत असणाऱ्या वेद-वेदांगांच्या शाखेंत पुढें डॉ. श्री. व्यं. केतकर, पं. श्री. दा. सातवळेकर, श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, श्री. कृष्णशास्त्री घुले, ह. दा. वेलणकर, रा. ना. दांडेकर, लक्ष्मणशास्त्री जोशी, विद्वद्रत्न के. ल. दप्तरी, वासुदेवशास्त्री अभ्यंकर, केवलानंद स्वामी, शं. रा. राजवाडे ही परंपरा पुढें खचित अभिमान वाटण्याजोगी निर्माण झाली. राजवाडे यांना जें संस्थात्मक जीवन अभिप्रेत होतें, तेहि पुढें महाराष्ट्रांत निर्माण झालें. डॉ. वि. स. सुकथनकर, चिं. वि. वैद्य, डॉ. अ. द. पुसाळकर, डॉ. गो. सं. घुर्ये यांचींहि नांवें याच संदर्भात ध्यानांत येण्यासारखीं आहेत. धर्मसूत्रें, स्मृति, धर्मशास्त्र यांतील संशोधनसंकलनाच्या क्षेत्रांत अलीकडच्या काळांत नजरेंत भरण्याजोगी राष्ट्रीय कामगिरी केली ती म. म. पां. वा. काणे यांनीं. वाङ्मयेतिहास व सांस्कृतिक इतिहास यांच्या क्षेत्रांत डॉ. प. कृ. गोडे यांचीहि कामगिरी मोलाची मानावी लागेल. प्राकृत, अपभ्रंश भाषांचा

अभ्यास अलीकडच्या कालांत प्रा. ह. दा. वेलणकर, डॉ. प. ल. वैद्य, प्रा. अ. म. घाटगे, डॉ. आ. ने. उपाध्ये, धर्मानंद कोसांबी यांनीं विपुल प्रमाणांत केलेला आहे. पुराणवस्तुसंशोधनाचें क्षेत्रहि मोठ्या प्रमाणावर मार्ग आक्रमित असल्याचें दिसून येईल. प्रा. दे. रा. भांडारकर, रा. ब. का. ना. दीक्षित, डॉ. ह. धी. सांकळिया इत्यादि पंडितांच्या प्रयत्नानें इतिहासाचे धागेदोरे उत्खननावरून अधिक स्पष्ट होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. ही सर्व नामावलि नुसतीच उल्लेखिली आहे कारण हा सर्व विकास राजवाडे यांच्या नंतरचा आहे. आपणांस येथें फक्त राजवाडेपूर्व संशोधनाचा विचार करावयाचा आहे.

व्याकरण आणि भाषाशास्त्र हाहि राजवाडे यांच्या अभ्यासाचा व आवडीचा विषय होता. ऐतिहासिक व तौलनिक व्याकरणांवर त्यांच्या कटाक्ष होता हें ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेच्या व्याकरणावरून सिद्ध होईल. राजवाडेपूर्व कालांत चांगलीं मातबर व्याकरणें तयार झालीं होतीं. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचें 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' (१८३६), व मोरो केशव दामले यांचें 'शास्त्रीय मराठी व्याकरण' (१९११) हीं दोन मोठीं व्याकरणें मान्यतेस पावलीं होतीं. यांच्याहि आधीं कांहीं लहान व्याकरणें मराठींत होतीं, पण त्यांची परंपरा पुढें चालू राहिली नाहीं. अनेराज व्यास, पं. भीष्माचार्य, पं. विश्वनाथ वर्धनस्थ या महानुभावीय पंडितांनीं कामापुरतें व्याकरण तयार केलें होतें. रामदासांच्या परंपरेंतील गिरिधर स्वामींनीं 'व्याकर्ण' म्हणून एक प्रकरण लिहिलें होतें. कांहीं मिशनरी जिज्ञासूंचे प्रयत्न उल्लेखनीय आहेत. फादर स्टीफन्स (१५४९–१६१९) यांनीं कोंकणी मराठीचें व्याकरण तयार केलें होतें. डॉ. विल्यम केरी, रे. स्टीव्हन्सन, यांचींहि नांवें या संदर्भांत ध्यानांत येण्याजोगीं आहेत. परशुरामपंत गोडबोले, दाजीशास्त्री शुक्ल, पंडित वैजनाथ नागपूरकर, जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके, बाळशास्त्री घगवे, जांभेकर, गंगाधरशास्त्री टिळक इत्यादि शास्त्रींनीं लहान मोठीं व्याकरणें रचलीं होतीं. सर्वांत नांव घेण्याजोगा प्रयत्न दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचा होय. ज्या मराठी भाषेला आजवर 'व्याकरणरूप फणीनें तिला कोणी विंचरलेंच नाहीं म्हणून जींत अनेक ग्रंथी जमून फारच गुंतलेली अशी जी ही मराठी भाषा' तिला व्यवस्थित नियमांत बसविण्याचें काम दादोबांनीं केलें. दादोबांच्या नंतर रावजीशास्त्री गोडबोले, कृष्णशास्त्री गोडबोले, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचीहि व्याकरणविषयक कामगिरी उल्लेखनीय आहे. रा. भि. जोशी, रा. भि. गुंजीकर, आगरकर यांनीं व्याकरणचर्चेंत भर घालून लहानमोठीं व्याकरणाविषयक पुस्तकें लिहिलीं होतींच. मोरो केशव दामले यांचा 'शास्त्रीय मराठी व्याकरण' हा न्यायशास्त्राच्या दृष्टीनें काटेकोर असलेला ग्रंथ आजहि प्रमाण मानला जातो, तितक्याच प्रमाणांत राजवाडे यांची या ग्रंथावरील टीका महत्त्वाची आहे.

शब्दांचीं मुळें तपाशीत जाणें हा इतिहासप्रेमी राजवाडे यांचा एक आवडता

छंद होता. त्यांचीं शेवटचीं वर्षे दोन मोठे कोश सिद्ध करण्यांत गेलीं. कोशवाङ्मयाची परंपराहि संस्कृत, प्राकृत, मराठींत मोठी होती. ईस्ट इंडियन कंपनीच्या आश्रयानें कांहीं पंडितांच्या साह्यानें कँडी व मोल्सवर्थ यांनीं निर्माण केलेला मराठी शब्दकोश सर्व प्रसिद्ध आहे. वासुदेवराव आपटे, विद्याधरपंत भिडे, रानडे यांचे लहानमोठे शब्दकोश प्रसिद्धच आहेत. शब्दकोशाची परंपरा बरीच प्राचीन आहे. निरनिराळ्या भाषांचें सान्निध्य निर्माण झाल्यावर शब्दांचे भाषांतरात्मक अर्थ देणारेहि कोश निर्माण झाले. शिवकालांतील 'राज्यव्यवहार कोश,' लेफ्टनंट कर्नल केनेडी यांचा सन १८२४ मधील मराठी इंग्रजी कोश, १८२९ मधील शास्त्रीमंडळाचा कोश, वर उल्लेखिलेला मोल्सवर्थ कँडी यांचा मराठी इंग्रजी कोश, रघुनाथ भास्कर गोडबोले यांचा १८६३ मधील हंसकोश, सन १८६७ मधील रा. गोडबोले यांचा 'मराठी भाषेचा कोश' यांसारखीं आणखी किती तरी नांवें सांगतां येतील. व्युत्पत्ति कोशाची परंपरा मात्र राजवाडे यांच्यापूर्वी फारशी दिसून येत नाहीं. 'शब्दसिद्धिनिबंधा' सारखें छोटें पुस्तक सन १८४३ मध्यें निर्माण झालेलें दिसतें. हें पुस्तक 'विनायकशास्त्री दिवेकर आणि गोविंद विठ्ठल महाजन यांनीं बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांच्या साह्यानें' तयार केलें होतें. याच नांवाचें आणखी एक पुस्तक सन १८७८ मध्यें विनायक वासुदेव गोडबोले व भास्कर अनंत शास्त्री ताम्हणकर यांनीं तयार केलें. याशिवाय आणखी एक पुस्तक 'व्युत्पत्तिप्रदीप' या नांवाचें विनायक वासुदेव बापट यांनीं यानंतर लिहून प्रसिद्ध केलें.

व्याकरण व कोश यांच्या जोडीस भाषाशास्त्र हा एक कांहींसा नवा विषय त्या वेळीं पाश्चात्यांच्या साह्यानें सिद्ध होत होता. कॅप्टन जॉर्ज जर्व्हिस, जॉन बीम्स, होर्न्ले, सर जॉर्ज ग्रीअर्सन, प्रा. झुल ब्लोक इत्यादि पाश्चिमात्य पंडितांनीं भारतीय भाषांचा अभ्यास विशेष स्वरूपांत केलेला होता. जॉन बीम्स (१८३७-१९०२) यांचा पंजाबी, बंगाली, उडिया, भोजपुरी वगैरे भाषांचा चांगला परिचय होता. होर्न्ले (१८४१-१९१८). यांनीं 'गौडी भाषांचें तुलनात्मक व्याकरण' नांवाचा प्रबंध लिहून मोठें नांव कमाविलें. नाणीं, शिलालेख, प्राकृत भाषा, त्यांची लिपी, याविषयी त्यांचे सुमारें १२५ लेख प्रसिद्ध आहेत. प्रसिद्ध सर जॉर्ज ग्रियर्सन १८५१ यांनीं केलेली भारतीय भाषांची पाहणी सर्वप्रसिद्ध आहे. भाषा विषयावर हिंदुस्थानच्या दृष्टीनें महत्त्वाचें असें आणखी कांहीं ग्रंथ यांनीं लिहिले आहेत. झुल ब्लोक या प्रसिद्ध फ्रेंच भाषाशास्त्रज्ञानें १९१४ मध्यें लिहिलेला 'मराठी भाषेचा विकास' हा ग्रंथ तर आजहि फार मोलाचा मानला जातो. सन १९२० मध्यें तो प्रसिद्ध झाला La Formation de la Langue Marathi या नांवानें. मराठी शब्दांची उत्पत्ति, त्यांचीं रूपें, अपभ्रंशांच्या अवस्था, व्युत्पत्ति इत्यादि महत्त्वाच्या विषयांवरील यांचें विवेचन मोलाचें मानावें लागेल.

भाषाशास्त्र, व्याकरण, शब्दकोश, व्युत्पत्ति हे विषय राजवाडे यांच्या

आवडीचे झाले. कारण त्यांत त्यांच्या ऐतिहासिक प्रतिभेला भरपूर वाव होता. ज्या लोकसाहित्याचा आज आपण आस्थेनें अभ्यास करीत आहोंत त्या दालनांतहि राजवाडे यांनीं प्रवेश केलेला होता. विशेष नवलाची बाब अशी कीं मराठी लोक-साहित्याचा अभ्यासहि प्रथम पाश्चात्यांनींच केला. सन १८६८ सालीं मेरी फ्रियरचें 'ओल्ड डेक्कन डेज' किंवा १८९९ मध्यें मॅनवेअरनें प्रसिद्ध केलेलें मराठी म्हणींचें संकलन उल्लेखनीय आहे. जुन्या कहाण्या, जुनीं लोकगीतें, तोंडोतोडीं झालीं होतीं तीं मुद्रित होऊं लागलीं. 'स्त्रीगीतमनोरंजिका' हा गाडेकर यांचा संग्रह या संदर्भात नोंदविणें अगत्याचें आहे. 'पण कांहींतरी समाजशास्त्रीय धोरण ठेवून लोकसाहित्याची बूज स्वतंत्र विषय समजून कुणी राखली असेल तर ती इतिहासाचार्य राजवाड्यांनीं......राजवाड्यांनीं लोकगीत व लोककथा हे दोन शब्द पहिल्यानें वापरले व या प्रकाराला शिष्टमान्यता आणि अभ्यासकीय लायकी प्राप्त करून दिली.'[१] स्वतः राजवाडे यांचे दोन लेख यासंबंधीं आहेत. एक भोंडल्यावरचा व दुसरा सज्जनगडावरील लोकगीताचा. राजवाडे यांचे आरती-छंदावरील प्रकरणहि येथें उल्लेखनीय ठरेल. राजवाड्यांच्या नजरेंतून मराठी मंगळाष्टकेंहि सुटलीं नाहींत.

१ महाराष्ट्र जीवन, भाग २ पृष्ठ २१४.

३ : राजवाड्यांचें इतिहाससंशोधन : साधनसामग्रीची व्याप्ती

सन १८८३ सालीं राजवाडे यांच्या पत्नीचें निधन झालें. पुनः लग्न करण्याचें वय असतांना राजवाडे या फंदांत पुनः पडले नाहींत. विवाहाचें व त्या निमित्तानें जन्मभर नोकरीचें बंधन त्यांच्या मूळच्याच फटिंग व भटक्या वृत्तीस मानवणारें झालें नसतें. तीव्र बुद्धिमत्ता, मूलगामी विचारशक्ति, अविरत परिश्रमांची आवड व या सर्वांना सामावून घेईल अशी स्वाभिमानी वृत्ति, राजवाड्यांच्या जवळ सतत जागृत असणाऱ्या या गोष्टींमुळे राजवाडे सतत बेचैन राहिले. संशोधनाचें एकमेव क्षेत्र त्यांच्या अधाशी व कांहींशा हवऱ्या बुद्धीस पुरें पडलें नाहीं. एककल्ली व तामसी स्वभाव लोकसमुदायास राजी राखण्यासारखा नव्हता. म्हणून बहुधा सर्वत्र एकांडे शिलेदार म्हणूनच राजवाडे वावरत राहिले. आपला देश परतंत्र आहे, दुसऱ्याच्या ताब्यांत असतांना आपली उन्नति होणार नाहीं, आपलें गत वैभव आपण पुनः उभें करावें, त्यासाठीं पाश्चात्य शास्त्रीय संशोधनाची उपासना येथें सुरू व्हावी, सर्व नवीन भौतिक शास्त्रांचा व उपशास्त्रांचा येथें निष्ठेनें अभ्यास व्हावा अशी त्यांची तळमळ होती. इतिहास, धर्मशास्त्र, वनस्पतिशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, व्याकरण व भाषाशास्त्र इत्यादि विविध विषयांशीं परिचय करून घेऊन आपणांस व आपल्या वृत्तीस मानवेल अशा इतिहाससंशोधनाच्या क्षेत्राकडे राजवाडे लागलीच वळलेले दिसतात.

राजवाडे यांचें इतिहाससंशोधन हें स्वाभिमानानें प्रेरित होऊन झालेलें आहे. इतिहासलेखकास पुढें उपयुक्त पडतील अशीं प्रचंड दसरें राजवाडे यांनीं शोधिलीं व असंख्य कागदपत्र अत्यंत काळजीपूर्वक तपासून प्रसिद्ध केले. त्यांना त्या वेळीं कुठली शिष्यवृत्ति नव्हती, अनुदान नव्हतें, राजाश्रय नव्हता, पण एक जिद्द होती, ज्ञानोपासनेची तीव्र तळमळ होती. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या लेखांनीं झपाटलेलें मन होतें. आपल्या शिक्षणविषयक निबंधांत त्यांनीं लिहिलें आहे, ‘शाळेंतून जातांना व येतांना व शहराच्या पश्चिम भागांत हिंडतांना शास्त्रीबोवांच्या सभ्य, भारदस्त, व प्रौढ मूर्तीला मीं अनेकवार पाहिलें होतें. शास्त्रीबोवा परम देशभक्त आहेत, असें ज्यांच्या त्यांच्या तोंडून ऐकत होतों, आणि त्यांनीं लिहिलेले निबंध वाचलेले माझ्या कानावरून गेले होते—’ चिपळूणकरांपासून घेतलेल्या या प्रेरणेनें ‘भाषांतर’ मासिक निघालें व याच प्रेरणेंतून राजवाडे इतिहाससंशोधनाकडे वळले. ‘काव्येतिहाससंग्रहकारांच्या ऐतिहासिक पत्रांनीं स्वदेश म्हणून कांहीं आहे हें मला कळलें’ असें राजवाडे यांनीं याच निबंधांत

म्हटलें आहे. अत्यंत पवित्र व उदात्त हेतूनें प्रेरित होऊन देशभक्तीचा एक विशिष्ट मार्ग म्हणून कर्तव्यबुद्धीनें राजवाडे यांची ज्ञानोपासना सुरू झाली. स्वातंत्र्य नष्ट होऊन फार काळ लोटला नसल्यानें इतिहासाचीं अनेक साधनें या नाहीं त्या स्वरूपांत अनेक राजेरजवाडे, संस्थानिक, जहागिरदार, सरदार यांच्या घरीं असतील तीं वेळींच जमवावींत, त्यांची नीट व्यवस्था लावावी, शक्य झाल्यास तीं प्रसिद्ध करावींत या एकाच कल्पनेनें राजवाडे भारावून निघाले.

आपला इतिहास आपणच लिहिला पाहिजे हें एक राजवाडे यांच्या कार्याचें मुख्य सूत्र होतें. परकीयांनीं लिहिलेले आपले इतिहास आपणांसाठीं नसतात, त्यांत अनेक बाबींचा जाणीवपूर्वक विपर्यास केलेला असतो, सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांत बुध्याच नसतो अशी खात्री राजवाडे यांची झाली होती. विश्वसनीय व अस्सल साधनें प्रथम शोधून काढणें, त्यांचें परीक्षण करून तीं प्रसिद्ध करणें हें फार मोलाचें कार्य राजवाडे यांनीं प्रथम हातीं घेतलें. सन १८९७ मध्यें भाषांतर मासिक पुण्यांतील प्लेगमुळें चालू ठेवणें त्यांना कठिण झालें व याच सुमारास राजवाडे यांचा वांईशी संबंध दृढ झाला. अंताजी गंगाधर जोशी, रामकृष्णपंत लेले गोपाळरावजी भिडे, शंभूराव करंदीकर, काकाराव पंडित इत्यादि प्रतिष्ठित वाईकरांशी राजवाडे यांचा परिचय झाला. येरंडे यांच्या माळ्यावरील दप्तर राजवाडे यांच्या हातीं लागलें आणि त्यांच्या आयुष्याची दिशा निश्चित ठरली. तहानभूक विसरून राजवाडे या एकाच कामास लागले. केवळ इतिहाससंशोधन हाच एक राजवाडे यांचा संसार होता. कष्टाचा कंटाळा कधींच नव्हता. हातानें स्वयंपाक करीत आणि दिवस-रात्र जुनीं कागदपत्रें वाचण्यांत, त्यांचा अर्थ लावण्यांत खर्च करीत. एका विडीशिवाय दुसरें व्यसन नव्हतें. अखंड परिश्रम आणि तीव्र व मूलगामी विचार करण्याची प्रखर बुद्धिमत्ता यांच्या योगानें राजवाडे यांनीं सगळा महाराष्ट्र स्वतः हिंडून पाहिला. राजघराणीं, संस्थानिक, इनामदार, सेनापती यांच्या वाड्यांचे उंबरे झिजवले, त्यांच्यापाशीं याचना केली. कधीं लोभानें, कधीं प्रेमानें, कधीं रागानें त्यांनीं मालकास समजाविलें व कागदपत्रें हस्तगत केलीं. मोडी लिपींतील जुनाट कागद वाचणें, तारखांचा मेळ बसविणें, घटनांचा क्रम लावणें हीं कामें त्यांना सहज साधत गेलीं.

हिंदुस्थानांत कोठें कोठें हिंडावयास पाहिजे व कोठें कोठें शोध घ्यावयास हवा याचें आकलन राजवाडे यांना बरोबर झालें होतें. 'अफगाणिस्थान, इराण इत्यादि देशांत व लिस्बन, पॅरिस, लंडन, आम्स्टर्डाम इत्यादि शहरांत मराठ्यां-संबंधीं कागदपत्रें सापडण्यासारखी आहेत. ब्रिक्स, ग्रँट डफ, म्याकेंझी इत्यादि गृहस्थांनीं विलायतेंत नेलेले कागदपत्र लंडन येथें जाऊन शोधिले पाहिजेत" असें त्यानीं प्रथमच सांगून टाकलें आहे.[1] माधवराव बल्लाळ, नारायणराव बल्लाळ, रघुनाथ

१ मराठयांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १ पृष्ठ ६.

बाजीराव, माधवराव नारायण, शिवाजी, संभाजी, राजाराम, बाळाजी विश्वनाथ यांचीं पत्रें कसून शोधावयास हवींत असें त्यांनीं आवर्जून म्हटलें आहे. ‘ मुख्यतः शिवाजी महाराजांसंबंधीं पत्रें सांपडलीं पाहिजेत. महाराजांना जाऊन कांहीं फार काळ झाला नाहीं;सव्वादोनशें वर्षें अद्यापि व्हावयाचीं आहेत. शिवाजी महाराज व त्यांचे सरदार व मुत्सद्दी ह्यांनीं लिहिलेलीं पत्रें लक्षावधी असलीं पाहिजेत. शिवाजी महाराजांचा पसारा केवढा, त्यांचा पराक्रम कसला अकटोविकट आणि त्यांचें धोरण किती लांबवर ! तेव्हां त्यांच्या अद्भुत चरित्रपटाच्या लाखों धाग्यांचा यथास्थित उलगडा करण्यास त्यांचा व त्यांच्या मुत्सद्यांचा पत्रव्यवहार सांपडला पाहिजे, ’[१] ही राजवाडे यांची जिद्द होती. मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, रघोजी भोसले, गोविंद हरि पटवर्धन, मुरारराव घोरपडे, संभाजी राजे कोल्हापूरकर, दमाजी गायकवाड, दाभाडे, यशवंतराव पवार, यमाजी शिवदेव, बाबूजी नाईक बारामतीकर, आंग्रे, अंताजी माणकेश्वर, नारो शंकर, विठ्ठल शिवदेव इत्यादि प्रसिद्ध पुरुषांचे पत्रव्यवहार इतिहासाच्या सिद्धतेस फारच उपयुक्त असल्याचें त्यांनीं आवर्जून सांगितलें. इतकेंच नव्हे तर अयोध्या, काशी, अलीगड, पानिपत, बुंदी, कोटा, भोपाळ, ग्वालेर, जयपूर, इंदूर, देवास, धार, उज्जनी, महेश्वर, ओंकार, औरंगाबाद, बीड, हैद्राबाद, सातारा, ओझर्डे, तालीकोट, श्रीरंगपट्टण, म्हैसूर, विजापूर, बेदर, सुरत, रामदुर्ग, भरतपूर, चांदवड, भिवंडी, जिंजी इत्यादि ११३ स्थळांचीं यादीहि त्यांनीं संशोधनासाठीं दिलेली आहे.[२]

आणि आश्चर्याची गोष्ट अशी की राजवाडे यांनीं महाराष्ट्रांतील बहुतेक स्थळें इतिहाससंशोधनार्थ स्वतः हिंडून तपासलीं. तंजावर, कोल्हापूर, सांगली, मिरज, कऱ्हाड, वांई, सातारा, पुणें, तळेगाव दाभाडे, मुंबई, ठाणें, नाशिक, चाळिसगांव, धुळें, इत्यादि गांवीं त्यांचें भ्रमण नित्य होत असे. सन १८९० मध्यें स्वतःच्या पत्नीस आणण्यासाठीं राजवाडे बंधूंच्याकडे कराचीस गेले असतांना काबूलपर्यंत गेल्याचा तुरळक उल्लेख सांपडतो.[३] राजवाडे यांचें चित्त एके ठिकाणीं फारसें स्थिर होत नसे. त्यांच्या कुशाग्र बुद्धीस नित्य नवें खाद्य लागे. त्यांचें परिभ्रमण नित्य नव्या हेतूनें होई. कधीं एखादा शिलालेख, कधीं ताम्रपट, कधीं जुनी पोथी, कधीं जुन्या तहाच्या अटी, कधीं जुन्या घराण्याची वंशावळ यांचा संग्रह त्यांच्यापाशीं होई. या साधनसामग्रीनें त्यांच्याजवळील दोन तीन ट्रंका भरलेल्या असत. कागदपत्रांचें परीक्षण व त्यांचें पुनर्लेखन वारंवार चालें. जेथें जातील तेथें गांवच्या प्रमुखाशीं संधान बांधतील, भाड्यानें एखादी खोली घेतील,

१– कित्ता : पृष्ठ ६ व ७

२– कित्ता : पृष्ठ ७.

३– भा. वा. भट – राजवाडे चरित्र. पृष्ठ १७८.

स्वयंपाकाचीं भांडीं जमवतील, दूध, तूप, शिधासामग्री मिळवतील, स्वतःचा स्वयंपाक स्वतः करतील आणि एवढ्या अल्प सामग्रीवर इतिहासाचीं साधनें शोधण्यास नेटानें सिद्ध होतील, असा राजवाडे यांच्या परिभ्रमणाचा अर्थ आहे. स्वभाव संशयी व तामसी म्हणून कुटुंबवत्सल माणसांकडे त्यांचें फारसें जमलें नाहीं. कायगांव टोकें, चाळीसगांवाजवळील पाटण, पंढरपूर, हैद्राबाद संस्थानांतील तवरेश्वर वा तवगगिरी, पैठण, बीड, लातूर, परळीवैजनाथ, मोर खोरें, राजापूर, चिपळूण, श्रीपरशुरामक्षेत्र, बैतुल, मुलताई, मेणवली, वांई यांसारख्या कित्येक ठिकाणीं साधनसंशोधनार्थ अखंड परिभ्रमण त्यांनीं केलें. आंबेगांव, कान्हूरपठार, पळसदेव, श्रीवर्धन, दीव, जंजिरा, आसनगांव, कुमठे, पाली, चाफळ, धावडशी, कळंब, वर्ये, करंदी, कऱ्हाड, गोवारें इत्यादि गांवांची तारीखवार जंत्रीहि राजवाडे यांच्या एका टिपणांत सांपडली आहे.[1]

या अखंड परिभ्रमणांत राजवाडे यांना किती भलेबुरे अनुभव आले असतील. कधीं लोकांची बेफिकीरी, कधीं राजवाडे यांचा विक्षिप्तपणा, कधीं राग, कधीं त्रागा, कधीं लोभानें पोटांत शिरून कागदपत्रें हस्तगत करण्याचें लाघव. राजवाडे यांनीं आपल्या इष्टसिध्यर्थ नाना उपाय योजिले असतील. वांईस पानिपत प्रकरणींचीं कागदपत्रें तपासून झाल्यावर मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचा पहिला खंड प्रसिद्ध झाला. त्याच्या तेजस्वी प्रस्तावनेनें त्यांचें नांव उभ्या महाराष्ट्रांत प्रसिद्ध झालें. अनेक घरंदाज व प्रतिष्ठित पुरुष आपापलीं दप्तरें तपासण्याची विनंति करण्यासाठीं राजवाडे यांच्या जवळ आले. सरदार रास्ते, वेदमूर्ति दीक्षित, थिटे, भिंताडे, सरदार शेखमिरे वगैरे इतिहासप्रसिद्ध घराण्यांतील कागद राजवाडे यांनीं पाहिले. नाना फडणीस यांचा प्रसिद्ध वाडा वांईजवळ मेणवलीस आहे. तेथील कागदपत्रें महत्त्वाचीं असल्याचें राजवाडे यांना समजलें. राजवाडे तेथें गेले, परंतु त्यांचा जम तेथें नीट बसेना. त्यांना दप्तर पाहवां आलें नाहीं. वांईच्या रामकृष्णपंत लेले यांच्या मध्यस्थीनें कशीतरी परवानगी मिळाली. पहाटे पांच पासून रात्रीं अकरा वाजेपर्यंत राजवाडे दप्तरें तपाशीत. मध्यें खाण्यापिण्यास जेवढा वेळ लागे तेवढाच खर्च होई, काकाराव पंडित व गोपाळराव रास्ते त्यांना मदत करण्यास जात असत. 'मी शंभर वर्षें जगलों आणि हें मेणवलीचें दप्तरप्रकाशनाचें काम सुरू केलें तर माझें सर्व आयुष्य खर्च झालें तरी हें काम तडीस जाणार नाहीं' असें ते वारंवार म्हणत.[2]

राजवाडे या कामीं स्वःजवळची तुटपुंजी रक्कम खर्च करीत. आनंदीबाई, राघोबादादा, सखारामबापू, निजामअली यांच्या संबंधींच्या कागदपत्रांची व्यवस्था

१– कित्ता : पृष्ठ १९१.

२ – ब्राह्मण पत्रिकेचा राजवाडे तिलांजलि अंक : पृष्ठ ५६

नीट असावी म्हणून त्यांनीं रुमाल बांधण्यासाठीं ऐशी रुपयांचें कापड विकत आणलें. यांतील एक रुमाल नाना नेहमीं वापरीत असलेल्या नकाशांचा होता. यांतील कांहीं नकाशे गळबटले. मालकाचा संशय राजवाडे यांच्यावर आला. राजवाडे यांनीं रागानें हें काम तसेंच सोडून दिलें. आपल्या या प्रदीर्घ उद्योगाचा विस्तृत आढावा स्वतः राजवाडे यांनींच एकादां घेतलेला दिसतो. मेणवली येथील दप्तराचें ऐतिहासिक महत्त्व व त्यासाठीं राजवाडे यांनीं केलेले परिश्रम यांत दिसून येतात.

"ब्युबॉनिक प्लेगला हटविण्याकरितां इंग्रजी सैन्यानें पुण्यावर हल्ला केला हें सर्वत्रांस श्रुत झालेंच आहे. त्या धामधुमीच्या वेळीं पुण्यांत अगदी शुक्क झालें होतें. शहरांतील बहुतेक सर्व कारखाने बंद होऊन बोलायला माणूस देखील मिळण्याची पंचाईत पडे. अशा वेळीं विशेष कांहीं कामधंदा नसल्यामुळें व आपल्या हातून इंग्रजी सैनिकांना काडीइतकेंहि साहाय्य होईल अशी खात्री नसल्यामुळें मी वांई प्रांतीं जाऊन राहिलों होतों, त्याच प्रांतीं मुद्दाम जाण्याचें कारण असें झालें कीं, ऐतिहासिक लेखांचा व माहितीचा भरणा तिकडे विशेष आहे हें मला दोनचार वर्षांच्या खटपटीवरून कळून आलें होतें. तेव्हां ही संधी या कामाला उत्तम आहे असें जाणून मी श्रीक्षेत्र वांई येथें गेलों व ऐतिहासिक माहितीचा सुगावा लागण्याच्या खटापटीस लागलों. ओझर्डे, वांई, बावधन, लिंब, वयें, कोरेगांव, मेणवली इत्यादि स्थळीं जुनीं दप्तरें कांहीं कांहीं घराण्यांत अजून शिल्लक आहेत असें माझ्या नजरेस आलें. ह्या घराण्यांपैकीं पांचचार दप्तरें मीं बारीक तपासून पाहिलीं. पैकीं प्रथम पंत राजाज्ञा यांचें दप्तर तपासलें. गेल्या दोनशें तीनशें वर्षांतील रेव्हिन्यू व जुडीशियल खात्यांची माहिती पंतांच्या दप्तरांत बरीच भरली आहे. विजापूरचे, व रामशास्त्र्यांचे निवाडे ह्या दप्तरांत बरेच आहेत. तसेच वाकनामे, करारनामे, इनामपत्रें, बक्षिसपत्रें, करिणे, तहपत्रें, कर्जरोखे व इतर रोजच्या व्यवहारासंबंधीं शेकडों कागद त्या दप्तरांत आहेत. ह्या दप्तरांत निव्वळ राजकीय अशी माहिती बिलकूल नाहीं. दुसरें दप्तर वांई येथील येरंडे यांचे तपासलें. हें दप्तर येरंडे यांच्या वाड्यांतील एका जुन्या आवारांत कातड्यानें मढविलेल्या अशा एका पेटाऱ्यांत शाबूत जसेंच्या तसेंच कोरें करकरीत सांपडलें. सदाशिवरावभाऊ पानपतास असतांना त्यांनीं गोविंदपंत बुंदेल्यास पाठविलेलीं पांच चारशें पत्रें या पेटाऱ्यांत होतीं. तीं मोठीं वाचनीय असून त्या वेळच्या कांहीं गोष्टींचा खुलासा तीं उत्तम करतील असा अदमास आहे. तिसरें दप्तर दुसऱ्या बाजिरावाचे सासरे रास्ते म्हणून वाईस आहेत त्यांचें होय. त्यांच्या येथील कागदांत कांही चमत्कारिक माहिती मिळाली. त्या तिन्ही दप्तरांची थोडीबहुत चांचणी घेतल्यावर माझ्या पाहण्यांत चवथें एक दप्तर आलें. तें विस्तीर्ण व प्रचंड असें असून इतिहासाच्या भोक्त्यांची मनोकामना तृप्त करण्यासारखें आहे. तें दप्तर नाना फडणीस यांचें होय व ह्याच दप्तरासंबंधीं आज मी थोडीशी माहिती देणार आहें.

" वांईपासून एका मैलावर पांडवगडाच्या पायथ्याशीं व कृष्णानदीच्या तीरावर मेणवली म्हणून एक सुंदर खेडें आहे. तेथें नाना फडणीसांचे अवशिष्ट राहिलेले सर्व कागदपत्र वाड्यांत नीट जपून ठेविलेले आहेत. एकंदर सर्व रुमाल सुमारे १०० असून त्यांपैकी सुमारे निम्मे अधिक रुमाल जाबसाली पत्रांनीं भरले आहेत. बाकीचे रुमाल हिशेबी आहेत. लहानमोठ्या जाबसाली पत्रांची एकंदर संख्या वीस पासून पंचवीस हजारापर्यंत भरेल व त्यापैकी प्रायः प्रत्येक पत्र अत्यंत महत्त्वाचें आहे. परभू लोकांनीं वेदोक्त कर्म करूं नये अशा नारायणरावांनीं सखाराम हरी इत्यादी गृहस्थाकडून घेतलेल्या लेखी कबुलीच्या कागदापासून तो तहत नाना फडणीसाच्या मृत्यूबद्दल गव्हर्नर जनरलानें पाठविलेल्या दुखवट्याच्या पत्रापर्यंत झालेल्या सर्व एकंदर खटाटोपीसंबंधी पत्रें या दप्तरांत स्वर्गीच्या चित्रगुप्ताच्या दरबारांतील पत्राप्रमाणें, क्रमवार सापडतात. खरा कोण, मित्र कोण, शत्रु कोण याचा उलगडा ह्या पत्रांत इत्थंभूत होतो. त्या वेळच्या बहुतेक गुप्त गोष्टी ह्या दप्तरांत स्पष्टपणें वाचतां येण्यासारख्या आहेत. मोरोबादादा, सखाराम हरी, चिंतो विठ्ठल, सखारामबापू, हरिपंत फडके, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, अलिबहादर, फत्तेसिंग गायकवाड, परशरामभाऊ पटवर्धन, राघोबादादा, आनंदीबाई, हैदरअल्ली, रुक्न उद्दौवला, प्रतिनिधि, साबाजी भोंसले, मुधोजी भोंसले, आंग्रे, धुळप, मुंबई, मद्रास, कलकत्ता येथील कौन्सिलें, डच्च लोक, जर्मन, फ्रेंच व पोर्तुगीज लोक, सारांश हिंदुस्थानांत त्या वेळीं जो जो कोणी मातबर म्हणून माणूस झाला त्याचीं त्याचीं पत्रें नानांच्या दप्तरीं विल्हेस लावलेलीं आहेत. हे रुमाल सोडून पाहून आंतमध्यें आहे काय हें नुसतें वरवर पाहण्यास मला सरासरी एक आठवडा लागला. पुढें महिनाभर मीं या पत्रांचें वर्गीवरण केलें. दररोज सुमारें दहा तासप्रमाणें मी काम करीत असें. तरीहि सुमारें एकोणीस पुडकीं तपासावयाचीं शेवटीं राहिलींच आहेत. वर्गीकरण करून एकंदर एकशें सदुसष्ट पुडकीं झालीं. प्रत्येक पुडक्यांत सुमारें शंभरपासून तीनशेंपर्यंत कागद आहेत. ह्या पुडक्यांचे मी मुख्य चार भाग केले आहेत. पहिल्या भागाला दादासाहेब भाग म्हणून म्हटलें आहे. ह्या भागाचा विस्तार इ. स. १७७३ पासून म्हणजे नारायणरावांच्या मृत्यूपासून तों इ. स. १७८४ पर्यंत म्हणजे दादासाहेबांच्या मृत्यूपर्यंत झालेला आहे. हाच भाग फार महत्त्वाचा व नाना फडणिसाची मुत्सद्देगिरी कसास लावणारा असा आहे. ह्या बारा वर्षांत नानांनीं आपले बहुतेक शत्रू पराजित करून टाकिले. यःकश्चित येसाजी शिंद्यापासून तों तहत गाडरापर्यंत सर्व लोकांची खैरी नानांनीं ह्याच बारा वर्षांत जिरविली, व तत्संबंधीं बहुतेक कागदपत्र अजूनही दप्तरांत उपलब्ध आहेत. दुसरा भाग इ. स. १७८४ पासून इ. स. १७८७ पर्यंतचा. हा भाग प्रायः शांततेचा असून नानांचा थोडासा सुखाचा व वैभवाचा गेला. तिसरा भाग १७८७ पासून म्हणजे टिपूशीं लढाया सुरू झाल्यापासून तों इ. स. १७९६ पर्यंतचा म्हणजे सवाई माधवरावांच्या मृत्यूपर्यंतचा.

ह्या नऊ वर्षांत टिपूशीं दोन लढाया व निजामाशीं एक लढाई झाली. ह्या लढायां-संबंधीं सविस्तर माहिती या दप्तरांत आहे. चवथा भाग इ. स. १७९६ पासून इ. स. १८०० पर्यंतचा. ह्या चारही वर्षांसंबंधींची माहिती मात्र अगदी त्रोटक आहे. दुसऱ्या तीन भागांच्या मानानें पाहिलें असतां ह्या चवथ्या भागांतील माहिती फारच तुटपुंजी होणार आहे. कदाचित् बाजीरावानें हा भाग जप्त करून नेला असावा. येणेप्रमाणें मीं ह्या दप्तराचे चार भाग केले आहेत. आतां ह्यांतील कांहीं विशेष गोष्टी सांगून आटोपतों.

"ह्या दप्तरांत एक नकाशांचा रुमाल आहे. त्यांत लढायांचे, किल्ल्यांचे, वेढ्यांचे, हिंदुस्थानचे, निजामराज्याचे, मराठी साम्राज्याचे, कोंकण किनाऱ्याचे, साष्टीचे, मुंबईचे इत्यादि नकाशे आहेत. कोंकणचा नकाशा सरासरी पांच पन्नास हात लांब आहे व त्यांत सह्याद्रीचे घाट व समुद्रावरचीं बंदरें काठेवाडापासून गोव्यापर्यंतचीं काढलेलीं आहेत. फ्रेंच रेव्होल्युशनांत राजाराणीला फांशी दिलेल्या संबंधीं व युरोपांतील राष्ट्राराष्ट्रांत त्या वेळीं झालेल्या तहांसंबंधीं कांहीं पत्रें दप्तरांत आहेत. मुंबईच्या व कलकत्त्याच्या कौन्सिलांत झालेल्या वादविवादाचे रिपोर्ट, कौंसिलदारांचे स्वभाव इत्यादींची माहिती दप्तरांत आहे. इंग्लिश नेव्हीचे कांहीं नकाशे असून तत्संबंधीही थोडी माहिती आहे. भोंसले, होळकर, निजाम, टिपू, महादजी, दवलतराव, रामाजी पाटील, बाजीराव, हरिपंत इत्यादि ज्या ज्यासंबंधीं माहिती पाहिजे असेल त्या त्या संबंधीं तितकी माहिती ह्यांत आहे. सवाई माधवरावांची नानांच्या एका कारकुनानें ठेविलेली एक मोडकळीस आलेली डायरी आहे. तींत सवाई माधवरावांच्या आजन्म मरणापर्यंतच्या दैनंदिन व्यवहाराचा इतिहास आहे. त्यांत सवाई माधवराव कधीं भूगोल शिकतांना, कधीं तारांगणांत दुर्बिण फेकतांना, कधीं शिकार करतांना, दृष्टीस पडतात.

"एकंदरीत दप्तर बिनमोल आहे. नानांचा खरा मोठेपणा हें दप्तर सबंध प्रसिद्ध केल्याविना कळणार नाहीं. या प्रचंड बुद्धीच्या व कर्तृत्वाच्या पुरुषासंबंधीं अजूनही फार कोत्या कल्पना आहेत. यूरोपांतील अलीकडील मुत्सद्द्यांत माझ्या मतें नानांच्या बरोबरीचा ह्या चारशें वर्षांत एकच मुत्सद्दी झालेला दिसतो. तो स्पेनचा एंपरर पांचवा चार्लस याचा गुरु कार्डिनल झिमिनस हा होय.

"श्रीमंत सरदार मेणवलीकर यांनीं मला दप्तर पाहण्याची परवानगी दिली याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

"नाना फडणिसासारख्या आमच्यांतील प्रख्यात मुत्सद्द्याचा खरा इतिहास लोकांपुढे मांडून नानांची खरी योग्यता महाराष्ट्रीयांचे मनांत बिंबवून देणारे हे कागदपत्र छापविण्यास निदान ३०-४० हजार रुपये तरी लागतील असा अंदाज आहे. मुंबईच्या सेक्रेटेरियांतील कागदपत्र छापण्यास सरकार लाखों रुपये खर्च करितें. तेव्हां नानांबद्दल आम्हांलाही अभिमान वाटतो म्हणविणारे मुंबई सरकार

ह्या कामीं कांहींना कांहींतरी मदत करीलच करील. तथापि हें काम आमच्यांतील श्रीमंत लोकांनीं व जहागीरदारांनीं आंगावर घेतल्याशिवाय पार पडावयाचें नाहीं. ज्या शहरांत हिंदू इस्पितळाला तीन हजार रुपयांची रक्कम जुळतां जुळतां पुरेवाट झाली, त्या पुण्यांतल्या कंगाल व निरभिमानी लोकांच्या हातून कितीशी मदत होणारी आहे हें दिसतेंच आहे! महाराज सरकार करवीर, पटवर्धन सरदार, ज्ञानप्रसारार्थ झटणारे श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड, पूर्वजांचा अभिमान बाळगणारे महाराज बाळासाहेब होळकर ह्यांपैकी कोणीही मनावर घेतल्यास हें काम सहज होणारें आहे. सरदारांच्या कानांवर ही गोष्ट गेली असतां आपण होऊन मदत करण्यास ते तयार होतील हें त्यांच्या पूर्वजांविषयींच्या कळकळीवरून उघड दिसतच आहे."[१]

आपल्या प्रतिवर्षीच्या संशोधनाचा आढावा राजवाडे भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक सभेच्या वेळीं देत असत. सन १९१३ च्या सुमारास राजवाडे गणेश चतुर्थीच्या निमित्तानें वऱ्हाडांत गेलेले दिसतात. मूर्तिजापूर, व कारंजे या गांवीं चांगली 'प्राप्ती' झाली म्हणून राजवाडे यांनीं लिहिलें आहे. "मूर्तिजापुरास जोशी आहेत. त्यांची वस्ती आज त्या प्रांतांत आठशें वर्षें आहे, असें तेथील जोश्यांचें दप्तर व कांहीं पोथ्या पाहतां दिसून आलें. शिवाय जोश्यांचा एक वंशवृक्ष मिळाला. त्यांत एकंदर पिढ्या ३२ आहेत. दर पिढीस २२ वर्षें धरलीं तर एकंदर वंशवृक्ष ७२६ वर्षांचा होतो. म्हणजे कमींत कमी हा वंश मूर्तिजापूर प्रान्तांत ७२६ वर्षें म्हणजे शातवाहनाच्या अकराव्या शतकापासून आहे. इतकी जुनी वंशावळ आतांपर्यंत मला दक्षिणेंत आढळली नाहीं. ज्ञानेश्वराच्या आईच्या घराण्याची वंशावळ आपले नजरेखालून जावी म्हणून आज मंडळांत आणली आहे." असें राजवाडे यांनीं या सालचा अहवाल सांगतांना म्हटलें आहे.

करंजासहि राजवाडे यांना कांहीं संस्कृत-मराठी ग्रंथ मिळाले. नंतर ते खेड जुन्नर येथें आले. खेड येथील देशपांडे यांच्या घरीं ज्ञानेश्वरकालीन अस्सल जुन्या पाठाच्या ज्ञानेश्वरीचीं कांहीं पानें त्यांना मिळालीं. नंतर राजवाडे चित्पावनांची मूळ भूमिका कोंकण संशोधावें म्हणून तिकडे वळले. प्रथम गोव्यापासून त्यांनीं प्रारंभ केला. पूर्णगड, पावस, रत्नागिरी, चिपळूण, राजापूर, प्रभानवल्ली इत्यादि ठिकाणांना त्यांनीं भेट दिली. या प्रवासासंबंधीं ते स्वतः लिहितात, 'गोव्यापासून चिपळूणापर्यंतची कोंकणपट्टी मी तीनदां चालून गेलों. एकदां वलाटीनें गेलों. एकदां खलाटीनें गेलों, कोकणपट्टी मी तीनदां चालून गेलों. आणि हा सारा प्रवास पायानें केला. बोचक्यांत काठी अडकवून ती खांद्यावर टाकून सुमारे दहाबारा मैलांपर्यंत

१– केसरी : जून १८९७.

दिवसाची मजल मी करीत असें. बैलगाडीचाहि दोनतीन वेळां उपयोग केला. या प्रवासांत चित्पावनांच्या मूळ पीठिकेचा व मध्यकालीन स्थितीच्या इतिहाससाधनांचा शोध करतां करतां कऱ्हाडे, देशस्थ, देवरुखे, भंडारी, शेणवई, प्रभू वगैरे जातींच्या इतिहाससाधनांचेहि कांहीं कागदपत्र मिळाले. समुद्र, खाड्या, बंदरें, कोट, दऱ्या, खोरी, पठारें, नद्या, डोंगर, पर्वत, देवळें, मशिदी, घाट्या पाहून कोकण प्रांतांतील लोकांच्या जीवनचरित्रासंबंधानें व वैयक्तिक आणि सामाजिक मनोरचनेसंबंधीं माझ्या माहितींत बरीच भर पडली...ह्या प्रदेशाचा ऐतिहासिक अभ्यास करण्यास, खरें म्हटलें तर एक स्वतंत्र इतिहास मंडळच हवें...पुढील वर्षीं मीं चिपळुणापासून अष्टागरापर्यंतच्या प्रदेशांत हिंडावयाला संकल्प केला आहे."

सन १९१४ सुमारास राजवाडे यांच्या प्रवासाची हकीगत खालीलप्रमाणें आहे.

'१ गेल्या सालीं मी खालील स्थळीं हिंडलों.'

१ उखडे	२ जंजिरा	३ दीव	४ श्रीवर्धन
५ आसनगांव कुमठे	६ पळसदेव	७ पाली	८ चाफळ
९ उरले	१० मरळी	११ दिवशी	१२ सातारा
१३ धावडशी	१४ कळंब	१५ वेचलें	१६ करंदी
१७ बहुली	१८ तळबीड	१९ गोवारें	२० कऱ्हाड
२१ कान्हूर पठार	२२ कण्हेर आकलें.		

या बावीस ठिकाणीं हिंडून राजवाडे यांनीं जी सामग्री मिळवली तिचा वृत्तान्त सांगून आपल्या संशोधनांत अडचणी कोणत्या आहेत याचा विस्तृत परामर्श घेतलेला आहे. रुळलेले कारकून वर्षे दोन वर्षे अगोदर तयार केले पाहिजेत व प्रवास खर्च, जेवण खर्च यांचीहि तरतूद व्हावयास पाहिजे असें त्यांनीं म्हटलें आहे. कधीं राजवाडे आपल्याबरोबर कांहीं इतिहासप्रेमी शिष्यमित्रांना घेत असत. पुढल्याच वर्षी राजवाडे यांच्याबरोबर आजचे प्रसिद्ध म. म. दत्तो वामन पोतदार हे होते. राजवाडे यांच्या समागमें त्यांनीं केलेल्या परिभ्रमणाचें मार्मिक चित्र पोतदार यांनीं काढलें आहे. भा. इ. सं. मंडळाचे सभासद गोपीनाथ बाळकृष्ण पोतनीस यांच्या गांवीं संशोधन व्हावें असें ठरलें. तेथील परिस्थितीचें वर्णन करतांना पोतदार लिहितात,

"उरवडें गांव भोर हद्दींत असून मोठ्या नामीं जागीं वसला आहे. शेजारींच राळे माचीचा भव्य व सिंहगडाशीं स्पर्धा करणारा डोंगर आहे. पोतनिसांच्या बखळ झालेल्या वाड्याच्या देवडीवरील दिवाणखान्यांत दप्तरांचे रुमाल फळ्यांवरून चेपून ठेवलेले दृष्टीस पडले. उंदरांच्या लेंडीपुष्पांचा खच त्यावर पडलेला असून पावसाच्या पाण्यानें दप्तरें आभिषिक्त झालेलीं आढळलीं. एकंदर रुमाल

सुमारें दोनशें असावा. याखेरीज संस्कृत, प्राकृत, प्रसिद्ध पुष्कळ पोथ्या मोठ्या खर्चानें लिहवून घेतलेल्या आपल्या आपल्या जीर्णोद्धारकर्त्यांच्या स्वागतार्थ तेथें सज्ज होत्या. या संग्रहांत मुक्तेश्वराचीं पर्वें आहेत. मोडींत लिहिलेल्या कृष्णामाहात्म्याचीं पानें आहेत. भागवताचे अध्याय आहेत. मल्हार रामरावकृत राजनीत्यादि प्रकरणें आहेत. रामहृदय, सूर्यहृदय इत्यादि स्तोत्रें आहेत. धर्मग्रंथ आहेत, मोडी कित्ते आहेत, असें विविध भांडार आहे."[१]

इस्लामपूरचे वासुदेव दामोदर मुंडले हे राजवाड्यांचे एक चाहते होते. इतिहास-संशोधनाच्या कामीं राजवाड्यांच्या बरोबर असण्यांत काय प्रसंग येत त्याचें त्यांनीं विस्तारानें वर्णन केलें आहे.[२] आंबडखिंड, कण्हेरीचा मठ, मांढरदेवी इत्यादि स्थळांच्या त्यांच्या भेटी इतिहास संशोधनाच्या दृष्टीनें नसल्या तरी राजवाडे यांच्या स्वभावाच्या निदर्शक मात्र जरूर आहेत. सातारा जिल्ह्यांतील चिकुर्डे, शिराळे, चरण बिळाशी व वाटेगांव येथील संशोधनवृत्तान्तहि मुंडले यांनीं सदरच्या लेखांत दिलेला आहे. चिकुर्डे येथील इनामदारांच्या घरचा एक ताम्रपट मराठी भाषेच्या दृष्टीनें राजवाडे यांच्या दृष्टीनें महत्त्वाचा ठरला.

राजवाडे एकदा एखाद्या उद्योगास लागले म्हणजे सर्वस्व अर्पून काम करीत असत. मेणवली दप्तराची महती त्यांनीं वर वर्णन केलीच आहे. पण या दप्तराचा नाद त्यांना सोडावा लागला. नंतर हें दप्तर पुरुषोत्तम विश्राम मावजी शेट व रावबहादूर पारसनीस यांना हस्तगत झालें. याच सुमारास रा. ब. द. ब. पारसनीस यांचें 'ब्रह्मेंद्र स्वामींचें चारित्र' प्रसिद्ध झालें. राजवाडे यांनीं या चारित्रावर आपल्या साधनांच्या तिसऱ्या खंडांतील प्रस्तावनेंतून कडाडून हल्ला केला. आपल्या सहकाऱ्यांसहित त्यांनीं ब्रह्मेंद्रस्वामीविषयींचीं कागदपत्रें जमविण्यास प्रारंभ केला. पिंपरी येथील आप्पासाहेब भागवत या स्वामींच्या परंपरेंतील गृहस्थांकडून राजवाडे यांना बरींच पत्रें मिळालीं. पहिले बाजीराव व चिमाजी आप्पा यांनीं ब्रह्मेंद्रस्वामीशीं केलेला पुष्कळसा पत्रव्यवहार राजवाडे यांच्या हातीं आल्यावर त्यांनीं पारसनीस यांच्या ब्रह्मेंद्रचरित्रावर टीकास्त्र सोडलें. 'संपूर्ण इतिहासाचीं साधनें हातीं आल्याशिवाय हातीं पडलेल्या साधनावर एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीचें संपूर्ण चरित्र लिहिण्याची हा मनुष्य व्यर्थ खटपट करतो' असा अभिप्राय राजवाडे यांनीं पारसनीस यांच्यासंबंधीं दिला आहे.[३]

राजवाडे यांचा संग्रह वाढत गेला. खटावकर दप्तरांत एक महत्त्वाचा कागद सापडल्यामुळें वांईच्या विकासाची दिशा त्यांना उपलब्ध झाली. ओझर्डे येथील

१— भा. वा. भट — राजवाडे चरित्र, पृष्ठ ५२६.

२— कित्ता : पृष्ठ ४३१

३— काकाराव पंडित — ब्राह्मण पत्रिका, राजवाडे तिलांजलि अंक पृष्ठ, ५६.

पिसाळ देशमुख यांचेकडेहि कांहीं कागदपत्र राजवाडे यांना मिळाले. औरंगजेबाच्या दक्षिणेवरील स्वारीच्या वेळचीं पत्रें या दप्तरांत होतीं. सूर्याजी पिसाळ देशमुख हा देशद्रोही, फितुरी करणारा असें राजवाडे यांनीं प्रसिद्ध केलें आणि त्यामुळें त्यांच्या हातीं तें दप्तर पुरतें आलें नाहीं. काळे दप्तर, शिंगणे दप्तर, अशीं कामें सारखीं चालू होतींच. राजवाडे यांनीं हा हव्यास जन्मभर केला. अनेक अडचणींवर व संकटांवर मात करून त्यांनीं साधनसामग्रीचा पर्वत उभा केला. बाराबारा तास कसल्याहि मोबदल्याची अपेक्षा न करतां अखंड परिश्रम केले. त्यांतूनच 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' या नांवाचे २२-२३ खंड प्रसिद्ध झालें. त्यांचा तपशील महत्त्वाचा असल्यानें येथें दिलेला आहे.

१) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड १ ला**:—सन १७५० ते १७६१ पर्यंत. येरंडे, भानू (वांई), खरेशास्त्री (मिरज) व पैठण येथील ३०४ कागद; सटीक; पानिपतपराभवमीमांसा, महाराष्ट्रधर्म, नाना, भाऊ, मल्हारराव, जयाप्पा शिंदे इत्यादिकांच्या हालचाली, प्रवासांचे मार्ग, ग्रँट डफच्या चुका इत्यादिविषयीं विवेचक प्रस्तावना पृष्ठें १२७. खंडाची पृष्ठसंख्या ४०९. सन १८९८. वांई.

२) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड २ रा**:— पेशव्यांची शकावली. इ. स. १७१४ ते १७६१ पर्यंतच्या काळांतील तीनहि पेशवे व फत्तेसिंग भोसले यांच्याविषयीं तारीखवार वृत्तान्त. सन १९००. वांई.

३) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड ३ रा**:— पत्रें, यादी वगैरे इ. स. १७०७–१७६० धावडशी–भागवत, कायगांवकर दीक्षित, पांडेवाडीचे कोल्हटकर, ओझर्डे पिसाळ, शांताश्रम मठ व भानू वांई, खरे-बावधन, शिर्के-सातारा नागपूरकर भोसले इत्यादींकडील ५६८ पत्रें. आंग्रे, ब्रह्मेन्द्रस्वामी, नागपूरकर भोसले ह्यांसंबंधी माहिती, चेऊलची बखर, थोरातांची हकीगत, होळकरांची थैली, शिर्के, देशमुख, प्रतिनिधि इत्यादींची माहिती. ब्रह्मेन्द्रस्वामीविषयीं साधकबाधक विस्तृत चर्चा करणारी प्रस्तावना. पृष्ठें ६४. खंडाची पृष्ठसंख्या. ५२२. सन १९०१, कोल्हापूर.

४) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड ४ था**:— नारायण व्यवहार शिक्षा, पेशव्यांची बखर, पेशवाईच्या अखेरची अखबार, रामस्वयंवर, १८१६ व १८१७ सालांतील हकीगत, पेशव्यांची वंशावळ, शिवाजी महाराजांच्या सर्व बखरीचें विस्तृत परीक्षण, पृष्ठें १३९; खंडाची पृष्ठसंख्या ३२६. सन १९००, पुणे.

५) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड ५ वा** : पत्रें, यादी वगैरे. इ. स. १७९५ जून ते आक्टोबर. खर्ड्यांच्या लढाईनंतर मराठे व निजाम ह्यांच्यामध्यें तहप्रकरणीं बोलणीं एतत्संबंधीं वृत्तान्त–लेख, गोविंद कृष्ण

काळे ह्यांजकडून सवाई माधवराव, नाना फडणीस ह्यांस आलेलीं २४२ पत्रें. पृष्ठ-संख्या २९८. १९०२, कोल्हापूर.

६) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड ६ वा :** पत्रें, यादी वगैरे, बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव ह्यांच्या कारकीर्दीतील पुरंदरे, हिंगणे, जाधव वगैरे सरदारांच्या संबंधींचे कागद पत्र; रामदास स्वामींची वंशावळ, पुरंदरे ह्यांजकडील स्मरणें इत्यादि अनेक कागदपत्र. पौर्वात्य व पाश्चिमात्य इतिहास-विषयक कल्पना, भागवत धर्म, इतिहासशास्त्राच्या बहुविध शाखा इत्यादि विषयांचें विस्तृत विवेचन करणारी दीर्घ प्रस्तावना, पृष्ठें ९८. खंडाची पृष्ठसंख्या ६७६. सन १९०५, कोल्हापूर.

७) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड ७ वा :** इ. स. १७९२–१७९४. साहाय्यक ना. कृ. गद्रे, ज. र. घारपुरे, वा. रा. जोशी; हैद्राबाद येथील पेशव्यांचे वकील गोविंदराव काळे यांच्या संग्रहांतील पत्रें, सरंजामे–सरदार यादी; दुसऱ्या बाजीरावाविषयीं टिपणें, खर्ड्याच्या लढाईसंबंधी पत्रव्यवहार, कांहीं मराठी शब्दांच्या व्युत्पत्ति, 'महाराष्ट्र इतिहास' मध्यें प्रसिद्ध झालेल्या प्रकरणाचें संकलन. खंडाची पृष्ठसंख्या ३८+१०+२२६+३२+१२८. सन १९०४, मुंबई.

८) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड ८ वा :** इ. स. १६४९ ते १८१७ पर्यंतचे श्रीमंत गगनबावडेकर पंत अमात्य यांच्या दप्तरांतील लेख. फारशी आणि मराठी भाषा यांच्या परस्परसंबंधाचें विवेचन करणारी प्रस्तावना. खंडाची पृष्ठसंख्या १२२+२३०. सन १९०३, कोल्हापूर.

९) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड ९ वा :** तंजावरचा शिलालेख, धुळे येथील 'प्रभात' मासिकांत प्रसिद्ध झालेला. सन १९०६, धुळे.

१०) **मराठ्यांच्या इतिहाचीं साधनें; खंड १० वा :** शके १६८३-१७३९ थोरले माधवराव ते दुसरे बाजीराव या चार पेशव्यांसंबंधींचा पत्रव्यवहार. वांईकर वैद्य ह्यांच्या संग्रहांतील पत्रें, खंडाची पृष्ठसंख्या ४९६, सन १९०९, पुणे.

११) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड ११ वा :** (किरकोळ). चास (जि. पुणे) येथील जोशी बाळाजी विश्वनाथाचे व्याही व सावकार आणि कल्याण इत्यादि प्रांतांचे अधिकारी ह्या घराण्यांतील इ. स. १६९७–१७१० पर्यंतचे कागद, मंगळवेढ्यासंबंधीं विस्तृत माहिती; लेखांक ११८. खंडाची पृष्ठ-संख्या ८५. सन १९१२, पुणे.

१२) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड १२ वा :** रघुनाथ

बाजीराव व बाजीराव रघुनाथ ह्यांचीं अस्सल पत्रें. चिंतो विठ्ठल रायरीकर यांच्या दप्तरांतील कागदपत्रकें, लेखांक ३८०. खंडाची पृष्ठसंख्या २३७. सन १९१२, पुणे.

१३) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड १३ व १४ वा** : रायरीकर व खाजगीवाले दप्तरांतील पत्रें, खाजगीवाले संग्रह, रायरीकर व लिमये यांची वंशावळ, थोरल्या माधवरावांच्या काळचीं पत्रें. खंडाची पृष्ठसंख्या १६५-८२. सन १९१८, पुणे.

१४) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें: खंड १५ वा** : शिवकालीन पत्रव्यवहार, मसूस—जगदाळे, निंब--सदानंद मठ, रोहिडखोरें—जेधे देशमुख व गुप्ते, देशपांडे, सातारा—राजोपाध्ये, चाकण-ब्रह्मे या सहा घराण्यांतील कागद. लेखांक ४५३. खंडाची पृष्ठसंख्या ४८८. सन १९१२, धुळे.

१५) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड १६ वा** : कानदरखोरें-मरळ देशमुख. 'इतिहाससंग्रहांत' प्रसिद्ध झालेलीं. शके १५३८ ते १७०३, लेखांक ८७. खंडाची पृष्ठसंख्या ८७. सन १९१२, मुंबई

१६) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड १७ वा** : शिवकालीन घराणीं मुरुम खोरें- सिलिमकर देशमुख 'इतिहाससंग्रहांत' प्रसिद्ध झालेली. शके १४९८ ते १६७५ लेखांक ४४. खंडाची पृष्ठसंख्या ५४, सन १९१३, मुंबई.

१७) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड १८ वा** : शिवकालीन घराणीं–पुणे–देशपांडे. 'इतिहाससंग्रहांत' प्रसिद्ध झालेलीं. लेखांक ६४. इ.स. १६०२ ते १७३२; जेधे शकावलीचीं कांहीं पानें. खंडाची पृष्ठसंख्या ९२. सन १९१४, मुंबई.

१८) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड १९ वा** : हैदर व टिपू ह्यांच्या दरबारांतील पत्रें अथवा कृष्णाजी नारायण जोशी, श्रीरंगपट्टण येथील पेशव्यांचे वकील ह्यांचा पत्रव्यवहार, इ. स. १७७९–८४ मधील. 'इतिहास संग्रह' मासिकांत प्रसिद्ध झालेलीं. लेखांक २१२. खंडाची पृष्ठसंख्या १३८. सन १९१४, मुंबई.

१९) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड २० वा** : शिवकालीन घराणीं, सुपें, शिरवळ, वांई इत्यादि १६ ठिकाणचे कागदपत्र, शके १३५०–१६००. राजकारणी, भाषाविषयक, न्यायमनसुबी, मुलकी, धर्माधिकारी, वतनदार इत्यादि संबंधीं, तसेंच शिवाजी, शहाजी, दादाजी कोंडदेव, रणदुल्लाखान, संभाजी शाहू वगैरे व्यक्तींची व सिंहगड, कोळी, चंद्रराव मोरे या प्रसंगांची माहिती देणारे अस्सल कागद. खंडाची पृष्ठसंख्या ४७६. सन १९१५, पुणे.

२०) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड २१ वा** : शिवकालीन

घराणीं, प्रभानवल्ली-सरदेसाई, देवरुख- देसाई, कऱ्हाड-गिजरे. खंडाची पृष्ठसंख्या ३६०. सन १९१९. धुळे.

२१) **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड २२ वा :** काळे वकिलाती पत्रव्यवहार, शके १७१४ कार्तिक ते शके १७१५ वैशाख. 'इतिहास संग्रहांत प्रसिद्ध झालेलीं. लेख क्रमांक २४७. खंडाची पृष्ठसंख्या १३७. सन १९१७, मुंबई.

राजवाडे यांच्या साधनसंशोधनाचा असा हा विस्तृत वृत्तान्त आहे. याशिवाय त्यांनीं केसरी, विश्ववृत्त, राष्ट्रोदय, लोकशिक्षण, महाराष्ट्रधर्म, प्राचीप्रभा, विद्यासेवक, इतिहास-ऐतिहासिक, रामदास रामदासी, सरस्वती मंदिर, ग्रंथमाला, इतिहाससंग्रह, चित्रमयजगत् इत्यादि त्या वेळच्या नियतकालिकांतून अनेक स्फुट विषयांवर ऐतिहासिक दृष्टीनें लेख लिहून संशोधनाची दिशा होतकरू तरुणांना दाखविली आहे. भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास व महाराष्ट्राचा बसाहतकाल या त्यांच्या दोन लेखमाला अनेक कारणांनीं गाजल्या. आयुष्यांतील शेवटचीं कांहीं वर्षें राजवाडे याचें चित्त भाषा, व्याकरण, कोश, समाजशास्त्र यांसारख्या विषयावर केंद्रित झालें होतें तरी प्रत्येक ठिकाणीं त्यांची प्रखर ऐतिहासिक दृष्टि स्पष्टपणें प्रकट झालेली दिसून येते. मरणाच्या आधी चार वर्षें व दोन वर्षें त्यांनीं अनुक्रमें राधामाधवविलास चंपू व महिकावतीची बखर ह्या दोन अप्रतिम साधनग्रंथांचें संपादन केलें. या दोनहि ग्रंथांना त्यांनीं जोडलेल्या विस्तृत प्रस्तावना साधनखंडांपैकीं कांहींना जोडलेल्या प्रस्तावनांपेक्षां अधिक विचारपूर्ण व उद्बोधक झालेल्या आहेत.

'राधामाधवविलास चंपू,' हा ग्रंथ राजवाडे यांना चिंचवड येथे विष्णुपंत रबडे यांच्या घरीं तिसऱ्या मजल्यावरील पोथ्यांच्या व कागदपत्रांच्या अस्ताव्यस्त गळाठ्यांत कुजत पडलेला मिळाला. राजवाडे यांनीं यासंबंधीं म्हटलें आहे, 'सहा महिन्यांपूर्वी रबड्यांच्या घरीं गेलों असतां, शेकडों संस्कृत व मराठी पोथ्या तिसऱ्या मजल्यावरील कौलारू छपराखालीं भिजून भाकरीप्रमाणें झालेल्या व उंदरांच्या लेंड्यांनीं भरलेल्या पाहून त्यांतून पांच पन्नास लहानमोठे ग्रंथ निवडून व झाडून पुसून एकीकडे काढिले, त्यांत ही राधाविलास चंपूची पोथी होती.' जयराम पिंडे नांवाच्या कवीनें राजे शहाजी यांचें कर्तृत्व या गद्यपद्यमिश्रित संस्कृत ग्रंथांत वर्णन केलें आहे. मूळ ग्रंथ साठ सत्तर पृष्ठांचा असून राजवाडे यांचीं प्रस्तावना २०१ पृष्ठांची आहे. शहाजीच्या कर्तृत्वाचा विस्तृत परामर्श राजवाडे यांनीं पहिल्या शंभर सवाशें पृष्ठांत घेऊन नंतर राजवाडे तत्कालीन समाजघटनेची चिकित्सा अत्यंत प्रखरतेनें व मूलगामी पद्धतीनें करतांना दिसतात. शहाजीकालीन मराठा समाज इतका कां खालावला व त्यास वर येण्यास मार्ग कोणता यासंबंधीं त्यानीं शास्त्रशुद्ध चर्चा केली आहे.

सन १९२४ मध्यें म्हणजे मृत्यूच्या आधीं दोन वर्षें राजवाडे यांनीं केशवा-

चार्यादिकृत ' महिकावतीची ऊर्फ माहीमची बखर' प्रसिद्ध केली. राजवाडे यांना प्रिय असलेल्या महाराष्ट्रधर्माचा उल्लेख या बखरींत आहे. या बखरीच्या रचनाकालासंबंधी विवेचन करून राजवाडे यांनीं स्थल, काल व व्यक्ति यांची ऐतिहासिक चिकित्सा केली आहे. आणि नंतर आपल्या प्रखर व पृथक्करणकुशल कुशाग्र बुद्धीनें, राजवाडे यांनीं कोंकणवासी समाज व त्याच्या प्रवृत्ति यांची साधकबाधक चिकित्सा केलेली आहे. राजवाडे यांच्या परिणत प्रज्ञेचा विलास व दिमाख या एकाच प्रस्तावनेंत पाहण्यासारखा आहे.

याखेरीज कित्येक स्फुट विषयांवरचीं टिपणें कांहीं प्रसिद्ध व कांहीं अप्रसिद्ध अशा स्थितींत असतील. जमविलेल्या साधनांच्या द्वारें आपण कोणते ग्रंथ लिहावयाचें याचीहि एक स्थूल कल्पना राजवाडे यांना होती.

४ : राजवाड्यांचें इतिहाससंशोधन : मराठ्यांचें ध्येय व धोरण

शहाजी व शिवाजीराजे यांनीं स्वराज्यसंस्थापनेचा एवढा मोठा व अद्वितीय उपक्रम कां केला ? रायगडावर सन १६७४ मध्यें राज्यारोहण समारंभ करवून घेऊन शिवाजीराजे यांनीं महाराष्ट्रांतील स्वराज्याचें एक नवें पर्व सुरू केलें. कोणत्या ध्येयानुसार वा कोणत्या धोरणानुसार हा उपक्रम घडला ? शहाजीराजे, शिवाजी, संभाजी, राजाराम, शाहू, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, नानासाहेब, सदाशिवरावभाऊ, माधवराव, सवाई माधवराव व इतर अनेक लहानमोठे सरदार, सेनापती यांनीं महाराष्ट्रांत दोन शतकांपर्यंत स्वराज्यवर्धनाचें जें प्रचंड कार्य केलें त्यास कोणती प्रेरणा होती ? अनेक लढाया झाल्या, जिवावरचीं कामें झालीं, सारा देश जागा झाला, परकीय अमलाविरुद्ध उठला. हें सर्व कार्य कोणत्या एका ध्येयानें वा धोरणानें प्रेरित होतें ? का कांहीं ध्येय वगैरे नसतांनाच आपोआप परिस्थितीनुसारच या गोष्टी घडत राहिल्या ? उत्तरेंत जाण्यासाठीं शिवाजीराजे जिवावरचा धोका पत्करून कां तयार झाले ? बाळाजी विश्वनाथास उत्तरेचें येवढें आकर्षण का ? बाजीरावानें उत्तरेंत मर्दुमकी गाजविली, मराठे सर्वस्व गमावून पानिपतचें युद्ध झुंजले, निजामशीं, हैदरशीं, इंग्रज पोर्तुगीजांशीं लढण्यांत मराठ्यांनीं हयात खर्च केली. हा सारा उद्योग केवळ परिस्थितीमुळे झाला ? केवळ पोटापाण्याचा प्रश्न सुटावा म्हणून झाला ? केवळ मुलखगिरी करण्यासाठीं झाला ? केवळ लूट मिळवावी म्हणून झाला ? मराठ्यांच्या राज्यसंस्थापनेचें एकंदर ध्येयधोरण कोणतें ?

या महत्त्वाच्या प्रश्नांचा खुलासा विस्तारानें राजवाडे यांनीं आपल्या साधन-खंडांच्या प्रस्तावनांतून वारंवार केला आहे. राजवाडे यांच्यापूर्वी मराठ्यांच्या ऐतिहासिक कार्याचें विवेचन करणारी कांहीं मंडळी होती. ग्रँट डफ, सिली, कर्नल टॉड, व्हिन्सेंट स्मिथ इत्यादि परकीय अभ्यासकांनीं मराठ्यांच्या कार्याचें जें मोजमाप केलें आहे तेंच प्रारंभीं तरी वास्तव स्वरूपाचें मानलें जाई. मराठे स्वदेशाच्या अभिमानानें प्रेरित झालेले नव्हते, नासधूस, लुटालुट, जुलूम, स्वैर सत्ता यांचें प्राबल्य मराठ्यांच्या स्वाऱ्यांत असे. मराठ्यांचें राज्य म्हणजे लूट करणारी एक सामुदायिक संस्था होय, व्हँपायर पक्ष्यांच्या टोळ्यांप्रमाणें मराठे लोक ज्या ज्या ठिकाणीं लूट मिळण्याचा संभव असे त्या त्या ठिकाणीं धाड घालून त्या पक्ष्यांप्रमाणें जीवित्वसाधनाचें रक्तशोषण करीत असत. शिवाजी म्हणजे आपले दुष्ट हेतु साधण्यासाठीं लोकांना असंख्य यातना देणारा एक प्रमुख चोर होता. मराठ्यांच्या वा पेशव्यांच्या हातून लोकहिताचें एकहि कार्य झालें नाहीं. मराठे हे धंदेवाईक

चोर वा लुटारू असून शेजारच्या देशांतील लोकांना त्रास देणें एवढेंच त्यांचें कर्तव्य होतें. परकीय इतिहासकारांनीं मराठ्यांच्या कार्याबद्दल हें विवेचन प्रारंभीं केलें होतें व तेंच सर्वत्र प्रमाण मानिलें जात होतें. यांच्याच मताची री ओढणारे बंगाली इतिहासकार होते. कालीप्रसाद बॅनर्जी, बंगाली ब्राह्मण, यदुनाथ सरकार यांनीं मराठ्यांसंबंधीं जवळ जवळ हेच उद्‌गार काढले आहेत. बारा महिन्यांपैकीं आठ महिने मराठी सैन्यानें परकीय देशांत चरावें व त्या प्रांतातील लोकांना लुटावें हाच एक उद्देश शिवाजीनें आपल्या लोकांना घालून दिला होता असे यदुनाथ सरकारसारख्या इतिहासकारानें लिहावें ![1]

मराठ्यांच्या राज्यविस्ताराकडे पाहण्याचा हा दृष्टिकोण असतांना त्याविरुद्ध प्रथम विचार करणारे म्हणजे नीलकंठ जनार्दन कीर्तने. ग्रँट डफच्या बखरींतील वैगुण्यें त्यांनीं बरोबर हेरलीं. पुढें विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं 'इतिहास' व 'आमच्या देशाची स्थिति' हे निबंध लिहून सर्व महाराष्ट्र हलवून जागृत केलें. न्यायमूर्ती रानडे, राजारामशास्त्री भागवत, विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचें अधिक निरीक्षण केलें व त्यांच्या ध्येयधोरणाचा साधार, तपशीलवार व विश्वसनीय असा सामग्र्यानें विचार केला. मराठ्यांचा राज्यविस्तार देवधर्माच्या रक्षणासाठीं होता असा एक विचार या लोकांनीं मांडून दाखविला. 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्रधर्म वाढवावा' या समर्थांच्या उक्तींतील 'महाराष्ट्रधर्म' या शब्दाचे निरनिराळे अर्थ लावण्यांत आले. महाराष्ट्रधर्म हा हिंदुधर्माहून भिन्न असून त्याच्या तोडीचा जेमतेम इंग्रजी शब्द 'पॅट्रिऑटिझम' हा होईल;[2] म्हणजे देशभक्तीच्या जवळ आलेला हा महाराष्ट्रधर्म अशी न्या. रानडे यांची कल्पना. सन १९०० मध्यें त्यांचा 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' नांवाचा जो इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध झाला त्यांतहि याच विचाराचा विस्तार आहे. एका मोठ्या व एकजीव झालेल्या राष्ट्राच्या धर्माचा प्रसार करणें हें काम शिवाजीराजानें करावें असा समर्थांचा आदेश होता. याच सुमारास राजारामशास्त्री भागवत यांनींहि 'महाराष्ट्रधर्म' या विषयावर विवरण केलें. सन १८९५ मध्यें ब्राह्मण सभेतर्फे त्यांनीं एक प्रबंध वाचून मराठ्यांच्या राजकीय चळवळीचें रंगरूप स्पष्ट केलें. त्यांच्या मतें गीतेंतील भागवतीधर्म हा महाराष्ट्रधर्माचा पाया होय. याच धर्माचें पुढे कर्मकांड अथवा कर्मठांचा संप्रदाय व ज्ञानकांड अथवा ब्रह्मज्ञान्यांचा संप्रदाय असे दोन विभाग झाले. पण ज्ञानेश्वरादि संतांनीं जो भागवतधर्म पुनः वेगळ्या भूमिकेवर मोठ्या कळकळीनें उभा केला तोच महाराष्ट्रधर्माच्या पार्श्वभूमीवर आहे

१– मॉडर्न रिव्ह्यू जून १९१९. यदुनाथ सरकार : लेसन्स फ्रॉम दि करिअर ऑफ् शिवाजी.

२– न्या. म. गो रानडे : धर्मपर व्याख्यानें, पृष्ठ ३३६

असें भागवतांचें म्हणणें. 'ज्या धर्मासाठीं शिवाजीचा अवतार झाला तो धर्म कर्मठांचा कोता धर्म नव्हे, तर ज्ञानेश्वरांनीं जीर्णोद्धार केलेल्या संतांचा विशाल धर्म होय.' या वाक्यांतून राजारामशास्त्रींचें मत स्पष्टपणें व्यक्त झालें आहे.

राजवाडे यांनीं या विषयाचा सांगोपांग उहापोह केलेला आहे. स्वराज्य-स्थापनेची चळवळ मराठ्यांनीं कां केली व त्यांच्या उत्तरेंतील मोहिमा कोणत्या हेतूनें झाल्या याबद्दल राजवाडे यांच्या मनांत बिलकुल शंका नव्हती. साधन खंडांपैकी पहिल्याची प्रस्तावना विशेष गाजली याचें कारण म्हणजे राजवाडे यांनीं मराठ्यांच्या राज्यस्थापनेच्या व विस्ताराच्या मागें असणाऱ्या ध्येयधोरणाचें विस्तारानें व कांहींशा आग्रहानें विवेचन केलें हेंच होय.

मराठ्यांचा आत्मिक पद्धतीनें इतिहास लिहायाचा म्हणजे त्यांच्या ध्येय-धोरणाचा सांगोपांग विचार करणें क्रमप्राप्तच होतें. पंधराव्या सोळाव्या शतकांतील महाराष्ट्राची स्थिति फारच शोचनीय झाली होती. 'तीर्थक्षेत्रें मोडिलीं, ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं, सकळ पृथ्वी आंदोळली,' असे उद्गार समर्थांनीं काढले आहेत. यवनांनीं हिंदु धर्माचा उच्छेद मांडिला. तेव्हां देव, धर्म, गोब्राह्मण यांच्या संरक्षणासाठीं शिवाजी राजे यांनीं स्वराज्याचा उद्योग केला. 'तुम्ही झाला म्हणून महाराष्ट्र धर्म कांहीं तरी राहिला. आपण धर्मस्थापनेची कीर्ति अशीच उत्तरोत्तर सांभाळली पाहिजे. अमर्याद फितवेखोर लोकांचा संहार करावा, न्यायसीमा उल्लंघू नये, नेटके बंद बांधावे, तुरंग, शस्त्र आणि स्वार जमवावे, बहुतेक लोक मेळवावे, एक विचारे भरावें, कष्ट करून घसरावे म्लेंछावरी, आहे इतकें जतन करावें, पुढें आणीक मेळवावें, महाराष्ट्र राज्य करावें जिकडे तिकडे, मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्रधर्म वाढवावा' या समर्थांच्या प्रेरणेनुसार राज्यसाधनेचा प्रयत्न सुरू झाला. 'सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्रांतील विचारी पुरुषांचीं मनें एकाच जबर कल्पनेनें भारून गेलीं होतीं. ती कल्पना कोणती तर महाराष्ट्रधर्माची स्थापना करणे ही'[१] असें राजवाडे यांनीं स्पष्टपणें म्हणून महाराष्ट्रधर्म म्हणजे काय याची स्पष्टपणें चर्चा केलेली आहे.

ख्रिस्तीधर्म, महमुदीधर्म, यहुदी धर्म ह्या सारखा हा महाराष्ट्रधर्म नाहीं. तो केवळ हिंदुधर्मही नाहीं. त्या काळीं यवनांचा नायनाट करणें हा एक भाग हिंदु-धर्माचा होऊ पहात होता. महाराष्ट्रांतील हिंदूंचें स्वराज्यसाधन धर्माची स्थापना करून देवब्राह्मणाचें पालन करण्यासाठीं होतें. स्वराज्यसाधन हें महाराष्ट्रधर्माचें एक मुख्य कलम होतें. महाराष्ट्रेतर प्रांतातील हिंदु धर्म+ धर्मस्थापना+ गोब्राह्मण-प्रतिपाल + स्वराज्य संस्थापना + एकीकरण+धुरीधरण म्हणजे महाराष्ट्रांतील हिंदुधर्म अशी त्या वेळची समजूत होती. याच समजुतीला समर्थांनीं महाराष्ट्रधर्म

१–ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ३१–३२

ही संज्ञा दिली आणि ह्या धर्माची स्थापना व प्रसार करण्यासाठी शिवाजी महाराज व त्यांचे अनुयायी ह्यांनीं प्राणांचा व वित्ताचा अपरंपार व्यय केला. महाराष्ट्र धर्माची ही कल्पना मराठ्यांच्या ह्या १५० वर्षांतील हालचालीची केवळ प्राणभूत आहे.[१]

मराठ्यांच्या चळवळीचें ध्येय स्पष्ट केल्यानंतर राजवाडे यांनीं स्वराज्य-साधना, गनीमाई, सरदेशमुखी, चौथाई, अष्टप्रधानघटित राज्यव्यवस्था, राष्ट्रभाषा, या बाबतींत कसे प्रयत्न झाले यांचें विवेचन केलें आहे. ज्यांचा अर्थ लावण्यांत पुढें नामांकित इतिहासकार गढून गेले त्या सय्यद बंधूंकडून बाळाजी विश्वनाथानें मिळविलेल्या स्वराज्याच्या सनदा, पुढचा बाजीरावाचा उद्योग, हिंदुपदबादशाहीची स्थापना इत्यादि विषयांचा परामर्श घेऊन राजवाडे ब्राह्मणपदबादशाहीपर्यंत येऊन पोहचले आहेत.[२] नांव कांहीं का असेना, या सर्वांत महाराष्ट्रधर्म हें सूत्र प्राधान्यानें होतें. शिवाजी, शाहू, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव यांचीं मनें या एकाच विचारानें भारावून गेलीं होतीं. पेशवाईच्या उत्तरार्धांतहि खर्ड्यांच्या लढाईच्या तहाचे वेळीं धर्म, गोब्राह्मण व स्वराज्य यांच्या रक्षणाचीं कलमें होतींच. पानिपतचा प्रकार याच हेतूनें झाला. मोगल बादशाहीचें संरक्षण हें बाह्य निमित्त, पण महाराष्ट्र-धर्माचा उत्तरेंत प्रसार हें मुख्य सूत्र याहि मोहिमेंत होतेंच. पानिपतच्या पराभवाची मीमांसा करतांना राजवाडे यांनीं स्पष्टपणें म्हटलें आहे कीं पानिपतप्रसंगीं अनेक हिंदूंनीं यवनास साह्य केलें याचें कारण उत्तरेंत महाराष्ट्रधर्माचा व्हावा तेव्हढा प्रसार झालेला नव्हता. तेव्हां मराठ्यांचें उत्तर हिंदुस्थानांतील मुख्य कार्य म्हणजे महाराष्ट्रधर्माचा प्रसार करणें हेंच होय. हिंदुधर्म, स्वराज्यस्थापना, गोब्राह्मण-प्रतिपालन, एकीकरण व पुढारीपण हीं महाराष्ट्रधर्माचीं प्रमुख अंगें होत. १६४६ ते १६९६ पर्यंतच्या प्रत्येक तहांत स्वराज्याचें व स्वधर्माचें कलम असलेलें दिसून येईल.

राजवाडेप्रणीत महाराष्ट्रधर्माचें हें विवेचन अनेक ठिकाणीं निरनिराळ्या निमित्तांनीं आलेलें आहे. कोणत्याहि देशाच्या इतिहासाचा आत्मा म्हणजे त्या त्या युगाचें माहात्म्य, स्पिरिट आफ् दि एज. हें मुख्यतः विचारप्रधान असून याच विचारानें भारावून प्रचंड कार्यें होत राहतात. या विचाराची चर्चा प्रस्तावना खंडाच्या चौथ्या भागांत करितांना राजवाडे पुनः महाराष्ट्रधर्माकडे वळले आहेत. रानडे, भागवत यांनीं केलेल्या या शब्दाच्या अर्थाची त्यांनीं चिकित्सा करून त्यांत भर घातली. धर्म म्हणजे गुण, धर्म म्हणजे कर्तव्य, धर्म म्हणजे दान, धर्म म्हणजे आत्यंतिक दुःखध्वंसाचा मार्ग. हा चौथा अर्थ महाराष्ट्रधर्मांत

१– ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ३२-३३

२– कित्ता : पृष्ठ ३९-४०

अभिप्रेत आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे सर्व महाराष्ट्राचें, सर्व मराठा समाजाचें कर्तव्य. महाराष्ट्रधर्म हा केवळ धर्मोन्नतीचा मार्ग नव्हे, किंवा भागवतधर्मीय संतांचाहि मार्ग नव्हे. ही केवळ धर्मक्रांति नव्हती, ही केवळ धर्मसुधारणेची लाट नव्हती, किंवा केवळ भक्तिसुखाची वाट दाखविणारी ही परंपरा नव्हती. याहून फार मोठा व व्यापक असा अर्थ महाराष्ट्रधर्मास होता. स्वराज्य साधणें, यवनांचें पारिपत्य करणें, मराठ्यांची एकी करणें, विरुद्ध कोणी असतील त्यांचें पारिपत्य करणें, इत्यादि बाबी प्रामुख्यानें महाराष्ट्रधर्मांत येतात.

सन १९१७ मध्यें सातारा येथें 'महाराष्ट्र–धर्म'माला या पुस्तकमालेंत पहिलें पुष्प म्हणून राजवाडे यांचें पुस्तक प्रसिद्ध झालें असून त्यांत त्यांनीं महाराष्ट्रधर्माचा अर्थ व व्याप्ति या बाबी पुनः एकदा विवरून सांगितल्या आहेत. ऐतिहासिक दृष्टीनें या विषयाची चर्चा करून राजवाडे यांनीं म्हटलें आहे कीं 'व्यक्ति, समाज, देव व इतर प्राणिमात्र ह्यांच्या संबंधानें धनात्मक किंवा ऋणात्मक जें जें म्हणून कर्तव्य तें सर्व धर्म होय. महारट्टांची अशीं जीं कर्तव्यें त्या सर्वांना महाराष्ट्रधर्म ही संज्ञा आहे. महाराष्ट्रधर्म या शब्दाचे दोन अर्थ आहेत. मराठा क्षत्रियांचा धर्म असा पहिला व पुरातन अर्थ आणि महाराष्ट्रांतील सर्व आर्यांचा सामान्य धर्म हा दुसरा व अर्वाचीन अर्थ. शिवाजीला उद्देशून समर्थांनीं जें पत्र लिहिलें त्यांत पहिला अर्थ अभिप्रेत आहे; आणि दासबोधांत दोनहि अर्थ विवक्षित आहेत."

मराठ्यांचें ध्येय व धोरण महाराष्ट्रधर्म प्रसाराचें होतें याबद्दल राजवाडे यांच्या मनांत कधींहि शंका आली नाहीं. सन १९१२ मध्यें 'राधामाधवविलास चंपू' या काव्याच्या विस्तृत प्रस्तावनेंत शहाजीराजे यांच्या ध्येयधोरणाची त्यांनीं चिकित्सा केली आहे. स्वराज्य स्थापून स्वधर्म व स्वदेश व स्वभाषा व स्वजन यांचें पालन, लालन व संरक्षण करावें ह्यांतच शहाजीराजे आपल्या जीविताचें साफल्य मानीत हें जयराम पिंडे यांचें मत राजवाडे यांनीं ग्राह्य मानून त्यास स्वराज्याचा उद्गाता म्हणून गौरविलें आहे. शिखरशिंगणापूरचा शंभुमहादेव व कुळस्वामिनी तुळजाभवानी ह्यांचे दर्शनाची ओढ शहाजीस नेहमींच असे. शके १७७५ मध्यें फार वर्षांनंतर शहाजीशिवाजी यांच्या भेटीचें हृद्य चित्र जयराम पिंडे याच्या साह्यानें राजवाडे यांनीं रंगविलें आहे. 'शिवाजीचे किल्ले, कोट, ठाणीं, पागा, राजधानी, अठरा कारखाने, शिबंदी, फौज, हत्ती, घोडे, तोफा वगैरे जंगी सामान पाहून राजे परम संतुष्ट झाले आणि आणि आपली तुळजा नांवाची प्रासादिक तरवार त्यांनीं शिवाजीस बहाल केली. निरोप देतांना शहाजीनें शिवाजीची मनःपूर्वक स्तुति केली. आमच्या वंशांत जन्म घेऊन तुम्हीं बेचाळीस पिढ्या उद्धरिल्या; धर्मस्थापना करून वर्णाश्रम पुनरुज्जीवित केले; यवनाक्रान्त पृथ्वीचे क्लेश निवारण करून जगदंबेचा वर आमच्या प्रत्ययास आणून दिला, वगैरे कर्णमधुर शब्द उच्चारून

शहाजीनें शिवाजीस शेवटचा आशीर्वाद दिला, आणि आदिलशहा, औरंगजेब, इत्यादि सर्वांशीं पुढें कसें वर्तन ठेवावें याची वाटाघाट करून कर्नाटकाचा रस्ता धरिला.[१] " येणेंप्रमाणें शिवाजीच्या स्वराज्यसाधनाचा वाटा शहाजीपर्यंत भिडविण्याचा व तसें सिद्ध करण्याचा राजवाडे यांचा प्रयत्न आहे.

सन १९२४ सालीं राजवाडे यांनीं महिकावतीची बखर संपादित केली व तिलाहि एक मोठी विद्वत्तापूर्ण व वैचारिक प्रस्तावना लिहिली. ' आद्यशक्ति महाराष्ट्रधर्म रक्षिका तुम्हां प्रसन्न असो ' या केशवाचार्यांच्या वाक्यावर राजवाडे न थांबतील तरच नवल ! केशवचार्य व नायकोराव यांनीं समाजास कसें तारलें याचें वर्णन करतांना राजवाडे लिहितात, " या दोन माणसांखेरीज बाकी सर्व सैनिक ऊर्फ क्षत्रिय व ब्राह्मण पोटांकरितां यवनाचे सेवक झाले. सर्व सैनिक, इनामदार, व रयत यवनाच्या बाजूचे झाले. क्षत्रियांनीं राज्याभिमान सांडिला, शस्त्रें सोडिलीं, कृषि धरिली, सोमवंशियांनीं कारकोणी व गांवखोती पत्करली, शिंदे वतनें सांभाळून यवनाची सेवा करूं लागले, आचारहीन जाले, गोत्र, प्रवर, कुळस्वामीण, कुळगुरु यांस विसरले. या अन्नलंपटांना केशवाचार्यानें प्रवृत्तिप्रधान महाराष्ट्रधर्म सांगितला. ह्याच महाराष्ट्रधर्माचा पुनरुच्चार दोनशें वर्षांनीं पुढे शके १५७० च्या सुमारास श्रीमत्समर्थ रामदास स्वामी ह्यांनीं शिवप्रभृत्ति मराठ्यांच्या हितार्थ सह्याद्रिकुहरांत केला. त्यानंतर दोनशें वर्षांनीं महादेव गोविंद रानडे व राजारामशास्त्री भागवत ह्यांनी पंचवीस वर्षांमागें महाराष्ट्रधर्म म्हणजे काय ह्या बाबीसंबंधानें लेखांतून व भाषणांतून खल मांडिला. महाराष्ट्रधर्म या शब्दाचा अर्थ महाराष्ट्रांतील देवधर्म म्हणजे Religion of महाराष्ट्र असा रानडे व भागवत यांनीं केला. महाराष्ट्रधर्म हा देवधर्मवाचक शब्द नसून कर्तव्यवाचक शब्द आहे असें प्रत्युत्तर त्या वेळीं प्रस्तुत लेखकानें दिलें. त्या प्रत्युत्तराला पोषक असा पुरावा केशवाचार्यांच्या लेखांत सांपडतो.[२] "

केशवाचार्यानें महाराष्ट्रधर्माचें विवेचन बखरीच्या ५३ पासून ६१ पृष्ठापर्यंत विस्तारानें केलें आहे. त्याच्या मतें महाराष्ट्रधर्म म्हणजे महाराष्ट्रिक लोकांचा ऊर्फ मराठा लोकांचा धर्म असा आहे. त्याच्या मतें देशधर्म, जातिधर्म, कुलधर्म, वंशधर्म, देवधर्म यांचा समावेश महाराष्ट्रधर्मांत होतो. सर्व समाजाचा विचार या धर्मांत होतो. ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार या धर्मांत स्थान नक्की आहे. भिन्न वर्ण, भिन्न गोत, भिन्न कर्म, भिन्न आचार, भिन्न पेहराव, भिन्न भूषणें, भिन्न भाषा, भिन्न कुळ्या इत्यादि नाना उपभेद मराठ्यांत असले तरी महाराष्ट्रधर्मांत त्यांना समानतेनें वावरतां येते हा चर्चेचा सारांश येथें आहे.

१— राधामाधवविलास चंपू : प्रस्तावना, पृष्ठ ९९.

२— महिकावतीची बखर : प्रस्तावना, पृष्ठ १००.

राजवाडे यांनीं पल्लेदार व विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहून समकालीन लोकांना दिपविलें. इतिहासाच्या साधनांचा अभ्यास कसा करावयाचा, घटनांचा क्रम व अर्थ कसा लावावयाचा याचें एक थोर दर्शन पहिल्या खंडांत होतेंच. पण मराठ्यांच्या स्वराज्यसाधनेवर व विस्तारावर बाष्कळपणें आरोप करणाऱ्या परकीय इतिहास-लेखकांना ही प्रस्तावना म्हणजे समर्पक, खंबीर व साधार असें उत्तर होतें. मराठ्यांच्या इतिहासलेखनास व अभिमानास यापुढें निराळेंच बळ मिळालें. मराठे केवळ लुटारू, दंगेखोर नसून स्वधर्मरक्षणाची तीव्र लालसा मनांत असल्या-मुळें व मराठशाहींत आणि पेशवाईत एकापेक्षा एक कर्तृत्ववान असे पुरुष निपजल्या-मुळें शिवाजीनें उत्तरेंत जी पायवाट निर्माण केली होती तिचा हमरस्ता बाजीरावा-नंतर होऊन मराठ्यांच्या कर्तृत्वास सर्व दिशा मोकळ्या झाल्या. अर्थात् ठिक-ठिकाणीं सरदार निर्माण होऊन कांहीं स्वार्थी धोरण आखलें गेलें नाहीं, असें नाहीं. मध्यवर्ती सत्तेशीं विरोधहि झाला. पण एवढें असूनहि मराठ्यांच्या राज्य-विस्तारास एक निश्चित असें ध्येयधोरण होतें असा आग्रह राजवाडे यांनीं पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेच्या द्वारा अभ्यासकासमोर प्रथमच साधार व तेजस्वी भाषेंत मांडिला. यायोगें लोकांची दृष्टि निबळण्यास मदत झाली. केवळ पोटार्थी मुलखगिरी करणारे मराठे कांहीं योजनाबद्ध व विचारपूर्ण कृत्यें करू शकतात असें स्पष्ट झालें.

परंतु राजवाडे यांच्या या विवेचक प्रस्तावनेवर आक्षेप कोणीं घेतले नाहींत असें नाहीं. कांहीं तपशील, कांही तारखा, काहीं स्थळनामें, एखादें अतिरिक्त विधान यांची नंतर दुरुस्ती झाली; पण राजवाडे यांचें मुख्य प्रमेयच मान्य नसणारे विद्वान महाराष्ट्रांत निघाले. एखादें प्रमेय तावून सुलाखून घ्यावें, ऐतिहासिक साधनांच्या निकषांवर घासून घ्यावें हें योग्यच आहे. पण राजवाडे यांनीं मांडलेल्या प्रमेयांचा साराच पट उधळून लावण्यांतील कसब शैलीच्या दृष्टीनें मोहक असलें तरी विचाराच्या बैठकीवर कितपत टिकेल हें पाहणें इष्ट आहे. सुमारें चाळीस वर्षांपूर्वी रियासतकार सरदेसाई यांनीं नानासाहेब पेशवे यांचें चरित्र लिहिलें. त्यास छत्तीस पृष्ठांची दीर्घ प्रस्तावना कै. त्र्यं. शं. शेजवलकर यांनीं लिहिली, आणि सरदेसाई यांनीं नानासाहेबांचें केलेलें मूल्यमापन कसें चुकीचें आहे याचा ऊहापोह त्यांनीं विस्तारानें केला.

प्रस्तावनालेखकानें मूळ ग्रंथांतील विवेचनास किती व कसा विरोध करावा हा मुद्दा महत्त्वाचा नाहीं. पण मूळ ‘ग्रंथकारापेक्षां जरा जास्त उंचीवर चढून, जरा खोल बुडी मारून मराठ्यांच्या इतिहासाचा पट डोळ्यासमोर आणून शेजवलकरांनीं ही चिकित्सा’ केलेली असल्यामुळें तिला महत्त्व आहे. शेजवलकरांच्या मतें मराठे, विशेषतः पेशवे चुकतच गेले. पेशव्यांच्या एकाहि चुकीची (ही चूक अर्थातच शेजवलकरांच्या दृष्टीनें) गय त्यांनीं केलेली नाहीं. पेशवे चुकले, त्यांनीं निजामचा मोड न करतां उत्तरेंत स्वाऱ्या केल्या हेंच मुळीं

चुकलें. शिवाजीचें धोरण ब्राह्मण पेशव्यांना समजलेंच नाहीं. सारी दक्षिण मोकळी असतांना पेशवे नर्मदेच्या पलीकडे गेले हेंहि त्यांच्या मतें बरोबर नाहीं. चौथाई, सरदेशमुखी, स्वराज्य यांच्या सनदा पेशव्यांनीं मिळविल्या त्यांचा अर्थहि त्यांना व नंतरच्या इतिहासकारांना समजलेला नाहीं असें शेजवलकरांचें मत आहे. पेशवे उत्तरेंत गेले तरी कशासाठी? महाराष्ट्रधर्माच्या प्रसारासाठी? हिंदुपदपातशाहीची स्थापना करण्यासाठी? हाच तर सारा वेडगळपणा होता.

राजवाडे यांच्या विवेचनास प्रमाण मानून रियासतकार सरदेसाईनीं आपल्या नानासाहेबांच्या चरित्रांत 'हिंदुपदपातशाहीची सिद्धता' नांवाचें एक प्रकरण घातलें आणि 'शिवाजी महाराजांच्या वेळेपासून मराठ्यांचें धोरण या देशांत हिंदूंची सार्वभौमसत्ता स्थापण्याचें होतें. शिवाजीचा दृष्टिक्षेप दक्षिणेस जिंजीपासून उत्तरेस आग्रा, दिल्ली, मथुरा, बनारसपावेतो वाढलेला होता. चौथाई सरदेशमुखीच्या द्वारें महाराष्ट्राबाहेरील प्रदेश स्वसत्तेच्या आटोक्यांत आणण्याची सोय शिवाजीनेंच करून ठेविली होती. रजपूत राजांशीं स्नेह ठेवून स्वधर्मरक्षणाकरितां सर्व हिंदूंनीं एक होण्याची जरूरी केव्हढी आहे ही गोष्ट शिवाजीनें आपल्या राजकीय पत्रांतून व्यक्त केलेली आहे.' आणि हेंच राजकारण पुढें चालू राहिलें. 'जसवंतसिंग, जयसिंग, छत्रसाल, आकण्णा, मादण्णा, मालोजी घोरपडे, रघुनाथ पंडित इत्यादिकांशीं शिवाजीनें केलेले व्यवहार पाहिलें म्हणजे त्याच्या अंतिम ध्येयाची खात्री पटते.......'[1]

बाळाजी विश्वनाथानें ठिकठिकाणची हिंदुसत्ता एकवटण्याचा प्रयत्न केला तो महाराष्ट्रधर्माच्या भावनेबरच. पुढे बाजीराव व सवाई जयसिंग यांच्या व्यवहारांत हीच भावना होती. पुढे नानासाहेब पेशवे यांनीं हिंदुस्थानभर आपली सत्ता असावी व त्यासाठीच हिंदुपतपातशाहीचा विशेष निष्ठेनें उद्योग आरंभिला. या अर्थाचें सरदेसाईचें विवेचन राजवाडेप्रणीत सिध्दान्तावर आधारलेलें आहे. तें अर्थातच शेजवलकरांना मान्य नाहीं. छापण्याची कला मराठ्यांना माहित नव्हती, वर्तुळाकार जगाचे नकाशे त्यांच्याजवळ नव्हते, त्यांचें स्वतःचें आरमार नव्हतें, पल्लेदार हत्यारें नव्हतीं इत्यादि राजवाडे यांचें निरीक्षण त्यांना मान्य आहे; पण असें अनुकूल साधन नसतानांहि मराठ्यांनीं, पेशव्यांनीं कांहीं पराक्रम केला तर तो त्यांना उमगलेला नाहीं. हिंदुपतपातशाहीची कल्पना शेजवलकरांना वेडगळपणाची वाटते. मराठ्यांच्या राज्याचा कायमचा दुष्मन निजाम कायम राहिला हें कशाचें द्योतक! शेजवलकरांनीं विचारिलें आहे. 'मराठा तितुका मेळवावा' हा शिवाजीस दिलेला गुरुमंत्र 'शिवाजी महाराजांच्या शिष्यास' आठवला नाहीं काय?[2] निजामास शिल्लक ठेवून पेशव्यांनीं उत्तरेंत कां धांव घेतली? शिवाजीच्या वेळीं

१– नानासाहेब पेशवे यांचें चरित्र : प्रस्तावना पृष्ठ १५६.

२– कित्ता : प्रस्तावना, पृष्ठ २१.

जें राजकारण होतें तेंच पुढें पेशव्यांनीं चालू ठेविलें नाहीं म्हणून शेजवलकर मराठ्यांना नांवें ठेवितात. मग पुनः सोळाव्या व सतराव्या शतकांत जें काम झालें तें अठराव्या शतकांत होणें अशक्य ना ? मग शिवाजीच्या मूळ धोरणास मुरड घालणाऱ्या पेशव्यांवर एवढा राग का ? हिंदुपतपातशाही स्थापन करण्याचा वेडगळ प्रयत्न करणारे सगळेच पेशवे चुकले खरे ! स्वराज्य व चौथाईच्या सनदा मिळतांच आपण मोंगलांचें ताबेदार झालों हेंहि पेशव्यांच्या व त्यांच्या इतिहासकारांच्या ध्यानीं आलें नाहीं तें शेजवलकरांच्या आलें. परप्रान्तांत मराठे नीतीनें वागले नाहींत अशी एक त्यांची तक्रार आहे. पुढें ती पानिपत या पुस्तकांत नाहींशी झालेली दिसते. पण येथें मात्र हिंदुपतपातशाहीस पोषक अशी नीति मराठ्यांस सातत्यानें राखतां आलेली नाही हाच निष्कर्ष आहे.[१] नानासाहेबांच्या पेशवाईत समाजाची पिछेहाट झाली, पेशव्यांच्या दक्षिणेचा व अहल्याबाईच्या दानधर्माचा मराठेशाहीच्या संवर्धनास कांहीं उपयोग झाला नाहीं असें त्यांचें मत आहे.[२] हा सर्व पैसा तळीं, घाट वगैरे उपयोगी कार्यास लागला तो वजा करून व्यर्थ गेला. पेशवाईत धार्मिक कर्मकांड फार झालें, टांचण्या सुया यांचे कारखाने निघाले नाहीत.[३] सारांश नानासाहेबांच्या पेशवाईत अनेक धोरणें चुकलीं. त्यांनीं कसली हिंदुपतपातशाही स्थापन करावी ? नानासाहेबांच्या चुकीचे परिणाम पाहा किती दूरवर झाले ! हिंदूंच्या भांडवलावर इंग्रजांचे धंदे उभारले गेले, इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रांति झाली. हें सर्व टाळावयास नानासाहेबानें जागरूक असावयास हवें होतें. ‘ हिंदुस्थानांत कर्तबगारी दाखवतां दाखवतां जगाच्या इतिहासास नवें वळण देणें ही गोष्ट नानासाहेबांस त्या वेळीं शक्य होती. ’ असें म्हणणारे शेजवलकर मध्येंच लिहितात, ‘एखाद्या राष्ट्राचें भवितव्य एकाच माणसावर अवलंबून असतें ही विचारसरणी आम्हांस मान्य नाहीं.’ मग कांही चुका झाल्या त्या न झाल्या तर नानासाहेबानें जगाच्या इतिहासास वळण दिलें असतें या विधानाचा अर्थ काय ? मराठ्यांनीं उत्तरेंत राजकारण केलें ही बाब अभिमानाची म्हणून राजवाडे प्रभृतींनीं त्यांचा गौरव केला. पण शेजवलकरांच्या मतें मराठ्यांना उत्तरेंत जाण्याचा हक्कच नव्हता. पण तेच शेजवलकर अबदाली हिंदुस्थानावर कोणत्या हक्कानें स्वारी करतो, देवळें लुटण्याचा, निरपराधी लोकांच्या कत्तली करण्याचा अधिकार त्यास कुणी दिला, हा प्रश्न कधींच उच्चारीत नाहींत. उलट अबदालीलाच ‘ अफगाण शिवाजी ’ हा किताब बहाल करतात.

१– नानासाहेब पेशवे यांचें चरित्र; पृष्ठ ३१.

२– कित्ता, पृष्ठ ३३.

३– ‘ राधामाधवविलास चंपू ’ च्या प्रस्तावनेंत राजवाडे यांनीं हा दोष मान्यच केलेला आहे.

या अफगाण शिवाजीची रग जिरविण्यास मराठे उत्तरेंत गेले, महाराष्ट्र-धर्माचा अभिमान त्यांना होता असें राजवाडे यांचें विवेचन शेजवलकरांना मान्य नाहीं. राजवाडे यांचें या विषयींचें सारें लिखाणच मुळी शेजवकलरांना घातक वाटतें. 'इतिहाससंशोधक राजवाड्यांनीं आपल्या पहिल्या खंडाच्या प्रदीर्घ प्रस्तावनेंत पेशव्यांचा हेतु हिंदुपदपातशाही स्थापण्याचा होता असें **खोटें** (जाड ठसा लेखकाचा) प्रतिपादन मोठ्या कुशल वावदूतकतेनें केलें. ही गाजलेली प्रस्तावना सबंध मराठ्यांचा इतिहास दूषित करण्यास समर्थ ठरली आहे.'[१] राजवाडे यांचें विवेचन कांहीं व्यक्तींच्या बाबतींत 'अवास्तव, अतिरिक्त आणि फोल' असेल पण मराठ्यांच्या ध्येयधोरणाची चिकित्सा त्यांनीं जी केली आहे ती आजहि अबाधित अशी आहे.

पानिपतचें युद्ध कशासाठीं झालें? महाराष्ट्रधर्माच्या प्रसारासाठीं कीं दिल्लीच्या मोंगल बादशाहीच्या संरक्षणासाठीं? वर वर पाहतां व सर्व पत्रव्यवहारात्मक साधनांचा अभ्यास करतां मराठे दिल्लीपतीचें संरक्षण करण्यास बांधील होतें ही गोष्ट खरी आहे. 'आम्हांस तर चकते याची पातशाही राखणें. अब्दालीशी सलूख करणें नाहीं,' 'तैमूरीयांची पातशाही; याचा बंदोबस्त कळेल तसा आम्ही राजश्री पंतप्रधान यांच्या इतफाकानें करूं, तुम्ही या गोष्टींत न पडावें,' 'अबदालाची जड हिंदुस्थानचे पातशाहींत रुतों देणें अयोग्य,' 'अबदालीचें पारिपत्य होणें हें आदि आहे,' 'नजीबखान तो अबदालीच आहे... नजीबखान तो मूळच आहे' यांसारखीं तत्कालीन पत्रांतील वाक्यें मराठे पातशाही रक्षण करण्यास उत्तरेंत गेले हें दर्शविण्यास पुरेशीं आहेत. पण येथें प्रश्न उपस्थित होतो असा कीं दिल्लीच्या पातशाहीचें प्रेम मराठ्यांना एवढें का? वृक्षांच्या मूळ बुंध्यास घाव घालावा मग फांद्या आपोआप गळतील हें एक सूत्र मराठे या वेळीं विसरले होते कीं काय? कीं त्यांचा एक राजकारणी डाव होता? पानिपतास मराठ्यांस यश आलें असतें तर? तर राजवाडे यांच्या लिहिण्याचा रोख ध्यानीं आला असता. आजहि राजवाडे यांचाच सिद्धान्त बरोबर आहे असें म्हणणें भाग आहे. पानिपतप्रसंगीं मराठ्यांस स्वकीय सुद्धां मदत करीत नव्हते. बरोबरच आहे; महाराष्ट्र धर्माचा प्रसार व्हावा तेवढा त्या वेळीं झालेला नव्हता, एका रामदासाच्या ऐवजीं शेकडों रामदास त्या वेळीं हवे होते. पण मराठ्यांच्या राजकारणांत ही मोठी उणीव राहिली आणि त्यांची महाराष्ट्रधर्मप्रसाराची, हिंदुपतशाहीचीं स्वप्नें विरून गेलीं. आणि नंतरच्या इतिहास-कारांना मराठ्यांच्या या वेडगळ भ्रमाची थट्टा करण्यास मात्र संधि मिळाली.

महाराष्ट्रधर्माचा प्रसार, हिंदुपतपादशाही यासारखे शब्दहि आज हास्यास्पद

---

१ – त्र्यं. शं. शेजवलकर – पानिपत : १९६१ पृष्ठ २.

ठरले आहेत. काळाचे व राजकीय परिस्थितीचे तडाखे खातखातच माणसाची दृष्टि सुधारली तर सुधारेल. एरव्ही नाहीं. अगोदर 'मराठ्यांनीं उत्तरेंत जावयास नको होतें' हें प्रतिपादन. पण ते गेलेले तर दिसतात, मग कोणत्या हेतूनें ते उत्तरेंत गेले? तर महाराष्ट्रधर्म, हिंदुपदबादशाही वगैरे कल्पनेची वावटळ साधण्यासाठी नव्हे तर दिल्लीची बादशाही रक्षण्यासाठी. पण विवेचनाच्या ओघांत 'मुख्यतः धर्माच्या रक्षणासाठी व देशाच्या स्वातंत्र्यासाठीं मराठ्यांनीं क्षत्रियकर्म अंगीकारलें होतें'[1] असें शेजवलकर लिहून जातातच. इतकेंच नव्हे तर आपल्या 'पानिपत' या ग्रंथाच्या उपसंहारांत एक परिणामकारक म्हणून शेजवलकर आठवण देतात. रघूजी भोसले व भास्कर कोल्हटकर यांच्या बारगीर शिलेदारांनीं जो बंगाल लुटला तेवढाच आज स्वतंत्र हिंदुस्थानांत सामील झाला आहे म्हणून शेजवलकर लिहितात. म्हणजे मराठ्यांच्या लुटीला एवढें महत्त्व आहे तर! आणि मग शेजवलकरांनीं पूर्व बंगालमधून नागपूर येथें शिक्षक परिषदेस आलेल्या बंगाली शिक्षकाची एक उद्बोधक आठवण दिली आहे. या शिक्षकानें म्हणे भोसले कुटुंब प्रमुखाला विचारलें, "तुम्ही गंगा ओलांडून आमच्या पूर्व बंगाल्यांत येण्याचा आळस का केलांत, तें सांगा. तुमच्या या न येण्यामुळेंच तेथील मुसलमान मस्त राहून त्यांनीं आतां आम्हांस आमचा देश सोडण्यास लाविलें.'[2] म्हणजे मराठे तेथें जाते तर आजचा प्रसंग उद्‌भवला नसता! म्हणजे मराठे नर्मदेच्या उत्तरेस गेले हें ठीक झाले तर! मराठ्यांना उत्तरेंत जाण्याचा हक्कच काय असें ठासून विचारणाऱ्या शेजवलकरांनीं आपल्या ग्रंथाचा शेवट मात्र अशा शब्दांत केला आहे, 'मराठे जेथें जेथें गेले तेथील दबलेल्या हिंदूंची मुसलमानांच्या भीतींतून त्यांनीं सुटका केली. हें एक प्रकारचें नैतिक पुनरुत्थानच होतें... मराठ्यांनीं सर्व हिंदुस्थान बुडविलें असेल, लुटलें असेल, दुसऱ्याहि अनेक चुका केल्या असतील, पण त्यांनीं पांचशें वर्षांच्या इस्लामी वरवंट्याखालीं चुरडलेल्या हिंदु प्रजेस आपल्या वर्तनानें ताठ उभें राहण्यास उदाहरण घालून दिलें होतें. हिंदुस्थानांतील मुसल्मानी राज्ययंत्र त्यांनीं इतकें खिळखिळें केलें होतें कीं, कोणत्याहि प्रदेशांत तेथील प्रजेनें बंड करून उठून मुसलमान सुभेदारास हांकून द्यावें व स्वतःचें राज्य स्थापावें. या कामांत त्यांस मराठ्यांची मदत आपोआप मिळाली असती आणि हीच शिवछत्रपतिनिर्मित राज्याची इतिकर्तव्यता होती! इतर प्रांतांतील लोकांत हें लोण जाऊन पोंचूं शकलें नाहीं, हीच मराठ्यांच्या इतिहासांतील शोककथा होय, पानिपतचा पराभव नव्हे."[3] अत्यंत परिणामकारक

१– पानिपत : पृष्ठ २३१.

२– कित्ता : पृष्ठ २३५.

३– कित्ता : पृष्ठ २३५.

म्हणून जो शेवट शेजवलकरांनीं केलेला आहे तोच राजवाडे यांच्या विवेचनाचा अर्क आहे. मराठ्यांचें ध्येयधोरण साऱ्या हिंदुस्थानांत पोंचूं शकलें नाहीं म्हणून पानिपत ते हरले असेंच राजवाडे यांचें प्रतिपादन आहे.

शेजवलकरांनीं लिहिण्याच्या भरांत खरें तें सांगितलें; पण तें त्यांच्या मनांतील नसावें. कारण ' चिपळूणकर, रानडे, राजवाडे प्रभृतींनीं महाराष्ट्रेतिहासाचें जें काल्पनिक रूप सिद्ध केलें त्याला इतिहासाचा आधार नाहीं. राजवाड्यांची गाजलेली पहिल्या खंडाची प्रस्तावना महाराष्ट्रीय ब्राह्मणांना चुकीच्या मार्गावर नेण्यांत यशस्वी झाली आहे. त्या प्रस्तावनेंत राजवाड्यांनीं भटकुलपातशाही किंवा ब्राह्मण-कुलपातशाही अशासारखे जे केवळ काल्पनिक चित्तविलास व भाषाविलास ध्वनिक्षेपित केले आहेत, त्यांमुळें महाराष्ट्रांतील ब्राह्मण पिढी चुकीची वाटचाल करून आपलीं ढोपरें मोडून बसली आहे. ' असाच विचार शेजवलकर नेहमीं न चुकतां मांडतात.[१] राजवाडे यांना मराठ्यांच्या राज्यास हिंदुपदपातशाही कीं भटकुलपातशाही म्हणावें या शाब्दिक गोष्टीशीं कर्तव्य नव्हतें. ' नाव पाहिजेल तें द्या. वस्तुस्थिति ध्यानांत आली म्हणजे झालें. ' असें त्यांनीं म्हटलें आहे.[२] अनेक पेशवाईचे गुणवर्णन करतात ते अखेरच्या कालखंडांतील, पण पहिल्या भागाकडे विधायक दृष्टीनें पाहण्यासारखें कितीतरी आहे. शेजवलकरांना हा ब्राह्मण्याचा ऱ्हास झालेला नको आहे. राष्ट्राच्या व समाजाच्या प्रकृतींत नीतिजन्य समधातपणा निर्माण करू शकणाऱ्या खऱ्या ब्राह्मणांचीच ' 'रसायन शाळा' त्यांना हवी आहे.[३] पुढें पुढें तर शेजवलकरांचीं मतें फारच निवळलेलीं दिसतात. मार्च १९५९ च्या ' जीवनविकास ' मासिकांत त्यांनीं ' विश्वशांतीची समस्या ' नांवाचा एक लेख लिहिला आहे. त्यांत खऱ्या ब्राह्मण्याची व धर्माची आवश्यकता त्यांनीं आवर्जून सांगितली आहे. " आजहि त्यांतील (वैदिक आर्यांच्या धर्मांतील) आद्य तत्त्वें समाजनियमनासाठीं स्वीकारण्याजोगीं आहेत.

" आमच्या वर्णजातिविवेकावर टीका करणाऱ्यांनीं लक्षांत ठेवावें कीं आजच्या राष्ट्रव्यापी कामगार संघटणा, कीं ज्या क्षणार्धांत समाजाचें गाडें स्वतःच्या लहरीप्रमाणें हवें तेव्हां बंद पाडूं शकतात, त्याहून वर्णव्यवस्था निश्चित जास्त चांगली होती...हिंदूंच्या समाजनियमनाची दुसरी किल्ली त्यांच्या आचारधर्मांत होती. धर्म हाच मुळांत आचारप्रभव आहे असें या नियमनकारांनीं निश्चित केलें होतें. म्हणजे मनुष्य हा मूळचा पशु असून आचाराच्या नित्य कसरतीनें कह्यांत राखावयाचा असतो हें त्यांनीं ओळखलें होतें. " इतकें लिहून शेजवलकर विचारतात ' आज

१– शेजवलकरांचे लेख : पुस्तक दुसरें, पृष्ठ ८१–८२, सन १९५९.

२– ऐतिहासिक प्रस्तावना: पृष्ठ ४६.

३– शेजवलकरांचे लेख : पुस्तक दुसरें, पृष्ठ १७२.

त्या आचारांपैकीं काय शिल्लक उरलें आहे ? मग राजवाडे यांनीं हिंदुपतबादशाहीचा पुरस्कार केला वा मराठ्यांच्या उत्तरेंतील राजकारणाला ध्येय व धोरण घालून दिलें तर शेजवलकरांना तें 'काल्पनिक चित्तविलास' कां वाटावें हें समजत नाहीं. असो.

मराठ्यांचा राजकीय चळवळींचा अर्थ किंवा त्यांच्या उत्तरेंतील कार्याचें ध्येयधोरण याची चिकित्सा राजवाडे व शेजवलकर यांनीं काय केली आहे तें आपण एथवर पाहिलें. आतां मराठ्यांच्या राजकारणाचा आणखी एका 'उत्क्रान्तिशास्त्रांच्या दृष्टीने थोडा परिचय करून घेऊं. मार्क्सवादी विचारसरणीनें जगताच्या साऱ्या मानवी जीवनावरच गेल्या शतकांत फार मोठा प्रभाव गाजविला. समाजाच्या प्रत्येक परिवर्तनाचे अर्थ त्यांच्या शास्त्राच्या दृष्टीनें अर्थोत्पादनाच्या साधनांशीं निगडित असतात. जगांतील सारे उत्पात, साऱ्या लढाया, सारी कलाविलासाची निर्मिति, तत्त्व,-ज्ञानाचा जन्म या सर्व घटनांचीं कारणें त्यांच्या मतें आर्थिक असतात. न्यूटननें प्रिंसिपिया कां लिहिला आणि नर्तिका नृत्यविलास कां करितात, यांची कारण-मीमांसा या नव्या समीक्षापद्धतीनें ठरविलेली आहे. मराठ्यांच्या राज्यस्थापनेची मीमांसाहि करणें त्यांना कठीण वाटत नाहीं. या पक्षाच्या मतें मराठ्यांनीं हिंदु-पदपातशाहीचा उद्योग केला, गोब्राह्मणांचें प्रतिपालन केलें, हिंदुधर्माचें रक्षण केलें, हीं उत्तरें अगदींच एकांगी व संकुचित आहेत. शिवाजीच्या वा मराठ्यांच्या कार्याला जी गति मिळाली ती धर्मप्रेरणेमुळें नाहीं. शिवकार्याचें स्वरूप धार्मिक होतें, नाहीं असें नाहीं, कारण अनेक कागदोपत्रीं तशी नोंद आहे. पण या पंथीयांच्या मतें धर्मप्रेरणा हें शिवकार्याचें बहिरंग होय, अंतरंग नव्हे. शिवकार्याची उठावणी ज्या अंतरंगांतून झाली त्याचें लक्षण वेगळेंच होतें. धर्मच्छल असा यांच्या मतें मुसलमानांकडून झालाच नाहीं, मग धर्मरक्षण अंतरंगांत कसें येणार ? शिव-कार्याचा व धर्मरक्षणाचा संबंध जोडणें म्हणजे यांच्या मतें कमालीच्या बुद्धिमांद्याचें लक्षण किंवा हेतुपुरस्सर विपर्यास करण्याच्या हीन मनोवृत्तीचें द्योतक तरी ठरेल. याच लोकांनीं एकदां म्हणून ठेविलें आहे की 'इतिहासाचार्य कै. राजवाडे यांचें पितृऋण तर असीम आहे.'[१]

तरी सुद्धां शिवकार्याचें व महाराष्ट्रधर्माचें नातें हें अंतरंगांतील नव्हे असाच विवेचनाचा सूर व आग्रह सर्वत्र आहे. 'शेतकऱ्यांची दुःखजर्जर अवस्था, मिरासदार व वतनदार यांजकडून होणारी त्यांची निर्दय व मनस्वी लूट, सतत लढायां-मुळे जमिनींची झालेली अघोर हानी यांची माहिती दादोजीकडून मिळून शिवाजीच्या बालमनावर तिचा तीव्र परिणामहि झाला होता.'[२] शिवकार्याच्या अंतरंगाचें स्वरूप

१— लालजी पेंडसे— : धर्म की क्रांति !, पृष्ठ १२.

२— कित्ता : पृष्ठ ४५

येथून सुरू होतें. 'हें राज्य व्हावें असें श्रीच्या मनांत आहे' हें खरें आहे. शिवराजनीति ज्या 'आज्ञापत्रां' त प्रकट झाली आहे त्यांत वतनदारांना भूमिदान देऊं नये असा शिवरायांचा आग्रह दिसून येतो. शिवाजीनें ही वतनदारी पद्धति बंद केली. जमिनीची पाहणी केली, प्रतवारी ठरविली, उत्पन्नाच्या हिश्शांची वाटणी केली, ओसाड जमिनीच्या मशागतीची व्यवस्था केली. हें सर्व खरें आहे. पण त्याच्या क्रांतिकार्याचें हेंच अंग महत्त्वाचे कसें? कोणत्याहि चांगल्या राजास प्रजेसाठी या गोष्टी कराव्याच लागतात. शिवाजीचें खरें महत्व हें कीं स्वराज्यसाधना कशासाठीं, जमिनीची प्रतवारी कशासाठी, मानवी जीवनाचा खरा अर्थ कोणता हें त्यानें ओळखलें. सर्व राज्य समर्थांच्या झोळींत टाकणारा शिवाजी किंवा शैलपर्वतावर भावावेशांत येऊन आत्मसमर्पण करूं पाहणारा शिवाजी मोठा ठरतो तो काय त्याच्या जमीनविषयक सुधारणेमुळें? प्रजेस काडीचा आजार द्यावयास गरज नाहीं असें आपल्या सैनिकांना सांगणारा शिवाजी खऱ्या अर्थानें धर्मप्रवृत्तीचा होता. प्रजेनें लावलेल्या भाजीच्या देठालाहि स्पर्श करूं नका असें बजावणारा शिवाजी खऱ्या अर्थानें महाराष्ट्रधर्माचा प्रवर्तक होता.

म्हणून शिवकार्याचें अथवा मराठ्यांच्या ध्येयधोरणाचें स्वरूप समजावून घेतांना मोठीच सावधगिरी बाळगली पाहिजे. लालजी पेंडसे यांच्या मतें 'शिवाजीचा मुख्य लढा मिरासदार-वतनदार-विरोधी शेतकरी क्रांतीचा होता. या लढयाचें अंतरंग मात्र आर्थिक स्वरूपाचें होतें.'[१] स्वराज्य साधनेचे परिणाम व मूळ हेतु यांचा विपर्यास झाल्यामुळें मार्क्सवादी अशा प्रकारचें विवेचन करू शकतात. याच आर्थिक कारणास आणखी थोडे राबविलें कीं मग मराठ्यांनीं केलेली नुसती लूट, नुसती मुलुखगिरी, जुलूम याहि बाबी वास्तविक स्वरूप म्हणून कायम राहतील.

मराठ्यांचें ध्येय व धोरण यांची आणखी विवेचना करण्याची जरूरी नाहीं. महाराष्ट्रधर्म, हिंदुपदबादशाही या शब्दांना आजकाल विपरीत दिवस आले असले तरी काळ हा मोठा प्रबल समीक्षक आहे. मनुष्य समूहांत का राहतो, कोणत्या प्रेरणेमुळें कार्यप्रवृत्त राहतो, कोणत्या शक्तीनें अचाट कृत्यें, अद्भुत पराक्रम करण्यास उत्सुक असतो याचीं उदाहरणें इतिहासांत जागजागीं विखुरलेलीं दिसतील. राजवाडे हे स्वतः धार्मिक प्रवृत्तीचे नव्हते, पण मराठ्यांचें कार्य व ध्येय यांची मीमांसा त्यांनीं इतिहासास धरून केलेली आहे. सत्याच्या अधिक जवळ जवळ जाण्याचा प्रयत्न करणें हाहि एक धार्मिकतेचा भाग म्हणतां येईल. राजवाडे यांच्या महाराष्ट्रधर्मांत कर्तव्यतत्परतेचा अंश मोठाच होता हेंहि आतांपर्यंत ध्यानांत आलें असेल. स्वराज्यसाधनेमुळें धर्मकारणाचें रक्षण होतें व धर्मकारणा-

१–; लालजी पेंडसे : धर्म कीं क्रांति?, पृष्ठ ५७.

मुळें स्वराज्यास अर्थ प्राप्त होतो हेंच खरें. स्वराज्य, स्वातंत्र्य मिळविलें तें कशासाठीं ? याचेंच उत्तर तयार नसल्यावर मग काय काय दशा होते तें आज आपल्या देशांत होणाऱ्या सीमाप्रांतांतील विटंबनेवरून ध्यानांत येण्यासारखें आहे. ध्येयधोरणांची कल्पना निश्चित नाहीं त्या राष्ट्राची फजिती जगांत फार होते. मूळ मानवी प्रेरणाच नष्ट करण्याच्या प्रयत्नांना जेव्हां यश येईल किंवा तितक्याच महत्त्वाच्या नव्या प्रेरणा निर्माण होतील तेव्हां पुढल्या ‘ इतिहासा ’चें स्वरूप निराळें होईल. एरव्ही मागचा इतिहास हा मागच्याच प्रेरणांवरून उभा करावा लागतो.

५ : राजवाड्यांचें इतिहाससंशोधन : पानिपत प्रकरण

राजवाडेकृत साधनखंडांच्या पहिल्या भागाची प्रस्तावना विशेष गाजली ती त्यांतील पानिपत पराभवाच्या मीमांसेमुळें. मराठ्यांचा व नंतर पेशव्यांचा राज्यविस्तार हिंदुस्थानांत १७ व्या व १८ व्या शतकांत होत राहिला त्याला एक विशेष अर्थ होता, एक ध्येयधोरण होतें, महाराष्ट्रधर्मसंस्थापनेविषयी जिद्द होती हा आपला मुद्दा विस्तारून सांगितल्यावर राजवाडे पानिपत–प्रकरणाकडे वळले आहेत. सन १७५० पासून सन १७६१ पर्यंतच्या ३०४ पत्रांतील मुख्य विषय पानिपतच्या युद्धासंबंधीं आहे. पनिपतचें युद्ध, मराठ्यांच्या युद्धविषयक हालचाली, अबदालीचें सामर्थ्य, मराठे सरदार व भाऊसाहेब पेशवे यांची दुर्बलता, पानिपतचा घोर संग्राम व मराठ्यांचा पराभव यांची मीमांसा राजवाडे यांनीं प्रथमच मराठींत शास्त्रशुद्ध रीतीनें कागदपत्रांचा आधार घेऊन करण्याचा प्रयत्न केला. शिवाजी, संभाजी राजाराम, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, इत्यादि श्रेष्ठ पुरुषांच्या कर्तृत्वामुळें वाढीस लागलेल्या मराठी राज्याचें त्यांनीं प्रथम खुलासेवार वर्णन केलें आणि म्हटलें कीं 'मराठ्यांनीं पेशव्यांच्या पुढारपणाखालीं समुद्रवलयांकित पृथ्वीचें सार्वभौमत्व मिळविण्याचा मुहुर्त १७६० च्य सुमारास आणिला. परंतु १७६१ सालीं अब्दालीशीं युद्ध होऊन मराठ्यांचा कधींहि झाला नव्हता असा पराभव पानिपत येथें झाला. ह्याहि गंडांतरांतून निभाऊन थोडक्याच कालांत त्यांनीं पूर्वीची सत्ता बहुतेक कायम केली, परंतु पूर्वीची भट्टी जी ह्यावेळीं बिघडली ती पुनः कधीं नीट सावरतां आली नाहीं." [१]

राजवाडे यांना मराठ्यांच्या पानिपतवरील पराभवाचा सर्वांगांनीं विचार करावयाचा असल्यामुळें त्यांनीं पराभवाच्या प्रचलित कारणांचा निर्देश करून मग त्यांच्या सत्यासत्यतेकडे ते वळले आहेत. पानिपतच्या पराभवाचीं एकूण अठरा कारणें अनेकांनीं दिलेलीं म्हणून त्यांनीं नमूद केलीं आहेत; तीं अशीं—

(१) पेशव्यांनीं छत्रपतींची सत्ता संपुष्टांत आणिल्यामुळें स्वामिद्रोहाच्या पापानें पेशव्यांचा क्षय झाला.

(२) छत्रपतींची सत्ता संपुष्टांत आणिल्यामुळें मराठा व ब्राह्मण सरदारांचीं मनें पेशव्यांविषयीं कलुषित झालीं.

(३) मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेंत सत्तेचें केंद्रीभवन झालेलें नव्हतें, त्यामुळें निरनिराळ्या सरदारांना आपापली सत्ता स्वतंत्रपणें स्थापण्याची दुरिच्छा झाली.

१– ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ४६–४७

(४) जातिभेदामुळें मराठ्यांची एकी होण्याचा कधींच संभव नव्हता वा कांहीं अघटित कारणांनीं कांहीं वेळ एकी झालीच तर ती लयास जाऊन व जातीजातींत मत्सर उत्पन्न होऊन सर्वत्र बेबंदशाही माजण्याचा संभव होता. तोच प्रकार १७६१ च्या अगोदर थोडाबहुत होऊन पानिपत येथें मराठ्यांचा मोड झाला.

(५) भरतखंडांत सर्व हिंदुलोकांत राष्ट्रीयत्वाची कल्पना पसरली नव्हती.

(६) ब्राह्मणांच्या पोटजातींत भेद झाला होता.

(७) सदाशिवरावभाऊचें वर्तन उद्दाम व सान्निपातिक होतें.

(८) त्यानें इब्राईमखानाच्या तोफखान्यावर भिस्त ठेवून मोंगलाई रीतीचा अंगीकार केला.

(९) मराठ्यांची जुनी गनिमी काव्याची रीत त्यानें सोडून दिली.

(१०) मराठ्यांच्या अंगीं पूर्वीचा काटकपणा राहिला नव्हता. त्यांच्यामध्यें चैनबाजीचा प्रवेश झाला होता.

(११) सडे जाऊन युद्ध करण्याचें सोडून सदाशिवरावभाऊनें कबिलेबुणगे बरोबर घेतले.

(१२) त्यानें दिल्लीचें तख्त फोडून तद्देशीयांचें वैर संपादिलें.

(१३) सुजाउद्दौल्यानें अब्दालीशीं तह करून देतो म्हणून थाप देऊन मराठ्यांचा विश्वासघात केला.

(१४) गिलच्यांच्या धिप्पाड व अर्बुज शरीरांपुढें मराठ्यांच्या ठेंगण्या व हलक्या मूर्तीचा टिकाव लागला नाहीं.

(१५) सदाशिवरावभाऊनें रघुनाथराव दादासारख्या अनुभवलेल्या शिपायाला ह्या मोहिमेचें सेनापतित्व दिलें नाहीं. सदाशिवरावभाऊला लढाईचा सराव नव्हता.

(१६) मल्हारराव होळकर माळव्याच्या अलीकडे खानाशीं येऊं नये म्हणून सांगत असतां भाऊनें त्याचा उपदेश ऐकिला नाहीं.

(१७) लाहोरास जाऊन अब्दालीची धाड मुद्दाम बोलावून आणण्यांत रघुनाथरावाचा मूर्खपणा झाला.

(१८) अब्दालीसारख्या कसलेल्या शिपायापुढें सदाशिवरावभाऊसारख्या नवशिक्या सरदाराचें कांहीं एक चाललें नाहीं.

पानिपतच्या पराभवाची मीमांसा स्वतःच्या मतें करण्याअगोदर राजवाडे यांनीं वरील समकालीन कारणांची प्रथम चिकित्सा केली आहे. स्वामिद्रोहामुळें मराठ्यांना अपयश आलें या मुद्याचा विचार करतांना यांतील पातकाचा विचार धर्मशास्त्राकडे सोपवून या विषयाचा मानवी विचार करण्याचें त्यांनीं ठरविलें; आणि छत्रपती स्वतःच कमकुवत झाल्याकारणानें 'आत्यंतिक राष्ट्रहित साधण्याची ज्याच्या अंगीं विशेष कर्तबगारी त्याच्या हातांत सूत्रें जाणें स्वाभाविक व अपरिहार्य

होतें.' असा त्यांचा या बाबतींतील निष्कर्ष आहे. रामराजा हा बुद्धीनें मंद, राज्यपदाला अयोग्य व मतलबाला अजागरूक आणि ताराबाई भिकार भांडणें करणारी अशी परिस्थिति असल्यामुळें सहजच पेशव्यांचें महत्त्व वाढलें. छत्रपती अकर्ते झाले म्हणून कोणी मराठे सरदार पानिपत येथें पेशव्यांच्या मदतीस आले नाहींत असा प्रकार नव्हता.

पेशव्यांचे सरदार केंद्रसत्ता मानीत नव्हते कीं काय या मुद्याचा राजवाडे यांनीं विस्तारपूर्वक विचार केला आहे. त्यांनीं प्रथमच सांगून टाकिलें कीं शिंदे, होळकर, पवार, गायकवाड, भोसले, अंताजी माणकेश्वर, विठ्ठल शिवदेव, गोविंद बल्लाळ, गोपाळराव पटवर्धन, मेहेंदळे, पुरंधरे इत्यादि सर्व सरदार पेशव्यांचे नोकरच होते. उत्पन्नांच्या दृष्टींनें हे सरदार मामलतदार होते, मालक नव्हते. यांनीं आपापल्या प्रांतांतील वसूल करावा व खासा, कारकून आणि शिबंदी यांचा खर्च वारून राहील तो पैसा रसद म्हणून पुण्यास पोंचवावा असा त्यांचा पेशव्यांशीं करार असे. सरदारांना सर्व हिशेब खडा न् खडा द्यावा लागे. पेशव्यांना गैरवर्तणुकी-बद्दल सरदारांच्या चौकशीचा अधिकार होता. 'पेशवे आपले मुख्य आहेत व आपलें बरें वाईट काय पाहिजे तें करण्याचा अधिकार सर्वस्वी पेशव्यांच्या हातांत आहे असा सरदार मंडळांत सर्वत्र ग्रह झाला होता'[1] अशी राजवाडे यांची तत्कालीन पत्रव्यवहार पाहून खात्री झाली होती. मोहिमा, तह, महालांची जमा व त्यांचा खर्च ह्या सर्वांची व्यवस्था पुण्याहून होत असे. सरदारांना स्वतंत्र हालचाल करण्याकरितां कोठेंच सवड सदाशिवरावभाऊनें व बाळाजी बाजीरावानें ठेविली नव्हती. सन १७४० पासून सुरू असलेल्या केंद्रीकरणाचा बाळाजी बाजीरावानें चालू केलेला हा उद्योग १७६० पर्यंत पूर्णावस्थेस गेला होता.

पानिपतच्या पराभवाचा विचार करतांना राज्यव्यवस्थेचें केंद्रीकरण झालें नव्हतें असें म्हणण्यापेक्षां मातबर सरदारांना अवघड वाटेल इतकें केंद्रीकरण पेशव्यांनीं स्थिर केलें होतें असाहि विचार राजवाडे यांनीं मांडिला आहे. पेशव्यांच्या हातीं झालेल्या सत्तेच्या या केंद्रीभवनाच्या विरुद्ध बरीच खटपट ह्यांपुढें कांहीं सरदारांनीं, मामलतदारांनीं, व मुत्सद्यांनीं केलीं.'[2] केंद्रीकरणाच्या विरुद्ध निरनिराळ्या हेतूंनीं प्रोत्साहित झालेल्या दुरुद्योगाचे हानिकारक परिणाम पानिपत येथें मराठ्यांना भोगावे लागले असाहि निर्णय राजवाडे यांनीं दिलेला आहे. हा दुरुद्योग मुख्यतः मल्हारराव होळकर, अंताजी माणकेश्वर, लक्ष्मण शंकर, बापूजी महादेव व दामोदर महादेव आणि गोविंदपंत बुंदेले यांनीं केला असा राजवाडे यांचा दावा आहे. पेशव्यांची धोत्रें बडविण्याची पाळी आपणावर येऊं नये ही भाषा याच संदर्भातील

१– ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ५०.

२– कित्ता : पृष्ठ ५०.

आहे. पानिपतच्या प्रकरणीं विशेष संबंध येतो तो गोविंद बल्लाळ खेर व मल्हारराव होळकर यांचा. गोविंदपंत बुंदेले यांची कुचराई पानिपत प्रकरणास बरीच भोंवली असा राजवाडे यांच्या अभ्यासाचा मथितार्थ असून त्यांनीं गोविंदपंतांच्या वर्तणुकी-वर कडाडून हल्ला चढविला आहे. बाजीराव निवर्तल्यापासून गोविंदपंत हिशेब देण्यास कां कूं करू लागला व मराठयांच्या म्हणजे पेशव्यांच्या हुकूमांकडे दुर्लक्ष करूं लागला. गोविंदपंत पैशाचे हिशेब नीट ठेवीत नसल्यानें पेशव्यांनीं येरंडे व कानिटकर हे दोन दरखदार सन १७५७ मध्यें गोविंदपंताकडे पाठविले होते. त्यांनीं गोविंदपंताविरुद्ध खालील प्रकारचे गंभीर आरोप केले.

१) मागील जमा आहे त्यापैकीं सोडून देऊन जमा करतात.

२) शिबंदीप्यादाचा खर्च जास्त वाढविला, पांच प्यादे होते तेथें पंच-वीस ठेविले.

३) फौज मन मानेल तशी ठेवून खर्च बहुत करतात.

४) जेथें शिबंदी बहुत नलगे ते परगणे शिंद्याकडे देतात व बहुत शिबंदी लागती ते परगणे सरकारांत ठेवितात.

५) भेटी व नजराणे अंतस्ते घेतात.

६) महालांचा दाखला दाखवीत नाहींत.

७) ह्यांच्या दहशतीमुळे रयत किंवा जमीदार कोणी आम्हांस भेटत नाहीं.

८) कलमरुजवात होत नाहीं.

९) कारभारी मन मानेल तें मिळवितात.

तत्कालीन पत्रांतून दिसून येणाऱ्या गोविंदपंतांच्या वर्तनाबद्दल ह्या तक्रारी प्रमुख होत्या. आणखीहि त्याच्या कांहीं दुष्कृत्यांची नोंद राजवाडे यांनीं दिली आहे. सदाशिवराव भाऊ ज्या ज्या सूचना गोविंदपंतास करीत होता त्यांतील एकीचेंहि पालन सचोटीनें त्यानें केलें नाहीं. गोविंदपंताच्या सर्व हालचाली हयगयीच्या, चुकारपणाच्या व दिरंगाईच्या होत्या. राजवाडे यांनीं तपशीलवार वर्णन करून गोविंदपंताच्या चुकांचें माप पुरेपूर भरून निष्कर्ष काढिला आहे कीं 'पानिपतच्या मोहिमेचें अपयश जर कोणाच्या माथीं मारावयाचें असेल तर त्या शिक्षेला गोविंद-पंत बुंदेले हाच सर्वथैव पात्र आहे. मुद्दाम बहाणे करून व सबबी सांगून ह्या गृहस्थानें भाऊला मदत करण्याचें टाळिलें व आपल्या या देशावर महत् संकट आणिलें. गोविंदपंतानें सदाशिवराव भाऊला मदत तर केली नाहींच, परंतु सुजा-उद्दौला, अबदाली, अलीगोहर, मीरजाफर ह्या लोकांकडील बातमी देखील जी वेळोवेळीं पाठविली ती पुष्कळदां खोटी असे. खरी बातमी काढण्याचा ह्या नीच

गृहस्थानें प्रयत्न केलानाहीं.'[1] पानिपत प्रकरणीं राजवाड्यांच्या मतें दुसरा अपराधी इसम म्हटला म्हणजे मल्हारराव होळकर होय. मल्हाररावाच्या स्वामीभक्तीविषयीं व देशभक्तीविषयीं त्यांनीं विकल्प प्रकट केला आहे. गोपाळ गणेश बर्वे व गणेश संभाजी खांडेकर ह्या दोन ' रघुनाथरावाच्या पुढ्यांतील ' इसमांच्या घरबुडवेपणाचाहि तीव्र शब्दांत राजवाडे यांनीं निषेध व्यक्त केला आहे. गोविंदपंत बुंदेलेच्या विषयीं विचार करतांना राजवाडे यांनीं त्याच्या जातीवर ठपका ठेवून जें संकट पुढें स्वतःवर ओढवून घेतलें तो पुढील शब्दांत वर्णन केला आहे : ' कऱ्हाडे लोकांच्या ठिकाणीं सर्वत्र साखर पेरून आपलें हित करून घेण्याचा जो एक मोहक गुण आहे, तो गोविंदपंताच्या अंगीं अमूप होता. '[2]

मराठे सरदारांत फूट होती कारण मध्यवर्ती सत्तेचें केंद्रीकरण त्यांना असह्य झालें व निव्वळ स्वार्थप्रेरित होऊन त्यांनीं पेशव्यांशीं वैर धरलें, या मुद्याचें स्पष्टीकरण करून झाल्यावर पानिपतच्या पराभवाशीं सदाशिवरावभाऊचें वर्तन कितपत निगडित आहे याचा परामर्श त्यांनीं घेतला आहे. सदाशिवरावभाऊ, कमकुवत होता, युद्धाचा अनुभव त्यास नव्हता, त्याचें वर्तन उद्दामपणाचें होतें, त्यानें जवळच्या मुत्सद्यांचा उपदेश ऐकिला नाहीं वगैरे आरोप राजवाडे यांना मान्य नाहींत. त्यांच्या मतें सदाशिवरावभाऊची निवड यथायोग्यच होती. तो उत्तम मुत्सद्दी व लढवय्या सरदार म्हणून नांवाजलेला होता. बहादुर भेंड्याची स्वारी, यमाजी शिवदेवाचें बंड, तुंगभद्रा, कोरेगांव येथील लढाया, भालकी, श्रीरंगपट्टण, होळीहोन्नर, सावनूर, उद्गीरच्या मोहिमा, इत्यादि प्रसंगींचा युद्धांचा अनुभव भाऊच्या जमेस होता. म्हणूनच पडदूरच्या निवाड्यांत भाऊनें उत्तरेंत जावें असें ठरलें. भाऊचें वर्तन धीमेपणाचें शांततेचें होतें. त्यांत उद्दामपणा बिलकुल नव्हता. पानिपतच्या पराभवास भाऊ जबाबदार नाहीं असाच निर्णय राजवाडे यांनीं दिला आहे व त्यांनीं आपल्या पूर्वीच्या विधानांवर शिक्कामोर्तब करून म्हटलें आहे; ' शत्रूच्या युक्तीपेक्षां मराठे गोविंदपंताच्या व मल्हारावाच्या कुचराईमुळें ही मोहीम हरले हा सिद्धान्त मात्र सर्वत्र मान्य व्हावा असा दिसतो.'[3] सदाशिवरावास गोविंदपंताची मदत असती तर युद्धाचें भवितव्य बदलेलें असतें. अब्दालीनें अमूक एक डाव योजिला व म्हणून भाऊ फसला असें झालें नाहीं.

पानिपतच्या पराभवाची मीमांसा करतांना राजवाडे प्रथम समकालीन कारण-परंपरेची छाननी करीत आहेत. जातिभेदाचा प्रश्न, ब्राह्मणांतील पोटभेद, मराठ्यांत पसरलेली चैनबाजी, गिलच्यांचे धिप्पाड व अर्बुज देह असलीं क्षुद्र कारणें पानिपतच्या

१– ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ८५.

२– कित्ता : पृष्ठ ६८.

३– कित्ता : पृष्ठ ८८,

पराभवाचीं असतील असें राजवाडे मानण्यास तयार नाहींत. त्यांनीं स्पष्टपणें व थोड्या अभिमानानें म्हटलें आहे, 'गिलच्यांच्या लांबीरुंदीपेक्षां मराठयांच्या शरीराचें क्षेत्रफळ कदाचित लहान असेल, परंतु लढाईंत ह्या क्षेत्रफळावरच मोठी भिस्त असते असें नाहीं. कर्नाटकांतील राठ व धिप्पाड शेतकरी, मथुरावृन्दा-बनांतील गलेलठ्ठ बैरागी, पंजाबांतील उंच, धिप्पाड व ढिसूळ शीख, राजपुतान्या-तील रुंद छाताडाचे व भरगच्च मांसाचे राठोड ह्या सर्वांना लहान्या परंतु काटक मराठयांनीं वेळोवेळीं चीत केलें होतें. त्या मराठयांना अर्बुज गिलच्यांचें किंवा पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याहि मनुष्याचें भय मागें कधीं वाटलें नाहीं व पुढें कधीं वाटणार नाहीं'[1] राष्ट्रीयत्वाची कल्पना त्या काळीं सर्वत्र रूढ झालेली नव्हती हा आरोप मात्र राजवाडे यांना मान्य आहे. पण हा आरोप मान्य करून राजवाडे आपल्या नेहमींच्या आवडत्या मुद्यावर भर देतात कीं तें राष्ट्रीयत्व पसरविण्यासाठींच मराठयांचे प्रयत्न होते. 'महाराष्ट्रधर्माची पताका घेऊन मराठे १६४० त जे निघाले ते तिला आस्ते आस्ते हिंदुस्थानांत सर्वत्र हिंडवीत असतां त्यांच्यावर १७६१ त हा घोर प्रसंग आला. हा प्रसंग येण्याच्या पूर्वी कित्येक प्रांतांत महाराष्ट्र-धर्मांचा प्रसार झाला होता व कित्येक प्रांतांत तो व्हावयाचा होता. उत्तरेकडील प्रांतात तो झाला नव्हता म्हणून तर तत्रस्थ हिंदूलोकांनीं यवनांचें साहाय्य केलें व मराठयांचा द्वेष केला.'[2] या राजवाडे यांच्या विचारावरून महाराष्ट्रधर्माचा प्रसार झाला नव्हता हें एक कारण पानिपतच्या पराभवाचें म्हणून स्थिर झालें.

पानिपतच्या घोर आपत्तीची चिकित्सा करतांना राजवाडे यांनीं कांहीं स्थूल कारणांचा विचार करून पुढें अधिक मूलगामी कारणांची शास्त्रशुद्ध चर्चा केली आहे. महाराष्ट्रधर्म उत्तरेंत पसरविण्यासाठी पेशव्यांनीं पद्धतशीर प्रयत्न केला नाहीं ही राजवाडे यांची मुख्य तक्रार आहे. एकामागून एक मुलुख मिळविणें, सरदारांवर वचक बसविणें, वसुलीची व्यवस्था करणें, फौज उभारणें हीं कामें मराठयांनीं केलीं; परंतु नव्या सत्तेबद्दल आपुलकी वाटेल, स्नेह निर्माण होईल, महाराष्ट्रधर्मांचें अंतरंग समजून त्याविषयीं जिव्हाळा उत्पन्न होईल असे प्रयत्न उत्तर पेशवाईत झाले नाहींत. लोकांचीं मनें स्थिर व्हावींत, नव्या राजवटीस अनुकूल व्हावींत यांसाठीं पेशव्यांनीं कांहीं प्रयत्न केलेले दिसत नाहींत. शिव-शाहींत समर्थ रामदासांनीं जें कार्य केलें तें कार्य उत्तर काळांत अधिक गरज अस-तांनाहि होऊं शकलें नाहीं. "कानडे, तेलंग, द्रवीड, गुजराथी, बुंदेले, रांगडे, पुर-भय्ये, शीख वगैरे लोकांच्या मनांत महाराष्ट्रधर्माविषयीं प्रेम उत्पन्न करण्याकरितां कोणत्याहि संस्था पेशव्यांनीं स्थापिलेल्या दिसत नाहींत; किंवा त्या कामीं कोणा

१– ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ९१.

२– कित्ता : पृष्ठ ८९.

महापुरुषाचें साहाय्य घेतलेलेंहि आढळत नाहीं. ह्यामुळें तरवारीच्या जोरावर व मुत्सद्यांच्या युक्तीवर भिस्त ठेवून पेशव्यांना हिंदुस्थानांत आपली सत्ता चालवावी लागे. मुसलमानांप्रमाणें पेशवेहि परकीय आहेत असा दुजाभाव जिंकलेल्या प्रदेशांत कायम राही व परशत्रु आला असतां पेशव्यांचें जूं झुगारून देण्यास तेथील लोक तयार असत... जिंकलेल्या लोकांचीं मनें आकर्षून घेण्यास व नवीन वळणावर नेण्यास पेशव्यांनीं व्यवस्थित प्रयत्न केले नाहींत हा त्यांचा मोठा दोष होता." [1] असे राजवाडे यांनीं स्पष्टपणें म्हटलें आहे.

जिंकलेल्या लोकांचीं मनें कशीं आकर्षून घ्यावींत या संबंधींहि त्यांनीं मार्गदर्शन केलें आहे. उच्छृंखल सरदारांना नीट काबूंत ठेवणें जसें पेशव्यांना जमलें नाहीं तसेंच सर्वसामान्य लोकांच्या मनाची मशागत नव्या सत्तेच्या स्थिरतेच्या दृष्टीनें करणें किती अगत्याचें आहे हेंहि पेशव्यांच्या ध्यानीं आलें नाहीं. सर्व प्रकारच्या लष्करी धामधुमींत व मोहिमांच्या व्यापांत प्रजानुरंजनाचें व त्यायोगें उद्‌बोधनाचें कार्य व्हावयाचें राहून गेलें. लोकांचीं मनें आकर्षून घेणें किती अगत्याचें आहे हें सांगतांना राजवाडे लिहितात, " कथा, पुराणें, यात्रा वगैरे संस्था सतराव्या शतकांतल्याप्रमाणें अठराव्या शतकांतहि चालू होत्या. परंतु सतराव्या शतकांतील जिवंतपणा अठराव्या शतकांतील कथापुराणांत राहिला नव्हता. येणेंप्रमाणें मराठ्यांच्या राजकारणाला सरदारांचीं व प्रजेचीं मनें उपयोगी पडण्यास योग्य जेणेंकरून होतील अशी ग्रंथ, व्याख्यानें वगैरे साधनसंपत्ति पेशव्यांनीं तयार न केल्यामुळें हिंदुस्थानांतील मराठे सरदार व तद्देशीय संस्थानिक व सामान्य जन पानिपतच्या मोहिमेच्या अगोदर व नंतर मराठ्यांच्या विरुद्ध उठले ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. ग्रंथसमूहांचा, धर्मव्याख्यानांचा, साधुसंतांचा, व यात्राजत्रांचा उपयोग राष्ट्रांतील लोकांच्या मनाला नीट वळण देण्यास केवढा मोठा होतो ही गोष्ट शहाजी व शिवाजी ह्यांच्या मनांत जशी बिंबली होती तशी बाळाजी बाजीरावाच्या व सदाशिव चिमणाजीच्या मनांत भरलेली दिसत नाहीं... राज्यें मिळविण्यास जसा तोफांचा व शिपायांचा उपयोग होतो तसा तीं कायम राखण्यास व जतन करण्यास व्याख्यानांचा व विचारी पुरुषांचाहि होतो." [2] पानिपतच्या पराभवाचीं मुळें किती खोलवर आहेत याची राजवाडे यांची ही अशी मीमांसा आहे. युद्धें जिंकली जातात व बुडविलीं जातात तीं नेहमीं अत्याधुनिक शस्त्रांनीं हें जसें खरें, तसेंच या कामीं सर्वसामान्य लोकांच्या मनांचें सार्वभौम सत्तेशीं सामरस्य असणें अगत्याचें आहे अशी जी राजवाडेकृत मीमांसा आहे ती उद्‌बोधक व अभिनव अशीच आहे.

१– ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ९४.

२– कित्ता : पृष्ठ ९५

लोकमानसाचें सामुदायिक सामर्थ्य पेशव्यांनीं ओळखलें नाहीं एवढेंच सांगून राजवाडे थांबले नाहींत. पेशव्यांच्या ध्यानीं ही गोष्ट कां आली नाहीं ? या प्रश्नाचा विचार करतांना राजवाडे यांची पल्लेदार विवेचक शक्ति आणखी खोलवर तपास करीत असल्याचें दिसून येतें. त्या वेळच्या महाराष्ट्रांतील विद्येची व शिक्षणाची स्थिति राजवाडे यांनीं तपासून पाहिली आहे. स्वतःची शेतवाडी करणाऱ्यांना, कारकुनी धंदा करणाऱ्यांना, शिपाईगिरीचा पेशा पत्करणाऱ्यांना, अगदीं सामान्य दर्जाचें व्यवहारशिक्षण त्या वेळीं जेमतेम मिळत असे. उच्च दर्जाच्या शिक्षणाचा किंवा नवीन उदित होणाऱ्या ज्ञानशाखांचा परिचय त्या वेळच्या मराठ्यांना नव्हता. जगाचें स्वरूप चोहों दिशांनीं विकसित होत असतांना मराठ्यांना मात्र त्याची जाणीव नव्हती. हजारों मैलांवरून परकीय शत्रू सशस्त्र होऊन, हत्यारांच्या बाबतींत बलवत्तर होऊन समोर ठाकला असतांना मराठ्यांना त्याच्या देशाची, त्याच्या शस्त्राची, त्याच्या मनोवृत्तीची माहिती करून घ्यावी असें वाटलें नाहीं. या विपरीत व भयानक परिस्थितीचें वर्णन करतांना त्यांनीं लिहिलें आहे, 'कारकुनांना व शिपायांना हिंदुस्थानचें भूज्ञान स्वतः हिंडून जें काहीं मिळे त्या पलीकडे बिलकूल नसे. हिंदुस्थानाव्यतरिक्त इतर देशांचें भूज्ञान ह्या लोकांना कांहींच नसे. निपाणीजवळ भोज येथील कुलकर्ण्यांच्या येथें मला एक अठराव्या शतकांतील पृथ्वीचा नकाशा सांपडला. त्यांत सप्तसमुद्रात्मक पृथ्वी शेषाच्या मस्तकावर दिली असून, चीन, इंग्लंड, रावणाची लंका वगैरे देशांच्या दिशा स्थूल मानानें बरोबर दाखविल्या आहेत व हिंदुस्थान चतुष्कोणाकृति काढिला असून तासगांव हिंदुस्थानचा मध्य धरिला आहे."[1] ही स्थिति अठराव्या शतकांतील आहे. याच्या आधीं तीन चार शतकें कोलंबसानें नवी भूमि शोधून काढली होती, मॅगेलनच्या बरोबर असणाऱ्या लोकांनीं पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण केली होती, वास्को द गामा कालिकत येथें झामोरिन बादशहाच्यापुढें येऊन उभा राहिला होता. पण मराठ्यांना या विस्तीर्ण भूगोलाचें ज्ञान यथातथाच होतें. भौतिक ज्ञान ही एक विलक्षण शक्ति नव्या जगांतील आहे हें फार थोड्या लोकांनीं त्या काळीं ओळखलें व त्यांतील अगदीं मोजक्या लोकांनीं त्या दृष्टीनें प्रयत्न केला. सर्वसामान्य लोकांना हें ज्ञान कमीच असणें हें गृहीत धरलें तरी राज्यकर्ते पेशवेहि या बाबतींत उदासीन होते हें आश्चर्य नव्हे काय ? राजवाडे यांनीं कबूल केलें आहे कीं "पेशव्यांच्या दरबारांतून व राज्यांतून भूगोलाचें व इतिहासाचें ज्ञान अगदींच क्षुद्र होतें हें कबूल करणें योग्य आहे. कपिल, कणाद वगैरे पुराण मुनींनीं प्रणीत शास्त्रांच्या व्यतिरिक्त युरोपांत ठाऊक असलेल्या शास्त्रांचा गंधहि पेशव्यांच्या राज्यांत कोणाला नव्हता. पाठशाला, विद्यापीठें, विद्वत्सभा, अजबखाने, वादसभा, शोधसभा, पृथ्वीपर्यटणें वगैरे युरोपियन संस्था

१– ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ९५—९६.

पेशव्यांच्या राज्यांत नव्हत्या इतकेंच नव्हे, तर त्या दुसरीकडे कोठें आहेत किंवा काय ह्यांचाहि पत्ता महाराष्ट्रांत कोणाला नव्हता. ह्या नकारात्मक वाक्याचा इत्यर्थ एवढाच कीं १८ व्या शतकाच्या पूर्वार्धांत व उत्तरार्धांत मराठ्यांची संस्कृति युरोपांतील प्रगत राष्ट्राच्या संस्कृतीहून कमी दर्जाची होती. "[1]

मराठ्यांच्या संस्कृतींत उणेपणा कोणकोणत्या बाबतींत होता याचाहि विचार राजवाडे यांनीं केला आहे. मराठ्यांना छापण्याची कला माहीत नव्हती, वा ती माहीत करून घेण्याचा प्रयत्नहि त्यांनीं कधीं केला नाहीं. धुळपांना व आंग्र्यांना लोहचुंबकाची व तारवें बांधण्याच्या गोद्यांची जरूरी विशेष होती. या दोनहि गोष्टी त्यांनीं इंग्रजांच्या गलबतांतून मुंबईत पाहिल्या होत्या. पण त्या बनविण्याची उत्कट इच्छा कोणालाहि झाली नाहीं. शिवशाहींत आरमाराकडे लक्ष होतें असें आज्ञापत्रांतील या विषयींच्या प्रकरणावरून दिसतें. तोफखान्याकडे पेशव्यांचें लक्ष होतें. पण याहि बाबतींत त्यांना परक्यांवर अवलंबून राहावें लागत असे. मराठ्यांना या भौतिक विद्यांच्या प्रगतीकडे लक्ष देण्याची बुद्धि कां झाली नाहीं ? या प्रश्नाचें मोठें मार्मिक व समर्पक विवेचन राजवाडे यांनी राधामाधवविलासचंपूच्या विस्तीर्ण प्रस्तावनेंत केलेलें आहे. येथें पानिपत पराभवाची राजवाडेकृत मीमांसा संपते. राजवाडे यांची ही मीमांसा सन १८९७-९८ सालची म्हणजे त्यांच्या वयाच्या चौतिसाव्या वर्षी झालेली आहे. यानंतर सुमारे पंचवीस वर्षांनीं राधामाधवविलासचंपूची विद्वत्तापूर्ण व तेजस्वी प्रस्तावना लिहिली गेली. त्यांत अधिक सखोल असें मानवी मनाचें किंवा लोकमनाचें विवेचन यावें हें सहजच होतें.

पानिपतच्या पराभवाचे परिणाम शेवटीं थोडक्यांत वर्णन करून राजवाडे यांनीं हें प्रकरण संपविलें आहे. मराठयांचें पाऊल आंत आलें, नजीबखानाला स्वतःचा प्रांत व कांहीं काळ दिल्लीचें पुढारीपण मिळालें, होळकरांचीं पेशव्यांचीं घोत्रें बडविण्याची भीति नाहींशी झाली. सुजाउद्दौल्यास पुढें मराठयांचा उपद्रव झाला नाहीं, रोहिलेहि मराठयांच्या जाचांतून मुक्त झाले. जानोजी भोसले, गायकवाड यांचें महत्त्व वाढलें. दिल्लीच्या पातशहाचें दैन्य वाढलें, दक्षिणेंत हैदरअल्लीस फावलें इत्यादि स्थूल परिणामांची नोंद राजवाडे यांनीं घेतली आहे. अबदालीला या मोहिमेपासून कांहींच फायदा झाला नाहीं. तो हिंदुस्थानांत राहिला नाहीं, दिल्लीचा पातशहा झाला नाहीं कीं पुनः हिंदुस्थानांत आला नाहीं इतकेंच श्रेय मराठयांच्या बाजूनें द्यावें लागेल.

सुमारें साठ वर्षांपूर्वी राजवाडे यांनीं केलेली पानिपतपराभावाची ही मीमांसा आज अनेक दृष्टींनीं अभ्यास करण्यासारखी आहे. एवढ्या तपशीलानें व मूलगामी दृष्टीनें जी विवेचना साठ वर्षांपूर्वी झाली तिचें आज काय महत्त्व आहे ? या दीर्घ

१– ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ९६.

काळांत अनेक साधनग्रंथ उपलब्ध झाले, नवे पुरावे मिळाले, परकीय भाषांतील साहित्यसाधनांची भर पडली, अनेक नवे कागदपत्र हस्तगत झाले. या सर्वांचा परिणाम राजवाडे यांच्या विवेचनावर कितपत झाला हें पाहणें मनोरंजक ठरणार आहे. राजवाड्यांच्या वेळीं पानिपतविषयक कांहीं पत्रें, पानिपतची बखर, भाऊसाहेबांची कैफीयत, भाऊसाहेबांची बखर, काशीराजाची बखर, इत्यादि मोजकीं साधनेंच उपलब्ध होतीं. हीं सर्व बखरींच्या स्वरूपाचीं असल्यानें ऐतिहासिक चिकित्सेस उतरणारीं नव्हतीं. काशीराजाची बखर हा एक प्रमुख आधारग्रंथ मानला जाई. पण यांतील अग्राह्य बाबींचा ऐतिहासिक पत्रांच्या आधारें राजवाडे यांनीं परामर्श घेतलेला आहे. राजवाडे यांनीं केलेल्या पानिपतच्या विचारांचा परामर्श आज नव्यानें उपलब्ध असणाऱ्या साधनांच्या द्वारें घेतांना भौगोलिक स्थळांचा चुकीचा निर्देश, तारखांची अदलाबदल यांसारखे विषय न घेतां विचारप्रधान अशा विवेचनावरच येथें प्रमुख्यानें चर्चा करण्यांत येणार आहे. पेशवेदप्तर, शिंदेशाहीच्या इतिहासाचीं साधनें, अनेक फारसी ग्रंथ इत्यादींच्या नव्या साधनांनीं राजवाडेकृत पानिपतपराभवमीमांसा निरखून पाहावयाची आहे.

पानिपतच्या अपयशाचें सारें खापर राजवाडे यांनीं गोविंदपंत बुंदेले यांच्या माथीं फोडलें आहे. सदाशिवरावभाऊनें सांगितलेलें कोणतेंहि काम धडपणें गोविंदपंतानें केलें नाहीं असा निष्कर्ष राजवाडेसंपादित पत्रांवरून निघतो. गोविंद बल्लाळ खेर हा कऱ्हाडा ब्राह्मण असून मूळचा रत्नागिरी जिल्ह्यांतील नेवरे गांवचा. छत्रसालच्या मदतीस बाजीराव निघाला त्या वेळीं हा त्याचेबरोबर होता, आणि तिकडेच त्यानें लौकिक मिळविला. पानिपतच्या आधीं पंचवीस वर्षें गोविंदपंत उत्तरेंत वावरत असल्यामुळें त्यास तिकडील परिस्थितीचा परिचय चांगला होता, म्हणून भाऊची अपेक्षाहि त्याजकडून मोठी होती. गोविंदपंताबद्दलच्या तक्रारीहि फार मोठ्या प्रमाणांवर भाऊकडे येत होत्या. (१) ऐवजाचा भरणा केला नाहीं. (२) सुजाचें मन वळविण्यांत आलें नाहीं. (३) अब्दालीस शह दिला नाहीं. (४) अंतर्वेदींतील ठाणीं राखलीं नाहींत आणि (५) मराठी फौजांना यमुनापार जाण्यास नावा पुरविल्या नाहींत यांसारखे आरोप पंतावर होते. राजवाडे यांच्या हातीं पडलेल्या दप्तरांतील सर्व पत्रें बुंदेले यास भाऊनें दोषारोपाचीं लिहिलीं तींच बहुधा होतीं. त्यामुळें राजवाड्यांचा ग्रह बळकट होत राहिला. आपण पुनः पुनः कांहीं कामांविषयीं बजावीत आहोंत आणि कामें मात्र होत नाहींत हें पाहून भाऊस विषाद वाटत राहिला. त्याचीं पत्रें मोठीं खोचक व बोचक आहेत. एका पत्रांत भाऊनें लिहिलें आहे.

"येथील खर्चाचे ओढीकरितां ऐवजाविशीं तुम्हांस वारंवार फारच लिहीत गेलों. परंतु ह्या गोष्टी तुमच्या चित्तांत किमपि न येतां चालढकलीवरी या कालपर्यंत

नेलें. धातुपोषणार्थ मात्र लिहितां कीं मजला ऐवजाचे तुर्तुदीशिवाय दुसरा अर्थ नाहीं, तुर्तुद केली, करतों, एका दो दिवशीं रवानगीहि करितों, येतों, कार्यावरी आज्ञेप्रमाणें जातों. ऐशा गोष्टी रिकाम्या लिहितां. मात्र निदर्शनास यांतील एकहि येत नाहीं. यामुळें तुमच्या कर्तृत्वाची तारीफ वाटते. ते कोठपर्यंत लिहावी ! लिहितां लिहितां भागलों ! हें तुमच्या कर्तृत्वास उत्तम नाहीं. याउपरि पत्र पावतांच रसदेचा व बाकीचा ऐवज मातबर भरणा करून अविलंबे रवाना करणें. दिरंग एकंदर न लावणें. कदाचित् अब्दाली यमुनेच्या दक्षिण तीरीं आल्यामुळें मार्गसुद्धां नाहीं, ऐवज कसा रवाना करावा, हें निमित्त ठेवाल, आणि हा तपशील लिहावा तरी असें न करणें. अब्दालीची आमची गांठ पाणीपतजवळ पडली आहे. तोफखान्याचा आराबा रचून लढाई करावयास तयारी केली आहे. त्याच्यानें इकडे तिकडे जावत नाहीं व कांहीं करवत नाहीं. पावणे दोन कोस दीड कोसाची तफावत आहे. पेंढारीं व लुगारे राऊत वगैरे नित्य उंटें, घोडीं, तट्टें, बैल आघाडी पिछाडीवर जाऊन गोटापासून घेऊन येतात. त्याचे कोणी पाठीवरहि निघत नाहीं. याप्रमाणें आहे. तुम्ही या गोष्टी भयाच्या कोण्हेविषयीं चित्तांत न आणितां सत्वर ऐवज दिल्लीस रवाना करणें. तेथें आलियावरी आम्ही हरतर्तुदेने घेऊन येऊं. विलंब न लावणें. जलद जलद ऐवज दिल्लीस येऊन पोंहचते करणें. तुम्हींहि पत्र पावतांच अंतरवेदींतून पठपठगंजावरी यांच्या पछाडीस येऊन पोंहचणें. सावकास याल तरी ठीक नाहीं. लांब लांब मजलीनें येणें. रसद त्याजकडे जावयाची आढळेल ते लुटणें, दबाव पाडणें, म्हणजे चहूंकडून घाबरा होईल. हेंहि युक्त तुम्हांस बहुत वेळ लिहिली. परंतु तुम्ही येत नाहीं. सारीच डोळेझांक करितां. परंतु असा समय चाकरी करून दाखवावयाचा पुढें कदापि येणें नाहीं. या हंगामी जो आपले शक्तिपेक्षां चाकरी अधिक करून दाखवील त्याचें रूप आहे. हें दूरदेशी ध्यानांत आणून सर्व गोष्टी लिहिल्याप्रमाणें करणें. ऐवज पाठविणें. तुम्ही येणें. लहान सहान गढ्यामुळे गुंतोन मोठ्या कामाच्या उपयोगांतून जाल असें करून न घेणें, तुम्ही दरमजल बागपतचे सुमारें अंतरवेदींतून येऊन रसद मारणें. नजीबखानाचा मुलूक जाऊन लुटून फस्त करणें, ऐवजरसदेचा पाचसातशे राऊत देऊन आगरियावरून जलदीनें दिल्लीस येऊन पोहोचेसा करणें. जाटाच्यानें अटकाव होत नाहीं. वेडे वांकडें तो करणार नाहीं. मातबर एकदाच द्यावा. त्यांत दोन तीन लाख एकेकदां उंटें चांगले राऊत देऊन रवाना करावे. दिल्लीस पावलियावर जसें दिसेल तसें पुढें आणून घेऊं. दोन चार हजार चांगली निवडक फौज लांब लांब मजली करून लिहिलेप्रमाणें रोहिले यांच्या मुलुकांत दंगा व रसद बंद करणें. कांहीच न झालें तरी परिछिन्न तुम्हांवर शब्द येईल. वारंवार लिहिलियाची आपले अबरूची इरे धरून काम बजावून आणणें. या दिवसांत तुम्ही येउन लिहिलेप्रमाणें पावलां असतां तर किती काम होतें ! अजूनतरी करून

दाखविणें...याप्रमाणें करणें. मसलत मोठी ; या दिवसांत ज्या मतें लिहावें त्या प्रमाणें होऊन न येई मग तुम्ही आमचे कामाचे काय ?'[१]

या अर्थाचीं पत्रें अनेक आहेत. गोविंदपंताकडून वसूल होत नाहीं, रसद पोचत नाहीं, सारीच डोळेझाक होतें हेंहि खरें आहे. परंतु येथें आणखी कांहीं मुद्दे महत्त्वाचे आहेत. गोविंदपंत हा मामलतदार स्वतः होऊन कांही कुचराई मुद्दाम करीत आहे की परिस्थितीच त्याला जबाबदार आहे ? ठिकठिकाणचा वसूल होणेंच कठीण झाले असेल व ही स्थिति उत्तरेंत सर्वत्र मामलतदारांची असेल तर एकट्या गोविंदपंतास बोल कसा देतां येईल ? मराठ्यांविषयीची आपुलकी या वेळी थोडी ओसरलेली दिसते. पानिपतसारख्या राष्ट्रीय संकटाच्या प्रसंगीं मराठे एकटे पडले व बाकीचे शत्रूच्या बाजूनें तरी गेले किंवा उदासीन तरी राहिले हें स्पष्ट आहे. मराठ्यांकडून आपलें संरक्षण होईल अशी खात्री कुणासच नव्हती असें दिसतें. वारंवार प्रयत्न होऊनहि मनोभावें मदत मराठ्यांना कुणाकडूनहि झालेली नाहीं. स्वपक्षाकडील होळकरांसारख्यांनींहि अंग चोरून लढाई दिली अशा प्रसंगीं वसूल होणें व तो भाऊकडे हव्या तेवढ्या प्रमाणांत पोंहचतां होणें या गोष्टी शक्य होत्या काय ? या आधीं होणाऱ्या मराठ्यांच्या स्वाऱ्यामुळें उत्तरेंतील लोक सावध झाले होते. लुटीच्या द्रव्याखेरीज इतर मार्ग उरलेला नव्हता. जिंकलेल्या प्रदेशांत सुयोग्य व्यवस्था असेल तर राज्यकर्त्यांविषयीं मनांत आपुलकी निर्माण होते. पण या वेळीं वस्तुस्थिति निराळी होती. अबदालीसारखा शत्रू जबरदस्त होता. त्याची दहशत मोठीच होती, आणि मराठ्यांविषयीं स्नेहाची वा विश्वासाची खात्री नव्हती. गरीब रयत आर्थिक दृष्ट्या खालावलेली होती. सन १७३३ मध्यें चिमाजी आप्पानें लिहिलें आहे, 'स्वामींच्या आशीर्वादकरून सर्व गोष्टी उत्तम आहेत. मुलुख मात्र ओस होऊन यमुनापलीकडे गेला. कोठें माणूस नजरेस पडत नाहीं,' सन १७५७ सालीं रघुनाथरावानें लिहिलें आहे, 'चार रुपये आकारतील असा हिंदुस्थानांत जीव कोठे दिसत नाहीं. जाटांत जीव आहे, द्रव्यवान आहे परंतु किल्ले मातबर आहेत व मोठा काबुवार आहे. आम्हांस बाहेर कर्जदेखील भक्षावयास न मिळे. रोज गांव मारून खावें. सांप्रत या मुलखांत गढ्या फार बांधल्या आहेत. झुंजल्याखेरीज दाणा नाहीं, रुपया नाहीं, कर्जहि ना मिळे. निदान येकयेक दोन दोन फाके लष्करास झालें.[२]

रयतेची परिस्थिति ही अशी व मातबर उमराव मराठ्यांविषयीं साशंक. अशा परिस्थितींत गोविंदपंताकडून अपेक्षेप्रमाणें वसूल झाला नाहीं. स्वतः शिपाई-

---

१– राजवाडे, मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १ ला लेख क्र. २६४ दि. ४ नोव्हेंबर १७६०.

१– त्र्यं. शं. शेजवलकर. पानिपत : पृष्ठ ५३–५४.

गडी नसल्यामुळें युद्धकुशलताहि त्याचेजवळ नव्हती. तरी त्याच्याकडून जें होईल तें त्यानें केलें. भाऊ आग्र्यास येण्यापूर्वी दोन लाख रुपये व डिसेंबरपर्यंत चार लक्ष वीस हजार रुपये कसेबसे पोंचते केले. पण पूर्वीप्रमाणें वसूली होत नव्हती हेंच खरें. पूर्वी नियमितपणें वसूल भरल्याबद्दल त्याचा लौकिक होता व पेशव्यांकडून पालखी अब्दागिरीचा बहुमान त्यास मिळाला होता, पण सन १७५१ पासून उत्तरेस पठाणांचा जोर वाढल्यापासून सारा समाज विस्कळीत होऊन गेला. गोविंदपंतानें या अडचणी वारंवार लिहून कळविल्या आहेत. १२ जानेवारी १७५१ च्या पत्रांत तो लिहितो, "पैसा कोठलाहि वसूल होत नाहीं. धान विकत नाहीं. असें परमसंकट आहे. श्रीमंत कोणीकडे जाणार काय मनसुबा तें लिहिणें. सवंगाईमुळें पैसा वसूल होत नाहीं; रयत बटाई ध्या म्हणते, नाहींतर पळोन जातात. पैसा उगवत नाहीं. बुंदेलखंडीं चार लाख रुपये कर्ज देणें तें अद्याप वारत नाहीं. शहरीं देणें तें तसेंच. श्रीकाशींत हुंडी केली, तेथें ऐवज तूर्त न मिळे, म्हणून कर्ज घेणें लागलें; ऐसा प्रसंग ईश्वरें आणिला. धरणींपारणीं सावकारांचीं होऊं लागलीं. अशी गत कधीं न जाली." अशा परिस्थितींत वसूल होणार कसा? ही सर्व परिस्थिति न ओळखून भाऊनें गोविंदपंतास टोंचून लिहिलें व राजवाडे यांनीं अपयशाचें सारें अपश्रेय गोविंदपंतास दिलें हें बरोबर नाहीं असेंच म्हणावें लागतें.

उत्तरेंत वसूल कां होत नाहीं याची जाणीव खुद्द भाऊसहि थोड्या परिचयानें झालेली दिसते. गंभीरच्या काठीं मुक्काम असतांना एकंदर परिस्थितीविषयीं पुण्यास कळवितांना तो २६ जून रोजीं लिहितो,......' अबदालीच्या मसलतीमुळें रसदांचा पैखा ध्यावा लागला. शहास गुंतल्यानें दुसरा पैका कोठें मिळणें कलतच आहे. घरचा पैका व कर्ज खावें लागलें...हिंदुस्तानांत आबदालीचा दंगा जाला यामुळें सालमजकूरचा अंमल यथास्थित चालोन ऐवज माहालाचा वसूल झाला नाहीं. व गाराताडी पडली, यामुळें जगांजागां महालास तोटे आले. नवेजुने मामलतीची घालमेल जाहली. यामुळें बाकीस ठिकाणच नाहीं....जाटाकडे खंडणीचा पैका येणें त्यास या समई जाटास मागतां येत नाहीं. जयनगरवाले यांजकडील पैसा येणे कलतच आहे. मसलतीमुळें अडचण पडली...दिलीकडे दंगा जाहाला यामुळें इकडील सावकार परागंदा जाहाले. कर्जवाम कोठें पैसा मिलत नाहीं. रडल्याहावी उत्तम नाहीं—" ही स्वतः भाऊची गत मग गोविदपंतास बोल किती लावावा? तरीसुद्धां भाऊच्या पत्रांत बोंचक शब्दांनीं सावध होऊन गोविंदपंत आपल्याकडून होईल तें करीत होता. यावेळीं त्याचे वय साठींच्या वर होतें. लढाईचा अनुभव कमी. पण थोडाफार वसूल पाठवून दिल्यावर अबदालीची रसद बुडविण्यासाठीं त्यानें प्रयत्न चालू केला. अबदालीस हें सहन झालें नाहीं. अताईखान व करीमदादखान या नव्या ताज्या दमाच्या सरदारांना गोविंदपंतावर त्यानें

पाठविलें. गोविंदपंत कर्मठ ब्राह्मण ! स्नान व संध्या करून सोंवळ्यानें जेवण करण्याच्या बेतांत होता. इतक्यांत ही धाड आली. पळापळ सुरू झाली. पळतांना गोविंदपंत तीनदां घोड्यावरून घसरून पडला. तिसऱ्या खेपेस त्याचा मुलगाहि जवळ नव्हता. अशा स्थितींत अफगाणांनीं त्याचें शीर कापून नेलें; आणि भाऊ-च्याकडे जाणारें धान्य पठाणांस मिळालें. प्राप्त परिस्थितींत धन्यास मदत करतां करतांच गोविंदपंतास मरण आलें. या संबंधांत रियासतकार सरदेसाई यांनीं लिहिलें आहे "राजवाड्यांनीं पानिपतचे अपयशाचा बराच मोठा वाटा गोविंद-पंताचे माथीं मारला आहे तें बरोबर नाहीं. गोविंदपंतांनीं होड्या पुरविल्या असत्या तरी अखेरचा परिणाम विशेष निराळा झाला असतां असें म्हणतां येत नाहीं. गोविंदपंत मतलबी होता. तसा आर्थिक मतलब त्याकाळीं सर्व लहान मोठ्यांचें मनांत प्रामुख्यानें वागत होता... तो मूळचा कारकून, हिशेबी कामाचा वाकब, पण पुष्कळदां, शिपाईगिरीचें कामहि त्यास शक्तिबाहेर पडलें. यजमानांच्या आज्ञा त्यानें यथाशक्ति पाळल्या,...पंतानें आपल्या अडचणी वरिष्ठांना वारंवार लिहून पाठविलेल्या आढळतात, त्यावरून मुद्दाम लबाडी किंवा हरामखोरी त्यांनें केल्याचें दिसत नाहीं. चहूंकडची माहिती ठेवून, सावधगिरीनें वागून, कोणाशीं विकोपास न जातां आपला कार्यभाग व्यवस्थित चालवावा असा त्याचा परिपाठ उपलब्ध कागदांत व्यक्त होतो. — मी चाकर बारगीर स्वामीचा आहे... आम्ही कान धरली शेळी आहों. हुकमी आहों. खावंदाची अहार्निशीं सेवा एकनिष्ठपणें करावी हें जाणतोः — अशी याची माया ...पंतानें धन्याचे सेवेंत जीव देऊन गुन्ह्याचें क्षालन केलें असल्यामुळें आतां जास्त विवेचन करण्याची जरूरी नाहीं."[१] कऱ्हाड्यांच्या साखरपेरणीचा गुण राजवाडे यांनीं ती जात ध्यानांत घेऊन केला आहे तोहि राजवाडे यांच्या अतिरेकी व लहरी मनाचा दाखला आहे. जातिवंत इतिहास लेखकांचें दर्शन येथें मुळींच नाहीं.

मल्हारराव होळकर प्रकृतीनेंच वेगळ्या प्रकारचा होता. पानिपतप्रसंगीं त्याचें व भाऊचें तितकेसें रहस्य नव्हतें हें उघड आहे. पानिपतास विजय झाला तर पेशवे हिंदुस्थानांत भारी होतील ही भीति होळकराच्या मनांत प्रथमपासून होती. हीच परिस्थिति थोड्याफार फरकानें इतर सरदारांच्या बाबतींतहि म्हणतां येईल. मराठ्यांनीं नेहमींच्या संवयीनें गनिमी काव्यानें युद्ध करावें, अशी जुनी मसलत भाऊसाहेबांनीं मानली नाहीं याचाहि रोष मल्हाररावाच्या मनांत असावा. दत्ताजी शिंद्याचा जो भीषण अंत झाला तोहि मल्हाररावाची मदत योग्य वेळीं आली नसल्यामुळेंच. पानिपतहून पराभवानंतर ते पळून आले त्यांत हा होताच. एकंदरीत परिस्थितीच अशी विपरीत बनत राहिली कीं मराठ्यांना मनापासूनचें साह्य

१-- मराठी रियासतः पेशवा बाळाजीराव, पृष्ठें २६७, २७२. सन १९५३.

मल्हाररावासारख्या कर्त्या, शूर व अनुभवी पुरुषाकडूनहि होऊं नये.

भाऊच्या वर्तनासंबंधीं उलटसुलट मतें दिसतात. तडफ, शौर्य, हिशेबीपणा व चौकस दृष्टि यांनीं संपन्न असलेलें भाऊचें व्यक्तिमत्त्व पानिपतप्रसंगीं लौकर निर्णय घेऊं शकलें नाहीं. बायकामुलांसहित सर्व संभार असल्यामुळें त्यांच्या सुरक्षिततेचा एक विषय नित्य होऊन राहिला व हालचालींना मंद गति प्राप्त झाली. धार्मिक विधींनीं मन प्रसन्न व खंबीर होत असेल, पण युद्धप्रसंगीं देवपूजा, व्रतवैकल्यें, श्राद्धपक्ष व यात्रा व यांत सामील होणारी भटभिक्षुक, याज्ञिक, पुराणिक ही मंडळी व त्यांच्यातर्फे होणारीं धर्मकृत्यें यांचा अर्थ काय लावावयाचा? मुचकुंद तीर्थावरील यात्रेमुळें आषाढ महिना गेला. अधिक श्रावण हा आणखी एक महिना वाया जाणारा निघाला. गोकुळ, वृंदावन, मथुरा या ठिकाणचीं यात्रा याप्रसंगीं शोभून दिसते काय? याच क्षेत्रांच्या रक्षणाच्या दृष्टीनें त्वरित हालचाली होणें अगत्याचें होतें. याच क्षेत्रांत पठाणांनीं केलेलीं अनन्वित कृत्यें अगदीं ताजीं होतीं त्यांकडे मराठ्यांचें लक्ष वेगळ्या कारणासाठीं जावयास हवें होतें. पण एवढा पोंच कोणाच्याहि विचारांत नव्हता असें दिसतें. स्वकीयांचेंच साह्य संपलें तेव्हां मराठ्यांच्या सैन्यांत अन्नान्न दशा निर्माण झाली त्याची हृदयभेदक वर्णनें वाचण्यासारखीं आहेत. हरिपंत फडके याचा वकील लिहितो, "सला होता दिसत नाहीं. लष्करांत मोठमोठे माणसास फाके जातात. घोड्यास दाणा ठाऊक नाहीं. लस्कर गलालें, कर्ज कोठें मिलत नाहीं, अशी तवाई आजपर्यंत कधीं गुदरली नव्हती. घोड्यामाणसांत जीव राहिला नाहीं. श्रीमंताचें दैव थोर आहे. परिणाम कठिण दिसतो. याचमध्यें सर्वांची आबादी दिसोन आली! सर्व गोष्टीनें असें साल पाहिलें नव्हतें." नाना फडणीसनें लिहिलें आहे, "आपली फौज भारीच आहे. परंतु पोटास नाहीं. घोडीं दाणा खावयास विसरलीं. माणसास अन्न मिळतां कठिण दिवस, इतकेंच मात्र संकट आहे." अशा प्रसंगीं नाइलाज म्हणून शेवटीं निकरानें लढाई खेळावी लागली. त्यांत सर्वांचे प्राण नव्हते. कारण प्रमुख माणसास म्हणजे भाऊस आप्त अनाप्त झाले असें नानाफडणीस यानें म्हटलें आहे.

वरील सारखीं आणखी कांहीं कारणें सांगून पानिपतपराभवाची मीमांसा राजवाडे यांच्यानंतरहि होत राहिली आहे. अमुक एका माणसाच्या चुकीमुळें पराजय झाला असें आजहि निश्चयानें म्हणतां यावयाचें नाहीं. युद्धांत जय मिळता तर सर्वच उपलब्ध असणाऱ्या साधनांतूनंहि उलट सुलट तर्क संभवणें शक्य आहे. अगदी अलीकडे या विषयावर प्रसिद्ध झालेले दोन उत्कृष्ट ग्रंथ म्हणजे एक कै. त्र्यं. शं. शेजवलकर यांचा 'पानिपत' व मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातर्फे प्रसिद्ध झालेला 'पानिपत संग्राम' हे होत. पहिल्यांत कांहीं विशिष्ट प्रसंगीं लेखकाची दृष्टि एकांगी व केवळ दोष पाहणारी असली तरी आजवरच्या साधनांच्या अभ्यासानें लेखकांनीं पानिपतविषयीं मौलिक विवेचन केलें आहे. मराठ्यांजवळची

हत्यारें हीं शत्रूपेक्षां कमकुवत होती, लष्करी सामर्थ्यास नैतिक बल कमी पडलें, इत्यादि राजवाडेकृत मीमांसाच ग्रंथकर्त्यानें विवरून सांगितली आहे.[१] भौतिक प्रगतींत व युद्धकलेंत मराठे मागासलेले होते तरी त्यांची मानसिक घडण विकसलेली होती हा एक सूक्ष्म विचार शेजवलकरांनीं मार्मिक रीतीनें मांडला आहे. 'वृथा रक्तपाताची जाळपोळीची हौस मराठ्यांना कधींच नव्हती. भौतिक दृष्ट्या मराठ्यांचा उणेपणा या लढाईनें उघडा पडला; पण नीतिदृष्ट्या पाहता त्यांचें वर्तन आक्षेप न घेण्यासारखें अगदी स्वच्छ आहे.'[२] हा शेजवलकरांचा निष्कर्ष विचारणीयच आहे. मराठे पानिपतचें युद्ध कां लढलें याची चर्चा शेजवलकरांनीं या पुस्तकांत प्रामुख्यानें केली आहे त्याचा परामर्श मागील प्रकरणांत घेतला आहेच.

'पानिपतचा संग्राम' या पुस्तकांत कांहीं मराठी साधनांचा व पुष्कळशा फारशी साधनांचा संग्रह नव्यानें केला गेला आहे. फारसीचे पंडित श्री. सेतुमाधवराव पगडी यांच्या परिश्रमानें प्रथमच कांहीं अस्सल फारसी साधनें मराठींत आलीं आहेत. यांच्या आधारें आणखी एक इतिहास अभ्यासक श्री. न. र. फाटक यांनीं या संग्रहास 'अल्प समालोचन' जोडलें आहे. यांत मराठी व फारसी पत्रें एकाच प्रसंगाबद्दल उलटसुलट मतप्रदर्शन कसें करतात याचें मार्मिक विवेचन आहे. भाऊसाहेबाच्या धैर्याचें वर्णनहि या साधनांतून उत्तम प्रकारें आलें आहे. भाऊंनीं मराठ्यांची नेहमींची गनिमी काव्याची पद्धति सोडली, तोफखान्याच्या भरीस मराठे पडले म्हणून युद्ध हरलें हें मत समालोचनकारास यथार्थ वाटत नाहीं. वैरणीअभावीं मराठ्यांची घोडीं थकलीं हें कांहीं पराभवाचें कारण होऊं शकत नाहीं. दिल्लीची पातशाही रक्षण्यासाठींच मराठ्यांनीं पानिपतचें युद्ध केलें हा विचार मात्र शेजवलकरांच्या विचारांशीं जुळणारा असा आहे. सारांश असा की पानिपतमीमांसा अजूनहि चालूच आहे. 'विश्वासराव पडल्याबरोबर चित्तवृत्ति क्षुब्ध घेऊन सदाशिवरावानें शांत विचार सोडून एकदम रणकुंडांत उडी घेतली हेंच त्याचें कृत्य शेवटच्या मोठ्या नाशास कारण झालें असेंहि म्हणतां येईल.'[३] हेंहि एक पराभवाचें कारण म्हणून सांगण्यांत येतें. शौर्य, धाडस, निश्चय या भाऊंच्या गुणांचा अतिरेक म्हणजे त्याचें आत्मसमर्पण. पानिपतावर मराठ्यांचा पराभव झाला परंतु त्यांच्या पराजयांतील उदात्तपणा, शौर्यादि गुणांचें दर्शन, अब्दालीचें पुनः परत न येणें इत्यादि विशेषांनीं 'विजय

१– त्र्यं. शं. शेजवलकर, पानिपत : पृष्ठ २२७–२२९.

२– कित्ता : पृष्ठ २३३.

३– गो. स. सरदेसाई : मराठी रियासत, पेशवा बाळाजीराव पृष्ठ ४३८ सन १९५३.

कोणाचा ?' असाहि प्रश्न इतिहासकारांनीं उपस्थित केला आहे.[1] पानिपतच्या युद्धांत जय मिळवूनहि अब्दालीस हिंदुस्थानांत कायमचें राहावें, राज्य करावें असें वाटलें नाहीं. स्वतः अब्दालीनें नानासाहेब पेशव्यास लिहिलेलें पत्र फार वाचनीय असें आहे.[2] पानिपतच्या पराभवामुळें मराठ्यांची एक पिढीच्या पिढी गारद झाली पण त्यांची हिंमत खचली नाहीं. त्यांचा कारभार म्हणावासा कोसळून गेलेला दिसत नाहीं. मोडलेल्या झुंजाची शिफारस कशास लिहावी अशीच भाषा सर्वत्र नंतरच्या पत्रव्यवहारांत दिसते. पराभव झाला पण यांतून स्फुरण येऊन हें अपयश मराठ्यांनीं पुसून टाकलें हाहि पुढचा इतिहास स्पष्ट आहे. पानिपतपराभवाची ही मीमांसा राजवाडे यांच्या प्रस्तावनेनंतर साठ वर्षें होत आहे. परंतु राजवाडे यांची कांहीं अतिरिक्त विधानें सोडून दिल्यास एवढें मूलगामी विवेचन अजूनहि झालेलें नाहीं. शेजवलकरांचा प्रयत्न फार मोठा मानावा लागेल; परंतु तेहि आत्यंतिक आग्रहीपणांत व पूर्वग्रह करून लिहिण्यांत राजवाडे यांच्या तोडीस तोड होते असेंच दिसून येईल.

१– कित्ता : पृष्ठ ४२२-४३४.

२– कित्ता : पृष्ठ ४२६.

६ : राजवाड्यांचें इतिहास संशोधन : ब्रह्मेंद्रस्वामी

'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड ३ रा' हा ग्रंथ राजवाडे यांनीं सन १९०१ सालीं प्रसिद्ध केला. यांत मुख्यतः म्हणजे २३६ पत्रें धावडशीच्या ब्रह्मेंद्रस्वामीसंबंधानें आहेत. त्या पत्रांच्या अध्ययनावरून राजवाडे यांनीं या खंडाच्या प्रस्तावनेंत ब्रह्मेंद्रस्वामीच्या कार्यावर कडक शब्दांत प्रखर टीका केली आहे. या प्रखर शब्दाची धार वाढण्यास तत्कालीन कारण म्हटले म्हणजे आधल्याच वर्षी म्हणजे १९०० मध्यें साताऱ्च्या रा. ब. द. ब. पारसनीस यांनीं आपला 'महापुरुष ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर, चरित्र व पत्रव्यवहार' हा सुमारें पांचशें पृष्ठांचा ग्रंथ प्रसिद्ध केला होता. या ग्रंथाची भाषापद्धति सुरस असून लेखकांनीं ब्रह्मेंद्रस्वामींस महापुरुष बनवून रामदासांच्या तोडीची योग्यता अर्पण केली होती. राजवाडे यांना हें सहन न होऊन त्यांनीं ब्रह्मेंद्रस्वमींच्या पत्रव्यवहारांचा आणखी तपास करण्यास सुरुवात केली. त्यांनीं पिंपरी येथील आप्पासाहेब भागवत यांचे कडील दप्तर तपासून पाहिलें. त्यांत त्यांना पहिलें बाजीराव व चिमाजी आप्पा यांचेशीं स्वामींचा व स्वामींशीं या दोघांचा पत्रव्यवहार झालेलीं बरींच पत्रें मिळालीं. या आधारावर त्यांनीं तिसऱ्या खंडास विस्तृत प्रस्तावना लिहिली. नेहमींप्रमाणें तिनें विलक्षण खळबळ उडवून दिली. मुख्य रोख पारसनीस यांच्या ब्रह्मेंद्रस्वामींच्या चरित्रावर होता. वांईस मेणवली दप्तराचें काम चालू असतांना राजवाडे म्हणाले होते, 'संपूर्ण इतिहासाचीं साधनें हातीं आल्याशिवाय ऐतिहासिक व्यक्तीचें संपूर्ण चरित्र लिहिण्याची हा मनुष्य व्यर्थ खटपट करतो.'[१] अर्थात् ही व्यक्तिगत टीका राजवाडे यांनीं नेहमींच्या स्वभावास अनुसरून केलेली दिसते. 'संपूर्ण इतिहासाचीं साधनें' ही अवस्था कुणासच प्राप्त होणारी नाहीं. राजावडे यांनीं तिसऱ्या खंडास जी साठ पृष्ठांचीं प्रस्तावना लिहिली व ब्रह्मेंद्रस्वामीचें मूल्यमापन केलें तें तरी कोणत्या अवस्थेंत? त्या वेळीं तरी संपूर्ण इतिहासाचीं साधनें हस्तगत झालीं होतीं काय?

ब्रह्मेंद्रस्वामीस पारसनीसांनीं रामदासाच्या बरोबरीनें मान देऊन राष्ट्रगुरु म्हणून त्याचा गौरव केला तर राजवाडे यानीं 'खुनशी, तिरसट, भगवीं वस्त्रें पांघरून कृष्ण कर्मे करणारा म्हणून स्वामीवर अपशब्दांचा वर्षाव केला. या वादाच्या निमित्तानें त्यावेळीं महाराष्ट्रांत पुष्कळ शाब्दिक चकमकी झाल्या. या रस्सीखेचींत

१– ब्राह्मणपत्रिका : राजवाडे तिलांजलि अंक; पृष्ठ ५६.

ब्रह्मेंद्रस्वामी नेमका कुठे आहे हें यथार्थपणें ध्यानांत यावयास शांतपणें विचार करणें आज शक्य आहे. ब्रह्मेंद्रस्वामीचें मूल्यमापन योग्य रीतीनें व्हावयाचें तर त्यासाठीं ब्रह्मेंद्रस्वामीची पूर्वपीठिका, शाहू, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, चिमाजी यांचीं राजकारणें, सिद्दी, आंग्रे यांच्या कोकणमधील कलागती इत्यादि संबंधीं प्रथम परिचय करून घ्यावयास हवा. हे सर्व धागेदोरे जमले तरच स्वामीचें महत्त्व योग्य रीतीनें ध्यानांत येण्यास मदत होईल.

बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, शाहू, आंग्रे इत्यादि राजकारणी पुरुष आणि त्यांच्या घराण्यांतील राजस्त्रिया यांची भक्ति ब्रह्मेंद्रस्वामीवर विशेष होती. त्याच्या कृपेनें आपलें राज्य वाढतें, संकट दूर होतें असाच समज सर्वांचा होता. हे ब्रह्मेंद्रस्वामी मूळचे वऱ्हाडांतील दुधवाडी गांवचे. यांचा जन्म सन १६४९ च्या सुमारास झाला. वयाच्या बाराव्या वर्षी आईबाप वारल्यानंतर मूळची वैराग्यशील वृत्ति ईश्वरभक्तीकडे लागली व यांनीं राजुरी येथील गणपतीची आराधना आरंभिली. तपश्चर्या मोठ्या प्रमाणांत केली. काशीस जाऊन चतुर्थाश्रम स्वीकारून स्वामी ब्रह्मेंद्र झाले. हिमालयापासून रामेश्वरापर्यंत तीर्थयात्राहि झाली. कृष्णातीरी आल्यावर तेथें मन प्रसन्न झालें. चिपळूणनजीक पेढें नांवाच्या गांवीं परशुरामाचें देवस्थान प्रसिद्ध आहे तेथें स्वामी आले. जवळील धामणी सोनगांवच्या रानांतील एका रम्य ठिकाणीं स्वामींनीं पुनः तपश्चर्या चालू केली. बाळ गौळी नावांचा गुरे चारणारा इसम स्वामींच्या तपस्येनें त्यांचा मित्र व भक्त बनला. आणखी कांही मंडळी स्वामींच्या भोंवती जमलीं. बाळाजी विश्वनाथाचें मन स्वामीवर जडलें. 'तूं महत्पदास चढशील' हा आशीर्वाद बाळाजीस मिळाला. पेशवेपद प्राप्त झाल्यावर ही भक्ति आणखी वाढली. याहिपूर्वी राजारामास जिंजीच्या प्रसंगीं मदत झाली होती म्हणून धामणी गांव स्वामीस इनाम दिला गेला होता. स्वामींचें भक्तमंडळ हळूहळू वाढीस लागलें. त्यांच्या अलौकिक सामर्थ्याची वार्ता सवत्र पसरलेली होती. यावेळीं येथील अंमल जंजिऱ्याच्या हबशाकडे होता. या हबशाकडूनहि स्वामींनीं पेढें व आंबडस हीं दोन गांवें परशुरामच्या देवस्थानास म्हणून मिळविलीं.

ब्रह्मेंद्रस्वामीचें वजन वाढत असतां कोंकण किनाऱ्यावर उलाढाली करणारे कोण कोण लोक होते याचाहि तपशील पाहाणें अगत्याचें आहे. वसई, ठाणें, चेऊल येथें पोर्तुगीझ, मुंबईस इंग्रज, जंजिऱ्यास हबशी, अलीबागेस आंग्रे, सावंतवाडीस सावंत, मालवण-पन्हाळ्याकडे कोल्हापूरकर, गोव्यास पूर्तुगीझ इत्यादि अधिकाऱ्यांची सत्ता कोकणांत यावेळीं होती. यांच्यांत कहलप्रसंग नेहमीं होई. शिवाजी, संभाजी, राजाराम इत्यादि राजमंडळांतील लोकांना यांच्याकडे प्रथमपासून लक्ष द्यावें लागलें होतें. 'घरास जैसा उंदिर तैसा मराठी राज्यास सिद्दी' असें सूत्र शिवाजीपासूनच होतें. यांतील कांहींचें साह्य मोंगलांस असल्यामुळें मराठ्यांशीं नेहमींच वैर असे. आणि ज्या ध्येयधोरणाचा पाठपुरावा मराठ्यांना करावयाचा होता तो लक्षांत

घेतां कोंकणांत स्वकीयांचाच अंमल असावा असें त्यांना वाटणें स्वाभाविकच होतें. पण कोंकणांत तर परकीयांच्या निरनिराळ्या सत्ता वाढीस लागलेल्या होत्या. इजिप्त देशाच्या जवळील सोमाली लोकांच्या देशांतून आलेले हे हबशी वा सिद्दी वा शामळ या नांवानें प्रसिद्ध होऊन मराठयांस उपद्रव देऊं लागले होते. यांचा बंदोबस्त करणें हें मराठयांचें प्रथम कर्तव्य बनून गेलें होतें. आणि पुन्हां पुन्हां निर्माण होणाऱ्या या कटकटींत मुख्यतः ब्रह्मेन्द्रस्वामी कारणीभूत झालेले दिसतात.

जंजिऱ्याचे हबशी हे मोंगलांचे हस्तक असल्यामुळें मराठ्यांच्या शत्रुपक्षांत नेहमींच असत. बाळाजीची कोंकण ही जन्मभूमि. ती आपल्या ताब्यांत असावी ही त्याची इच्छा. जंजिऱ्याच्या सिद्दीचा त्रास निवारण करण्याचे प्रयत्न वारंवार झालेले दिसतात. बाळाजी विश्वनाथानें सन १७१५ मध्यें ठरविलेला तह मोडून सिद्दी मराठ्यांना उपद्रव देऊं लागला. आंग्रे आणि सिद्दी यांचाहि वैरभाव वाढतच होता. सन १७०७ पासून १७३१ पर्यंत जंजिऱ्यास सिद्दी रसूल याकूदखान हा कारभार पाहात होता. यास स्वामींबद्दल प्रथम आकर्षण वाटत असावें. कारण यांनींच परशुरामास दोन गांवें इनाम म्हणून दिलीं. दाभोळच्या वाडीच्या मुखाशीं अंजनवेल येथें हबशांचाच अंमल असून तेथें सिद्दीसात हा अधिकारी होता. याला कर्नाटकांतील सावनूरच्या नबाबाकडून एक चांगला हत्ती बक्षीस मिळाला. यांतून राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें ब्रह्मेंद्रस्वामीचें ‘ चमत्कारिक उपाख्यान ’ सुरू झालें.

इतक्या लांबून हत्ती अंजनवेल येथें सुरक्षितपणें आणण्याचें कार्य ब्रह्मेंद्रस्वामीकडे सिद्दीसातानें सोपविलें. स्वामीनें तें काम मान्य केलें. ‘ अशी दहापांच फालतू कामें बगलेंत घालून बाहेर पडण्याची स्वामीला जन्माची खोड होती. लग्नें, मुंजी, जवाहीर, हत्ती, घोडे वगैरे बाकी ठरविण्यांत, विकण्यांत व विकत घेण्यांत आपला हातखंडा आहे, अशी स्वामीला घमेंड होतीं[1] या स्वभावास अनुसरून आपणांस कोण काय करणार या खात्रीनें स्वामीनें हें काम पत्करलें. त्यावेळीं निरनिराळ्या देशांत अधिकाऱ्यांच्या चौक्या असून परवानगी-शिवाय फौज, जनावरें, वा माल इकडूनतिकडे नेतां येत नसे. कांहीं ठिकाणच्ीं परवानगीपत्रें स्वामीजवळ होतीं, कांहींची जरूरी आपणांस काय, अशीहि अहंता मनांत असावी. हत्ती विशालगडावरून सुरक्षित आल्यावर माखजनच्या मेटापर्यंत हत्ती आल्यावर कान्होजी आंग्रे याच्या चौकींतील अधिकाऱ्यांनीं हत्तीस अटकाव केला. हत्ती हबशांचा व बिगरपरवानगीचा म्हणून आंग्र्यांनीं कैद केला. हबशी आंग्रे यांच्या लोकांत थोडी लढाई होऊन हबशांचा पराभव झाला व हत्ती जयगडच्या किल्ल्यांतील आंग्र्यांच्या सैनिकांनीं आपल्याबरोबर नेला. सिद्दीस वाटलें स्वामीनें कांहीं निमित्त करून मुद्दामच हत्ती आंग्र्यांच्या ताब्यांत दिला. रागानें त्यानें ब्रह्मेंद्र-

१– ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ १५५.

स्वामींचें गांव व परशुरामाचें देवालय लुटून फस्त केलें. बायकामाणसांची अब्रू घेतली. हा प्रकार सन १७२७ च्या फेब्रुवारींत शिवरात्रीस झाला. ब्रह्मेंद्रस्वामीची अवस्था दोन्हीकडून चमत्कारिक झाली. इकडे हत्ती गेला, तिकडे देवस्थान लुटलें गेलें. आंग्रे यांनीं हत्ती सोडावा म्हणून ब्रह्मेंद्र स्वामींनीं विनविण्या व धाकाच्या विनंत्या सुरू केल्या. 'हत्ती सोडून देणें, नाहीं तर तुझें कल्याण होणार नाहीं' असा शापहि दिला. शेवटीं हत्तीस मुक्त करण्यांत आलें. पण स्वामींच्या मनांतील शल्य गेलें नाहीं. याकुतखान, सिद्दीसात व कान्होजी यांच्याशीं स्वामींचें बिनसलें. परशुराम क्षेत्रीं आपण राहावें असें स्वामींना वाटेना. स्थानत्याग करून जाण्याचा विचार कान्होजीच्या आग्रही शपथेमुळे कांहीं काळ थांबला. पण पुढें मन लागेना, असें पाहून स्वामी देशावर धावडशीस आले. शाहूची त्यांनीं भेट घेतली व कोंकणच्या प्रकारांची सर्व हकीगत महाराजांना सांगून कान्होजी, सिद्दीसात यांचा बंदोबस्त करण्याचें सुनावलें. हत्तीमुळें आपलें पंचवीस हजार रुपयांचें नुकसान झालें, व्याजाचा हिशेब केव्हां देणार, दोन महिन्यांपूर्वीच्या गोष्टी आपण विसरलों नाहीं अशा अर्थाचें पत्रहि ब्रह्मेंद्रांनीं कान्होजीस लिहिलें. कान्होजीसहि थट्टा करण्याची लहर आली. त्यानें लिहिलें, 'स्वामी तो परमहंस, सुखदुःखातीत, फलाण्यामुळें फलाणें झालें, हत्तीमुळें फलाणें गेलें, हा मोह मनुष्यास न व्हावा यास्तव श्रुतिस्मृति प्रवर्तल्या, कोणाचें काय गेलें व कोणी नेलें?' असा शास्त्रार्थ कान्होजीनें स्वामीसच सुनाविला.

स्वामी सन १७२८ च्या सुमारास धावडशीस आले. आपलें संकट, आणि देवस्थानची लूट शाहू व बाजीराव यांच्या मनांत सलत राहावी असा प्रयत्न ब्रह्मेंद्रांचा होता. हिंदुधर्माची अवहेलना व सत्पुरुषांचा छळ या दोनहि गोष्टी मराठ्यांना खपण्यासारख्या नव्हत्या. 'देवब्राह्मणांचा तूं उच्छेद केलास; अतःपर तुझाहि उच्छेद लौकर होईल' ही शापवाणी स्वामींनीं उच्चारली होतीच. कान्होजी आंग्र्याचें शाहूशीं व बाजीरावाशीं तितकेसें सख्य नव्हतेंच. सन १७२९ मध्यें कान्होजी मरण पावल्यावर सेखोजी आंग्रे हा स्वाभिमानी व पराक्रमी मनुष्य कारभार पाहूं लागला. दरम्यान सूडाची भावना स्वामींच्या मनांतून गेली नव्हती. पुढें कांहीं वर्षांनीं १७३३ मध्यें सिद्दी रसूल मरण पावला. यास अब्दुल्ला, सिद्दी संबूल, सिद्दी अंबर वगैरे पांचसहा मुलें होतीं. नेहमीप्रमाणें बंडाळी माजल्यावर फत्तेसिंग व बाजीराव यांनीं एकत्र येऊन कोकणच्या सिद्दीवर चाल केली. दाभाडे, आंग्रे, गायकवाड यांना मदतीचीं पत्रें शाहूनें लिहिलीं. बाणकोट ते रेवदंड्यापर्यंचा मुलुख, उंदेरी बेट, रेवस, थळ, बाणकोट, जयगड, दाभोळ इत्यादि सिद्दीचीं ठिकाणें घेऊन मराठी राज्यास जोडणें हें मुख्य काम होतें. राजपुरी, खोकरी, तळेंघोसाळें बिरवाडी इत्यादि ठिकाणें हस्तगत करून जंजिऱ्यावर हल्ला करण्याची तयारी झाली. एवढ्यांत श्रीनिवास प्रतिनिधि यांनीं रायगड किल्ला हस्तगत केल्याचें कारस्थान

केल्यानें बाजीरावाचें मन मोहिमेंतून उडालें. हबशांना आणखी मदत मिळविण्याची संधि मिळाली; आणि मराठ्यांचे मदतनीस उदास बनले. आंग्रे, प्रतिनिधि व बाजीराव यांचे प्रयत्न चालू होते, पण मुख्य जंजिरा काबीज होण्याचें लक्षण दिसेना. हबशास इंग्रजांची मदत मोठीच मिळाली. दरम्यान सेखोजी आंग्रे मरण पावल्यानें मोहीम आणखी बारगळली. या नंतर येणारा संभाजी आंग्रे तिरसट, उतावळा व तऱ्हेवाईक असल्यानें मोहिमेस जोर चढेना. बाजीरावानें आपलें अंग या युद्धांतून काढून घेतलें. संभाजी आंग्रे यानें मोहिम चालू ठेवली. शाहू व ब्रह्मेंद्रस्वामी यांची प्रेरणा एकसारखी होतीच. चिमाजी आप्पा नव्या दमानें या लढाईत सामील झाला. शेवटीं सन १७३६ मध्यें सिद्दि साताचा पराभव झाला. शाहू व ब्रह्मेंद्रस्वामी यांना कमालीचा हर्ष झाला. "सिद्दीसात केवळ रावणासारखा दैत्य, तो मारून हबशांचा मूळ कंदच उपटून काढला" या शब्दांत विजयी वीरांचें स्वागत झालें. पुढे एकदोन वर्षांत वसईच्या मोहिमेंत मराठ्यांचा जय झाल्यानें सर्वत्र उत्साहाचें उधाण येत राहिलें. आणि हा सर्व विजय त्या वेळच्या समजुतीप्रमाणें ब्रह्मेंद्रस्वामींच्या आशीर्वादानें व पुण्याईनें मिळाला अशी भावना मराठे मंडळींची झाली यांत नवल नाहीं.

याप्रमाणें सिद्दी, पोर्तुगीझ, आंग्रे, इंग्रज इत्यादींशी मराठ्यांचे संबंध निरनिराळे आले त्यांना ब्रह्मेंद्रस्वामींची प्रेरणा होती. फिरंग्यांचा नायनाट झाला. हबशी एक लहानसा मांडलीक बनला. आंग्रे बंधूचें भांडण मात्र चालू राहिलें. संभाजी व मानाजी आंग्रे यांपैकीं शाहू व स्वामी यांचा कल संभाजीकडे होता. या सर्व वृत्तांताशीं म्हणजे कान्होजी आंग्र्याच्या उदयापासून स्वामींचा संबंध या नाहीं त्या कारणानें राजकारणाशी होता. या दीर्घ मुदतींतील स्वामींची प्रेरणा नेमकी कोणती व तिचें स्वरूप नक्की कोणतें हा वादाचा मुख्य विषय. मराठ्यांच्या मुख्य राजकारणाचा सूत्रधार ब्रह्मेंद्रस्वामी होता व जंजिरा आणि वसई या मोहिमा त्यांच्याच प्रेरणेनें लढविल्या गेल्या व यशहि स्वामींच्या पुण्याईनेंच प्राप्त झालें अशी पारसनीसांची कल्पना. राजवाडे यांना कोणतेंच मत मान्य नाहीं. राज्यकारभाराचीं वा राजकारणाचीं सूत्रें स्वामी चालवूंच शकणार नव्हता; कारण मराठ्यांच्या नंतरच्या कारकीर्दीत संयुक्त राज्यपद्धतीचें रूप राजकारणास येत राहिलें होतें. त्यावर स्वामींचा ठसा उमटणें अशक्य, कारण स्वामींच्या उदयापूर्वींच हे नवें स्वरूप राज्यपद्धतीस येत राहिलें होतें. बाजीराव व शाहू यांच्याशीं स्वामींचा पत्रव्यवहार असला तरी कोंकणखेरीजच्या इतर कुठल्याहि राजकारणावर स्वामींचा प्रभाव नव्हता असें राजवाडे यांनीं निक्षून सांगितलें आहे. केवळ आशीर्वाद देणें, अमकें झालें तें माझ्या आशीर्वादानें, अमकें गेलें तें माझ्या शापानें असें म्हणण्यामुळें सूत्रचालकत्व पदरीं पडत नसतें.

राजवाडे यांच्या मतें ब्रह्मेंद्रस्वामींनीं फार मोठी कामगिरी करावयास हवी

होती. ती म्हणजे वाढत जाणाऱ्या साम्राज्यांतील सरंजामी सरदारांना मध्यवर्ती सत्तेशीं एकनिष्ठेनें वागण्याची मनोवृत्ति बनविण्याचें. स्वामीसारख्या माणसानें हें एकी वाढविण्याचें कार्य करावयास हवें होतें. पण स्वामींनीं यांतील कांहींहि काम केलें नाहीं. उलट भांडणें लावणें, नसत्या भानगडी, कुरापती काढणें, परस्परांत वैमनस्यें पसरविणें, विश्वासघात करणें हींच कामें स्वामींनीं केलीं व पुढील महाराष्ट्राच्या विनाशाचीं बीजें पेरून ठेविलीं.[1] स्वामी नेहमी धमकी देई, आपल्या शब्दांचें सामर्थ्य वर्णी, देणग्यांची मागणी करी; पेशवे स्वामींचे शिष्य व स्वामी पेशव्यांचा सावकार अशी हीं नातीं उद्‌बोधनाच्या कामीं उपयोगी आलीं नाहींत. मराठ्यांचे आपण गुरु म्हणून मिरवावें हीच फक्त त्यांची इच्छा होती. अनेक इनामें मिळवावींत, सरदारांना भय घालावें, शाप द्यावेत, प्रतिपक्षाची निंदा करावी, दुसऱ्यांचीं गृहछिद्रें शोधावींत हींच स्वामींचीं प्रमुख कामें होतीं. राजकारणाचा सूत्रधार म्हणून तर स्वामींचें स्थान बिलकूल नव्हतें. आदर्श सत्पुरुषाचें महत्त्व मुळींच नव्हतें. राजवाडे यांनीं त्यांच्या दोषांची यादीच दिली आहे. रामदासांच्या तुलनेंत ब्रह्मेंद्र फारच कमीच आहे. उलट ब्रह्मेंद्र स्वामींचें वर्तन अनेक प्रसंगीं निंद्य, भांडखोर, अभिमानी, सन्मानाची हाव असणारें, इस्टेट करणें, अचकट विचकट शिव्या देणें, हटयोग व समाधि यांचें प्रस्थ माजविणें, इत्यादींनीं भरलेलें होतें असें राजवाडे सांगतात.[2] ब्रह्मेंद्र खुनशी, तिरसट स्वभावाचा, सुवासिक तेलें, उत्तम प्रावरणें, चमत्रमीत भोजन यांचा भोक्ता, सावकारी व व्याजबट्टा करणारा, इतर साधूंचा मत्सर करणारा, सरळ व शुद्ध लिहितां न येणारा, असा असल्यानें (राजवाडे यांच्या मतें) त्याची तुलना रामदासांशीं झाली हें त्यांना खपलें नाहीं. महाराष्ट्रधर्माचा विचार तर ब्रह्मेंद्राच्या वागणुकींत कुठेंच येत नव्हता.

पारसनीसांच्या चरित्रानें मराठी वाचकांचा गैरसमज होऊं नये म्हणून राजवाडे यांनी एवढ्या तिखट शब्दांत स्वामींचा व पारसनीसांचा समाचार घेतला. राजवाडे यांच्या या लिखाणावर पुष्कळ टीका प्रतिटीका झाली. किती झालें तरी स्वामीं मराठ्यांचे व पेशव्यांचे गुरु. त्यांची दोषपरंपरा सांगतांना राजवाडे यांनीं भाषा बेतानें वापरावयास हवी होती; नुसत्या शिव्यांच्या भडिमारानें विचार बोथट होतो व खंबीर बाजू शबलित होते हें राजवाडे यांनीं लक्षांत घ्यावयास हवें होतें, असाहि टीकेचा एक सूर होता. तसें पाहिलें तर ब्रह्मेंद्र स्वामींच्या नादी लागणारे सर्व मराठमंडळच होतें. सर्वांच्या गुरुस्थानीं असणाऱ्या या महंताबद्दल त्यावेळच्या लोकांना काय वाटत होतें हें पाहणें महत्त्वाचें आहे. राणी सगुणाबाई व सकवारबाई, विरुबाई, राधाबाई पेशवे, मथुराबाई व लक्ष्मीबाई आंग्रे, उमाबाई दाभाडे,

१ ऐतिहासिक प्रस्तावना: पृष्ठ, १८४

२ कित्ता: पृष्ठ, १९४

राजसबाई निंबाळकर, गौतमाबाई होळकर इत्यादि थोर घराण्यांतील स्त्रियांचीहि स्वामींवर निष्ठा होती. त्यांच्या अलौकिक सामर्थ्यावर सर्वांची श्रद्धा होती. भिक्षेच्या वेळीं स्वामी सरदारांकडून द्रव्य घेई, पण त्याचा उपयोग स्वतःसाठी फारसा न करतां परोपकार व जनतेच्या सुखसोयी यांकडे ते करीत. प्रसंगीं मराठ्यांना कर्ज मिळे. हबशांच्या व वसईच्या संग्रमांत स्वामींचें उत्तेजन व आशीर्वादात्मक वचन सर्वांनाच पुरें होई. स्वतः बाजीराव स्वामींचा सल्ला अनेक प्रसंगीं त्यांना विचारीत असे. वसईच्या मोहिमेनंतर बाजीराव सन १७४० मध्यें वारल्यावर ब्रह्मेंद्रस्वामीनें चिमाजीस विचारलें ' बाजीवासारखा शिष्य गेला; याउपर मुलखांतून जावें किंवा प्राण सोडावा, काय करावें तें लिहिणें. ' यावर चिमाजीने लिहिलें, ' आजपावेतों कृपाकटाक्षें पाहत आहां, तैसेंच स्वस्थ चित्तें राहाल तर चि. रा. नानास बाजीरायाची जागा आहे. स्वामीची कृपा मस्तकीं असलियावर यापेक्षां अधिकपणें शिष्याचें नांव राखील. उमेद तों आमची या प्रकारची आहे. सर्व हिंमत स्वामीच्या आशीर्वादबळाची आहे. स्वामींनीं नानावर, आम्हांवर, सर्व बाळकांवर नजर देऊन संतोषरूप राहावे. आशीर्वाद असल्यावर काय न्यून होणार ! सर्व प्रकारें उर्जितच होईल ' १

पुढें नानासाहेबास पेशवाईचीं वस्त्रें मिळावींत म्हणून स्वामींचे आशीर्वाद आहेतच. परंतु नानाचें व स्वामीचें फारसें जमलेलें दिसत नाहीं: कांहीं दिवसांनीं स्वामींचा कारभारी चिमणजी भागवत व चिमाजी आप्पा हे दोघेहि निवर्तल्यावर स्वामी उदास झाले आणि सन १७४५ च्या श्रावण शु. ९ रोजीं ते निजधामास गेले. त्यांच्या शिष्यांनीं धावडशीस मोठ्या थाटानें त्यांचा अंत्यसंस्कार केला. शाहूनें मोठें मंदिर बांधण्यास सुरुवात केली. स्वामींवर साऱ्यांची निष्ठा या प्रकारची होती. स्वामींनीं पैसा मिळवला. नुसत्या भिक्षेवरच त्यांना वर्षाचे सोळा हजार रुपये मिळत असत. पण त्यांनीं ते मंदिरें, विहिरी, तलाव, सडका, पूल वगैरे बांधण्यांत खर्च केले. यवत जवळ भुलेश्वराचें देऊळ स्वामींनींच बांधलें. त्यामुळें राजवाडे यांनीं केलेले आरोप अतिरेकाचे होते असेंच म्हणावे लागेल.

स्वामींचे शब्दलाघव अपार असावें. मराठ्यांना व पेशव्यांना कर्ज देणाऱ्या स्वामीनें बाजीरावापाशी पैशाचा तगादा लाविला. त्यावेळीं उत्तर हिंदुस्थान जिंकावयास निघालेला बाजीराव स्वामीशीं किती नम्र होता हें पाहण्यासाठी व स्वामींचें वास्तविक कर्तृत्व किती होतें हें ध्यानांत येण्यासाठीं एक पत्र येथें संक्षेपानें देतां येण्यासारखें आहे. बाजीराव लिहितो.

" बाबा, आम्हांस काय चिंता आहे ? तुम्ही जालेत गोसावी आणि

१– गो. स. ससरदेसाई: मराठी रियासत ५, सन १९४२

आम्हांकडे प्रपंच लाविला. त्या प्रपंचामुळें आम्हीं जोड इतकीच केली कीं, " वीस लाख रुपये कर्जदार जालों. कर्जदारांचे नरकांत कुजतों इतकेंच मिळवलें. या दुःखास्तव गतवर्षी पिंपरीस आलों तेव्हां सारें तुमच्या हवालीं करून मोकळें होऊन देवाची सेवा करावी हा हेतु धरून स्वामीस विनंति केली. स्वामी कृपाळू होऊन आश्वासन दिल्हें, कीं " भार्गव तुझें ध्यानीं आहे, फत्ते तुझी होईल व पैकाहि उदंडसा मिळोन कर्ज फिटेल. सर्व साह्यकारी भार्गव आहे. " तेवढें वचनावर दृष्टि देऊन होतों. त्यास चिरंजीव तुझा तिकडे गेला होता. यश मात्र थोडेंबहुत आलें. पैका न मिळाला. लष्करचे हाल श्रीरंगपट्टणचे वेळेस जाले होते तसेच झाले. आपण या गोष्टीचा शोध करावा. आतां नित्य उठोन कर्जदारांचे पायां पडावें. शिलेदारांचे पायां पडतां पडतां कपाळ छिनत चाललें. आतां हीं सुखें आम्हांस नकोत. तुम्ही या आणि आपला कारभार सांभाळा. अगर टाकून उठोन येतों. वरकड तुम्ही आपल्या पैक्यासाठीं लिहिलें तरी स्वामींनीं कांहीं चिंता न करावी. आमचा जीव आहे तों पैकियाची काय चिंता आहे ? कोणे समयीं पैका पाहिजे तें आम्हांसही कळतें. पैका पावतां करूंच. आतां प्रस्तुत तों आमचा जीवच मात्र आहे. तो येथें येऊन घेणे अगर तेथें बोलावशील तरी सर्व संग टाकून येतों. तुम्ही थोर देवा. तुम्हांस वचनास धरावें तें वचन खरें न जालें म्हणून आम्ही लेकरांनीं तुमची रड तुम्हांपाशीं रडावी आणि रडतियाची अशी तुम्ही पुसोन परिणाम त्याचा करावा तो कराल. तुमचें झाड लाविलें, तोडाल तरी आतां तोडा; वाढवाल तरी वाढवा. या गोष्टीस नादर कोण आहे ? तुमचे दबवणीस आम्ही कां भिऊं ? मारशील तरी तूंच, बाबा, मारशील. यातहि कीर्ती तुझीच आहे. आणि आम्हां लेकरांचे लडिवाळ चालवून कीर्तिरूप होसील तरी तूंच होसील; आम्ही तो कर्जदारांचे नरकांत बुडालों. तुझें वचनावर अबंदाचे सालीं जर मला कर्ज व राजा व लोक यांचे देणियापासून मुक्त करशील यास्तव देवाजवळ आमचा प्राण देऊं. आम्हांस लेकरांस मुक्त कराल ऐसें वचन अभयपूर्वक आलिया एवढे आठ माहिने आणीक जीव धरून पाहूं. यांत जर आम्हीं कृत्रिम लिहिलें असेल तरी आम्हांस तुझीच शफत असे. काय तें उत्तर लवकर पाठविणें. तैसीच तजवीज करूं. तूं देव कैसा कीं आमची कृत्रिमता किंवा निर्मळता न कळे. ध्यानांत येईना तेव्हां आम्हींच प्राक्तनाचे गाढे. आमचें कपाळ फुटलें ! तुमचा कोप आम्हां गरिबांवर कशास ? जे दुष्ट असतील त्यांजवर करा कीं ! तेणेंकरून प्रजा सुख पावे. आज दाभाडे, गायकवाड, बांडे, कोटी कोटी रुपये खजिने, आणि मीन आम्हीं तुझे पायापाशीं व धन्याचे पायाशीं निष्ठेनें वर्ततों ते

अन्नास महाग जालों! त्यांत आम्ही चिपळुणे, तुझें वाढविलें. लाज तुला असावी. लाज धरशील तरी त्यांजवर कोप करा, आणि आमचें उर्जित करून, राहिलें ब्राह्मणाचें काम करून घ्या. नाहीं तरी आम्हांवरी कोपराग कशास पाहिजे? आपले स्वाधीन करून घे आणि आम्हांस मुक्त कर. आणीक एखादा देव पाहून सेवा करूं. पिंपरीसच बोलिलें आहां कीं, "माझा राग तुजवर होणार नाहीं. कदाचित् रागें भरलों तर चालणार नाहीं." त्यास आतां लिहिलें कीं, "पिंपरीस मरत होतों. ज्वरानें शुद्ध नव्हती. ते बोलीं प्रमाण नाहीं" तरी मरत होतास तरी रात्रींच माझे रक्षणास कैसा आलास? ह्या गोष्टी कैशास लिहितां? जर आम्हीं उमगतों न, तरी त्वां भार्गवच साक्ष असेल. आतांच उठोन संन्यासी होऊन एखादे-कडे उठोन जावे ऐसें वाटत नसेल तरी भार्गवाची शफत आहे. परंतु मागती कांहीं विवेक करून धीर धरून पाहतो. जर धीर धरवेल तरी धरवून पाहूं. नका म्हणाल तरी आम्हीं तों सिद्धच आहों. सेवेसी श्रुत होय. हजार रुपये सातान्याहून धावडशीस पावते करणें म्हणून पूर्वीचं खङ्कें अगोदर दोन दिवस पत्र लिहून पाठविलें आहे. पावले असतील अगर पावतील.[1]

ब्रह्मेंद्र स्वामींबद्दल वाटणारे हें प्रेम केवळ दिखाऊ आहे असें कसें म्हणतां येईल? स्वामीसहि आपल्या भक्तांचा जिव्हाळा अपार असाच होता. चिरंजीव रघुपति, विजयीभव रघुनाथजी, मन निर्मल गंगाजल, आचारें पुण्यशील भक्तराज, भार्गवसेवक, धीररघुनाथाचा सेवक, सहस्त्रायु, सत्यवक्ता अशा प्रकारचीं गौरवाचीं संबोधनें स्वामी बाजीराव व चिमाजीआप्पा यांना पत्रें लिहितांना वापरीत. लोकांच्या सोयी व्हाव्यात, देवधर्मांचें रक्षण व्हावें असेंच स्वामींस वाटे. 'स्वामी देवालयें, वापी, कूप, तडागे, झाडझाडोरा लावतात हें कीर्ति अक्षय करिजेली यापेक्षां उत्तम काय आहे? आम्हांस या गोष्टीचा परम संतोष आहे' असे उद्‌गार स्वामींविषयी शाहूनें काढले आहेत. एकंदरीत पाहतां स्वामींचें वर्तन राजवाडे यांनीं ज्या कठोर व निंदात्मक शब्दांनीं वर्णन केलें आहे तितकें वाईट खासच नव्हतें. एवढें मात्र खरें कीं स्वामींच्या पारमार्थिक वा आध्यात्मिक अधिकाराचा उल्लेख कुठेंच नाहीं. सद्विचारांच्या प्रसारासाठीं स्वामींची ग्रंथ-रचनाहि नाहीं. याचा अर्थ असा कीं रामदासासारख्या विचारी सत्पुरुषाच्या तुलनेनें मात्र स्वामींचें महत्त्व निःसंशय कमीच मानावें लागेल. रामदासाची योग्यता ब्रह्मेंद्रस्वामीस नाहीं. मनुष्यस्वभावाचें व जगाचें ज्ञान आणि राष्ट्रोद्धरणास लागणारें साहित्य व नैतिक सामर्थ्य जसें रामदासास अवगत होतें तसें ब्रह्मेंद्रस्वामीस नव्हतें.

१– ब्रह्मेंद्रस्वामी पत्रव्यवहार, ले. ३२

रामदासांसारखे निःस्वार्थी राष्ट्रपुरुष क्वचित् काळीं निर्माण होतात. तेव्हां त्याज-बरोबर ब्रह्मेंद्राची तुलना करणें युक्त होणार नाहीं. ……… साधु पुरुष तपः-सामर्थ्यानें अघटित कृत्यें करूं शकतात आणि त्यांच्या आशीर्वादाशिवाय आपलें चालावयाचें नाहीं, अशी भावना त्या वेळीं बहुतेक लहानथोर पुरुषांची होती. विशेषतः सांसारिक व्यक्तींना कोणी तरी गुरु हा असेच; आणि त्याच्या आज्ञेनें ते वर्तन. अशा सामान्य साधूंपैकींच ब्रह्मेंद्रस्वामी होता. त्यास राष्ट्राची किंवा राजकारणाची जाणीव नव्हती. आपल्या शिष्यांचें कल्याण चिंतून त्यांजकडून महत्कृत्यें करवावीं व त्यांत आपलाहि ऐहिक मनोरथ साधून घ्यावा, अशी या सामान्य साधूंची प्रवृत्ति असते."[1] हा एका थोर इतिहासलेखकाचा अभिप्राय या प्रकरणीं अधिक समर्पक म्हणावा लागेल.

राजकीय उलाढालींना वा प्रसंगीं महत्त्वाच्या हालचालींना आशीर्वादात्मक पाठिंबा देणें एवढाच स्वामींचा राजकारणाशीं संबंध आणि तोहि कोंकणपुरता होता. वसईच्या मोहिमेंत स्वामींचें विशेष अंग असून ती त्यांच्या सूत्रचालनानें व प्रोत्साहनानें यशस्वी झाली असें पारसनीस म्हणतात. पण अभ्यासकांच्या मतें "ही सर्वथा गैरसमजूत आहे. पत्रव्यवहारावरून तरी आशीर्वाद देण्यापलीकडे या मोहिमेंत स्वामींचा कांहींही कार्यभाग नाहीं. वसईवर निशाण चढल्यावर आप्पासाहेबांनीं फार गौरवपूर्वक शाहू महाराजांस लिहिलें कीं, वसई घेतल्यामुळें महाराजांची कीर्ति समुद्रवलयांकित पृथ्वींत प्रफुल्लित झाली–" हे जसे शब्द नुसते आदरार्थी शब्द आहेत तसेच आप्पासाहेबांचे स्वामींविषयीं आहेत. "तुम्हीं गोमूत्र घेण्याचेंहि सोडून दिलेंत. अनुष्ठान केलेंत व वसई दिली दिली दिली म्हणून त्रिवार सांगितलेंत. त्यामुळें वसई हातीं आली ' हे शब्द केवळ गौरवपर आहेत. अनुष्ठानानें वसई हातीं आली असेल तर स्वामींसारखाच पेशव्यांचा दुसरा गुरु नारायण दिक्षित पाटणकर तोही ब्राह्मण लावून वसईकरितां अनुष्ठान करीत होता व आप्पासाहेबास उत्साह व आशीर्वाद देत होता. तोहि गुरु आणि हाही गुरूच. सारांश, स्वामी मोठा असेल आणि पेशव्यांची त्यावर कदाचित अनन्यभक्तीहि असेल. पण मोहिमेच्या बाबतींत पत्रव्यवहारावरून पाहिलें तर स्वामींकडे कांहीएक कर्तृत्व जात नाहीं. तसें म्हणणें पारसनीसांच्या साधुभक्तीला शोभेल. त्यांच्या इतिहास भक्तीला शोभणार नाही."[2]

वरील दोन समतोल अभिप्राय पाहतां असें म्हणावें लागतें कीं राजवाडे स्वामींस जितका दोष देतात तितकें त्यांचें वर्तन राष्ट्रविघातक झालेलें नाहीं. आणि पारसनीस लिहितात तितक्या श्रेष्ठ प्रकारचें कर्तृत्व त्यांचेळवळ नव्हतें. राजकारणाशीं

१– गो. स. सरदेसाई : मराठी रियासत ५ : पृष्ठ २४५ सन १९४२

२– य. न. केळकर : वसईची मोहीम, पृष्ठ ७

संबंध तर स्वामींचा जपून जोडला पाहिजे. 'आपलें व्याज वसूल करण्यास सरकारी अंमलदारांचा उपयोग करणें,आपला रोष असलेल्या इसमास शिक्षा करविणें, आपल्या भक्तमंडळीस गुन्ह्याबद्दल झालेल्या शिक्षा माफ करविणें, वतनें व नेमणुका यांच्या घालमेली करणें, भिक्षेच्या व दक्षणेच्या नांवाखाली पैसा उकळणें, जकातीची माफी करणें अशीं कितीतरी कृत्यें नियमित राज्यकारभाराशीं विरोध असलेलीं स्वामींकडून झालीं. अर्थातच स्वामींचा हा उद्योग पुढे नानासाहेबास खपलेला दिसत नाहीं.

स्वामींचें वर्तन आणखी एक दृष्टीनें गैर दिसतें. स्वामीनें निरिच्छ असावें, लौकिकाचा वा ऐहिकाचा लोभ त्यास नसावा. आलेला पैसा जरी स्वामींनीं लोकोपयोगाकरतां खर्च केला तरी त्यांचीं पत्रें एकसारखीं कशाची ना कशाची तरी मागणी करतांना दिसतात. एखादा सद्विचार वा आध्यात्मिक बोल त्यांत दिसणार नाहीं. सारखी पैशाची, व्याजाची, देणगीची मागणी! तुळया, वासे, लाकडें, पानें, झाडें, घोडे व घोड्या, घंटा, चुना, लवंग, साखर, जायफळ, तूप, गूळ, मध, औषधि, हेमगर्भ, नारायण तेल, कृष्णागर, दुलया, दुपटा, पासोडी, मखमल, साड्या, शालजोड्या, किनखाब, पातळ, चांदणी, नीलवर्णी तापता, शालू, मोत्यें, हस्तिदंत, अपूर्ववस्त्र, नळे चंद्रज्योति, म्हैस यांसारख्या असंख्य वस्तूंची एकसारखी मागणी करून स्वामींनीं आपला प्रपंच थाटलेला पाहून आश्चर्य वाटतें. कदाचित् या साऱ्या वस्तु आपल्या असंख्य अशा भक्तांच्या ऐहिक वर्धनासाठीं असतील. 'सारांश, भिक्षेवर सधन झालेलें व समग्र वस्तुजातानें भरलेलें हें स्वामींचें संस्थान ऐहिक थाटास सर्वथैव शोभणारें होतें. मात्र स्वामींचें स्वतःचें आचरण निष्कलंक असून वरील वस्तूंचा उपयोग केव्हांहि असन्मार्गाकडे झालेला नाहीं, आणि स्वामीनें आपल्या पैशाचा अगर वजनाचा उपयोग अनीतीकडे केव्हांहि केलेला नाही. युद्धप्रसंगीं स्वामी पेशव्यास प्रासादिक पोषाख पाठवी, त्यास तो वज्रकवच म्हणे आणि तें घालून लढाईस जावें असें सांगे." [१]

स्वामींच्या कर्तृत्वाचीं भलींबुरीं अंगें हीं अशी आहेत. त्या वेळीं लक्षांत राहील असा कोणीच श्रेष्ठ पुरुष नजरेंत नसल्यानेंहि स्वामींचें माहात्म्य वाढलें असेल. पण एवढें मात्र खरें की समकालीन लोकांना स्वामींचा आधार मोठाच वाटत होता. म्हणूनच त्यांच्या आशीर्वादानें व पुण्याईनें मराठ्यांस यश मिळत गेलें ही समकालीन समजूत खरी मानली जावी अशा अर्थाचे लेख राजवाडे यांच्या तिसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेच्या प्रसिद्धीनंतर लिहिले गेले. रामदासांवरील भक्तीमुळें राजवाडे सात्विक संतापाच्या भरांत स्वामींवर अपशब्दांचा वर्षाव करून गेले हे खऱ्या इतिहासकारास शोभणारें खचित नाहीं. इतिहासकारानें कोणताहि पूर्वग्रह करून घेऊ नये हा

१–गो. स. सरदेसाई : मराठी रियासत ५ पृष्ठ २४९, सन १९४२

त्यांचाच सिद्धान्त त्यांच्या ध्यानांत राहिलेला येथें दिसत नाहीं. त्यांचे अनेक मुद्दे बरोबर असूनहि अपशब्दात्मक भाषेमुळें त्यांचें लेखन त्यांच्या हेतूबद्दल संशय निर्माण करणारे झाले. स्वतः राजवाडे यांना देखील शांत मनानें आपला ब्रह्मेंद्रावरील व पारसनीसांवरील हल्ला पुष्कळ सौम्य करतां आला असता; असा विचार राजवाडे यांनाहि सुचण्याचा प्रसंग एकदा आला.

इतिहासविषयक सामग्री शोधण्यासाठीं राजवाडे कोंकणच्या प्रवासास निघाले. चिपळूण व परशुरामक्षेत्र येथील कागदपत्र त्यांनीं तपासले. परशुरामक्षेत्रींचें श्रीभार्गवरामाचें मंदिर व तें ज्या स्थलीं आहे तें स्थळ पाहून राजवाड्यांना परम संतोष व आनंद झाला. त्यांच्याबरोबर असलेल्या दत्तोपंत नांवाच्या गृहस्थांशीं त्यांनीं पुढीलप्रमाणे उद्गार काढले, ‘ दत्तोपंत, येथें फार सुंदर वातावरण आहे. अभद्र विचार मनांत यावयाचेच नाहींत. इतका वेळ स्वस्थ बसून मी विचार करतों तों मनांत चांगलेच विचार आले. ब्रह्मेंद्राचे मनांत असेच सद्विचार येत असले पाहिजेत ’! [१]

१– भा. वा. भट : राजवाडे चरित्र, पृष्ठ १८९, सन १९४६

७: राजवाड्यांचें इतिहाससंशोधन : शहाजीचरित्र

राजवाडे यांच्या इतिहाससंशोधनांतील एक महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांनीं संपादित केलेला जयराम पिंडेविरचित 'राधामाधवविलासचंपू' हा ग्रंथ होय. या ग्रंथाच्या निमित्तानें राजवाडे यांनीं एक विस्तृत प्रस्तावना लिहून त्यांत प्रारंभींच्या विभागांत शहाजी राजांच्या चरित्राची विस्तारानें चर्चा केलेली आहे. बृहदीश्वराच्या देवालयांतील शिलालेख, शिवदिग्विजय, शिवाजीप्रताप, बसातिने सलातीन व सानेकृत शहाजी महाराजांची कैफीयत यांसारख्या उपलब्ध साधनांवरून व जयराम पिंडेकृत वर्णनावरून त्यांनीं शहाजीराजे यांच्या चरित्रांतील अनेक धागेदोरे एकत्र गुंफून साधार व विस्तृत असें शहाजीचरित्र मराठींत प्रथमच स्वतंत्र रीतीनें सिद्ध केलें.

राधामाधवविलासचंपू हा ग्रंथ राजवाडे यांना चिंचवड येथील विष्णुपंत रबडे यांच्या घरीं तिसऱ्या मजल्यावर पोथ्यांच्या व कागदपत्रांच्या अस्ताव्यस्त गळाठ्यांत कुजत पडलेला आढळला. ही पोथी मूळची ५६ पानांची होती. पोथीचा कागद जुना जुनरी असून पानाचें आकारमान ९½"×४" असें होतें. प्रत्येक पृष्ठावर नऊ ते बारा ओळी व प्रत्येक ओळींत चाळीस ते पंचेचाळीस अक्षरें होतीं. सबंध पोथी एका हातानें, एका शाईनें लिहिलेली असून पोथीचा लेखक मनोहर लक्ष्मण पुराणिक या नांवाचा होता. ही पोथी मनोहर पुराणिकानें लिहिली कीं कुणी दुसऱ्यानें लिहिलेली त्याच्या संग्रहांत आली याबद्दल राजवाड्यांच्या जवळ नक्की पुरावा नाहीं. साक्षेपी संशोधकाच्या दृष्टीस अनुसरून प्रथम राजवाडे यांनीं मनोहर पुराणिकांचा तपास केला आहे. भीमेच्या काठीं असणाऱ्या खेड गांवचा हा राहणारा असून पहिल्या बाजीरावाच्या वेळीं तो चिंचवड येथें आला असावा. हा पुराणिक संस्कृत, प्राकृत भाषांशीं हा चांगला परिचित असून मोठा व्युत्पन्न असा होता. चिंचवडग्रामीं असणाऱ्या या मनोहर पंडिताच्या संग्रहांत आलेली राधामाधवविलासाची पोथी राजवाडे यांच्या मतें शक १६०० सुमारास तयार झाली असावी. सर्वांत जुनी पोथी शहाजी राजे यांची राजधानी बंगळूर येथें लिहिली गेली. स्वतः शहाजीराजे यांनीं या पोथीचें श्रवण केलें होतें. शहाजी राजे शेवटीं बंगळूर येथें राहात असत. त्या वेळीं त्यांच्या आश्रयास आलेल्या जयराम पिंडे यानें हा ग्रंथ राजास ऐकविला. शक १५८० च्या सुमारास या ग्रंथाची रचना झाली असावी. ग्रंथकर्ता जयराम पिंडे हा सप्तशृंगीच्या समोरील मार्कंड्याच्या डोंगरांतील एका गांवचा राहणारा. कवीच्या बापाचें नांव गंभीरराव,

आईचें नांव गंगाबाई. शहाजीराजांनीं बंगळूर प्रांतीं निर्माण केलेल्या राज्याची कीर्ति ऐकून जयराम पिंडे त्या प्रांतीं गेला. पिंडे अनेक भाषाकोविद असून शीघ्र कवित्वांतहि तरबेज होता. चंपूचे दहा उल्लास आणि शेवटीं परिशिष्ट असे अकरा भाग आहेत. पहिल्या पांच उल्लासांत संस्कृत काव्याच्या धर्तीवर जलक्रीडा, पुष्पशय्यारिरंसा, नखशिखा, षडर्तु व चंद्रोदयसूर्यास्तमय इत्यादि विषयांचा प्रपंच आहे. उरलेल्या भागांत शहाजीचरित्राचा थोडक्यांत विस्तार केलेला आहे.

शहाजी राजांच्या दरबारांत आणखी कवि कोण होते, त्यांनीं कोणत्या समस्या घातल्या, त्यांचें पूरण जयराम पंडितानें कसें केलें यांचाहि उल्लेख ग्रंथांत आहे. शिवराय गोस्वामी, वीरेश्वर वैद्य, मल्लारिभट्ट पुरोहित, नारोपंडित दीक्षित, नरहरि कवीश्वर, नीळकंठभट्ट श्रोत्रिय, प्रल्हाद सरस्वती, शेष पंडित, अभेद गंगाधर, जनार्दन पंडित, रघुनाथ व्यास, लाछिराम इत्यादि साठाच्यावर कवींचा उल्लेख जयराम पंडितानें केला आहे व राजवाडे यांनीं यांतील प्रत्येकाची ऐतिहासिक ओळख करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. शक १५७५ ते १५८० पर्यंतच्या काळांत शहाजीराजे यांचें ऐश्वर्य किती श्रेष्ठ प्रकारचें होतें याचाहि नमुना प्रस्तुत काव्यांत मिळण्यासारखा आहे. जयरामकृत शहाजी राजे यांची दिनचर्या खास हिंदु परंपरेंतील आहे.

एवढा प्रारंभीचा भाग वर्णन करून झाल्यावर राजवाडे यांनीं शहाजीराजे चरित्रावर भर दिला आहे. शहाजी राजे यांच्या चरित्रांतील महत्त्वाच्या प्रसंगाची नोंद घेऊन, त्यांची संगतवार जुळणी करून राजवाडे यांनीं जे कांहीं महत्त्वाचे निष्कर्ष काढले त्यांतील एक वादग्रस्त असलेला मुद्दा असा कीं शिवराजकृत स्वराज्याचा फार मोठा वाटा शहाजी राजे यांच्याकडे जावयास हवा. शहाजी हा शिवाजीचा पूर्वावतार, त्याच्या कर्तबगारीवर शिवाजीच्या कार्याची इमारत उभी आहे. कधीं निजामशाहीची, कधीं आदिलशाहीची, कधीं मोंगलाची ताबेदारी पत्करून मोठमोठे संग्राम जिंकणारा शहाजी हा एक परकीय सत्तेचा निष्ठावान नोकर म्हणून वरवर दिसत असला तरी त्याच्या अंतर्यामीं स्वराज्याची, हिंदुराज्याची लालसा होतीच होती असा राजवाडे यांचा निष्कर्ष आहे. जयराम पिंडे यांच्या आधारानें राजवाडे यांनीं असें सिद्ध केलें आहे कीं स्वराज्य स्थापून स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा, स्वजन यांचें पालन, लालन व संरक्षण करणें हेंच शहाजीचें धोरण व जीवितकार्य होतें.[१] राजवाडे यांचा हा निष्कर्ष आजवरच्या समजुतीच्या विरुद्ध होता. शिवाजी राजे यांनीं स्वराज्य, स्वधर्म, स्वदेश यांची जोपासना केली, शहाजी राजे यांनीं फक्त पातशाहीची ताबेदारी पत्करून भाकरीसाठी चाकरीची सोय सतत पाहिली. संस्कृत-प्राकृत भाषांना आश्रय प्रथम शिवाजीराजांनीं दिला. मराठे लोकांच्या अंगीं माणुसकी

१– राधामाधवविलास चंपू : प्रस्तावना, पृष्ठ १००-१०१

प्रथम शिवाजीनें निर्माण केली, परंतु राजवाडे यांच्या मार्मिक व विवेचक प्रस्तावनेमुळें शहाजीच्या चरित्रास फार मोठा उजाळा मिळाला व शहाजीचें कर्तृत्व उठून दिसूं लागलें. शिवाजीनें जें जें केलें त्याचा प्रारंभ कधीं सुप्त वा कधीं प्रकट अवस्थेंत शहाजीच्या चरित्रांत दिसून येतो असें राजवाडे यांनीं सप्रमाण दाखवून दिलें आहे.

यासाठी राजवाडे यांनीं शहाजी राजे यांच्या चरित्राचे सर्व धागेदोरे तपासून पाहिले. नांव, आडनांव, कुल, गोत्र, वंश, वर्ण, मातृपितृनामें यांचीहि कसून चौकशी त्यांनीं केली. संभाजी भोसले, मालोजी भोसले या परंपरेचाहि त्यांनीं शोध घेतला. मालोजी शके १५४३ मध्यें मृत्यु पावल्यावर त्याची सर्व जहागीर व सैन्य यांची ताबेदारी शहाजीकडे आली. येथपासूनच्या चाळीस बेचाळीस वर्षांच्या कारकीर्दीचे चार ठळक विभाग राजवाडे यांनीं मानिले आहेत. प्रथम शक १५४३ पासून १५५० पर्यंतच्या काळांत शहाजी राजे मलिक अंबरचे हस्तक म्हणून निजामशाहींत होते. त्यानंतर शके १५५८ मध्यें निजामशाहीचा अंत झाला येथपर्यंतचा कालखंड या काळांत शहाजीचें सामर्थ्य वाढीस लागलें, व त्यामुळेंच निजामशाही कांहीं काल तग धरूं शकली. तिसऱ्या विभागांत शके १५५८ पासून १५७० पर्यंतची बारा वर्षें शहाजी आदिलशाहींत नोकरीस होता. या कालखंडाच्या शेवटीं शेवटीं शहाजीचा जम कर्नाटकांत चांगल्यापैकी बसला. याच वेळेस तो प्रथम स्वतंत्र व मुखत्यार असा महाराज बनला. चौथ्या कालखंडांत शहाजी कर्नाटकांत स्थिर झाला. या पंधरा वर्षांत शहाजीचें वागणें स्वतंत्र राजाप्रमाणें होतें. शहाजीच्या चरित्रांतील या प्रमुख विभागांचें विस्तृत वर्णन राजवाडे यांनीं दिलेंच आहे, पण तें अधिक साधार व रेखीव व्हावें म्हणून त्यांनीं तत्कालीन राजकीय स्थितीचें स्थूल चित्रहि मोठ्या मार्मिकपणें रेखाटलें आहे. तत्कालीन हिंदु सरदार, रानटी अनार्य, मुसलमान, निजामशाही, आदिलशाही, उत्तरेंतील मोंगलशाही यांची राजवाडे यांनीं सविस्तर चर्चा करून या पार्श्वभूमीवर शहाजीचें चरित्र उभें केलें आहे.

आणि एवढ्या मोठ्या विस्तृत पार्श्वभूमीवरील विवेचनानंतर राजवाडे शहाजीच्या ध्येयाची, धोरणाची चिकित्सा करण्यास प्रवृत्त झाले आहेत. प्रथमच त्यांनीं सांगून टाकलें आहे कीं शहाजीला आदिलशहाची चाकरी मनापासून आवडत होती असें नाहीं. "स्वतंत्र संस्थान पुनरुज्जीवित करून त्याची वजिरी मुखत्यारीनें ज्यानें नुकतीच केली, वजिरी करतां करतां स्वतःच राज्याधिकार बळकावून स्वतःच हिंदु राज्य स्थापण्याची ज्याची ईर्ष्या, लहानगा मूर्तिजा दरबारला भितो ह्या मिषानें तख्तावर त्यास घेऊन बसण्याचा परिपाठ पाडून दरबाऱ्यांच्या नजरेला हिंदु राजा तख्तावर बसलेला पाहण्याची संवय ज्यानें लाविली त्या मुत्सद्याला व सरदाराला दुसऱ्याच्या दरबारी चाकरी करण्यांत भूषण वाटणें शक्य नव्हतें. केवळ

अपरिहार्य प्रसंग म्हणून आदिलशाही चाकरी शहाजीनें पत्करिली "[1] एवढा निष्कर्ष काढून राजवाडे थांबत नाहींत तर शहाजीचा सरंजाम पुढें शिवाजीस कसा उपयोगी पडला, दादाजी कोंडदेव, सोनोपंत, नीळकंठराव इत्यादि विश्वासांतील मुत्सद्यांचा उपयोग पुण्याकडील राजकारणास कसा झाला, कर्त्या व पोक्त अशा जिजाबाईनें शहाजीपासून प्रेरणा कशी मिळविली, शहाजी सुद्धां शिवाजीस प्रोत्साहन कसें देत असें इत्यादि बाबींची चर्चा राजवाडे यांनीं आपल्या निष्कर्षास परिपुष्ट होईल अशाच रीतीनें केली आहे.

शहाजीनें स्वराज्य निर्माण करण्याचे प्रयत्न कसे केले व शिवाजीच्या उद्योगास पाठबळ कसें दिलें याबद्दल अनेक दाखले राजवाडे यांनीं या प्रस्तावनेंत दिले आहेत. राजवाडे यांच्या मतें " शहाजीनें शिवाजीशीं बोलण्यांत दोन भाषा वापरल्या. चार लोकांसमक्ष बोलतांना, आदिलशहाशीं चाकर या नात्यानें प्रामाणिकपणें वागावें म्हणून तो शिवाजीस उपदेश करी व एकांतांत आदिलशहा व मोंगल यांच्याशीं वेळ पडल्यास देशकालवर्तमान पाहून दोन हात करण्यास चुकूं नये म्हणून स्वच्छ सल्ला देई. "[2] शहाजी व शिवाजी यांची शकें १५८३ मध्यें जेजुरी येथे झालेली भेट ही उभयतांच्या मनोमीलनाची व परस्परपूरक साह्याची निदर्शक अशी आहे. राजवाडे यांनीं या भेटीचें रसभरीत वर्णन केलें आहे, "शके १५५९ त पुणें प्रांताला रामराम ठोकून कर्नाटकांत आल्याला शहाजीला १५८३ त चोवीस वर्षे म्हणते तब्बल दोन तपें होऊन गेलीं होतीं. त्याच्या मनांत आपल्या जहागिरीचें व जिजाबाईचें व आपल्या नुकत्याच जन्मलेल्या नातवाचें व इष्टमित्रांचें व कुलस्वामी जो शिखरशिंगणापूरचा शंभुमहादेव त्याचें व कुळस्वामिणी जी तुळजापूरची भवानी तिचें दर्शन घेऊन, तीस वर्षांपूर्वी ज्या प्रदेशांत त्याचा कांहीं काल गेला त्या बेदर, आवसें, धारूर, बीड, परंडा वगैरे प्रांतांवर तुळजापुरच्या टेकाडावरून नजर फेकून, तो पंढरपुरावरून शिखर शिंगणापुरास गेला. शिखर उतरून आपले संबंधी जे फलटणचे निंबाळकर त्यांना दर्शन देऊन, शहाजी शिवाजीच्या राज्यांत शिरला. जेजुरीस भेटीचा बेत ठरला. शिवाजीस घटके घटकेची बातमी होतीच. त्यानें शके १५७५ त शहाजी कडून शिवराजाच्या दरबारी आलेल्या मोरो त्रिमळ पिंगळे यास पुढें पाठविलें व वडिलांस अत्यंत समारंभानें वाजतगाजत खंडोबाच्या देवालयांत आणून उतरविलें. पितापुत्रांच्या भेटीस बारा आणि बारा चोवीस वर्षे होऊन गेलेलीं, सबब शास्त्रविधीनें भेट घेणें प्राप्त झालें. शिवाजीराजे व सौभाग्यादिसंपन्न वज्रचुडेमंडित जिजाई आऊ साहेब व सईबाई व पुतळाबाई आदिकरून खाशी मंडळी बाल संभाजी

१ – राधामाधवविलास चंपू : प्रस्तावना पृष्ठ, ७९.

२ – कित्ता: पृष्ठ, ८९-९०

राजासह आधींच मंदिरांत जाऊन शहाजी महाराजांची मार्गप्रतीक्षा करीत बसली होती. महाराज येतांच राजोपाध्ये यांनीं श्रीणीं पूजा यथासांग करवून, सघृत अशा काश्याच्या ताटांत स्त्री, पुत्र, स्नुषा व पौत्रै यांचीं मुखें शहाजी महाराजांकरवीं एकावच्छेदेंकरून पहाविलीं. नंतर भेटी झाल्या. शेकडों लढायांत हजारों जीवांचा संहार करण्यानें ज्यांचीं अंतःकरणें वज्राहूनहि कठोर झालेलीं, त्या पितापुत्रांचीं मनें मोहानें जिंकलीं जाऊन मेणाहूनहि मऊ होऊन गेलीं. दोघांनाहि एकमेकांच्या गतचरित्राची आठवण होऊन, परस्परांविषयीं आदरबुद्धि वाटली. नंतर नूतन संपादित राज्यांतील राजगड, तोरणा, सिंहगड, पुरंधर, प्रतापगड, विशाळगड, पन्हाळा, रांगणा इत्यादि गड पहात पहात दोन महिन्यांनीं पितापुत्र राजधानी जी रायगड तेथें गेले. रायगडास राजधानी करण्याचा सल्ला शहाजी राजांनींच कर्नाटकांतून मोरोपंत पिंगळ्यांच्या मुखें सांगून पाठविली होती. ती कबुल जागा तपासून, शहाजी परत पुण्यास आला. तेथील आपण बांधिलेल्या इमारती वगैरे जागांचें अवलोकन करून, तो पुनः जेजुरीस खंडोबाचें दर्शन घेऊन कर्नाटकांत जाण्यास सिद्ध झाला. शिवाजीचे किल्ले, कोट, ठाणीं, जागा, राजधानी, अठरा कारखाने, शिबंदी, फौज, हत्ती, घोडे, तोफा वगैरे जंगी सामान पाहून राजे परम संतुष्ट झाले आणि आपली तुळजा नांवाची प्रासादिक तरवार त्यांनीं शिवाजीस बहाल केली. शहाजी एकंदर सहा महिने शिवाजीच्या राज्यांत राहून शके १५८३ च्या अखेरीस कर्नाटक प्रांतांत जाण्यास निघाला. शिवाजी व जिजाबाई शहाजीस पोंचविण्यास वारणेंपर्यंत गेलीं. निरोप देतांना शहाजीनें शिवाजीची मनःपूर्वक स्तुति केली. आमच्या वंशांत जन्म घेऊन तुम्ही बेचाळीस पिढ्या उद्धारिल्या, धर्मस्थापना करून वर्णाश्रम पुनरुज्जीवित केले, यवनाक्रान्त पृथ्वीचे क्लेश निवारण करून जगदंबेचा वर आमच्या प्रत्ययास आणून दिला, वगैरे कर्णमधुर शब्द उच्चारून शहाजीनें शेवटचा आशीर्वाद दिला, आणि आदिलशहा, औरंगजेब, इत्यादि यवनांशीं ह्यापुढें कसें वर्तन ठेवावें त्याची वाटाघाट करून कर्नाटकचा रस्ता धरिला."[१]

सारांश, शिवाजी राजांनीं सर्व मसलत व स्फूर्ति राज्यनिर्मितीसाठीं जी घेतली तिच्यांत शहाजी राजांचा फार मोठा वाटा होता. शके १५५९ च्या नंतर शहाजी राजांचें सारें लक्ष कर्नाटकांत गेलें. बंगळूर येथें त्यांनीं स्वतंत्र राज्यच निर्माण केलें. बंगळूर येथील शहाजी राजांचें ऐश्वर्य शिवाजीला त्याच्या लहानपणीं पाहावयास सांपडलें असावें. शके १५६३ च्या सुमारास शहाजी राजे यांचें ऐश्वर्य कर्नाटकांत व बंगळूरास वाढत होते. शिवाजी व जिजाबाई शहाजी राजांच्या बरोबर कांहीं दिवस बंगळूरास होती. याच वर्षी मोठ्या धोरणानें शहाजी राजे यांनीं कांहीं मुत्सद्यांच्या बरोबर शिवाजी व जिजाई यांची रवानगी पुणे जहागिरीवर केली.

२– कित्ता: पृष्ठ ९८–९९

या कामीं शहाजीस शंकराचा दृष्टान्त झाला असें सांगितलें जातें. त्याचाहि अर्थ शिवाजीच्या चरित्रांतील या गूढ भागाच्या अनुरोधानें लावतां येण्यासारखा आहे. शिवाजी राजे या सुमारास दहाबारा वर्षांचे असावेत. बंगळूर येथील शहाजी राजांच्या हिंदु राज्याचा सारा दिमाख बाल शिवाजीस पाहावयास सापडला असावा. राजवाडे यांनीं पिंडेकृत शहाजीची दिनचर्या वर्णन केली आहे तींत कवीची अतिशयोक्ति जमेस धरूनहि पुष्कळ तथ्य आहे असें मानावें लागतें.

जयराम पिंडे यानें शहाजी राजे यांच्या संबंधीं रोजच्या कार्यक्रमाविषयीं म्हटलें आहे, " पहाटेस शेजघराजवळ बाळसंतोष, कुडबुडे जोशी व शाहीर लोक भूपाळ्या वगैरेंचे मधुरालाप काढून राजाला सुखशय्येवरून उठवीत. इतक्यांत विश्वनाथभट्ट उच्चस्वरानें प्रातःस्मरण संस्कृत भाषेंत करीत. कित्येक ब्राह्मण पुण्याहवाचनाचे म्हणजे राजाला सुखाचा दिवस जावो अशा अर्थाचे मंत्र म्हणत, कित्येक विप्र ॐ कारपूर्वक वेदपठन करीत, कित्येक स्वस्तिसाम्राज्यादि मत्रांनीं आशीर्वाद देत व कित्येक अग्नीहोत्री वषट्कारार्पणांत गुंतत. मंत्रपठनाच्या, भूपाळ्यांच्या व प्रातःस्मरणांच्या ह्या धांदलीत राजा शेजेवरून उठून अंगणांत येऊन आकाशाकडे पाहून अरुंधति, शचि, देवसेना, व आकाशगंगा इत्यादि तारांगणावर नजर फेकून आणि शिव, विष्णु, स्कंद ऊर्फ खंडोबा, ब्रह्मदेव, लोकपाल, इंद्रादि देव, होमशालेंतील अग्नि, इत्यादींचें दर्शन होऊन दिशावलोकन करी..." यानंतर राजाला शुभचिन्हे कशीं होत, घोडेस्वारांची कवायत कशी होई, वृक्ष छायेंत त्याचे क्षण कसे जात, राजवैद्यांकडून त्याचें नाडीपरीक्षण कसें होई, त्याचा दरबार कसा असे, सरस्वतिपुत्रांची दाटी तेथें कशी होत असे, भालदार चोपदार यांच्या गर्जना कशा होत असत, स्वारीशिकारीचा नाद राजास कशा प्रकारचा असे, त्याचे लघु किंवा जड व्यवहार कोणते असत, सायंकर्म आटोपल्यावर खलबतखान्यांत गुप्त कारवाई कशी होत असे, हा सारा तपशील जयराम पंडितानें दिला आहे. त्यावरून हिंदु राज्य सम्राट शहाजी राजे यांचें वैभव शिवाजीच्या कोंवळ्या मनावर नेमकें ठसलें अससावें पुढल्या सर्व ऐश्वर्याचें बीजारोपण येथेंच झालें असावें असाहि तर्क करण्यास पुढें इतिहासांत आधार आहे.

कारण हा सर्व वारसा शिवाजीस मिळालेला आहे. याच केवळ आधारावर शहाजी राजे हे स्वराज्यस्थापक म्हणून राजवाडे म्हणतात असें नाहीं तर निष्फळ होणारे स्वराज्यस्थापनेचे प्रयत्न राजांनीं कसे केले यांचेंहि विवेचन त्यांनीं केलें आहे. राजवाडे यांनीं स्पष्टपणें म्हटलें आहे कीं "स्वराज्यस्थापनेच्या कल्पना शहाजीच्या वेळींच अत्यंत अंधुकपणें व अल्पांशानें कां होईना पण उदय पावत होत्या" एवढें सांगून राजवाडे यांनीं शहाजीच्या प्रयत्नांची मोजदाद केली आहे. पहिला स्वराज्यस्थापनेचा प्रयत्न शके १५५१ मधील लोदीच्या बंडाच्या वेळचा, दुसरा शके १५५५ मधील निजामशाही पुनरुज्जीवित करून राज्यासन स्वतः

आक्रमिण्याचा, कर्नाटकांतील तिसरा प्रयत्न आणि शिवाजी, जिजाबाई व दादोजी कोंडदेव यांच्याद्वारां पुणे प्रांतीं स्वराज्यस्थापनेचा चौथा प्रयत्न. या सर्व प्रयत्नांचे गुणावगुण वर्णन करून राजवाडे चौथ्या प्रयत्नाचे धागेदोरे जमवितांना लिहितात,

"महाराष्ट्रांतील ह्या चौथ्या स्वराज्यस्थापनेचें सर्व श्रेय शिवाजीच्या पदरांत पडलें हें खरें. परंतु मूळ कल्पना व योजना शहाजीची असल्यामुळें, शहाजीलाहि या श्रेयाचा वाटेकरी करणें इतिहासास प्राप्त आहे. पिंगळे, अत्रे, दादाजी, पानसंबळ, रोझेकर, जेधे, बांदल हे सर्व मुत्सद्दी व सरदार शहाजीचे, जहागीर शहाजीची, तोफा हत्ती घोडे वगैरे किल्लोकिल्लीं व ठाणोठाणीं सांठविलेला जंगी सरंजाम शहाजीचा. त्यांच्या जोरावर शिवाजीनें आपली मूळ इमारत रचली. आकाशांतून पडला आणि धांवायला लागला, अशांतला कांहीं प्रकार शिवाजीचा नव्हता. बापाच्या खांद्यावर उभा राहून शिवाजी पहिल्यान्दा उच्चासनस्थ झाला. निंबाळकर, मोहिते, जाधव, महाडीक, गायकवाड इत्यादि थोर मराठी कुळांशीं शहाजीचा पिढीजात शरीर संबंध असल्यामुळें, शहाण्णव कुळींतील नामांकित मराठ्यांचें सहाय्य शिवाजीस मिळालें. तात्पर्य, दरबारी मुत्सद्दी, लष्करी सरदार, लढाऊ सामान शहाण्णव कुळींच्या जेवे आदिकरून मराठ्यांचें सहाय्य व शहाजीच्या नांवाचा दरारा व दिमाख ह्या देणग्या शहाजीकडून शिवाजीस मिळाल्या...... ह्या सगळ्याचा मथितार्थ एवढाच कीं स्वराज्यस्थापनेचा धागा शहाजीच्या अथपासून इतिपर्यंतच्या चरित्रांत शके १५५१ पासून शके १५८३ पर्यंत अनुस्यूत झालेला आढळतो"[१]

शहाजी राजे यांच्या या कर्तृत्वाचा गौरव राजवाडे यांनीं या प्रस्तावनेच्या द्वारा करून प्रचलित समजुतींना जोराचा धक्का दिला. शहाजी राजे यांच्या धोरणाचा व इतिकर्तव्यतेचा खुलासा त्यांनीं केलाच, पण ज्या साधनांच्या अभावी मनांतील थोर राजकीय विचार जागच्या जागी शुष्क होऊन जातात त्या साधनांची निर्मिति व जोपासना शहाजीनें कशी केली यांचाहि विचार त्यांनीं सांगोपांग केला आहे. पक्ष, सैन्य, हत्यार हीं तीन साधनें निर्माण करून स्वराज्यसाधनाच्या प्रयत्नांत त्यानें आपलें आयुष्य वेंचलें व त्यामुळेंच शिवरायांना प्रत्यक्ष स्वराज्यस्थापनेचें कार्य करणें शक्य झालें असें राजवाडे यांचें विवेचन आहे. सारांश, "प्रकट स्वराज्य, प्रच्छन्न स्वराज्य, मांडलिकी स्वराज्य व स्वतंत्र स्वराज्य म्हणजे स्वतःचे व्यक्तिमात्राचें राज्य स्थापिण्याचे उत्तरोत्तर प्रयत्न करणें ही शहाजीची इतिकर्तव्यता होती. ही इतिकर्तव्यता अथपासून इतिपर्यंत विकास पावत असतां शत्रू मित्र व उदासीन यांच्याशीं प्रसंगाला अनुकूल दिसेल तें शत्रुत्वाचें, मित्रत्वाचें किंवा उदासीनतेचें वर्तन ठेवणें हें शहाजीचें घरसोडीचें धोरण

१– राधामाधवविलासचंपू: पृष्ठ, १०२–१०३

होतें. आणि हें धोरण अमलांत आणण्याकरतां करोल सैन्य व सामुग्री ह्यांच्या साह्यानें त्यानें स्वतःचा पक्ष निर्मून साधनसंपत्तीची जोड केली होती." [१]

आणि याच साधनसामग्रीच्या बळावर शहाजीच्या काळापासून हिंदुस्थानांतील इस्लामी सत्ता खिळखिळी होण्याच्या मार्गास लागली; कारण शहाजी ह्या वेळीं हिंदुत्वाचा विजयी वाली बनला होता.[२] कारण जरी शहाजीच्या मदतीनें दक्षिणेकडील हिंदु राज्यें खालसा होत असलीं व वरवर जरी तीं मुसलमानी अंमलाखालीं आलीं असल्याचें दिसत असलें, तरी शहाजीच्या नेतृत्वाखालीं त्यांचें रक्षणच झालें. इस्लामी आक्रमणाचा धोका केवळ शहाजीमुळें आक्रमक व हानिकारक ठरला नाहीं. आधींच निर्जीव होत चाललेलीं छोटीं छोटीं हिंदु राज्यें नष्ट झालीं हें खरें, पण तीं मुसलमानी सत्तेकडून प्रत्यक्ष नष्ट होण्याऐवजीं शहाजीकरवीं तीं झालीं हें एका अर्थानें फार बरेंच झालें असें म्हणावें लागतें. कारण शहाजीचें स्वराज्य मांडलिकी स्वरूपाचें असलें तरी तें मांडलिकत्व नांवाचेंच होतें. शहाजीचा अधिकार व पराक्रम एवढा होता कीं त्याचा प्रत्यक्ष धनी आदिलशहाच त्याला वचकून वागे. 'तात्पर्य, शहाजीचें कर्नाटकांतील राज्य पूर्णपणें अनियंत्रित होतें. तथापि जमीनमहसुलाच्या व न्यायमनसुबीच्या पुणे प्रांतांतील जुनाट पद्धति शहाजीनें कर्नाटकांत इतक्या नामी बसवून दिल्या कीं सर्व प्रजानन त्याचा दुवा गाऊ लागले. परंतु सर्वांत ज्या कृत्यानें शहाजी कर्नाटकांत अत्यंत प्रिय झाला तें हें कीं तो राज्य करूं लागल्यापासून मुसमानांच्या हातून देवालयें छिन्नभिन्न होण्याची, बायकांवर जुलूम जबरदस्ती गुदरण्याची, शेटसावकारापासून पैसा उकळण्याची व शेतकऱ्यांचें सर्वस्व नागविण्याची पीडा कर्नाटकांतून कायमची बाद झाली. देशाला असा सुरक्षितपणा आल्याकारणानें, शहाजीच्या कर्नाटकांतील राज्यासंबंधानें भरतखंडांतील सुज्ञ व कळकळीच्या विचारी हिंदूंना सानंद अभिमान वाटूं लागला. वैदिक, पंडित, शास्त्री, मल्ल, गायक, कवि, साधु, संत, शैव वैष्णव, रामानुज असे गुणीजन व भिन्न पंथीय लोक शहाजीच्या दर्शनास येऊं लागले. भाट, चारण इत्यादि बंदिजन देशोदेशीं शहाजीचीं कवनें व पोवाडे गाऊन एक नवीन हिंदुराज्य दक्षिणेंत नुकतेंच स्थापन झालें आहे व तें स्थापन करणारा महाराज शहाजी राजा भोसला या नांवाचा वीर पुरुष दक्षिणेंत अवतरला आहे, अशी आख्या चोहोंकडे पसरवीत. शके १२०० पासून १५०० पर्यंतच्या तीनशें वर्षांत शहाजीएवढा हिंदु राज्यकर्ता दुसरा कोणी झाला नाहीं"[३] उत्तर दिशेचा लोकपाल शहाजहान व दक्षिणेचा रक्षक शहाजी राजा असें जयराम पिंडये म्हणतो यांतील रहस्य तरी हेंच आहे.

१-- राधामाधवविलासचंपू: प्रस्तावना, पृष्ठ ११३.
२--कित्ता; पृष्ठ ११५
३--कित्ता; पृष्ठ १२०--१२१

शहाजीच्या कर्तृत्वाची, पराक्रमाची, त्याच्या स्वराज्यनिर्मितीची राजवाडे-कृत मीमांसा ही अशी आहे. राजवाडे यांनीं अनेक जुन्या कल्पनांना धक्का दिला ही गोष्ट खरी. शिवाजीराजांचें कर्तृत्व हें शहाजीच्या प्रेरणेंतून वा प्रोत्साहनांतून उभें राहिलें हेंहि खरें, पण सर्वच इतिहासकारांना शहाजीचा हा राजवाडेकृत मोठेपणा मान्य नाहीं असें दिसतें. प्रसिद्ध अभ्यासक भारताचार्य चिं. वि. वैद्य यांनीं राजवाडे-कृत शहाजीचरित्रावर आक्षेप घेतला आहे. त्यांच्या मतें पहिल्या १२५ पानांत जें शहाजीचें चरित्र अत्यंत रसभरित, इतिहासाला धरून व अनेक ग्रंथकारांच्या साक्षीची संगति जुळवून दिलें आहे तें मननीय व वाचनीय आहे. तरीसुद्धां "शहाजीराजांचा पराक्रम व त्यांचें ऐश्वर्य, त्यांची बुद्धिमत्ता व सुसंस्कृतता, कितीही असली तरी स्वराज्य स्थापन करण्याच्या शक्यतेची कल्पना स्वराज्य खरोखर स्थापन करण्याच्या श्रेयाबरोबर शिवाजी महाराजांच्याच डोक्यांत आली, शहाजी राजांच्या नव्हे असें माझें मत आहे. स्वराष्ट्रांत स्वतंत्र राज्य स्थापणें हाच त्या-वेळचा खरा स्वराज्याचा अर्थ आणि तो अर्थच मनांत धरून शिवाजीनें स्वराज्य स्थापिलें. मांडलिकी स्वराज्य आणि प्रच्छन्न स्वराज्य म्हणजे स्वराज्यच नव्हे आणि प्रकट स्वराज्य किंवा स्वतंत्र स्वराज्य शहाजीनें कधींही स्थापिलेंच नाहीं. बेंगलूर, कर्नाटक मुलुख येथें केवढीही सत्ता शहाजीची असली तरी ती मांडलिकी स्वरूपाची परमुलखांतील होती यांत बिलकूल शंका नाहीं. जयराम कवीनें कविसंप्रदायास अनुसरून शहाजीची कितीही प्रशंसा केली आणि राम, विक्रम, शालिवाहन किंवा शहाजहान यांच्या तोडीस त्यास नेऊन बसविलें तरी तो विजापूरकर यवन बाद-शहाचा अंकितच होता हें केव्हांहि विसरतां यावयाचें नाहीं. .... खरें स्वराज्य स्थापण्याच्या शक्यतेच्या कल्पनेचें श्रेय शिवाजी महाराजांसच द्यावें लागतें, शहाजीस देतां येत नाहीं....शिवाजी महाराजांच्या मोठेपणाचा हा मोठा भाग काढून घेऊन त्यांच्या वडिलांस देणें योग्य होणार नाहीं. शहाजी स्वतंत्र होता. परंतु विजापूरकरांस शेवटपर्यंत खाविंद म्हणत होता."[1] स्वराज्यस्थापनेची कल्पनाहि शहाजीस नव्हती, उलट मुसलमानांच्यावतीनें दक्षिणेकडील हिंदु राज्येंच खालसा करण्यांत शहाजीची उमर खर्ची पडली असाहि निष्कर्ष महंमदनामा व बुसातिन-उस-सलातिन या मुसलमानी साधनांच्या साह्यानें कांहीं इतिहासकार काढतात; आणि यांच्याच आधारानें शहाजी हा मुख्य सेनापती नव्हता इतकेंच नव्हे तर तो सैन्यांच्या स्वतंत्र तुकडीचा अधिपतीहि नव्हता; तो मुसलमान सरदारांच्या नजरे-खाली वागणारा असा एक सामान्य सरदार होता आणि याच अनुरोधानें जदुनाथ सरकारांसारखे इतिहासलेखक शहाजीचें कर्तृत्व मापतात[2] आणि याचाच

१ चिं. वि. वैद्य; वैद्यांचे ऐतिहासिक निबंध : पृष्ठ ७०-७३, सन १९३१

२ मॉडर्न रिव्ह्यू; जुलै; १९२९

अनुवाद आपल्यांतले कांहीं इतिहासकार करितात. डी. बी. डिकसळकर यांनीं विजयानगर व शहाजी यांच्यासंबंधीं लेख लिहून असा निष्कर्ष काढिला कीं 'शहाजीच्या सर्व जीवितांत व्यापक राष्टीय किंवा धार्मिक कल्पना आपल्याला दिसत नाहींत. आपल्या धन्याचें काम करणें व त्याची कृपा संपादणें एवढाच त्याचा जीवितहेतु दिसतो.[१] अगदीं अलीकडे वा. कृ. भावे यांनीं जें शिवचरित्र प्रसिद्ध केलें आहे त्यांतहि शहाजीच्या कर्तृत्वासंबंधीं असाच सूर आहे. 'शहाजी कारक, कष्टाळू व प्रकृत्तीनें निकोप होता. त्याचें सर्व आयुष्य मुसलमानांची सेवा करण्यांत गेलें...शिवाजी मोठा होऊन सन १६४५ पासून हिंदूंचें स्वतंत्र राज्य स्थापण्यांत आपलें बुद्धिसर्वस्व व शक्तिसर्वस्व खर्च करीत होता. हा त्याचा उद्योग १९ वर्षे पर्यंत सतत डोळ्यापुढें दिसत असतां त्याच काळांत शहाजी कर्नाटकांतील हिंदूंचीं राज्यें बुडवीत होता, हा ठळक विरोध डोळ्यांत भरल्याशिवाय राहत नाहीं.'[२] या वरून भावे यांना वाटतें कीं अनेक मराठे सरदार मुसलमानांच्या अर्थात् आदिलशाहीच्याहि पदरीं होते. त्यापैकींच शहाजी हा एक होता. कोणाचीहि ताबेदारी पत्करून आपलें ऐहिक ऐश्वर्य वाढविणें हें एकच ध्येय इतर मराठे सरदारांप्रमाणेंच शहाजीचेंहि होतें.

शहाजी राजे हे सर्वस्वी मुसलमान सत्ताधीशांच्या अंकित होते, स्वराज्याची कल्पना त्यांना नव्हती अशा अर्थाचीं विधानें करणाऱ्या इतिहासकारांच्या आक्षेपांचा अधिक विचार व्हावयास हवा. शहाजीला स्वराज्याची कल्पना नव्हतीच; इतकेंच नव्हे तर दक्षिणेकडील हिंदुराज्येंहि त्यानें धुळीस मिळविलीं याहि आक्षेपाचा विचार व्हावयास हवा. शहाजीनें विजयनगरच्या अंतानंतर अवशिष्ट राहिलेलीं हिंदुराज्यें जिंकलीं व तीं मुसलमानांचा ताबेदार म्हणून जिंकलीं हें वर वर खरें आहे. विधुपूरचा राजा वीरभद्र, श्रीरंगपट्टणचा राजा कंठीराव, कोंगदेशाचा राजा कोंगनायक, कावेरी पट्टणाचा राजा जगदेव, तंजापूरचा विजयराघव, चंदीचा वेंकटनायक, मदुरेचा तिरुमल्ल नाईक, वाली गुंडापूरचा अरिकाल वेंकट नाईक, विजयानगरचा रंगशायी नायक इत्यादि लहानमोठे पाळेगार शहाजीनें जिंकले, त्यांचा पराभव केला ही गोष्ट तर खरीच; पण या लहानसान राजांच्या राज्यांत कितीसें त्राण राहिलें होतें ? शहाजी मध्यस्त नसता तर या पाळेगारांची व त्यांच्या राज्यांची मुसलमानाकडून काय दशा झाली असती ? या प्रश्नांनाहि फार महत्त्व आहे. राजवाडे यांनीं या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न केला तो आपण पाहिला आहे; पण राजवाडे यांच्या नंतरचे इतिहासकार राजवाडे यांच्या या विवेचनास किती महत्त्व देतात ?

---

१ विजयनगरस्मारक ग्रंथ : पृष्ठ १११, सन १९३६–३७

२ वा. कृ. भावे; युगप्रवर्तक शिवाजी महाराज : पृष्ठ ५०–५१; सन १९५५

राजवाडे यांच्या निधनानंतर दुसऱ्याच वर्षी दिवेकरसंपादित परमानंदकृत 'श्रीशिवभारत' प्रसिद्ध झालें. या ग्रंथास प्रसिद्ध इतिहासवेत्ते द. वि. आपटे यांनीं विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेंत शहाजीच्या दक्षिणेंतील कामगिरी-विषयीं त्यांनीं लिहिलें आहे; " कर्नाटकांतील त्या वेळच्या विजापूरकरांच्या स्वाऱ्यां-संबंधीं एक विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट अशी होती कीं त्यांत त्यांनीं ज्यांचा मुलूख घेतला, त्याला नेस्तनामूद करण्याचें धोरण न स्वीकारतां त्यांच्या ताब्यातला सुपीक भाग खालसा करून बिनवस्तीचा भाग पूर्वीच्याच मालकाकडे चालू ठेविला. या धोरणामुळें तिकडील पाळेगार खुनशी न बनतां जंगली भाग वसाहतीखालीं आणण्यासाठीं झटूं लागले. ......अशा प्रकारें हिंदु पाळेगारांचीं राज्यें घेऊन देखील त्यांना नेस्तनाबूद करावयाचें नाहीं व त्यांचीं पाळेंमुळें खणून न काढतां जगण्यास वाव ठेवावयाचा हें राजकीय धोरण शहाजीनें किंवा त्यावेळच्या विजापूरच्या अधिकाऱ्यांनीं पत्करलें असें राईस म्हणतो तें विचार करण्याजोगें आहे. विजापूरचा इतिहासकार म्हणतो त्याप्रमाणें कित्येक मुसलमानी मुत्सद्यांना ही कर्नाटकची मोहिम म्हणजे धर्मयुद्ध वाटत होतें हें खरें असेल तर हिंदु राजे जाणून बुजून जिवंत ठेवण्याचें धोरण पत्करणें संभवत नाहीं. हिंदु पाळेगार व संस्थानिक यांचा निर्वंश कसा होईल हाच विचार प्रामुख्यानें त्यांनीं मनापुढें वागविणें स्वभाविक होतें. परंतु शहाजीला मुसलमानांची धर्मयुद्धाची कल्पना पटण्या-जोगी नव्हती. त्याला तिच्या विरुद्ध वागणें भागच होतें. आणि तो याप्रमाणें हिंदूंना आंतून मदत करीत होता हाच आरोप त्यांच्या विजापूरच्या अधिकाऱ्यांनीं ठेवला होता असें जेधे-करीना सांगतो. ... यावरून कर्नाटकांतील हिंदु राजाविषयीं आपलेपणाची भावना वागवून त्यांना जगविण्याची राजनीति कर्नाटकांत योजिली गेली याचें श्रेय शहाजीसच द्यावें लागेल असें उपलब्ध पुराव्यावरून दिसतें "[१] दुसऱ्या ठिकाणीं द. वि. आपटे यांनीं राजवाडे यांनीं शहाजी राजे यांच्या विजापूर-करांशीं असलेल्या ताबेदारीच्या संबंधाविषयीं जें विवेचन केलें आहे तेंहि राजवाडे यांच्या विचाराशीं जुळतें आहे.[२]

राजवाडे यांच्याच मताचा पुरस्कार करणारे दक्षिणेकडील इतिहासकार आहेत हें विशेष आहे. मद्रास विद्यापीठांतील इतिहासाचे प्राध्यापक डॉ. एस. कृष्णस्वामी ऐयंगार यांच्या मतें विजापूरकरांच्या कर्नाटकांतील सत्तेमुळेंच मराठी राज्याचा पाया घातला गेला. त्यांच्या मतानुसार, ' सर्व ऐतिहासिक साधनांचा साकल्यानें विचार करतां मराठा सरदार शहाजी हा सेनानायक व राज्यव्यवस्था करणारा या दोनहि नात्यांनीं मोठा कर्तबगार होता असें दिसतें. विजापूरकरांच्या

१—कवींद्र परमानंदकृत श्रीशिवभारत: प्रस्तावना, पृष्ठ १०९-११०

२—शिवचरित्र निंबधावली: पृष्ठ, ११०—१११, सन १९२९.

वतीनें कर्नाटकांतील कित्येक छोटीं राज्यें जिंकून त्यानें महत्त्वाची कामगिरी बजावली. या विजयांतून हळूहळूं त्यानें प्रथम आपल्या विजापूरकर धन्याच्या अधिराज्या-खालीं, पण अखेरीस सर्वस्वी आपल्या ताब्यांत असणारें असें एक लहानसें राज्यच उभारिलें.'[1] याहि आधीं कांहीं वर्षे आंध्रचे इतिहाससंशोधक ए. शंकरराव यांनीं तालिकोटच्या लढाईपासून शिवाजीच्या उदयापर्यंत एक लेख लिहून निष्कर्ष काढला आहे कीं तालिकोटच्या पराभवामुळेंच हिंदूंच्या पुनरुज्जीवनाची लाट पुनः उसळली व शिवाजीची राज्यस्थापना या लटेचाच अंतिम परिणाम असल्यामुळें शिवशाहीला विजयनगरच्या साम्राज्याचा खरा वारस म्हटलें पाहिजे.[2]

शिवाजीनें स्थापन केलेल्या स्वराज्याची मूळ प्रेरणा विजयानगरचें हिंदु राज्य व शहाजीचें कर्तृत्व यांच्याविषयीं अधिक मूलगामी विवेचन केलें आहे तें त्र्यं. शं. शेतवलकर यांनीं. 'विजयनगर साम्राज्याचे मराठे शाहीवरील परिणाम' या नांवाचा एक मूलगामी विचारांचा लेख त्यांनीं सन १९३६ च्या डिसेंबरच्या 'सह्याद्रि'मध्यें लिहिला. त्यांत त्यांनीं शहाजीच्या राज्यद्रोहाची मीमांसा, शिवाजीच्या हिंदुत्वाच्या अभिमानाचें मूळ यांसंबंधीं साधार खुलासा केलेला आहे. प्रथमच त्यांनीं सांगून टाकलें आहे कीं 'मराठेशाहीची स्थापना ही सर्वस्वी शिवाजीकडून झाली असें न मानतां शहाजीकडूनच तिची प्राणप्रतिष्ठा झाली असें समजण्यास इतिहासाचा भरपूर आधार उपलब्ध झालेला आहे. चौदा वर्षांपूर्वी राजवाड्यांनीं राधामाधव-विलासचंपूची प्रस्तावना लिहून शहाजीची योग्यता जगासमोर मांडली तेव्हां पुष्क-ळास ती अतिशयोक्तीची वाटली. पण आतां तीच गोष्ट बहुधा सर्वमान्य झालेली आहे." राजवाडे यांशीं सहसा सहमत न होणाऱ्या शेजवलकरांचा हा अभिप्राय महत्त्वाचाच मानाला लागेल. त्यांनीं आग्रहानें सांगितलें आहे कीं 'शहाजीनें बंगळूरास राहून विजापूरच्या नांवाखाली जें स्वराज्य स्थापिलें तेंच खरोखरी मराठेशाहीचें बीजारोपण होतें, तेथूनच शिवाजीचा पाठपुरावा झाला, व त्याचा स्वराज्यांत आश्रय घेतां आला म्हणून राजारामकालीन आघातांतून मराठेशाही वांचली हें आतां उघड झालें आहे......एका बाजूनें पाहिलें तर शहाजी एक हिंदु साम्राज्य धुळीस मिळवीत होता; पण दुसऱ्या बाजूनें पाहतां तो एका हिंदु साम्राज्याचा पाया घालीत होता." आणि याच हिंदु राज्यांतून शिवाजीचें बालमन संस्कारसंपन्न झालें. शिवाजीची धर्मप्रेरणा, अष्टप्रधानांची व्यवस्था, त्याची राजमुद्रा, त्याचा कवि व पंडितांचा संग्रह, त्याच्या भोंवतींचे मुत्सद्दी यांचा विचार करतां दक्षिणेकडील शहाजीच्या दरबारांतच त्याला एक संपन्न व समर्थ असें हिंदु राज्य पाहतां आलें. त्याच्या जाज्वल्य हिंदुधर्माच्या अभिमानाचें

१–जर्नल ऑफ् मॉडर्न हिस्ट्री : पृष्ठ २१४-२१५, ऑगस्ट १९३०

२–विजयनगर स्मारक ग्रंथ : पृष्ठ ६४ सन, १९३६-३७

उगमस्थान पूर्ण हिंदुत्वाचें वारें खेळत असलेलें बंगळूरच असलें पाहिजे असाच निष्कर्ष शेजवलकरांचा आहे. आश्चर्याची गोष्ट अशी कीं शहाजीचें कर्तृत्व वर्णन करतांना शेजवलकरांनीं मराठ्यांच्या ऐतिहासिक कार्याविषयीं एक विधान केलें आहे. 'हिंदूंना राखणें, त्यांचें उच्छेदन होऊं न देणें, त्यांच्या संस्कृतीचें पुनरुज्जीवन करणें हेंच मराठ्यांचें ऐतिहासिक कार्य होतें' राजवाडे यांनीं मराठ्यांच्या ध्येयधोरणाबद्दल जें विवेचन केलें त्यास शेजवलकरांचा कसून विरोध होता हें आपण मागें पृष्ठ ५५–५७ वर पाहिलें आहेच; ते ध्यानांत घेतां १९३६ सालीं व्यक्त झालेलें हें मत अधिक ग्राह्य मानणें युक्त आहे. याच लेखाचा शेवट करतांना शेजवलकरांनीं म्हटलें आहे, "महाराष्ट्रराज्याची कल्पना विजयनगरच्या छायेंत शिवाजीच्या मनांत स्फुरली, त्याच राज्याचा मुलुख जिंकतां जिंकतां वृद्धिंगत पावली, त्याच राज्याच्या आश्रयामुळें मराठेशाही रुजली, वाढली, गंडांतरांतून टिकली, चालू राहिली आणि अखेरीस तो आश्रय सुटला तेव्हां कोसळून कोलमडून पडली." शेजवलकरांच्या या निष्कर्षांत शहाजीचें कर्तृत्व उठावानें दिसून येण्यासारखें आहे.

तेव्हां सारांशानें असें दिसून येतें कीं राजवाडेकृत शहाजीकर्तृत्व कांहीं अपवाद सोडल्यास मातबर इतिहासकारांना मान्य झालें आहे. ज्यांना अमान्य आहे त्यांनीं राजवाडे यांच्या एवढें मूलगामी विवेचन केलेलें नाहीं वा त्यांचा मथितार्थ पुराव्यांनीं खोडून काढलेला नाहीं. गो. स. सरदेसाई यांच्यासारखे समतोल इतिहासकारहि राजवाडेकृत शहाजीमाहात्म्यास हातभार लावतांना म्हणतात, 'तत्कालीन ऐतिहासिक व्यक्तीस राष्ट्रीय स्वत्व दिमाखानें मिरविणारा शहाजीशिवाय दुसरा एकहि हिंदु सत्ताधीश दक्षिणेंत आढळत नाहीं. म्हणून शिवाजीला जन्म देऊन त्याचे ठिकाणीं स्वातंत्र्याचें वारें उत्पन्न करण्याचें श्रेय त्यांना अवश्य मिळतें. या दृष्टीनें शिवाजीला जर 'राज्य संस्थापक' म्हणावयाचें तर शहाजीला '**राज्यसंकल्पक**' असें पद देण्यास हरकत नाहीं."[1]

या सर्व विवेचनावरून असें सिद्ध होतें कीं, प्राप्त परिस्थितींत शहाजीराजे विजापूरकराशीं एकनिष्ठ होते पण अंतर्यामीं त्यांना स्वतंत्र राज्याचें स्फुरण होत असावें. या राज्याची थोडी कां होईना पण भूक भागली ती बंगळूरच्या राजधानींत. या ठिकाणीं शहाजी स्वतंत्रच होते. नाममात्र सत्ता विजापूरची होती. बाकी रक्षण होत होतें तें सर्वस्वी हिंदुराज्य पद्धतीचें; आणि याच मुक्कामीं शिवाजीचें बालपण गेलें. आंतरिक प्रेरणेनें शहाजी राजे यांनीं सर्व तयारीनिशी बाल शिवाजीस सन १६४१–४२ मध्यें पुण्यास रवाना केलें. या पाठवणींत जणुं स्वराज्याचा धडाच त्यांना शिवाजीस शिकवावयाचा होता. "बरोबर शामराव नीळकंठ म्हणून

१–गो. स. सरदेसाई; मराठी रियासत १, शहाजी राजे भोसले : पृष्ठ. ८४ सन १९३५.

पेशवे नेमून दिले. मुजुमदार, डबीर, सबनीस, असेहि स्वतंत्र अधिकारी पाठविले. ” असें सभासदी बखर सांगते. आणि ‘ नंतर ’ कांहीं हत्ती, घोडे, पायदळ, पिढीजाद व विश्वासू अमात्य, विख्यात अध्यापक, बिरुदें, उंच ध्वज, विपुल द्रव्य व अद्वितीय कर्में करणारे दुसरे परिजन असा विस्तार शिवभारतकार करतोत. पुढें एके प्रसंगीं कान्होजी नाईक जेधे व दादाजी कृष्ण लोहोकरे यांस मुद्दाम बोलावून “ मावळ प्रांतीं तुम्ही वतनदार जबरदस्त आहां. राजश्री शिवाजी राजे पुणां आहेत. त्याकडे जमेतीनिसी तुम्हांस पाठवितों. तेथें इमानें सेवा करावी. काल आला तरी जिवावरी श्रम करावे. तुमचा भरोसा मानून रवाना करतों. इमानें वर्तावें येसी शक न देणें अशा अर्थाची त्यांची आळवणी शहाजी राजांनीं केली आहे.[१] इतकेंच नव्हे तर दादोजी कोंडदेव हयात होते तोंपर्यंत बरीचशी मसलत शहाजीच्या मार्फतच होत असे. सन १६६५ पर्यंत शहाजीकडून हुकूम येत असत. पुढें शिवाजीचें कर्तेपण ध्यानांत येतांच त्यांनीं दुर्लक्ष केलें असावें; वा कधी शिवाजीचा उद्योग आपणांस मान्य नसल्याचें वरकरणी सोंगहि त्यांना आणावें लागले असावें. या वरवरच्या सोंगाचा गर्भितार्थ समजावून सांगण्यास राजवाडे यांची प्रतिशाली प्रस्तावना राधामाधवविलासचंपूच्या निमित्तानें समर्थ ठरली यांत संशय नाहीं.

१. दि. वि. काळे; छत्रपति शिवाजी महाराज : पृष्ठ २८, सन १९६०

८ : राजवाड्यांची इतिहास–मीमांसा

इतिहासाच्या शास्त्रशुद्ध स्वरूपाचें व तत्त्वज्ञानाचें संपूर्ण तपशीलासहित वर्णन अखिल भारतांत प्रथम राजवाडे यांनीं केलें आहे. राजवाड्यांच्या पूर्वी इतिहास-संशोधनास तुरळकपणें प्रारंभ झाला होता. कांहीं साधनसंग्रहाचीहि कल्पना लोकांना होती. चिपळूणकरांचा 'इतिहास' हा निबंधहि पुढल्या पिढीस प्रेरणा देणारा ठरला. परंतु इतिहास या विषयाची शास्त्रीय मीमांसा मात्र राजवाडे यांनींच प्रथम आपल्या साधनखंडांच्या प्रस्तावनांतून केली आहे. प्राचीन भारतीय वाङ्मयांत इतिहास, पुरावृत्त, दंतकथा, गोष्ट, आख्यायिका यांसारख्या नांवांनीं इतिहास विषय साधारणपणें ओळखला जात असे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत राजाच्या शिक्षणासाठीं इतिहास विषय उपयुक्त असल्याचा उल्लेख आहे. छांदोग्य उपनिषदांत 'इतिहास पुराणा'स पांचवा वेद म्हटलें आहे. यावरून एवढेंच दिसून येतें कीं ज्याला इतिहास असें ढोबळ मानानें म्हणतां येईल असे ग्रंथ प्राचीन काळापासून आपल्याकडे होते असें म्हणतां येईल. रामायण महाभारत यांसारख्या ग्रंथांतूनहि आपणांस इतिहास मिळतो. पुराणांतील इतिहास कसा वाचावयाचा याचेहि कांहीं अडाखे ठरू पाहात आहेत. हें सर्व खरें असलें तरी इतिहासशास्त्राविषयीं तात्त्विक मीमांसा आपणांकडे प्राचीन काळीं होत नसावी असें दिसतें.

इतिहासाचें लेखन, त्याची शास्त्रीय मीमांसा, त्याचें तत्त्वज्ञान, संशोधन, चिकित्सा, संकलन, समीक्षण, इतिहासलेखकांचे गुणावगुण यांची चर्चा पश्चिमेकडे अधिक तपशीलानें व विस्तारनें झालेली आहे. ग्रीक, रोमन, ख्रिश्चन विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या काळांतील व धर्मसुधारणेच्या काळांतील इतिहासकार, बुद्धिवादी, भावनावादी, राष्ट्रवादी, ध्येयवादी, शास्त्रीय दृष्टिकोनवादी इतिहासकार यांनीं निरनिराळ्या लोकांचे व देशांचे इतिहास तर लिहिले आहेतच; पण इतिहास म्हणजे काय, इतिहासाचें स्वरूप, इतिहासाचे प्रकार, इतिहासलेखनाच्या पद्धती, साधन-चिकित्सा, संशोधकाची पात्रता, इतिहासलेखनाची दृष्टि इत्यादि विविध विषयांचा सांगोपांग विचार इतिहासमीमांसा म्हणून युरोपमधील इतिहासलेखकांनीं केलेला आहे. हेरोडोटस पासून टॉयन्बीपर्यंतची इतिहासमीमांसा अनेक दृष्टींनीं महत्त्वाची आहे. हेरोडोटस, सेंट ऑगस्टिन, मॅकियवॅली, मार्टिन लूथर, व्हॉल्टेर, डेव्हीड ह्यूम, रॉबर्टसन, एडवर्ड गिबन, सर वॉल्टर स्कॉट, कान्ट, हेगेल, रान्के, कार्लाईल, मेकॉले, लॉर्ड ॲक्टन, डिल्टाय, स्पेंग्लर, क्रोचे, टॉयन्बी, कार्ल मार्क्स यांसारख्या प्रतिष्ठित इतिहासलेखकांची व इतिहासमीमांसकांची एक मोठी परंपरा युरोपमध्यें निर्माण

झाली आणि आपल्या इंग्रजी शिक्षित पिढीच्या पुढें उभी राहिली. पौराणिक, गूढवादी, ईश्वरीसूत्रवादी, मूलतत्त्ववादी, कालवादी, प्रकृतिवादी अथवा अर्थवादी, पौरुषवादी, भूगोलवादी, वंशवादी, शिल्पशास्त्रवादी, समाजसत्तावादी, राजसत्तावादी, संयोगीकरणवादी वा समन्वयवादी यांसारखे अनेक इतिहसवेत्ते आपापलीं मतें व आपापले वाद अभ्यासकांपुढें ठेवतांना दिसतात. उत्खननशास्त्र, जीवशास्त्र, समाजशास्त्र, पुराणवस्तुसंशोधनशास्त्र, भाषा व व्याकरणशास्त्र, ध्वनिशास्त्र, मानववंशशास्त्र, भूगर्भशास्त्र, लिपि व लेखनशास्त्र, मुद्रा व शिक्के यांचें शास्त्र, नाण्यांचें शास्त्र, मूर्तिशास्त्र, वेषभूषाशास्त्र इत्यादि विविध शास्त्रांचा व उपशास्त्रांचा अभ्यास व यांतील नवें संशोधन इतिहासमीमांसेस उपयोगी पडत राहिलें असल्यास नवल नाहीं. युरोपमधील इतिहासमीमांसेचें धावतें दर्शन घेण्यापूर्वी साठ वर्षांपूर्वी राजवाडे यांनीं इतिहासशास्त्राविषयीं जें विवेचन केले आहे तें ध्यानांत घेणें प्रथम अगत्याचें आहे.

राजवाडे यांनीं आपल्या साधनखंडांच्या कांहीं भागांना ज्या विस्तृत प्रस्तावना जोडल्या आहेत त्यांत त्यांनीं आपले इतिहासविषयक विचार अनेक ठिकाणीं व्यक्त केले आहेत. सन १९०५ सालीं प्रसिद्ध झालेल्या सहाव्या खंडांत तर राजवाडे यांनीं इतिहासशास्त्र या विषयाची सांगोपांग चर्चा केली आहे. एवढें मूलगामी व विस्तृत विवचेन या पूर्वी कुणी केलें नव्हतें आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं या नंतर साठ वर्षांच्या काळांतहि राजवाडे यांच्या इतिहासमीमांसेपेक्षां वेगळें असें स्वतंत्र विवेचनहि मराठींत झालेलें नाहीं. सन १९४७ मध्यें प्रसिद्ध झालेल्या 'कै. दत्तोपंत आपटे स्मारक ग्रंथ, इतिहास : शास्त्र व तत्त्वज्ञान' या ग्रंथांत इतिहासमीमांसेच्या अनेक उपपत्तींची चर्चा आलेली आहे. पहिल्याच १०८ पृष्ठांच्या विस्तृत अशा प्रा. श्री. व्यं. पुणतांबेकर यांच्या ' इतिहासकारांच्या इतिहास विषयक कल्पना ' या लेखांत मुख्यत: पाश्चिमात्य लेखकांच्या इतिहासविषयक कल्पनांचा फार चांगला आढावा घेण्यांत आलेला आहे. तरी सुद्धां राजवाडे यांनीं केलेली सहाव्या खंडांतील इतिहासमीमांसा आजहि अभ्यासनीय व उद्बोधक अशीच आहे. या विषयीं एक अभिप्राय महत्त्वाचा आहे. "मराठी वाङ्मयापुरतें बोलावयाचें तर इतिहासशास्त्र विषयाचें तात्त्विक विवेचन विस्तृतपणें व स्वतंत्रपणें करणारें लिखाण प्रायः नाहीं म्हटलें तरी चालेल. कै. राजवाड्यांनीं सहाव्या खंडाचे प्रस्तावनेंत केलेलें विस्तृत विवेचन हा त्यांच्या लेखनाचा आणि प्रतिभेचा परमोत्कर्ष झालेला एक नमुना आहे." असें म. म. द. वा. पोतदार यांनीं म्हटलें आहे.[1]

आपल्या इतिहासमीमांसेंत इतिहासाचें स्वरूप काय असावें याचा विचार प्रथम करावा असें राजवाडे यांना वाटतें. परंतु याहि पूर्वी कांहीं पाश्चात्य इतिहास-

१–भा. वा. भट : राजवाडे चरित्र; पृष्ठ ३१७

वेत्त्यांच्या कल्पना कशा त्याज्य आहेत, त्यांनीं करून घेतलेले पूर्वग्रह कसे दूर व्हावयास पाहिजेत या आणखी एका महत्त्वाच्या विषयाकडे ते आधीं लक्ष देतात. कारण पाश्चात्यांचे विचार जसेच्या तसे फारसा विचार न करतां सिद्धान्त म्हणून पत्करण्याची जी एक दुष्ट खोड येथें रुजूं पाहात होती तिला राजवाडे यांना दुरुस्त करावयाचें होतेंच, पण निरनिराळ्या इतिहासकारांनीं केलेलें इतिहासविवेचन किती मतलबी व स्वार्थी असूं शकतें व पाश्चात्य इतिहासलेखकांचे अनेक भ्रम कसे विचित्र असतात याचें मोठें विदारक चित्र राजवाडे यांनीं काढलें आहे. पहिल्या प्रथम फ्रीमनच्या 'इतिहास म्हणजे गत राजकारण व राजकारण म्हणजे वर्तमान इतिहास' (History is past Politics and Politics is a present History) या लक्षणावर राजवाडे यांनीं हल्ला चढविला आहे. राजकारणाखेरीज धर्म, आचार, विद्या, व्यापार वगैरे लोकजीवन इतिहासांत येत असतें. तेव्हां इतिहास म्हणजे गत राजकारण ही व्याख्या राजवाडे यांच्या मतें सर्वस्व अपूर्ती आहे. केवळ राजकारणास महत्त्व देणाऱ्या इंग्लंडसारख्या देशाच्या इतिहासास ही व्याख्या एखाद्या वेळेस मानवेल पण इतर इतिहासांना या लक्षणाचा कांहींहि उपयोग होण्यासारखा नाहीं. राष्ट्राचें सर्व तऱ्हेचें गतकालीन चरित्र व वर्तमान चरित्र म्हणजे इतिहास असा एक ढोबळ निर्णय राजवाडे प्रथम देतात. हजारों वर्षांपूर्वी आपल्या आर्यन पूर्वजांनीं 'इति ह आस'–असें होतें, हें इतिहासाचें लक्षण दिलें आहे तें त्यांना अगदीं निर्दोष वाटतें. पूर्वी जें जें कांहीं झालें तें तें सर्व इतिहास. त्यामुळें युरोपीयन लोकांनीं इतिहासाचें वरीलसारखें जें लक्षण केलें तें त्यांना भ्रामक व अशास्त्रीय वाटलें. समाजाच्या चरित्रांतील गत गोष्टींची जी हकीगत ती इतिहास होय असें त्यांनीं आग्रहानें सांगितलें आहे. या लक्षणद्वारें एवढें पुन्हां निश्चित झालें कीं मानव-समाजाचें अखिल चरित्र हा इतिहासाचा विषय व वर्तमान क्षणाच्या पाठीमागील सर्व गतकाळ हा त्याचा प्रांत अशी व्यापक दृष्टि घ्यावी लागते.

पाश्चात्य इतिहासकारांनीं कल्पिलेल्या आणखी एका गैरसमजाची राजवाडे अशीच दुरुस्ती करतात. इतिहासाचा विषय व काळ निश्चित झाला, पण स्थळ? जेथें जेथें मानव समाजाची वस्ती आहे तें तें इतिहासाचें स्थळ असावयास हवें. राजवाडे यांच्या मतें पाश्चात्य इतिहासकार जगाच्या इतिहासाचें लेखन करण्याकडे धांव घेतात. पण प्रत्यक्षांत त्यांच्या दृष्टिपथांत येणाऱ्या पांचदहा देशांच्या विवेचनांतच त्यांचा जगाचा इतिहास आटोपतो. कांहीं पाश्चात्य देशांच्या इतिहासकारांच्या मनांत एक चमत्कारिक समज असल्यामुळें त्यांची दृष्टि एवढी संकोचित राहिली असावी. कांहींच्या मतें पाश्चात्य समाज सतत प्रगतिपथावर असल्यानें त्यांना इतिहास आहे; आणि पावात्य समाज हा स्थिर असल्यानें त्यांना इतिहास असूंच शकणार नाहीं. थोडक्यांत म्हणजे पाश्चात्य समाज हा प्रगतिपर आहे; आणि पौर्वात्य समाज हा स्थिर आहे. तेंव्हा राजवाडे यांनीं मुळांतच नेहमी-

प्रमाणें हात घालून प्रगति म्हणजे तरी काय? असा प्रश्न उपस्थित केला आहे; आणि उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे कीं गति दोन प्रकारची असते, एक अधम गति व दुसरी उत्तम गति. पैकीं उत्तम गती ही प्रगति. समाजाची उत्तम गति म्हणजे आत्यंतिक नीतिमत्तेकडे, आत्यंतिक बुद्धिमत्तेकडे व आत्यंतिक संपन्नतेकडे समाजाची प्रवृत्ति ती प्रगति. या जागतिक अवस्थेकडे जाण्यास युयुत्सुता व सुयंत्र राज्यव्यवस्था या दोन साधनांचा उपयोग होतो. प्रगतीचें हें स्वरूप भारतवर्षांतहि चांगलें परिचित आहे. राज्ययंत्र उत्तमोत्तम ठेवून व सैन्याच्या जोरावर अंतस्थ व बहिस्थ शत्रूंचा नाश करून, धर्म, न्याय, नीति, स्वास्थ्य यांची स्थापना करण्याचाच प्रयत्न आपल्याकडे होता. पाश्चात्यांचे प्रगतीचे जे मार्ग आहेत त्याहून कांहीं निराळे परंतु उदात्त मार्ग आपणांकडे होते. तेंव्हा अधिक चांगल्या अर्थानें प्रगतिपर असणाऱ्या पौर्वात्य देशांना विसरून इतिहासकारांना चालणार नाहीं. अर्थात ही प्रगति सातत्यानें कधी दिसणार नाहीं. युरोपच्या इतिहासांत तरी सातत्य कुठें आहे? रोमन साम्राज्यानंतर दहा शतकें अगदी अंधाराचीं गेलीं असेंच पाश्चात्य इतिहासकार सांगतात. राजवाडे यांनीं इंग्लंड व फ्रान्स या दोस्त राष्ट्रांचीं उदाहरणें देऊन पाश्चात्य राष्ट्रांतहि प्रगतींतील सातत्य राहिलेलें नाहीं असें स्पष्ट करून युरोपीयन समाजांत ‘ दारूनें झिंगलेल्या कामकऱ्यांच्या समाजापेक्षां जास्त प्रगति दिसून येत नाहीं ’ असा निष्कर्ष काढला आहे.[1]

पाश्चात्य इतिहासकारांचीं पोरकट व क्षुल्लक मतें राजवाडे एवढयासाठी हाणून पाडतात कीं त्यांचा अनुवाद आपल्याकडील कित्येक परभृत व परदेशाभिमानी लेखक वारंवार करितांना त्यांना दिसत होते. असें होऊ न देतां निर्लेप व निरहंकारी बुद्धीनें ब्रह्मविचारांत विलीन होणाऱ्या आर्यांच्या वंशजांना हें अवघड वाटूं नये. खरें म्हणजे लेखकाची वृत्ति निर्लेप व निरहंकारी होणें हीच इतिहासाचें खरें स्वरूप जाणण्याची पहिली पायरी होय असें राजवाडे सांगतात. यासाठीं आपण कांहीं अर्धवट ग्रह सोडून द्यावयास हवेत. कांहीं इतिहासकारांना वाटतें कीं मनुष्यसमाज हा एके काळीं अगदीं रानटी स्थितींत होता. व त्या अवस्थेंतून हळूहळू सुधारून आजच्या सुसंस्कृत अवस्थेंत आला. राजवाडे यांच्या मतें हा समज निराधार आहे. खरी स्थिति अशी आहे कीं इतिहासास माहिती असणाऱ्या दहापंधरा हजार वर्षांच्या काळांत मनुष्यसमाज कोठें ना कोठें तरी सुसंस्कृत असलेला आढळतो व या सुसंस्कृत समाजाच्या बरोबरीनें येण्याचा प्रयत्न पृथ्वीवरील इतर रानटी समाज करीत असतात.

राजवाड्यांच्या मतें कोणताहि मनुष्यसमाज अनंत काल राहू शकणार नाहीं. हा आणखी एक अर्धवट ग्रह युरोपीयन इतिहासकारांचा आहे. लो. टिळकांच्या

१.– ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ३११

ध्रुव सिद्धान्ताचा आधार घेऊन राजवाडे यांनीं याविरुद्ध म्हटलें आहे कीं पृथ्वीच्या पाठीवर पूर्वप्रलयीन कालापासून वर्तमानकालपर्यंत अव्याहत टिकलेलें कांहीं मनुष्यसमाज आहेत. भारतवर्षीय आर्य समाज, पारशी समाज हे दीर्घ कालपर्यंत टिकून राहिलेले दिसतात. तेव्हां 'No people may hope to live eternally' या हेल्मॉटच्या सिद्धान्तावर राजवाडे यांचा विश्वास नाहीं. चातुर्वर्ण्यामुळें आर्य समाज टिकून राहिल्याचा आपला आवडता सिध्दान्त राजवाडे येथें हळूच सांगून टाकतात. युरोपीयन इतिहासकारांनीं आणखी एक समज दृढ केला आहे कीं युरोपांतील कांहीं समाज हे आर्य आहेत. राजवाड्यांचे मतें युरोपीयन समाज जातीनें, आचारानें, धर्मानें, आर्यांपेक्षां निराळेच आहेत. कदाचित आर्यांच्या सहवासांत आजच्या युरोपीयन समाजाचे पूर्वज निकटत्वानें आले असतील. आर्यांबरोबरील युद्धांत पराजित झाले असतांहि दनु–दस्यु रक्षस व यातु हे आर्यांचे प्रथमपासूनचे शत्रु; राजवाडे यांच्यामतें हे सर्व समाज युरोपांतील आधुनिक राष्ट्रांच्या पूर्वप्रलयकालीन पूर्वजांचे होत. त्यांनीं आर्यांच्या भाषेंतील अनेक शब्द उचलले म्हणून ते आर्य नव्हते.

युरोपियन इतिहासकारांची आणखी एक खोड अशी कीं जें जें पुरातन व उत्तम त्याचा आपल्या समाजाशीं बादरायण संबंध लावण्याचा हव्यास पाश्चात्य इतिहासकारांना नेहमींच असतो. संस्कृत भाषेच्या परिचयामुळें ग्रीकांच्याहि आधीं असणाऱ्या आर्यांशीं ते आपला संबंध जोडू पाहतात. सत्यापेक्षां स्वजातिगौरवाची ही पद्धति राजवाड्यांना बिलकूल मान्य नाहीं. पाश्चात्य इतिहासकार आपला अधिकार सोडून निरनिराळीं भाकितें करतात, हेंहि राजवाड्यांना मान्य नाहीं. युरोपीयन समाज सर्व पृथ्वी पादाक्रांत करणार हें भाकित इतिहासकारांस शोभत नाहीं. तो त्यांचा अधिकार नाहीं. त्यांनीं निर्भेळ सत्य सांगावें; स्वार्थी भाकितें करूं नयेत. सर्व प्रकारचे पूर्वग्रह सोडून इतिहासलेखकानें आपली भूमिका निर्लेप व निरंहकारी कशी ठेवावी हें सांगतांना राजवाडे यांनीं वरीलप्रमाणें कोणतें पूर्वग्रह सोडणें अगत्याचें आहे त्याचेंहि विवेचन आवर्जून केलें आहे. सर्व पूर्वग्रह विसरून निर्भेळ इतिहास म्हणजे फक्त झालेल्या प्रसंगांची विश्वसनीय हकीगत देणें होय. कालाचें पौर्वापर्य लावून व प्रसंगांचें कार्यकारणत्व सिद्ध करून भूत गोष्टी अशा अशा सातत्यानें झाल्या इतकें सांगितलें म्हणजे इतिहासाची कामगिरी आटोपली. इतिहासाचें काम आवडनिवड किंवा स्तुतिनिंदा न करतां किंवा आपलें मत न देतां झाली गोष्ट जशीच्या तशी नमूद करणें एवढेंच होय. सद्‌गुणांचा व दुर्गुणांचा विचार इतिहासांत येत नाहीं. राजवाड्यांच्या मतें इतिहास भूतवृत्ताचा विश्वसनीय सारांश देतो; व नीतिशास्त्र त्याचें उत्तमाधत्व ठरविते. पाश्चात्य इतिहासकारांचे पूर्वग्रह व भ्रामक कल्पना कोणत्या हें सांगतांना याप्रमाणें राजवाडे यांनी इतिहासाचें वास्तविक रूप समजावून दिलें आहे.

जगाच्या इतिहासाचें खरें रूप ध्यानांत घेण्यासाठीं पुढील बाबींचा विचार महत्त्वाचा मानावयास हवा. (१) वर्तमान क्षणापर्यंतचा सर्व भूतकाल हा त्याचा काल. (२) पृथ्वीवरील सर्व देश हें त्याचें स्थल. (३) नष्ट व सर्व विद्यमान मानवसमाज हे त्याचे विषय. (४) स्वतःच्या किंवा समाजाच्या अभिमानाला धरून कोणत्याहि पूर्वग्रहांना थारा न देतां इतिहासाचें लेखन व्हावयास हवें. नीति, धर्म वगैरे शास्त्रांतील चलग्रहांच्या भरीस न पडतां लेखन व्हावयास हवें. हकीगतींवर अभिप्राय देणें व इष्टानिष्टता भासविणें हें काम इतिहासकारांचें नाहीं. (५) निर्मत्सर, तटस्थ, निरंहकार व निर्लेप वृत्तीनें हकीगत इतिहासांत यावयास हवी. याच हकीगतीचा इतिहास खरा व विश्वसनीय म्हणावा लागेल. हेंच राजवाडे यांच्या मतें इतिहासाचें वास्तव स्वरूप.

इतिहासाच्या स्वरूपाविषयीं विचार झाल्यावर तो लिहिण्याची सशास्त्र पद्धति कोणती यासंबंधीं राजवाडे यांनीं चर्चा केली आहे. राजवाड्यांच्या मतें इतिहास-लेखनाच्या पद्धती तीन, एक कालानुक्रम पद्धति, दुसरी दैशिक पद्धति व तिसरी कौलिक पद्धति. पहिल्या पद्धतींत ऐतिहासिक कालापासून दरवर्षीं किंवा दर शंभर वर्षांनीं पृथ्वीवर काय काय वृत्तें घडलीं त्यांची कालानुक्रमानें हकीगत येते. तोडून घेतलेल्या कालखंडांत कालानुक्रमानें कोणकोणत्या गोष्टी घडल्या त्याची नोंद या पद्धतींत होते. राजवाडे यांच्या मतें ही पद्धति फारशी प्रशस्त नाहीं. दुसऱ्या पद्धतींत विवक्षित देशांचा इतिहास येतो. हीहि पद्धति राजवाड्यांना मान्य नाहीं. कारण देशाचा म्हणजे देशांतील लोकांचा इतिहास असतो. त्यांच्या मतें इतिहास निव्वळ कालाचाहि लिहावयाचा नसतो किंवा देशाचाहि लिहावयाचा नसतो. इतिहास लोकांचा म्हणजे मानवसमाजाचा लिहावयाचा असतो. मनुष्य समाजाच्या धोरणानेंच इतिहास लिहिला असता तो सुबोध, सुसंगत व स्पष्ट होतो. पूर्वप्रलयीन कालापासून असें आढळून आलें आहे कीं मनुष्यसमाजांत निरनिराळीं कुलें आहेत व निरनिराळ्या कुलांच्या चालीरीती, भाषा, धर्म, हेतु, व नीति कमीजास्त मानानें भिन्न आहेत. ही निरनिराळीं कुलें अंतःप्रवृत्तीनें किंवा कुलान्तरांच्या स्पर्शानें वाढलीं कशीं, सुसंस्कृत कशीं झालीं, मेलीं कशीं, जगलीं कशीं, स्तब्ध कशीं राहिलीं आणि मिश्र किंवा शुद्ध बनलीं कशीं हें पाहावयाचें म्हणजे ह्या कुलांचा इतिहास अथपासून इतिपर्यंत दिला पाहिजे. यालाच मराठींत कौलिक व युरोपीयन भाषेत Ethnographic पद्धति म्हणतात.[1] या पद्धतीनेंच मानवी समाजाचा सर्वोत्तम इतिहास निर्माण होईल असें राजवाडे यांना वाटतें. या पद्धतींत मानवी समाजाच्या मुख्य कुलांच्या व उपकुलांच्या उलाढालींची विश्वसनीय हकीगत येते.

१–ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ, ३२१

दिक्कालांच्या आवरणाखालीं मानव कुलांच्या हालचालींची जी विश्वसनीय हकीगत तो इतिहास होय.

राजवाडे यांनीं केलेलें या पुढचें विवेचन त्यांच्या सूक्ष्मदर्शी व मूलगामी विचारशक्तीचें द्योतक आहे. व्यक्ति, वर्ग, लोक, राष्ट्र, उपकुल व कुल यांच्या हालचाली तरी किती प्रकारच्या संभवतात? त्या प्रामुख्यानें दोन प्रकारच्या असतात. एक अंतस्थ म्हणजे खाजगी वर्गाची. केवळ वर्गांतल्या वर्गांत जी चळवळ ती अंतस्थ व दुसरी बहिस्थ. हींत वर्गाची इतर वर्गाशीं घसट येते. प्रत्येक समाजाला अंतस्थ व बहिस्थ असा दोन प्रकारचा इतिहास असतो. राजवाडे यांच्या मतें दानव, असुर, मोगल, आर्य, आफ्रिकन, अमेरिकन, व पालिनेशियन, अशी सात मानवकुलें पृथ्वीवर सध्यां आहेत. यांतील कांहीं दुर्बल व कांहीं सबल आहेत. यांचे अंतःस्थ व बहिस्थ जे व्यवहार ते समग्र मानवेतिहासांत येतात. राजवाडे यांनीं अखिल मनुष्य जातीचे कुल, उपकुल, राष्ट्र, लोक, वर्ग, व्यक्ति यांप्रमाणें विभाग केले असून या विभागांनुसार म्हणजे कौलिक पद्धतीनें इतिहास लिहिल्यास व्यवस्थित होतो असें सांगितलें आहे. व्यक्तीचा इतिहास लिहावयाचा म्हणजे तिचें चरित्र व तिच्या शरीरयंत्राच्या सबलत्वाची वा दुर्बलत्वाची हकीगत द्यावी लागते. त्याचप्रमाणें वर्ग, लोक, राष्ट्र इत्यादींच्या इतिहासांतहि त्यांच्या शरीरयंत्राची माहिती द्यावी लागते. त्यांच्यांत राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक वगैरे निरनिराळ्या संस्था उत्पन्न होतात. ह्या संस्थांचा इतिहास म्हणजे एक प्रकारचा त्यांच्या शरीरयंत्राचा इतिहासच. समाज व संस्था ह्यांच्या शरीरयंत्राची हकीकत देण्याच्या पद्धतीस शारीरक पद्धति असें नांव आहे.

या शारीरक पद्धतीचा विचार करतांना राजवाडे आणखी खोलांत शिरले आहेत. समाजानें कोणत्याहि कर्माला प्रवृत्त व्हावयाचें म्हणजे त्याला अगोदर आपलें शरीर निर्माण करावयास हवें. वासना, शरीर व कर्म अशी मानवसंस्थांच्या चरित्राची विविध परंपरा आहे. प्रथम कर्म करण्याची वासना निर्माण होते; मग कर्म ज्याच्या द्वारां व्हावयाचें तें शरीरयंत्र निर्माण होतें आणि शेवटीं संकल्पित कर्म निर्माण होतें. वासना–शरीर–कर्म या त्रयीमुळेंच व्यक्ति, वर्ग, राष्ट्र यांच्यांत हालचाली निर्माण होतात. ज्यांच्या वासना अस्पष्ट त्यांचें शरीरयंत्रहि अस्पष्ट व ज्यांच्या राज्यवासना स्पष्ट, प्रबळ व व्यवस्थित त्यांचें शरीर यंत्र प्रबळ व त्यांचीं कर्मेंहि प्रबळ असतात. समाजसंस्थांच्या शरीराच्या उत्पत्तीचें प्रधान कारण म्हणजे तद्‌घटक व्यक्तींच्या वासना होत. पोषण, संरक्षण, प्रजोत्पादन, प्राजाशिक्षण ह्या मानवाच्या मुख्य वासना व यांच्या साधनार्थ त्यांचे संघ होतात. पोषण, उत्पादन व शिक्षण हीं अप्रतिबंध चालावींत; एतदर्थ संरक्षणार्थ राज्यसंस्था व धर्मसंस्था निर्माण होतात. आजपर्यंत ज्या ज्या म्हणून संस्था निर्माण केल्या आहेत, त्यांतील बहुतेकांचें मूळ मनुष्याच्या वासनेंत आहे.

या वासना संस्थायंत्राच्या द्वारें फलद्रूप होतात. तेव्हां संक्षेपानें असें म्हणतां येईल कीं, वासना-यंत्रणा-व साधना किंवा इच्छा-शरीर-कर्म अशी मानव-समाजाच्या चळवळींची जी विविध परंपरा आहे, तिच्या हकीगतीस इतिहास म्हणतात.

वासनांतून शरीरयंत्र व शरीरयंत्रांतून कर्मशृंखलेचा विस्तृत विचार झाल्यानंतर राजवाडे यांनीं आणखी तपशीलांत व खोलवर जाऊन प्रश्न उपस्थित केला आहे कीं या वासना तरी किती प्रकारच्या असतात? राजवाड्यांच्या मतें दोन प्रकारच्या: एक विकारोद्भूत वासना, दुसऱ्या विचारोद्भूत वासना. या दोन्ही प्रकारच्या वासनांच्या फलद्रूपार्थ संस्थायंत्रें निर्माण होतात. शत्रुत्वबुद्धीनें किंवा अन्नार्थ मनुष्य, पशू, पक्षी यांची हत्या करण्याकरितां किंवा परदेश, परदारा अपहरणार्थ राज्य, सैन्य वगैरे यंत्रें उभीं राहतील. त्याचप्रमाणें सदयता, सभ्यता, ज्ञानसंपन्नता यांच्या वाढीसाठींहि जाणून बुजून विचारपूर्वक प्रयत्न होत असतात. पहिल्या प्रकारांत वासना विकारोद्भूत असतात; दुसऱ्यांत विचारोद्भूत असतात. कधीं विकार आणि विचार यांच्या सीमा ओळखणें कठिण असतें. या विचारांचा वा विकारांचा इतिहास देणें म्हणजे एका कल्पनेची वा विचाराची अभिवृद्धि कशी झाली याची हकीगत देणें होय. इतिहासाचा संबंध येथून सुटतो. मानव समाजाच्या चरित्राचा जो वृत्तान्त तो इतिहास व त्या समाजाच्या गतिस्थितीच्या कार्यकारणांची ती नियम-परंपरा तीस मानवसमाजशास्त्र असें नांव आहे; आणि यासच लोक चुकीनें सायन्स ऑफ् हिस्ट्री अशी संज्ञा देतात. राजवाडे यांना सायन्स ऑफ् हिस्ट्रीपेक्षां मेथड ऑफ् हिस्ट्री महत्त्वाची वाटते.

यानंतर राजवाडे यांनीं मानवी प्रपंच, तत्त्वज्ञानाची निर्मिति व त्यायोगें होणाऱ्या मानवी हालचालींचें महत्त्व यांची चर्चा केली आहे. तत्त्वज्ञानाचा अथवा तात्त्विक कल्पनांचा व प्रपंचाच्या अथवा मानवसमाजाच्या चरित्राचा संबंध बिंबप्रतिबिंबरूप आहे. तें तात्विक बिंब मनांत उत्पन्न होतें त्याचें प्रतिबिंब समाजांत प्रतिफलित होतें. भगवान बुद्ध, गीता, महाराष्ट्राधर्म, रामदासी पंथ, चिपळूण-कर पंथ यांची चर्चा करून राजवाडे यांनीं त्या त्या तत्त्वाप्रमाणें समाजांत जी ढवळा-ढवळ झाली तिचा निर्देश केला आहे. या प्रमाणें तत्त्वज्ञानाचा परिणाम समाजा-वर होत असतो असें सांगून राजवाडे म्हणतात कीं जोंपर्यंत सायन्स ऑफ हिस्ट्री म्हणजे समाजशास्त्र निर्माण झाले नव्हतें तोंपर्यंत तत्त्वज्ञानाचा पगडा समाजावर असतो. परंतु नियमांनीं बद्ध अशा शास्त्रांचा उदय जसजसा होत राहील तसतसा स्वैरसंचार करणाऱ्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्या मतें अस्त होईल.

आणि जोंपर्यंत तत्त्वज्ञानाची छाप समाजावर आहे तोंपर्यंत त्याची प्रगतीहि यथातथाच होणार. तत्त्वज्ञानाची ऐतिहासिक दृष्टीनें राजवाडे यांनीं थोडीफार चर्चा यानंतर केली आहे. त्यांच्या मतें युरोपांतील ऐतिहासिक तत्त्वज्ञांच्या

दोन शाखा आहेत. पहिल्या पद्धतींत विवेचक पद्धतीनें हजारों ऐतिहासिक प्रसंगांची छाननी करून अनुनय पद्धतीनें सदर प्रसंगांची कार्यकारणपरंपरा शोधीत सामान्य कारणापर्यंत जातां येतें. या शाखेला A posteriori वा inductive नांव देतां येईल. दुसऱ्या शाखेंत तत्त्वज्ञांनीं स्वतंत्र रीतीनें कल्पिलेल्या सर्वसामान्य आदि कारणाचा स्वीकार करून त्याचा परिष्कार मानवसमाजाच्या चरित्रांतील प्रसंग-समूहावर व प्रत्येक प्रसंगावर कसा झाला आहे तें निर्णय पद्धतीनें करून दाखविलें जातें. या शाखेस A priori अथवा deductive अशी संज्ञा आहे. राजवाड्यांच्या मतें पहिली अनुनयपद्धति शास्त्रीय विचाराला अधिक जवळची आहे तथापि दुसऱ्या निर्णायक पद्धतीनें प्रपंचाचा सामग्र्यानें अर्थ कळण्यास मदत होते. मनाला शांति व समाधान प्राप्त होतें. हेंच या पद्धतीच्या साम्राज्याचें बीज आहे. प्रपंच्याच्या दाहानें तप्त व उद्विग्न झालेल्या व्यक्तींच्या मनाला समाधान याच पद्धतीमुळे मिळतें. निर्णायक पद्धति समाजाच्या स्थैर्याला पोषक आहे तर अनुनायक पद्धति समाजाच्या गतीला अनुमोदक आहे. अनुनायक पद्धतीचा अवलंब करणारे समाजशास्त्रीय व निर्णायक पद्धतींचा अवलंब करणारे केवळ काल्पनिक तत्त्वज्ञ होत. पहिले पायाकडून अज्ञेय शिखराकडे जातात, व दुसरे काल्पनिक शिखराकडून पायाकडे येत आहेत. व्यावहारिक सत्य पहिल्याच्या बाजूस आहे. तात्त्विक सत्य दुसऱ्यांच्या पक्षाला आहे.[1]

ऐतिहासिक तत्त्वज्ञानाच्या अनुनायक व निर्णायक या दोन युरोपीय शाखांचा परिचय करून दिल्यानंतर राजवाडे भारतीय तत्त्वज्ञानाकडे वळले आहेत. त्यांच्या मतें भारतांत निर्णायक अथवा पूर्वग्रहात्मक पद्धतीचेंच राज्य निरंतर चालू आहे. या निर्णायक पद्धतीच्या पुनः दोन उपशाखा भारतवर्षांत आहेत. सर्व चराचर सृष्टीशीं समबुद्धि ठेऊन चालणारी एक शाखा आहे. जन्म हें महा दुःखाचें कारण आहे, देहत्याग करावा, ब्रह्मांत लीन व्हावें, असें या शाखेस वाटतें, प्रपंच, संसार, समाज, राष्ट्र, राष्ट्रयंत्र, धर्ममंत्र, व्यक्ति स्वातंत्र्य, सामजिक संस्था यांचा संपूर्ण तिटकारा या शाखेच्या मनांत आहे. परब्रह्मांत विरून जाण्यासाठी समबुद्धीनें वागणें एवढेंच महत्त्वाचें ही शाखा मानते. या शाखेचा पुरस्कर्ता राजवाडे यांच्या मतें महाराष्ट्रांत ज्ञानेश्वर आहे. या शाखेच्या प्रभावामुळें राष्ट्रीयत्वाचा लोप झाल्याचें मत राजवाडे यांनीं ऐतिहासिक विवेचन करतांना दिलें आहे. 'ही ग्यानबा तुकारामाची जोडी महाराष्ट्रांतील समाजाच्या व राष्ट्राच्या प्रपंचाला बहुत घातक झालेली आहे' असें आपलें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. भारतांतील निर्णायक पद्धतीची दुसरी शाखा अधिक विचारी आहे. ती प्रवृत्तिवादी आहे. प्रपंचाचा महिमा या शाखेनें सांगितला आहे. रामदास या शाखेचा प्रमुख असून समर्थपणें प्रपंचाविषयीं बोलणाऱ्या

१–ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ३४०

या शाखेचा अभिमान खऱ्या इतिहासकारास शोभणार नाहीं इतका राजवाडे यांना आहे. उत्तम परमार्थ साधण्यास उत्तम प्रपंच साधला पाहिजे असा रामदास स्वामींचा आग्रह असे. कोणत्याहि लोकसमाजाच्या इतिहासावर तत्त्वज्ञानाची छाप किती व कशी असते याचें राजवाडेप्रणीत विवेचन आजहि मोठें उद्‌बोधक असें आहे.

इतिहासाचें खरें स्वरूप काय आहे, त्याची लेखनपद्धति कशी असावी, त्याचे विषय, त्याचें स्थळ, त्याचें स्थान, तत्त्वज्ञानाशीं त्याचा संबंध, इत्यादि विषयांची प्रौढत्त्वास शोभणारी व मूलगामी चर्चा करून झाल्यावर राजवाडे यांनीं आपल्या देशांत इतिहासलेखनाची प्रवृत्ति कशी आहे याचा स्थूल आढावा घेतला आहे. इतिहासांचे प्रकार किती असू शकतात याचेंहि संक्षिप्त विवेचन येथें त्यांनीं केलें आहे; आणि महाराष्ट्रांतील सामाजिक वा ऐतिहासिक तत्त्वज्ञानाकडे त्यांनीं भेदकपणें दृष्टि दिली आहे. पुढें राधामाधवविलासचंपूंत ज्या विषयाचा विस्तार त्यांनीं केला आहे त्याचा निर्देश या संदर्भांत येथें संक्षेपानें आलेला आहे. आपल्याकडे प्रामुख्यानें विचार झाला तो अध्यात्माचा, परमार्थाचा. फ्रेंच तत्त्वज्ञ ऑगस्ट कोंटनें म्हटल्याप्रमाणें मनुष्य समाज तीन पायऱ्यांनीं विकसित होतो. पहिली धार्मिक विचारांची पायरी असते. दुसरी तात्त्विक विचारांची असते. तिसरी शास्त्रीय विचारांची असते. राजवाडे यांच्या मतें आपण तूर्त दुसऱ्या पायरीवर आहोंत. अव्वल इंग्रजीच्या काळापासून थोडीथोडी शास्त्रीय विचारांची स्थिति निर्माण होण्याचीं चिन्हें त्यांना दिसतात. याच प्रवृत्तींतून चिपळूणकर, कीर्तने, रानडे यांनीं इतिहासविषयक आस्था दाखविली आहे. पण इतिहासाचें साधनसंशोधन, साधनसंग्रह, साधनप्रकाशन असें त्रिविध कार्य पूर्ण होण्यास तज्ज्ञ माणसांचें व द्रव्याचें केवढें साह्य आवश्यक आहे या संबंधींचें स्वतःचें मनोराज्य सांगून राजवाडे यांनीं आपली इतिहासमीमांसेवरील ही तेजस्वी प्रस्तावना संपविली आहे.

राजवाडेकृत इतिहासमीमांसेची मीमांसा करण्यापूर्वीं इतिहासाचें स्वरूप वा लेखनपद्धति याबद्दल राजवाडे यांनीं आणखी कांहीं मुद्दे इतरत्र उपस्थित केले आहेत, त्यांचा येथें संक्षेपानें उल्लेख करावयास हवा. साधनखंडाच्या पहिल्या भागास प्रस्तावना लिहितांना ग्रँट डफचा इतिहास बरबर विचार करणारा असल्यामुळें मराठ्यांचा खरा इतिहास त्यास म्हणता येणार नाहीं; हा मुद्दा मांडतांना राजवाडे यांनीं इतिहासलेखनाच्या दोन पद्धती सांगितल्या आहेत. एक आत्मिक पद्धति व दुसरी भौतिक पद्धति. कोणत्याहि राष्ट्राच्या चरित्राचा सांगोपांग विचार करावयाचा म्हटलें म्हणजे तो अनेक दृष्टींनीं केला पाहिजे. धर्म,

१–कित्ता, पृष्ठ ३४१

नीति, विद्या, समाज, व्यापार, कृषि, कलाकौशल्य, कायदेकानू, राजकारण यांसाठीं केलेल्या अंतस्थ व बहिस्थ खटपटी इतक्या सर्वांच्या प्रगतीचा किंवा विगतीचा कालक्रमानें यथास्थित, बांधेसूद, पद्धतवार व सप्रमाण विचार केला जाऊन तो पुनः आत्मिक व भौतिक रीत्या झाला म्हणजे राष्ट्राचें चरित्र समग्र कळलें असे होतें. धर्म, नीति, विद्या, राजकारण इत्यादि राष्ट्रीय अंगांचा कार्याच्या रूपानें विचार भौतिक पद्धतींत येतो व कारणरूपानें विचार करणें आत्मिक पद्धतींत येतें. भौतिक पद्धतीनें कोणत्याहि राष्ट्राच्या राजकीय गतिस्थितींचा विचार करावयाचा म्हणजे त्या राष्ट्रांत झालेल्या अंतस्थ कलहांचीं व बहिस्थ कलहांचीं वर्णनें द्यावयाचीं; म्हणजे राष्ट्रांतील बंडांचीं, निरनिराळ्या पक्षांच्या, वर्गांच्या व जातींच्या चढाओढींचीं व परराष्ट्रांशीं झालेल्या लढायांचीं वर्णनें द्यावयाचीं ; आणि आत्मिक पद्धतीनें राष्ट्राच्या राजकीय गतीस्थितींचा विचार करावयाचा म्हणजे अंतःस्थ व बहिस्थ कलहांच्या उत्पत्तीचीं कारणें त्या राष्ट्रांतील एकंदर लोकसमूहांत आत्म्याच्या उन्नतावनत वृत्तींपैकीं कोणत्या वृत्तींचें विशेष प्राबल्य आहे त्याचा सूक्ष्म विचार, त्या राष्ट्रांतील मोठमोठ्या तटांच्या पुरुषांच्या राजकीय मतांचें सशास्त्र दर्शन इत्यादि प्रश्नांची चर्चा करावयाची. याप्रमाणें राष्ट्राच्या गतिस्थितीचा भौतिक व आत्मिक दृष्ट्या जो विचार त्यासच राष्ट्राचा राजकीय इतिहास म्हणतात.[१]

आत्मिक पद्धतीची अधिक तपशीलवार चर्चा प्रस्तावनाखंडाच्या चौथ्या विभागांत राजवाडे यांनीं केली आहे. इतिहासाचें मुख्य प्रयोजन सांगतांना राजवाडे लिहितात कीं, व्यक्तींच्या हातून विशिष्ट काळीं व विशिष्ट स्थळीं घडलेल्या अनेक प्रसंगांचें मुद्देसूद, तपशीलवार व व्यवस्थित वर्णन देतां देतां विशिष्ट काळीं व विशिष्ट देशांत कोणत्या महाविचाराची कशी उत्क्रांति झाली व काय परिणाम झाले हें वर्तमान व भावी पिढ्यांना दाखवून देण्याचें भूत व वर्तमान इतिहासाचें मुख्य काम आहे. इतिहासाची निर्मिति होत असतां अनेक कालांशीं घटित जो कालाचा महाभाग, ज्यास (Epoch, Age) मन्वंतर वगैरे संज्ञा देतात त्यांत कोणत्या विचाराचें प्राधान्य आहे हें सहज समुद्भूत होतें. ह्या विचारापासूनच वर्तमान व भावी पिढ्यांना गतकालीन पिढ्यांचें कर्मसंततीचें ज्ञान होतें. गतकालीन पिढ्यांच्या कर्माचें जें ज्ञान–ज्यास युगमाहात्म्य Spirit of the Age, Esprit d'epoc म्हणतात त्यासच इतिहासाचा आत्मा म्हणतात. राजवाडे यांनीं या युगमाहात्म्याचा विचार शिवकालीन परिस्थितीचा विचार करतांना, याच खंडांत पुढें केलेला आहे. या काळाचा महाविचार म्हणजे महाराष्ट्रधर्माचा प्रसार हा होय. या एका विचारानें सर्व मराठ्यांचीं मनें या काळीं प्रभावित झालीं होतीं म्हणून या विचारास युगमाहात्म्याचा विचार म्हणतां येईल.

१.– ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ २७—२८

एखाद्या कालखंडाचा वा राष्ट्राचा इतिहास त्या कालाचें वा राष्ट्राचें युग-माहात्म्य सांगण्यास प्रवृत्त होत असतो, याचा अर्थ असा कीं त्या त्या काळांत प्रसिद्ध असणाऱ्या महाविचारांचा निर्देश करणें व त्याच्या अनुरोधानें गतीस्थितींची हकीगत देणें हें इतिहासाचें एक प्रमुख कार्य राजवाडे यांनीं मानलें आहे; आणि हें काम तरी इतिहासानें कां करावयाचें? इतिहासाचा हेतु वा उपयोग कोणता? राजवाडे यांनीं स्पष्टपणें लिहिलें आहे कीं, "विष्णुशास्त्री चिपळोणकर म्हणतात त्या प्रमाणें उच्च प्रतीची करमणुक हाच केवळ इतिहासाचा उपयोग नाहीं. स्वसमाजाचें सबीज व सकारण चरित्र काढलें असतां सामाजिक गुणदोष दृष्टयुत्पत्तीस येतात आणि दोषांचा त्याग व गुणांचा परिपोष करण्याकडे प्रवृत्ति होते. दोषत्याग व गुणपरि-पोष हा इतिहासज्ञानाचा मुख्य उद्देश आहे."[१] इतिहासाच्या कार्याविषयीं, उद्देशां विषयीं अधिक स्पष्टीकरण देतांना राजवाडे यांनीं लिहिलें आहे; 'ज्या लोकांची स्वचरित्रांची स्मृति हारपली ते लोक मृतवत् असून पाहावें तेव्हां सदाच मूढावस्थेंत असल्या सारखे दिसतात...स्मृति जाज्वल्य तऱ्हेनें जागृत असली म्हणजे गत चरित्राचा आढावा घेतां येतो, आढावा घेतां आला म्हणजे आपले राष्ट्रीय गुणदोष कळू लागतात. आणि गुणदोष कळले म्हणजे दोषांचा बीमोड करून गुणांचा परिपोष करण्याकडे सहज प्रवृत्ति होते. राष्ट्राचा इतिहास म्हणजे राष्ट्रांतील सर्व लोकांच्या संकलित चरित्राची हकीगत. ती लोकांपुढें मांडिली असतां सर्व लोकांना समान स्मृतित्वामुळें ऐक्याची व बंधुप्रेमाची भावना होतें.[२] आणि याच भावनेनें प्रेरित होऊन राजवाडे इतिहाससंशोधनाच्या कामास प्रवृत्त झाले होते. साधनांचा पहिला खंड प्रसिद्ध होत असतांनाहि त्यांनीं हेंच स्पष्टपणें सांगितलें आहे. पूर्वजांच्या निर्गुण मोठेपणाचें सामान्य जनांस ध्यान करतां येत नाहीं; तेव्हां हें मोठेपण सगुण व साकार झालें असतां, म्हणजे या मोठ्या पुरुषांनीं कोणकोणते पराक्रम केले ह्याची तारीखवार माहिती मिळाली असतां लोकांना त्यांच्या मोठेपणाची व्यवस्थित कल्पना येईल आणि यामुळें गुणपरिपोष व दोषत्याग यांचें कार्य होत राहील अशी राजवाडे यांची कल्पना.

आपल्या साधनखंडांना प्रस्तावना लिहितांना राजवाडे यांनीं इतिहासाचा हेतु, त्याचें स्वरूप, त्याच्या लेखनपद्धती इत्यादींचा उहापोह विस्तारानें केला आहे; त्याचें संक्षेपानें दर्शन आपण घेतलें. याशिवाय साधनसंशोधन, संशो-धकाचे गुण यांसारख्या विषयांवरहि त्यांनीं पुष्कळ लिहिलें आहे. या दृष्टीनें 'संशोधनाची सद्यःस्थिति' व 'संशोधनाच्या पायऱ्या' हे दोन लेख[३] वाचण्या-

१–ऐतिहासिक प्रस्तावना: पृष्ठ ३६०

२–कित्ता: पृष्ठ ४६४

३–इतिहास व ऐतिहासिक, भाग पहिला : ऐतिहासिक विविध विषय, खंड पहिला, पृष्ठ ४–२९

सारखे आहेत. आपल्याकडील इतिहाससंशोधनाची राजवाडेकृत मीमांसा आपण या पूर्वीच पाहिली आहे. या नंतर सन १९२५ सालीं म्हणजे निधनापूर्वी एक वर्ष राजवाडे यांनीं पुण्याच्या विद्यासेवक मासिकांत मार्च १९२५ पासून 'भारतीय इतिहासाचीं मूलतत्त्वें' नांवाची एक लेखमाला सुरू केलेली दिसते. ही पूर्ण झालेली नाहीं, तरी पहिला लेख मोठ्या तोलाचा म्हणावा लागेल. या लेखांत भारताचा इतिहास म्हणजे भारतीय लोकांचा इतिहास हें त्यांनीं पुनः आवर्जून सांगितलें आहे. भारतीयांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक, वैय्यापारिक एकोनएक हालचालींचा परामर्श भारतीय इतिहासांत येणें अगत्याचें आहे. असें सांगून 'इतिहास' शब्दाचे अर्थ त्यांनीं पुनः सांगितले आहेत. गतकालीन कृत्यें व या कृत्यांच्या परंपरित वर्णनास इतिहास म्हणतात; आणि या इतिहासाची मूलतत्त्वें म्हणजे कृत्यपरंपरेचीं मूल कारणें. मूलकारणें दोन प्रकारचीं ; बाह्य व अंतर. मनुष्याच्या पिंडावर बाह्य सृष्टीचे आघात होतात. आघातांचें सातत्य होऊन मनोरचना बनते. सृष्टि ही मनोरचनेचे ऊर्फ स्वभावाचें बाह्य कारण होतें आणि कृत्यरूपानें फलद्रूप होणारा स्वभाव कृत्यांचें अंतर कारण ठरतें.[1]

राजवाडेकृत इतिहासमीमांसेचें हें असें थोडक्यांत स्वरूप आहे. या मीमांसेचें परीक्षण करण्यापूर्वी राजवाडे ज्या पाश्चात्य इतिहासकारांच्या वाचनानें प्रभावित झाले त्यांचा ओझरता परिचय करून घेणें अगत्याचें आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे इतिहास, आमच्या देशाची स्थिति, काव्येतिहाससंग्रह या सारखे मासिक यांसारख्यांच्या वाचनानें राजवाडे प्रथम प्रभावित झालेले आपण पाहिलेंच आहे. पण राजवाडे यांनीं आपल्या आत्मनिवेदनांत नमूद केलें आहे त्यावरून यूरोपचा इतिहास, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, राजनीतिशास्त्र, तर्कशास्त्र, मानसशास्त्र यांवरील प्राचीन व अर्वाचीन अस्सल व भाषांतरित ग्रंथ त्यांच्या वाचनांत परिश्रमपूर्वक आलेले होते. युरोपचा इतिहास अर्थात्च इंग्रजीमधून राजवाडे यांनीं सन १८९० पर्यंत म्हणजे बी. ए. होईपर्यंत वाचला होता. पुढे दहाबारा वर्षांनीं म्हणजे १९०२,-३ सालीं त्यांनीं आपण वाचलेल्या निरनिराळ्या इतिहासांचें व इतिहासविषयक चर्चांचें मनन केलें असावें. परदेशी लेखकांचें अनुकरण राजवाडे यांच्या हातून होणें कदापि शक्य नव्हतें; उलट युरोपीयन इतिहासकार कुठें कुठें चुकले व भ्रमांत राहिले याचाच पाढा त्यांनीं प्रथम वाचला आहे. परंतु विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या काळानंतर युरोपमध्यें भौतिक विद्यांच्या अभ्यासांना जो बहर आला, त्यांतून जें नवें सामर्थ्य उभें राहिलें, बलशाली राष्ट्रांची जी परंपरा उभी राहिलेली त्यांनीं पाहिली त्या सर्व गोष्टींनीं मात्र राजवाडे भारावलेले दिसतात. युरोपीय शास्त्रांचा अभ्यास आपण केल्याशिवाय, बुद्धिवादी दृष्टिकोणांतून आपण आपल्या

१–राजवाडे लेख संग्रह, भाग २ : पृष्ठ ३

समाजाची मांडणी केल्याशिवाय आपणांस तरणोपाय नाहीं. खऱ्या प्रवृत्तिधर्मांची उपासना भौतिक शास्त्रांच्या साह्यानें आपण करावयास हवी, हा आग्रह राजवाडे यांनीं जो धरला त्याच्या पाठीमागें पाश्चात्य विचार पूर्णपणें होता हें कबूल करावयास हवें. नव्या विद्यांची विचारपूस आपण केली नाहीं म्हणूनच आपण परतंत्र झालों असा त्यांचा सिद्धान्त आहे. साहजिकच शास्त्रशुद्ध रीतीनें इतिहासाची मीमांसा करावी ही प्रबल इच्छा राजवाडे यांची याच सिद्धान्ताच्या पोटीं निर्माण झाली; आणि इतिहासाचें शास्त्रशुद्ध विवेचन आपल्या तर परंपरेंत नाहीं; युरोपमधील भौतिकवादी विचारसरणी राजवाडे यांनीं पत्करलेली; अर्थात्च बुद्धिवादी, भौतिकवादी इतिहासकार व त्यांची इतिहासमीमांसा त्यांना जवळची वाटली. कोणाहि एका इतिहासवेत्त्यास वाट पुसत राहणें हें राजवाडे यांच्या स्वभावांतच नव्हतें, तरी हर्डर, हेगेल, गिबन, व्हिको, बकल, लीकी, हेल्मॉल्ट, फ्लिंट, स्पेन्सर, व्हाल्टेर, फ्रीमन, ऑगस्ट कोम्ट, इत्यादि इतिहासशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांचे उल्लेख राजवाडे यांच्या लिखाणांत वारंवार येतात. कधीं त्यांच्या मतांस राजवाडे यांनीं पुष्टी दिली आहे आणि बहुतेक ठिकाणीं त्यांच्यावर प्रखर टीका केली आहे. राजवाडे यांच्या या टीकेचें स्वरूप नीटपणें ध्यानांत येण्यासाठीं युरोपीयन इतिहासमीमांसकांची परंपरा लक्षांत घ्यावयास हवी.

सोळाव्या सतराव्या शतकांत भौतिक शास्त्रांची वाढ झाली. निरनिराळे शोध लागले, नवें भूमिसंशोधन झालें, व्यापारवृद्धि झाली, औद्योगिक क्रांतीचीं पावलें दिसूं लागलीं, यंत्रयुगाची पहांट झाली, या सर्व परिवर्तनाचें तत्त्वज्ञान भौतिक पायांवर उभें करण्यांत आलें. मार्टिन ल्यूथरपासून कार्ल मार्क्सपर्यंत या नव्या भौतिक व ऐहिक तत्त्वज्ञानाची परंपरा आहे. बेकन, देकार्त, लॉक, यांसारखे तत्त्वप्रतिपादक व कोपर्निकस, केप्लर, गॅलिलिओ, न्यूटन यांसारख्या शास्त्रज्ञांनीं प्रत्यक्ष निरीक्षण करून अनुनय पद्धति रूढ केली. शब्दप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य, धर्मनिष्ठा, पोथीनिष्ठा दूर होऊन सृष्टिरचनेची भौतिक मीमांसा, ऐहिक कार्यकारणभाव बुद्धिवादी दृष्टीनें करण्याची पद्धति सुरू झाली. व्हीको, व्हॉल्तेर, तुर्गो यांसारख्यांनीं या पद्धतीचा पुरस्कार केल्यामुळें इतिहासाची मीमांसाहि भौतिक पायावर होऊं लागली. या पद्धतीचा पहिला पुरस्कर्ता जिओव्हानी बातिस्ताविको (Giovani Baltistavico १६६८–१७४४) असून ह्यानें आपल्या ‘ नवें शास्त्र ’ (Scienza Nuova) या ग्रंथांत इतिहासाच्या दैवी, वीरात्मक, व मानवी अशी तीन अवस्था मानल्या आहेत. त्याच्या मतें मानवी युगांत प्रत्यक्ष ज्ञानाचें व मानवी प्रयत्नाचें अथवा राजकीय स्वातंत्र्याचें प्राबल्य असतें. याच्या मतें प्रगतीची रेषा सरळ नसून नागमोडी आहे.

यानंतर अठराव्या शतकांत **मॉन्टेस्क्यू** (Montesquieu १६८९–१७५५) व **व्हॉल्टेर** (Voltaire १६९४–१७७८) या दोन इतिहासवेत्त्यांनीं नव्या शास्त्रीय दृष्टीच्या इतिहासाचें शास्त्र विवरून सांगितलें. धर्मपंथ व राज्य-

विस्तार यांच्या बरोबरीनें व समाज, संस्कृति, संस्था, उद्योग, व्यापार, इत्यादि मानवी जीवनास यांचेमुळेंच इतिहासांत स्थान मिळालें. व्हॉल्टेरची निष्ठा बुद्धि व विज्ञान यांवर मुख्यतः होती. धर्मनिष्ठा, ईश्वरवाद, भोळाभाव यांवर त्यानें प्रखर टीका करून मानवी समाज कसा राहतो, वागतो, विचार करतो यांकडेच दृष्टि दिली. सर्व मानवी जीवनास त्यानें इतिहासांत स्थान दिलें. मानवी संस्कृतीचा उदय, आविष्कार व क्रम दाखविणें आणि मनुष्य मूढ स्थितींतून ज्ञानाच्या अवस्थेपर्यंत कसा गेला हें सांगणें हा इतिहासाचा उद्देश व्हॉल्टेरनें सांगितला. स्वतः व्हॉल्टेर ईश्वरनिष्ठ असला तरी इतिहास तसा असावा हें त्यांस मान्य नाहीं. त्याच्या मतें इतिहास हा मनुष्यांच्या विचारांचा, आकांक्षांचा, हेतूंचा, कल्पनांचा, संघर्ष व हालचाल आहे; आणि तो माणसांच्या प्रयत्नानें बनला आहे. व्हॉल्टेरच्या मतें इतिहासांत जें घडलें त्याची नोंद तर व्हावीच, पण त्याच्या कालाचें परीक्षण करणें, मूल्य ठरविणें, मापन करणें हेंहि काम इतिहासानेंच करावयाचें असतें. व्हॉल्टेर-प्रमाणेंच डेव्हिड ह्यूम (David Hume, सन १७११–१७७६) हा एक युरो-पीयन इतिहासकार बुद्धिवादी मताचा होऊन गेला. त्याच्या मतें इतिहास म्हणजे मानवी जीवनाच्या वैचारिक व नैतिक कल्पनांचा वृत्तान्त होय. रूढ ख्रिस्ती धर्म व भाबड्या समजुती यांवर टीका करून यानेंहि इतिहासास वास्तव व प्रयत्नात्मक स्थितीवर आणून सोडलें. रॉबर्टसन (१७२१–१७९३) गिबिन (१७३७–१७९४) हे दोन मोठे इतिहाकार याच पंथांतील होत.

यानंतर खऱ्या खुऱ्या अर्थानें इतिहास वास्तवपूर्ण व शास्त्रीय बनविला तो लिओपोल्ड फॉन रान्के (Leopold von Ranke १७९५–१८८६) या जर्मन इतिहासकारानें. ‘ आधुनिक इतिहास लेखकांची समीक्षा ’ या नांवाचा ग्रंथ लिहून लेखकांच्या साधनांचें व त्यांच्या अंतरंगाचें यानें परीक्षण केलें. नुसत्या साधनांचा बडेजाव न मानतां तीं ज्यांनीं निर्माण केलीं त्यांच्या स्वभावांचा, विचारांचा, कृत्यांचा, पूर्ण अभ्यास इतिहासकारांनीं करावयास हवा असें त्यांनें सांगितलें. रान्केच्या इतिहासांत ही अंतरंगपरीक्षणाची भर विशेष मानली जाते. रान्केनें आणखी एक विचार सांगितला कीं, गत घटना जशा व ज्या अपूर्व प्रकारें घडल्या तशा इतिहास-कारानें सांगाव्यात, त्यांत वर्तमान काळाचे विचार व आग्रह येतां कामा नयेत. रान्केनें इतिहासमीमांसेंत आणखी एक तत्त्व आवर्जून सांगितलें. तें प्रत्येक देशां-तील विशिष्ट युगाच्या रहस्याचें वा माहात्म्याचें. त्या त्या कालाचा एक विचार वा भावनांची धारा महत्त्वाची असून तीस कालात्मा (Zeitgeist) असतो. यास अनुसरून त्या त्या युगांतील महान कृत्यें होतात. या मानस रूपी प्रेरक व जनक शक्तीमुळे इतिहास घडतो आणि हा कालात्मा समजावून घेण्यासाठीं समकालीन साधनें सावधगिरीनें तपासून पाहाणें अगत्याचें आहे.

अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत जे राष्ट्रवादी इतिहासकार फीश्टे, हेगेल,

शेलिंग, सर वॉल्टर स्कॉट, मिचेल, इत्यादींचा विचार येथें करण्याचें फारसें कारण नाहीं. कारण केवळ देशभक्ति इतिहासांत मूलभूत मानण्यास शास्त्रीय दृष्टि तयार होणार नाहीं. थॉमस कार्लाईल [१७९५-१८८१] यानें इतिहासांत वीरपुरुषांच्या पराक्रमाला स्थान दिलेलें प्रसिद्धच आहे. व्यक्तीचें साकल्यानें पराक्रमी चरित्र म्हणजे इतिहास अशी त्याची कल्पना होती. हेन्री थॉमस बकल, [१८२१-१८६२] यानें मात्र भौतिक शास्त्रांची मदत इतिहासविवेचनांत घेतलेली दिसते. 'इंग्लंडचा सांस्कृतिक इतिहास' या ग्रंथांत भौगोलिक परिस्थितीचा मानवी जीवनावर जो परिणाम होतो त्याचा विचार आलेला आहे. मेकॉले, [१८००-१८५९] केंब्रल [१८०७-१८५७] विल्यम स्टब्स [१८२५-१९०१] एडवर्ड फ्रीमन [१८३३-१८९२], जान सीली (१८३४-१८९५), रिचर्ड ग्रीन इत्यादि इतिहासकारांनीं ब्रिटिश लोकांचे गोडवे गाण्यांत व वांशिक, जातीय स्वाभिमान निर्माण करण्यांत आपलें सर्वस्व खर्च केलें असल्यानें वास्तव दृष्टीच्या वा भौतिक दृष्टीच्या इतिहासमीमांसेंत यांना स्थान बेताचेंच आहे. साधनें गोळा करणें, त्यांची परीक्षा करणें, त्यांचें संकलन करणें व त्यावरून त्या त्या काळाचें निर्लेप व निरंहकारी चित्र उभें करणें हें कार्य सर्वांनाच जमतें असें नाहीं. डिल्टाय (१८३३-१९११) स्पेंग्लर (१८८०-१९३६) टॉयन्बी, क्रोचे यांसारख्या प्रसिद्ध इतिहासकारांचें लेखन महत्त्वाचें असलें तरी तें राजवाडे यांच्या नंतरचें असल्याकारणानें आतांच त्यांचा विचार उद्भवत नाहीं.

इतिहासमीमांसेवर, युरोपांत आणखी दोन तत्त्ववेत्त्यांचा परिणाम झाला. पहिला ऑगस्ट कोम्ट (Auguste Comte १७९८-१८५७) व दुसरा कार्ल मार्क्स (१८२०-१८९५). पहिला फरेंच तत्त्वज्ञ व समाजशास्त्रज्ञ असून सोशॉलॉजी या विषयाचा अभ्यास शास्त्रीय दृष्टीनें त्यानेंच सुरू केला. मानवी बुद्धीच्या वाढीच्या तीन अवस्था ऑगस्ट कोम्ट यानें मानल्या. पहिली दैवी कल्पनेची, दुसरी तात्त्विक विचारांची व तिसरी प्रत्यक्ष अनुभवजन्य शास्त्रीय ज्ञानाची. युरोपच्या इतिहासांत या परंपरेस पॉझिटिव्ह स्कूल म्हणून मोठीच मान्यता मिळालेली आहे. दैवी, ईश्वरीय, आत्मिक, आध्यात्मिक बैठकीवरील विचार सोडून ऑगस्ट कोम्टनें निरीक्षण, वर्गीकरण इत्यादीवर आधारलेली वस्तुनिष्ठ अभ्यासाची महती मान्य केली. सन १८२२ मध्यें A prospectus of the scientiic works required for the reorganizatin of society या नांवाचें पुस्तक लिहून ऑगस्ट कोम्टनें आपल्या समाजशास्त्रीय नवविचारास प्रारंभ केला. पुढें आठदहा वर्षांनीं पॉझिटिव्ह फिलॉसॉफी हा त्याचा ग्रंथ सहा खंडामध्यें प्रसिद्ध झाला. युरोपमधील समाजशास्त्रज्ञांत पहिला असा गौरव कॉम्टचा मिलनें केला आहे. ऑगस्ट कोम्टनें मानलेल्या प्रगतीच्या तीन अवस्थापैकी पहिली दैवी पौर्वात्य देशांत प्रबल असून हिचें मुख्य लक्षण म्हणजे मानसिक दृष्टीमध्यें दैवी श्रद्धा आणि राजकीय व सामाजिक

आचारांमध्यें क्षत्रिय वृत्ति; दुसरी तात्त्विक विचारांची जी अवस्था ती प्राचीन यवन व रोमन काळांत मध्ययुगीन युरोपांत प्रबळ होती. तिसरी अवस्था शास्त्रीय विचारांची व औद्योगिक स्थित्यंतराची; ही अलीकडील दोन तीन शतकांत युरोपांत उदयास आली.

कार्ल मार्क्सची अर्थवादी विचारसरणी आपणा सर्वांच्या परिचयाची आहे. प्राकृतिक निसर्गाचा व मानवाचा विकास विरोधरूपानें होत असतो. एक चालू घटना, थेसिस; दुसरी विरोधी घटना, ॲंटिथेसिस; तिसरी समन्वयाची घटना. यांच्या आघातप्रत्याघातांतून मानवी विकास होत राहतो. मानव हा स्वतंत्र प्रवृत्तीचा नसून परिस्थितिबद्ध व मर्यादित असा तो कामगार आहे. आर्थिक हितसंबंधास अनुसरून त्याचे सर्व व्यापार होतात. आर्थिक उत्पादनाची व्यवस्था हेंच इतिहासातील सर्व घटनांचें व जीवनाचें आद्य कारण आहे. या उत्पादनव्यवस्थेनुसार समाज, धर्म, संस्कृति, विद्याप्रसार, वाङ्मयादि कला, राजकारण इत्यादींत मानवाची प्रगति होते. असा मार्क्सच्या इतिहासपद्धतीचा अति संक्षिप्त भावार्थ आहे. मार्क्स पूर्णपणें जडवादी असून अध्यात्म, परमतत्त्व, ईश्वर यांना त्याच्या तत्त्वज्ञानांत जागा नाहीं. माणसाचा सर्व सामाजिक व सांस्कृतिक इतिहास मार्क्सनें अर्थकारणाच्या एका सूत्रांत गोविला आहे. मानवी स्वभावाचें मूळ सुद्धां मार्क्सच्या मतें आर्थिक उत्पादनव्यवस्थेंत आहे. मार्क्सनें इतिहासाचे पांच खंड पाडून मानवी कर्तृत्वाची विभागणी केली आहे. १) इतिहासपूर्व कालांतील प्राथमिक समाजावस्था २) ऐतिहासिक प्राचीन कालाची गुलामी अवस्था ३) मध्ययुगीन कालाची सरंजामी समाजव्यवस्था ४) अर्वाचीन काळांतील भांडवलदारी समाज अवस्था; आणि ५) भावी काळांतील अंतिम वर्गहीन सामुदायिक समाज अवस्था. या प्रत्येक अवस्थेंत समाजाचें रूप तत्कालीन अर्थकारणावरून ठरत असतें.

राजवाडे यांच्या आधीं युरोपांत जे प्रमुख इतिहासमीमांसक झाले त्यांचा परिचय अर्थातच राजवाडे यांना होता. बुद्धिवादी दृष्टिकोणांतून भौतिक मीमांसा राजवाडे यांनीं केली. ती पाश्चात्य विचारांच्या प्रभावानें. अर्थात राजवाडे यांची मीमांसा किती मौलिक आहे हें आपण थोड्या वेळांत पाहणार आहोंतच. येथें प्रथम हें ध्यानांत घ्यावयास हवें कीं, राजवाडे यांच्या इतिहासमीमांसेचा विचार करतांना व्हॉल्टेर, रान्के व ऑगस्ट कोम्ट यांच्या विचारपद्धतीशीं ती बरीचशीं जुळती आहे असें दिसून येईल. इतिहास म्हणजे गत राजकरण नव्हे या फ्रीमनच्या मतावर प्रखर टीका करून राजवाडे यांनीं मानवी जीवितांतील सर्व व्यवहार इतिहासांत आणून बसविले. राजकीय विषयांबरोबर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विषय येणें आवश्यक आहे हें प्रथम व्हॉल्तेर (१६९४–१७७८) यानें प्रतिपादिलें. 'दि एज ऑफ् लुई XIV' आणि '-एसे ऑन दि मॅनर्स ॲंड स्पिरिट ऑफ् दि नेशन्स' हे ग्रंथ लिहून त्यानें इतिहासाच्या मर्यादा विस्तृत केल्या. 'दि डिक्लाईन ॲंड फॉल ऑफ्

दि रोमन एम्पायर' या गिबनच्या प्रसिद्ध इतिहासाचें स्वरूपहि असेंच सर्वांगीण आहे. राजवाडे यांच्याहि मतें इतिहासांत धर्म, अर्थ, काम, विद्या, कला, व्यापार इत्यादी-संबंधीं मानवी व्यवहारांचा, घडामोडींचा व संस्थांचा समावेश होतो. लॉर्ड ॲक्टन यांनीं इतिहासाचें क्षेत्र असेंच जीवनाइतकें सर्व व्यापक केलें होतें, 'वर्तमान क्षणाच्या पाठीमागील गत कालीन पृथ्वीवरील नव्या व जुन्या दरोबस्त सर्व समाजांच्या सर्व तऱ्हांच्या उलाढालींची जी साधना व विश्वसनीय हकीगत' तें इतिहासाचें वास्तवरूप राजवाडे यांनीं मानलें. केवळ स्वदेशाभिमान, केवळ काळदृष्ट्या, देशदृष्ट्या, भूगोलदृष्ट्या धर्मदृष्ट्या इतिहास, राजवाडे यांना मान्य नाहीं.

लिओपोल्ड रान्के (१७९५–१८८६) याच्या इतिहासमीमांसेंहि राजवाडे यांच्या विवेचनाशीं बरेंच साम्य असल्याचें दिसून येतें. रान्केच्या पूर्वी इतिहास-रचनेंत अनेक दोष होते. पूर्वीच्या इतिहासकारांनीं समकालीन वृत्तान्त गोळा केले नव्हते, साधनें सांभाळून एकत्र ठेवण्याची व्यवस्था नव्हती, साधनांची चिकित्सा-पद्धति नव्हती, साधनांची ऐतिहासिक चर्चा करणारी मंडळी नव्हती, चिकित्सापद्धत शिकविणारे शिक्षक वा संस्था नव्हत्या, या पद्धतीनें लिहिलेले इतिहास नव्हते, बहुतेक सर्व इतिहास पूर्वग्रहांनीं भरलेले होते. या सर्व दोषांना दूर करण्याचा प्रयत्न रान्के व त्याचे शिष्य यांनीं केला. रान्केनें काय व कसें घडलें, याचें खरें वर्णन करण्याचा उद्देश इतिहासाचा ठरविला. राजवाडे यांनीं आपल्या मीमांसेंत याच उद्देशास उचलून धरल्याचें आपण पाहिलें आहे. रान्केनें इतिहासासाठीं समकालीन साधनें जमविलीं, इतिहासप्रसंगांचें संशोधन व संकलन शास्त्रीय पद्धतीनें केले, या साठीं chronology, geography, palaeography, epigraphy, archaeology, lexieography liquistics, philology इत्यादि शास्त्रांचा उपयोग त्यांनीं करून घेतला. राजवाडे यांच्या इतिहाससंशोधनांत व मीमांसेंतहि या नवीन शास्त्रांचा मोठ्या प्रमाणांत साह्य त्यांनीं घेतलें असल्याचें स्पष्ट आहे. निर्विकार, निर्लेप व निरंहकारी वृत्तीनें इतिहासलेखन करण्याची वृत्ति रान्के व राजवाडे यांच्यांत समान दिसते. रान्केनें शास्त्रशुद्ध इतिहासाचें शिक्षण देण्यासाठीं जशी एक शाळा-हिस्टॉरिकल सेमिनार-काढली होती तशीच एक संस्था भारत इतिहास संशोधक मंडळासारखी काढण्याचा विचार राजवाडे यांनीं केला हें प्रसिद्ध आहे. रान्केनें इतिहासलेखनाच्या पद्धती दोन ठरविल्या. एक बहिरंग परीक्षणाची. यांत साधनें व त्यांचा काळ, स्थळ, भाषा यांचें परीक्षण व त्यावरून त्यांचें प्रामाणिकत्व ठरविणें या बाबी येतात. दुसरी अंतरंग परीक्षणाची. यांत लेखकांचें विश्वसनीयत्व, त्यांचें प्रामाण्य, त्यांचें संकलन इत्यादि कामें येतात. राजवाडे यांची भौतिक व आत्मिक इतिहासलेखनपद्धति आपणांस माहीत आहेच. आणखी एका बाबतींत राजवाडे व रान्के यांच्या विचारांत साम्य आहे. कोणत्याहि कालखंडाचा विचार करतांना त्या कालखंडाचा प्रधान विचार महत्त्वाचा

आहे असें राजवाडे यांनीं मानिलें आहे. या विचारास त्यांनीं युगमाहात्म्य वा कालात्मा म्हणून म्हटलें आहे. महाराष्ट्रधर्म हा सतराव्या शतकांतील प्रमुख विचार मानून त्या योगें त्यांनीं तत्कालीन इतिहासाची मांडणी केली आहे. रान्के याच्या मीमांसेंतहि या कालात्म्यास वा युगमाहात्म्यास (zeitgeist) विशेष प्राधान्य होतें.

ऑगस्ट कोम्ट (Auguste Comte सन १७९८–१८५७) हा फ्रेंच तत्त्वज्ञ तर राजवाडे यांना विशेष जवळचा वाटतो. याच्या समाजशास्त्रीय विचारांनीं राजवाडे विशेष प्रभावित झालेले दिसतात. मानवी इतिहासांत ऑगस्ट कोम्ट यानें प्रगतीच्या तीन अवस्था मानल्याचें आपण पाहिलें आहे. दैवी विचारांची अवस्था, तात्त्विक कल्पनांची अवस्था व शास्त्रीय अभ्यासाची अवस्था या तीन अवस्थांतून मानवी समाज प्रगत होत जातो अशी कोम्टची विचारसरणी. राजवाडे यांनीं या विचारपद्धतीचा पुरस्कार अनेकदां केला आहे. महाराष्ट्रांतील ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचा विचार करतांना राजवाडे यांनीं लिहिलें आहे; "साधुग्रंथ-कारांचा मुख्य कटाक्ष तत्त्वावर आहे, आणि असाच प्रकार होणें रास्त होतें. ऑगस्ट कोंटनें म्हटल्या प्रमाणें मुख्य समाजाचे विचार तीन पायऱ्यांनीं उद्भूत होत असतात. प्रथम धार्मिक विचारांचा उदय होतो. तो झाल्यावर नंतर तात्त्विक विचारांचें साम्राज्य होतें आणि शेवटीं शास्त्रीय ज्ञानाचें राज्य होतें. पैकीं ज्ञाने-श्वरापासून तुकारामापर्यंत महाराष्ट्रांत तत्त्वज्ञानाचें म्हणजे तात्त्विक विचारांचें साम्राज्य होतें. धार्मिक, तात्त्विक व शास्त्रीय ह्या संस्कृत शब्दांना ऑगस्ट कोंटे Religious, Metaphisical and Positi ve स्वभाषेंत शब्द योजतो."[१] ऑगस्ट कोम्टची ही पद्धति राजवाडे यांना नेहमीं चिंतनीय वाटलेली दिसते. इतिहासकालीन महाराष्ट्र, विशेषतः शिवपूर्वकालीन समाजविचार हा तात्त्विक विचा-रांचा होता हें राजवाडे यांनीं मान्य केलें आहे. पुढें सन १९२२ सालीं जयराम पिंडे याचा राधामाधवविलासचंपू प्रसिद्ध करितांना यांनीं जी अति विस्तृत वा विवेचक अशी प्रस्तावना त्यांनीं लिहिली तींतहि याच ऑगस्ट कोम्टच्या विचारांचा पुनरुच्चार व समर्थन आहे. मराठी साधुसंत महाराष्ट्रांतील जनतेस ब्रह्मसाक्षात्कारांत नेऊन मुक्त करण्यास कसे उत्सुक होते याचें वर्णन करून राजवाडे यांनीं लिहिलें आहे, "थोडक्यांत ऑगस्ट कोम्ट याच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे महाराष्ट्र त्या काळीं metaphysical अवस्थेंत होतें आणि Positive अवस्थेंत यावयास त्याला अद्यापि पांचशें वर्षांचा अवकाश होता. म्हणजे शक २००० च्या सुमारास महाराष्ट्र Positive बनणार होतें."[२] तीसपस्तीस वर्षांपूर्वी राजवाडे यांनीं केलेल्या

१–ऐतिहासिक प्रस्तावना, पृष्ठ ३५२

२ राधामाधवविलासचंपू : प्रस्तावना, पृष्ठ १०७– १०८

या निरीक्षणाचा अर्थ आज १९६४ सालीं ध्यानांत घेण्यासारखा आहे. आपण Positive म्हणजे शास्त्रीय दृष्टया संपन्न अशा भौतिक वा ऐहिक भूमिकेवर येण्याचा प्रयत्न केवळ करीत आहोंत, हें ध्यानीं घेतल्यावर राजवाडे यांच्या भाकिताचें अशीं भाकितें इतिहासकारांनीं करूं नयेत हें त्यांचें मत ध्यानांत घेतांहि महत्त्व विशेष वाटतें.

ऑगस्ट कोम्टच्या विचारांशीं राजवाडे आणखी एका विचारानें जवळचे आहेत. राजवाडे आपल्या सर्व पुस्तकावर छापीत असत कीं 'कोणताही हक्क राखून ठेविलेला नाहीं,' 'सर्व हक्क स्वाधीन 'च्या एका टोकापासून कोणताहि हक्क राखून ठेविलेला नाहीं या अवस्थेपर्यंत वैचारिक दृष्टया फार मोठें अंतर आहे. उदात्त विचार ही कोण्या एका व्यक्तीची बाब नसून ती राष्ट्राची, समाजाची आहे. ही विचारसरणी मोठी उदात्त मानावी लागेल. प्रत्येक नव्या विचाराचें वा कल्पनेचें पेटंट घेऊन हक्क रक्षण्याच्या काळांत वा कॉपीराईटच्या काळांत राजवाडे यांचें हें मत् कदाचित आज कुणास पटणार नाहीं. कदाचित तें त्यांच्या इतर अनेक लहरींतील एक वाटेल. परंतु अधिक विचार करतां वैचारिक संपत्ति ही समाजाची, राष्ट्राची असावी हा विचार खचितच उच्च व प्रगत मनाचा मानावा लागेल. ऑगस्ट कोम्ट यानें आपले विचार असेच समाजाच्या वा राष्ट्राच्या स्वाधीन केले होते. त्याचीं व्याख्यानें व त्याचे लेख हे लोकांसाठीं विना मोबदला असत. त्याची उपासमार होत असे, परंतु त्यानें आपल्या पुस्तकांचे वा व्याख्यानांचे पैसे स्वतःसाठी पत्करले नाहींत. मित्रांच्या मदतीवर तो राही. परंतु आपल्या वैचारिक संपत्तींतून निर्माण होणारा पैसा समाजाच्या हितासाठीच खर्च व्हावा असा त्याचा आग्रह होता. "He insisted upon the rule that all his literary productions should be given to the public gratuitously "[१] याच संदर्भांत कोणताहि हक्क राखून ठेविला नाहीं हे राजवाडे यांचे शब्द त्यांच्या प्रत्येक पुस्तकावरील आठविण्यासारखे आहेत. अर्थात्च राजवाडे यांची ही त्यागकल्पना त्यांची स्वतः-चीच असूं शकेल, पण ज्याचा आधार राजवाडे वारंवार घेतात व ज्यास ते मानतात; त्या ऑगस्ट कोम्टची विचारसरणी याहि बाबतींत त्यांना अगदीं जवळची आहे.

व्हॉल्टेर, रान्के, ऑगस्ट कोम्ट वगैरे राजवाडेपूर्व इतिहासकारांच्या विचारांशीं राजवाडे यांचे विचार कितपत मिळते जुळते आहेत हें पाहिल्यावर राजवाडे यांच्या नंतर युरोपमध्यें जी इतिहासाची शास्त्रीय चर्चा झाली तिच्या आधारें राजवाडे यांच्या मीमांसेचें परीक्षण करणें अनेक दृष्टींनीं उपकारक व उद्‌बोधक होणारें आहे. परंतु याहि आधी आपल्या इतिहासाच्या विवेचनाच्या ओघांत राजवाडे यांनीं अनेक युरोपियन इतिहासकारांचे पूर्वग्रह दूर करण्यासाठी

१-Emory S. Bogardus; The development of Social Thought : पृष्ठ २३३, सन १९५५

जे चार पांच महत्त्वाचे सिद्धान्त सांगितले आहेत त्यांचें महत्त्व विशेष असल्यानें त्यांच्याकडे प्रथम लक्ष देणें अगत्याचें आहे. राजवाडे यांच्या इतिहासमीमांसेचें स्वरूप आणखी स्पष्ट होण्यास त्यायोगें मदत होईल. राजवाडे यांचें मुख्य प्रतिपादन असें आहे कीं इतिहासांत मागें जें घडलें त्याची विश्वसनीय हकीगत इतिहासकारानें निर्लेप वृत्तीनें द्यावी. स्वदेशाभिमान, देशाभिमान, कालाभिमान, ज्ञात्याभिमान, ठेवून इतिहास लिहिणें युक्त होणार नाहीं. इतिहासाचें लेखन निर्विकार मनानें व्हावयास पाहिजे. राजवाड्यांच्या मतें वैयक्तिक मतें एकीकडे सारून स्वदेशाभिमानाचा दर्प बाजूला ठेवून सर्व प्रकारचे अर्धवट ग्रह सोडून देऊन इतिहासलेखनाचें काम केलें पाहिजें. पण अशी निर्लेप व निरहंकारी वृत्ति कोणत्या मानवी इतिहासकारास शक्य आहे? राजवाडे आवर्जून म्हणतात कीं निर्भेळ इतिहास म्हणून ज्याला म्हणतां येईल त्याचें काम फक्त झालेल्या प्रसंगांची विश्वसनीय हकीगत देण्याचें आहे. कालाचें पौर्वापर्य लावून व प्रसंगांचें कार्यकारणत्व सिद्ध करून भूत गोष्टी अशा अशा सातत्यानें झाल्या इतकें सांगितलें म्हणजे इतिहासाची कामगिरी आटोपली. इतिहासाचें काम आवडनिवड किंवा स्तुतिनिंदा न करतां झाली गोष्ट जशीच्या तशी नमूद करून ठेवायाचें आहे. इतिहास भूत वृत्ताचा विश्वसनीय सारांश देतो; व नीतिशास्त्र त्यांचें उत्तमाधमत्व ठरवितें, म्हणजे चांगलेंवाईट ठरविण्याचें काम इतिहासाचें नाहीं. येथें राजवाडे यांनीं रान्केचें जें अनुकरण केलें आहे, त्यास मुरड घालवयास हवी असें वाटतें. कोणता इतिहासकार इतका निर्लेप व निरहंकारी आजवर निपजला आहे? राजवाडे यांनीं जें थोडें इतिहासलेखन केलें तें तरी निर्लेप वृत्तीनें केलें आहे काय? गुणवर्धन व दोषत्याग हे दोन प्रधान हेतु राजवाडे यांनीं सांगितले आहेत. ते निर्विकार व निरहकारी वृत्तीनें नुसत्या कालानुक्रमानें घटना देण्यानें कितपत साध्य होतील? कालात्म्याचें व युगमाहात्म्याचें वर्णन करतांना दृष्टि कितपत निर्लेप राहील? स्वदेश, स्वराज्य, स्वभाषा, स्वसंस्कृति वगैरे स्थूलज्ञान सामान्य जनास झाल्यास त्यांच्या ठायीं स्वदेशादिकांच्या संबंधानें यथार्थ प्रेम सहज वृद्धिंगत होतें.[१] हें प्रेम वृद्धिंगत होण्यास वृत्ति अगदींच तटस्थ राहून कसें चालेल? दुसऱ्या एका ठिकाणीं राजवाडे यांनीं म्हटलें आहे, 'वर्तमान व भावी पिढ्यांना आपल्या पूर्वजांचे गुणदोष कळावेत, कोणत्या गुणांच्या जोरावर त्यांनीं राष्ट्राची उन्नति केली व कोणत्या दोषांच्यामुळें ते राष्ट्राच्या अवनतीस कारणीभूत झाले हें ज्ञान त्यास व्हावें हा तर इतिहास लिहिण्याचा प्रधान हेतु आहे.[२]' मग हा हेतु साध्य होण्यास फक्त झालेल्या हकिगतींची नोंद कशी चालेल?

१– ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ३४७

२–कित्ता : १९३

स्वतः राजवाडे यानांहि ही जाणीव असावी असें वाटतें. त्यांनीं म्हटले आहे कीं झाडून सर्व पूर्वग्रह फेकून देणें मनुष्यस्वभावाला तर निसर्गतःच अशक्य आहे. जो इतिहासकार ज्या संस्कृतींत वाढलेला असतो त्या संस्कृतीनें त्याचें मन बनलेलें असतें आणि अमुक विचार, विकार किंवा संस्था इष्ट व अमुक अनिष्ट हा भेद तो त्या बनावाच्या अनुरोधानें करीत असतो ; विकार किंवा विचार यांनीं खळबळून जाणाऱ्या व्यक्तींशीं व समाजाशीं मानवेतिहासाला कर्तव्य आहे. निर्विकार दृष्टीचा उपयोग करणारी व्यक्ति स्वतः विकारवश असतेच; व ज्या समाज-दृष्टीचा उपयोग करावयाचा ते समाजहि विकारवश असतात..... स्वतःचे विकार अजिबात दाबून समाजाच्या विकारांचें व विचारांचें, वर्णन व परीक्षण ताटस्थ्यानें करणारा इतिहास केव्हां जन्मेल तेव्हां जन्मो " समाजाचे विकार व्यक्तींत म्हणजे लेखकांत उतरतात. निर्लेप वृत्ति स्वभावतःच अशक्य आहे. असें स्वतःच म्हणून पुनः राजवाडे तटस्थ वृत्तीची अपेक्षा करतात हें जरा विचित्र आहे.

भावविरहित वा ध्येयविरहित होणें कोणत्याहि इतिहासकारास शक्य नसतें. इतिहास लिहितांना कोणते प्रसंग नमूद करावयाचे, गाळावयाचे, प्रसंगांतील सामान्यत्व व विशेषत्व, महत्त्व व गौणत्व, प्रभावत्व व अप्रभावत्व, गतित्व व स्थितित्व असा कांहीं फरक करणें अगत्याचें असतें. प्रसंगांत तारतम्यता, निवड, वैशिष्ट्यप्रभाव यांचा विचार आला कीं इतिहासकाराची तटस्थ वृत्ति, निर्लेप दृष्टि थोडीफार कमी झालीच म्हणून समजावी. हाच अर्थ ध्यानांत घेऊन प्रसिद्ध इटालिअन तत्त्वज्ञ व इतिहासमीमांसक बेनिडेक्टो क्रोचे यानें १९१२–१३ च्या सुमारास प्रतिपादन केले कीं " All History is contemporary History " म्हणजे सर्व इतिहास समकालीन दृष्टिकोणांतूनच लिहिलेले असतात; आणि ही आत्मनिष्ठता असल्याशिवाय लेखकांचें चालणारच नाहीं. घडलेले प्रसंग जेव्हां इतिहासलेखकांच्या समोर उभे राहतात तेव्हां तेव्हां त्यांच्या योगें इतिहासकाराचें मन भारावून जातें. क्रोचेच्या शब्दांत तें कंपायमान होतें (' Vibrate in the historian's mind ') क्रोचेच्या मतें इतिहासाचें अधिष्ठान साधनसामग्रींत वा ऐतिहासिक कागदपत्रांत नसून या सामग्रीचें परीक्षण करणाऱ्या मानवी मनांत असते. " For History is not contained in books or documents, it lives only as a present interest and pursuit, in the mind of the historian when he criticizes and interprets those documents "[१] इतिहासलेखकास समकालीन हेतु विसरून भागत नाहीं. केवळ गतगोष्टींची हकीगत म्हणजे इतिहास नव्हे तर गतगोष्टींची हकीगत प्रतिभावान इतिहासकारास जी प्रतीत झाली तिचा इतिहास बनतो. ग्रीकांच्या शिल्पशास्त्राचा इतिहास म्हणजे काय ? तर तीं शिल्पें आपणांस कशीं प्रतीत झालीं

१–Collingwood R. G.; The Idea of History: पृष्ठ २०२, सन १९४६

याचेंच ज्ञान नव्हे काय? तेव्हां इतिहासामध्यें पूर्णपणें वस्तुनिष्ठता वा निर्लेप वृत्ति राखणें मानवी स्वभावास शक्य होणारें नाहीं.

इतिहास लिहिण्याच्या शास्त्रीय पद्धतीची चर्चा करतांना राजवाडे यांनीं कालानुक्रमिक, दैशिक व कौलिक अशा तीन पद्धती सांगून कौलिक पद्धतीचा पुरस्कार केला आहे. केवळ राजकीय वृत्तान्तास राजवाडे इतिहास मानीत नाहींत. धर्म, समाज, विचार, चालीरीती, वाङ्मय, कला, व्यापारसंवर्धन इत्यादि साऱ्या मानवी जीवनाचा वृत्तान्त निरनिराळ्या मानवकुलांच्या अनुरोधानें देणें राजवाडे यांना मान्य आहे. मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, अनुहरणशास्त्र इत्यादि शाखांच्या विकासाच्या आजच्या काळांत राजवाडे यांची ही पद्धति मान्य होण्यासारखी आहे. साठ वर्षांपूर्वी राजवाडे यांनीं आग्रहानें प्रतिपादन केलेली ही इतिहासलेखन-पद्धति आजहि शास्त्रशुद्ध मानली जाते. आजहि नव इतिहासकार याच दृष्टि-कोनांतून इतिहासलेखनपद्धति ठरवितात. जेम्स् हार्वे, रॉबिन्सन् इत्यादि आधुनिक, इतिहासकारांच्या मतें History deals with all aspects every thing that man has ever done or thought or hoped or felt. [१]

आणि इतिहासांत येणारें हें विवेचन मानवकुलांच्या अभ्यासानें अधिक विश्वसनीय व उपयुक्त होतें. सन १९३३ ते १९३९ पर्यंत प्रसिद्ध झालेल्या ‘ A Study of History ’ या आपल्या सहा खंडांत आजचे विख्यात इतिहासकार आर्नोल्ड टॉयन्बी यांनीं मानवकुलांच्या दृष्टीनेंच सर्व इतिहास पाहणें शास्त्रशुद्ध मानलें आहे. जगाच्या इतिहासाची आखणी टॉयन्बी राष्ट्रानुसार वा राज्या-नुसार करीत नाहींत तर ती वेगवेगळ्या मानवी संस्कृतींत (civilizations) कर-तात. अशा प्रकारें त्यांनीं सुमारें एकवीस मानवी संस्कृती मानवी कुळांच्या अनुरोधानें मांडल्या आहेत. त्यांतील जिवंत संस्कृती पांच सहा असून उरलेल्या नष्ट किंवा मृतप्राय मानल्या आहेत. निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या काळीं जीं मानवकुळें वा मानवी समूह यांचा उदय व विकास झाला त्यांची प्रगति झाली. हा अभ्यास इतिहासास अभिप्रेत आहे. टॉयन्बी यांच्या मतें the intelligible unit of historical study is neither a nation nor mankind as a whole but a certain grouping of humanity, which we have called a Society [२] म्हणजे राष्ट्र अथवा सर्व जग इतिहासलेखकासमोर नसून एखादा मानवी समाज, त्याची विशिष्ट संस्कृति, त्याचे उत्कर्षापकर्ष हाच इतिहा-साच्या अभ्यासाचा विषय होतो. टॉयन्बींच्या मतें अशा जिवंत संस्कृतींचें समाज आज

१— भा. वा. भट, राजवाडेचरित्र : पृष्ठ ३४१.

२ — A study of history : Arnold Toynbee : Abridgement of Volumes I-VI; by D. C. Somervell. 1947, पृष्ठ, ११

पांच तरी दृष्टीस पडतात. (१) आग्नेय युरोपमधील सनतान ख्रिश्चन समाज Orthodox Christian Society in South Eastern Europe and Russia (२) पूर्वेकडील बिझँटिक, ख्रिश्चन समाज Byzantic Christendom (३) मुस्लीम समाज Islamic (४) हिंदी समाज Hindu Socitey (५) अतिपूर्वेकडील मानवी समाज Far Eastern Society या संस्कृतींच्या द्वारें टॉयन्बी नष्ट संस्कृतीचाहि अभ्यास करूं पाहतात. मानवी समाजाची या संस्कृतींची निपज कशी झाली, त्यांना उतरती कळा कां लागली यांचीहि मीमांसा टायन्बी करतांना दिसतात. टॉयन्बीचें हें सर्व इतिहासभाष्य वाचतांना साठ वर्षांपूर्वी राजवाडे यांनीं प्रतिपादन केलेली कौलिक पद्धति किती श्रेष्ठ होती याची साक्ष पटेल. राजवाडे यांनीं स्पष्ट म्हटलें असल्याचें आपण पाहिलें आहे कीं "ही निरनिराळीं कुलें अंतःवृत्तीनें किंवा कुलांतरांच्या स्पर्शानें वाढलीं कशीं, सुसंस्कृत कशीं झालीं हें पहावयाचें म्हणजे ह्या कुलांचा इतिहास अथपासून आतांपर्यंत दिला पाहिजे'[1] निरनिराळ्या मानवी कुलांच्या आसन्यानें मानवी जिविताचा इतिहास यथार्थानें उभा राहील हें राजवाडे यांचें मत अतिविस्तारानें व प्रगल्भपणें साकार झालेले दृष्टीस पडतें तें टॉयन्बींच्या विस्तृत इतिहासभाष्यांत. टॉयन्बी यांनीं आपला बारा तेरा खंडाचा इतिहास पूर्ण करीत आणला आहे. राजवाडे यांना एकहि इतिहासग्रंथ निर्माण करणें जमले नाहीं. त्यांच्या विवेचक प्रस्तावना मात्र त्यांच्या प्रगाढ विद्वत्तेची व प्रगल्भ प्रतिभेची साक्ष देणाऱ्या आहेत.

राजवाडे यांनीं इतिहासाची मीमांसा करतांना समाजशास्त्र, मानवशास्त्र उत्क्रांतिशास्त्र, मानसशास्त्र, जीवशास्त्र इत्यादि नवीन शास्त्रांचा उपयोग केलेला आहे. पण मानवी प्रगति इतिहासांत भौगोलिक परिस्थितीशीं निगडित असते; तिचा फारसा प्रपंच त्यांनीं केलेला नाहीं. इतिहासाच्या मूलतत्त्वांचा विचार करतांना मानवी कृत्यांचीं मूळ कारणें त्यांनीं दोन प्रकारचीं सांगितलीं आहेत. पहिलें बाह्य कारण म्हणून सृष्टिविचार त्यांनीं सांगितला आहे. त्यांच्या मतें सृष्टि हें बाह्य कारण मानवी मनोरचनेचें आहे. मनुष्याच्या पिंडावर बाह्य सृष्टीचे आघात होऊन त्याची मनोरचना बनते. एवढेंच सांगून राजवाडे थांबले आहेत; पण या भौगोलिक परिस्थितीची बाह्य सृष्टीची अधिक मीमांसा त्यांनीं केलेली नाहीं. वातावरण, समुद्रसान्निध्य, डोंगराळ भाग, अतिऊष्ण, अतिशीत, वैराण वाळवंट, नदीतीर इत्यादि भौगोलिक परिस्थितीनें मानवी स्वभावरचनेंत बदल होतो व त्यायोगें इतिहास बदलत राहतो; याची चर्चा युरोपमध्यें फार विस्तारानें झालेली आहे. बोदिन (Bodin १५३०-१५९६) मँतेस्क्यू, बकल (१८२१-१८६२) मिस-सेंपल इत्यादि विचारवंतांनीं या चार बाबींना मानवी विकासांत मोठेंच स्थान

१- ऐतिहासिक प्रस्तावनां : पृष्ठ ३२१

असल्याचें आधार देऊन सांगितलें आहे. संपत्ति मिळविणें, अन्नाचा साठा करणें, नवीन भूमिसंशोधनाची मोहिम काढणें, परिश्रम करीत राहणें, प्रजोत्पादन करणें, संघशक्तीचें महत्त्व जाणणें, शास्त्रीय संशोधनांत मग्न होणें, अध्यात्म-विचारांत तृप्त राहणें, कलासंपन्न होणें इत्यादि गोष्टी बऱ्याच अंशी भौगोलिक कारणमीमांसेंत चर्चिल्या जातात. इतकेंच नव्हे तर कायदे, नीति, धर्म, रीति-रिवाज, लोकभ्रम यांवरहि हवामान, निसर्ग यांचा परिणाम झालेला असतो. नाईल, गंगा, व्होल्गा, यांगत्सी, युफ्रेटिस, तैग्रिस, टायबर, अमेझॉन, काँगो, थेम्स, हडसन, मिसिसिपी इत्यादि नद्यांच्या कांठचा मानवी इतिहास या दृष्टीनें पाहण्या-सारखा आहे. आजच्या प्रगत शास्त्रीय संशोधनामुळें मानवानें सृष्टीवर मात केली असल्यानें भौगोलिक कारणमीमांसेस फारसें महत्त्व उरलेलें नाहीं. तरी राजवाडे यांच्या काळीं या विचारास फार महत्त्व होतें. पानिपतच्या पराभव-मीमांसेंत भौगोलिक कारणांचा विचार तर प्रधान मानला जातो. राजवाडे यांनीं आपल्या इतिहासमीमांसेंत याचा अधिक सखोल विचार करावयास हवा होता. या संदर्भांत आर्नोल्ड टॉयन्बीच्या 'A study of History' मधील Challenge of Environment and Response of man, या ऐतिहासिक प्रसंगाच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांची विस्तृत चर्चा ध्यानांत घेण्यासारखी आहे.

राजवाडे यांच्या इतिहासमीमांसेंत आणखी एक वादग्रस्त प्रश्न उपस्थित होत असतो. तो म्हणजे मानवसमाजाच्या प्रगतिसंबंधानें. युरोपीयन समाज प्रगतिपथावर आहे व पौर्वात्य समाज स्थिर म्हणजे प्रगतीहीन आहे; या दुरा-ग्रहाचें खंडन करतांना राजवाडे यांनीं मानवी प्रगतीवर फार थोर दर्ज्याचें भाष्य केलें आहे. आत्यंतिक नीतिमत्तेकडे, बुद्धिमत्तेकडे, संपन्नतेकडे, समाजाची जी प्रवृत्ति ती प्रगति अशी व्याख्या राजवाड्यांनीं केली आहे. या व्याख्येनुसार राजवाडे यांनीं युरोपीयन पौर्वात्य समाजाच्या प्रगतीचें समीक्षण केलें आहे; आणि हें करतांना राजवाडे यांनीं आणखी एक सिद्धान्त प्रस्थापित केला आहे कीं मनुष्य-समाज मागें कोणा एका काळीं रानटी व वन्य स्थितींत होता आणि आस्ते आस्ते तो सुसंस्कृत झाला हें त्यांच्या मतें बरोबर नाहीं. राजवाडे यांच्या मतें हा गैरसमज आहे. पृथ्वीच्या पाठीवर त्यांच्या मतें सदोदित सुसंस्कृत समाज कोठें ना कोठें तरी नांदत होता. दुसरा कुठला तरी समाज त्याचा धागा पकडून सुसंस्कृत होत होता. अशी स्थिति पूर्वप्रलयकालापासून दृष्टीस पडते. म्हणजे मानवी संस्कृतीचीं बीजें इति-हासपूर्व कालांतहि सांपडण्यासारखीं आहेत. राजवाडे यांचा हा सिद्धान्त तपासून पाहण्यासारखा आहे. नवीन होणाऱ्या उत्खननांमुळें जीं विपुल साधनसामग्री उपलब्ध होत आहे, त्यावरून आपण ज्यांना रानटी समजत होतों त्यांच्या प्रगत जीवनाच्या साक्षी नव्यानें उपलब्ध होण्यासारख्या आहेत. अजिंठा, वेरूळ येथील चित्रकलेंत वा मूर्तिकलेंत जे दागिन्यांचे व वेषभूषेचे प्रकार वा केशरचनेचे प्रकार

दिसून येतात त्यांतील कित्येक आज आधुनिक म्हणून मान्य होण्यासारखे आहेत. तेव्हां प्रगतिविचार करितांना प्रगति म्हणजे काय हें राजवाडे यांनीं सांगितलें आहे, तें ध्यानीं धरून चर्चा व्हावयास हवी. आज आपण प्रगतिपथावर आहोंत. याचा अर्थ भौतिक दृष्ट्या आपण अधिक संपन्न आहोंत. अन्न, हवापाणी, सांसारिक सुखसोयी, प्रवास, शेती, संस्थात्मक जीवन, शस्त्रास्त्रें इत्यादि क्षेत्रांतील प्रगति डोळ्यांत भरण्याजोगी निःसंशय आहे. परंतु आत्यंतिक सुखाकडे, समाधानाकडे आपली गति कितपत आहे? या सर्व बाह्य प्रगतीमुळें आपण अधिक सुखी, अधिक विचारी, अधिक नीतिमान, अधिक क्षमाशील, अधिक गुणवान झालों काय? ज्यांना आपण रानटी वा वन्य समजतों त्यांचा समाज या बाबतींत अधिक असेल तर प्रगत कोण? मनाच्या संस्कृतीचा विकास व भौतिक संस्कृतीची वाटचाल यांची आपण चमत्कारिकरीत्या गल्लत तर करीत नाहीं ना? असे अनेक प्रश्न राजवाडे यांच्या प्रगतिविचारावरील चर्चेवरून निर्माण होतात. अलीकडील काळांत विचारवंत या एकाच विषयाची चर्चा गंभीरपणें करीत आहेत.

आपल्या इतिहासमीमांसेंत राजवाडे यांनीं आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. युरोपांतील प्राचीन व अर्वाचीन समाज आर्य आहेत काय? राजवाडे यांच्या मतें केवळ भाषासाम्यावरून घेतलेला निर्णय चुकीचा आहे. जर्मनींत झालेल्या आर्यन रक्ताच्या प्रभावाचा इतिहास अगदीं ताजा आहे. राजवाडे यांच्या मतें देवांच्या म्हणजे आर्यांच्या शेजारीं राहणारे दनु, दस्यु इत्यादि समाज यांनीं आर्यांचे कांहीं भाषाविशेष उचलले. पुढें आर्य जेते झाल्यामुळें या संबंधास अधिक महत्त्व येऊन दनुदस्यूंनीं आर्यांच्या आणखी कांहीं बाबींचें अनुकरण केलें. म्हणून ते आर्यवंशीय म्हणतां येणार नाहींत. राजवाडे यांच्या मतें हीं नांवें आधुनिक युरोपीयन समाजाच्या पूर्वजांचीं असावींत. हे लोक पूर्व प्रलयकाळीं आर्यांच्या बरोबर राहात असावेत, पण जात, आचार, धर्म यांबाबतींत हे आर्यांच्याहून वेगळेच मानावयास हवेत. राजवाडे यांच्या या निरीक्षणास आज नवीन उत्खननानंतर वेगळें महत्त्व प्राप्त झालें आहे. हरप्पा व मोंहेंजादारो येथील उत्खननांचे जे अभ्यास स्टुअर्ट पिगॉट यांच्यासारख्या संशोधकांनीं प्रसिद्ध केले आहेत त्यांवरून आर्यांचे दनुदस्यु हे शत्रु कोणत्या जातीचे, प्रकारचे होते याचा उलगडा होण्यास मदत होण्यासारखी आहे. सिंधु संस्कृति ही सुमेरियन कीं भारतीय असाहि वाद आज निर्माण झालेला आहे. पाश्चात्य संशोधकांच्या मतें ही सुमेरियन संस्कृति आहे, तर सर जॉन मार्शलच्या मतें ही सुमेरियन संस्कृति नव्हे. म. म. पां. वा, काणे यांनीं या संस्कृतीस आर्य संस्कृति म्हटलें आहे. कांहींच्या मतें आर्य व सुमेरियन लोकांपेक्षां वेगळेच असे हे दनुदस्यु लोक असावेत. यासंबंधी गेल्या पांचसहा वर्षांत 'नवभारत' मासिकांत प्रसिद्ध झालेले श्री. प्र. रा. देशमूख यांचे 'सिंधु संस्कृतींतील लोकच ऋग्वेदांतील आर्यांचे शत्रु' या नांवाचे लेख विचारास चालना देणारे आहेत.

राजवाडे यांच्या इतिहासमीमांसेचें थोडक्यांत परीक्षण हें असें आहे. राजवाडे यांनीं आर्य कुल व चातुर्वर्ण्य यांना श्रेष्ठत्व व महत्त्व या मीमांसेंत दिलें आहे तें कित्येकांना मान्य नाहीं. तसेंच आर्थिक सुधारणा, यांत्रिक उन्नति, संस्कृति-संपर्क, स्थलांतर, भौगोलिक परिस्थिति इत्यादींचाहि विस्तृत परामर्श राजवाडेकृत इतिहासमीमांसेंत नाहीं ' त्यांच्या चर्चेंत इतिहासाच्या कारणपरंपरेची, क्रमाची, क्रांतीची, समन्वयाची व संगतीची (Synthesis) तपशीलवार व सूक्ष्म मीमांसा नाहीं. ' असा अभिप्राय देऊन थोर इतिहासमीमांसक प्रा. डॉ. पुणतांबेकर यांनीं देऊनहि राजवाडे यांची थोर इतिहासकार व इतिहासमीमांसक म्हणून गौरव करतांना लिहिलें आहे, "राजवाड्यांच्या दृष्टींत व विचारांत, अभ्यास पद्धतींत व मांडणींत एक विशिष्ट प्रकारचें नाविन्य, सूक्ष्मपणा, सडेतोडपणा व शास्त्ररीति सांपडते. त्यांची दृष्टि, शास्त्रपद्धति, विचारसरणी, दीर्घोद्योग ही युरोपमधील १९ व्या शतकांतील अति नामांकित विद्वानांच्या तोडीचीं आहेत....... त्यांच्यामध्यें उत्तम इतिहास लिहिण्याचें पहिल्या प्रतीचें सामर्थ्य होतें. त्यांना श्रेष्ठ प्रकारची कालदृष्टि, स्थलदृष्टि व समाज आणि व्यक्ति समजण्याची दृष्टि होती. त्यांना ऐतिहासिक व शास्त्रीय पद्धत पूर्णपणें अवगत होती. त्यांच्यामध्यें उदार भावना, समतोल दृष्टि, न्यायबुद्धि व निःपक्षपातपणा होता तद्वत प्रबळ चिकाटी व श्रमसासइहि होतें......युरोपमध्यें जी क्रांति, इतिहासपद्धतींत व लेखनांत रान्केनें घडवून आणली तीच राजवाड्यांनीं आपल्या देशांत केली......त्यांनीं इतिहास-लेखनाची शास्त्रीय पद्धति (Scientific Method) दाखवून दिली ...... राजवाडे हे अद्वितीय, श्रेष्ठ, बिनतोडीचे, अकुंठित बुद्धीचें एक महान् इतिहासचार्य, संशोधक, तत्त्वविवेचक व विचारप्रवर्तक आपल्या देशांत होऊन गेले." या डॉ. पुणतांबेकर यांच्यासारख्या श्रेष्ठ इतिहासाच्या अभ्यासकानें व्यक्त केलेलें मत अतिशयोक्तीचें आहे असें कोण म्हणेल ?

राजवाडे यांच्या इतिहासमीमांसेचें स्वरूप पाहून झाल्यावर इतिहास-संशोधनसंबंधानें त्यांनीं ज्या महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत त्यांचा विचार करणें अगत्याचें आहे. इतिहाससंशोधन म्हणजे काय, तें कसें करावें, साधनें कशीं जमवावींत, त्यांचा खरेखोटेपणा कसा ओळखावा , त्यांची जुळणी कशी करावी, त्यावरून निष्कर्ष कसे वाढावेत यांसंबंधीं इतर संशोधकांना मार्गदर्शक व उपयुक्त ठरतील अशा बहुमोल सूचना राजवाडे यांनीं दिलेल्या आहेत. याशिवाय आपल्या-कडील संशोधनस्थितिविषयींहि राजवाडे यांनीं अनेक महत्त्वाचे विचार प्रदर्शित केले आहेत. आपल्याकडील संशोधनाची सद्यःस्थिति कशी आहे यांचें विस्तारानें एक चित्र राजवाडे यांनीं रेखाटलें आहे. शकपूर्व १००० पासून शक १८१८ पर्यंत मराठ्यांच्या इतिहासाचें संशोधन जवळजवळ झालेलें नाहीं असें त्यांनीं म्हटलें आहे. बौद्ध, शातवाहन, अशत्क, पूर्वचालुक्य, राष्ट्रकुट, उत्तर

चालुक्य यांच्यासंबंधीं फारशी माहिती आपणांस नाहीं. अलीकडे डॉ. केतकर, डॉ. मिराशी वगैरेंच्या प्रयत्नानें कांहीं तपशील मात्र उपलब्ध झालेला आहे. राजकीय, लष्करी व आरमारी, आर्थिक, वाङ्मयिक, धार्मिक, देवधार्मिक, सामाजिक, शास्त्रीय, कलिक अशा संशोधनांच्या विविध शाखांतून आपण कांहींहि केलेलें नाहीं याची जाणीव राजवाडे यांना आहे. राजवाडे तपशील देतात तो किती हेंहि येथें पाहण्यासारखें आहे.

देवधार्मिक इतिहासाचा जो थोडा शोध झाला आहे व जो अजून बराच व्हावयास पाहिजे त्याचा तपशील देतांना राजवाडे यांनीं तेवीस बाबींचा उल्लेख केला आहे. सनातन धर्म, नाथ संप्रदाय, विठ्ठलभक्ति संप्रदाय, दत्त संप्रदाय, मानभाव संप्रदाय, लिंगायत संप्रदाय, जिन धर्म, गणपति संप्रदाय, वैष्णव संप्रदाय, भागवत संप्रदाय, खंडोबा संप्रदाय, दक्षिण मार्ग, वाम मार्ग, कौल मार्ग, दावलमलकी पंथ, दाऊद पंथ, आगाखान पंथ, करवीर मठ, संकेश्वर मठ, समर्थ संप्रदाय, कोळी, भिल्ल, कातकरी इत्यादींचे वन्य देवता संप्रदाय, दत्त-संप्रदाय इत्यादींचा शोध घेऊन देवधार्मिक इतिहास तयार व्हावयास हवा. शास्त्रीय इतिहासांत वेदविद्या, मंत्र विद्या, तंत्र विद्या, न्याय, तर्क, व्याकरण, ज्योतिष, गणित, मीमांसा, आयुर्वेद, रसविद्या, इतिहासशास्त्र इत्यादि विषयांचा समावेश पाहिजे. कलिक इतिहासांत चित्रकला, मूर्तिकला, वाणी, नकाशे, शस्त्रें, कपडे–पोषाख, रत्नें–दागिने, खेळ, स्थापत्य इत्यादींचा विचार होणें जरूर आहे. इतिहाससंशोधनाचा हा एवढा विस्तृत उद्योग आरंभावयाचा म्हणजे मनुष्यबळ, द्रव्यबळ, पाहिजेच; पण राजवाडे यांच्या मतें हें कार्य यासाठीं मंडळें काढलीं म्हणजे निश्चित झपाट्यानें होईल.[१]

या संशोधनकार्याच्या पायऱ्याहि त्यांनीं एके ठिकाणीं सांगितल्या आहेत. प्रथम इतिहास मंडळांची लागवड प्रत्येक जिल्ह्याच्या व तालुक्याच्या गावीं करावी. येथें अनेक साधनें जमतील. जाति, देव, देवळें, गढ्या, किल्ले, शिलालेख, कागदपत्रें, जुनी हत्यारें, क्षेत्रनावें, आडनांवें, वगैरे बाबींचा या ठिकाणीं विचार होत राहील. हस्तगत झालेल्या साधनांचीं टिपणें करणें हेंहि महत्त्वाचें कार्य आहे. या टिपनीकार्यानंतरचें महत्त्वाचें काम म्हणजे एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाचें किंवा संस्थेचें किंवा समाजाचें किंवा धर्माचें किंवा हालचालीचें सोपपत्तिक विवेचन करणें हें होय. हें इतिहासलेखनाचें काम व्हावयाचें म्हणजे लेखकास इतिहासशास्त्र, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र इत्यादि शास्त्रांचा मूलभूत अभ्यास असावयास पाहिजे. या शिवाय इतिहासलेखनाच्या तोडीस एखाद्या प्रसंगाची कारणमीमांसा करणें जमणार नाहीं. संशोधनें तावून सुलाखून घेणें, घटितांचा अन्वयार्थ लावणें,

---

[१] ऐतिहासिक विविध विषय, खंड पहिला : पृष्ठ २५–२९

त्यांचीं कारणें पाहणें, परिणाम ठरविणें इत्यादि महत्त्वाचें काम इतिहासलेखनांत विशेष प्रकारचें मानावें लागतें.

आपल्या साधनखंडांच्या अकराव्या विभागाच्या प्रस्तावनेंत राजवाडे यांनीं समकालीन संशोधनाचा चांगला आढावा घेतलेला आहे. पारसनीस यांच्याजवळील हजार पत्रें, वासुदेवशास्त्री खरे यांच्या जवळील अडीचतीन हजार पत्रें, स्वतःजवळील पन्नास हजार पत्रें प्रसिद्धीची वाट पाहात आहेत असें राजवाडे यांनीं म्हटलें आहे. हीं सर्व पत्रें प्रसिद्ध करावयाचीं म्हणजे पांचशें पत्रांचा एक खंड याप्रमाणें सुमारें १४६ खंड काढावयास हवेत; आणि अनुपलब्ध असणाऱ्या पत्रांचा शोध घ्यावयाचा म्हणजे आणखी १५०० खंडांची तयारी करावयाची. स्वराष्ट्राच्या इतिहासाची चाड असलेल्यांना हें अशक्य नाहीं असें राजवाडे यांनीं म्हटलें आहे. यासाठीं अनेक तरुण व होतकरू लोकांनीं सिद्ध व्हावयास हवें. ओली व कोरडी भिक्षा मागून कां होईना पण संशोधकानें आपलें काम चालू ठेवावयास हवें. अत्यंत निकृष्ट वेतन घेऊन समाजाची उत्कृष्ट सेवा करावी. मनोनिग्रह व इंद्रियनिग्रह यांचीहि संशोधकास फार आवश्यकता आहे. चित्तवृत्ति अकलंक राहून, ज्ञानज्योतीचें निर्लेप स्फुरण होईल अशा मार्गानें आचरण हवें.

एवढी मानसिक तयारी झाली म्हणजे मराठ्यांच्या साम्राज्याचा शोध घ्यावा व साधनें गोळा करण्यास प्रारंभ करावा. ग्वाल्हेरपासून तंजावरपर्यंत व रजपुतस्थानापासून कलकत्त्यापर्यंत कोठेंहि जा; प्रत्येक ठिकाणीं मराठ्यासंबंधी कांहींतरी मिळेलच. कोठें कागदपत्रें, कोठें ताम्रपत्रें, पोथ्यापुस्तकें, नाणीं, शिलालेख, गड, किल्ले, गुहा, देवळें, मशिदी, पुष्करण्या, तलाव, कुंडें, घाट, गाडलीं गेलेलीं शहरें या सर्वांचा संशोधकानें शोध घ्यावा. लोकांकडून साधनें मिळविण्यासाठीं काय अडचणी सहन कराव्या लागतात याचाहि अनुभव राजवाडे यांनीं दिलेला आहे. साधनें जमा करतांना संशोधकांनीं कामक्रोधादि विकार जिंकले पाहिजेत असें त्यांनीं आवर्जून सांगितलें आहे. स्वतः राजवाडे यांना मात्र हें जमलें नाहीं हें खरें आहे. संशोधकाच्या बौद्धिक तयारीचें वर्णन त्यांनीं फार समर्पक रीतीनें केलें आहे. प्रथम इतिहासाचा प्रांत कोणता, केवढा, याची अटकळ संशोधकास हवी. ह्या संसारांत प्रवृत्तीच्या ऐलथडीपासून निवृत्तीच्या पैलथडीपर्यंत व्यक्ति, कुल, समाज, देश, राष्ट्र व मानवजाति यांच्या सर्व प्रकारच्या ज्या असंख्य घडामोडी, त्यांचीं कालदेशावाच्छिन्न जी व्यवस्थित हकीगत ती इतिहास व याची फुटकळ प्रमाणें म्हणजे इतिहासाचीं साधनें होत. या साधनांच्या प्रामाण्याप्रामाण्यासंबंधानेंहि संशोधकानें कसून चौकशी करावयास हवी. कालसंकलनाचीहि अचुक माहिती त्यास हवी. संस्कृत, प्राकृत, फारशी, कानडी, गुजराथी, हिंदी, बंगाली, इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीज या भाषांतील साधनें मराठ्यांच्या इतिहासांस उपयुक्त होण्यासारखीं आहेत. या सर्व साधनांची जुळवाजुळव व प्रकाशांत आणण्याची खटपट आपण करावयास हवी.

संशोधनास कांहींशी सुरुवात झालेली होती, पण एकंदरीत राजवाडे यांचा अनुभव कांहीं चांगला नव्हता. ज्यांनीं इतिहास घडविला तीं मराठे घराणीं वा ते संस्थानिक यासंबंधी उदासीन असल्याचा अनुभव राजवाडे यांना आलेला असावा. त्यांनीं या विषयीं म्हटलें आहे, "साधनें प्रकाशण्यासंबंधानें एक चमत्कार आज कित्येक वर्षें मी निमूटपणें पाहात आहें. तो असा कीं, शिंदे, होळकर, गायकवाड, आंग्रे, पटवर्धन, विंचूरकर, पवार, राजेबहादूर, कोल्हापूरकर तंजावरकर, फडणीस, प्रतिनिधी, फलटणकर, भोरकर, जतकर, हैदराबादकर, जयपूरकर, जोधपूरकर, सागरकर व इतर लहानमोठे संस्थानिक, जाहागीरदार, इनामदार, देवस्थानवाले, व पूर्वींचे मुत्सद्दी हे अद्यापपर्यंत काय करीत आहेत ? त्यांचीं दप्तरें किंवा त्यांच्यासंबंधाचीं कागदपत्रें आमच्यासारख्या भिकारड्यांनीं शोधण्याचा व छापण्याचा प्रयत्न करावा आणि त्यांच्यासारख्या श्रीमंतांनीं अगदीच उदासीन व निद्रिस्त असावें. हा कोठला न्याय ? काय त्यांचे पूर्वज त्यांचे कोणी नव्हत ? पूर्वजांनीं संपादिलेल्या जहागिरी व राज्यें भोगण्यास राजी आणि त्यांचे पराक्रम व इतिहास जाणण्यास गैरराजी, हा न्याय पृथ्वीवर इतर कोठेंहि पाहावयास मिळावयाचा नाहीं. वासुदेवशास्त्री खऱ्यांनीं आपलें घरदार विकून पटवर्धनी दप्तर छापावें आणि मिरजकर, सांगलीकर, जमखिंडीकर यांनीं खुशाल झोपा काढाव्या; शिवाजीमहाराज, दमाजी गायकवाड, परशुरामभाऊ पटवर्धन हे आम्हां संशोधकांचे आजे पणजे आहेत आणि संस्थानिकांचे कोणी नाहींत, असेंच म्हणण्याची पाळी आली. संस्थानिकांची व इनामदारांची आपल्या प्रत्यक्ष पूर्वजासंबंधानें केवढी ही विस्मृति ! केवढा हा अपराध. ही भरतभूमि पितृपूजेविषयीं प्रख्यात आहे. तींत प्रस्तुतकाळीं पितरांची अशी बोळवण व्हावी ना ?

"असो, राजे निजले आहेत, जहागीरदार डुलक्या घेत आहेत, आणि इनामदार झोपा काढीत आहेत. ते जागे होईपर्यंत जागे झालेले मध्यमस्थितींतील जे आपण त्यांनीं राष्ट्राच्या या पितरांचें स्मरण कायम ठेविलें पाहिजे. आपलें सामर्थ्य यद्यपि जुजबी आहे तत्रापि पुण्यकर्माच्या प्रीत्यर्थ तें खर्चिलें पाहिजे—"[1]

१. ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ४६३

९ : राजवाड्यांचें समाज-चिंतन

देशाभिमान व स्वसमाजोन्नतीची तीव्र तळमळ ही राजवाडे यांच्या इतिहाससंशोधनामागची प्रेरणा होती. निर्लेप, तटस्थ, निरहंकारी वृत्तीनें इतिहास-लेखन व्हावयास पाहिजे असें राजवाडे यांनीं परोपरीनें सांगितलें असलें तरी स्वतः राजवाडे यानांहि तें जमलें नाहीं. आपला देश एकेकाळीं उन्नत अवस्थेप्रत पोंचला होता; परंतु पाश्चात्यांच्या नवविद्यांचा अभ्यास आपण केला नाहीं, नवीन भौतिक संशोधनाकडे आपण लक्ष दिलें नाहीं, प्रवृत्ति धर्माची उपासना आपण केली नाहीं, म्हणून परकीय मुसलमान व मुख्यतः इंग्रज यांपुढें आपण हतप्रभ झालों अशी त्यांची विचारसरणी होती. नाना विद्यांची जोपासना, भौतिकशास्त्रांचा अभ्यास, इतिहाससंशोधन इत्यादि उद्योग समाजहितासाठीं, समाजकल्याणासाठीं त्यांनीं उभे केले. अनेक मानवी समाजांची निर्मिति कशी झाली, वाढ कशी झाली, त्यांच्यांत धर्म, संस्कृति, कला, व्यापार, वाङ्मय इत्यादि अंगें कशीं विकसित झालीं, परकीय संकटांना त्यांनीं कसें तोंड दिलें, ते विजयी कसे झाले, ते पराजित कसे झाले, इत्यादि विविध विषयांची नोंद राजवाडे यांच्या मनांत नेहमीं असे; म्हणूनच इतिहाससंशोधन वा इतिहासमीमांसा करतांना राजवाडे यांच्या नजरेसमोरून समाजस्थिति कधींहि दूर झाली नाहीं.

डेक्कन कॉलेजांत असतांना सन १८८४--९० पर्यंत राजवाडे यांनीं युरोपचा इतिहास, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, राजनीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, तर्कशास्त्र इत्यादि विविध विषयांवरील प्राचीन व अर्वाचीन ग्रंथ वाचले होते, त्या विषयांचें मनन त्यांचें चालूच होतें. समाजशास्त्र हा नवीन अभ्यासविषय नुकताच स्वतंत्रपणें उदयास येऊं पाहात होता. व्यास, मनु, याज्ञवल्क्य अथवा प्लेटो, ॲरिस्टॉटल यांसारख्या प्राचीन तत्त्वचिंतकांनीं समाजाविषयीं त्यांच्या काळास अनुसरून जें लिहिलें होतें तें राजवाडे यांच्या चांगल्या परिचयाचें होतेंच; परंतु अर्वाचीन काळांतील बकल, स्पेन्सर, व्हाल्तेर, गिबन, रान्के, हेगेल, फ्रीमन, व्हीको, तुर्गो इत्यादि तत्त्ववेत्त्यांची भौतिक विचारसरणीहि राजवाडे यांनीं अभ्यासली होती. ज्यानें सोशॉअलजी या शास्त्रास शास्त्र म्हणून जन्म दिला त्या प्रख्यात फ्रेंच मीमांसकाची ऑगस्ट कोंटेची (Augaste Comte सन १७९८–१८५७) राजवाडे यांनीं तारीफ तर केली आहेच, पण त्याच्या तत्त्वाच्या साह्यानें शिवपूर्वकालीन समाजरचनेची मीमांसाहि त्यांनीं पुनः पुनः केलेली आहे. राजवाडे यांनीं आपल्या साधनखंडांना ज्या विद्वत्तापूर्ण व तेजस्वी प्रस्तावना लिहिल्या

त्या मुख्यतः सन १८९९ ते १९०९-१० पर्यंतच्या काळांतच. या प्रस्तावनांतून त्यांनीं इतिहासाचीं साधनें, त्यांची जपणूक, त्यांची चिकित्सा, त्यांच्यावरून इतिहास-लेखन, त्यांची भाषा, त्यांची लेखनपद्धति, त्यांत दिसून येणारी तत्कालीन परिस्थिति, त्या काळाचें युगमाहात्म्य यांची तर चिकित्सा केलीच, पण प्रत्येक ठिकाणीं राज-वाडे यांची सामाजिक दृष्टि विशेष जागृत असल्याची साक्षहि पदोपदीं पटण्या-सारखी आहे. पानिपतला मराठे कां हरले याची सखोल चिकित्सा करितांना राजवाडे शेवटीं जिंकलेल्या लोकांची मनें संस्कारित करण्याच्या कामाकडे म्हणजेच महाराष्ट्रधर्माच्या प्रसाराकडे लक्ष देण्यास मराठ्यांना सवड मिळाली नाहीं याच मुद्यावर येऊन ठेपतात. सहाव्या खंडांत इतिहासमीमांसा करतांना समाज-शास्त्राचें कार्य कोणतें तें त्यांनीं सांगितलें आहेच, पण इतिहासलेखकासहि समाज-स्थिति ध्यानीं घेणें किती अगत्याचें आहे हेंहि त्यांनीं आग्रहानें प्रतिपादन केलें आहे.

समाजाच्या स्थैर्यासाठीं व प्रगतिसाठीं सामुदायिक प्रयत्न व्हावयास पाहिजे असें राजवाडे यांनीं नुसतें म्हटलेंच नाहीं तर त्याप्रमाणें कांहीं संस्था व कांहीं मंडळें यांची निर्मिति सुद्धां त्यांनीं सहकारी जमवून केली. सन १९१० च्या सुमारास स्थापन झालेले भारत इतिहास संशोधक मंडळ आज भारतांत प्रसिद्ध आहे. इतिहास-संशोधन, भाषासंशोधन हें त्यांचें जीवितकार्यच होतें, पण समाजाच्या उन्नतीसाठीं आरोग्य मंडळ स्थापण्याच्या कामींहि त्यांचा पुढाकार होता. 'संशोधकां'च्या दुसऱ्या वर्षाच्या सातव्या अंकांत राजवाडे यांची एक दीर्घ नोंद प्रसिद्ध झाली आहे; त्यांत समाजाच्या कोणत्या स्वास्थ्यासाठीं कोणतें मंडळ काढावयास हवें याची नोंद त्यांनीं केलेली दिसते. सॅनिटेशन, जहागिरदारांचीं लग्नें, गृहारोग्य, नगरा-रोग्य, हिंदु भोळसटपणा, ब्राह्मणांच्या मुलांची व मुलींची छाती मोजून इतरांशीं त्यांची तुलना करणें, केमिकल सोसायटी, फिजिकल सोसायटी, बॉयॉलॉजिकल सोसायटी, जिऑग्राफिकल सोसायटी, डॉक्टर्स सोसायटी, सोसायटी ऑफ् इंजिनिअर्स सिव्हिल, वेदान्त सोसायटी, पुण्याच्या नदीचें पात्र व पाणी सुधारण्यासाठीं सोसायटी, मुलामुलींचे चरित्र सुधारण्यासाठीं सोसायटी, रेल्वेकारभार सुधारण्यासाठीं सोसायटी, हेडमास्तर अॅसोसिएशन, चेंबर ऑफ् कॉमर्स इत्यादिसारख्या चाळीस सोसायट्या समाज स्वास्थ्यासाठीं निर्माण व्हाव्यात असें राजवाडे यांना साठ वर्षांपूर्वीं वाटत होतें.

साऱ्या महाराष्ट्रांत साधनसंशोधनार्थ एकसारखें भ्रमण व जमविलेल्या साहित्याचें परिशीलन हाच एक उद्योग त्यांना जन्मभर पुरण्यासारखा होता. तो त्यांनीं नेटानें करून साधनसाहित्याचें खंड प्रसिद्ध केलेच; पण पुढें पुढें धुळें येथील वास्तव्यांत भाषा, व्याकरण व समाजशास्त्र या विषयांवर त्यांचें मन गुंतून राहिलेलें दिसतें. समाजशास्त्रावर आपणांस एक ग्रंथ लिहावयाचा आहे असें ते

बोलून दाखवीत असत. धुळ्यास असतांना धातुकोशाचें, नामादिशब्दव्युत्पत्तिकोशाचें काम चालू असतांनाच राजवाडे यांनीं सन १९२२ मध्यें 'राधामाधवविलास चंपू' नांवाचें शहाजीचरित्रात्मक प्रकरण प्रसिद्ध केलें. यास जोडलेल्या दोनशें पानांच्या दीर्घ प्रस्तावनेंत राजवाडे यांनीं शहाजीकालीन समाजावस्थेचें सखोल परीक्षण करून महत्त्वाचे असे संशोधनात्मक निष्कर्ष काढले आहेत. सन १९२४ सालीं म्हणजे मृत्यूच्या आधीं दोन वर्षें त्यांनीं 'महिकावतीची बखर' छापून प्रसिद्ध केली. याहि बखरीस राजवाडे यांनीं कोकणांत स्थिर झालेल्या समाजपुंजांविषयीं जो मूलगामी विचार केला आहे त्याला आजहि तोड नाहीं. या दोनहि प्रस्तावनांत राजवाडे यांची बुद्धिमत्ता, त्यांचें विचारसामर्थ्य, त्यांची सखोल अशी संशोधनदृष्टि यांची परिणती विशेषत्वानें झालेली दिसून येईल. 'हिंदु समाजांत हिंद्वीतरांचा समावेश', 'चित्पावनांची सामाजिक मूळपीठिका', 'विकार विचार प्रदर्शनाच्या साधनांची इतिहासपूर्व व इतिहासोत्तर उत्क्रांति,' 'भारतीय विवाहपद्धति,' 'चातुर्वर्ण्य,' 'अंत्यजोद्धार,' कोंकण व नागलोक,' 'महाराष्ट्रांतील शिवकालीन समाजरचना,' 'महाराष्ट्रांतील बुद्धिमान, प्रतिभावान व कर्त्या लोकांची मोजदाद,' 'सप्तशतीं' यासारख्या निबंधांतून राजवाडे यांच्या विवेकशक्तीची झेंप किती मोठी होती व त्यांच्या प्रतिभेचें सामर्थ्य किती श्रेष्ठ प्रकारचें होतें यांचा प्रत्यय आजहि येण्यासारखा आहे.

जयराम पिंडेकृत 'राधामाधवविलास चंपू' या शहाजीचरित्रास प्रस्तावना लिहितांना राजवाडे यांनीं शहाजीच्या चरित्राचें, त्याच्या धोरणाचें, त्याच्या कार्याचें कर्तृत्व उभें करून झाल्यावर त्यावेळच्या समाजाची जी चिकित्सा केली आहे तितकी मूलगामी चर्चा त्यानंतर झाली आहे असें वाटत नाहीं. शहाजी कालीन ब्राह्मण, मराठे, वैश्य, शूद्र, अतिशूद्र, कातकरी, कोळी, ठाकूर, भिल्ल इत्यादि समाजघटकांचें जें विस्तृत विवेचन करून एक उद्बोधक व विचारप्रवर्तक सिद्धान्त मांडला आहे तो अतिशय महत्त्वाचा आहे. शहाजीकालीन मराठा समाज एवढ्या निकृष्ट अवस्थेला कां गेला या प्रश्नाची चर्चा राजवाडे यांनीं अति विस्तारानें व शोधक बुद्धीनें केलेली आहे. मराठे जर पुरातन क्षत्रिय, तर मग ते शहाजीकाळांत इतके अधम, निकृष्ट, अज्ञ व राष्ट्रभावनाविहीन कसे निपजले ? या एका प्रश्नाचें उत्तर शोधण्यासाठीं राजवाडे यांनीं मराठ्यांच्या मनोवृत्तीची पारख करण्याचें ठरविलें; आणि पाणिनीकाळापासून शहाजीच्या काळापर्यंतचा भारतीय ब्रह्माचा, क्षत्राचा, विशाचा, शूद्राचा इतिहास त्यासाठीं तपशीलानें उभा केला. नंतरच्या काळांत चार वर्णांतून शेकडों जाति कशा निर्माण झाल्या हें त्यांनीं विवरून सांगितलें. राजवाडे यांच्या मतें शूद्राला चातुर्वर्ण्यांत स्थान मिळाल्यामुळेंच त्यांची स्थिति सुधारली, त्यांस आपली प्रगति करून घेतां आली; शूद्र त्रैवर्णिकांच्या जवळ आला. "पडवींतील गुराढोरांत पशुवत् कालक्रमणा करणारा उत्तर कुरूंतील शूद्र चढतां

चढतां दक्षिण कुरूंत शूद्र स्त्रियांच्या उपयुक्त गुणांच्या जोरावर त्रैवर्णिकांना व अग्नीहोत्र्यांना जांवई करण्याच्या उच्चतम पायरीप्रत पोंहचला "[1] पण यामुळें आर्यांच्या चातुर्वर्ण्यासच धक्का बसला. पुढें जैन, बौद्ध धर्ममतांच्या तुफानी प्रचारामुळें आर्यांची समाजघटना खिळखिळी होऊन गेली आणि यांतून पुनः कडक असें चातुर्वर्ण्याचे नियम आले. शूद्र पुनः परित्यक्त झाला.

आणि या सामाजिक घडामोडीच्या काळींच उत्तरेंतील आर्यसमाज दक्षिणपथांत वसति करण्यासाठीं समुहानें येऊं लागला. प्रथम मगधांतील महाराष्ट्रिक आले. करूपांचालांतील राष्ट्रिक आले. विराटाच्या देशांतील वैराष्ट्रिक आले. राजवाड्यांनीं महाराष्ट्राच्या वसाहत काळासंबंधी एक विस्तृत लेखमाला 'इतिहास व ऐतिहासिक' नांवाच्या मासिकांत लिहून प्रसिद्ध केली होती. अनेक गांवांची, नद्यांची, वृक्षांचीं, लोकांचीं नांवें पाहून राजवाडे यांनीं महाराष्ट्राच्या स्थलकालाची निश्चिति करण्याचा प्रयत्न केला आहे. राजवाडे यांच्या संशोधनावर पुढें थोडीफार टीका झाली. कांहीं ठिकाणीं दुरुस्तीहि झाली. परंतु आपल्या सिद्धान्तास राजवाडे यांनीं जो भाषिक व पुरोहितांच्या गोत्रावळींचा पुरावा दिलेला आहे तो पाहून आजचे वस्तुनिष्ठ दृष्टीनें अभ्यास करूं पाहणारे संशोधकहि थक्क होतील. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणीं जाऊन तेथील उपाध्यायांच्या याद्या तपासण्याचा व त्यांतील गोत्रांवरून महाराष्ट्रिकादि आडनांवांवरून कांहीं धागे बांधण्याचा त्यांचा प्रयत्न होता. बौद्धक्रांतिकालीं लोकांच्या बरोबर भोज, पेतेनिक, सतियपुत, केरलपुत, पांड्य, चोल इत्यादि आले; त्यांचाहि परामर्श राजवाडे यांनीं घेतला आहे; व दक्षिणेंत स्थिर झाल्यानंतर या संमिश्र समाजाची गतिस्थिति काय झाली या महत्त्वाच्या मुद्याकडे राजवाडे यांनीं लक्ष दिलें आहे. राजवाडे यांच्या मतें महाराष्ट्रिक व नाग यांच्या हजार पांचशें वर्षांच्या संगमापासून शक पांचशेंच्या सुमाराचे मराठे निर्माण झाले. निरक्षर नाग व ईषदक्षर महाराष्ट्रिक यांच्यांतील गुण व दोष मराठ्यांत उतरले. सूर्यवंश व शेषवंश यांचें चमत्कारिक मिश्रण मराठ्यांत झालें. राजवाडे यांच्या मतें हे मराठे लोक क्षत्रिय खरे, पण रामकृष्णजनकादि आत्मानात्मविचार करणाऱ्या व साम्राज्यें चालविणाऱ्या थोर क्षत्रियांचे हे साक्षात वंशज नव्हत; तर रामकृष्णादिकांच्या काळच्या कांहीं कम सुधारलेल्या आयुधजीवी क्षत्रियांचे व नागांचे हे मुख्यत्वेकरून वंशज होत. याशिवाय राजवाडे यांच्या मतें त्यावेळीं महाराष्ट्रांत राहिलेले उत्तर हिंदुस्थानांतील क्षत्रियांचे वंशज जे होते त्यांच्यांत चालुक्य, यादव, पल्लव, भोज, इत्यादि घराणीं होतीं. यांतूनच चाळके, यादव, जाधव, पालवे, भोसले निघाले व याच कुळांत शहाजी, शिवाजी हे अवतारी पुरुष निपजले. पण त्यांच्या जोडीस असणारे महाराष्ट्रिक नागकुलोत्पन्न मराठे मात्र संस्कृतीनें खालच्या

१ राधामाधवविलास चंपू : प्रस्तावना, पृष्ठ, १४७

दर्जाचे राहिले. राज्यें उभारावींत, वाङ्मयकलादिकांची निर्मिति करावी व तीस आश्रय द्यावा, उच्च प्रकारचा धार्मिक वा तात्त्विक विचार करावा हें या वर्गास साधलें नाहीं. स्वतंत्र स्वाभिमानी पक्ष निर्माण करावा, स्वतःची श्रेष्ठ हत्यारें निर्माण करावींत, स्वतंत्र फौज उभारावी ही इच्छा एकट्या शहाजीच्या ध्यानांत त्या काळीं आली.

पण समकालीन मराठ्यांच्या मनांत या महत्त्वाकांक्षेचा अल्पांशहि नव्हता. पोटाला भाकर देणाऱ्या धन्याच्या पाठीमागे धांवणारे हे सारे लोक होते. त्यांच्यांत राष्ट्रीय भावना निर्माण करण्याचें, त्यांना श्रेष्ठ हत्यारांचें शिक्षण देण्याचें कठिण कार्य शहाजीशिवाजी यांना करावयाचें होतें. नवीन हत्यारें शहाजीस टोपीवाल्या-कडून घेण्याचा प्रसंग येई. बंदुका, तोफा, दारुगोळा यांची निर्मिति महाराष्ट्रांत होणें शक्य नव्हतें कां ? राजवाडे यांनीं आपल्या नेहमींच्या आधारानें या प्रश्नांची चर्चा केली आहे. राजवाडे यांच्या मतें त्या वेळच्या मराठी समाजास शिक्षणच एकंदर बेताचें व बहुतेक निवृत्तीचें मिळत असे. त्यांनीं म्हटलें आहे, “ शहाजीच्या हयातींत युरोपांत डकार्ट, बेकन इत्यादि विचारवंत सृष्टपदार्थ संशोधन-कार्याचे वाली ज्यारीनें पंचभूतांचा शोध लावण्यास लोकांना प्रोत्साहित करीत होते; आणि आपल्या इकडे एकनाथ, तुकाराम, दासोपंत, निपट निरंजन इत्यादि संत पंचभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्कारांत राष्ट्राला नेऊन मुक्त करण्याच्या खटपटींत होते. अश्यांना, स्क्रू, टांचणी, बंदुक व तोफा यांचा विचार वमनप्राय वाटल्यास त्यांत नवल कसचें ? थोडक्यांत ऑगस्ट कोट याच्या भाषेंत सांगावयाचे म्हणजे महाराष्ट्र त्या काळीं Metaphysical अवस्थेंत होतें आणि Positive अवस्थेंत येण्यास त्याला अद्याप पांचशें वर्षें अवकाश होता ” ऑगस्ट कोंटच्या आधारें राजवाडे यांची ही समाज-चिकित्सा किती शास्त्रशुद्ध आहे हा प्रश्न निराळा, पण अशा प्रश्नांचा विचार समाजशास्त्रानें करावयास हवा असें प्रतिपादन आग्रहानें प्रथम राजवाडे यांनींच केलें.

राजवाडे यांच्या प्रगल्भ विवेचन शक्तीचें, परिणत बुद्धीचें व विलक्षण प्रतिभेचें दर्शन घ्यावयाचें असेल तर आपणांस ‘ महिकावतीची बखर ’ या ग्रंथाच्या विस्तृत प्रस्तावनेकडे वळावें लागेल. सन १९१३–१४च्या सुमारास राजवाडे यांनीं इतिहास-शोधार्थ कोंकणांत परिभ्रमण केलें होतें. चित्पावनांची भूमि व तेंथील लोकजीवन हाहि त्यांच्या अभ्यासाचा एक खास विषय होता. गोवा, राजापूर, रत्नागिरी, पावस, चिपळूण, प्रभानवल्ली इत्यादि अनेक ठिकाणचा प्रवास त्यांनीं केला. त्यांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे बोचक्यांत काठी अडकवून ती खांद्यावर टाकून रोज दहाबारा मैलापर्यंत प्रवास कधीं वलाटीनें वा कधीं खलाटीनें त्यांनीं केला. चित्पावनांच्या बरोबरच कऱ्हाडे, देशस्थ, भंडारी, शेणवई, प्रभू इत्यादि लोकांचीहि माहिती त्यांनीं मिळविली. समुद्र, खाड्या, बंदर, कोट, दऱ्या, खोरीं, पठारें, नद्या, डोंगर, पर्वत, देवळें, मशिदी पाहून कोंकणविषयक समाजजीवनाची त्यांनीं बरीच

माहिती जमविली होती. याच सुमारास कोंकणच्या इतिहाससंशोधनासाठीं एखादें स्वतंत्र मंडळ असावें अशीहि सूचना त्यांनीं केलेली आहे. हें झालें दक्षिण कोंकणच्या संचाराविषयीं. सन १९२४ सालीं महिकावतीची बखर संपादित करितांना त्यांनीं उत्तर कोंकणच्या लोकजीवनाचा कसून अभ्यास केला. शक १०६० च्या प्रतापबिंबापासून पोर्तुगीजापर्यंतचा इतिहास या इतिहाससिद्ध बखरीच्या साह्यानें राजवाडे यांनीं उभा केला.

परंतु राजवाडे यांच्या कर्तृत्वाची व प्रतिभेची खरी चमक यापुढील विवेचनांत आहे. राष्ट्ररचनेंत कोंकणी लोकांचा वाटा किती होता, कोंकणांत कोणी कोणत्या वेळीं वसाहत केली; तेथील नद्यांचीं, पर्वतांची, गांवांचीं नांवें कोणीं दिलीं ? भौगोलिक परिस्थितीचा तेथील लोकजीवनावर कोणता परिणाम झाला, राष्ट्रपराङ्मुखता ही या देशच्या मूळच्या लोकांत कशी स्थिर झाली, राज्ययंत्र वा सरकार या विषयीं हे लोक उदासीन का राहिले, त्यांना महाराष्ट्रधर्म कोणी शिकविला, इत्यादि अनेक महत्त्वाच्या प्रश्नांची मूलगामी चिकित्सा राजवाडे यांनीं केलेली आहे. राजवाडे यांच्या मतें नाग लोक प्रथम कोंकणांत आले. त्यांच्याहि आधीं कदाचित् कांहीं वर्षें समुद्र-सपाटीस लागून मांगोले, तांडेले लोक वस्ती करून असावेत. त्यांच्या पूर्वेस दुबळे धेडे लोक शेती करणारे, त्यांच्याहि पूर्वेस सह्यशिखरापर्यंत वारली लोक होते. मांगोले आंध्र मधून आले असावेत. दुबळे धेडे गुजराथमधून आले असावेत. वारलीहि बाहेरून आला असावा. हे सर्व तरी आदिवासीच, पण त्यांच्याहि आधीं भिल्ल, कोळी, कातवडी किंवा कातकरी, यांची वस्ती कोंकणांत असावी. सारांश, मांगोले, वारली, ठाकरी, कातकरी कोळी, कुणबी पातिणी इत्यादि लोकांची वस्ती कोंकणांत पुरातन कालापासूनची आहे. राजवाडे यांच्या मतें "महाराष्ट्र जितुका महाराष्ट्रि-कांनीं बनविला तितकाच बहुतेक मांगोले, वारली, कोळी, कातवडी, लाडी, रांगडी इत्यादि पुंजांनीं वसविला आहे. हे पुंज जर सीमाप्रदेशावर नसते तर मराठी भाषेचा विस्तार सध्या जो दिसत आहे त्याहून बराच संकुचित व मर्यादित दिसता[1]

या आदिवासींची पूर्वपीठिका देऊन राजवाडे यांनीं प्रश्न उपस्थित केला आहे कीं महाराष्ट्रिक, आंध्र, शिलाहार, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, बिंब, नागरशादि-राजे, मुसलमान, पोर्तुगीज, पुनः मराठे, इंग्रज इत्यादि लोकांनीं कोंकणावर अधिराज्य गाजविलें तेव्हां हे आदिवासी किंवा कोंकणचे रहिवासी काय करीत होते ? गुहा-शयांत राहून उदरनिर्वाह करणारा मानव प्राणी, कातवडी, नाग, वारली, कोळी ठक्कर, मांगोले तांडेले, येथें केवळ सुखानें जगत होते. येथील मुबलक अन्न-पाण्यामुळें त्यांना जीवनकलहाची भीति नव्हती. त्यामुळें कोण राजा, कोणाची सत्ता याचीहि फिकीर त्यांनीं कधीं केली नाहीं. एकंदर भारताचाच महिमा जुन्या-

१. महिकावतीची बखर : प्रस्तावना, पृष्ठ, ८५

काळीं असा होता कीं अन्नसंपत्तीच्या मुबलक सहजलभ्य पुरवठ्यामुळें येथील मानव सहजच मुक्तद्वारी बनतो. त्यास पोटासाठीं दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागत नाहीं; किंवा तो पोटार्थी दुसऱ्यावर विनाकारण आक्रमणहि करीत नाहीं. युरोपमधील भुकेबंगाल मानवाप्रमाणें तो सदा युयुत्सु व आक्रमक राहात नाहीं. अन्नसौलभ्यामुळें येथील माणसें उदासीन, आळशी व काल्पनिक तत्त्वज्ञानाच्या मायाजालांत रममाण होणारी निपजतात. त्यांच्यांत एकजुटीचा अभाव असतो. परकीयांशीं लढण्यांत त्याला खुळचटपणा वाटतो. तो परकीयहि येथें कांहीं शतकें राहिल्यावर अन्नाच्या वैपुल्यामुळें त्याचीहि वृत्ती अशीच प्रवृत्तिपासून विलग होते. यामुळें राज्य, पोलीस, सरकार इत्यादि संस्थांची त्याला भलतीच अडगळ वाटते. श्वापद व चोराचिलटापासून संरक्षण करण्यास महार, कुत्रें, काठी एवढी सामग्री त्यास पुरी वाटते. सरकार म्हणजे एक उपटसुंभाची टोळीच या माणसांना वाटते. जुन्या वा नव्या सरकारांचें सुतकसोयर त्यांना तितकेंच असें. त्या काळीं हिंदु गांवकऱ्यांची सृष्टिसिद्ध परिस्थिति सिद्ध व अन्नसिद्ध मनोरचना इतकी मुक्तद्वारी, तुटक व स्वयंपूर्ण बनलेली असे कीं त्यांना देशी वा परदेशी कोणतेंच सरकार मनापासून नको असे. या सरकार नांवाच्या कृत्रिम, उपटसुंभ, चोरट्या, व जुलमी संस्थेसंबंधानें गांवकरी नेहमींच उदासीन असत.

अन्नवैपुल्य व अन्नसौलभ्य यांमुळें भारतीयांची वृत्ति सर्व क्षेत्रांत तटस्थ व एकाकी राहिली. वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था याच कारणामुळें येथें स्थिरावली. प्रत्येक जातीनें आपापलें अन्न आपापला धंदा करून मिळविलें म्हणजे झालें. प्रत्येकानें आपापला देव पृथकपणें पूजिला म्हणजे होत असे. याप्रमाणें सर्वच क्षेत्रांत उदासीन, संन्यस्त, तुटक, मुक्तद्वारी अशा व्यक्तींनीं देश व्यापिलेला असल्यानें सामुहिक जीवनास वावच नव्हता. राजवाडे यांनीं याच ठिकाणीं समाज या शब्दाची तात्पुरती व्याख्या दिलेली आहे. कांहीं एका अर्थाच्या सिध्यर्थ अन्योन्योपकारक व्यक्तींचा जो सहकारी समवाय तो समाज; या व्याख्येनुसार कोणतें समान बंधन या समाजास होतें ? उत्तर कोकणांत वन्य, यहुदी, मुसलमान, खिस्ती, पारशी, अंत्यज, शूद्र, वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण यांपैकीं प्रत्येकाची परंपरा वेगळी, धर्म वेगळा, भाषा वेगळी, फक्त अन्नोत्पादनाच्या बाबतींत सर्वजण एकमेकांना साह्य करीत. बाकी इतर सर्व दृष्टींनीं विसदृश असणाऱ्या या लोकांत एकजीवता निर्माण होणें महा कठिण होतें. प्रत्येकाच्या देवकल्पना तर फारच वेगळ्या होत्या. कातकरी पिशाचपूजक, यहुदी, मुसलमान एक देवपूजक, पारशी अग्निपूजक, हिंदु अनेक देवपूजक, यांच्यांत समानबंधत्व निर्माण होण्यासाठीं या देवकल्पनेसच उखडून टाकण्याचा एक मार्ग राजवाडे यांनीं सुचविला होता. त्यांच्या कल्पनेप्रमाणें यापुढील भौतिक शास्त्राच्या युगांत देवधर्म, अध्यात्म, परमार्थ, पापपुण्य इत्यादि भ्रांत कल्पना दूर होणार होत्या. उत्तर कोंक-

णऱ्या या संमिश्र समाजास एक राज्याची, एकत्वाची जाणीव करून देऊन त्याच्यांत महाराष्ट्रधर्म पसरविण्याचा प्रयत्न तरी सुद्धां कांहीं ब्राह्मण-क्षत्रियांनीं केला.

पण हे ब्राह्मणक्षत्रिय सुद्धां येथील अन्नसमृद्धि व हवापाणी यांनीं लौकर संतुष्ट होतात व त्यांची प्रवृत्ति ठायींच जिरून जाते. तरुणपणीं राज्यभार वाहणारा जनक राजा उतार वयांत वेदान्तविचारास प्रवृत्त झाला. तरुणपणीं रक्तसांड-करणारा अशोक पुढें लागलीच अहिंसेची दीक्षा घेतो. खुनांचा सडा पाडणारा औरंगझेब कुराणाच्या नकला करतो, राजकारण गाजविणारा महादजी शिंदे उत्तर-वयांत रडके अभंग रचीत बसतो. राजवाडे यांच्या मतें या सर्वांच्या वागणुकीचा अर्थ असा कीं हिंदुस्थानांत राजकारण, तदंगभूत मारामाऱ्या व राज्ययंत्र यांची फार जरूरी कुणासच भासली नाहीं. या देशांत मुबलक अन्न इतकें असें कीं त्याच्या प्राप्तीसाठीं राज्ययंत्र, राष्ट्र, मारामाऱ्या, मुत्सद्देगिरी यांची जरूरी मुळींच नव्हती. उत्तर कोंकण वा एकंदर भारतीय लोकजीवनाची मीमांसा करितांना राजवाडे यांनीं यांचें कारण म्हणून एक आर्थिक आदिमूळ सांगितलें आहे. अन्नाचें दुर्भिक्ष्य व दौर्लभ्य यामुळें पश्चिमेकडील समाज एकत्वानें प्रेरित झाले, राष्ट्रनिर्मितीचा प्रपंच त्यांनीं थाटला, आपल्याकडे परिस्थिति अगदीं वेगळी होती. साधनखंडा-पैकीं सहाव्याच्या प्रस्तावनेंत राजवाडे यांनीं जी इतिहासमीमांसा केली आहे तींत मानवी जीवनावर होणाऱ्या बाह्य सृष्टीचा परिणाम कोणता होता याचा ओझरता उल्लेख केला आहे, संपूर्ण विवेचन तेथें आवश्यक आहे अशी टीका कै. डॉ. पुणतांबेकरांनीं राजवाड्यांचें गुणग्रहण करतांना राजवाडेनिधनोत्तर केली आहे. पण सन १९२४ सालीं राजवाडे यांनीं 'महिकावतीची बखर' प्रसिद्ध करतांना प्रस्ताव-नेत जी चिकित्सा केली आहे ती मात्र पूर्णांशानें भौगोलिक कारणांची आहे. बोदिन (१५३०–१५९६), बकल (१८२१–१८६२), रॅटझिल (१८७४–१९०४), मिस सेंपल इत्यादि शास्त्रज्ञांनीं भौगोलिक परिस्थिति व मानवी समाज यांविषयीं जो विचार युरोपीयन समाजशास्त्रांत केला आहे तो या संदर्भात ध्यानांत येण्यासारखा असला तरी राजवाडे यांच्या मीमांसेचें स्वरूप स्वतंत्र व कांहीं ठिकाणीं अधिक मूलगामी आहे.

नाना वंश, नाना जाती, नाना भाषा यांमुळे हिंदु लोक दुर्बल झाले आहेत हें मत राजवाडे यांना तितकेसें मान्य नाहीं. मुसलमान लोक एकभाषी, एक जातीय असतांना हिंदुस्थानचे रहिवाशी झाल्यापासून तुटक, उदासीन, समाज-विन्मुख व राष्ट्रपराङ्मुख झालेले दिसतात. तेव्हां मानवी समाजाच्या पराङ्मु-खतेचें मुख्य व एकमेव कारण राजवाडे यांच्या मतें सुलभ व विपुल अन्नसंपत्ति हेंच होय. या मुख्य विचाराचें स्वतंत्र, विस्तृत विवेचन करणें अगत्याचें आहे असें राजवाडे यांना वाटलें. पण आर्थिक, सामाजिक व राजकीय विषयांचा खल इत्थंभूत व सविस्तर होण्यास एखादा स्वतंत्र ग्रंथ रचिला पाहिजे. बखरीच्या

पडवींतील तुटपुंज्या जागेंत त्याचा निर्वाह होणार नाहीं असें त्यांनीं म्हटलें आहे. संकल्पाप्रमाणें समाजशास्त्रावरील ग्रंथ राजवाडे यांच्या हातून पूर्ण झाला असता तर मराठीस एक अप्रतीम शास्त्रीय ग्रंथ लाभला असता.

उत्तर कोंकणमधील मानवी समाज वरीलप्रमाणें तटस्थ, उदासीन असला तरी त्याला राष्ट्रप्रवण करण्याचे प्रयत्न झालेच. क्षत्रियांना व ब्राह्मणांना राजा, राज्य, राष्ट्र व प्रजा यांचा अर्थ फार प्राचीन काळापासून माहीत होता. कारण ते ज्या प्रदेशांत राहात असत त्या देशांत अन्नाची टंचाई मोठीच होती. अन्न दे, प्रजा दे, गाई दे, मेंढ्या दे अशाच प्रार्थनांनीं आर्यांचे वेद भरलेले आहेत. ‘गिव्ह अस अवर डेली ब्रेड’ ही जशी युरोपीयनांची नित्य प्रार्थना तशीच ब्राह्मणक्षत्रियांची भुकेबंगाली प्रार्थना असे. राजवाडे यांच्या मतानें राजा व प्रजा ही संस्था ब्राह्मणक्षत्रियांनीं भारतवर्षांत आणली. मूळचा राजन् हा शब्द पितृ या शब्दाचा समानार्थक व प्रजा म्हणजे जणूं पोटचीं संतानें. या आर्यांनीं भारतांत एकराज्य, वैराज्य, साम्राज्य, महाराज्य इत्यादि राजकीय प्रयोग प्रथम केले; आणि प्रयोग करून थकल्यावर तेहि अन्नसंतृप्तीनंतर तुटक, सन्यस्त व वेदान्ती म्हणजे राष्ट्रपराङ्मुख, समाजपराङ्मुख बनले; पण यांनांहि पुनः पुनः सावध करणारा व परकीयापासून संरक्षणाची जाणीव करून देणारा एक अल्पसंख्यांक वर्ग होताच. एक समाज करावा, एक राष्ट्र बनवावें व स्वधर्म, स्वराज्य, स्वभाषा इत्यादींची स्थापना करावी असा उपदेश करणाऱ्या महिकावतीच्या बखरीचा कर्ता केशवाचार्य व त्याचा पुरस्कर्ता नायकोराव यांच्याबद्दल राजवाडे यांच्या मनांत सहाजीकच मोठी प्रीति आहे. शाण्णव कुळींचे पाटील, देशमुख, वतनदार या सर्वांची गणना केशवाचार्यानें महाराष्ट्रांत केली. देसाय, पाटेल, चौधरी, वतनदार, हजारदार, महालदार, कुळंबी, म्हातारे, चवघले, राऊत, शिंदे, कड्ड, चोरघे, ठाकूर, परभू, कोळी, तांबट, लोहार, सुतार, सोनकोळी ढोरकोळी, डोरवले, नट, भाट, बुरूड इत्यादि सर्वांचा महाराष्ट्र निर्माण करण्या-बद्दल राजवाडे यांच्या मनांत कमालीचा अभिमान असल्यास नवल नाहीं. देशाचार, कुळाचार, वंशाचार, व देवशास्त्राचार या सर्वांचा मिळून महाराष्ट्रधर्म मानणाऱ्या केशवाचार्यांची गांठ राजवाडे यांच्याशीं पडल्यावर ते एकदम खूष झाले. ‘आद्यशक्ति महाराष्ट्रधर्म रक्षिका तुम्हां सुप्रसन्न असे.’ असा उपदेश भोंवतींच्या लोकांना करणारा हा महात्मा राजवाडे यांना समानधर्मा वाटला.

वरील दोन विशेष प्रस्तावनांचा विचार झाल्यावर राजवाडे यांनीं समाज-विषयक असे महत्त्वाचे विषय घेऊन जे किरकोळ लेख लिहिले त्यांचा विचार करणें अगत्याचें आहे. ‘हिंदुसमाजांत हिंद्वीतरांचा समावेश–’ हा राजवाड्यांचा एक दुर्लक्षित पण महत्त्वाचा लेख आहे. एखादा पुढारलेला समाज परकीय समाजाचा समावेश कोणत्या पद्धतीनें करूं शकतो या संबंधीं ऐतिहासिक

उदाहरणांच्या अभ्यासानें राजवाडे यांनीं यांत चर्चा केली आहे. राजवाड्यांच्या मतें अशा प्रकारचें समवेशन तीन प्रकारांनीं होतें. पहिलें म्हणजे नुसतें जुजबी राजकीय समावेशन. कांहीं मतदानाचे हक्क देणें, आपला प्रजाजन मानणें एवढ्या-पुरतेंच यांत समावेशन असतें. दुसरें धार्मिक समावेशन. पर समाजानें धर्मांतर केलें तरच तो स्वसमाजांत प्रविष्ट झाला असें कांहीं समाज मानतात. तिसरें सामाजिक समावेशन. स्वसमाजांतील स्त्रीपुरुषांना बेटीव्यवहार करण्याची पर-वानगी या समावेशनांत असते. युरोपअमेरिकेंतील समाज रक्त, वर्ण पाहूनच परकीयांस आपल्यांत समावेश करूं देतात. याचें विवेचन करून राजवाडे यांनीं हिंदुसमाजाच्या समावेशनपद्धतिसंबंधीं म्हटलें आहे कीं हिंदु समाजांत परकीयांचें समावेशन जातिशः होतें. येथील आर्यांशीं दोन प्रकारच्या अनार्यांचा संबंध आला. नाग, कोळी, भिल्ल, गोंड, कातकरी वगैरे एतद्देशीय अनार्य व शक यवन, पारसिक, बाल्टिक, मुसलमान वगैरे बाह्य अनार्य. आर्यांच्या चातुर्वर्ण्यांतून पुढें अनेक जाति निर्माण झाल्या. प्रत्येक जातीस एकेक धंदा देऊन ग्रामव्यवस्था सिद्ध झाली. परकीयांचीहि आर्यांनीं जाति निश्चित केली, तिचें ग्रामव्यवस्थेंतील कार्य निश्चित केलें व एकंदर गांवगाड्याच्या कारभारांत त्या परकीय समाजाचा समावेश हिंदु आर्यांनीं केला.

यापुढें राजवाडे यांचें निरीक्षण असें कीं जातिशः समावेश हा व्यक्तिशः समावेशापेक्षां किती तरी श्रेष्ठ आहे. पश्चिमेकडील समाज व्यक्तिशः समावेशन पद्धति स्वीकारीत असल्यानें त्यांच्या इतिहासांत अनेक रक्तपात झाले. दक्षिण अमेरिकेंतील पेरू, मेक्सिको वगैरे देशांत युरोपांतील स्पॅनिश गेले तेव्हां तेथील मूळ लोकांचें काय करावयाचें असा प्रश्न त्यांच्यापुढें होता. ख्रिश्चन धर्म त्यांना देण्याचा प्रयत्न पहिल्यानें झाला पण त्यांत यश न आल्यानें पुढें रक्तपात, क्रौर्य, कत्तल हे प्रकार सुरू होऊन गांवेच्या गांवें उध्वस्त झालीं. संयुक्त संस्थानांत इंग्रज वसाहतवाल्यांनीं रेड इंडियन्सची केलेली निर्दय हत्या इतिहासप्रसिद्ध आहे; आणि आफ्रिकेंतून बरोबर नेलेल्या निग्रोंच्या वंशजांना आजहि किती चमत्कारिक पद्धतीनें तेथें वागणूक मिळते याचाहि इतिहास ताजा आहे. या पार्श्वभूमीवर हिंदूनीं परकीयांस वा येथील मूळ रहिवाशांस जातिशः समाविष्ट करून घेतल्यामुळें येथील समावेशन अधिक उदात्त व माणुसकीस शोभणारें आहे असें वाटतें. हिंदूंच्या या पद्धतिमुळें त्या त्या समाजाचें तें तें वैशिष्ट्य राहिलेंच व आस्ते आस्ते अधिक प्रगत अशा आर्य समाजाचें अनुकरणहि त्यांनीं केलें. हिंदूंचे देव, धर्मविचार, आचार, संस्कृति यांची छाप त्यांच्यावर हळूहळू पडूं लागली. शूद्रांची वा अंत्यजांची सुधारणा झाली ती या मार्गानें. अनार्य, अंत्यज, शूद्र यांना आर्यांनीं आपल्या चातुर्वर्ण्यांत स्थान दिल्यामुळें त्यांच्यांत सुधारणा होऊं शकली असा राजवाड्यांचा सिद्धान्त आहे. वन्यपणा सुटून ते ग्रामवासी झाले, केवळ पारध

करून राहण्या ऐवजीं शेती, गांवांतील इतर उद्योग त्यांना करतां येऊं लागले, नग्नावस्था जाऊन वस्त्राच्छदनावस्था प्राप्त झाली, मांसाहार कमी झाला, चोरटेपणा जाऊन संभावितपणा आला, वन्य देवदेवतांच्या ऐवजी रामकृष्णादि आर्य देवांचें भजनपूजन त्यांना करतां येऊं लागले; आणि भक्तिमार्गाच्या साह्यानें कित्येकांना ब्राह्मणादिकांना वंद्य असें संतत्वहि प्राप्त झालें. राजवाडे यांच्या मतें अनार्यांची ही प्रगति आर्यांच्या विशिष्ट समावेशनपद्धतीमुळें व अनार्यांचा चातुर्वर्ण्यांत समावेश झाल्यामुळें त्यांना करतां आली. त्यांच्या मतें आपली वर्णव्यवस्था वा जातिव्यवस्था हीच आपणास अत्यंत उपकारक झाली आहे. अनेक संकटांतून तिनें आपणांस तारलें आहे; व त्याचबरोबर अनेक अनार्यांना माणुसकीच्या वाटेवर आणलें आहे. सारांश "आस्ट्रेलिया, पाटेगोनिया, मध्य आफ्रिका वगैरे खंडांतील युरोपियनांच्या संसर्गास ज्या रानटी जाति आहेत त्यांच्या मानानें हिंदूंच्या शेजारास आलेल्या अनार्य जाति खरोखरच भाग्यवान समजल्या पाहिजेत. युरोपीयन संसर्गाची बाधा होऊन आस्ट्रेलिया, अमेरिका व आफ्रिका यांतील रानटी समाज कित्येक नष्ट झाले, कित्येक क्षीण झाले व कित्येक गुलाम झाले. तें दुर्भाग्य हिंदुस्थानांतील अन ार्यांच्या वाट्यास न येतां आस्ते आस्ते मगदुराप्रमाणें मार्ग आक्रमण्यास त्यांना इतर अश्रुतपूर्ण अशा सर्वस्वी हिंदूंच्या दयाभूतपणानें मिळाल्या आहेत. अशा या बाराव्या शतकापर्यंतच्या जातिसंस्थ हिंदुसमाजास मंद व मृत कोणत्या तोंडानें म्हणावें?"[१]

राजवाड्यांच्या अव्वल दर्जाच्या प्रतिभेची व मूलगामी विवेचक शक्तीची साक्ष देणारा आणखी एक उपेक्षित निबंध म्हणजे 'विकार–विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांति' हा होय. पहिल्या अर्धांत भाषाशास्त्रीय विवेचन व दुसऱ्या अर्धांत समाज शास्त्रीय विवेचन या लेखांत फार मार्मिकपणें आलें आहे. मनुष्य आपल्या मनांतील विकार वा विचार किती मार्गांनीं प्रकट करूं शकतो? हा भाषाशास्त्रांतील एक प्राथमिक प्रश्न हावभाव, रेखा, चित्रें, लिपि, भाषा, संकेत इत्यादि दहापांच साधनांची चर्चा भाषाशास्त्रज्ञ नेहमीं करतात. परंतु राजवाडे यांनीं मनांत येणाऱ्या विकार–विचारांचें प्रदर्शन करण्याऱ्यांची प्रारंभींच ऐशीच्यावर प्रकारांची नोंद केली आहे. राजवाडे याचें सूक्ष्म निरक्षण आणि पृथक्करण किती शास्त्रशुद्ध असतें याची साक्ष या परिगणनावरून पटण्यासारखी आहे. वेडावणें, दांत काढणें, स्मित करणें, जिभल्या दाखविणें, मिशीवरून हात फिरविणें, भुंवया चढविणें, अंगठा दाखविणें, हुंगणें, थुंकणें, थयमान करणें, लाथाडणें, डोळे मिचकावणें इत्यादि अनेक प्रकारांनीं मनुष्य आपले मनोविकार प्रकट करीत असतो. याच क्रमानें प्रयत्न होतां होतां माणसानें भाषा कमावली. मूळ ध्वनीपासून भाषा, रंगीत

१. राजवाडे लेखसंग्रह : साहित्य अकादेमी, पृष्ठ ५०

किंवा साध्या रेखाचित्रापासून अक्षरमालिका, नैसर्गिक हावभावापासून कृत्रिम अभिनय व पाहिलेल्या आकृतीपासून बनावट भांडीं वगैरे......अशा चार कृत्रिम व्यावहारिक कला माणसानें आपल्या अकलेनें संपादन केल्या. विकार विचार दर्शनाच्या साधनांची नुसती मोजदाद करणें वा त्यांचें वर्गीकरण करणें एवढ्यावरच राजवाडे थांबले नाहींत तर या प्राथमिक चार कलांच्या साधेपणावरून व अतियत्त्वा-वरून आणखी कोणत्या कला माणसानें तयार केल्या त्यांचीहि चर्चा त्यांनीं केली आहे. त्याच्या मतें ध्वनि, रेखा, हावभाव व आकृति या गुणांवरून भाषा, अक्षर, अभिनय, भांडी या साध्या व्यावहारिक कलांची व अतिशयत्व वा भावनांची तीव्रता ज्यांत अधिक आहे अशा गान, चित्रण, नृत्य, मूर्तिकरण या सांस्कृतिक कलांची वाढ होत राहिली. साधेपणा व भावनांची तीव्रता यांच्यांत कमीजास्त होऊन आणखी चार कलांची निर्मिति झाली. काव्य, सचित्र ग्रंथ, 'दिवटें पोर,' नाटक व स्थापत्य या आणखी थोर कलांची निर्मिति मूळ साधनांच्या साह्यानेंच माणसानें केली. ध्वनी, रेखा, हावभाव, घन आकृति या मूळ साधनांपासून निर्माण झालेल्या वीसबावीस कलांचा प्रपंच राजवाडे यांनीं उभा केला आहे; आणि यानंतर त्यांनीं मानवी समाजांत दृढ होऊं पाहणाऱ्या एका विचित्र साधनाच्या चर्चेकडे लक्ष दिलें आहे. हें साधन पूर्ण विकारमय, गूढ व केवळ भ्रान्त असें आहे. परंतु मानवी मनावरील त्याची पकड मात्र विलक्षण असते.

मानवकृत या भ्रान्त शबल व कल्पनाजन्य साधनाची चिकित्सा राजवाडे यांनीं जी केली तिला मराठीत तरी दुसरी तोड नाहीं. ध्वनि, रेखा, हावभाव, घनाकृति हींच मूळ साधनें, पण त्यांच्यावर माणसानें पूर्ण अज्ञात असणारी सृष्टि उभारली व ती सत्य सर्वार्थानें मानिली. आकाशवाणी, अरण्यरुदन, पिशाच्चगान, स्मशानकोलाहल वगैरे ध्वनींच्या प्रतिकारार्थ-ऱ्हाँ,-ऱ्हीं-ऱ्हूँ, फट् व षट्, स्वाहा वगैरे ध्वनि निर्माण झाले. आकाशनगरें, गंधर्व पुऱ्या, सूर्यमुखें वगैरे सारखी काल्पनिक चित्रकला आली. अंगांत वेडेविद्रे संचार होऊन आळेपिळे, पिंगे यांसारखे हावभाव आले व यासर्वांतून पिशाच्च, राक्षस, खवीस, वेताळ, स्वर्ग, नरक, देव, दानव वगैरे घनाकृति निर्माण झाल्या. राजवाड्यांच्या मतें हीं सर्व भ्रान्त व शबल साधनें आहेत. परंतु नवल असें कीं तीं खऱ्याहून खरी मानून देवधर्माचा प्रचंड डोलारा माण-सानें उभा केला. नाना देव, त्यांची पूजाअर्चा, त्यांचे नैवेद्यविधि, भूतपिशाच्च, वेताळ, सैतान यांनीं मानवी जीवनांत एकच गर्दी करून सोडली आहे. मानवी जीवनांत याच संभारास फार महत्त्व आलें. रोजची व्यवहारांतील कर्मे, आयुधें, उपकरणीं, यंत्रें, चित्रें, मूर्ति, थडगीं, लग्नें, जातकरणें, पताका, ध्वज, संस्कार आणि यांतून निर्माण झालेलीं देवदानवांचीं विचित्र चित्रें, स्तोत्रें, वेद, बायबलें, कुराणें, त्रिपीटकें, काव्यें, नाटकें, तांडवें ही प्रजा माणसानें निर्माण केली. ही सर्व सृष्टि काल्पनिक. वास्तवाशीं हिचा संबंध बिलकूल नाहीं. पण मानवी जीवनांत हिचे स्थान फार बळकट आहे.

या बळकट स्थानाचें राजवाडेकृत वर्णन मराठींत एका अव्वल दर्जाच्या गद्य-काव्याइतकें सरस वठलें आहे. एक जुनें पुराणें मराठी गांव, तेथील देवळांची स्थिति, यांचें चित्र राजवाडे यांनीं फार बहारीनें रेखाटलें आहे. जुनाट पिंपळ-वा वड, त्यांचे पार, त्यावरील ब्रह्मराक्षस, वडाच्या बुंध्याशीं असणारा म्हसोबा, वेताळसभा, सतींचीं देवळें, त्यावरील दांपत्य, देवडी, गोपुरें, दीपमाळ, देवळाचें प्रवेशद्वार, इंद्रध्वज, गरुडध्वज, सिंहध्वज, भगवा झेंडा, देवळांशेजारचें कांदळ (प्राचीन कोरीव दगड), वीर, असुर, गरुड वा नंदी, जयविजय, कांसव, कीर्तिमुख, प्राकारचित्रें, इंद्रसभा, दशावतार, अडनीवरचा शंख, सर्पाकृत पळीं, कमलाकृत अभिषेकपात्र, मत्स्याकृति धुपाटणें, अनेक महरपा, जाळ्या, नागशिला, जलदेवता गोमुख, संन्याश्यांच्या समाध्या, चबुत्रें, मशीद, बौद्ध स्तूप, पांडवलेणें, क्याथो-लिक चर्च इत्यादि सर्व तपशीलांचा गांव राजवाडे यांनीं उभा केला आहे! आपणहि गांव पाहतों, देऊळ पाहतों, पण राजवाडयांना लहानसान वस्तूंत फार मोठा इतिहास दिसतो. सर्पाकृत पळीचा वा नागशिलेचा, गरुडाचा वा कासवाचा, गोमुखाचा वा नंदीचा जिवंत इतिहास त्यांच्या जवळ आहे; आणि हा इतिहास पुनः महाराष्ट्रांतील लोकांच्या शबल, काल्पनिक, अवास्तव साधनांचें, कलांचें, मतांचें मूर्त प्रदर्शन आहे. श्रद्धाळु माणसास ही सारी सृष्टि खरी वाटते. कलेचे व शिल्पाचे भोक्ते या सृष्टीकडे कलेच्या दृष्टीनें पाहतात; आणि राजवाडे यांच्या सारख्या करड्या इतिहासकारास हे सर्व भ्रान्त कल्पनेचे खेळ वाटतात. सोंडेचा गणपती, पंखांचे देवदूत, चोचीचा गरुड, शेषशायी नारायण, चतुर्मुख ब्रह्मदेव, दशमुख रावण, घोडमुखे किन्नर, ऊर्ध्वशिखा नारद ही सारी सृष्टि त्यांच्या मतें खोटी भ्रान्त व अशास्त्रीय आहे. शास्त्रज्ञान वाढत जाईल तसतशीं ही सृष्टि लोप पावेल असा त्यांचा विश्वास आहे. या सृष्टीनें राजवाडे यांच्या मतें ‘ अद्याप जग बाल्यावस्थेंत कसलें, शैशवावस्थेंतच आहे. ’ कार्यकारणभावाचें नीट ज्ञान नसल्यानें माणसानें या भ्रान्त कल्पना उभारल्या व त्यांचें स्तोम माजविलें. देव ही कल्पना राजवाडे यांच्या मतें मुळांतच कृत्रिम आहे. स्वयंभू नाहीं.

राजवाड्यांच्या देवकल्पनेची चिकित्सा येथें करावयास अवसर नाहीं व शास्त्रज्ञानाच्या वाढीबरोबर ती किती कमी होईल हें आजमावण्याचें येथें स्थान नाहीं; पण एखाद्या बाबीचा राजवाडे किती सूक्ष्म व तरल विचार करूं शकतात याचा उत्तम नमुना म्हणजे विकार विचार प्रदर्शनावरील हा निबंध होय. मानवी प्रेरणांच्या आधुनिक चिकित्सेंत राजवाडे यांच्या या निबंधास फार मोठें व महत्त्वाचें स्थान द्यावें लागेल. राजवाडे यांचा हा लेख विस्मृतींत गेला असला तरी या विषयाच्या अभ्यासकास आणखी किती तरी वर्षें तो मार्गदर्शक ठरेल. याच तोलाचा राजवाडे यांचा आणखी एक निबंध म्हणजे ‘ महाराष्ट्रांतील बुद्धिमान, प्रतिभावान व कर्त्या लोकांची मोजदाद ’ हा होय. आज वस्तुनिष्ठ अभ्यासाचें महत्त्व आपण

फार मानतों. राष्ट्रांतील कर्तृत्ववान लोकांची परिगणना अनेक दृष्टींनीं हितकारक व उद्‌बोधक असते. अलीकडच्या काळांत तर या निरीक्षणास फार मोठा सामाजिक अर्थ प्राप्त झाला आहे. सन १९५२ सालीं डोनाल्ड रॅाबिन्सननें ' The 100 most Important People in the world today ' नांवाचा आपला अभ्यास प्रकट केला आहे. एकाच वर्षांत या पुस्तकाच्या चार आवृत्त्या निघाल्या. तीनचार वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या ' महाराष्ट्र जीवन ' च्या दुसऱ्या खंडात प्रा. ग. बा. सरदार यांनीं ' आधुनिक महाराष्ट्राचे शंभर शिल्पकार ' म्हणून एक यादी प्रसिद्ध केली आहे. पहिला अभ्यास जगांतील लोकांचा आहे. त्यांत जवाहलाल नेहरू हें एकच नांव भारतीय आहे. दुसऱ्या प्रयत्नांत महाराष्ट्रजीवन ज्यांनीं उंचावलें त्यांची नोंद ओळदीड ओळीच्या वर्णनासहित आहे. राजवाडे यांनीं पन्नास वर्षांपूर्वी याविषयीं केलेला अभ्यास अधिक मूलगामी व चिकित्सापूर्ण आहे. प्रतिभावान मनुष्य हा नेहमीं काळाच्या पुढें असतो. अर्थात् राजवाडे यांच्या आधीं असा प्रयत्न युरोपमध्यें झाला होता व तुलनेसाठीं राजवाड्यांनीं त्यांचा उपयोगहि करून घेतला आहे. पण महाराष्ट्रापुरता शोध या प्रकराचा प्रथम राजवाडे यांनीं घेतला. त्याची शास्त्रशुद्ध चिकित्सा केली व आपले निष्कर्ष लोकांसमोर मांडले. आपल्या समाजांत खेदकारक उणीव ही कीं असे निष्कर्ष पाहणारे व त्यावरून पुढें जाणारेच कुणी भेटत नाहींत.

बुद्धिमान, कर्तृत्ववान व समाजोपयोगी अशाच माणसांचें कर्तृत्व राजवाडे यांनीं मापलें आहे. राजवाडे यांनीं प्रथम दीडशें माणसांची नोंद केली. यांत ग्रंथकार, नट, समाजसेवक, वेदविद्यासंशोधक, गोरक्षक, वर्तमानपत्रकार, राजकारणी, संस्थास्थापक, योगी, वैद्य, इतिहाससंशोधक इत्यादि क्षेत्रांतील कर्तृत्ववान लोक आहेतच. या कर्तृत्ववान व बुद्धिमान लोकांतून राजवाडे यांनीं प्रतिभावंत लोक वेगळे काढले. प्रतिभा व बुद्धि यांतील सूक्ष्म फरक राजवाडे यांनीं फार मार्मिकपणें वर्णन केला आहे. प्रतिभा (genius) चें स्वरूप निश्चित करून वरील नांवांतून राजवाडे यांनीं ४३ नांवें निश्चित केलीं व त्यांतून ७ च व्यक्ति प्रतिभावान म्हणून त्यांनीं निवडल्या आहेत. ही निवड गेल्या शंभर वर्षांतील लोकांतून आहे. या हिशेबानें राजवाडे यांना बुद्धिमान व प्रतिभावान अशीं माणसें १९१३ सालीं २३ मिळालीं. यापूर्वी कांहीं वर्षें म्हणजे सन १८६८ सालीं प्रसिद्ध संशोधक फ्रान्सिस गाल्टन यानें "Natural Existance and Hereditary Genius" या ग्रंथांत अशा प्रकारें काम करून १२५० व्यक्तींची निवड केली होती. राजवाडे यांची तुलनात्मक बुद्धि येथें काम करूं लागली. राजवाडे यांच्या हिशेबानें ग्रेट ब्रिटनमध्यें लाखांत सव्वा मनुष्य प्रख्यात कर्ता होतो, तर आपल्याकडे वीस लाखांत एक प्रख्यात कर्ता निपजतो. संख्येचें हें प्रमाण जितकें चिंतनीय तितकेंच व्यवसायबाहुल्याचें दृश्यहि आपल्यांकडे चिंताजनक आहे. भौतिक शास्त्रांच्या वीसबावीस

शाखा अशा आहेत कीं महाराष्ट्रांत कर्तृत्व शून्य आहे. या दुःसह स्थितीची संपूर्ण चिकित्सा पुढें मागें राजवाडे करणार होते; पण ती त्यांच्या हातून झालेली दिसत नाहीं.

राजवाडे यांच्या हातून समाजशास्त्रावर स्वतंत्र असा ग्रंथ लिहून झाला नाहीं; परंतु त्यांच्याजवळ ऐतिहासिक दृष्टि प्रखर असल्यामुळें अनेक सामाजिक समस्यांचा उलगडा करण्याचा प्रयत्न त्यांनीं आपल्या विख्यात प्रस्तावनांतून व किरकोळ लेखांतून केलेला आहे. त्यांतील कांहीं विचारांचें मोल आजहि असें आहे कीं आजच्या अभ्यासकांनीं तें सूत्र घेऊन पुढें जावें. राजवाडे यांचीं कांहीं मतें निःसंशय अतिरेकाचीं होतीं, पण त्या त्यांच्या अतिरेकांतहि त्यांचें म्हणूनहि एक सबळ कारण असे. शबल, विकृत, भ्रान्त, कल्पनाजन्य, भावनांनीं लडबडलेलें राजवाड्यांना कांहींहि पसंत पडणारें नव्हतें. विज्ञानविकासवर त्यांची श्रद्धा होती. या भौतिक शास्त्रांच्या आधारावर आपला समाज प्रगत व्हावा असें त्यांना मनापासून वाटे. राष्ट्रनिष्ठेवरीलहि त्यांची दृष्टि कधीं चळली नाहीं. या दोन वृत्तींवर त्यांचें हें समाजचिंतन उभें राहिलें आहे.

राजवाडे यांच्या समाजचिंतनाचें स्वरूप विस्तारानें ध्यानांत येण्यासाठीं त्यांच्या आणखी कांहीं किरकोळ लेखांचा उल्लेख येथें करावयास हवा. 'महाराष्ट्रांतील शिवकालीन समाजरचना' या विस्तृत लेखांत राजवाडे यांनीं शिवकालीन समाजस्थितीचें रेखीव व यथातथ्य चित्र रेखाटलें आहे. शिवपूर्वकालीन समाज चातुर्वर्ण्यावर आधारलेला कसा होता, प्रत्येक वर्ण स्वधर्मानें वागत असल्यानें समाज निर्भय कसा बनला होता, पुढें या चातुर्वर्ण्यास वाईट दिवस कसे आले, जैन, बुद्ध यांच्यामुळें समाज विघटित कसा झाला, इस्लामी आक्रमणांत समाजाचें रूपच कसें उलटें सुलटें होऊन गेलें याचें मोठें विदारक चित्र राजवाड्यांनीं उभें केलें आहे. "हिंदुमात्राला नेऊन मुसलमान सुंतेची दीक्षा बलात्कारानें देऊं लागले. देवळें मोडलीं गेलीं, देव फोडले गेले, बायका भ्रष्ट केल्या गेल्या, साधु संत छळले गेले आणि लक्षावधि लोक दुष्काळानें मृत्युमुखीं पडले. ब्राह्मणाला स्वधर्म चोरून पाळणें कपाळीं आलें, आणि क्षत्रियांचें शौर्य वांझ झालें. पुनः चातुर्वर्ण्य संस्थेला उतरली कळा लागली. वैश्यवर्ग नागवला गेला आणि शेट महाजन हें नांव मात्र राहिलें. महाराष्ट्रांतून वैश्य वर्ग अजिबात नाहींसा झाला. अति शूद्रांपैकीं खाटीक, तांबोळी, रंगारी, चांडाळ हे लोक स्वतः होऊन मुसलमान झाले. मराठ्यांत एक भाऊ हिंदु, तर दुसरा बिरादर मुसलमान दिसूं लागला. काजी न्यायासनावर बसला आणि खाटिक बलुतेदार झाला. देवळांच्या मशिदी झाल्या आणि पर्वत्यांचे पीर झाले. घाटांचे दर्गे बनले; आणि राउळांचे महल झाले. अशी सर्वत्र उलटापालट झाली. धर्म केवळ लोपून गेला."[1] अशा या भ्रष्ट होणाऱ्या समाजास साधुसंतांनीं वाचविलें व पुढें रामदास शिवाजीनें याचा उद्धार केला.

'हिंदुस्थानांतील आर्य लोकांचा वर्ण' या नांवाचा एक महत्त्वाचा लेख राजवाडे यांनीं लोकशिक्षण मासिकाच्या शके १८३५ च्या आषाढ महिन्याच्या अंकांत लिहिला आहे. पृथ्वीवर काळ्या, पांढऱ्या, तांबड्या, पिवळ्या रंगाचीं माणसें आढळतात. चिनी, ब्रह्मी, तिबेटी, भूतानी, जपानी वगैरे लोक पिवळसर असतात. निग्रो, हबशी मिसरी काळे असतात. अमेरिकेंत इंडियन तांबडे असतात. युरोपियन गोरे असतात. अर्थात् यांतहि अनेक छटा व प्रकार असतील. गोरेपण, तांबडेपण वगैरे सापेक्षतेनेंहि समजावयास हवे. भारतीय आर्यांचा वर्ण कोणता ? असा प्रश्न उपस्थित करून इतिहासांतील देवादिकांचे दाखले पाहून राजवाडे यांनीं भारतीयांना 'सावळ्या' रंगाचें ठरविलें आहे.

'सप्तशती' हा असाच एक राजवाडे यांचा महत्त्वाचा लेख. महाराष्ट्रांतील देवदैवतांत देवीचें स्थान फार मोठें आहे. तुळजापुर, सप्तशृंगी, विंध्यवास, कोल्हापूर, मातापूर, पार इत्यादि ठिकाणीं ही शक्तिमाता निवास करून आहे. सप्तशतींत देवीचें माहात्म्य वर्णन केलें असून मत्त झालेल्या असुरांपासून तिनें आपल्या भक्तांचें कसें रक्षण केलें या संबंधींच्या सुरस कथा देण्यांत आल्या आहेत. राजवाडे यांच्या मतें प्रत्येक कथा म्हणजे त्या त्या वेळीं आलेलें सामाजिक गंडांतर होय. कोल, महिष, मुंड, व चंड, असुर, दैत्य, धौम्र, कालक दौर्हृद, मौर्य, कालकेय, कंबू, ताम्र, अंधक हीं सर्व नावें मानवसमुदायी असून आर्यांना भेटणारीं हीं अनार्यकुलें होत. राजवाडे यांनीं यांतील प्रत्येकाची ऐतिहासिक दृष्टीनें छाननी करून आज यांच्यापैकीं कोण कोणत्या स्वरूपांत प्रवशिष्ट याची चर्चा केली आहे.

ज्या लेखमालेमुळें राजवाडे यांच्यावर अनेकांचा रोष झाला ती म्हणजे 'संशोधक' मासिकांतील 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' ही होय. भारतीय विवाहसंस्थेच्या विकासकार्यांत अनेक चमत्कारिक बाबींचा त्यांनीं उल्लेख केला आहे. रानटी लोकांचा 'यज्ञ,' प्रजापतिसंस्थेचें कार्य, अग्नि व यज्ञ, अग्नि व प्रजोत्पादन इत्यादि विषयांवर राजवाडे यांचे विचार प्रक्षोभक आहेत. गर्भ, योनि, रेत, मुष्क, अंजि, प्रजनन, प्रजापति, मेंदू, इंद्रिय, वृष, वृषण, वीर्य इत्यादि शब्द ज्यांचा उच्चार करणें आपणां अर्वाचीनांस अश्लील व असभ्य वाटतें ते शब्द यजुः संहितेंत अग्नीच्या सान्निध्यानें पदोपदीं आलेले आढळतात. प्रजोत्पादक इंद्रियें हीं अग्नि आहेत, अशी रानटी ऋषिपूर्वजांची कल्पना असे. ......यजमानानें वर्षभर ब्रह्मचर्यानें राहावयाचें व्रत वैदिक कालीं निघालें. तत्पूर्वी वेदीवर म्हणजे आवतीभोंवतीं म्हणजे जमातीच्या जागीं स्त्रियांच्या पाठी लागणारे पुरुष व

१. राजवाडे लेख–संग्रह : भाग ३ : पृष्ठ १०१

पुरुषांच्या पाठी लागणाऱ्या स्त्रिया यथेच्छ रममाण होत. ज्या मालकाची आगटी असेल त्यांच्या स्त्रिया आलेल्या पाहुण्यांशीं रममाण होत व तोंपर्यंत यजमान स्वतः अतिथिसत्कारार्थ स्वतः ब्रह्मचर्यानें राही. अतिथीला स्वस्त्री समर्पण करण्याची जी चाल वैदिक ऋषी लोकांत पुढें चालू होती तिचें दर्शक यजमानाचें हें कांहीं कालापर्यंतचें ब्रह्मचर्य होय. ' अशा सारख्या राजवाडेकृत संशोधनावर सर्वत्र टीका न झाल्यासच नवल.

राजवाडे यांच्यावर आणखी एकदां टीकेचें मोठें काहूर उठलें तें म्हणजे चांद्रसेनीय कायस्थ प्रभु जातीवर राजवाडे यांनीं कांहीं लेख लिहिले तेव्हां. शके १८३४ च्या अहवालामध्यें भा. इ. सं. मंडळानें दोन निवाडपत्रें प्रसिद्ध केलीं. शके १८३९ मध्यें चतुर्थ संमेलन वृत्तांतांत संस्थेचे उपाध्यक्ष राजवाडे यांनीं ' कायस्थधर्म प्रदीप ' व शिवराज प्रशस्ति, ' नांवाचा मूळ लेख प्रसिद्ध केला. या लेखांत चांद्रसेनीय कायस्थ प्रभूवर राजवाडे यांनीं कांहीं दूषणात्मक आरोप केले आणि महाराष्ट्रांत एकच वादळ निर्माण झालें. स्वजातीय पुढाऱ्याकडून हल्लेप्रतिहल्ले होत राहिले. केशव त्रिंबक गुप्ते यांचे ' राजवाड्यांची गागाभट्टी ' सन १९१९ व के. सी. ठाकरे यांचें ' कोदंडाचा टणत्कार ' हीं दोन पुस्तकें राजवाडे यांना उत्तर देण्यासच जन्मास आलीं. वि. स. वाकसकर यांनींहि विविधज्ञानविस्तारांत[१] या विषयाचा परामर्श घेतलेला आढळून येतो.

राजवाडे यांचें समाजशास्त्रीय निरीक्षण आणखी एका गैरमर्जीस कारणीभूत झालें. मराठी संतांवर राजवाडे यांची गैरमर्जी होती असा एक समज आहे. संतांनीं राष्ट्र बुडविलें, नेभळें केलें अशा अर्थाचा मजकूर राजवाडे यांनीं लिहिला तो अजूनहि लोकांच्या लक्षांत आहे. संतमंडळींचा वा संताळ्यांचा भक्तिपंथ कसा होता याचें वर्णन करतांना राजवाडे लिहितात, " ह्या तीन शतकांत संताळ्यांचेंच प्राबल्य महाराष्ट्रांत फार होतें. संत म्हटला म्हणजे अत्यंत पंगुपणाचा केवळ मूर्तिमंत पुतळाच होय. संताला खाणें नको, पिणे नको, वस्त्र नको, प्रावरण नको, कांहीं नको. एक विठोबा मिळाला म्हणजे सर्व कांहीं मिळालें. ऐहिक सुखदुःखें ऐहिक उपभोग, ऐहिक व्यवहार, त्यांच्यांत मन घालणें संताचें काम नव्हे. इहलोक हा संताचा नव्हेच. राजा कोणी असो, सारा कोणी घेवो, संताला त्याचें कांहीं नाहीं. असल्या या संतमंडळीच्या हातीं विचाराची दिशा जाऊन, महाराष्ट्र तीन शतकें पंगू बनून राहिलें. "[२] मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड चौथ्यामधील हाच

१. ऑक्टोबर १९१८, एप्रिल मे १९२३

२ ऐतिहासिक प्रस्तावना: पृष्ठ २८५

सूर खंड सहाव्याच्या प्रस्तावनेंतहि आहे. ‘शिवाजीच्या हत्तींना, रथांना व घोड्यांना व जनसमूहाच्या मताला धाब्यावर बसविणारा तुकाराम, ज्ञानेश्वराचाच शिष्य होय. ही ग्यानबा तुकारामाची जोडी महाराष्ट्रांतील समाजाच्या व राष्ट्राच्या प्रपंचाला बहुत घातक झालेली आहे.”[1]

संतांविषयीं अशा प्रकारचे तीव्र उद्‌गार राजवाडे यांनीं काढले तेवढे मात्र जास्त प्रचलित झाले. राजवाडे यांनीं संतांच्या कार्याचें विधायक समालोचन केलें आहे तेंहि ध्यानांत घेणें अगत्याचें आहे. उत्तर पेशवाईंत मराठ्यांचें राज्य मोडकळीस कां आलें याची चर्चा करतांना पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत राजवाडे यांनीं असें म्हटलें आहे कीं समाजाची मनोभूमिका घडविणारे साधुसंत त्या काळीं नव्हते. “ग्रंथ, व्याख्यानें वगैरे साधनसंपत्ति पेशव्यांनीं तयार न केल्यामुळें हिंदुस्थानांतील मराठे सरदार व तद्देशीय संस्थानिक व सामान्य जन पानिपतच्या मोहिमेच्या अगोदर व नंतर मराठ्यांच्या विरुद्ध लढले ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. ग्रंथसमूहांचा, धर्मव्याख्यानांचा, साधुसंतांचा, व यात्राजत्रांचा उपयोग राष्ट्रांतील लोकांच्या मनाला नीट वळण देण्यास केवढा मोठा होतो ही गोष्ट शहाजी, शिवाजी यांच्या मनांत जशी बिंबली होती तशी बाळाजी बाजीरावाच्या व सदाशिव चिमणाजीच्या मनांत भरलेली दिसत नाहीं...राज्यें मिळविण्यास जसा तोफांचा व शिपायांचा उपयोग होतो तसा तीं कायम राखण्यास व जतन करण्यास व्याख्यानांचा व विचारी पुरुषांचा होतो.[2] पुढें आठव्या खंडाच्या प्रस्तावनेंत मराठी भाषेस फारशीच्या आक्रमणांतून संतांनीं वाचविलें असें विवेचन राजवाडे यांनीं केलें आहे. ‘हे ग्रंथकार नसते तर सतराव्या शतकांत महाराष्ट्रांत झालेली स्पृहणीय राज्यक्रांति झालीच नसती—’ असा निर्णय राजवाडे यांनीं येथें दिलेला आहे.

संतकार्याचें अधिक विधायक दृष्टीनें त्यांनीं केलेलें समालोचन ‘शिवकालांतील समाजरचना’ या मागें उल्लेखलेल्या निबंधांत आलेलें आहे. मुसलमानी आक्रमणामुळें मराठी समाज अस्ताव्यस्त होऊन गेला होता; त्यावेळीं संतांनीं महाराष्ट्रास कसें तारलें यांचें विवेचन करतांना राजवाडे यांनीं लिहिलें आहे, “अठरा पगड जातीचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र स्वधर्मभ्रष्ट झाले असतां, ते बहुतेक मुसल्मान बनल्यासारखेच झाले. इतकेंच कीं त्यांनीं सुंतेची दीक्षा मात्र घेतली नाहीं. तीहि त्यांनीं घेतली असती, परंतु त्यांच्या आड एक मोठी धोंड आली. ती धोंड महाराष्ट्रांतील साधु व संत हे होत. भांडणें, तंटे, अपेयपान, अभक्ष्यभक्षण, ह्यांचें साम्राज्य सर्वत्र मातलेलें पाहून, ही बजबजपुरी कांहीं तरी ताळ्यावर यावी या सदहेतूनें साधुसंतांनीं सर्वांना सहजगम्य व सुलभ

१. कित्ता: पृष्ठ ३४१.

२. कित्ता: पृष्ठ ९५

अशा भक्तिमार्ग सुरू केला. धर्मज्ञान लोपलें होतें, विधिनिषेधाची प्रतिष्ठा राहिली नव्हती. प्रायश्चित्तास कोणी पुसत नव्हतें, अशी सर्व प्रजा वृषलवत् अथवा बहुतेक म्लेंच्छवत् बनली होती. ही प्रजा सनातन धर्माला, आर्य संस्कृतीला सोडून जावयाच्या पंथास लागली होती. बरेच लोक सोडूनहि गेले होते. बाकीं राहिलेल्या लोकांचा मगदूर पाहून, साधुसंतांनीं परमकारुण बुद्धीनें भक्तिमार्ग सुरू केला...... ह्या भक्तिमार्गाच्या द्वारां साधुसंतांनीं वर्णाश्रमधर्मलोपप्रधान अशी ही महाराष्ट्रांतील दुर्दैवी प्रजा दोनअडीचशें वर्षें आर्यसमाजांत मोठ्या शिताफीनें थोपवून धरिली, व आर्य संस्कृतीचें रक्षण केलें. तेव्हां आपल्या या देशावर त्यांचे उपकार बिनमोल झाले ह्यांत काडीचाहि संशय नाहीं."[१]

राजवाडे यांचें हें समाजचिंतन अशा प्रकारचें आहे. ऐतिहासिक शोधक दृष्टीनें त्यांनीं समाजमनाची परीक्षा केली व ती निर्भिडपणें लोकांपुढें मांडली. रागलोभाची पर्वा त्यांना कधींच नव्हती. कांहीं विचार अर्थात्च अतिरेकाचे आहेत, पण अतिरेकानें सांगितल्याशिवाय या मठ्ठ समाजास समजावयाचेंच नाहीं अशी जणुं त्यांची कल्पना असावी. समाज कणखर असावा, सर्व आंतरबाह्य संकटें त्यानें लीलेनें झुगारून द्यावींत, वर्णाश्रम धर्माची स्थापना व्हावी, भौतिक सामर्थ्यानें समाज प्रतिष्ठित व्हावा, सर्व शक्तींचा विकास होऊन राज्याचें अनुशासन भक्कम व्हावें ही त्यांची एकमेव मनीषा होती. सामर्थ्यसंपादनाच्या विरहित जें जें असेल त्याचा त्याग करावा असें त्यांचें आग्रही मत होतें. तें मांडतांना थोड्या अतिरेकानें त्यांनीं म्हटलें आहे.

"कुइं कुइं, किणकिण, गुइंगुइं वगैरे नरम आवाज उत्पन्न करणारी सतार, दंतवाद्य, गितार वगैरे भिकार वाद्यें खुद्द भीमसेनालाहि बृहन्नडा करतील; मग सामान्य पोलीस, शिपाई व खर्डेघाशे ह्यांन्या साक्षत् स्त्रैणपणा त्यांनीं आणला तर त्यांत नवल नाहीं. बायकी आवाज काढणारे ते जनानखान, फुटक्या मडक्यासारख्या थालिपिठ्या व रेक्या आवाज काढणारे ते लंबकंठ शास्त्री त्या दोघांनाहि संस्थानिक प्रजा बिघडविण्यास सक्त मनाई असावी. नाकांतून गाणाऱ्या पारशी नाटक कंपन्या व ताणावर ताणा घेणाऱ्या मराठी नाटक कंपन्या संस्थानांत बिलकुल शिरकूं देऊं नये. ह्यांच्या ऐवजीं पवाडे म्हणणारे शाईर, एकतारीवर भजन म्हणणारे महार, गंभीर वीण्यावर व मर्दानी डफावर आलपणारे लावणीकार, ह्यांचा परामर्श कदाचित् प्रजेला जास्त हितकर होईल. सगळयांत रणभेरी, रणतंबूर, रणझांज वगैरे हत्यारें प्रजेकडून ऐकविल्यास व वाजविल्यास, तिच्यांत मर्दानी बाणा उभवेल. रडकीं गाणीं व किरटीं वाद्यें वाजविण्यास किंवा भिकार नाटकें पाहण्यास येथील प्रजेला मुबलक वेळ आहे तेथील प्रजा खुळी, परतंत्र, जनानी व झिंगलेली

१. राजवाडे लेखसंग्रह : भाग ३; पृष्ठ १०९-११०.

आहे, असें खुशाल समजावें. दुष्काळानें व महर्गतेनें पोटभर अन्न न मिळालें तरी चालेल, परंतु भांडीं विकून व बायको गहाण टाकून नाटकें पाहणारे कारागीर ज्या देशांत फार झाले तो देश पक्का वेडा बनला असला पाहिजे, यांत बिलकुल संशय नाहीं. दहा वर्षांच्या खटपटीनें पैसा फंडाचे महाराष्ट्रांत आठ हजार मिनतवारीनें बनतात; एकट्या मुंबईतील सर्व नाटक कंपन्यांचें दर आठवड्याचें उत्पन्न वीस हजारावर आहे"[१] राजवाडे यांचीं हीं विधानें अतिरेकाची व गैरसमजुतीची वाटतात, पण एकंदर समाजाच्या स्वास्थ्याचा व रक्षणाचा विचार करतां त्यांना एका दृष्टीनें मोलाचें स्थान द्यावें लागेल यांत संशय नाहीं. असल्या विधानांमागची त्यांच्या मनाची तळमळ स्पष्ट होण्यासारखी आहे.

१. विश्ववृत्त मासिकः सप्टेंबर १९०७

१०. राजवाड्यांचें समाजचिंतन : चातुर्वर्ण्य व जातिविचार

राजवाडे यांच्या समाजचिंतनांत चातुर्वर्ण्यविचारास प्रमुख स्थान द्यावें लागेल. प्राचीन भारतीयांच्या या विशिष्ट समाजघटनेविषयीं त्यांना कमालीची आस्था वाटे. चातुर्वर्ण्य व जातिरचना यांच्यामुळें भारतीय समाजास स्थैर्य आलें व अनेक बाह्य आक्रमणांपासून त्यांचा बचाव झाला अशी त्यांची खात्री झाली होती. वर्ण आणि आश्रम ह्या भारतीय समाजघटनेच्या दोन गोष्टी त्यास निरंतर उपयोगी झाल्या याबद्दल राजवाडे यांना संशय नव्हता. हे चातुर्वर्ण्य कोणी निर्माण केलें? गीतेंतील 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्' चा नेमका अर्थ काय? चातुर्वर्ण्य ईश्वरानें निर्माण केलें याचा अर्थ तें स्वयंभूच होतें असा करावयाचा कीं प्राचीन ऋषिवर्यांनीं समाजव्यवस्थेचा एक सर्वोत्तम प्रयोग म्हणून करून पाहिला आणि तो यशस्वी झाला म्हणून त्याकडे पाहावयाचें? पुनः ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण एकदम निर्माण झाले कीं प्रथम ब्राह्मण, मग क्षत्रिय अशा क्रमानें गुण-कर्मांवरून यांची निर्मीति झाली? जाती वा उपजाती या आधीपासून होत्या कीं त्यांची निर्मिति वर्णांमधून झाली? आजच्या शास्त्रीय युगांत या वर्णविचारास वा जातिविचारास कितपत स्थान आहे? यांसारख्या अनेक प्रश्नांची चर्चा करण्यापूर्वी स्वतः राजवाडे यांनीं याविषयीं जें विवेचन केलें आहे त्याकडे प्रथम लक्ष देऊं.

राधामाधवविलासचंपूच्या प्रस्तावनेंत राजवाडे यांनीं या विषयाचा विस्तारानें प्रपंच मांडला आहे. शहाजीकालीन मराठे इतके अधम कसे निघाले याची चर्चा करतांना त्यांनीं प्राचीन क्षत्रियांचा व म्हणून ब्राह्मणांचा, वैश्यांचा व शूद्रांचा विचार केलेला आहे. या वर्णव्यवस्थेचीं स्थित्यंतरें कशीं झालीं याचीहि मार्मिक चर्चा राजवाडे यांनीं केलेली आहे. भारतीय क्षत्राचा इतिहास पाहण्यासाठीं त्यांना भारतीय ब्रह्माचा, भारतीय विशाचा, भारतीय शूद्राचा इतिहास पाहणें अगत्याचें वाटलें. या चातुर्वर्ण्याचा दक्षिणेंतील आर्यांच्या वसाहतीशीं संबंध कोणता होता हें त्यांना प्रामुख्यानें पाहावयाचें असल्यानें पाणिनीच्या काळापासून त्यांनीं विचार केला आहे. पाणिनीच्या काळीं पुरुष-सूक्तोक्त ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण होते. यांतून पक्की जाति-संस्था मात्र उदयास आलेली नव्हती; म्हणजे या वर्णांना वर्णत्व जन्मानें न येतां त्यांच्या गुणांवरून प्राप्त होत असावें. पाणिनिकालांत ब्राह्मण षट्कर्माधिकारी असून राजाचें पुरोहितत्व करणारा व प्रसंगीं राजाशीं लढणारा वा दुसरा राजा निर्माण करणाराहि आहे. जे ब्राह्मण अविद्वान वा कुलशीलविहित असत त्यांना ब्राह्मणजातीय म्हणत. आयुधजीवी ब्राह्मणांना ब्रह्मणकीय म्हणत. गोत्र-

प्रवरांना ब्राह्मण फार जपे. दुसरा वर्ण क्षत्रियांचा. वेदकालीन राजन्य म्हणजेच क्षत्रिय. हे त्रिकर्माधिकारी असून देशरक्षणाचें काम यांच्याकडे असे. कृषि, पाशुपल्य, व वाणिज्य हे धंदे वैश्याकडे असत. हे तीनहि वर्ण त्रैवर्णिक म्हणून प्रसिद्ध असून या तिघांना उपनयनादि संस्कार असत व त्यांचें शिक्षण गुरुगृहींच होत असे. चौथा वर्ण शूद्रांचा. अनिरवसितशूद्र व निरवसितशूद्र असे दोन प्रकार त्यांच्यांत होते. निरवसित म्हणजे आंत येण्याचे निःशेष बंद केलेले व अनिरवसित म्हणजे निःशेष बंद न केलेले. राजवाड्यांच्या मतें शूद्र हे आर्य नव्हत. शूद्र हे पहिल्यापासून अनार्य असून ते त्रैवर्णिकांच्या बाहेरच होते. पाणिनीच्या कालीं त्यांना अंशतः समाजव्यवस्थेंत दाखल करून घेतलें होतें. हे शूद्र म्हणजे तक्षन्, अयस्कार, रजक, तंतूवाय इत्यादि होत ; व चंडाल, निषाद, मृतप यांचा विचार अजून व्हावयाचा होता.

पाणिनिसूत्रांच्या साह्यानें चातुर्वर्ण्याकडे पाहावयाचें म्हणजे या चारहि वर्णांत गौण का होईना पण शरीरसंबंध होत असे. या संकरवर्णाच्या उपवर्णाचा उल्लेख पाणिनि करीत नाहीं. अंबष्ठ, करण, उग्र, मागध, माहिष्य, क्षतृष्य वैदेहक, रथकार, निषाद, पारशव, चंडाल इत्यादि अनुलोमप्रतिलोम संकर याज्ञवल्क्य वर्णन करतात. नट, करण, झल्ल, मल्ल निच्छिवि, द्रविड इत्यादींचा मनु उल्लेख करतो. परंतु पाणिनि यांचा निर्देश करीत नाहीं; संकर जातीय म्हणून करीत नाहीं. याचा अर्थ राजवाडे यांच्या मतें असा कीं या संकर जातींना स्वतंत्र असें सामाजिक अस्तित्व मिळालें नव्हतें. पाणिनि किंवा त्याच्याहि आधींच्या कालीं संकर जातीस गौणत्वहि येत नसावें. पाणिनीकालीन शूद्र हा अनार्य होता. त्यांना संस्कार नव्हते, त्यांना धर्म नव्हता, आखुघातः शूद्रः म्हणून त्यांचा उल्लेख होई. उंदीर मारणारा व खाणारा शूद्र. यांतील कांहीं वरुड म्हणजे बुरूड होते. कांही वस्त्रें रंगविणारे रजक होते. कित्येक तांबे लोखंड शोधणारे ताम्रकुट्ट व अयस्कार होते. यांच्या स्वाभाविक धंद्यांवरून प्रथम त्यांना स्वग्रामांत व नंतर वर्णव्यवस्थेंत आर्यांनीं स्थान दिलें ; त्यांना जवळ केलें.

आर्यांच्या चातुर्वर्ण्यांतील ब्राह्मण हा ऋग्वेदकालाच्या अगदीं पहिल्या थराच्याहि पलीकडल्या काळांत एकच वर्ण होता. मुलतः याचा वर्ण शुक्लभास्वर, मनोरचना देवधार्मिक आणि हव्यास आत्मानात्मविचाराचा. ह्या ब्राह्मण नांवाच्या आर्ष लोकांना पामीरच्या पठारावर वर्णानें लाल असे लोक मिळाले. हे रक्तवर्ण लोक शौर्यानें सिंहासारखे, क्रौर्यानें लांडग्यासारखे, कजाखीनें कुक्कटाप्रमाणें, सोशीकपणानें कुत्र्यासारखे असून डोक्यानें किंचित् मंद होते. या मंद डोक्याच्या रक्तवर्ण लोकांवर तीव्र डोक्याच्या शुक्लवर्ण ब्राह्मणांनीं बेमालूम छाप बसविली आणि वेदवाङ्मयांत गाजणारें ब्रह्मक्षत्रात्मक द्वंद्व निर्माण झालें. या दोघांत कालान्तरानें आणखी एक पीतवर्ण येऊन मिसळला. या टोळींतील लोक कृषि, पाशुपाल्य व वाणिज्य करण्यांत

कुशल असून स्वास्थ्याच्या काळांत ब्रह्मक्षत्राहून जास्त पटाईत होते. ह्या द्रव्योत्पादक टोळीला ब्रह्मक्षत्रांनीं विश असें नांव दिलें ; आणि आर्यांचें त्रैवर्ण्य सिद्ध झालें. अशा प्रकारें क्रमयोगेंकरून विकास पावलेलें हें त्रैवर्ण्य पामीर प्रदेशांतून दक्षिण दिशेनें उत्तर कुरु, हिरण्मय, रम्यक, इलावृत्त, हरिवर्ष, किंपुरुष अशा उत्तरोत्तर दक्षिण देशांतून भारतवर्षांत उतरलें. हिमालयाकडील उत्तर कुरु व उत्तर मद्र या देशांतच यांना कृष्णवर्णीय असे शूद्र नामक रानटी लोक भेटले. यांच्याकडे दास्य कर्म आलें. राजवाडे यांनीं येथें आवर्जून सांगितलें आहे कीं दास्य कर्म करावयास लाविलें याचा अर्थ त्यांच्यावर जुलूम केला असा नव्हे. त्रैवर्णिक ज्याला दास्यकर्म म्हणत तें अर्धरानटी शूद्र उच्च व सुखाचें कर्म मानीत.

आणि यानंतर राजवाडे यांनीं सर्वांच्या आदरास व कांहींच्या रोषास कारणीभूत झालेल्या पुरुषसूक्ताचा स्वतंत्र अर्थ बसवून दाखविला आहे. राजवाडे यांच्या मतानें पुरुषसूक्तांतील पुरुष म्हणजे सर्वत्र असणारा, अनेक असणारा, सर्व व्यापून असणारा असा विराट संस्थावाचक शब्द आहे. उत्तरकुरूंतील व उत्तरमद्रांतील जी राज्यपद्धति तीस वैराज्य असें नांव होतें. चातुर्वर्णिकांची ही वैराज्य नामक विशिष्ट राज्यपद्धति, तिचें गुणवर्णन करणारें जें राष्ट्रीय वा वैराष्ट्रीय गीत तेंच पुरुषसूक्त होय. या नवीन राज्यसंस्थेचे घटक यांत वर्णन केले आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशी ही चतुष्पाद राज्यसंस्था निर्माण झाली. काबाडकष्टाचीं कामें शूद्राकडे आलीं. द्रव्योत्पादनाचें काम वैश्य पाहूं लागले. राष्ट्ररक्षण क्षत्रियाकडे आलें व वेद निर्मितीचें किंवा ज्ञानविद्येच्या जोपासनेचें कार्य ब्राह्मणांकडे आलें. यांखेरीज पशु, पक्षी, सूर्य, चंद्र, इंद्र, अग्नि, वायु, अंतरिक्ष, द्यावा, पृथ्वी, हीं सर्व या राज्यांचींच अंगें मानण्यांत येत असत.

राजवाड्यांच्या मतें या चातुर्वर्ण्यात्मक वैराज्य संस्थेचा परिणाम शूद्रांच्या सामाजिक स्थितीवर फार चांगला झाला. 'त्रैवर्णिकांच्या समाजांत एव्हांपर्यंत शूद्राला आपलें स्वतःचें असें हक्काचें स्थान नसे. तें हक्काचें स्थान चातुर्वर्ण्य संस्थेच्या निर्मितीनें शूद्रास कायमचें मिळालें. आजपर्यंत शूद्राला त्रिवर्णबाह्य, अस्पृश्य, व ओंगळ समजत. एथून पुढें तो चातुर्वर्ण्यान्तर्गत, स्पृश्य व सोंगळ समजला जाऊं लागला. चातुर्वर्ण्यांत घेतल्यामुळें चातुर्वर्ण्याचे सामान्य धर्म पाळण्याची त्याच्यावर जबाबदारीहि आली. उंदीर, कुत्रीं, सर्प इत्यादि गलिच्छ व निषिद्ध मांसें शूद्रांस चातुर्वर्ण्यांत आल्यापासून सोडावीं लागलीं. यशाशक्ति स्वच्छ राहून शौचधर्म पाळण्याची आवश्यकता भासूं लागली. चोऱ्यामाऱ्या करून परस्वापहरणापासून पराङ्मुख व्हावें लागलें, आणि इंद्रियांची स्वैरगति नियमित करावी लागली. तात्पर्य, चातुर्वर्ण्यांत आल्यानें शूद्रांची रानटी स्थितींतून ग्राम्यस्थितींत बढती झाली."[1]

---

१ राधामाधवविलासचंपू, प्रस्तावना: पृष्ठ १४३

शूद्राच्या या व्यवस्थेमुळें आर्यांचेंहि हित झालें. शूद्र अगदीं परकीय म्हणून जो त्रास होत असे तो वाचला. अनार्य चोऱ्या करीत, आश्रम लुटीत, गाई मारीत, खन्याखोस्याचा विधिनिषेध बाळगीत नसत, व्यर्थ हिंसा करीत आणि आर्यस्त्रीशी असभ्यतेनें वागत. त्यांना चातुर्वर्ण्यात स्थान मिळाल्यामुळें आर्यांना वाटणारी ही पीडादायक स्थिति बंद झाली; आणि चातुर्वर्ण्यात्मक समाजाची सर्वांगीण प्रगति झाली. मग नंतरच्या काळांत शूद्रास अवमानित कां व्हावें लागलें ? या प्रश्नाची चर्चा राजवाडे यांनीं फार मार्मिकपणें व मूलगामी दृष्टीनें केली आहे. राजवाडे यांच्या मतें शूद्रांची नंतरची अवमानित स्थिति ही प्रतिक्रियेच्या स्वरूपाची आहे. शूद्र घरींदारीं कामास राहिला व त्यांतून संकरास प्रारंभ झाला. प्रथम हा प्रमाद वैश्याकडून घडला. कृषि, पाशुपल्य, व व्यापार करणाऱ्या वैश्याला हाताखालीं राबण्यासाठीं बरेच शूद्र ठेवावे लागले. शूद्र स्त्रीपुरुषांचा वैश्य स्त्रीपुरुषांशीं अशा रीतीनें संबंध आला. कालान्तरानें हा असद्व्यवहार क्षत्रियांत व ब्राह्मणांतहि वद्धूं लागला. पुढें यास संभावितपणा प्राप्त झाला. भीष्म, कृष्णद्वैपायन, विचित्रवीर्य, शकुंतला, यदु, द्रुह्यु, आस्तिक, वसिष्ठ, ऋष्यशृंग, काश्यप, वेद, तांड्य, कृप, द्रोण, मतंग, मत्स्य इत्यादि हीन वर्णीयांच्या मातांपासून निर्माण झालेल्या ब्रह्मक्षत्रांची परंपरा महाभारतांत सांपडेल. अपत्य पित्याच्या वर्णानुसार समजण्याची पद्धति असल्यानें या संकरज प्रजेला प्रतिष्ठा मिळाली. पण त्रैवर्णिकांच्या रक्तांत, वर्णात, स्वभावांत व चालीरीतींत फार फरक पडत चालला. ब्राह्मणीचीं पोरें व शूद्रीचीं पोरें अशीं सर्व ब्राह्मण पोरें समजलीं जाऊं लागल्यानें समाजघटनेंत शैथिल्य निर्माण झालें. पुढें तर शुक्लभास्वर वर्णाचे व कृष्णवर्णाचे ब्राह्मण वेगळे दिसूं लागले. यांतून आर्यांच्या चातुर्वर्ण्यास तडे जाऊं लागले व पुढें पुढें तर चार्वाक, जैन, बौद्धमत यांच्याकडूनहि प्रखर हल्ले होऊन चातुर्वर्ण्यात्मक रचना खिळखिळी झाली. मध्यंतरीच्या काळांत शूद्रांच्या हातीं राजसत्ताहि गेली.

थोडक्यांत म्हणजे उत्तरकुरूंत जो अर्धरानटी शूद्र केवळ दासकर्म करून समाजसोपानाच्या अगदीं खालच्या पायरीवर लाथाडला जात होता तो आतां नंदांच्या व मौर्यांच्या शूद्र व वृषल राजवटींत अध्यात्म, नीति, प्रव्रज्या, एकवर्णता, सर्वसमता व साम्राज्य यांचा विजयी चालक बनला. जैनबौद्धादींची ही एक विलक्षण अशी सर्वव्यापी भयंकर सामाजिक क्रांति होती. बुद्धाचें अलौकिक सामर्थ्य ओळखून आर्यांनीं त्यास आपल्या दशावतारांत स्थान देऊन चातुर्वर्ण्यावर ओढावलेल्या आपत्तीच्या निरसनार्थ प्रयत्न चालविले. चातुर्वर्ण्याच्या अभिमान्यांनीं राहिलेल्या शूद्रांस व शूद्र स्त्रियांस दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. शूद्रनियमनाचा उपक्रम आखण्यांत आला. ‘ शूद्रस्त्रीजन्य प्रजा पितृजातीय एव्हांपर्यंत समजली गेल्यामुळें त्रैवर्णिकांत शौद्र रंग, शौद्र स्वभाव व शौद्र वृत्ति यांचा प्रसार होऊन, जैन बौद्धादिक

पाखंडें जन्मास आलीं. सबब धर्मज्ञांनीं व पूर्वेतिहासज्ञांनीं असा कायदा केला कीं शूद्रस्त्रीशीं त्रैवर्णिकांनें कोणत्याहि स्थितींत (कस्मिन्नपि वृत्तान्ते) व कसल्याहि आपत्तींत (आपद्यपि) विवाह करूं नये.[1] यामुळें संकरास थोडा प्रतिबंध झाला. शूद्र स्त्रीची प्रजा मातृवर्णाची मानली जाऊ लागल्यामुळें निषाद उर्फ पारशव उग्र व करण ऊर्फ रथकार अशा नव्या जाति निर्माण झाल्या. यांतूनच चातुर्वर्ण्य-प्रणीत व्यवस्थेंतून अनेक जातींची निर्मिति झाली. पुढें राजकीय स्थितीहि पालटली. बौद्ध धर्माचा पाडाव झाला. सनातन अशा वैदिक धर्मास पुनः चांगले दिवस आले. गुप्तांच्या व सातवाहनांच्या काळांत हिंदु धर्मास पुनः प्रतिष्ठा प्राप्त झाली. राम, कृष्ण इत्यादि ऐतिहासिक व्यक्ति देवत्व पावल्या. त्यांची व शिव, विष्णु, इंद्र, सूर्य, वायु, मरुत, लक्ष्मी इत्यादि देवदेवतांचीं भव्य व रमणीय मंदिरें उभारलीं गेलीं. ब्रह्मसूत्रें, तर्कसूत्रें, मीमांसासूत्रें, भक्तिसूत्रे वगैरे ग्रंथ निर्माण होऊन वैदिक धर्मास स्थिरता प्राप्त झाली. चातुर्वर्ण्यांतील शूद्राचें स्थान जें उंचावलें होतें तें पुनः खालीं कां गेलें याची राजवाडेकृत मीमांसा ही अशी आहे.

चातुर्वर्ण्य कसें निर्माण झालें असावें, त्यांत शूद्रास महत्त्वाचें स्थान कसें मिळालें, त्याचा परिणाम अवनत अवस्थेंत कसा झाला, प्रतिक्रिया म्हणून पुनः शूद्रास अवमानित कां व्हावें लागले राजवाडे यांचीं विवेचना बहुधां मान्य होण्यासारखी आहे. चातुर्वर्ण्यात्मक समाजघटनेमुळेंच व जातीव्यवस्थेमुळेंच भारतीय समाज टिकून राहिला, अनेक संकटांपासून बचावला, याबद्दल राजवाडे यांच्या मनांत बिलकुल संदेह नव्हता. आज चातुर्वर्ण्य व जातिसंस्था याबद्दल आपल्या मनांत विशेष अनुकूलता नसली तरी इतिहासकालांत त्यांनीं केलेलें कार्य मान्य करणें भाग आहे. एऱ्हवी राजवाड्यांना विरोध करणारे चिं. वि. वैद्य सुद्धां राजवाडे यांच्या या विषयींच्या चौकसबुद्धीची तारीफ करतांना दिसतात. 'पाणिनिकालीं मिश्रजाति नव्हत्या, मिश्रजाती शूद्रस्त्रीमुळें हळुहळू उत्पन्न झाल्या. चांडाळ, वैदेह मागध वगैरे त्यांची नांवें देशपरत्वानें पुढें उत्पन्न झालीं वगैरे अनुमानें साधार आहेत आणि राजवाड्यांच्या सूक्ष्म चौकस बुद्धीची व विस्तृत शोधाची साक्ष देतात.'[2]

परंतु चिं. वि. वैद्य यांना राजवाडे यांनीं पुरुषसूक्ताचा राजकीय अर्थ बसविला आहे तो मान्य नाहीं. वैद्य यांच्या मतें या सूक्ताचा अर्थ पारमार्थिक आहे. तसेंच शुभ्र वर्णाच्या ब्राह्मणांच्या टोळीस लाल वर्णाची टोळी पामीर प्रान्तात भेटली. पुढें पिवळ्या रंगाची टोळी या दोघांना भेटली व त्यांतील व्यवस्थेंतून वेदकालीन त्रैवर्णिक निर्माण झालें हें राजवाडे कृत भाष्य वैद्य यांना मान्य नाहीं. त्यांच्या

१. मनुस्मृति : अध्याय ३, श्लोक १४

२. वैद्यांचे ऐतिहासिक निबंध : पृष्ठ ७३

मतें 'पांढरा, तांबडा, पिवळा रंग केवळ काल्पनिक आहे. ऐतिहासिक नव्हे. कविकल्पना आणि इतिहास हे निराळे केले पाहिजेत.'[1] राजवाडे यांच्यावरील वैद्यकृत या आक्षेपाचा अधिक विचार करणें अगत्याचें आहे. रंगांवरून वर्णकल्पना कीं गुणकर्मांवरून वर्णकल्पना असा भेद मनांत निर्माण होणें सहाजिक आहे. जगांतील लोकांचें वर्गीकरण सापेक्षता ध्यानांत घेऊन गोरे, काळे, ताम्र, पीत असें करतां येण्यासारखें आहे. प्रत्येक रंगांस विशिष्ट गुणधर्म सततचा चिकटविणें कितपत बरोबर होईल हें सांगतां येणार नाहीं. पण वैद्य समजतात त्याप्रमाणें ही रंग कल्पना राजवाड्यांची केवळ कविकल्पना नाहीं. महाभारताच्या शांतिपर्वांत भृगु-भारद्वाज संवादांत पुढील श्लोक आले आहेत.

न विशेषोस्ति वर्णानाम् सर्वं ब्रह्ममिदं जगत् ।
ब्रह्मणा पूर्वसृष्टं हि कर्मणा वर्णतां गतम् ॥
कामभोगप्रियास्तीक्ष्णा : कोधना : प्रियसाहसा : ।
त्यक्त स्वधर्मारक्तांगास्ते द्विजा : क्षत्रतां गत : ॥
गोभ्यो वृत्तिं समास्थाय पीताकृष्योपजीविन : ।
स्वधर्मान्नानुतिष्ठन्ति ते द्विजा : वैश्यतां गता : ॥
हिंसानृतप्रियालुब्धा : सर्वकर्मोपजीविन : ॥
कृष्णा : शौचपरिभ्रष्टास्ते द्विजा : शूद्रतां गत : ॥

प्रथम काय असावें, वर्ण कसे निर्माण झाले, त्यांचे गुणधर्म कोणते होते, त्या गुणधर्मांत बदल कितपत शक्य होता इत्यादि प्रश्नांचा खुलासा येथें चांगला झालेला आहे. प्रथम ब्रह्मदेवानें वर्ण विशेषरहित असें जग उत्पन्न केलें, तेव्हां सर्वच ब्राह्मण होते. पुढें कर्मांमुळें वर्णभेद झाला. ज्यांना भोग आवडत, संताप येई, धाडसाचीं कामें करण्याची ईर्षा असे व ज्यांचा वर्ण तांबूस रंगाचा होता असे क्षत्रिय झाले. गुरेंढोरें पाळून शेतीवर उपजीविका करणारे पीत वर्णाचे लोक वैश्य झाले; आणि हिंसा करणें, खोटें बोलणें ह्यांविषयीं प्रेम असणारे व सेवावृत्तींत समाधान मानणारे शूद्र बनले. म्हणजे समाजाच्या गरजेनुसार गुणकर्मावरून हें चातुर्वर्ण्य निर्माण झालें. त्यांतील रंगाशीं असणारा संबंध समाजशास्त्रज्ञांनीं तपासून पाहावयास हवा. भगवद्-गीतेमध्यें 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागश :' म्हणून स्पष्टपणें सांगितलें आहे.[2] याचा अर्थ असा कीं चातुर्वर्ण्य जन्मावरून ठरत नसून गुणांवरून ठरत असावें. पुढें गीतेंतच प्रत्येक वर्णाचे गुणधर्महि विस्तारपूर्वक सांगून कर्तव्यें

१. कित्ता : पृष्ठ ७४

२. गीता : अध्याय ४, श्लोक १३

कर्मांचीहि मीमांसा केलेली आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचीं कर्में त्यांच्या स्वभावजन्य म्हणजे प्रकृतिसिद्ध गुणांप्रमाणें पृथक विभागलेलीं आहेत. शम, दम, तप, शुचिर्भूतपणा, शांति, सरळपणा (आर्जव) ज्ञान म्हणजे अध्यात्मज्ञान, विज्ञान म्हणजे विविध ज्ञान, व आस्तिक्य बुद्धि हें ब्राह्मणांचें स्वभावजन्य कर्म होय. शौर्य, तेजस्विता, धैर्य, दक्षता, युद्धांतून पलायन न करणें, दातृत्व आणि प्रजेवर सत्ता चालविणें हें क्षत्रियांचें स्वभावजन्य कर्म होय. कृषि म्हणजे शेती, गौरक्ष्य म्हणजे गुरेंढोरें पाळण्याचा धंदा आणि वाणिज्य म्हणजे व्यापार, हें वैश्यांचें स्वभावजन्य कर्म होय; आणि सेवा करणें हें शूद्रांचें स्वभावजन्य कर्म होय.[1] चातुर्वर्ण्याची ही स्वभावजन्य गुणभेदानें झालेली रचना इतरत्रहि अनेक ठिकाणीं वर्णन केली आहे. महाभारतांतील वनपर्वांत नहुषयुधिष्ठिर व द्विजव्याध--संवाद, अनुशासन पर्वांत उमामहेश्वर संवाद, अश्वमेधपर्वांत अनुगीता इत्यादि ठिकाणीं या विषयांचें विवेचन आलेलें आहे. नंतर मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति यांतूनहि या विषयाचा प्रपंच आला आहे.

> लोकानां तु विवृद्ध्यर्थं मुखबाहूरुपादत :
> ब्राह्मणं क्षत्रियं वैश्यं शूद्रंच निरवर्तयत्[2]

प्रजेची वाढ व्हावी म्हणून परमेश्वरानें मुखापासून ब्राह्मण, बाहूंपासून क्षत्रिय, मांड्यांपासून वैश्य व पायांपासून शूद्र निर्माण केले. या मनूच्या वचनांत पुरुषसूक्तांतील विचार थोड्याफार फरकानें आलेला आहे. पुढें याच अध्यायांत चारी वर्णांचीं कर्मेंहि सांगितलीं आहेत. ब्राह्मणांचें श्रेष्ठत्वहि येथेंच निवेदन केलें आहे. विद्यारहित ब्राह्मणांचा निषेधहि केलेला आहे. शूद्रास सांगितलेले विधिनिषेधहि येथें नमूद झालेले आहेत. वर्णसंकाराची अखेर कशांत होते याचेंहि विवेचन मनुस्मृतींत आहे. प्राचीन स्मृतिग्रंथांचा व गीतेसारख्या सिद्धान्तग्रंथाचा या बाबतींत आशय असा कीं चातुर्वर्ण्य गुणकार्मावरून ठरतें, जातीवरून वा जन्मावरून नाहीं. गीतेनें आणखी एका विचारास प्राधान्य दिलें आहे; तें हें कीं, कोणत्याहि एका वर्णास कोणतींहि कर्में स्वभावजन्य प्रकृतिभेदानें प्राप्त झालीं असलीं तरी तीं आचरण करण्यांत वा समर्पित बुद्धीनें करीत राहण्यांतच आयुष्याची सार्थकता आहे. प्रकृतिधर्मानें भिन्न असणारा परधर्म कितीहि चांगला असला तरी तो भयावह असे असा गीतेचा संदेश आहे. धर्म या शब्दाचा अर्थ गीता प्रकृतिजन्य स्वाभाविक कर्तव्यकर्में हाच करिते

---

१. भगवद्गीता अध्याय १८ श्लोक, ४१–४४

२. मनुस्मृतिः अध्यायः १–३१

आशा या चातुर्वर्ण्याची तारीफ राजवाडे यांनीं अनेक ठिकाणीं केलेली आहे. ही वर्णव्यवस्था आज कालबाह्य कां झाली हा आणखी एक महत्त्वाचा विचार आहे. परंतु चातुर्वर्ण्यामुळें हिंदु समाज टिकून राहिला याविषयीं समाजशास्त्रज्ञांतहि दुमत नाहीं. "चातुर्वर्ण्याविषयीं हें सांगितलें पाहिजे कीं हें तत्त्व समाजास अत्यंत हितकर आहे. चातुर्वर्ण्य आणि जातिभेद हीं एक नव्हत. एकजातिरूप बनलेल्या राष्ट्रांत आणि समाजांत चातुर्वर्ण्य असूं शकतें आणि आज जातिभेद नाहींसा झाला तर चातुर्वर्ण्य उत्कर्ष पावेल, अपकर्ष पावणार नाहीं."[1] डॉ. श्री. व्यं. केतकर यांचा हा अभिप्राय या दृष्टीनें चिंतनीय आहे. भारतीयांच्या या प्रख्यात समाजघटनेच्या प्रयोगावर त्याच्या यशस्वितेची साक्ष असतांनासुद्धां आज कडाडून टीका होते ती त्यांतील चौथा वर्ण जो शूद्र याच्या निर्मितीसंबंधीं गैरसमज बरवर पाहतां निर्माण होतात तेव्हां. परंतु राजवाडे यांनीं हे शूद्र चातुर्वर्ण्यांत कसे आले व त्यांची स्थिति कशी सुधारत चालली याचें फार चांगलें विवेचन केलें आहे. त्याचा परिचय आपण करून घेतला आहेच. कोणत्याहि वर्णास वा कर्मास कमी महत्त्व नाहीं, व फारच निकृष्ट असणाऱ्या लोकसमूहास उन्नतावस्थेंत आणण्याचा प्रयत्न करणें या दोन विचारांवर वर्णव्यवस्था तपासण्यासारखी आहे. शूद्र पायापासून निर्माण झाले या अर्थाच्या मनूच्या वचनापेक्षां शूद्र हे या विराट पुरुषाचे पाय आहेत या अर्थाचें पुरुषसूक्त अधिक महत्त्वाचें मानावें लागेल. आर्यांच्या समाजघटनेंत शूद्रास स्थान मिळालें तेव्हां त्याची उन्नति होत गेली व ती इतकी झाली कीं मूळचें चातुर्वर्ण्य धोक्यांत येण्याचा संभव निर्माण झाला आणि पुनः चातुर्वर्ण्यांत शूद्रावर अतिरिक्त बंधनें आलीं. त्यांच्यावर अपमानास्पद अशीं आचारात्मक बंधनें लादण्यांत आलीं. यांतूनच पुढें जातिभेदांतील अस्पृश्यत्व निर्माण झालें व शूद्राची अवहेलना फार झाली. ही बाब खरीच आहे.

तेव्हां भारतीय समाजघटनेचा इतिहास पाहतां ब्राह्मण वर्णाइतकेंच शूद्रास या नाहीं त्या कारणानें महत्त्व आलेलें दिसेल. हे शूद्र होते तरी कोण ? द्रविड, आदिद्रविड वा अनार्य म्हणजे शूद्र असें सर्वसाधारणपणें मानण्यांत येतें. यांचा कायमचा उपद्रव टाळावा म्हणून आर्यांनीं यांना त्रैवर्णिकांशीं जोडून घेतलें; हें आपण पाहिलें आहेच. हे शूद्रातिशूद्र आर्यांची वसाहत होण्यापूर्वीच येथें वस्ती करून होते. यांतील अनेक उपजातींचें विस्तारानें वर्णन करण्याचें हें ठिकाण नसलें तरी आजवर अत्यंज वा अस्पृश्य गणले गेलेले महार हे महाराष्ट्रांतील आदिवंशांपैकीं असावेत असाहि संशोधकांचा तर्क आहे. महाराष्ट्र हें नांवहि महारावरून आलें असाहि निष्कर्ष ज्ञानकोशकार डॉ. केतकर काढतात हेंहि सर्व-

१. श्री. व्यं. केतकर, भारतीय समाजशास्त्र : पृष्ठ २०५, सन १९३६

प्रसिद्ध आहे. महार हे अधिक बुद्धिमान, ईर्षावान, शक्तिमान् असल्यामुळें इतिहासकालांत त्यांच्याकडे कामगिरीहि विशेष असे. खरें म्हणजे आपल्या येथील मूळ भूमिपुत्र महारच. जमिनीची सर्व व्यवस्था त्याच्याकडे असे. गांवठाणाच्या जमिनीच्या साऱ्या सीमा त्याला माहित असत. गांवचें रक्षण तोच करी. गांवच्या खजिन्याची नेआण तोच करी. ‘ थोरल्या घरचा ’ महार गांवगाड्यांत महत्त्वाचें स्थान संपादून होता. ‘ महारांच्या हक्कासंबंधींचीं पत्रें राजवाडे यांनींच आपल्या साधनांच्या विसाव्या खंडांत व भा. इ. सं. मंडळाच्या चतुर्थ संमेलनवृत्तान्तांत प्रसिद्ध केलीं आहेत. न्यायनिवाड्यांतहि महारांच्या साक्षीस विशेष महत्त्व असे. महारांची हक्कदारी व त्यांचीं सरकारदरबारचीं कर्तव्यें यांच्याविषयीं प्रा. माटे यांनीं केलेलें ऐतिहासिक विवेचन सुस्पष्ट आहे.[1] पुढें शास्त्राधारहि बदलत गेला. अस्पृश्यत्व कोठें पाळावें न पाळावें याचाहि विवेक झालेला दिसतो. देव, यात्रा, लढाई, बाजारहाट, उत्सव, यज्ञयाग, तीर्थस्थानें इत्यादि ठिकाणीं स्पर्शास्पर्श-विचार पाळूं नये अशी शास्त्रवचनेंहि तयार झालीं आणि चौदाव्या शतकांपासून महाराष्ट्रांत जी संतांची चळवळ निर्माण झाली तिनेंहि अस्पृश्यांना परमेश्वराचे दरवाजे सताड उघडे करून दिले. या संदर्भात चोखामेळा, सोयराबाई, कर्ममेळा यांच्या साक्षी पाहण्यासारख्या आहेत. पेशव्यांच्या सैन्यांत पुष्कळ महार पथकदार असत. या सर्व चर्चेचा अर्थ असा कीं शूद्रांचा विचार हिंदु समाजपद्धतीनें विशेष केलेला होता. खऱ्या ब्राह्मण्याचाहि विसर ज्या ज्या वेळीं झाला तेव्हां तेव्हां शूद्रत्वाविषयींहि विपरीत कल्पना पुढें आल्या आणि जनावरासहि लांछनास्पद वाटतील अशीं बंधनें शूद्रांवर आलीं; हाहि इतिहास असल्यानें एकंदर जातिविचाराचें व शूद्राच्या स्थितीगतीचें मर्म ध्यानांत घेतांना विशेष सावधगिरी बाळगा वयासहवी. शूद्र, शूद्रांची उत्पत्ति, त्यांचें वर्णव्यवस्थेंत वा जातिव्यवस्थेंत स्थान, त्यांची इतिहासांत झालेली अवहेलना इत्यादींचें विशेष अध्ययन आजच्याहि काळांत व्हावयास हवें.

या दृष्टीनें अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेले डॉ. भीमराव आंबेडकर यांचे ‘ हू वेअर दि शूद्राज ’ आणि ‘ दि अनटचेबल्स ’ हे दोनहि ग्रंथ विचारप्रवर्तक आहेत. डॉ. आंबेडकर यांच्या मतें शूद्र हे सूर्यवंशी आर्यसमाजांतीलच होत. शूद्र हा स्वतंत्र वर्ण नसून इंडोआर्यन समाजांतीलच एक क्षत्रिय विभाग होय. शूद्र व ब्राह्मण यांच्या विग्रहांत शूद्रांचे उपनयनसंस्कार नष्ट झाले; आणि उपनयन संस्कारविरहित अवस्थेमुळें मूळचे क्षत्रिय शूद्र चौथ्या वर्णाचे बनले. हिंदु आणि शूद्र यांत वांशिक भेद नाहीं. आंबेडकरांच्या या क्रांतिकारक सिद्धान्तांचें परीक्षण इतिहासास धरून व्हावयास हवें. शूद्र आर्य कीं अनार्य, क्षत्रिय कीं आदि द्रविड, कीं नागवंशीय इत्यादि अनेक मुद्दे उपस्थित होण्यासारखे आहेत. शूद्र वा

१. श्री. म. माटे, अस्पृष्टांचा प्रश्नः पृष्ठ २००–२१५, सन १९३३.

अस्पृश्य कोणीहि असोत, अर्यांनीं त्यांना इतकें दूर कां लोटलें याची राजवाडेकृत चर्चाहि नव्या संशोधनाशीं ताडून पाहावयास हवी. साऱ्या जगाचा वा प्रगत समाजाचा इतिहास पाहिल्यास असें आढळून येईल कीं वंशशुद्धत्वाची व सातत्याची कल्पना माणसाला नेहमीं महत्त्वाची वाटत राहिली आहे. आपल्या जातीचे, रक्ताचे, वंशाचे गुणधर्म आपल्या मुलांनीं, मुलांच्या मुलांनीं पाळावेत व संस्कृतीचें, देवधर्मांचें, जतन करावें ही अभिलाषा सर्वत्र स्वाभाविक अशी आहे. कलाकौशल्य, वाङ्मयादि विचार, तत्त्वज्ञान, धर्मकल्पना, आत्मिक गुण हे परंपरेनें वाढीस लागावेत व त्यायोगें एकंदर समाज उन्नत व्हावा अशी मुळांत कल्पना असल्यानें वंशांत, रक्तांत भेसळ झालेली कांहींना मानवली नाहीं. आपलीच जात शुद्ध रक्ताची, त्यांतच विशिष्ट गुण निर्माण होणार, तिचें शुद्धत्व राखलें पाहिजे ही विचारसरणी आजच्या भौतिकशास्त्रास मान्य होवो न होवो, मानवी इतिहासांत तिला जबरदस्त स्थान आहे. आजच्या या वैज्ञानिक युगांत व प्रगत अशा राष्ट्रांतहि वर्णकल्पना वा काळ्यागोऱ्यामधील द्वंद्व किती उग्र रूप घेऊन उभें आहे हेंहि आपण पाहात आहोंतच. अगदीं हीन जातींत अलौकिक प्रतिभेचें व कर्तृत्वाचें स्फुरण जन्मास आल्याचीं उदाहरणें थोडकीं नाहींत. वंश, रक्त, संस्कार, वर्ण, जाति यांचें सर्व गणित बाजूस सारून मानवी कर्तृत्व अनपेक्षित ठिकाणीं निर्माण झालेलें दिसेल. नाहीं तर गुलाम इसाप, कल्हईवाल्याचा पोरगा जॉन बन्यन, कोष्टयाचा कोलंबस, कलालाचा क्रॉमवेल, शिकलगाराचा डेमॉस्थेनिस, धिसाड्याचा फॅरॅडे, भिकारी शेतकारी घेमर, कुंभार बेन जॉन्सन, पोर्टर व्हर्जिल, ब्लॉकमेकर जेम्स वॅट, धर्माधिपति मेंडेल, शेतकरी वॉशिंग्टन, पाथरवट सॉक्रेटिस, धनगर होळकर इत्यादींचा हिशेब कसा लावावयाचा? मग मानवी कर्तृत्व कशावर अवलंबून असतें? रक्त शुद्धत्वावर? वंश कल्पनेवर? परिस्थितीवर? शिक्षणावर? आधुनिक शास्त्रें निश्चयानें या प्रश्नांचीं उत्तरें देऊं शकत नाहींत; आणि म्हणूनच प्राचीन रक्तशुद्धता, वंशसातत्य, कुलपरंपरा इत्यादि विचारांना प्रमुख स्थान आजहि दिलें जातें. लोकशाहीच्या काळांत व विज्ञानाच्या वा जीवनशास्त्राच्या नव्या संशोधनांत रक्तशुद्धीला किंवा जातिशुद्धत्वाला महत्त्वाचें स्थान देणें युक्त होईल कीं नाहीं हें शास्त्रीय संशोधनानें ठरावें.

आर्यांच्याहि समाजरचनेंत शूद्रास महत्त्वाचें स्थान दिल्यावर वर्णव्यवस्था ढिलाईची झाली. ब्राह्मण, वैश्य, क्षत्रिय यांचा संबंध शूद्र स्त्रीशीं येऊन संकरज प्रजा निर्माण झाली. प्रजेस पित्याचा वर्ण मिळत गेल्यामुळें निकृष्ट संतति जन्मानें श्रेष्ठत्वास पोंचली; आणि गुणरहित प्रजेकडून गुणवानांची अवहेलना होऊं लागली. यांतूनच आर्य धर्माविरुद्ध, वर्णाश्रम व्यवस्थेविरुद्ध प्रचार सुरू होऊन अनेक पाखंडें निर्माण झालीं. या पाखंडांच्या आक्रमणांतून चातुर्वर्ण्यानें पुनः आपलें स्वरूप तपासलें, पुनः निर्बंध अतिशय कडक केले. जावई होऊं पाहणारा शूद्र चार हात

दूर राहील अशीच व्यवस्था झाली. संकरज प्रजेस पित्याचा वर्ण देण्याऐवजीं मातेचा वर्ण देण्याची व्यवस्था करावी लागली. स्त्री हें मानवी संस्कृतीचें प्रमुख वाहन आहे. पुरुष भटक्या वा थोडा धरसोड वृत्तीचाच; पण आघात सहन करून सारें कांहीं जाणणारी व पुढीलांच्या ताब्यांत देऊन संगोपन वृत्ति जपणारी ही स्त्रीच होय. या दृष्टीनें स्वजाति, स्ववंश, यांखेरीजच्या स्त्रियांशीं संबंध आल्यामुळें बजबजपुरी माजल्याचीं उदाहरणें अनेक आहेत. दक्षिण अमेरिकेंत स्पॅनिश, पोर्तुगीज दर्यावर्दी साहसासाठीं गेले, पण आपापल्या स्त्रियां त्यांनीं बरोबर नेल्या नव्हत्या. तत्रस्थ स्त्रियांशीं त्यांचे संबंध आले. प्रजा वाढली, पण समाजघटना, राज्यव्यवहार, कलाकौशल्य, वाङ्मय, कला, तत्त्वज्ञान या क्षेत्रांत त्यांचें नांव कुठेंहि नाहीं. स्वरक्ताच्या स्त्रिया व आपण मिळून आपला समाज बनतो हें ते विसरले. उत्तर अमेरिकेंत फ्रेंचांनींहि हीच चूक केली. तेहि सडेच गेले, तेथील स्त्रियांशीं त्यांचें संबंध आले. ‘ त्यांना तेथें मुलेंबाळें झालीं, पण कुलव्रत चालविणारे पुत्र झाले नाहींत. they left progeny but no successors असा निष्कर्ष शास्त्रवेत्ते काढतात. पुढें इंग्रज अमेरिकेंत स्वतःच्या सहचारिणीबरोबर गेले व त्यांनीं रक्ताची भेसळ थांबविली. It was the teuton wife that settle the question of race Empire in America अमेरिकेंतील संस्कृति स्थिर केली ती इंग्रज स्त्रीनें. मानवी संस्कृतीच्या इतिहासांत स्त्रीला असणारें हें प्राधान्य वंशकल्पनेशीं, रक्ताशीं, गोत्राशीं इतकें निगडित असतां आजचीं भौतिकशास्त्रें वा सामाजिक शास्त्रें याबाबतींत निर्णयाचें कांहीं सांगूं शकत नाहींत यांत नवल कोणतें ?

तात्पर्य, आर्यांची वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था आजच्या मापानें न मोजतां इतिहासाच्या मापनानें मोजावयास हवी. आज समाजांत वर्ण नाहींत काय ? जाति कायद्यानें मोडल्या पण जातीय विचार नष्ट झाला काय ? जातिभेदाचीं दुःखें दूर झालीं काय ? यांसारखे प्रश्न महत्त्वाचे असले तरी या ठिकाणीं त्यांचा उहापोह करण्याचें कारण नाहीं. चातुर्वर्ण्य व जातिव्यवस्था यांबद्दल राजवाडे यांना एवढा अभिमान कां वाटतो याचें विवेचन पूर्ण व्हावें म्हणून हा थोडा विस्तार केला आहे. ‘ हिंदू समाजांत हिंद्वितरांचा समावेश—’ या आपल्या अद्वितीय व अव्वल दर्जाच्या निबंधांत राजवाडे यांनीं हिंदूंच्या जातिसंस्थेचीहि मोठीच स्तुति केलेली आहे. पहिले चार वर्ण, त्यांचा संकर व त्यांतून नव्या जाति आणि उपजाति अशा क्रमानें त्यांनीं हिंदुसमाजाचें वर्णन केलें आहे. हिंदु समाज हा जातीस ओळखतो. व्यक्तीस नाहीं ब्राह्मणादि शुद्ध जाति, सुतारादि संकर जाति, व महारादि अंत्यज जाति ह्यांना गांवांत वृत्ति करून दिलेल्या असत. प्रत्येक जातीस स्वतंत्र वृत्ति असे. व्यक्ति जाति बनल्याखेरीज हिंदु समाजांत तिचा समावेश होत नसे. यांत सर्वांचाच फायदा असे. “ बाह्य जातिसंस्थ झाले म्हणजे त्यांना त्यांच्या अनुरूप वृत्ति मिळून किंवा धंदा मिळून हिंदु समाजांत व हिंदु देशांत देशांतील राज्यछत्राखालीं सुखरूप राहतां

येत असे." [1] युरोपीय लोकांनीं अमेरिकेंत रेड इंडियन्सची जी दैना केली त्या मानानें आर्यांनीं अनार्यांस वा शूद्रांस फार चांगलें वागविलें असेंच म्हणतां येईल. त्यांना चातुर्वर्ण्यांत स्थान मिळालें म्हणूनच त्यांची सुधारणा झाली. राजवाडे यांनीं याविषयीं आपलें मत निश्चयानें दिलें आहे कीं, "अनार्य स्त्रिया व आर्य शूद्र यांच्या शरीरसंबंधापासून अंत्यज संकर उत्पन्न झाले व संकरांच्या जाति बनवून प्राणहानि न होतां उन्नति करून घेण्याचा मार्ग आर्यांनीं अंत्यजांना मोकळा करून दिला, असा खरा प्रकार आहे. युरोपियनांच्या तावडींत जर हे अंत्यज व अनार्य सांपडते तर ते अमेरिकन इंडियनांच्याप्रमाणें आज पृथ्वीवरून समूळ नष्ट झाले असते. हिंदुस्थानांत ब्राह्मणादि चातुर्वर्णिकांचा जाणता वर्ण मध्यस्तीस असल्यामुळें, अंत्यजादि अनार्योत्पन्न समाजांचा सामाजिक मृत्यु टळलेला आहे.—" [2]

बीजशुद्धि, वंशशुद्धि, रंगशुद्धि, रक्तशुद्धि, या साऱ्या कल्पना आजच्या प्रगत शास्त्रांना वेडगळ वाटतात कीं काय हें पाहणें अगत्याचें आहे; पण शास्त्रीय उपासनेची कास धरणाऱ्या राजवाड्यांना यांचें महत्त्व अधिक वाटतें. विषम संस्कृतीच्या लोकांशीं संबंध म्हणजे स्वसमाजाच्या आचारांत, विचारांत, राजकारणांत, विद्येंत, शास्त्रांत, कलांत, व चेहऱ्यांत विलक्षण फेरफार होऊन समाज विस्कळीत होण्याची पूर्वतयारीच होय. नष्ट झालेल्या मानवी संस्कृतींचीं उदाहरणें देऊन राजवाडे यांनीं जातिमहिमा मोठ्या गौरवानें वर्णन करतांना लिहिलें आहे;

"गेल्या आठदहा हजार वर्षांत असुर, बाबिलोनियन, मिसर, शक, यवन, रोमन, किर्मिर, क्रौंच वगैरे अनेक समाज पृथ्वीच्या पाठीवर राज्यादि उपभोग घेऊन अस्तंगत झाले व नामशेष उरले. हे समाज नष्ट कां झाले ? हे समाज अजीबात नष्ट होण्याचें खरें कारण लढायांत पराजय, किंवा साथीचे रोग किंवा सष्टीची वक्रदृष्टि ह्यांपैकीं एकहि नसून ह्यांच्या नाशाचें खरें कारण ह्या लोकांतील सामाजिक समावेशनाची पद्धति होय. हे लोक वाटेल त्या बाह्य समाजांशीं शरीरसंबंध करीत व वाटेल त्या बाह्य समाजास वावरूं देत. त्यामुळें ह्या समाजांतील वंशशुद्धि भ्रष्ट होऊन मूळचे जाज्वल्य गुण—कीं ज्यांच्या जोरावर यांनीं राज्यें उभारलीं--बाह्यांच्या बेसुमार मिश्रणानें फिके व विरल झाले. हें गुणवैरल्य इतक्या थोरल्या प्रमाणावर झालें कीं बाह्य व बाह्यज संकर ह्यांच्या गर्दींत मूळची गुणी प्रजा वितळून गेली... अशी नामशेषता आर्यावर्तातील आर्यांच्या वांट्यास आली नाहीं, हें जगजाहीर आहे, आर्यांजवळ अशी कोणती जडीबुट्टी होती कीं तिच्या जोरावर ते आज आठदहा हजार वर्षें समाजरूपानें जसेच्या तसे कायम आहेत ? ही जडीबुट्टी दुसरी कोणतीहि नसून आर्यांनीं शोधून काढलेली जातिसंस्थेची कल्पना होय." [3]

---

१ राजवाडे लेखसंग्रह : साहित्य अकादेमी ; पृष्ठ ३८

२ कित्ता : पृष्ठ ४२

३ कित्ता : पृष्ठ ४७

राजवाडे जातिसंस्थेची तारीफ करूनच थांबले नाहींत तर त्यांनीं एक इषाराहि दिला आहे कीं, बुद्धिभ्रंश होऊन आपण या बहुगुणी संस्थेचा त्याग केला तर आपल्याहि समाजाचा, वंशाचा, संस्कृतीचा नाश होईल. याच जातिसंस्थेच्या आधारेंच हिंदु समाजानें विविध क्षेत्रांत केलेल्या पराक्रमांचा आढावाहि राजवाडे यांनीं घेतला आहे. शक बाराशेंपर्यंत जातिनिबद्ध हिंदु समाज प्रगतिपथावर होता, आणि पुढील काळांत जातिसंस्थ नसलेल्या मुसलमानांशीं त्यांचा परिचय होतांच त्यास उतरती कळा लागली. हिंदु समाजांत पुढें विद्यादि क्षेत्रांत मंदता व स्तब्धता आली ती मुसलमानी उत्पाताचा परिणाम आहे, जातिसंस्थेचा नाहीं. जातिसंस्थेचा हा महिमा आजहि सर्वच गातात. आज ही जातिसंस्था ठेवावी कीं नाहीं हा प्रश्न स्वतंत्र आहे, पण इतिहासकाळांतील तिची कामगिरी अपूर्वच मानवी लागेल. हिंदु जातिसंस्थेवर इंग्रजींत व मराठींत शेकडों ग्रंथ आजवर लिहिले गेले असतील. सर्वांनीं या चातुर्वर्ण्याचें व जातिसंस्थेचें गुणगानच केलें आहे. जे. एच. हटन हे केंब्रिज विद्यापीठांतील प्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञ आहेत. त्यांचा 'Caste in India' हा ग्रंथ अभ्यासकांत प्रसिद्ध आहे. त्यांनीं इतिहासकाळांत हिंदुजातिसंस्थेनें काय काय साधलें याची यादीच दिली आहे- प्रा. हटन यांनीं स्वतःच्या मतांबरोबरच गिलबर्ट, ॲबी डयूबॉइस, सी. जी. हिल, ब्लंट इत्यादि विचारवंतांचीहि जातिसंस्थेविषयींचीं मतें दिलीं आहेत. प्रा. हटन यांच्या मतें जातिसंस्थेमुळें हिंदुसमाज एकजिनसी राहूं शकला, राजकीय स्थित्यंतरांतून बचावला. ॲबी डयूबॉइस यानें तर जातिसंस्था म्हणजे ' The happiest effort of their legislation ' असा निष्कर्ष काढला आहे. बाह्य रानटी लोकांच्या आक्रमणापासून हिंदु समाज वाचला तो याच जातिव्यवस्थेमुळें असा त्यांचा निष्कर्ष आहे. आणि याच मताच्या अनुरोधानें प्रा. हटन यांनीं निर्वाळा दिला आहे कीं; Indian Society has survived a vast number of invasions, famines, revolutions, and social upheavals of all kinds, including concquests by invaders of alien religions essentially antagonistic to Hinduism and there can be no doubt but this is largly due to the caste system on which that society has constructed itself, a system which often survived even conversion to Islam or Christianity.'[१]

हिंदुसमाजांतील चातुर्वर्ण्य व जातिव्यवस्था यांचे गोडवे राजवाडे यांनीं कां गाइले हें आतां आणखी पुरावे देऊन सिद्ध करावयास पाहिजे असें नाहीं. राजवाड्यांनीं याविषयीं समाजशास्त्रीय विचार केला होता; व त्याच अनुरोधानें

1.- J. H. Hutton; Caste in India, Its Nature, Function and ..Origins : पृष्ठ १०५–१०६, सन १९४६.

ते समाजसुधारणेकडे पाहात होते. सन १९०९ च्या डिसेंबर महिन्याच्या 'राष्ट्रोदय' मासिकांत त्यानीं 'अंत्यजोद्धार' नांवाचा एक विस्तृत लेख लिहून अंत्यजोद्धाराची आपली कल्पना स्पष्ट केली आहे. प्रथम त्यांनीं हिंदुसमाजांत अंत्यजांची स्थिति कोठें आहे तें पाहण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथम तीन वर्ण कसे होते, चौथा शूद्रांचा वर्ण कसा मिळाला, लोकसंख्या थोडी असतांना हे चार वर्ण शुद्ध कसे राहिले, पुढें लोकसंख्येच्या वाढीबरोबर संकरज प्रजा कशी वाढीस लागली, अनुलोम व प्रतिलोम संकरापासून ८०६४ शुद्ध व संकर जाति कशा निर्माण झाल्या, बीजानें, रक्तानें, वंशानें, आचारानें व जातिधर्मानें कांहीं जाति स्थिर कशा राहिल्या इत्यादि प्रश्नांचा विचार करून राजवाडे अंत्यजाकडे वळलेले आहेत. त्यांच्या मतें अंत्य म्हणजे शूद्र, त्यांच्या किंवा तदुत्पन्न संकरजांच्या बीजापासून त्रैवर्णिकांच्या आणि त्यांच्या अनुलोम किंवा प्रतिलोम संकरजांच्या क्षेत्रांच्या ठाईं झालेली जी प्रजा ती अंत्यज[1]

आतां या अत्यंज जातींचा उद्धार करावयाचा म्हणजे काय ? याचा अर्थ राजवाडे यांनीं एवढाच सांगितला आहे कीं अस्पृश्यत्वापासून त्यांना मुक्त करावयाचें, त्यांचे आचारविचार सुधारावयाचे. उदाहरणार्थ महार. राजवाडे यांच्या मतें महार हा आर्य आहे. म्हशीला संस्कृत शब्द महस् व गाईला महा. या महावरून गवादींचें गांवाबाहेर निर्हरण करणाऱ्या जातीला महार अशी संज्ञा लाभली. महाकार, महा आर, महार अशी ही शृंखला आहे. यांचा धंदा गलिच्छ असल्यामुळें हे अस्पृश्य राहिले. हे लोक जास्त स्वच्छ रहावेत, त्यांना लिहिणेंवाचणें यावें, त्यांनीं धर्मविचार पाळावेत, मग त्यांच्या स्पृश्यास्पृश्यत्वाचा प्रश्न सुटेल असें राजवाडे यांना वाटतें. पण हेंहि काम सोपें आहे. अतिशय कठिण काम म्हणजे यांचा जात्युत्कर्ष कसा होईल ? जात्युत्कर्ष म्हणजे कनिष्ट जातींतून वरच्या जातींत जाणें, हेंहि घडावयास हरकत नाहीं, पण मनुप्रणीत पद्धतीनें त्यांनीं प्रयत्न करावयास हवा. ज्या श्रेष्ठ जातींत प्रवेश करावयाचा त्या जातींतील प्रविविक्षु जातींतील क्षेत्राचे ठायीं निक्षेप सतत तीन, पांच, किंवा सात पिढ्या झाला पाहिजे. त्यानंतर श्रेष्ठ जातींत स्थिति धर्म्य होते, व संकरदोष निघून जातो. म्हणजे जातीचा उत्कर्ष साधावयाचा असेल तर पहिल्यानें अंत्यज जातींना प्रविविक्षा (वरच्या जातींत जाण्याची इच्छा) पाहिजे. दुसरें म्हणजे अनन्तर्हित (जवळच्या) श्रेष्ठ जातीनें प्रविविक्षूंना बीज देऊन स्वजातींत प्रवेश करून दिला पाहिजे, आणि तिसरें म्हणजे न देईल तर त्या जातीला दंड करणारा सनातनधर्मी राजा पाहिजे ...म्हणजे जात्युत्कर्षाचें कार्य व्यवस्थितपणें व यथाशास्त्र पार पडावयाला

१. राजवाडे लेखसंग्रह भाग २ : पृष्ठ १३२

चातुर्वर्ण्याभिमानी सनातन राज्ययंत्र पाहिजे.[१] म्हणजे राजवाडे यांच्या मतें हें कार्य केवळ सुधारकांकडून होण्यासारखें नाहीं. सर्वांनीं या सत्कार्यासाठीं एकत्र यावयास पाहिजे आणि आचार्यांचीं पीठें भिक्षुकांच्या हातून विद्वानांच्या हातीं गेलीं पाहिजेत. राजवाडे यांच्या या विधानांतील मर्म हेंच कीं कोणतीहि सुधारणा नीट विचारपूर्वक व्हावी.

---

१ कित्ता : पृष्ठ १३४

११ : राजवाड्यांचें समाज--चिंतन ; मराठे कोण, कोठले ?

शहाजीकालीन मराठे स्वराज्यकल्पनेस पारखे कसे झाले, त्यांची संस्कृति इतकी निकृष्ट अवस्थेस कशी आली, त्यांच्या चालीरीति ओंगळ कां झाल्या इत्यादि प्रश्नांचा विचार करतांना राजवाडे यांनीं हे मराठे आहेत तरी कोण ? असा प्रश्न निर्माण करून त्याची निरनिराळ्या निमित्तांनीं चर्चा केली आहे. महाराष्ट्राच्या विकासांत मराठ्यांचें स्थान कोणतें या प्रश्नाच्या अनुरोधानें ही चर्चा अनेक ठिकाणीं आलेली आहे. सन १९१६ च्या सुमारास त्यांनीं 'इतिहास आणि ऐतिहासिक' या मासिकांत 'महाराष्ट्राचा वसाहतकाल' नांवाची एक अति विस्तृत अशी संशोधनपर लेखमाला लिहिली. त्यांत त्यांनीं ग्रामानामें, नद्यांचीं, पर्वतांचीं नावें, आडनावें, वनस्पतींचीं नांवें, मनुष्येतर प्राणिनामें, देवदेवतांचीं नांवें, इतर विविध वस्तूंचीं नांवें, इत्यादींच्या यादीवरून महाराष्ट्राच्या वसाहतकाळीं कोणकोणत्या लोकांनीं कुठें कुठें व कशी कशी वस्ती केली याचा राजवाडे यांनीं अंदाज बांधिला आहे; आणि या अंदाजांत त्यांनीं 'रट्ट' लोकांचा विचार केला आहे. हे रट्ट आहेत तरी कोण ? कोठून आले हे दक्षिणेकडे ? यांचेंच संस्कृत रूप म्हणजे राष्ट्रिक आणि राष्ट्रिक म्हणजे देशांत अधिकारावर काम करणारा मनुष्य. राष्ट्रकूट म्हणजे राठोड, राष्ट्राचा अधिकारी. तेव्हां हे राष्ट्रिक देसाई, देशमुख यांचेसारखे ग्राम वा देशप्रमुख असत. तेव्हां राजवाडे यांच्या मतें हे रट्ट, महरट्ट, राष्ट्रिक, महाराष्ट्रिक प्रांताधिकारी वा देशाधिकारी होत.

नर्मदेच्या उत्तरेंत लोकसंख्या वाढली, वर्णाश्रम धर्मावर संकट आलें, त्यावेळीं दक्षिणेकडे वसाहतकर्म सुरू झालें. या कामीं पुढाकार राष्ट्रिकांकडे होता. वसाहतींतील सर्व पाटिलक्या, देशमुख्या, सरदेशमुख्या रट्टांच्या किंवा महारट्टांच्याकडे आल्या. द्रव्यबल, मनुष्यबल, सत्ताबल, भाषाबल या चतुरंग बलानें युक्त असा यांचा समुदाय बनला. यांची भाषा महाराष्ट्री झाली. नर्मदेच्या उत्तरेंतून आलेल्या या लोकसमूहांत मानव्य, हैहय, भोज, यादव, नल, कदंब, मौर्य, चालुक्य इत्यादि गोत्रांचे लोक असून यांतूनच शहाण्णव कुळीचे मराठे निर्माण झाले. या राष्ट्रिकांना दक्षिणेस येण्यास कोणतें कारण घडलें हा मुख्य प्रश्न. अशी कोणती आपत्ति वर उत्तरेंत निर्माण झाली होती ? उपभोगलोलुप रानटी वा नागर परचक्राचा रेटा, धार्मिक जुलूम, लोकसंख्येची वाढ, तीव्र गुलामगिरी, दुष्काळादि आपत्ति यांपैकीं कांहीं संकटपरंपरा त्यांच्यावर कोसळली असावी. या सर्व संकटपरंपरेचा उल्लेख करून राजवाडे सांगतात कीं, "शकपूर्व सहाव्या शतकांत नर्मदोत्तर

प्रदेशांत वैदिकधर्मविरोधी बुद्धांचें व जैनांचें अशीं दोन पाखंडें अनिवार वाढलीं. हीं पाखंडें चातुर्वर्ण्यविरोधी असून शूद्र व बाह्य ह्यांचा पुरस्कार करणारीं होतीं. शाक्यसिंह जो गौतमबुद्ध त्याच्याच कालीं हें बौद्ध पाखंड प्रथम सुरू झालें असें नाहीं. गौतमबुद्धाच्या अगोदर ककुचंड, कनकमुनि, काश्यप वगैरे बौद्ध मतप्रवर्तक आचार्य होऊन गेलेले होते. म्हणजे बुद्धाच्या पूर्वी दीडदोनशें वर्षें ह्या पाखंडाची देशांत ज्यारीनें सुरुवात झालेली होती. बौद्धमताचें पाखंड सुरू होण्यापूर्वी चार्वाकाचें पाखंड होऊन गेलेलें होतें—,"[1] आणि या पाखंडांस त्रासून चातुर्वर्ण्यधर्माच्या रक्षणार्थ राष्ट्रिक दक्षिणेंत आले.

राजवाडे यांनीं या विषयाचा अधिक तपशीलवार विचार पुढें पांचसहा वर्षांनीं लिहिलेल्या 'राधामाधवविलासचंपू'च्या प्रस्तावनेंत केलेला आहे. त्यांच्या मतें, 'हे महरट्ट लोक महापद्मादि दुष्ट शूद्र राजांच्या, जैनबौद्धादि पाखंडांच्या व व्रात्यशूद्रादि उत्पथांच्या जुल्मास कंटाळून स्वधर्म, स्वराज्य, व स्ववृत्ति यांचा अनुभव घेण्यास दक्षिणारण्यांत बौद्ध कालाच्या प्रथम ज्वानींत म्हणजे शकपूर्व सहाशेंच्या सुमारास वसाहती करण्यास शिरले.'[2] राजवाडे यांनीं येथें आणखी तपशील दिला आहे. मगधांतून महाराष्ट्रिक, कुरुपांचालांतून राष्ट्रिक व उत्तरकुरु व उत्तरमद्र येथील वैराष्ट्रिक या तीन प्रकारच्या लोकांनीं दक्षिणेंत वसाहत करण्यांत पुढाकार घेतला. या लोकांची भाषा व त्यांच्या बरोबर येणाऱ्या पुरोहितांचीं नांवें यांचा पुरावा राजवाडे यांनीं या घटनेस दिलेला आहे. राजवाड्यांच्या मतें बौद्धक्रान्तीकालीं महाराष्ट्रिकादि लोकांबरोबर भोज, पेतेनिक, सतियपुत, केरलपुत, पांडय, चोल इत्यादि लोकहि दक्षिणेंत उतरले. भोज विदर्भांत स्थिर झाले, पेतेनिक गोदातीरीं राहून त्यांनीं प्रतिष्ठान वा पैठण शहर स्थापन केलें. सतियपुतांची वसति सावंतवाडीकडे झाली, केरलपुत मलबारकडे जाऊन राहिले. दक्षिणेंतील दंडकारण्यांत स्थायिक झाले ते मुख्यतः महाराष्ट्रिकादि लोक. हे लोक ग्रामदेश पुढारी असले तरी त्यांची राजकीय, सामाजिक, धार्मिक वा सांस्कृतिक स्थिति प्राथमिक अवस्थेंत होती. मगधादि देशांतील हे लोक गणराज्यपद्धतीला परिचित होते.

यानंतर राजवाडे यांनीं आणखी एका मताचा विस्तार केला आहे तो असा कीं दक्षिणेंत स्थायिक होणारे महाराष्ट्रिकादि लोक उत्तर हिंदुस्थानांतील तत्कालीन उच्च क्षत्रियांहून व उच्च अशोकादि राज्यकर्त्यांहून बऱ्याच खालच्या पायरीवर होते. या महाराष्ट्रिकादि लोकांवर शकपूर्व १५० पासून शकोत्तर १५० पर्यंत आंध्रभृत्यांनीं राज्य केलें. नंतर कांहीं कालानें चालुक्यांनीं अधिराज्य

१. ऐतिहासिक विविधविषय, खंड पहिला : महाराष्ट्राचा वसाहतकाल; पृष्ठ १४८–१४९, सन १९१८.

२. पृष्ठ १५८

केलें. नंतर राष्ट्रकूट आले. नंतर पुनः चालुक्य आले व शेवटीं शक १२४० पर्यंत यादवांची मगरमिठी महाराष्ट्रिकादिकांच्या पाठंगुळीस चिकटली होती. नंतर मुसलमान आले. याप्रमाणें तब्बल सोळाशें वर्षें महाराष्ट्रिक लोक परक्यांच्या अमलाखालीं होते. राजवाडे यांचें हें निरीक्षण पुढें वादास कारणीभूत झालें. कारण त्यांनीं आंध्रभृत्य, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव इत्यादि राज्यकर्त्यांना परकीय मानलें. अर्थात् राजवाडे यांना ही जाणीव होतीच. आंध्रभृत्य शालिवाहन, शातवाहन इत्यादि शब्दांचा अर्थ निश्चित करून ते आंध्र आर्य होते, असें त्यांनीं म्हटलें आहे. चालुक्य हे मूळचे अयोध्या प्रांतातील उच्च वैदिक धर्मीय क्षत्रिय होते, महाराष्ट्रिकाशीं त्यांचा संबंध नव्हता. राष्ट्रकूट, यादव यांचीहि परंपरा उच्च क्षत्रियांची होती. या उच्च वर्णीय क्षत्रियांनीं निरनिराळ्या वेळीं आपल्याहून कमी संस्कृतीच्या महाराष्ट्रिकादि लोकांवर नेहमींच राज्य केलें. विस्तीर्ण राज्यें उभारण्यास लागणारीं शस्त्रें, अस्त्रें, सैन्य, मुत्सद्देगिरी इत्यादि सामग्री महाराष्ट्रिकादिजवळ नव्हती. 'शातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव वगैरे उत्तरेकडील साहसी राज्यकर्त्यांनीं दक्षिणेंत जीं साम्राज्यें उभारलीं तीं परकीय व अल्पसंख्याक परंतु संस्कृतीनें वरचढ अशा लोकांनीं कमतर संस्कृतीच्या महाराष्ट्रिकादिकांवर उभारलेलीं अधिराज्यें होतीं हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे'[१] असें राजवाडे पुनः पुनः सांगतात. परकीयांच्या राज्यपद्धतीचा, स्थापत्यकलेचा, चित्रकारीचा, संस्कृतीचा गंधहि या महाराष्ट्रिकांना नव्हता. भाषेच्या वा वाङ्मयाच्या क्षेत्रांतहि हे लोक मागासलेले होते.

या महाराष्ट्रिकादींना आपली उन्नति करून घेण्याचें साधलें नाहीं. याचें आणखी एक कारण राजवाडे देतात, तें म्हणजे हे लोक वसाहत करण्यासाठीं दक्षिणेंत आले त्यावेळीं त्यांची गांठ त्यांच्याहूनहि संस्कृतीनें कनिष्ठ असे नागलोक यांशीं पडली. या नागांशीं शरीरसंबंध होऊन महाराष्ट्रिकादि व नागलोक यांतून एक नवीन समाज निर्माण होत होता आणि हा समाज म्हणजे महरट्टांचा, मराठ्यांचा. शक पांचशेंच्या सुमारास याप्रमाणें ज्यांना आपण मराठे म्हणतो ते लोक महाराष्ट्रिक व नाग यांच्या हजारपांचशें वर्षांच्या संगमापासून महाराष्ट्रांत निपजले. नागलोक महाराष्ट्रिक लोकांच्या पूर्वी नर्मदेपासून त्रावणकोरपर्यंत पसरले होते. त्यांची संस्कृति आर्यांहून हीन दर्जाची होती. राजवाडे यांच्या मतें 'निरक्षर नागांचें व ईषदक्षर महाराष्ट्रिकांचें प्रज जे मराठे त्यांच्यांत या दोनहि वंशांतील दोष व गुण उतरून त्यांची संस्कृति महाराष्ट्रिकांहून कमतर व नागांहून किंचित् उच्चतर अशी निपजली.'[१] हे नागलोक पूर्वीपासून सर्पपूजक, वनदेवताभजक असून बौद्धधर्माचा पगडा त्यांच्यावर अधिक होता. त्यामुळें सहजच मराठ्यांवर

१. राधामाधवविलासचंपू: प्रस्तावना ; पृष्ठ १८२

२. कित्ता : पृष्ठ १९०

बौद्ध व नाग यांच्या संस्कृतीची छाप अधिक बसली. वैदिक धर्माचा मूळचा ठसा अस्पष्ट कां होईना पण होताच. या संमिश्र मराठे समाजाची अशी ही चमत्कारिक अवस्था दीर्घ काळ टिकून राहिली. "त्यांना धड आर्य ऐतिह्यहि माहीत नव्हतें, धड बौद्ध ऐतिह्यहि अवगत नव्हतें, आणि नागांच्या वन्य देवधर्मांत मुळीं ऐतिह्यच नव्हतें. त्यामुळें मराठे म्हणजे महाराष्टांत त्या कालीं एक अडमुठ्यांचा अव्यवस्थित जमाव होऊन बसला होता. निश्चित देव नाहीं, निश्चित धर्म नाहीं, अक्षर नाहीं, ऐतिह्य नाहीं, असे हे लोक राज्यकर्त्यांच्या व देवब्राह्मणांच्या अखंड पराभवाला कारण होऊन गेले. जो खायला देईल त्याच्या बाजूनें लढावयाचें, एवढा एकच ह्यांचा धंदा राहिला."[1]

शहाजीकालीन मराठे कोण व त्यांची स्थिति कां खालावली यांचा शोध घेतां घेतां राजवाडे वरील निर्णयाप्रत पोंचलेले दिसतात. राजवाडे यांनीं निक्षून सांगितलें आहे कीं "हे मराठे लोक क्षत्रिय खरे, परंतु रामकृष्णजनकादि आत्मानात्मविचार करणाऱ्या व साम्राज्यें चालविणाऱ्या थोर क्षत्रियांचे हे साक्षात् वंशज नव्हत, रामकृष्णादिकांच्या काळच्या कांहीं कम सुधारलेल्या आयुधजीवी क्षत्रियांचे व नागांचे हे मुख्यत्वेकरून वंशज होत."[2] महाराष्ट्रांत राहणाऱ्या चालुक्य, यादव, पल्लव, भोज, इत्यादि थोर राजघराण्यांतील क्षत्रियांच्या घराण्यांशीं या मराठ्यांचा साक्षात् संबंध नव्हता. चाळके, यादव, जाधव, पालवे, भोसले, या राजघराण्यांत पुलकेशिन्, अमोघवर्ष, विक्रमादित्य, सिंघण, अपरार्क इत्यादि पराक्रमी राजपुरुष निपजले. यांच्याच आश्रयानें विज्ञानेश्वर, भास्कराचार्य, हेमाद्रि वगैरे विद्वान् पंडित प्रसिद्ध झाले. पण मराठ्यांचा या उच्चतर क्षत्रियांशीं कोणताहि संबंध नव्हता. उच्च वाङ्मय वा साहित्यविचार यांना समजण्यासारखाच नव्हता. राजवाडे यांच्या भाषेंत हा फरक सांगावयाचा तर "एका पक्षाचीं साम्राज्यें चालविण्याची योग्यता तर दुसऱ्याची सामान्य देशमुखीहि टिकविण्याची अयोग्यता. एक चतुरस्त्र विद्येय भोक्ता, दुसरा विद्येचा पिढीजात शत्रु, एक सनातन धर्मांचा व गोब्राह्मणांचा कैवारी, दुसरा भेटेल त्या देवधर्माचा व साळूमाळूचा अनुयायी; एक सुवर्णयज्ञोपवीत धारण करण्यांत भूषण मानणारा, तर दुसरा नागनरसोबा डोक्यावर घेऊन नाचणारा."[3] चालुक्यादि उच्च वर्णीय क्षत्रियांच्या राज्यांत कुणबी, कुणब्यांचे पुढारी पाटील, पाटलांचे पुढारी देशमूख एथून तेथून सर्व देशभर नाग महाराष्ट्रिकोत्पन्न मराठे असत. या हीन संस्कृतीच्या मराठ्यांना स्वाभिमान शिकविणें, त्यांच्यांत देशभक्ति निर्माण करणें,

१. कित्ता : पृष्ठ १९०
२. कित्ता : पृष्ठ १९१
३. कित्ता : पृष्ठ १९२

श्रेष्ठ प्रकारचें त्यांना ऐतिह्य देणें, उच्च साहित्यादि कलांची आवड त्यांच्यांत निर्माण करणें हा उद्योग उच्चवर्णीयांना करणें अगत्याचें होतें. हें कार्य फार मोठ्या प्रयत्नानें शहाजीशिवाजी या जोडीनें अद्वितीय रीतीनें करून दाखविलें.

राजवाडे यांच्या मतें मराठे हे नागमहाराष्ट्रिकांपासून निर्माण झाले याचा अधिक खोल विचार करावा लागेल. दक्षिणेकडील आर्य लोकांत अनेक वंशांची मिसळ असावी असा आजचें संशोधन निर्वाळा देईल. आर्य भारतांत किंवा दक्षिणपथांत येण्यापूर्वी भारताचे आदि रहिवासी कोण होते ? ते येथील खास याच भूमींचे कीं तेहि आर्यांप्रमाणेंच फार पूर्वी बाहेरून आले ? आधुनिक संशोधनानें असें सिद्ध केलें आहे कीं सर्वांत आधीं भारतवर्षांत आले ते निग्रिटो लोक-हे बहुधां आफ्रिकेंतील असावेत. यांची संस्कृति अगदीं प्राथमिक असून ते दगडी हत्यारें वापरणारे व शेतीची माहिती नसणारे (Polaeolithic stage) असावेत. यांच्या खुणा दक्षिणेकडे व आसाममधील नाग लोक यांच्यांत सापडतात. यानंतर भारतांत लोक आले ते प्रोटो ऑस्ट्रोलॉइड-(Proto-Austroliods) वंशाचे ऑस्ट्रिक भाषा बोलणारे. हे दीर्घ डोक्याचे, कृष्ण वर्णाचे व बसक्या नाकाचे असून 'निषाद' म्हणून ज्यांचा उल्लेख होतो ते हेच असावेत. कोल, मुंडा, संताळ, भूमिज, कुर्कू वगैरे जमाती यांच्यापैकींच. नारिकेल, कदल, तांबूल, हरिसा, शृंगवेर (सुंठ), वीतिंगण (वांगें) व अलाबु (भोपळा) हे शब्द यांच्या भाषांतून आर्यांच्या भाषेंत आले. याच्यानंतर द्राविडी भाषा बोलणाऱ्या लोकांचे गट आले. भूमध्य समुद्राच्या पूर्वेकडील प्रदेशांतून पश्चिम किनाऱ्यानें हिंदुस्थानांत हे घुसले असावेत. तामिळ, तेलगु, कानडी, मल्याळी, तुळु, काडेगु, गोंड इत्यादि यांच्या भाषा. आणखीहि कांहीं लोक आर्यांच्या आधीं भारतांत आले ते म्हणजे मंगोली; चिनी-तिबेटी भाषा बोलणारे लोक. यांनाच किरात ही संज्ञा मिळाली. आर्य भारतांत व नंतर दक्षिण भारतांत आले तेव्हां त्यांना अर्थातच या आधींच्या लोकांशीं सामना द्यावा लागला. कांहींचा त्यांनीं पराभव केला; कांहींच्यांत ते व कांहीं त्यांच्यांत मिसळून गेले. भारतीय विशेषतः दक्षिण भारतांतील मराठी संस्कृतींत या साऱ्यांचें सामरस्य दिसून येणारें आहे. द्रविडांशीं असलेले नागांशीं संबंध ध्यानांत घेतां व मराठी संस्कृति नागद्रविड व महाराष्ट्रिक यांच्या मिश्रणापासून आहे असें राजवाडे यांचें विधान गृहीत धरतां या सामरस्याचा अधिक अभ्यास व्हावयास हवा. या दृष्टीनें राजवाडे यांचें संशोधनहि तपासावयास हवें.

या नवीन संशोधनाच्या आधारें शहाजीकालीन मराठे कोण, कुठले, त्यांची हीन अवस्था कां झाली, यासंबंधींच्या राजवाडेकृत मीमांसेची परीक्षा करणें अगत्याचें आहे. तत्पूर्वी राजवाडे यांच्या प्रगल्भ व मूलगामी विवेचनांतच एकदोन शंका निर्माण होतात त्यांचा विचार आपण प्रथम करूं. एक तर असें कीं उत्तरेकडून माहाराष्ट्रिक, वैराष्ट्रिक, वगैरे लोक आले ते आर्यधर्म, वर्णाश्रमव्यवस्था यांच्या-

संरक्षणासाठींच आले असें राजवाडे सांगतात. मग त्यांच्यांत एवढी संस्कृतिहीनता काय केवळ स्थलान्तरामुळें वा नागांशीं मिश्रणानेंच आली कीं काय? स्वधर्माच्या वा चातुर्वर्ण्याच्या अभिमानानें हें स्थलान्तर असेल तर नंतरच्या काळांत धर्म, संस्कृति, स्वत्व यांना हे लोक इतके पारखे व्हावेत हें पटण्यासारखें नाहीं; आणि नागांची वा द्रविडांची संस्कृति राजवाडे समजतात तितकी हीन नव्हती असें अलीकडील संशोधनाचा मागोवा घेतल्यास दिसून येईल. आर्य येण्यापूर्वींच येथील म्हणजे भारतांतील द्रविडांची म्हणून नागांची संस्कृति फार श्रेष्ठ प्रकारची होती व आर्यांनींहि अनेक गोष्टींचा स्वीकार द्रविडांकडून केला असण्याची शक्यता असल्याचा निर्वाळा आजचें संशोधन देईल. तेव्हां नागांच्या मिश्रणानें मराठ्यांची अवस्था संस्कृतिहीन झाली वा ते स्वत्वहीन झाले या राजवाड्यांचा मताचा फेरविचार करणें आज अगत्याचें आहे. दुसरें असें कीं जनक, राम, कृष्ण, भीष्म या उच्चवर्णीय क्षत्रियांशीं मराठ्यांचा साक्षात संबध नाहीं असें राजवाडे पुढें आग्रहानें म्हणतात, मग अगोदरच्या विवेचनांत प्रस्तावनेच्या १२६ व्या पृष्ठावर उच्चवर्णीय क्षत्रियांशीं त्यांचा संबंध त्यांनीं कां सूचित केला आहे? उच्चवर्णीय क्षत्रियांचे वंशज हे मराठे इतके अधम कां बनले हा प्रश्न उपस्थित करून पुढें त्यांनीं त्याचें उत्तर देण्याचा प्रयत्न केला हें खरें, परंतु वैदिक क्षत्रियांशीं साक्षात् त्यांचें नातें असूनहि ही निकृष्ट अवस्था कां असेंच भासविलें आहे. आणखी एक प्रश्न असा निर्माण होतो कीं महाराष्ट्रिकादि लोक धर्मरक्षणासाठीं शकपूर्व सहाशें वर्षांपूर्वी दक्षिणेंत आले आणि याचें कारण म्हणणे बौद्धजैन मतांचें पाखंड होय. इथें प्रश्न असा कीं हा काल बौद्धजैनाच्या सुरुवातीचा काळ आहे. त्यांचीं मतें प्रचलित होण्यास, त्यांना अनुयायी मिळण्यास दोनतीन शतकें गेलीं असावींत; मग शकपूर्वी सहाव्या शतकांत एवढ्या जमातींना स्थलांतर करण्याची अवस्था केवळ पाखंडांमुळें आली हेंहि पटण्यासारखें नाहीं.

तेव्हां मराठे कोण, कोठले याचा विचार राजवाडे यांनीं जो केला आहे तो आज पारखून घ्यावयास हवा. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें बौद्धजैनादि पाखंडांच्या जुलमास कंटाळून महाराष्ट्रिकादि दक्षिणेंत आले हें खरें नाहीं. त्यांच्याहि आधीं आर्यांची वस्ती दक्षिणेंत असावी. महाभारतांतील भीष्मपर्वांत कन्याकुमारीपर्यंतची हकीगत असून त्यांत महाराष्ट्र आंध्रासह जमेस धरला आहे. तज्ज्ञांच्या मतें शकपूर्व १००० पासूनच दक्षिणेंत आर्यांचा प्रवेश महाराष्ट्रांत झाला असावा.[१] महाराष्ट्र हें नांव देशवाचक म्हणून तिसऱ्या शतकांत येत असलें तरी या प्रदेशास दक्षिणापथ वा दंडकारण्य अशीं नांवें याहि पूर्वी प्राप्त झालेलीं होतीं व उत्तरेकडून अनेक क्षत्रिय घराणीं आपापल्या उपाध्यायांबरोबर दक्षिणेंत सरकत

१. चिं. वि. वैद्य, वैद्यांचे ऐतिहासिक निबंध : पृष्ठ ७५, सन १९३१

होतीं. पाणिनि, कौटिल्य, वररुचि, बौधायन, पेरिप्लस, फाहियान, रामायणादि ग्रंथ, शिलालेख यांच्या साह्यानें राजवाडे यांच्यानंतर महाराष्ट्राची व्याप्ति, येथील लोक, येथील बसाहतकालाचा प्रारंभ यांच्याविषयीं बरेंच संशोधन झालें आहे. पाणिनि, कौटिल्य आणि बौद्ध ग्रंथकार अश्मक देशाचा उल्लेख करतात. बौधायन-स्मृतींत व कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत दक्षिणापथाचा उल्लेख येतो. महाभारतांतहि दक्षिणापथाचा उल्लेख अनेक वेळां आलेला आहे. नाणेघाटच्या शिलालेखांत वेदिसिरी हा दक्षिणापथाचा राजा होता असें म्हटलें आहे. या सर्वांवरून निष्कर्ष असा निघतो कीं, "इसवी सनापूर्वीं पुष्कळ शतकें हिंदुस्थानचा दक्षिणभाग म्हणजे कन्याकुमारीपासून तों नर्मदेपर्यंतचा प्रदेश उत्तरेकडील लोकांस ज्ञात होता व त्यावेळीं दक्षिणेकडे मोठमोठीं शहरें होतीं व सर्व प्रदेशभर निरनिराळीं व्यवस्थित राज्यें होतीं.[१]

पाली भाषेंतील 'महावंस' या सहाव्या शतकांतील ग्रंथांत महाराष्ट्र या शब्दाचें 'महारठ्ठ' असें प्राकृत रूप येतें, पण याहि आधीं म्हणजे ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकांतील मोग्गलिपुत्त तिस्स यानें आपल्या बौद्ध धर्माचे प्रचारक महिस-मंडल, वनवास, अपरांतक, महारठ्ठ इत्यादि देशांत पाठविल्याचा उल्लेख आहे.[२] यांतील महिस मंडल म्हणजे नर्मदातीरचा महिष्मतीचा प्रदेश, वनवास म्हणजे उत्तर कानडा, अपरान्त म्हणजे कोंकण. सम्राट अशोकानें सुद्धां राष्ट्रिक (महाराष्ट्र), पेतनिक (पैठण), अपरांत (कोंकण) वगैरे देशांत धर्मप्रसारक पाठविल्याचा उल्लेख आहे. याचा अर्थ असा कीं महाराष्ट्रांतील वसाहत राजवाडे समजतात त्याहून आधीची आहे. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकांतच भारतांतील लोकांना 'महाराष्ट्र' हें नांव माहित होतें असें दिसतें. महाराष्ट्रांतील लोकवस्तीचा अगदीं अलीकडचा पुरावा पाहतां या देशांतील वस्ती किती तरी प्राचीन काळची असावी असें अनुमान निघतें.

गेल्या कांहीं वर्षांत महाराष्ट्रांतील नाशिक, जोर्वे, नेवासे, कऱ्हाड, कोल्हापूर इत्यादि ठिकाणीं झालेल्या उत्खननांवरूनहि कांहीं नवी माहिती मिळण्यासारखी आहे. येथील उत्खननांत जे अवशेष मिळाले त्यांवरून या विषयांतील संशोधकांनीं काढलेले निष्कर्ष मननीय आहेत. या शास्त्राच्या अनुरोधानें महाराष्ट्राचे अश्मयुग, ताम्रपाषाणयुग व लोहयुग असे तीन विभाग सांस्कृतिक दृष्टीनें होतात. अश्मयुगाच्या प्राचीन, मध्य, व नव विभागांपैकीं सर्वांत विस्तृत पुरावा प्राचीन अश्मयुगाचा संशोधकांना मिळालेला आहे; आणि हा काल फार प्राचीन म्हणजे दोन तीन लाख वर्षांपूर्वीचा असावा असा अंदाज आहे. कात्यायनाच्या वार्तिकांत

१. श्री. व्यं. केतकर, प्राचीन महाराष्ट्र : पृष्ठ २१, सन १९३५

2. Turnouer, Mahaumaso, पृष्ठ ७१-७२

'महिश्मत' व 'नासिक्य' यांचे उल्लेख आढळतात. याचा अर्थ असा कीं इ. स. पूर्व तिसऱ्या शतकांत नासिक माहीत होतें. आजच्या उत्खननाच्या आधारें तर हें ठिकाण प्राग् ऐतिहासिक, आदिपाषाण युगांतील म्हणजे इ. स. पूर्वी ५ लक्ष ते ३० लक्ष वर्षांइतकें जुनें असावें असा अंदाज आहे.[1] ताम्रयुगाची महाराष्ट्रांत अखेर इ. पू. १००० या काळांत झाली असावी असें कार्बन १४ या पद्धती-वरून निश्चित झालें आहे. यानंतरच्या काळांत चारपांच शतकें तरी वस्ती नसावी. पुनः इसवी सन पूर्व तिसऱ्या चौथ्या शतकांत लोहयुगास प्रारंभ झाला व येथूनच नागरी संस्कृतीचा विकास झाला. पैठण, नाशिक, कोल्हापूर, कऱ्हाड हीं या संस्कृतींचीं केंद्रें होतीं. इसवी सनाच्या सुरुवातीस रोमन संस्कृतीशीं या महाराष्ट्रीय समाजाचा संबंध आला असल्याचा पुरावा प्राप्त झाला आहे.[२] हा एवढा शोध एवढ्यासाठी कीं राजवाडे यांच्या मतें महाराष्ट्रांत संस्कृतीचा उदय बौद्धक्रांतीनंतर झाला असें जें आहे तें बरोबर नाहीं. हें नीट सिद्ध व्हावें म्हणून. इ. स. पूर्व तिसऱ्या चौथ्या शतकांतच येथें नागरी संस्कृतीचा उदय होत राहिला होता. आतां मुख्य प्रश्न असा कीं हे लोक होते तरी कोण ?

राजवाडे यांच्या मतें आजचे मराठे म्हणजे उत्तरेकडून आलेल्या कमी दर्जाच्या क्षत्रियांच्या व नागांच्या मिश्रणाची एक नवी जमातच होय. राम, कृष्ण, भीष्म वगैरे उच्चवर्णीय क्षत्रियांशीं या मराठ्यांचा संबंध नाहीं. राजवाडे यांचें हें निरीक्षण इतिहासास धरून नाहीं. अपरान्त, विदर्भ, अश्मक, मूलक, कुन्तल अशा विविध नांवांच्या विभागांच्या महाराष्ट्राचा इतिहास पाहिला तर व शात-वाहन, चालुक्य, वाकाटक, राष्ट्रकूट, यादव या घराण्यांच्या राजकीय इतिहासाचा सूक्ष्म अभ्यास केला तर राजवाडे यांचें मत टिकेल असें वाटत नाहीं. निंबाळकर, परमार, गायकवाड, शिंदे, पवार, भोसले, घोरपडे, सावंत, आंग्रे, चव्हाण, डफळे, दाभाडे, यादव, जाधव, शिर्के, मोरे, होळकर आदि मराठे घराणीं व त्यांचें कर्तृत्व यांची साक्ष राजवाडे यांच्या निष्कर्षाच्या विरुद्ध निघेल. बुद्धाच्या समाजक्रान्तीनंतर व इस्लामच्या आक्रमणानंतर मराठ्यांचे रीतिरिवाज व कुलाचार शिथिल झाले, कांहींचा लोप झाला एवढेंच फार तर म्हणतां येईल. ऐतरेय ब्राह्मण, पाणिनिसूत्र व कात्यायनाचें वार्तिक यांच्यावरून सिद्ध होतें कीं इ. स. पूर्वी सहाव्या शतकांतच आर्य दक्षिणापथांत स्थिर झाले होते. रुक्मिणी व दमयंती या क्षत्रिय कन्या होत्या. नाशिक येथील गौतमीपुत्र शात-कर्णी याच्या शिलालेखांत त्याचें वर्णन 'खतिय-दप्पमान-दमनस्स' असें केलें आहे. यांतील क्षत्रिय शब्द लक्षणीय आहे.

---

1. S. D. Sankalias, S. B. Deo : Excavation at Nasik and Jorve : pp.6–9.

२. शां भा. देव, महाराष्ट्रांतील उत्खननें : पृष्ठ, ८३–८७.

या विचाराचा समर्पक परामर्श चिं. वि. वैद्य यांनीं घेतलेला आहे. त्यांच्या मतें "धर्मशास्त्राचा योग्य विचार करतां मराठे शुद्ध क्षत्रिय आहेत....शहाण्णव कुळी मराठे मूळचे सूर्यवंशी किंवा चंद्रवंशी क्षत्रिय असून ते उत्तरेकडून दक्षिणेंत आले."[१] मराठे केवळ शेतकी करून पाटीलकी करूं लागल्यानें त्यांचें शुद्ध क्षत्रियांशीं असलेलें नातें विसरणें बरोबर होणार नाहीं. पाटीलक्या, देशमुख्या करणारे मराठे एवढे नादान कसे असा प्रश्न राजवाडे यांना पडलेला दिसतो. पण अधिक तपासानंतर असें आढळून येईल कीं याच मराठ्यांचे पूर्वज अस्सल क्षत्रिय होते. श्रावणी करून गळ्यांत जानवें घालण्याची प्रथा आजहि जातिवंत मराठ्यांत आहे. "गावांत मुख्य अधिकारी पाटील. याच पाटलांनीं गांवचे मर्द जमा करून तरवार गाजवून प्रथम सरदाऱ्या व नंतर राज्येंहि संपादिलीं आहेत. शिंदे, होळकर, गायकवाड, पवार, जाधव, कदम वगैरे सर्व पाटीलच होते."[२]

राजवाडे यांच्या विवेचनांत आणखी एक भ्रम उत्पन्न झालेला दिसतो. आंध्रभृत्यापासून शिवाजी महाराजापर्यंत म्हणजे सुमारे १६०० वर्षे महाराष्ट्रांतील लोकांना उत्तरेकडील उच्च संस्कृतीच्या लोकांच्या अमलाखालीं रखडावें लागले... 'तब्बल सोळाशें वर्षें महाराष्ट्रिक लोक परकीयांच्या अमलाखालीं होते' ही राजवाडे यांची विचारसरणी आणखी चमत्कारिक आहे. आंध्रभृत्य, चालुक्य, राष्ट्रकूट यादव यांना राजवाडे यांनीं परकीय मानलें आहे! तसें पाहिलें तर महाराष्ट्रिक हेंहि महाराष्ट्रांत परकीयच होते. परंतु खरी गोष्ट अशी कीं आंध्रभृत्य सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव हे सुद्धां खऱ्या अर्थानें महाराष्ट्रिक म्हणजे मराठेच होत. ज्या सातवाहनाबद्दल शंका, तो सुद्धां महाराष्ट्रिक वा मराठे कुळांतील असावा कीं काय असा तर्क आजचे इतिहासकार करतात. शातवाहनांचें कुल महाराष्ट्रांतील असावें असा विचार आजकाल दृढ झालेला दिसतो. '१. शातवाहनांचा सर्वांत प्रारंभाचा शिलालेख नाणेघाट येथें आहे. २. त्यांचे बहुतेक लेख नाशीक येथें सांपडतात ३. त्यांच्या सर्व अंकित लेखांतून आंध्र असा शब्द न लिहितां शातवाहन असाच येतो. ४. खारवेल शिलालेखांत शातवाहनांचा प्रदेश कलिंग देशाच्या पश्चिमेकडील म्हणून दिला आहे. ५ जैन कथांमध्यें शातवाहनांची राजधानी पैठण म्हटलेली आहे. ६. कथासरित्सागरमध्यें यांच्या घराण्याचा संस्थापक पैठणला जन्मला असें दाखविलें आहे. ७. यांच्या शिलालेखांची भाषा महाराष्ट्री आहे. यांवरून हें कुल महाराष्ट्रीयच असावें या कल्पनेस दुजोरा मिळतो. पुणे जिल्ह्यांतील अंदर-मावळ, आंध्र-मावळ आन्ध्रा नदीचें खोरें हेंच सातवाहनांचें

---

१. वैद्यांचे ऐतिहासिक निबंध : पृष्ठ ५९-६१

२. भास्करराव जाधव, मराठे आणि त्यांची भाषा: पृष्ठ १५-१६, सन १९३२.

मूलस्थान असावें.'[१] नवीन संशोधनानुसार शातवाहन हे महाराष्ट्रीयच ठरतात. तेव्हां ते राजवाडे यांना परकीय वाटतात हें अर्थातच बरोबर नाहीं. चालुक्य हे अस्सल महाराष्ट्रीय यांत तर शंका घेण्यासहि जागा नाहीं. यांचे संबंध पल्लव, कदंब, सेंद्रक वगैरे मराठे कुळांशींच झालेले असून ते स्वतःहि आपणांस बिगरमराठे समजत नाहींत. याचप्रमाणें राष्ट्रकूट, यादव, वगैरेहि खऱ्या अर्थानें महाराष्ट्रीय क्षत्रिय म्हणजे मराठेच होत.

महाराष्ट्रांतील मराठे हे अस्सल क्षत्रियांपैकीं नव्हत हें सिद्ध करण्यासाठीं राजवाडे यांनीं त्यांना हीन, अधम अशीं विशेषणें दिलीं आहेत; आणि हें हीनत्व नागलोकांच्या संसर्गानें त्यांना अधिक आलें असा निष्कर्ष त्यांनीं काढलेला आहे. हे नाग लोक तरी कोण होते, त्यांची संस्कृति मराठ्यांना अपकर्षक झाली काय ? या प्रश्नांचा विचार करतां राजवाडे यांचें एक मत मान्य होण्यासारखें आहे. आजच्या मराठ्यांत नाग संस्कृतीचें मिश्रण आहे हें निरीक्षण सयुक्तिक दिसतें, कारण मराठे क्षत्रियांत सूर्यवंश, चंद्रवंश व नागवंश अशा तिघांचा विचार येतो. आर्यांच्या वसाहती दक्षिणेंत होण्याआधींच नागवंशीय लोक भारतांत ठिकठिकाणीं विखुरलेले होते. त्यांची संस्कृति द्रविडांशीं मिळतीजुळती होती. सर्प व नाग अशीं यांच्यांत दोन कुळें प्रमुख असावींत. खांडववनाचें दहन, तक्षक-परिक्षित स्पर्धा, जन्मेजयाचें सर्पसत्र इत्यादि पौराणिक कथांतून स्थूल इतिहास समजण्यासारखा आहे. कांहीं प्रमुख आर्यांनीं नागकन्यांशीं विवाह केल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. स्वतः राजवाडे यांनीं एक लेख 'कोंकण व नागलोक' असा लिहिला असून गोकर्ण, मलयपर्वत या पाताळांतील म्हणजे पश्चिमसमुद्राशेजारील नागांचे प्राण वाचविण्यासाठीं विद्याधरपुत्र जीमूतवाहन हा पाताळांत आला असा 'नागानंद' नाटकांतील उल्लेख त्यांनीं केला आहे. वासुकी, तक्षक, कर्कोटक, कालिया, इत्यादि प्रमुख नागकुलांचा उल्लेख करून राजवाडे यांनीं कुकणनांवाच्या नागकुलाचा कोंकणशींहि संबंध जोडिला आहे. "पांडवांच्या नंतर ह्या कुकण कुलानें अशी कांहीं तरी जबरदस्त व चिरस्मरणीय कामगिरी केलेली असावी कीं, अपरान्त म्हणून ज्याला पुढें नामाभिधान मिळालें, त्यालाच कुकुण देश, कोंकण, कोकण हेंहि नांव रूढ झाले...कोंकण हें नांव त्या प्रदेशांत राहणाऱ्या नागांच्या एका पराक्रमी कुळाच्या नांवावरून पडलें आहे."[२] प्रायः नागांचीहि क्षत्रिय जातच समजली जाई. ब्राह्मण नागांचें अन्न घेत. जरत्कारु ब्राह्मणानें वासुकि नागाची बहिण वरिल्याचें आस्तीकपर्वांत लिहिलें आहे.[३] ही सर्व नागस्तुति राजवाडे यांनीं

१. महाराष्ट्र परिचय : पृष्ठ ४८७, सन १९५४

२. राजवाडे लेखसंग्रह भाग २ : पृष्ठ २३३

३. कित्ता : पृष्ठ २३३

केली आहे. मग राधामाधवविलासचंपूच्या प्रस्तावनेंत नागसंस्कृतीच्या मिश्रणानें मराठे हीनावस्थेस पोंचलें या विचाराची संगति कशी लावावयाची ?

राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें आजच्या मराठ्यांत नागवंशाचें मिश्रण आहे. पण नागवंशमिश्रणानें मराठ्यांचें क्षत्रियत्व हीन कां ठरावें ? नागवंशांत शिद्यांचें कुळ प्रमुख आहे म्हणून तें हीन कसें होईल ? शातवाहनांचा नागांशीं संबंध असे. म्हणून शातवाहन कुळ हीन मानावयाचें का ? 'सातकर्णीचा विवाह महारठी कळलाय याच्या नागनिका नामक कन्येशीं झालेला होता. हा कळलाय नागवंशी होता.'[1] या माहितीवरून नागांशीं संबंध हीन संस्कृतीच्या मराठ्यांशींच होते असें नाहीं. अर्जुन-उलुपी संबंध प्रसिद्धच आहे. ज्या सातकर्णी शालिवाहनशी नागांचा संबंध आला त्याला या संबंधामुळें आपलें राज्य वाढविणें सुलभ झालें. 'महारठी कळलाय हा मोठा शूर राजा होता. नाणे घाटांतील लेखांत याच्या 'अंगिय' कुलाचा निर्देश आहे, व 'समुद्रवलयांकित पृथ्वीवरील प्रथमवीर' असें वर्णन याचें केलें आहे. याच्याशीं वैवाहिक संबंध झाल्यापासून सातकर्णीला आपलें सामर्थ्य वाढविण्यास पुष्कळ साह्य झालें असावें. हा पुढें सातकर्णीचा मांडलिक झाला तरी त्यानें स्वतःच्या नांवें नाणीं पाडण्याचा हक्क राखून ठेविला होता असें दिसतें. कारण याचीं नाणीं हैदराबाद, कर्नाटक व म्हैसूरमध्यें सापडलीं आहेत."[2] हें झालें कळलाय नागराजाचें वर्णन. याची मुलगी शातवाहनांच्या घरीं आली. नाणेघाटांतील शिलालेखांत या नागकन्येचें, नागनिकेचें वर्णन आलें आहे. धर्म, इंद्र, संकर्षण, वासुदेव, चंद्र, सूर्य यमवरुणादि चार लोकपाल व कुमारवर (कार्तिकेय) .यांना आरंभीं नमन केलें आहे... दक्षिणापथपति, वीर, शूर व अप्रतिहतचक्र अशा वेदिश्री राजाच्या कारकीर्दीत अंगियकुलवर्धन कळलाय नामक महारठीची कन्या, अत्यंत श्रेष्ठ अशा श्रीसातकर्णीची भार्या व पूर्तद, वरद, कानद व धनद अशा वेदिश्री व श्रीमान् सति (शक्ति) व याची माता (नागनिका) हिनें आपल्या पतीची सहधर्मचारिणी म्हणून व स्वतःही अनेक श्रौतयाग केले. ... नाणेघाटांतील हा लेख नागनिकेचा मुलगा वेदिश्री याच्या काळचा आहे. त्यावेळीं ती वृद्ध झाली होती. तिचा मुलगा भाय हा त्यापूर्वी कालवश झाला होता. वडील मुलाच्या मृत्यूनें तिचें हृदय होरपळून निघालें होतें. तशांत तिच्यावर पतिनिधनाचा घोर प्रसंग ओढवून आकाशच कोसळलें; तथापि तिनें धीर न सोडतां आपल्या इतर मुलांकडे पाहून उर्वरित आयुष्य संन्यस्त वृत्तीनें धार्मिक आचरणांत घालविण्याचें ठरविलें. नागनिका महिनामहिना उपवास करीत असे; ती आपल्या प्रासादांतहि तापसीप्रमाणें साधेपणानें राहत असे, ती ब्रह्मचर्य व्रताचें

---

१. वा. वि. मिराशी, संशोधन मुक्तावलि, सर दुसरा : पृष्ठ १६७

२. कित्ता: पृष्ठ १६७-१६८

पालन करी, व्रतें व यज्ञ करण्यांत तर ती अतिशय निपुण होती. अशा तिनें अनेक यज्ञ केलें.'[१] नागकन्या नागनिका हिचें एवढ्या विस्तारानें वर्णन केलें तें एवढ्यासाठीं कीं त्यावेळीं नागलोकांची सस्कृति राजवाडे समजतात तितकी हीन नव्हती हें ध्यानांत यावें म्हणून.

वरील सर्व पाहणीचा निष्कर्ष असा कीं राजवाडे समजत त्याहून आधींच्या काळीं महाराष्ट्रांत वसाहत झाली असावी, आजचे वा शहाजीकालीन मराठे हे उत्तरेच्या क्षत्रियांपैकीं म्हणजे आर्यांपैकींच होत, त्यांचा नागांशीं संबंध आला हें खरें पण त्यामुळें तें हीन संस्कृतीस पोंहचलें असें नाहीं. राजवाडे मानतात तेवढी हीन स्थिति त्यावेळच्या मराठ्यांची नव्हती, व जी होती तशी ती फक्त मराठ्यांचीच व महाराष्ट्रांतच होती असेंहि नाहीं. बौद्धादि क्रांतिकारकांच्या लाटांत व मुसलमानांच्या आक्रमणांत ब्राह्मणांची सुद्धां वाताहात होण्याचा प्रसंग आला तेथें मराठे आपल्या मूळच्या क्षत्रियत्वास वंचित झालें यांत नवल कोणतें ? त्यांच्या अवस्थेस हीन लेखणें, त्याच्या संस्कृतीस कमी मानणें, नागांच्या संबंधामुळें मराठे निकृष्ट बनले असा निर्णय घेणें ही राजवाडे यांची विचार परंपरा यामुळें चुकीची ठरते. उलट उत्तरेकडील समकालीन आर्यांपेक्षां दक्षिणेकडील आर्य मराठे अधिक स्वाभिमानी व शौर्यवान दिसतात. "मराठे, दक्षिणचे आर्य, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, उत्तर हिंदुस्थानच्या क्षत्रियांपेक्षां कमी बुद्धिमत्तेचे, राजकीय धोरणाचे किंवा धार्मिक संस्कृतीचे ही गोष्ट सर्वथैव चुकीची. कदाचित् पारडे झुकलें जर मराठ्यांच्याच बाजूस झुकेल. गुरखे, रजपूत, शिख इत्यादि ज्या शूर जाति हिंदुस्थानांत आहेत त्यांच्याशीं मराठ्यांची तुलना केली तर मराठे शहाणपणांत, बुद्धिमत्तेंत, राजकीय धोरणांत वरचढच आहेत. अशी खातरी सर्वांची आहे. शिवाय उत्तर हिंदुस्थानच्या क्षत्रियांनीं स्वराज्यस्थापनेच्या बाबतींत काय शंख वाजवला आहे. ? उत्तर हिंदुस्थान पारतंत्र्यांत महाराष्ट्राइतकेंच लोळत पडलें आहे. पंजाब तर कधींच स्वतंत्र झालेला व स्वराज्य भोगणारा शिकंदराच्या वेळेपासून दिसला नाहीं, आणि पंजाब तर आर्य क्षत्रियांचें माहेर आहे.... रजपुतांनीं मुसलमानी अंमल झुगारून खरें स्वराज्य स्थापन करण्याचा कधीं प्रयत्न केला किंवा वरिष्ठ संस्कृति गाजविली ? इतिहास हा मान एकट्या महाराष्ट्रासच देत आहे. शिवाजीच्या मराठ्यांनींच स्वदेशांत स्वधर्म आणि स्वराज्य; खरें स्वराज्य स्थापन केलें. तात्पर्य, महाराष्ट्रीय आर्यांची हीन संस्कृति आहे किंवा होती हा सिद्धान्त बरोबर नाहीं."[२] मराठ्यांच्या क्षत्रियत्वासंबंधीं वादविवाद महाराष्ट्रांत मागें कांहीं निमित्तांनीं झाला होता; पण आज त्याची जरूरी नाहीं. वंश, भाषा, चेहऱ्याची ठेवण, डोक्याची, नाकाचीं मोजमापें, शरीरयष्टी,

१. कित्ता : पृष्ठ १७० १७१

२. चिं. वि. वैद्य, वैद्यांचे ऐतिहासिक निबंध : पृष्ठ ८२–८३, सन १९३१

चेहऱ्याचीं मापें, वर्ण, केसांचे प्रमाण इत्यादि विविध साधनांवरून नव्या मानव-शास्त्राच्या आधारेंहि मराठे लोकांचा अभ्यास चालू आहे. मराठे अस्सल क्षत्रिय किती, द्रविड किती, नागवंशीय किती, शक वा मोंगोलियन किती, याचा काटेकोर हिशेब लागणें शक्य नसले तरी स्थूल निर्णय त्या त्या वेळच्या साधन-संशोधनावरून मान्य करावे लागतील.

राजवाडे यांनीं शहाजीपूर्वकालीन मराठे समाजाला हीन संस्कृतीचें लेखलें व त्याची शास्त्रीय मीमांसाहि केली. व या मीमांसेसाठीं त्यानीं त्यांचा आवडता तत्त्वज्ञ ऑगस्ट कोम्ट यांची साक्ष काढली. राजवाडे यांच्या मतें शहाजीकालीन समाज हा इतका हीन, इतका दैवाधीन, इतका दुर्बल बनत राहिला कीं संस्कृतीचें मापन हत्यार सुद्धां त्यांनीं नीट राखलें नाहीं. कारण हत्यार पल्लेदार राखण्या-बद्दल जी प्रवृत्तिपर मनोवृत्ति समाजाची लागते तीच त्या काळीं महाराष्ट्रांत नव्हती. ऑगस्ट कोम्टच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे महाराष्ट्र त्यावेळेस आध्यात्मिक अवस्थेंत होता व भौतिक अवस्थेंत यावयास त्यास पांचशें वर्षें अवकाश होता. या एकंदर विवेचनासाठीं राजवाडे यांनीं ऑगस्ट कोम्टप्रणीत समाजाच्या ज्या तीन अवस्था मानल्या त्या तरी इतिहासास कितपत मंजूर आहेत? समाज प्रथम देवदेवतात्मक विचारसरणीचा असतो, मग तो तत्त्वचिंतक बनतो व नंतर तो भौतिक शास्त्रांच्या अभ्यासास प्रवृत्त होतो हें गणित स्थूलमानानें बरोबर दिसलें तरी इतिहासाच्या अभ्यासकांस यांतील उणीवा सहज ध्यानांत येण्याजोग्या आहेत. ज्या देशांत भौतिक अवस्था येण्यास अद्याप पांचशें वर्षें अवकाश आहे असें राजवाडे म्हणतात त्याच देशांत कांहीं शतकांपूर्वी कणाद, नागर्जुन, चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य, वाग्भट, यांची परंपरा भौतिकशास्त्राच्या अभ्या-सकांचीच नव्हती का? भारतांच्या प्राचीन काळांतील शिल्पें, मंदिरें, गोपुरें, विहार, स्तूप, लेण्यीं, व अलंकारांची विविधता इत्यादींचा अभ्यास हा भौतिक शास्त्रांवरच आधारलेला होता ना? मग याच्यानंतर पुनः आध्यात्मिक अवस्था आली कीं काय? ऑगस्ट कोम्ट किंवा राजवाडे यांच्या भाषेंत याचें उत्तर देणें अवघड आहे. ग्रीकांच्या इतिहासांत अयोनियन, पायगोरियन, अथेनियन इत्यादि भौतिक शास्त्रांच्या अभ्यासपरंपरा निर्माण झाल्या, अनेक्झॅगोरस, थेल्स, ॲनेक्झी-मॅंडर, पायथॅगोरस, झीनो, अर्कोटस, हिपॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल इत्यादि श्रेष्ठ वैज्ञानि-कांची परंपरा ग्रीसमधून इ. स. पूर्वी चौथ्या शतकांत कां लुप्त झाली? त्या नंतर त्या समाजास कोणती अवस्था प्राप्त झाली? नाईलच्या मुखावर अलेक्झांड्रिया येथें युक्लिड, आर्किमिडीज, हिरो, अरिस्टार्कस, हिपार्कस, टॉलेमी, थिऑन, हिपाशिया इत्यादि शास्त्रवेत्त्यांची जी गौरवशाली परंपरा उभी राहिली तिच्या आधीं कोणती देवदेवतात्मक वा आध्यात्मिक अवस्था होती? आणि हीहि परंपरा लुप्त झाल्यावर जवळजवळ एक हजार वर्षें युरोपमध्यें सर्व क्षेत्रांत अज्ञानाचा अंधार होता या

अवस्थेस काय म्हणावयाचे? रॉजर बेकनपासून पुनः भौतिक परंपरा सुरू झाली, पण शास्त्रविकासाबरोबरच तत्त्वज्ञान, धर्म,अध्यात्म यांचेंहि महत्त्व वाढलें, प्रसंगीं शास्त्रज्ञांनींहि आपल्या मयादा ओळखून तत्त्वज्ञानाची, धर्मविचाराची महती सांगितली आहे. असें असतां ठोकळ मानानें समाजाच्या तीन अवस्था मानणें व त्याप्रमाणें शहाजीकालीन समाज निकृष्ट ठरविणें युक्त होणार नाहीं. एकाच काळीं तीनहि अवस्थांचीं लक्षणें दिसून आल्यास ऑगस्ट कोम्ट वा राजवाडे यांची विचारसरणी स्थूल मानानें वरवर बरोबर दिसत असली तरी इतिहासाच्या तपशी-लानें ती लंगडी ठरेल असें वाटतें.

१२ : राजवाड्यांचें समाज-चिंतनः आदिवासी

उत्तरेकडील आर्य दक्षिणेंत वसाहत करण्यास आले त्यावेळीं येथें मूळचे लोक त्यांच्याहि आधीं असणारे कोणचे होते या प्रश्नाचा उहापोह राजवाडे यांनीं एकदोन ठिकाणीं विस्तारानें केलेला आहे. 'महाराष्ट्राचा वसाहतकाल' या लेखमालेंत त्यांनीं महाराष्ट्रांतील ग्रामनामें, नद्यांचीं नांवें, वनस्पतींचीं नांवें, देवदेवतांचीं नांवें मनुष्येतर प्राण्यांचीं नांवें इत्यादींच्या अभ्यासावरून राजवाडे यांनीं महाराष्ट्राच्या वसाहतकालाचा व त्यावेळच्या परिस्थितीचा शोध घेतला आहे. राजवाडे यांच्या मतें धर्मरक्षणासाठीं उत्तरेकडील महाराष्ट्रिकादि लोक शकपूर्व सहाशेंच्या पूर्वीं दक्षिणेंत वसाहतीसाठीं आले असल्याचें आपण पाहिलें आहेच. हे महरट्ट धर्माभिमानी महरट्ट क्षत्रिय दंडकारण्यांत वसाहतकर्म अंगीकारतांना ग्रामस्थापना कशी करीत असावेत याचें राजवाड्यांनीं काढलेलें चित्र यथार्थ म्हणावें लागेल.

प्रथम ते राहण्यास उपयुक्त अशी जागा जलयुक्त असलेली म्हणजे नदीकांठची शक्य तों शोधीत. त्यानंतरचा विचार गुरें चरण्याला मुबलक गवादनी उर्फ गव्हाण आहे कीं नाहीं हा राही. मग कृषीकर्माला जमीन किती आहे याचा विचार होई. रहदारीच्या रस्त्याचाहि विचार होत असे. एवढें निश्चित झाल्यावर जमिनीवरचा फालतू झाडझाडोरा काढून वटपिप्पलौदुंबरादि पूज्य वृक्ष कायम राखून गांवठाण सिद्ध होई. मग पुरोहित या ग्रामवास्तूची शांती करी. ग्रामदेवतेची स्थापना होई. पुजारी सेवेकरी यांची योजना होऊन चारी दिशांचे किंवा अष्ट दिशांचे भैरवादि रक्षक निर्माण होत. देवधर्मांची अशी प्रतिष्ठापना झाल्यावर मग ग्रामकूट किंवा ग्रामाधिकारी किंवा पाटील गांवचा पुढारी होत असे. त्याच्याजवळ लेखनकर्म करणारा कर्मस्थ किंवा कार्यस्थ, किंवा कामथ, किंवा कायस्थ असे. हाच कायस्थ पुढें कुलकरणी झाला. या कुलकरण्याच्या घराशेजारीं वर्तक, जोशी, मेढी, पाठक यांचीं घरें असत. जोशी पंचाग, तीथवार सांगत असे. गांवांतील देवळांतून पाठक पुराण वाचत असे. मेध म्हणजे यज्ञयागाचें कार्य सांभाळण्याचें काम मेढी करीत असे. वर्तक देवालयाचा कारभार पाही. गांवचे शेतीकाम करणारे सर्व प्रजा म्हणून असत. या प्रजाखेरीज सुतार, लोहार, सोनार, शिंपी वगैरे कारू असत. याच कारूंना पुढें मुसलमान कालांत अलुतेबलुते असें नांव मिळालें. गांवांतील वैश्यांना महाजन वा श्रेष्ठी असें म्हणत. या चातुर्वर्ण्यांतील लोकांच्या वस्तीला सोडून कांहीं अंतरावर चांभारवाडा, महारवाडा

व मांगवाडा अशीं अंत्यजांची वस्ती गांवकुसबाबाहेर असे. नदीकांठच्या स्मशानावर डोंब असे.

ही ग्रामव्यवस्था राजवाडे यांनीं सिद्ध केली; तींत आर्यांच्याहि आधीं येथें असणाऱ्या मूळ लोकांचा समावेश नाहीं. ते वस्तीपासून दूर डोंगरदरींतून अथवा जंगलांतून राहात असावेत. ज्या ग्रामनामांवरून राजवाडे यांनीं वसाहतकालाचा शोध घेतला त्यांत त्यांना आंध्र, पुंड्र, शबर, कोल, भिल्ल, व वभ्र या रानटी लोकांचीं सामान्यनामें मिळालीं. ऐतरेय ब्राह्मणांतील आंध्र, पुंड्र, शबर, पुलिंद, व मूतिब यांतील कांहीं नांवें राजवाड्यांना खानदेशांत मिळालीं. पुणें प्रांतांतील नाणेंतर्फेतील नांवांच्या शोधांवरून राजवाडे यांना असा तपास लागला कीं भिल्ल, कोल, कातकरी, वारली वगैरे रानटी जातींचा निर्देश या ग्रामनामांत नाहीं. राक्षस, नाग, पारद, निप, अभीर व आर्य यांचा मात्र आहे. कदाचित् आर्यांच्या संस्कृतीपुढें हे मूळचे लोक बाजूस पडले असावेत. यांतील आर्यांच्या आधीं कोणते होते, आर्यांच्या बरोबर कोणते आले, आर्यांच्यानंतर कोणते आले याहिसंबंधानें राजवाडे यांनीं तर्क केलेला आहे. आंध्र, पुंड्र, शबर, पुलिंद व मूतिब हे पांच रानटी लोक आर्यांना माहीत होते. म्हणजे हे लोक आधींचे असावेत व कोल आर्यांना माहीत होते. म्हणजे हे लोक आधींचे असावेत व कोल, मुंड, भिल्ल, गोंड व वभ्र यांची माहिती आर्यांना वसाहतीच्या विस्ताराच्यावेळीं झाली असावी.

यांतील मुंड व गोंड हे पूर्वेकडील गोंडवनांतील मूळचे लोक होत. वभ्र हे तामिळ देशांतील होत. याच वभ्रांचे आजचे वंशज म्हणजे वडार लोक. शबर लोक साबरमती नदीकांठचे असावेत. राजपुतांना व माळवा येथून भिल्ल आर्यांच्या नंतर आले व डोंगरदऱ्यांच्या निकट स्थिरावले. याचा अर्थ असा कीं भिल्ल, मुंड, गोंड, वभ्र हे आदिवासी खऱ्या अर्थानें नव्हत. हेहि आर्यांप्रमाणेंच परस्थ पण वसाहतीस आलेले. समुद्राच्या काठीं राहून उपजीविका करणारे कूलिन्-कूळी-कोळी कोळवनांत आर्यांना भेटले. कोंकणच्या समुद्रकिनाऱ्यावर यांची वस्ती असावी. कोंकणांत हे स्वयंभूच असावेत असा राजवाडे यांचा तर्क आहे. आर्यांच्या अगोदर याप्रमाणें दंडकारण्यांत मनुष्य वस्ती किरकोळ स्वरूपाची होती. "आर्य दंडकारण्यांत येण्याच्या अगोदर हें अरण्य निर्मनुष्य होतें असें मात्र म्हणवत नाहीं. खानदेशांत गिरणा नदीच्या पात्रांत हिंवाळ्याच्या प्रारंभास हिंडत असतां प्रस्तुत लेखकास गारेच्या अणकुचीदार बोथाट्या पांचसात वर्षांपूर्वी उपलब्ध झाल्या होत्या."[1] राजवाडे यांच्या या विधानास आज नव्या उत्खननामुळें मोठेंच महत्त्व द्यावें लागणार आहे.

---

१. ऐतिहासिक विविध विषय, खंड पहिला : पृष्ठ २१२, सन १९१८.

महाराष्ट्रांतील या आदिवासींचा अधिक तपशीलानें विचार राजवाडे यांनीं महिकावतीच्या बखरीच्या प्रस्तावनेंत केला आहे. बखरींतील मजकुराच्या वस्तु-प्रामाण्याची चिकित्सा झाल्यावर बिंब, मौम, नागरशा, नायते इत्यादि उपनामांचा विचार राजवाडे यांनीं केला आहे; आणि याच वेळीं तांडेल या कुळनामाचा प्रश्न येतो. हे तांडेले कोण ? याच जातीला मांगेला हें दुसरें नांव आहे. राजवाडे यांनीं यांच्या शोधासाठीं नाशिक येथील तीर्थोपाध्ये चंद्रात्रे यांच्या वह्या तपासून पाहिल्या आहेत. या जातीचा सबंध निर्देश मांगेले-तांडेले असा आहे. तांडा म्हणजे नांवेंतील खलाशांचा समूह. यावरून हे तांडेले बनले. हे मांगेले तांडेले लोक राज-वाड्यांच्या मतें महाराष्ट्रिकांच्या अगोदर येथें वस्ती करून असावेत. हे महाराष्ट्रिकहि नव्हेत, व नागवंशीयहि नव्हेत. यांचा संबंध बहुधा आंध्र, तेलगू, द्रविड यांच्याशीं असावा. आणखी कोण कोण असे लोक कोकणच्या आश्रयास आले असावेत याचाहि शोध राजवाड्यांनीं घेतला आहे. समुद्र किनाऱ्यापासून मैल अर्धा मैल अंतरपर्यंत पूर्वेकडे हे मांगेले–तांडेले; आणि यांच्यानंतर पूर्वेस तीनचार मैलपर्यंत दुबळे लोकांची वसती आहे. हे दुबळे गुजराथमधील सुरतेकडून सरकत सरकत दक्षिणेंत आले. यांच्याच टापूंत धेडे राहतात. दुबळा शूद्र तर धेडा अतिशूद्र आहे. दुबळे-धेडे यांच्यानंतर पूर्वेस सह्याद्रिशिखरापर्यंत वारली लोकांची वस्ती आहे. वारली मराठी भाषा बोलतात. व्यासवरुडनिषाद० इत्यादि वार्तिकांत वरुड–वारुडकि या नांवावरून वारल्यांचा बोध होतो. वारुडकि=वारुलइ=वारली. येणें-प्रमाणें मराठी भाषा बोलणाऱ्या वारली व मांगेले ह्यांच्यामध्यें गुजराथी भाषा बोलणारे दुबळे व धेडे पाचरेसारखे अडकले आहेत. हे वारली कोठून आले ? वारली मराठी बोलतात. सूर्यनारायणादि देवांची भक्ति करतात. लावण्यासारखें वाङ्मय त्यांच्या तोंडीं आहे. भुवांखेतांवर त्यांचा विश्वास आहे. राजवाडे यांच्या मतें येथील भिल्ल, कोळी व कातवडी यांच्या जुन्या देशांत अधिक सुधारलेला वारली बाहेरून कोठून तरी आला असावा. विंध्योत्तर प्रदेशांत वरुड नांवाची अनार्य जात होती तीच महाराष्ट्रांत आली असावी.

याच वारल्यांच्या टापूच्या दक्षिणेस कोळी, कातवडी व ठाकर लोक आहेत. तस्कर-ठक्कर-ठाकर लोक उत्तरेकडून कोंकणांत आले. कातवडी, काथोडी, काठोडी अथवा कातकरी हेहि सह्याद्रीच्या प्रदेशांत अत्यंत जुने असे आहेत. यांचा धंदा मुख्यतः कात करण्याचा. हे कातवडी कातड्याचें वस्त्र पांघरीत, यावरून कृत्तिपद्दिन् व नंतर कातवडी असा राजवाडे यांचा तर्क आहे. कोळ्यांत डोंगरकोळी, समुद्र कोळी असे प्रकार त्यांनीं केले असून या सर्व आदिवासींच्या भाषेचेंहि वर्णन केलें आहे. राजवाडे यांना या लहानलहान आणि मागासलेल्या रानटी व आदिवासी जमातींचा विशेष परामर्श घ्यावासा वाटला. कारण त्यांच्या मतें महाराष्ट्र जितका महाराष्ट्रिकांनीं वसविला तितकाच मांगेले, वारली, कोळी, कातवडी, लाडी, रांगडी,

इत्यादि पुंजांनींहि वसविला आहे. मराठी भाषेच्या विस्ताराला या मानवपुजांनीं मोठीच मदत केली आहे. धनकर म्हणजे धनगर सुद्धां राजवाडे यांच्या नजरेंतून सुटला नाहीं. धन म्हणजे शेळ्यामेंढ्यांची संपत्ति. यांचा धनी धनकर, धनगर. धनगर हा देवयोनींतला असल्यामुळें त्याचा क्षत्रियांत समावेश होण्यासारखा आहे. महाराष्ट्रीय समाजांत मागासलेल्या वन्य, गुन्हेगार, अस्पृश्य समजल्या गेलेल्या वनवासी वा आदिवासी अशा आणखी किती तरी जाती आहेत. सरकारी शिरगणतींत यांची नोंद पद्धतशीर झालेली दिसते. यांच्या विकासाकडे मिशनरी, समाजसुधारक, सरकार यांचें लक्ष गेलें आहे. समाजशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांनीं यांच्या चालीरीति, यांची विचार पद्धति, यांचें जीवन, यांचें वाङ्मय, यांची देवदैवतें, यांचे लग्नसंबंध वगैरेंची नोंद घेऊन अभ्यास चालविला आहे. वंजारी, ब्रिजारी, लमाणी, मथुरी, चरण कोळी, मल्हार कोळी, महादेव कोळी, ढोरकोळी, आग्री कोळी, भामटे, घाटीचोर, उचले, वडारी, टाकारी, पाथवरट, भिल्ल, कातकरी कैकाडी, मांगगारुडी, पारधी, रामोशी, वडार, पठाण, बेलदार, बेरड, गोंड, आगरी वारली, अहिर, कामाठी, मल्हार कोळीं, सोनकोळीं, घिसाडी, ढोर, पेंढारी, भोई, वैदू, इत्यादि अनेक मानवी समूहांचा अभ्यास राजवाडे यांच्या नंतर झाला असला तरी व कांहीं प्रमुख आदिवासींच्या जीवनपद्धतींचें संशोधन सखोल झालें असलें, तरी ही मंडळी कोठून आली, त्यांची पूर्वपीठिका काय, कोणत्या वंशांतील हे लोक या संबंधीं इतिहासकालांतील संशोधन करण्याचें श्रेय राजवाडे यांना द्यावें लागेल. ज्ञानकोशकार केतकर यांनीं आपल्या 'प्राचीन महाराष्ट्र' या ग्रंथाच्या पहिल्या विभागांतहि नंतर या मानवपुंजांविषयीं थोडेंफार निरीक्षण केलें आहे. भोई, कोळी, यांचीं आडनावें, यांची पूर्वपीठिका देण्याचा प्रयत्न त्यांनीं विस्तारानें केलेला आहे. त्यांच्या मतें भोई व कोळी या जाती महाराष्ट्रांतील सर्वांत जुन्या असाव्यात. या जाती समुद्रकांठानें आणि नदीकांठानें मत्स्यवात व शेतकी हे दोन धंदे करून आहेत. विदर्भांतील आंध व गवळी या दोघांची वस्ती भोयांच्या इतकी जुनी आहे असें मत डॉ. केतकर यांनीं व्यक्त केलें आहे.[१] वऱ्हाडांतील माने कुणबीहि फार जुने असावेत. भोजांचाहि उल्लेख फार प्राचीन काळापासून होत असून ते पंजाबांतून राजपुताना, माळवा, गुजराथ या मार्गानें महाराष्ट्रांत आले असावेत असा त्यांचा तर्क आहे. हे भोज राज्यविस्तारक होते. यांचेचसंबंधीं कोळ्याप्रमाणें जीवन घालविणारे भोई.

महाराष्ट्राच्या संस्कृतिसंवर्धास कारणीभूत झालेल्या या व इतर प्रमुख जातींचा समाजशास्त्रीय अभ्यास अलीकडेच वाढीस लागलेला आहे. डॉ. गो. स. धुर्ये, कर्वे, दांडेकर, डॉ. इरावती कर्वे यांचें याविषयींचे समाजशास्त्रीय अभ्यास

१. प्राचीन महाराष्ट्र, शातवाहन पर्व: पृष्ठ ३३३, सन १९३५

प्रसिद्ध आहेत. राजवाडे यांच्या आधींपासून म्हणजे सन १९०१ पासून शिरगणतीस योग्य अशी दिशा मिळाल्यापासून सरकानेंच निरनिराळ्या जाति, भाषा, देवदैवतें, रीतिरिवाज यांची माहिती प्रसिद्ध केलेली दिसते. एन्थोव्हेनचें 'Tribes and Castes in the Bombay Presidency' हें पुस्तक व हिरालालचें 'Tribes and Castes of the Central Provinces' या पुस्तकांचा उल्लेख करणें अगत्याचें आहे. त्रिंबक नारायण अत्रे यांच्या 'गांवगाडा' नामक पुस्तकानें सन १९१६ मध्यें मराठी ग्रामदर्शनाचें रूप यथातथ्य रेखाटलेलें आहे. सन १९३३ मध्यें बदलापूरच्या ना. गो. चाफेकरांनीं 'आमचा गांव' नांवाचें एक पुस्तक समाजशास्त्रीय दृष्टिकोणांतून लिहून एक नवी दिशा गांवच्या अभ्यासाची दाखविली आहे. विल्यम मॉरिसन या अमेरिकन समाजशास्त्रीय विद्यार्थ्यानें याच गांवची पुनः पाहणी केलेली आहे. यांखेरीज त्रिं. ना. अत्रे यांचे गुन्हेगार जाती सन १९१५, या. मा. काळे यांचें गोंड लोकांचा इतिहास सन १९२७, ब. हि. पाटील यांचें गोरवंजारे लोकांचा इतिहास सन १९३६, अनसूया लिमये यांचें घाटावरील श्रमिकांचीं लोकगीतें सन १९५५, कुसूम व वसंत नारगोलकरांचे जंगलचे राजे सन १९५५, वि. रा. शिंदे यांचें भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न सन १९३३, इत्यादि मराठी भाषेंतील प्रयत्नांनीं मराठी लोकसमाजाची विशेषतः लहान लहान अशा मागासलेल्या मानवी समूहांची माहिती शास्त्रीय स्वरूपांत देण्याचें कार्य मोठेंच केलें आहे"

मुंबई विद्यापीठांतील डॉ. गो. स. घुर्ये यांचें याविषयींचें कार्य तर फार मोलाचें मानावें लागेल. जातिसंस्था, वन्य जमाती, त्यांची राहणी, त्यांचें जीवन, त्यांच्या चालीरीती, गुन्हेगार जमातींचीं भ्रमंती, वारली, ठाकूर, कातकरी, कोळी इत्यादि वन्य वा आदिवासी जमातिविषयींचें त्यांचे प्रबंध मान्यतेस पावलेले आहेत. डॉ. घुर्ये यांचें 'Caste and Class in India' या नांवाचें पुस्तक (सन १९५७) हिंदु जातिसंस्थेवर प्रमाणभूत मानलें जातें. यांचींच 'The Aborigines– 'So–Called' and their Future (सन १९३४), The Mahadeo Kolis (सन १९५७) हींहि पुस्तकें यांच संदर्भांत उल्लेख करण्याजोगीं आहेत. Thakurs and Ethnic Study हें एल्. एन्. चाफेकर यांचें पुस्तक सन १९४९, The Katkaris हें ए. एन. वेलिंग यांचें पुस्तक सन १९३७, 'The warlis हें के. जे. सावे यांचें पुस्तक सन १९४५, अशा आणखी जातिविषयक अभ्यासाचीं उदाहरणें देतां येण्यासारखीं आहेत. या जातिविषयक अभ्यासाची एक दिशा म्हणजे मराठी लोककथांचा, लोकगीतांचा अभ्यास वाढविणें ही होय. महाराष्ट्र सरकारनें या बाबतींत डॉ. सरोजिनी बाबर यांच्या नेतृत्वाखालीं एक स्वतंत्र शाखाच निर्माण केलेली आहे. महाराष्ट्रांत जे पुढारलेले वर्ग आहेत व जे इतर सर्वसामान्य वा मागासलेले वर्ण आहेत, त्या सर्वांचा समाजशास्त्रीय

वा मानववंशशास्त्रीय अभ्यास कर्वे-दांडेकर यांनीं सन १९५१मध्यें 'Anthropometric measurements of Maharashtra' या नांवानें प्रसिद्ध केलेला आहे. डॉ. इरावती कर्वे यांनीं याचा संक्षेपानें उपयोग आपल्या 'मराठी लोकांची संस्कृति' या सर्वोत्तम मराठी पुस्तकांत केलेला आहे. मानवी वंशांचें वर्गीकरण कोणत्या तत्त्वावर करतां येईल याबद्दल समाजशास्त्रज्ञांत निरनिराळीं मतें आहेत. माणसाचा रंग, त्याची उंची, त्याच्या अवयवांचें प्रमाण, केंसांची ठेवण, डोक्याची आकृति, त्याची मापें, नाकाची लांबीरुंदी, चेहऱ्याचा आकार, डोळ्यांची ठेवण वा रंगपद्धति इत्यादि विविध साधनांचा अभ्यास करून वांशिक संबंध ठरविले जातात. या सर्वांच्या साह्यानें प्रथमतः माणूस जातीचे तीन वर्ग पडलेले दिसतात. नीग्रोसदृश, मोंगोलसदृश, युरोपीयसदृश हे तीन वर्ग होत.

महाराष्ट्रांतील प्रमुख जाती व कांहीं मागासलेल्या आदिवासी जाती यांतील सुमारें पन्नास जातींचीं मापें घेऊन, त्यांचे जातवारी गट पाडून कर्वे–दांडेकर यांनीं आपला अभ्यास प्रसिद्ध केला आहे. त्यांनीं एकंदर ३०५४ माणसांचीं मापें घेतलीं. या लोकांची जातवारी व देशवारी विभागणी अशी आहे.

वऱ्हाड व मध्यप्रांतः– कुणबी, (तिरोळे, धनोजे, माना, खैरे) मराठा ब्राह्मण, गोवारी, कोरकू, हळबी कोष्टी, पोवार, बावने, महार, कोह्याळीं, गोंड, ढीवर व कोलम.

खानदेशः– ब्राह्मण, वंजारी, लेवा, गुजर भिल्ल (मावची, तडवी) अहिर सोनार बारी, मराठा.

देश– मराठा, ब्राह्मण, फुलमाळी, महार, कोळीं, चांभार, तेली, मांग, शिंपी, साळीं, न्हावी, परीट, गुरव, बुरूड, आंध, सोनार, भावसार, धनगर (हाटकर व खुटेकर)

कोंकणः– मराठा, वैश्यवाणी, भंडारी, ब्राह्मण, सोनकोळी, पाठारे प्रभु, कायस्थ प्रभु, दैवज्ञ सोनार, त्वष्टा कासार, पाठारे क्षत्रिय, खत्री, सोमवंशी वाडवळ, आगरी, ठाकूर, वारली, मल्हार कोळीं.

यांतील लोकांच्या डोक्यांचीं, नाकांचीं मापें घेऊन कांहीं निष्कर्ष काढण्यांत आले आहेत. डोक्यांच्या मापांवरून पुढील वर्ग पडलेले दिसतात.

अति लहान डोकींः– घेर ५१८-५२५ मिलिमीटर. भिल्ल, बावने महार, आंध, माना, ठाकूर, खुटेकर धनगर, मल्हार–कोळी, परीट, वारली.

लहान डोकींः– घेर ५२६–५३२ मिलिमीटर. आगरी, खैरे कुणबी, कोलाम, कोळी, कोरकू, कोहाली, हाळबी, गोंड, गोवारी, तेली, ढीवर, चांभार, महार, मांग, गुरव, बारी, न्हावी, इतर सोनार, शिंपी, साळी, वंजारी, हाटकर धनगर, भावसार व कांहीं मराठे.

मध्य डोकींः– घेर ५३२–५३९–तिरोळे, बहुसंख्य मराठे, गुजर, धनोजे

पोवार, कायस्थ प्रभु, पाठारे क्षत्रिय, वाडवळ, लेव फुल्माळी, चरक, ब्राह्मण, बुरुड , देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण.

मोठीं डोकीः– घेर ५३९–५४६–भंडारी, वैश्यवाणी, दैवज्ञ सोनार, सोनकोळी हळबी, कोष्टी, खत्री, त्वष्टा कासार, पाठारे, प्रभु, कऱ्हाडे, चित्तपावन, सारस्वत.

या यादीचा सारांश असा कीं पश्चिमेकडील सर्व वन्य जमाती म्हणजे वारली मल्हार कोळी, सर्व भिल्ल व ठाकूर पहिल्या गटांत येतात. आंधांचे व मान्यांचें स्थान आदिवासींच्या फार जवळ आहे. बावने महारांतहि आदिवासांचींचें मिश्रण असावें असें दिसते. दुसऱ्या गटांत शेतकऱ्यांतील कमी समजल्या गेलेल्या जाती व पूर्वेकडील गोंड, गोवारी, हळबी, कोलाम, कोरकू वगैरे वन्य जमाती, अस्पृश्य, महार, मांग, चांभार या बलुतेदार जाती, न्हावी, गुरव, शिंपी, साळी, भावसार या जाती, वंजारी, हटकर–धनगर या जाती येतात. तिसऱ्या गटांत प्रमुख शेतकरी, माळी, मराठे, तिरोळे, गुजर, धनोजे, पोवार, लेवा, फुल्माळी, वाडवळ, कायस्थ प्रभु, पाठारे क्षत्रिय, कांहीं ब्राह्मण या जाती येतात.[१]

डॉ. इरावती कर्वे यांनीं आपल्या ' मराठी लोकांची संस्कृति ' या अप्रतिम पुस्तकांत मराठी लोकांचीं मापेंच दिलीं आहेत असे नव्हे तर त्यावरून सिद्ध होणारे निष्कर्ष देऊन कांहीं प्रमुख जातींची माहितीहि त्यांनीं नव्यानें दिली आहे. राजवाडे यांनीं रानटी वा आदिवासी लोकांच्या इतिहासाचा वा पूर्वपीठिकेचा धागा जोडण्याचा प्रयत्न केला आहे तर डॉ. कर्वे यांनीं त्यांचें स्वरूप वर्णन केलें आहे. आंध, कोळी, गोंड, ठाकूर, धनगर, प्रभू, भिल्ल, मांग, महार, वारली, सोनकोळी इत्यादि जातींचें संक्षिप्त वर्णन त्यांच्या चालीरीतीसहित येथें आपणांस मिळेल. यांच्यापैकीं कांहींच्या जीवनावरील स्वतंत्र अभ्यासहि आज समाजशास्त्रीय दृष्टिकोणांतून होऊं लागले आहेत.

---

१. डॉ. इरावती कर्वे, मराठी लोकांची संस्कृति : पृष्ठ १४७ सन १९५१

१३ : राजवाड्यांचें समाज-चिंतन : कांहीं समस्या

(अ) कर्तृत्वाची निपज :—

महाराष्ट्रांतील बुद्धिमान, प्रतिभावान व कर्त्या लोकांची मोजदाद राजवाड्यांनीं केली आहे ती कशासाठी? राजवाडे यांनीं या महत्त्वाच्या लेखांत आपला हेतु स्पष्ट केला आहे. राजवाडे यांच्या निवडीसंबंधीं व प्रत्येकाच्या गुणवर्णनासंबंधीं अनेकांचे मतभेद होतील; पण ही अशी प्रतिभावंत व बुद्धिवंत यांची मोजदाद करण्यामागचा त्यांचा हेतु सर्वांना मान्य होण्याजोगा आहे. राजवाडे यांच्या मतें, 'कोणत्याहि देशाची रया त्यांतील बुद्धिमान व प्रतिभावन माणसांवरती असते.,' आणि याच हेतूनें समाजाच्या प्रगतीस ज्यांचें सामर्थ्य कारणीभूत झालें अशा बुद्धिमान, कतृत्ववान, प्रतिभाशाली व्यक्ती किती झाल्या यांचें परिगणन राजवाडे यांनीं केलें आहे. कोणास बुद्धिमान म्हणावयाचें, कोणास प्रतिभावान म्हणावयाचें याचा राजवाडे यांनीं केलेला विचार अगदीं शास्त्रशुद्ध नसला तरी स्थूल फरक सुचविणारा निश्चित आहे.

राजवाडे यांच्या मतें "भौतिक किंवा आत्मिक सृष्टींत शास्त्रीय शोध करून ज्या व्यक्ति समाजाचें हित करतात, किंवा समाजांतील कोट्यावधी व्यक्तींचें सुयंत्रण करून समाजाला पूर्ण पदाला नेण्याचा प्रयत्न करतात, किंवा आपल्या साधुचरितानें समाजांतील सामान्य लोकांना नीतीचें, वर्तणीकीचें व धर्माचें श्लाघ्य वळण घालून देतात; किंवा श्रेष्ठ धैर्यानें, दूर दृष्टीनें व करामतीनें समाजाचें आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक शत्रूंपासून रक्षण करून त्याचें संगोपन, संवर्धन व प्रगति साधतात; त्या पुढारी, बुद्धिमान व प्रतिभावान व्यक्तींना कतृत्ववान ही संज्ञा लावण्याचा प्रघात आहे"[1] अशी ऐसपैस व थोडी अघळपघळ सोय करूनच राजवाडे यांनीं कर्त्या लोकांची मोजदाद केलेली आहे. पुढे या मोठ्या यादींतून गुणवत्ता, संशोधन व कर्तृत्व या दृष्टीनें अधिक चाळणी करतांना राजवाडे यांनीं बुद्धिमान व प्रतिभावान असा सूक्ष्म भेद कर्त्या लोकांचा केलेला आहे. राजवाडे यांच्या मतें प्रतिभावान हा पहिल्या दर्जाचा तर बुद्धिमान हा दुय्यम दर्जाचा. बुद्धिमान प्रायः संग्राहक असतात; यांना सृष्टीचीं गुह्यें सहसा दिसतच नाहींत; पण प्रतिभावंतांच्या बुद्धींत अशीं दुर्भेद्य, दुर्गम गुह्यें जाणून घेण्याची, त्यांवर हल्ला करून तीं हस्तगत करण्याची अंतःशक्ति असते. प्रतिभावंत हीं गुह्यें तपासण्यासाठीं सर्वस्वाची आहुति देण्यास तयार असतो; परंतु नुसता बुद्धिमान असें साहस करूं

---

१. राजवाडे लेखसंग्रह : भाग ३. पृष्ठ १७१

शकत नाहीं. तो यासंबंधीं दीर्घकाळ चर्चा करीत राहील; पण बेभान होऊन उडी घालणारा बुद्धिवंत असूनहि प्रतिभेचें देणें त्याला लाभलेलें असतें. प्रतिभावंत नवें रहस्य नित्य शोधून काढतात व बुद्धिवंत त्याचा व्यावहारिक उपयोग करण्यांत गुंतलेले असतात. असा कांहींसा स्थूल फरक राजवाडे यांनीं दाखवून महाराष्ट्रांतील कर्त्या प्रतिभावंतांची व बुद्धिवंतांची मोजदाद केलेली आहे; आणि अशी मोजदाद विविध चाळणींतून स्थिर झाल्यावर ग्रेट ब्रिटनमध्यें फ्रान्सिस गाल्टननें जी मोजदाद सन १८६८ मध्यें केली तिच्याशी ते तुलना करितात; व ग्रेट ब्रिटनमध्यें एक लाखांत एक कर्ता मनुष्य व महाराष्ट्रांत आठ लाखांत एक कर्ता मनुष्य हें प्रमाण पाहून राजवाडे व्यथित होतात. याचा अर्थच असा कीं पुढारलेल्या देशांच्या मानानें आपण कर्तृत्वाच्या विविध क्षेत्रांत मागें आहोंत. बुद्धिमान व कर्त्या जगांत आपली किंमत नाहीं हा विचार राजवाडे यांना जिव्हारीं लागणारा आहे. सगळ्या भरत खंडाचे राज्य करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारे आपण कर्तृत्वशून्य आहोंत ही भावना राष्ट्रविकासाच्या दृष्टीनें त्यांना बोंचत होती.

शिवाय महत्त्वाची बाब अशी कीं हें परिगणन व निरीक्षण त्यांनीं नुसतें संख्येच्या दृष्टीनें केलें नाहीं. व्यवसायबाहुल्याचा वा कर्तृत्वाच्या विविध क्षेत्रांचा विचार करितां आपलें दारिद्र्य तर त्यांना फारच चिंताजनक वाटलें. संख्याशास्त्र, शुद्ध, प्रयुक्त गणित, निर्जीव रसायनशास्त्र, सजीव रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, इंद्रियविज्ञान, प्राणिशास्त्र, मानसशास्त्र, ज्योतिषशास्त्र, भूगर्भशास्त्र, समाज-शास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, वेदान्त वा आत्मविद्या, धर्मशास्त्र, ईश्वरशास्त्र, सर्वशास्त्रसंकलन, मानववंशशास्त्र, सुजनिशास्त्र, युद्धशास्त्र, शिक्षणशास्त्र, मानव-संस्थाशास्त्र अशीं शेकडों नवविद्यांच्या शाखा व उपशाखा पश्चिमेकडे पल्लवित झाल्या, पण इथे त्यांचा अंकुरहि नसावा याबद्दल राजवाडे यांना कमालीचा उबग आलेला दिसतो. हें असें कां व्हावें ? एके काळीं सर्व शास्त्रांत प्रगत असणारा व साऱ्या देशभर साम्राज्य पसरवूं पाहणारा समाज एवढा कर्तृत्वहीन कां झाला ? मानवी कर्तृत्वाचें हें अफाट क्षेत्र आपणापुरतें वांझ कां उरूं पाहत आहे ? या प्रश्नांचीं उत्तरें, कारणें व उपाय यांच्या सहित राजवाडे देणार होते, परंतु त्यांच्या हातून हें महत्त्वाचें कार्य पार पडलेलें दिसत नाहीं.

आजच्या लोकशाहीच्या काळांत मानवी कर्तृत्वाचा विकास सर्व अंगांनीं हें व्हावया पाहिजे. विविध क्षेत्रांत कर्ता लोकांची रांगच्या रांग उभी असावयास प्रगत व सुस्थिर समाजाचें चित्र आपणांकडे दिसतें काय ? इथें प्रत्येक क्षेत्रांत मानवी कर्तृत्व उणें पडत आहे, थिटें होत आहे, चांगल्या माणसांची वाण आहे हाच अनुभव सार्वत्रिक आहे. मागच्या पिढीपेक्षां येणारी पिढी सर्व बाजूंनीं सरस व खंबीर आहे अशी खात्री इथें कुणालाहि नाहीं. गेल्या पिढींत कर्तृत्वाचे उंच मनोरे सीमित क्षेत्रांत उभे राहिले, त्यांची किंमत अजमावण्याची बौद्धिक हिंमत

आज फार थोड्या लोकांना असल्याचें बोललें जातें. सर्वत्र खुजेपणा, बुटकेपणा कमकुवतपणा दिसत आहे. या दृष्टीनें समाजास आपल्या कर्तृत्वानें सावध करणारें बरोबर नेणारे प्रतिभावान् बुद्धिमान् नेतृत्व तरीं कसें केव्हां निर्माण होतें ? हा एक महत्त्वाचा प्रश्न आज तर विशेष योग्यतेचा आहे.

प्रतिभावंत, बुद्धिवंत कर्ते लोक समाज पुढें नेतात कीं समाजांतील विशिष्ट जाणीव वा परिस्थिति अशा कर्त्या लोकांना जन्म देते असा मुळांतच प्रश्न उपस्थित होतो व मग परस्पर विरोधी विचारांचें वादळ उभें राहतें. "राजा कालस्य कारणम्' हा महाभारतकारांचा निर्णय नव्या परिस्थितींत व शास्त्रीय विचार-परंपरेंत सर्वांना मान्य होण्यासारखा नाहीं. मग मानवी प्रतिभा, बुद्धिप्रभा, कर्तृत्वपरंपरा यांचा संभव तरी कोणत्या परिस्थितींत होतो ? मानवी कर्तृत्व कुठें निपजतें ? कसें निपजतें ? कोणत्या परिस्थितींत मानवी कर्तृत्वाचा फुलोरा तरारून प्रकटलेला दिसतो ? या प्रश्नांचीं उत्तरें आज शास्त्रज्ञ शोधण्याच्या खट-पटींत आहेत. आईबापांच्या रक्तांत म्हणजे आनुवंशिक गुणांत हें प्रतिभेच्या कर्तृत्वाचें बीज असतें काय ? संस्कारसंपन्न घर, सुशिक्षित आईबाप यांचा वाटा किती ? भोंवतींचा प्रगत समाज व उत्तम शिक्षण पद्धती यांची जबाबदारी किती ? समाजाच्या आर्थिक विषमतेंत किती ? दडपल्या गेलेल्या कामभावनेंत किती ? देणें ईश्वराचें किती ? मानवी प्रयत्नांचें किती ? ऐतिहासिक गरज म्हणून कर्तृत्ववान माणसें निर्माण होतात कीं कर्तृत्ववान माणसें निर्माण झाल्यावर मग इतिहास घडतो ?

खिस्तपूर्व पांचव्या सहाव्या शतकांतच भूमध्य समुद्रावरील सॅमॉस व कॉस या बेटांवर मानवी प्रतिभेचें चलनवलन एकाएकी कां निर्माण झालें ? थेल्स, पायथॉगोरस, झीनो, अनॅक्झीमँडर, अर्कॉटस, हिपॉक्रेटस, प्लेटो, युडॉक्सस, अरिस्टॉटल अनक्झॅगोरस, थिऑफ्रॅस्टस ही प्रतिभावंतांची परंपरा एकाएकी याच काळांत व याच ठिकाणीं कां उभी राहिली ? खि. पू. चौथ्या शतकांत ही एकदम नाश कां पावली वा तिचें अद्‌भुतरम्य असें वेष पालटून नाईलच्या मुखावर अलेक्झां-ड्रिया येथें स्थलांतर कां झालें ? पुनः येथें युक्लिड, अर्किमिडीज, हिरो, अपोलो-निअस, अरिस्टार्कस, इरॅटॉस्थिनीज, हिपार्कस, टॅलेमी, थियॉन, हिपाशिया ही तेजस्वी परंपरा याच काळांत याच क्षेत्रांत कां निर्माण झाली ? या प्रतिभावंतांनीं वा बुद्धिमंतांनीं आपल्या कर्तृत्वानें मानवी जीवित उजळविलें ? कीं उजळत राहणाऱ्या मानवी जीवितानें या प्रतिभावंतांना जन्म दिला ? पुनः सुमारें दहा शतकें सर्व युरोपभर अंधकार कां झाला ? कोणत्याहि स्थूल कारणमीमांसेनें या प्रश्नांचीं उत्तरें शोधणें भोंगळपणाचें वा अशास्त्रीय वृत्तीचें लक्षण होईल. या हजार वर्षांच्या काळांत काय ऐतिहासिक गरज नव्हती ? या दीर्घ काळांत मानवी रक्तांतील गुणधर्म वा आनुवंशिकता नष्ट झाली होती ? हीं दहाशतकें कर्तृत्वानें वांझ कां

होतीं? ख्रिश्चन आणि इस्लाम धर्म व पुढें आंधळे कर्मकांड यांच्याशिवाय कसलेंहि नवें स्फुरण मानवी प्रतिभेस कां स्फुरलें नाहीं? एवढ्या मोठ्या विस्तृत कालखंडांत मानवी प्रतिभा सुप्त कशी व कां राहिली? पुनः तेराव्याचौदाव्या शतकां-पासून, रॉजर बेकनपासून असें काय नेमकें कारण म्हणून हमखास सांगतां येण्या-सारखें घडलें कीं ज्यांतून प्रतिभावंत संशोधकांची एक अविच्छिन्न परंपरा उभी राहिली? कोपर्निकस, गॅलिलिओ, गिलबर्ट, व्हिंची, लुवेनहॉक, विल्यम हार्वे, न्यूटन, टॉरिचेली, रॉबर्ट बॉईल, प्रीस्टले, लाव्हासीए, डाल्टन, डेव्ही, बेंजामिन फ्रँकलिन, फॅरडे, लॅमार्क, डार्विन, पाश्चर, जेन्नर ही अद्भुत नामावलि कोणत्या पार्श्वभूमीवर उभी राहिली?

लुवेनहॉकनें दुर्बिणीच्या काचा कां घासल्या? गॅलिलिओनें अंतरिक्ष कां न्याहाळलें? न्यूटननें प्रिन्सिपिया कां व कसा लिहिला? बीगल जहाजावर डार्विन कां चढला? पाश्चरला सूक्ष्म जंतूंचें ज्ञान कसें झालें? पाण्यांत गाडलेल्या बर्फाच्या डोंगराप्रमाणें एक प्रचंड विभाग मानवी मनाचा अदृश्य व सर्वप्रेरक आहे असें फ्राईडला कां वाटलें? कार्ल मार्क्सनें 'दास कॅपिटल' कां लिहिलें? या प्रश्नांचीं उत्तरें वरवर दिसतात तशीं सोपीं नाहींत. कारण तशीच परिस्थिति निर्माण झाल्यास ते ते परिणाम घडल्याचें दिसत नाहीं तोंपर्यंत या प्रश्नांचीं उत्तरें शास्त्रहि देऊं शकत नाहीं असेंच म्हणावें लागेल. रक्तांतील उपजत गुणांमुळें न्यूटनची अद्भुत प्रतिभाशक्ति काम करीत होती कीं त्यास मिळालेलें शिक्षण, भोवतींची परिस्थिति तिच्यामागें होती? पृथ्वीच्या आरंभापासून झाडांवरील फळें खालींच पडत होतीं व किस्तवाचा शोध लागल्यापासून चहाच्या किटलीचें झांकण उडतच होतें; पण गुरुत्वाकर्षणाचा नियम समजण्यास व वाफेची शक्ति ध्यानांत येण्यास न्यूटनच कां? जेम्स वॅटच कां? व हे यांच काळांत कां? केवळ आनु-वंशिकता म्हणावी तर शिक्षणाभावी व परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें कित्येक कोंवळें प्रतिभा-अंकुर मोडून गेलेले दिसतात, बरें नुसती परिस्थिति वा शिक्षणपद्धति म्हणून चालवें तर न्यूटनच्या वर्गांतील सर्व विद्यार्थ्यांचीं नांवें इतिहासांत नमूद व्हावयास हवींत; व हीं याच काळांत कां याचेंहि उत्तर सांपडावयास हवें. पण असें गणितानें उत्तर आजहि मिळण्यासारखें नाहीं. भोंगळ स्वरूपांत उत्तर मिळालें तरी त्याला अप-वाद भरपूर मिळतात. शिवाय हें प्रतिभेचें कार्य जें सृष्टिरहस्य हुडकून काढण्याचें तें व्यक्त होण्याची प्रक्रिया नेमकी कोणती? तें अकस्मात लख्खकन वीज चमकावी तसें ध्यानीं येतें कीं हळुहळू प्रयत्न करून, कष्ट करून हस्तगत होतें? तें स्वयंसिद्ध प्रयत्नानें होतें, कीं गुरुमुखांतून येतें? तें स्वप्नांतून जाणवतें कीं स्पर्शांतून लक्षांत येतें? प्रतिभेचा साक्षात्कार नेमका कसा होतो? याहि प्रश्नाचीं उत्तरें शोधणें महत्त्वाचें असलें तरी येथें त्याचा प्रपंच विस्तारानें करणें अगत्याचें नाहीं.

राजवाडे यांना राष्ट्रविकासासाठीं, समाजप्रगतीसाठीं जी प्रतिभा, जी

बुद्धिमत्ता हवी तिचें संशोधन आजकाल मोठ्या प्रमाणावर होत आहे. सामान्यतः प्रतिभा म्हणजे नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा; म्हणजे जीनिअस (Genius). ही मानसिक शक्ति म्हणजे कोशगत अर्थाप्रमाणें very great and unusual capacity of the mind or immagination; power to invent or create. म्हणजे नवनिर्माण करण्याची, असाधारण अशी ही अलौकिक शक्ति होय. The highest range of mental ability, either general or in respect of special capacities of a creative order असें या शक्तीचें शास्त्रशुद्ध वर्णन केलें जातें.[1] याखेरीज पुष्कळ खालच्या पातळीवर असणारी बुद्धि (इंटेलिजन्स) होय. राजवाडे यांनीं हा फरक बरोबर केलेला आहे. बुद्धि किंवा इंटेलिजन्स म्हणजे प्रतिभावंतांनीं शोधलेल्या रहस्यांची ओळख करून घेण्याची पात्रता; the power of seeing, learning, understanding इतकेंच तिचें स्वरूप. अर्थात्, हेंहि देणें कमी महत्त्वाचें नसलें तरी प्रतिभेच्यापेक्षां कमीच यांत कसलाहि संशय नाहीं.

या नव्या विज्ञानयुगांत, स्पर्धायुगांत कोणत्या देशांत किती माणसे प्रतिभावान् झाली, किती माणसे बुद्धिमान झाली, त्यांचीं कर्तृत्वाचीं क्षेत्रें कोणतीं, आंतरराष्ट्रीय स्पर्धांत कुणास किती पदकें मिळतात, नोबेल पारितोषिकें कोणत्या देशास जास्त मिळालीं, ही प्रतिभाशक्ति वा बुद्धिमत्ता कशी निर्माण होते, कर्तृत्व उदयास कसें येतें, याची चिकित्सा आज सर्वत्र पुढारी, शिक्षणशास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, जीवशास्त्रज्ञ करीत आहेत. मानवी बुद्धीचें मापन करणें, तिचा क्रम ठरवून बुध्यंक निश्चित करणें, विशेष प्रकारची आवड पाहून बुद्धीचें वळण निश्चित करणें, प्रतिभाशक्तीचें स्वरूप अजमावणें यांत शास्त्रज्ञ आज गढून गेले आहेत. नाना कसोट्या, नाना चांचण्या यासाठीं तयार होत आहेत. मुख्य वादाचा मुद्दा अजूनहि आनुवंशिकता (heredity) कीं परिस्थिति (environment) हाच आहे. आनुवंशिक गुण बदलतां येणार नाहींत, पण परिस्थिति, शिक्षणपद्धति सुधारतां येईल असाहि एक विचार आहे. बीने (Binet), गॉडर्ड, टर्मन, स्टँडफर्ड, विल्यम स्टर्न, पिंटनर, पॅटर्सन, स्परमन इत्यादि शास्त्रज्ञांनीं बुद्धिमापनाचे परिश्रम केले आहेत. अलौकिक बुद्धीची परीक्षाहि करण्याचा उद्योग सुरू आहे. राजवाडे यांनीं ज्या फ्रान्सिस गाल्टनचा उल्लेख केला आहे त्यानें सन १८६९ मध्यें मानवी प्रतिभेचा, जीनिअसचा परिश्रमपूर्वक अभ्यास प्रथम केला. प्रतिभा ही मुख्यतः आनुवंशिक असते असा त्याचा निष्कर्ष आहे. पुढें अनेकांनीं विशेषतः कँडॉलनें परिस्थितीचेंहि महत्त्व विशद करून सांगितलें. सन १९०४ मध्यें प्रसिद्ध इंग्लिश तत्त्वज्ञ हॅवलॉक इलिसनें अनेक प्रतिभावंतांची तपासणी करून पुढारलेल्या व्यावसायिकांतून प्रतिभावंत निर्माण होतात असा सिद्धान्त मांडला. अमेरिकन प्रतिभावंतांचा जो अभ्यास जेम्स कॅटेल

1. James Drever; A Dictionary of Psychology:

यानें केला आहे त्यांतहि परिस्थिति व शिक्षणपद्धति यांना फार मोठें स्थान दिलें आहे. सिग्मंड फ्रॉईड, आल्फ्रेड अॅडलर यांची या विषयींचीं मतें सर्वप्रसिद्ध आहेत. इटालियन शास्त्रज्ञ लॉंब्रॉसॉ यानें प्रतिभावंताच्या मानसिक शक्तीस वेडाच्या लहरी-जवळ नेऊन बसविलें. अर्न्स्ट क्रेस्टशॅमर (Ernst Kretschmer) व विल्यम लॅंग-इचबॉम (Lange Eichbaum) यांचे अलीकडील अभ्यास प्रतिभा व वेडाची लहर यांचें साम्य दर्शवीत असलें तरी शेक्स्पीअर, बॅच, डार्विन, आईन्स्टीन या प्रतिभावंतांचीं उदाहरणें या तत्त्वाच्या विरुद्ध जाणारीं आहेत. टर्मनची साह्यकर्ती मिसेस डब्ल्यू. आर. मिल्स (Miles) हिनें ३०० बुद्धिमान पुरुषांची तपासणी करून त्यांच्या बुद्धिमापनाचा प्रयत्न केला आहे. जॉन स्टुअर्ट मिल, गटे, मेकॉले, पास्कल, लायबनिझ, गाल्टन यांचे बुध्यंक १८० ते २०० पर्यंत असल्याचें तिला आढळून आलें आहे. लहान वयांत अचाट शोध वा कर्तृत्व निर्माण करण्याचा विक्रम गाजविणारीं माणसेंहि आहेत. पण या सर्वांची पार्श्वभूमि वा कारणमीमांसा मात्र कोणासहि निश्चयानें सांगतां आलेली नाहीं. स्टॅनफोर्ड हॅटफील्ड यानें 'दि इनव्हेंटर अॅंड हिज वर्ल्ड' या पुस्तकांत मानवी प्रतिभेच्या संशोधनाचा अनेक उदाहरणें देऊन विचार केलेला आहे

सत्तास्पर्धा व ऐहिकाची वाढ यांच्या नादांत हुकमी प्रतिभा वा बुद्धिमत्ता निर्माण करतां येईल कीं काय हाहि एक लोभस विचार माणसाच्या मनांत येत आहे. सुप्रजाजननशास्त्र (Eugenics) हें एक नवें शास्त्र तयार होत आहे. फ्रान्सिस गाल्टननें याचा पाया घातला. आज आपणांस हवे त्या प्रकारचे बैल, गाई, डुकरें, शर्यतीचे घोडे मिळू शकतात ना ? ही किमया माणसांत साधली तर ? या शास्त्रांत अनुवंशाला, रक्ताला फार महत्त्व आहे. बुद्धिमंतांचीं लग्नें बुद्धिवानांशीं व्हावींत हें येथें ओघानें येतें. कनिष्ठांची प्रजा कमी व्हावी हेंहि एक सूत्र यांत आहे. एरव्हीचा अनुभव नेमका उलटा असतो. शिक्षणाचा काळ, आवडनिवड, सांस्कृतिक प्रेरणा, जबाबदारीची जाणीव, स्त्रीचें स्वातंत्र्य इत्यादि विविध कारणांनीं बुद्धिमंतांची प्रजा थोडी असते, व इतरेजनांची संख्या बेसुमार वाढते. महायुद्धा-सारख्या आपत्तींत धडाडीनें मृत्युमुखीं पडतात ते बुद्धिमान व धडधाकट आणि प्रजो-त्पादनासाठीं जगतात ते दुर्बळ, मंद बुद्धीचे व सामान्य लोक. यांच्यांतील लग्न-बंधनेंहि शिथिल होतात व त्याचा परिणाम संततीवर होतो; अनैतिकता वाढते; व निकृष्ट प्रजेची निपज मोठ्या प्रमाणावर सुरू होते. स्त्रियांचें पुरुषीकरण व पुरुषांचें स्त्रीकरण हेंहि या शास्त्राला मान्य नाहीं. या शास्त्रावर कडाडून हल्ला करणारेहि शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ आहेत. यांतील रक्ताच्या गुणधर्मांचें महत्त्व या नव्या काळांत मान्य होणें कठिण आहे. शिवाय या शास्त्रांतील भयानक यांत्रिकता जी जनावरांच्या बाबतींत आज शक्य आहे ती माणसांत येईल कीं काय हीहि एक धास्ती विचारवंतांना आहे.

मानवी प्रतिभा व बुद्धिमत्ता यांचा फार सूक्ष्म अभ्यास अगदीं अलीकडे म्हणजे याच वर्षी प्रसिद्ध झाला आहे तो ऑर्थर कोस्लर यांच्या ‘ दि ॲक्ट ऑफ् क्रिएशन ’ या नव्या ग्रंथामध्यें. काव्यसाहित्य, कला, शास्त्रीय संशोधन इत्यादि क्षेत्रांत मानवी प्रतिभेचा व्यापार कसा असतो याचें फार मार्मिक विवेचन अनेक प्रतिभावंतांचीं उदाहरणें घेऊन ग्रंथकारांनीं केलें आहे. देणें ईश्वराचें या सूत्रापासून परिस्थिति, शिक्षणप्रणाली, घरचें वातावरण एथपर्यंत सर्व प्रश्नांची चर्चा या ग्रंथांत आहे. इतकेंच नव्हे तर प्रतिभावंताचें मन कसें असतें, त्याला अलौकिक कसें दिसतें वा स्फुरतें, सृष्टीचीं गुपितें त्याच्या ध्यानांत कशीं येतात, एकदम विद्युल्लते-प्रमाणें प्रकाश पडतो कीं दीर्घ प्रयत्नानें हीं रहस्यें उलगडलीं जातात, योगायोगाचें, क्षणिक वृत्तीचें महत्त्व यांत किती, अशा अनेक प्रश्नांची चर्चा थोर संशोधकांचीं चरित्रें, आत्मवृत्तें, पत्रें यांचा आधार घेऊन येथें करण्यांत आलेली आहे. प्लेटोपासून गाल्टनपर्यंत जें सुप्रजाजननशास्त्राचें महत्त्व गातात त्यांना तितकेंच ठणकावून उत्तर देणारा व अमेरिकन वर्तनवादाचा पुरस्कार करणारा मानसशास्त्रज्ञ वॅटसन याचेंहि दर्शन येथें आहे. ‘ चांगली निरोगी अशीं दहाबारा मुलें मला द्या; मला स्वतःची अशी परिस्थिति निर्माण करू द्यात, मग तुम्हांस हवा तसा मनुष्य यांतून घडवून मी देईन. कलावंत, शास्त्रज्ञ, कारखानदार, सैनिक, नाविक, भिकारी कोण हवा तें सांगा– ’ असें प्रतिज्ञापूर्वक सांगणारा वॅटसन याचा परि-स्थितीवर, शिक्षणप्रणालीवर केवढा विश्वास होता हें स्पष्ट होण्यासारखें आहे. सुयोग्य बीज व अनुकूल भूमि आणि खतपाणी असाच निष्कर्ष आजच्या संशोधनाचा आहे. परिस्थिति, शिक्षणपद्धति आपण निर्माण करू शकतों; आपल्या समाजाचें वा राष्ट्राचें ध्येय निश्चित झाल्यावर किंवा नवीन परिस्थितींतील बदल ध्यानांत आल्यावर नव्या नव्या समस्यांना तोंड देणारी शिक्षण प्रणाली आपणांस बुद्धिमंत व प्रतिभावंत यांच्यावरहि संस्कार करणारी निर्माण करावी लागेल. एखादा लिओनार्डो व्हिन्स्की वा एखादा फॅरडे, ज्यास फार मोठी आनुवंशिकताहि नाहीं वा ज्यास शिक्षणहि फारसें मिळालें नाहीं त्याच्या प्रतिभेचें वा बुद्धिमत्तेचें कर्तृत्व अजूनहि अगम्यच आहे. निसर्गाची एक विस्मयकारक लहर असेंच तिचें वर्णन करावें लागेल.

राष्ट्राच्या वा समाजाच्या उदयकालासाठीं कर्त्या लोकांची संख्या कशी वाढेल वा व्यवसायबाहुल्याच्या दृष्टीनें त्यांचें क्षेत्र कसें विस्तृत होईल याची चिंता राजवाडे यांना होती. प्रतिभावंतांची निपज तरी कशी होते, कां थांबते याची चर्चा करावी असा त्यांचा संकल्प होता. प्रतिभावंतांच्या मनोव्यापारांचें सूक्ष्म वर्णन करण्यास वा नवनिर्मितीच्या वेळची परिस्थिति विस्तारानें निवेदन करण्या-साठीं येथें अवसर नसला तरी हें सांगावयास हवें कीं प्रतिभावंत जगांत अगदीं नसलेलें शोधून काढतो असें नव्हे तर सुप्त असणारें उजेडांत आणतो; संबंध

जोडतो, स्पष्ट करतो. कार्यकारणभावाचें नातें स्पष्ट करतो. युगानुयुगें असणारे संबंध जे अव्यक्त होते ते प्रतिभावंत सुस्पष्टपणें लोकांपुढें मांडण्याचा प्रयत्न करतो. सामान्य लोकांना काचेंतून दिसतें, कवीला धोंड्यांतून दिसतें या केशवसुतांच्या वचनांतील भावार्थ हाच कीं प्रतिभावंतांची दृष्टि भेदक असते. ती वस्तूच्या आरपार जाऊन अंतरंग ओळखते, ग्रहगोलांचे वेध घेते, पडणाऱ्या फळाची गति मोजते, वाफेची शक्ति अजमावते, रोग व सूक्ष्म जंतु यांचा अव्यक्त संबंध शोधते. वस्तु व तेजस यांचा अभेद दर्शवून $E—Mc^2$ सारखें स्फोटक सूत्र शोधते, सुप्त व अव्यक्त असणाऱ्या रहस्याचा शोध घेणें हें प्रतिभेचें काम; हीच नवनिर्माणक्रिया. जाणत्यांचा वा संशोधकांचा आजचा निष्कर्ष हाच आहे. "The creative act is not an act of creation in the sense of the Old Testament. It does not create something out of Nothing; it uncovers, selects, re-shuffles, combines, synthesizes, already existing facts, ideas, faculties, skills"[१] ईश्वरी दया, दृष्टान्त, अलौकिकता, दिव्यत्व यांचा शास्त्रीय अर्थ हा असा आहे; आणि या प्रतिभाशक्तीची वा बुद्धिमत्तेची जोपासना कशी करतां येणें शक्य आहे हा आपणांपुढील अजूनहि प्रश्न आहे.

प्रतिभाशक्ति वा बुद्धिमत्ता यांची जोपासना विविध क्षेत्रांत व्हावी असा राजवाडे यांचा आग्रह आहे. एकारलेलें मानवी जीवित केव्हांहि हानिकारकच. राजवाडे यांनीं जी कर्त्या पुरुषांची यादी तयार केली आहे ती व्यवसायबाहुल्याच्या दृष्टीनें फारच थिटी आहे. अनेक क्षेत्रांतील संशोधनाकडे वा अभ्यासाकडे आपलें लक्षच गेलें नव्हतें. विशेषतः गेल्या हजार वर्षांत बराचसा तरवारीचा पराक्रम व भलेंबुरें अध्यात्म यांशिवाय सारी क्षेत्रें उजाड आहेत. खरें पाहतां भारतीय आर्य हे प्रयत्नशील व कर्तृत्ववान. गणित, रसायन, वैद्यक, खगोलविज्ञान इत्यादि शास्त्रांतील त्यांची प्राचीन तपस्या फार मोठी होती. भास्कराचार्य, आर्यभट्ट, वराहमिहिर, चरक, सुश्रुत, वाग्भट, नागार्जुन इत्यादींची परंपरा विविध शास्त्रांतील होती. येथील स्थापत्य व येथील कलाकुसर आश्चर्यकारक होती. पण बुद्धोत्तर काळांत जो ऱ्हास झाला तो पुढें कित्येक शतकें सावरला गेलाच नाहीं. इस्लामी आक्रमणांतहि मोठी वाताहत झाली. भारतीय तत्त्वज्ञान व अध्यात्म विकृत रूपांत लोकांपुढें उभें राहिलें. कर्मकांड, व्रतें–वैकल्यें, बाह्य धर्माचार यांची चलती झाली; आणि सारें मानवी जिणें आंबून, सुकून, आकसून गेलें. परकीयांच्या आक्रमणांस सतत बळी पडलें; व अर्वाचीनकाळांत या पराभवाची, दुःस्थितीची मीमांसा सर्वत्र

1. Arthur Koestler : The Act of Creation : पृष्ठ १२०; Hutchingson & Co. Ltd. London; 1664

होत राहिली. राजवाडे या मीमांसकांपैकीं प्रमुख होते; व आपण शास्त्रीय विषयांच्या अभ्यासांत मागें पडलों असा त्यांचा विश्वास दीर्घ अभ्यासानें व चिंतनानें बनला तो त्यांनीं आपल्या लेखांत व प्रस्तावनांत सतत सांगितला असल्याचें आपण पाहिलें आहेच.

आणि याच विचारापोटीं राजवाडे कधीं तळमळून विचारतांना दिसतात, "शिवकालीं औरंग्याच्या मिशा उपटणारे मराठी वीर मूठभर इंग्रजांपुढें भागूबाई-सारखे नमतात हा काय चमत्कार आहे? अवरंगझेबाचे वेळीं जे मराठे सहकार्य, उद्योग, शौर्य यांबद्दल परम प्रख्याती पावले होते, ते इंग्रजांपुढें विस्कळित, आळशी, भेकड कसें दिसूं लागले? येथें शास्त्रीबोवा म्हणतात कीं, मराठ्यांच्या अंगीं आळस वगैरे दुर्गुण कायमचेच खिळलेले आहेत, परंतु चवकस, चिकित्सक या प्रश्नांचें निराळें उत्तर देईल. तो १८१८ तल्या पळपुट्या व घाबरलेल्या मराठ्यांची कसून जबानी घेईल, आणि त्याला विचारील कीं, बाबा! तूं इतका भ्यालास कोणाला? इंग्रज नामक द्विपादाला कीं काय? आम्हांला खात्री आहे कीं, या प्रश्नाला मराठ्यांचें उत्तर असें येईल कीं, आम्ही ताम्रमुखांना भ्यालों नाहीं. त्यांच्या लांब पल्ल्यांच्या तोफांना व शास्त्राला भ्यालों. ह्या उत्तरांत १८१८ तील सर्व इतिहासांतील सार भरलेलें आहे. यूरोपच्या भौतिक शास्त्रांपुढें महाराष्ट्राला नमावें लागलें. दारूनें झिंगलेल्या, महिनापंधरवड्यानें स्नान करणाऱ्या, स्त्रियांचें पुनर्विवाह लावणाऱ्या व रानटी नाच करण्याऱ्या यूरोपानें मद्यनिवृत्त, शुचिर्भूत, पतिव्रतासंपन्न व संभावित महाराष्ट्राला कसें जिंकलें हें कोडें अन्यथा सोडविणें दुरापास्त आहे. खोटे दस्तऐवज बनविणाऱ्या व बेगमांच्या चोऱ्या करणाऱ्या हेस्टिंग्जपुढें पापभीरू व एकवचनी नाना फडणीस फिका कशानें पडला? लांब पल्ल्याच्या तोफा जवळ नसल्यानें, १८०३ त शिंदे होळकर वगैरेंचा पराभव इंग्रजांनीं कशाच्या बळावर केला? लांब पल्ल्यांच्या तोफांच्या बळावर. क्लाईव्हनें तुळोजी आंग्र्याला कशानें पाडला? पल्लेदार तोफांनीं. तात्पर्य, पल्लेदार हत्यारांच्या जोरावर सद्‌गुणी, एकजूट, व उद्योगी लोकांचा पराभव दुर्गुणी, रोगी, विभक्त व ऐदी लोकही करूं शकतात. पल्लेदार हत्यारांपुढें सर्व सद्‌गुण फिके पडतात. व नसतील ते दुर्गुण समाजांत प्रादुर्भूत होतात. विधवांशीं लग्न लावल्यानें किंवा दारू प्यायल्यानें किंवा गोमांस खाल्यानें किंवा आकाशाकडे डोळे मिटून प्रार्थना केल्यानें किंवा एकपत्नीव्रतानें किंवा वेदाध्ययनानें किंवा कुराण पढण्यानें किंवा पोकळ व्याख्यानांनीं स्वराज्य मिळत नसतें व हरतहि नसतें. बाजीराव भित्रा, पळपुटा, संशयी, देशबुडव्या व पाजी असून त्याच्या सेनानीजवळ जर पल्लेदार हत्यारें व तीं करण्याचीं साधनें असतीं तर तो स्वराज्य एकाएकीं गमावता ना आणि चुकून गफलतीनें गमावता तर ते क्षणमात्रांत परत मिळवल्याशिवाय राहता ना. तात्पर्य, राष्ट्रांचें स्वातंत्र्य व राष्ट्रांचें पारतंत्र्य पल्लेदार हत्यारांवर अवलंबून असतें. मराठ्यांचें स्वराज्य जाण्याचें

एकच एक कारण पल्लेदार हत्यारांचा अभाव हें होय."[1] मराठी राज्याची बाताहत, त्याची कारणमीमांसा व विविध क्षेत्रांतील आपल्या कर्तृत्वाचा अभाव या संबंधींची राजवाडे यांची मीमांसा ही अशी आहे. नव्या शास्त्रांची आपणांस ओळख होईल तर भौतिकावरची आपली निष्ठा वाढेल व व्यवसायबाहुल्याच्या दृष्टीनें जी उणीव आहे ती भरून निघून नाना क्षेत्रांत प्रतिभावान व बुद्धिमान माणसें दिसूं लागतील असा राजवाडे यांचा कयास आहे.

(आ) भौगोलिक परिस्थिति व मानवी कर्तृत्व

राजवाडे यांच्या सामाजिक चिंतनाचा विचार करतांना आणखी एक मुद्दा निसटून जाण्याची शक्यता आहे. तो म्हणजे मागें उल्लेखलेला अन्नसमृद्धि व अन्नसौलभ्य आणि आपली स्वभाववृत्ति यांचें नातें राजवाडे यांनीं दर्शविलें आहे त्यासंबंधींचा होय. महिकावतीच्या बखरीस प्रस्तावना लिहितांना राजवाडे यांनीं या परिस्थितीचा पुनः पुनः आग्रहानें विचार करून आपला सिद्धान्त प्रस्थापित केला आहे. आपल्या देशांत उद्‌भिज व प्राणिज संपत्ति ऊर्फ अन्न इतकें मुबलक व इतकें सुलभ आहे कीं येथें येऊन स्थायिक होणाऱ्या मानवपुत्रांस स्वतंत्र, मुक्तद्वारी, तुटक, स्वयंपूर्ण, उदासीन, काल्पनिक तत्त्वज्ञानांत रममाण होण्याची हौस असणारा होण्यास अधिक पसंत पडले. अन्नवैपुल्य व अन्न-सौलभ्य, म्हणजे भौगोलिक अनुकलतेमुळें येथील समाज वेदान्त, धर्म, भक्ति, संसार, सारस्वत, देवदेवता इत्यादि जंजाळांत वावरतांना दिसतो.

इतिहासमीमांसा करितांना राजवाड्यांनीं या भौगोलिक परिस्थितीकडे तितकेसें लक्ष दिलेलें नव्हतें. पण महिकावतीच्या बखरीस प्रस्तावना लिहितांना मात्र सन १९२४ मध्यें त्यांनीं येथील भूमि, तिचा सकसपणा, येथील हवामान, येथील नद्या यांमुळें निर्माण होणारें अन्न, व त्याची सुलभता यांचा समाजजीवना-वर कसा परिणाम होतो याचा चांगलाच विचार केलेला दिसतो. बरवर पाहतां या राजवाडेकृत समाजमीमांसेंत पुष्कळ तथ्य दिसतें. मानवी समजाच्या प्रगतीची मीमांसा करतांना आजहि या मतास कमी महत्त्व नाहीं. हवामान व भौतिक परिस्थिति यांची अनुकूलता वा प्रतिकूलता लक्षांत घेऊन मानवी समाजाच्या स्थितिगतीचा विचार प्रथम बोदिन (Bodin १५३०–१५९६) यानें केला. ऊष्ण प्रदेशांत सर्व प्रकारच्या धर्मभोळ्या समजुती तयार होतात व थंड प्रदेशांत राजसगुणयुक्त अशी आक्रमक इच्छाशक्ति प्रबळ असते. समशीतोष्ण हवामानांत मानवी बुद्धीस, कार्यकारणभावास महत्त्व प्राप्त होतें. या दृष्टीनें पाहतां बोदि-नच्या मतें उत्तरेंत दिर्घोद्योग करणारे व महत्त्वाकांक्षा धरून युद्ध करणारे समाज

---

१ इतिहास आणि ऐतिहासिक: वर्ष २, अंक १९

निर्माण झाले, दक्षिणेस कवी, कलावंत, धर्मशास्त्रज्ञ यांची निपज झाली; व समशीतोष्ण विभागांत कायदा, न्याय, व्यासंग यांची निर्मिति झाली. बोदिननंतर मॉंटेस्कीन यानें आपल्या 'स्पिरिट ऑफ् लॉज' या ग्रंथांत याच कारणमीमांसेचा विचार केलेला आहे. मानवी कर्तृत्व भोंवतीच्या हवामानानें वा भौगोलिक परिस्थितीनें कसें निबद्ध असतें याचें शास्त्रशुद्ध विवेचन यानें केलें आहे. ऊष्ण प्रदेशांत मुली लहान वयांत लग्नाच्या होतात, त्यांना म्हातारपण लौकर येते, इत्यादि विचार सांगून त्यानें धर्मकल्पनेचा सुद्धां याच दृष्टीनें विचार केला आहे.

भौगोलिक मीमांसेचा मुख्य प्रवर्तक हेन्री थॉमस बकल (१८२१—१८६२) हा होय. भौगोलिक परिस्थिति व निसर्गसंपन्नता अथवा निसर्गाची प्रतिकूलता यांचा अधिक सूक्ष्म विचार मानवी समाजाच्या दृष्टीनें बकल यानें केलेला दिसतो. हवामान, अन्न, भूमि, व निसर्गाचे सर्वसामान्य विशेष यांनीं मानवी जीवित अंकित झालेलें असतें. पूर्वी सांगितलेल्या सिद्धान्तास बकलनें भरपूर आधार देऊन शास्त्रीयता प्राप्त करून दिली आहे. याच्याहि मतें हवामान, भूमिसंपन्नता यांमुळें मानवी वृत्ति बनत राहते. ऊष्ण प्रदेशांत दीर्घोद्योग करणारीं माणसें कमी दिसतील. युरोपमध्यें हवामान अनुकूल अधिक प्रमाणांत आहे तर इतरत्र भूमिसंपन्नता अधिक अनुकूल दिसेल. ऊष्ण प्रदेशांत माणसांना कमी अन्न पुरतें. पण येथें अन्नाचा साठा भरपूर असेल तर प्रजेची वाढ उदंड होते. उलट थंड प्रदेशांत अन्नाचें दुर्भिक्ष असलें तरी मांसाहार असल्यानें माणसें दीर्घोद्योगी बनलीं आहेत; आणि उष्ण प्रदेशांत मात्र प्रजेच्या वाढीबरोबर आलस्य वाढतें. वर्ण, जाती, दारिद्य यांची निपज येथेंच होते. गरिबांची संख्या वाढते, लोकशाही धोक्यांत येतें. युरोपमध्यें अन्न सुलभ नसल्यामुळें तेथील लोकसंख्या मर्यादित राहिली, तेथें जातींचा बुजबुजाटहि फार झाला नाहीं. म्हणून लोकशाही प्रवृत्तीचा विकास तेथें झपाटयानें झाला.[1] हिंदुस्थानांतील लोक तुटक वृत्तीचे, उदासीन कां बनले व भुकेकंगाल युरोपीयन लोक दीर्घोद्योगी कां बनले याची राजवाडेकृत मीमांसा बकलच्या तत्त्वज्ञानास धरून आहे. इतकेच नव्हे तर 'जातिसंस्था व वर्णसंस्था ह्या देशांत मूळ उत्पन्न होण्याचीं जीं अनेक कारणें आहेत त्यांत अन्नवैपुल्याचें व अन्नसौलभ्याचें कारण बरेंच प्रमुख आहे'[2] असें राजवाडे लिहितात तेव्हां त्यांच्या मनांत बकलची भौगोलिक मीमांसा असणें शक्य आहे.

माणसे दैववादी, उदासीन, तत्त्वज्ञानांत रममाण होणारी, नाना देव निर्माण करणारी कां होतात याची बकलची मीमांसा आणखी सूक्ष्म आहे. जेथें भव्य

---

1. H. T. Buckle, History of Civilization in England, 1 ; 14
२. महिकावतीची बखर, प्रस्तावना : पृष्ठ ९५–९६

निसर्ग आहे, जेथें माणसांच्या मनांत भयानक निसर्गाची सतत भीति आहे तेथें तो अगतिक होतो, शरण जातो, लीन होतो. विचार करण्याऐवजीं काल्पनिक स्तुतिस्तोत्रांत त्याचें चित्त रमूं लागतें. त्याची तर्कशक्ति कुंठित होते. उलट जेथें निसर्ग संथ व अनुकूल आहे तेथें माणसाची प्रवृत्ति भौतिकवादी बनते, बुद्धीस तेथें प्राधान्य मिळतें. ऊष्ण कटिबंधांत ज्या संस्कृति उदयास आल्या त्यांना भूकंप, वादळें, जोरदार पर्जन्यवृष्टि यांना तोंड द्यावें लागलें असल्यानें तेथील माणसें कल्पनाविश्वांत दंग झाली; व्यक्तिवादी बनली; त्यांची विचारशक्ति मरगळून गेली. धर्मप्रवृत्ति येथें वाढीस लागली. जगांतील प्रमुख धर्मांचा उगम येथेंच आहे. हिंदुस्थानांत कवितेस याचमुळें प्राधान्य मिळालें. व्याकरण, कायदा, इतिहास, वैद्यक आणि गणितसुद्धां, भूगोल, अध्यात्म यांचा विचार कवितेंतून आहे; गद्यांतून नाहीं. वृत्तशास्त्राचा अभिमान संस्कृत भाषेला जेवढा आहे तेवढा जगांतील कुठल्याहि भाषेस नाहीं.[1] उलट ग्रीसमध्यें नेमकी विरुद्ध परिस्थिति असल्यामुळें तेथें विचारशक्तीस अवसर मिळाला व भौतिक विज्ञान जन्मास आलें. ग्रीसमध्यें 'The climate was more healthy; earthquakes were less frequent; hurricanes were less disastrous; wild beasts and anoxious animals less abundant'[2] अशी परिस्थिति असल्यानें तेथील मानव उद्यमशील व विचारप्रधान बनला. बकलच्या नंतर फ्रेडरिक रॅट्झील (१८४४-१९०४) यानें या भौगोलिक परिस्थितीची अधिक तपशीलानें तपासणी केली; व या विचारास मानवभूविज्ञानाचें (Anthropo-geography) स्थान प्राप्त करून दिलें. याचा पुढें विस्तार मिस एलन सेंपल हिनें आपल्या Influences of Geographic Environment या ग्रंथांत केला आहे. सागरसान्निध्य, नद्या, किनारा यांचाहि विचार हिच्या मीमांसेंत आहे. हिच्या तत्त्वप्रणालीप्रमाणें माणूस सर्वार्थानें भूमिपुत्र आहे. एल्सवर्थ हंटिंग्टन, विल्यम रिप्ले यांनीं यासंबंधीं अधिक संशोधन केलें आहे.

माणसें दैववादी कां बनतात, तुटक वृत्तीची कां होतात, वेदान्तविचारांत मग्न कां होतात, कल्पनाविश्वांत कां सुखावतात या प्रश्नांची भौगोलिक मीमांसा ढोबळमानानें खरी आहे. तपशीलांत अनेक शंका निर्माण होतात. युरोपमध्यें अध्यात्माची, तत्त्वज्ञानाची मोठी परंपरा दिसली तर मोठी पंचाईत होईल. वेद-उपनिषदांत भौतिक विचारांचें दर्शन असेल तर वा विचारप्रधानता प्रमुख असेल तर बकलची भौगोलिक मीमांसा ढोबळ मानानेंच मानणें भाग पडेल. शिवाय कणाद, ब्रह्मगुप्त, आर्यभट्ट, भास्कराचार्य, चरक, सुश्रुत, वाग्भट, नागार्जुन,

१ H. T. Buckle, History of Civilization in England: page, 96

२ कित्ता: पृष्ठ ९९

वराहमिहिर यांच्या विलक्षण भौतिक शास्त्रीय उपासनेचा अर्थ कसा लावावयाचा ? गेलीं हजारपाचशें वर्षें सोडलीं तर याच आपल्या भूमींत ग्रहगोलांच्या गती अजमावण्यांत आल्या होत्या. 'पाय्'ची किंमत ठरविण्यांत आली होती, ग्रहणांचीं गणितें बरोबर केलीं जात होतीं, वनस्पतींचे गुणधर्म ओळखले जात होते, युरोपमधील लोक हाताच्या बोटांवर संख्या मोजून धेडगुजरी गणित करीत होते तेव्हां येथें दशांश पद्धति स्थिर झाली होती. माणसास देवी कां येतात हें येथें एडवर्ड जेन्नरच्या आधीं माहित होतें, येथें शल्यकर्म फार पुढारलेल्या दर्जाचें होतें. येथील स्थापत्य व येथील कलाकुसर, येथील नौकानयन व येथील व्यापार या गोष्टी थोरपणास शोभणाऱ्या होत्या. हवामान, भौगोलिक परिस्थिति, अन्नवैपुल्य वा सौलभ्य यांच्या बकल आणि राजवाडेप्रणीत मीमांसेंत या बाबींना स्थान देणें अडचणीचें होईल असें वाटतें. राजवाडे म्हणतात, येथील अन्नवैपुल्यामुळें वा सुलभतेमुळें जनक राजा उतार वयांत वेदान्ताचीं प्रवचनें ऐकूं लागला, अशोक उत्तरार्धांत अहिंसेची शपथ घेतो, औरंगझेब कुराणाच्या नकला करतो, महादजी शिंदा रडके अभंग गातो. या धुरंधरांची ही वृत्ति येथील भौगोलिक परिस्थितीमुळें झाली हें खरें कीं हीहि एक मानवी स्वभावाची परिणति आहे हें खरें ? नवयुगाचा पुरस्कर्ता रॉजर बेकन हा धार्मिक होता. मार्टिन ल्यूथरला धर्मसत्ता नको होती, पण धार्मिकता हवी होती. उतार वयांत न्यूटनची बायबलवर केवढी निष्ठा होती. कितीतरी भौतिकपरंपरेचे उपासक शेवटीं तत्त्वचिंतनाकडे, आत्मिक विचाराकडे वळलेले दिसतात. सर जेम्स जीन्स, एडिंग्टन, अलेक्झीस कॅरेल, आईन्स्टीन इत्यादींचा कल या दृष्टीनें तपासून पाहण्यासारखा आहे. मागें ज्याचा उल्लेख केला आहे त्या आर्थर कोस्लरनें आपल्या 'दि ॲक्ट ऑफ क्रिएशन'मध्यें एक स्वतंत्र परिशिष्ट लिहूनच या विषयाची चर्चा केलेली आहे. प्लेटो, अरिस्टॉटल, हिपॉक्रॅटस, कोपर्निकस, ब्राहे, गॅलिलिओ, केप्लर, न्यूटन फ्रान्क्लीन, फॅरडे, मॅक्सवेल, डार्विन, पाश्चर इत्यादि भौतिकवादी शास्त्रज्ञांच्या आध्यात्मिक वा धार्मिक विचारांची उद्बोधक चर्चा येथें आलेली आहे.

याच संदर्भात राजवाडे यांच्या आणखी एका विधानाचा थोडक्यांत परामर्श घ्यावयाचा आहे. विकारविचारप्रदर्शनांच्या साधनांचा इतिहास देतांना राजवाडे यांनीं स्वर्ग, नरक, पाताळ, वायुलोक, चंद्रलोक, भुतें, यक्ष, देव, दानव, अप्सरा, गंधर्व, वेताळ, पिशाच इत्यादि शबल साधनांचा यथेच्छ समाचार घेतलेला असल्याचें आपण पाहिलें आहे. या शबल व भ्रान्त साधनांचा मानवी मनावर फार मोठा पगडा असल्याचें त्यांनींच विस्तारानें दर्शविलें आहे. त्यांच्या दृष्टीनें यामुळें जग अद्याप बाल्यावस्थेंत कसलें, शैशवावस्थेंतच आहे. त्यांच्या मतें देव ही कल्पना कृत्रिम आहे, स्वयंभू नाहीं. कार्यकारणभावाचें ज्ञान जसें होत जाईल, व भौतिक शास्त्रांचा उदय जेवढ्या झपाट्यानें होईल तसतशी देवकल्पना नष्ट होईल

असा त्यांचा तर्क आहे. कार्यकारणभावाचें ज्ञान स्पष्ट झाल्यावर देवधर्माच्या खुळचट कल्पना नष्ट होतील, वेडगळ रूढि वा उपायचिंतनाचे भोंगळ व अनिष्ट प्रकार दूर होतील; येथपर्यंत राजवाडे यांचें विधान मान्य होण्यासारखें आहे. पण देवधर्मांची कल्पना समूळ नष्ट होईल असा त्याचा अर्थ असेल तर मग मात्र आज जिथें भौतिक शास्त्रांचा विकास प्रामुख्यानें झालेला आहे त्या देशांच्या साक्षी राजवाडे यांच्या विरुद्ध जातील. अमेरिकेंत चर्चमध्यें जाणारांची संख्या आजहि फार मोठी आहे. धर्मशिक्षण देणाऱ्या संडे स्कूलसमध्यें लक्षावधि विद्यार्थी नांवें नोंदवितांना दिसतात. त्यांच्या नाण्यांवर व तिकिटांवर आजहि 'इन गॉड वी ट्रस्ट' हींच अक्षरें आहेत. तेथील सार्वजनिक समारंभ आजहि प्रार्थनेनें सुरू होतात. तेथील सीनेटचें उद्‌घाटन करण्यासाठीं पीटर मार्शलसारखे धर्मगुरु लागतात. थोर दर्जाची धार्मिकता, थोर दर्जाची देवकल्पना ही माणसास आजच्या भौतिक युगांत पाश्चात्य देशांतहि फार निकडीची आहे असें भौतिक शास्त्रवेत्तेच म्हणूं लागले आहेत.

राजवाडे यांनीं ज्या विविध क्षेत्रांत संशोधन केलें त्यांत वाङ्मयशाखेच्या संशोधनास विशेष महत्त्व द्यावें लागेल. खरें म्हणजे त्यांचे इतिहासविषयक विचार, समाजशास्त्रीय विचार, भाषा व व्याकरण यांवरील त्यांचे लेख, स्वदेशावरील त्यांचे विचार या सर्वांना एका अर्थानें वाङ्मयच म्हणतां येईल, परंतु येथें विवेचनाच्या सोयीसाठीं वाङ्मयाचा अर्थ मर्यादित घेतला आहे. गेल्या सातआठशें वर्षांत मराठी भाषेंत वाङ्मयाची वाढ कोणत्या प्रमाणांत झाली, त्याचे प्रकार कोणते होते, वैचारिक वाङ्मय, कथात्मक वाङ्मय, गद्य वाङ्मय, पद्य वाङ्मय यांचें स्वरूप कोणतें होतें, कोणते महान् ग्रंथकार मराठींत झाले, त्यांनीं समाजास कसें वळण दिलें, मराठी भाषेचा प्रारंभ व विकास कसा झाला, मराठी व्याकरणाचें स्वरूप कोणतें, मराठी भाषेची पूर्वपीठिका कोणती, इत्यादि विविध स्वरूपांच्या भाषाशास्त्रीय व साहित्य-विषयक प्रश्नांची चर्चा राजवाडे यांनीं प्रसंगोपात्त केली आहे. भाषा व भाषेंतून प्रसिद्ध होणारें वाङ्मय यांविषयीं राजवाजे यांनीं फार तपशीलानें मूलगामी असें विवेचन केलेलें असल्यानें त्याचा परिचय करून घेणें अगत्याचें आहे. प्रथम मराठी ग्रंथ, ग्रंथकार, व त्यांचें कार्य यांच्या निमित्तानें एकंदर साहित्याविषयीं राजवाडे यानीं जें मतप्रदर्शन केलें आहे त्याचा परामर्श घेऊं.

मराठी ग्रंथकर्तृत्वाच्या इतिहासाच्या दृष्टीनें राजवाडे यांची फार मोठी कामगिरी म्हणजे त्यांचें ज्ञानेश्वरीसंशोधन मानावें लागेल. जें कार्य एकनाथांनीं सन १५८४ मध्यें केलें त्याच स्वरूपाचें किंवा अभ्यासकांच्या मतें त्याहून अधिक महत्त्वाचें कार्य राजवाडे यांनीं एकनाथपूर्वकालीन ज्ञानेश्वरीच्या संशोधानानें केलें आहे. राजवाडे यांनीं ज्या प्रतीवरून आपली ज्ञानेश्वरी छापली त्या प्रतीचें राजवाडे यांनीं काय केलें, यासंबंधीं अनेक प्रवाद आहेत. स्वतः राजवाडे यांनीं ती नष्ट केली असेंहि सांगितलें जातें. असा पुरावा नष्ट करण्याचें कृत्य इतिहासाभिमानी राजवाडे यांनीं कां करावें असाहि प्रश्न उपस्थित होण्यासारखा आहे. पण त्या त्या वेळीं काय काय परिस्थिति असेल याची चिकित्सा करण्याचें या ठिकाणीं कारण नाहीं. प्रसिद्ध असणाऱ्या राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरीसंबंधानेंच प्रामुख्यानें विचार करावयाचा आहे. राजवाडे यांना या ज्ञानेश्वरीची प्रत बीड शहरीं पाटांगण नांवाचें एक देवस्थान आहे तेथें मिळाली. इतर प्रतीमध्यें एका कोनाड्यांत पडलेली ही प्रत मठाधिपति मथुरानाथ गोसावी यांनीं राजवाडे यांना दिली. या पोथीचें सविस्तर वर्णन राजवाडे यांनीं आपल्या दीर्घ प्रस्तावनेंत दिलेलें आहे. त्यांच्या मतें या पोथीमधील सर्व

रूपें व्याकरण दृष्ट्या शुद्ध आहेत. ज्ञानेश्वरकालीन नागरभाषेचें रूप काना, मात्रा, ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार यांच्या दृष्टीनें तत्कालीन व्याकरणास अनुसरून सर्व रूपें या ज्ञानेश्वरींत आहेत. ' इतकी शुद्ध पोथी संस्कृतांतहि सापडणें कठिण, प्राकृतांत, तर ती केवळ अनुपमेय आहे. या पोथीचें मराठी भाषाशास्त्राला व निरुक्ताला फारच साहाय्य होईल'[1] असा अभिप्राय खुद्द राजवाडे यांचाच आहे.

आपल्या या प्रतीची कालनिश्चितीहि राजवाडे यांनीं करण्याचा प्रयत्न केला आहे. राजवाड्यांच्या या प्रतींत अर्थातच एकनाथकृत ओव्या शेवटीं नाहींत. इतकेंच नव्हे तर ' शके बारा शतें बरोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें । सच्चिदानंद बाबा आदरें । लेखकु जाला-'॥ ही प्रसिद्ध ओवीहि नाहीं. ओवी आहे, पण ती संबंध ज्ञानेश्वरीस शोभणाऱ्या वळणाची नाहीं. एक तर ग्रंथसमाप्तीचे सर्व संस्कार झाल्यानंतर ही ओवी असल्यामुळें मागाहून कोणी तरी ती जोडून दिली असावी हें उघड आहे. राजवाडे यांच्या मतें ही ओवी सच्चिदानंदबाबाकृतहि नसावी. राजवाडे यांची प्रत सद्‌गुरु मुकुंदराज यानें आपल्या विद्याधर नामक शिष्याला दिली. ही प्रत सच्चिदानंदबाबांच्या मृत्यूच्या अगोदर म्हणजे शके १२४० च्या सुमारास लिहिली गेली असावी असा राजवाडे यांचा अंदाज आहे. परंपरेनें ही पोथी विश्वनाथु कोनेर देवनुरकर यांचेकडे व तेथून पाटांगण देवस्थानांत आली. यानंतर राजवाड्यांनीं भारदे यांची ज्ञानेश्वरी, कुंटे यांची ज्ञानेश्वरी, वाईची सोनारी प्रत, माडगांवकरी प्रत इत्यादींशीं आपली प्रत ताडून पाहिली आहे. ओवीसंख्या निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे व ज्ञानेश्वरकालीं भाषेचा शास्त्र-शुद्ध अभ्यास व्हावा म्हणून आपल्या प्रतीची महती वर्णन केली आहे.

राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरीवर गेल्या कांहीं वर्षांत उलटसुलट पुष्कळ चर्चा झालेली आहे. चर्चेचा निष्कर्ष असा कीं राजवाडे यांची ज्ञानेश्वरी उपलब्ध प्रतींत भाषेच्या दृष्टीनें जुनी आहे हें निश्चित, पण राजवाडे समजतात तितकी मात्र ती जुनी नसावी. शके १२१२ मध्यें सच्चिदानंदबाबानीं लिहून घेतलेल्या ज्ञानेश्वरीची प्रत अजूनहि उपलब्ध नाहीं. पाहावयास मिळणाऱ्या ज्ञानेश्वरीच्या सर्व प्रती एकनाथांनीं शुद्ध केलेल्या ज्ञानेश्वरीच्या आहेत. ज्ञानेश्वर कालानंतर महाराष्ट्रांत जी सांस्कृतिक बाताहत झाली तींत मूळ ज्ञानेश्वरी लुप्त होते कीं काय, असा प्रसंग आला असतां सुमारें तीनशें वर्षांनीं एकनाथांनीं पहिलें ज्ञानेश्वरीसंशोधन केलें. एकनाथांचें हें कार्य फार मोठें हें खरेंच पण त्यांनीं ज्ञानेश्वरीच्या भाषेला थोडें आधुनिक वळण दिल्यामुळें व शुद्धाशुद्धें तपासल्यामुळें नंतरच्या अभ्यासकांच्या मनांत संशय निर्माण झाले. एकनाथांनीं नेमके कोणते संस्कार नवे स्वतःचे म्हणून केले हें समजावयास मार्ग नाहीं. ज्ञानेश्वरींत स्वतःची ओवी एकनाथांनी घातली नसावी, कारण असें करणाराचें कृत्य म्हणजे अमृताच्या

---

[1] राजवाडे ज्ञानेश्वरी, प्रस्तावना : पृष्ठ ६५, सन १९०९

तार्टी नरोटी ठेवण्यासारखें आहे असें त्यांनींच स्वतः म्हटलें आहे. तरी सुद्धां एकनाथांच्या ज्ञानेश्वरीची भाषा थोडी आधुनिक वळणाची म्हणजे समकालीन गद्यापेक्षां निराळी असल्यामुळें राजवाडे यांची ज्ञानेश्वरी भाषाशास्त्राच्या अभ्यासकांना अधिक सोयीची झाली. पुनः येथेंहि अडचण आहेच. राजवाडे यांच्या छापील प्रतींत कांहीं चुका राहिल्या, त्या मूळ प्रतीशीं ताडून पाहण्याची सोय मूळ प्रत नष्ट झाल्यामुळें उरली नाहीं. मूळ पोथींतील पानांचें त्यांनीं दिलेलें छायाचित्र व त्याचें मुद्रण यांतहि तफावत दिसून आल्यावर संशयास जागा अधिक राहिली. असें असलें तरी सर्व उपलब्ध प्रतींत राजवाडे यांचीच प्रत भाषेच्या दृष्टीनें जुनी असावी याविषयीं सर्वांचें एकमत आहे. प्रसिद्ध व्याकरणतज्ज्ञ कै. गो. कृ. मोडक यांनीं भाषेच्या आधारें या प्रतीचें प्राचीनत्व निर्विवादपणें सिद्ध केलें आहे.[1]

राजवाडे यांच्याप्रमाणेंच नंतर एक प्रयत्न डॉ. रा. ग. हर्षे यांनीं केला. डॉ. हर्षे यांची सिद्धनाथ प्रत ही त्यांच्या मताप्रमाणें शके १२७२ मधील न ठरतां शके १५७२ मधील ठरली तरी ज्ञानेश्वरीच्या प्रतींच्या संशोधनाच्या इतिहासांत या डॉ. हर्षे यांच्या प्रयत्नाचें महत्त्व विशेष मानावें लागेल. प्रसिद्ध संशोधक वि. अं. कानोले यांनींहि राजवाडे यांच्या प्रतीचें प्राचीनत्व मान्य केलें आहे. कुंटे प्रत, साखरे प्रत, माडगांवकर प्रत, राजवाड्यांची मुंकुंदराजी प्रत, बंकटस्वामी प्रत, व स्वतः जवळची नांदेड प्रत यांचा एकत्र विचार करून उपलब्ध ज्ञानेश्वरींच्या प्रतींचा अभ्यासपूर्ण आढावा श्री. कानोले यांनीं घेतलेला आहे;[2] व राजवाडे यांच्या प्रतीचें महत्त्व मान्य केलें आहे. एकनाथांनीं प्रसिद्ध केलेल्या ज्ञानेश्वरीस सांप्रदायिकता असल्यामुळें तिच्याविषयीं मोठीच आदरबुध्दि सर्वांना वाटते; परंतु चिकित्सक बुध्दि व भाषाशास्त्रीय अभ्यास या दोन कसोट्यांना उतरते ती राजवाडे प्रत. या प्रतीबद्दल सांप्रदयिकांचें मत तितकेसें अनुकूल नव्हतें. याचें कारण थोड्या अंशानें स्वतः राजवाडे यांच्या अतिरेकी स्वभावासच द्यावें लागेल. सांप्रदायिकांना ज्ञानेश्वरीचें भाषाशास्त्रीय महत्त्व पटत नाहीं म्हणून राजवाडे यांनीं किती संतापावें ?

'आजपर्यंत जेवढ्या म्हणून ज्ञानेश्वरीच्या प्रती छापिल्या गेल्या आहेत त्या सर्व अशुद्ध व अविश्वसनीय आहेत ... सध्यां भक्तिमार्गी लोक इतके गचाळ झाले आहेत कीं व्याकरण, व्युत्पत्तिं, इतिहास, शास्त्र यांची त्यांना बिलकुल पर्वा राहिलेली नाहीं. वाटेल तें चिताड त्यांच्या हातांत दिलें व तें ज्ञानेश्वरीचें, नामदेवाचें किंवा तुकारामाचें आहे असें सांगितलें म्हणजे तें त्यांना शिरसामान्य होतें. खरेंखोटें, विश्वास्यअविश्वास्य, हा भेदभाव तें करीत नाहींत... कोल्हापूरचे भावे, पनवेलचे आठल्ये, पुण्याचे भिडे ह्यांनीं ज्ञानेश्वरीचा अर्थ

१. भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक : वर्ष १५, अंक १

२. श्रीज्ञानेश्वरदर्शन, भाग पहिला : पृष्ठ १९७.–२०९ सन १९३४

लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु स्पष्टपणें सांगावयास हरकत दिसत नाहीं कीं, हे सर्व व्याख्याते अथपासून इतिपर्यंत अपव्याख्यान करीत गेलेले आहेत. पैकीं आठल्यांचें भाषांतर, अगदीं कुचकामाचें व कवडीमोल आहे.'[१] राजवाडे यांच्या अतिरेकी मतप्रतिपादनामुळें राजवाडे यांच्यावर व त्यांच्या ज्ञानेश्वरी-वर आक्षेप घेणारेहि सांप्रदायिक निघाले. 'श्रीज्ञानेश्वरीची संहिता ही भाविक जनांस वेदतुल्य असल्यामुळें त्यांतील एक अक्षरहि इकडचें तिकडें किंवा कमीजास्त झालेलें त्यांस खपावयाचें नाहीं,' अशी राजवाडे यांना प्रत्युत्तर म्हणून वाक्यें साखरी ज्ञानेश्वरीच्या प्रतींत दिसूं लागलीं. या सर्व वादाचा येथें परामर्श घ्यावयाचा नाहीं. स्वतः राजवाडे यांनींच 'माझी ज्ञानेश्वरी व कित्येक शंकाकार' या लेखांत आपल्या टीकाकारांना उत्तर दिलें आहे.[२] सांप्रदायिकांनाहि राजवाडे प्रतीचें एकनाथपूर्व-कालीनत्व मान्य आहेच. याचा अगदीं अलीकडील पुरावा म्हणजे महाराष्ट्र सरकारनें प्रसिद्ध केलेली ज्ञानेश्वरी ही राजवाडे ज्ञानेश्वरीचीच आवृत्ति आहे. या सरकारी ज्ञानेश्वरीचें संपादन करणाऱ्या समितीचे अध्यक्ष ह. भ. प. शं. वा. दांडेकर हे आहेत. ज्ञानेश्वरी मंडळाचे अध्यक्ष म्हणून प्रा. दांडेकर यांनीं प्रारंभीं जी प्रस्तावना लिहिली आहे तींत कुंटे, माडगांवकर यांच्या आवृत्तींचें परीक्षण केल्यावर राजवाडे ज्ञानेश्वरीबद्दल म्हटलें आहे "सर्व छापील प्रतींत राजवाडे प्रतच अत्यंत जुनी आहे यांत संदेह नाहीं. व भाषाशास्त्रज्ञांनीं यादवकालीन मराठी भाषेच्या दृष्टीनें या प्रतीला फार उच्च स्थान दिलें आहे म्हणूनच याच राजवाडे प्रतीचें संशोधन करून तिची सुधारलेली आवृत्ति ज्ञानेश्वरीभक्तांना उपलब्ध करावी असा विचार कांहीं अभ्यासकांच्या मनांत आला; त्याच्या परिणामीं मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या मराठी संशोधन मंडळाला तशा आशयाचें एक पत्र मुंबई सरकारच्या शिक्षण खात्याकडे पाठविण्याची विनंति करण्यांत आली व ती त्या मंडळानें मान्य केली.[३]" अर्थात् सरकारी प्रतींत राजवाडे प्रतीचीहि थोडीफार सुधारणा आहे. राजवाडे प्रतींतील 'ल' कार सरकारी प्रतींत 'ळ' कार झालेला आवश्यक त्या ठिकाणीं दिसतो. माडगांवकरांच्या प्रतीचें बरेंच साह्य या सरकारी प्रतीस झालेलें आहे. सरकारच्या ज्ञानेश्वरीमंडळास माडगांवकराचें हस्तलिखित, शाळिग्राम हस्तलिखित, गोपाळाश्रम हस्तलिखित, निरंजन रघुनाथ हस्तलिखित, बरवा हस्तलिखित, इतकीं हस्तलिखितें उपलब्ध झालीं होतीं. त्या सर्वांच्या निरिक्षणावरून राजवाडेप्रत हीच सर्वांत जुनी असेंच ठरलें. त्यामुळें ज्ञानेश्वरीभक्तांना उपयुक्त अशी राजवाडे ज्ञानेश्वरीच सरकारी मंडळास प्रसिद्ध

१. राजवाडे ज्ञानेश्वरी, प्रस्तावना : ९२
२. राजवाडे लेख–संग्रह, भाग ३ : पृष्ठ २४–३६
३. सरकारी ज्ञानेश्वरी, प्रस्तावना : पृष्ठ ४

करावीशी वाटली व तशी ती सन १९६० मध्यें राजवाडे ज्ञानेश्वरीची दुसरी आवृत्ति म्हणून प्रसिद्ध झाली. पहिल्या आवृत्तीचे संपादक म्हणून विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचें नांवहि या ज्ञानेश्वरीवर आहे.

ज्ञानेश्वरी मंडळाचे अध्यक्ष म्हणून प्रा. दांडेकरांनीं राजवाडे ज्ञानेश्वरीस मान्यता दिली तरी व अभ्यासाच्या दिशा भाषाशास्त्राच्या व व्याकरणाच्या मोकळ्या व्हाव्यात म्हणून जरी राजवाडे यांची ज्ञानेश्वरी मान्यतेस पावली तरी सांप्रदायिक अर्थाच्या वा एकंदर गीतार्थाच्यां दृष्टीनें तिच्यांत उणीवा आहेत हेंहि मान्य करावयास हवें. राजवाडे यांची प्रत मुकुंदराजी आहे हेंहि कदाचित इतिहासास धरून होणार नाहीं. ज्ञानेश्वरांच्या आधीं शंभर वर्षें मुकुंदराजांचा काळ मान्य झाला तर 'सद्गुरुमुकुंदेन दत्ता' यांतील मुकुंद व प्रसिद्ध मुकुंदराज यांना वेगळें मानावें लागेल. सन १९३०--३१ सालीं 'सुप्रभात' मासिकांत खंडेराव सदाशिव त्रिलोकेकर यांनीं 'एकनाथ विरुद्ध राजवाडे' असा लेख लिहून राजवाडे यांची प्रस्तावना व त्यांनीं छापलेली ज्ञानेश्वरी यांतील विसंगती स्पष्ट केलेली आहे. हा वाद आतां जुना झाला असला तरी व भाषाशास्त्रीय अभ्यासकांना राजवाडे ज्ञानेश्वरी उपयुक्त असली तरी केवळ भाषा व व्याकरण हेंच ज्ञानेश्वरीसर्वस्व न मानतां गीतार्थाच्या दृष्टीनें राजवाडे पाठाची निश्चिती व्हावयास हवी असें म्हणणारा एक पक्ष आजहि आहेच. ज्ञानेश्वरीचे प्रसिद्ध अभ्यासक डॉ. शं. दा. पेंडसे यांनीं या संबंधीं सूक्ष्म अभ्यास करून निर्णय दिला आहे कीं "आजच्या स्थितींत भाषेच्या दृष्टीनें राजवाडे प्रतच सर्वांत जुनी आहे. म्हणून अभ्यासाकरतां तीच घेणें युक्त असलें तरी या प्रतींत कांहीं अपपाठ राहिल्यामुळे इतर प्रतींचेंहि साहाय्य घ्यावें लागतें. ज्ञानेश्वरीच्या तत्त्वज्ञानांत भेद उत्पन्न करणारे अपपाठ मात्र राजवाडे प्रतींत कोंठेंहि आढळले नाहींत हें सांगितलें पाहिजे. तसेंच इतर प्रतींच्या तुलनेनें अनेक चांगले पाठहि राजवाडे प्रतींत आहेत[१]."

डॉ. पेंडसे ज्ञानेश्वरीचें एक चिकित्सक अभ्यासक. त्यांचा हा सौम्य अभिप्राय राजवाडे ज्ञानेश्वरीस अनुकूल असाच म्हणावा लागेल. कै. विष्णुबोवा जोग, कै बंकटस्वामी या परंपरेंतील प्रा. दांडेकरसंपादित ज्ञानेश्वरी आजकाल प्रचारांत जास्त आहे. आपल्या नव्या आवृत्तीस विस्तृत प्रस्तावना लिहितांना प्रा. दांडेकर हे अस्सल सांप्रदायिक आहेत असें वाटतें. सरकारी ज्ञानेश्वरीची प्रस्तावनाकारांची भूमिका वेगळी व या सांप्रदायिक ज्ञानेश्वरीची प्रस्तावना वेगळी. या स्वपरंपरेंतील ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत प्रा. दांडेकर यांनीं राजवाडे ज्ञानेश्वरीवर विस्तृत चर्चा केली आहे. राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरीनें नवीन युगास प्रारंभ केला. मराठी वाङ्मयास भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीनें ही एक अमोल देणगी आहे वगैरे म्हणून झाल्यावर सर्वोत्तम

१ डॉ. शं. दा. पेंडसे, श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान : पृष्ठ ३३, सन १९४१

ज्ञानेश्वरीच्या कसोटीस राजवाडे ज्ञानेश्वरी कां उतरत नाहीं हें, त्यांनीं फार मार्मिक रीतीनें सांगितलें आहे. भाषेच्या व व्याकरणाच्या कसोटीप्रमाणें ज्या प्रमाणें ज्ञानेश्वरीचें महत्त्व ठरवावें त्याप्रमाणें गीतार्थाशीं जुळणाऱ्या पाठांच्या संख्येचेंहि महत्त्व मानावयास हवें असें त्यांनीं आग्रहानें सांगितलें आहे. नाथांना जशी ज्ञानेश्वरकालीन प्रत मिळाली नव्हती असें राजवाडे म्हणतात त्याचप्रमाणें राजवाड्यांना ती मिळाली नाहीं हेंहि सत्य आहे. उपलब्ध प्रतींत ती जुनी पण एकनाथांच्या आधीं थोड्या वर्षांपूर्वीची असाच अभिप्राय प्रा. दांडेकर देतात.

राजवाडे यांचें लिहिणें जसें मनस्वी अतिरेकाचें तसेंच प्रा. दांडेकरहि प्रतिक्रिया म्हणून कां होईना पण तितकेंच तिखट लिहूं शकतात. राजवाडे यांनीं मुकुंदराजाची ही प्रत म्हणून सांगितलें त्यावर प्रा. दांडेकर लिहितात, "राजवाडे पडले जाडे संशोधक ... पण त्यांचे सर्वच तर्क बिनबुडाचे ठरले. शिवाय मुकुंदराजा या नांवाला कांहीं शिक्का आहे काय कीं तें फक्त प्रसिद्ध मुकुंदराज यानांच लागूं ! ज्ञानदेव तसे मुकुंदराजहि पुष्कळ असतील व प्रत्येक शिष्याला आपला गुरु ब्रम्हरूपच दिसत असल्यानें तो 'सदगुरू मुकुंदराजेन दत्ता' म्हणेल. स्वयंप्रज्ञ राजवाडे यांना ही गोष्ट ठाऊक नसावी कीं प्रत्येक शिष्याला आपला गुरु ब्रह्मरूप वाटतो.–"[१] प्रा. दांडेकरांच्या मतें राजवाडे प्रत ज्ञानेश्वरपूर्वकालीन खरी, पण ती त्रुटित, कित्येक ठिकाणीं चुकीचे पाठ असलेली, ज्ञानदेवांना मान्य नसलेला श्लोक व ओळी असणारी अशी आहे. या सर्व विवेचनाचा सारांश असा कीं भाषाशास्त्रीय अभ्यासकांना राजवाडे ज्ञानेश्वरी मान्य व इतरांना तिच्यांत उणीवा दिसतात. राजवाडे यांना हस्तगत झालेलें हस्तलिखित उपलब्ध असतें तर आणखी कांहीं प्रकाश पडला असता.

ज्ञानेश्वरीच्या संशोधनांत जसें राजवाड्यांचें कर्तृत्व विशेष मानावें लागतें तसेंच आणखी एका बाबतींत त्यांना साहित्यसंशोधनाचें श्रेय द्यावयास हवें. तें म्हणजे मराठींतील पहिलें नाटक (?) 'लक्ष्मीनारायणकल्याण' हें प्रकरण प्रथम राजवाडे यांनीं ग्रंथमालेंतून प्रसिद्ध केलें. वास्तविक 'नाटक नांवाच्या दिवट्या पोराचें' राजवाडे यांना मनापासून प्रेम नाहीं; पण तें इतिहासांत प्रथम, शिवाय तंजावरकडील शाहूराजाच्यावेळीं झालेलें म्हणून त्यांना विशेष कौतुक. नाटक मराठींत व संस्कृतांत तसें पाहिलें तर फार जुनें. पौराणिक उत्सवांत ललितादि प्रकार होत असत, त्यांतून मराठी नाटक आकारास आलें. जेथून मराठी नाटकांची परंपरा सुरू झाली असें आपणांस म्हणतां येईल तें 'सीतास्वयंवर' विष्णुदास भाव्यांनीं दशावताराच्या स्वरूपांत तयार केलें असलें तरी याहि आधीं किती तरी वर्षें म्हणजे सन १६८२ च्या सुमारास तयार झालें. तंजावरकडे तयार

१ सार्थ ज्ञानेश्वरी, प्रस्तावना : पृष्ठ २९, सन १९५३

झालेल्या या नाटकाचें स्वरूप अगदीं लहान आहे. पौराणिक नाटकाचा थाट सर्व आहे. स्तवन करणारा सूत्रधार आहे; वरप्रदान देणारा गणपति आहे, कंचुकीराय आहे, ब्रह्मा, विष्णु, लक्ष्मी यांचीं 'सोंगें' आहेत. विष्णु व लक्ष्मी यांच्या मनांतील परस्परांतील अनुराग व त्यांचा विवाह हा स्थूल मानानें विषय आहे.

राजवाडे यांना या नाटकाची पोथी तंजावर येथील एका रामदासी मठांत मिळाली नाटक एकांकी असून 'भोंसलकुलशाहदेवत्रिलोचन' असा राजासंबंधीं उल्लेख आहे. राजवाडे यांनीं याला थोडें प्रास्ताविक जोडलें आहे. स्वतः राजवाडे यांनाच संशय आला आहे कीं यास नाटक हें नांव द्यावें कीं नाहीं. केवळ दोन पात्रांचीं संभाषणें म्हणून हें नाटक. इतर पात्रांपेक्षां सूत्रधाराचें काम यांत अधिक आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या साहित्यांतील नटांचे, नाटकांचे उल्लेख पुढें राजवाडे यांनीं केलें आहेत. नाटकाबद्दल खास असें प्रेम राजवाडे यांच्या मनांत नसल्यानें प्रदीर्घ प्रस्तावना येथें संभवणारच नाहीं. या नाटकाप्रमाणेंच राजवाडे यांनीं 'ग्रंथमाला' मासिकांत वाङ्मयविषयक असे लेख पुष्कळ लिहिले. मुक्तेश्वर, दासोपंत, जनीजनार्दन, देवदास व मुकुंद, शिवदिनकेसरी, गद्यराज, तुकाराम, तुकोब्बाराय देहूकर, मुकुंदराज, रघुनाथपंडित, आनंदतनय इत्यादि संतकवींच्या अध्यात्माविषयीं किंवा भक्तिविषयीं राजवाडे यांना विशेष प्रेम नसलें तरी ऐतिहासिक दृष्ट्या या मराठी कवींची भाषा व त्यांचें काव्यसाहित्य यांचा परामर्श राजवाडे यांनीं घेतलेला आहे. ग्रंथमालेंतील त्यांच्या लेखांपैकीं विशेष गाजलेले लेख म्हणजे 'रामदास' व 'कादंबरी' हे होत. त्यांचाच फक्त थोड्या विस्तारानें येथें विचार करूं. राजवाड्यांच्या साहित्यविचाराचा परिचय होण्यास यामुळें सुलभ होईल.

ग्रंथमालेंत प्रसिद्ध झालेला राजवाडे यांचा 'रामदास' हा निबंध अनेक दृष्टींनीं महत्त्वाचा मानावा लागेल. स्वामींच्या कार्याचें एक वेगळें समालोचन त्यांत आहेच, पण स्वामींचें ग्रंथकर्तृत्व व त्यांच्या दासबोधाचें रहस्य राजवाडे यांनीं अचूकपणें उलगडून दर्शविलें आहे. प्रथमच रामदासी श्लोकांच्या लोकप्रियतेची ओळख करून देतांना श्लोकरचना व मुसलमानी फकिरांच्या फारसी, उर्दू सवालांची त्यांनीं आठवण करून दिली आहे. पुढें रामदासांची समग्र कविता छापणारांनीं दासांचे इतर ग्रंथ कसे वगळले आहेत व समर्थ हे एक थोर पुरुष कसे होते याचें वर्णन आलें आहे. दासबोधरचनेचा हेतु कोणता? या प्रश्नास राजवाडे यांचें स्थूल उत्तर असें कीं सन १६३२ सालीं नाशिकास असतांना यवनांनीं आक्रमिलेल्या महाराष्ट्राचा व सनातन धर्मीयांचा उद्धार करण्याचा समर्थांनीं संकल्प केला होता. या संकल्पाचा मूर्तिमंत अवतार म्हणजे दासबोध होय. हा दासबोध ग्रंथ आहे तरी काय? काव्य कां इतिहास, याचें प्रयोजन काय, याचें प्रमेय

कोणतें, याचें फल काय, हा वाचून फायदा काय वगैरे प्रश्नांची चर्चा राजवाडे यांनीं समर्पक रीतीनें केलेली आहे. राजवाडे यांच्या मतें हा काव्यग्रंथ नाहीं. ग्रंथ पद्यमय आहे एवढेंच, पण त्यांतील विषय काव्याचे नाहींत. राजवाडे यांनीं गीता, अमरकोश, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, यथार्थदीपिका, अष्टांगहृदय, लीलावती यांना काव्यग्रंथ मानिलें नाहीं. याच अर्थानें दासबोध हाहि काव्यग्रंथ नाहीं. स्वतः दासांनीं कवित्वाची व्याख्या केली आहे. त्यादृष्टीनें फार तर दासबोधास काव्य म्हणतां येईल. विषय, संदेह, संगति, पूर्वपक्ष, सिद्धान्त हे शास्त्राचे पांच अवयव दासांच्या कवित्वांत येतात. तत्त्वचर्चा, योग, विवरण, हे दासांच्या काव्यग्रंथाचे विषय. साधनें, पुरश्चरणें, तपें, तीर्थाटणें, धैर्य, शौर्य, धृति ह्या आचरणरूप वस्तु देखील कवित्वच. सारांश ज्या ज्या वस्तूंत, विचारांत व आचारांत ईश्वरी अंश आहे तें सर्व रामदासांच्या मतें कवित्व. या दृष्टीनें दासबोध हा प्रतिभासंपन्न ग्रंथ आहे पण तो रसात्मक नसल्यामुळें लौकिक अर्थानें कवित्वाचा नाहीं असें राजवाडे यांना वाटतें. वेदान्ताचें निरूपण, पढत मूर्खांचें वर्णन, राजनीति, व्यवहारनीति, चातुर्यनिरूपण, कवि, तापसी, योद्धे, गुरु, शिष्य यांचीं वर्णनें हे कांहीं काव्याचे विषय नाहींत. केवळ दृष्टान्तांची रेलचेल आहे. म्हणून कांहीं ग्रंथास राजवाड्यांच्या मतें कवित्व येत नाहीं. कवि या शब्दाचा व्यापक अर्थ घेतल्यास रामदास कवि ठरतील. कवि म्हणजे प्रतिभावंत पुरुष अथवा स्त्री–मग तो गणिति असो, वेदान्ती असो, योद्धा असो, चित्रकार असो, साधु असो, दाता असो, शिल्पी असो. या अर्थानें रामदास प्रतिभावान कवि आहेत असेंच म्हणावें लागेल. धीट, पाठ, या वर्णांतील कवि निराळे व प्रासादिक कवि निराळे. व्यवहार शिकविणारा, अनिष्टापासून रक्षण करणारा व ममतेनें उपदेश करणारा असा जे व्यास, वाल्मीकि, मुक्तेश्वर, कालिदास, शेक्सपीअर, लोपड, व्हीगो, वगैरे लोक आहेत त्यांत दासांची गणना व्हावी.

यानंतर राजवाडे यांनीं दासबोधाच्या हेतूचें फार सखोल असें विश्लेषण करून आपल्या धारदार व मर्मग्राही वृत्तीचें दर्शन घडविलें आहे. नाना किंतू निवारून, नाना संशय छेदून, नाना आशंका फेडून, भक्तीचा, वैराग्याचा, मोक्षप्राप्तीचा, आत्मज्ञानाचा उपदेश करण्याचा ह्या ग्रंथाचा मुख्य हेतु आहे. ह्या हेतूच्या अनुषंगानें नाना मतें, कवित्व, चातुर्य, राजकारण, गुरुत्व, शिष्यत्व वगैरे व्यवहारज्ञानाचें निरूपण पुढें आहे. या निरूपणाच्या ध्यासानें अज्ञान नष्ट होऊन बद्ध मुमुक्षु होतात, वैराग्य अंगीं बाणतें, अवलक्षणी सुलक्षणी होतात, धूर्त व विचक्षण समयज्ञ बनतात, आळशी साक्षेपी होतात, मूर्ख दक्ष होतो, मोक्षदर्शन हा हेतु, उपदेश हें मुख्य साधन व मोक्ष हें फळ आहे; आणि अशी ही त्रिविध घटना ध्यानांत यावी म्हणून राजवाडे यांनीं दासबोधाचें अंतरंग विस्तारानें उलगडून दाखविलें आहे. नीतीची व धर्माची स्थापना केल्यानें परमार्थ जो मोक्ष

अथवा मुक्ति अथवा स्वतंत्रता, तिची अंशतः प्राप्ती होते, परंतु ती पूर्णपणें होण्यास, तिच्या आड कोणतेही अडथळे न येण्यास, एका साधनाची जरूरी आहे; आणि तें साधन म्हणजे स्वराज्यसंपादन. या राज्यसंस्थापनाचें महत्त्व समर्थांनीं पुनः पुनः विवरून सांगितलें आहे म्हणून राजवाड्यांचें व त्यांचें जमलें आहे. नीति, धर्म व राज्य ह्या परमार्थाप्रत नेणाऱ्या संस्था स्थापाव्यात एवढेंच सांगून समर्थ थांबले नाहींत तर त्यांची स्थापना कशी करावयाची हेंहि त्यांनीं विवरून सांगितलें आहे. धर्मस्थापनेसाठीं, नीतिस्थापनेसाठीं राज्यसाधनेसाठीं भक्तमंडळ्या, संत मंडळ्या, ब्राह्मण मंडळ्या स्थापन कराव्यात असें समर्थांनीं सुचविलें आहे. कारण राज्यस्थापनेच्या द्वारेंच जीवात्म्याला परमार्थाचा, मोक्षाचा, मुक्तीचा वा स्वातंत्र्याचा पूर्ण लाभ होतो असा समर्थांचा सिद्धान्त आहे.

राजवाडे यांच्या शोधक व मर्मग्राही बुद्धीचा आणखी एक नमुना दिसतो तो असा कीं भगवद्गीता व दासबोध यांतील कर्मयोगाची तुलना त्यांनीं फार चांगल्या रीतीनें करून दाखविली आहे. सर्व कर्मांचा त्याग करणें हा संन्यास नव्हे तर सर्व कर्में इतरेजनांप्रमाणें किंवा अधिक समर्थपणें करून फलाचा लोभ न धरणें हा खरा संन्यास होय. दासबोधाचें वैशिष्ट्ये राजवाड्यांच्या मतें हें आहे. दासबोधास बद्ध व परतंत्र महाराष्ट्रास मुक्त करून कर्तव्यतत्पर करावयाचें होतें. गीताकालीन अथवा ज्ञानेश्वरकालीन प्रश्नांपेक्षां दासबोधकालीन प्रश्न खूप वेगळा होता. दासबोधकालीं राज्यसंस्था म्लेंच्छांच्या म्हणजे परधर्मीयांच्या हातीं गेली असल्यानें नीति, धर्म यांचा नाश झाला होता. समाज विस्कळित झालेला होता. "म्लेंच्छ राजाचें व उमरावांचें वैभव पाहून लोकांस स्वतःचे आचार, विचार, शास्त्र, सिद्धान्त, चाली, रीति, देवधर्म वगैरे सर्व कुचकामाचें वाटूं लागले. स्वतःचीं देवस्थानें सोडून लोक दाउद–उल्य–मुल्ख उर्फ दावलमलक नामक मुसलमान पीराला भजूं लागले. कित्येकांनीं तुर्की उर्फ मुसलमानी धर्म स्वीकारिला. ब्राह्मणांचा बुद्धिनाश झाला. शूद्र व अतिशूद्र ब्राह्मणांना शास्त्र शिकवूं लागले. मनोदौर्बल्य येऊन ब्राह्मणहि त्यांचा उपदेश ऐकूं लागले......चातुर्वर्ण्य नष्ट झालें. व सर्वत्र बेबंदशाही गाजूं लागली......तीर्थक्षेत्रांचा धुव्वा उडला. मूर्ति फोडिल्या गेल्या. बायका भ्रष्ट झाल्या. आणि धर्महि बहुतेक गेल्यासारखा झाला."[1] अशा परिस्थितींत लोकांना नीति, धर्म व राज्य यांच्या स्थापनेचा मार्ग दासबोधास दाखवावयाचा होता. महाराष्ट्रधर्माचें निरूपण यासाठींच समर्थांनीं केलें.

समर्थांच्या परमार्थनिरूपणाचा परिचय करून दिल्यानंतर राजवाडे यांनीं त्याची परीक्षा युरोपीयन शास्त्राच्या कसोटीवर पाहण्याचा प्रयत्न केला आहे. एकंदर मानवी मनाच्या सर्व धडपडीचा अर्थ काय? सुखवृद्धि? अर्थवृद्धि?

---

१ राजवाडे लेख संग्रह : साहित्य अकादेमी, पृष्ठ २५४

शरीररक्षण ? यांसारखे कांहीं हेतु आहेत कीं राष्ट्रीय सद्‌गुणांची वाढ, राज्यस्थापनेची लालसा यांसारखे आहेत ? परंतु हे प्रश्न वरवरच्या परीक्षेचे आहेत. राजवाडे यांच्या मतें मानवी हालचालींची नोंद हेगेलेसारख्या तत्त्ववेत्यांनीं ज्या प्रकारें घेतली आहे तो प्रकार समर्थांना अधिक जवळचा आहे. मानवाच्या बाह्य धडपडीकडे लक्ष न देतां त्याच्या शुद्ध, निर्मळ व निरुपाधिक आत्मरूपाकडे लक्ष द्यावयास हवें, या हेगेलेच्या ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचा राजवाडे यांनीं परिचय करून दिलेला आहे व त्याचें समर्थांच्या तत्त्वज्ञानाशीं साम्य दर्शविलें आहे; आणि निष्कर्ष काढिला आहे कीं रामदास हे इतिहासतत्त्वनिरूपण करणारे महाराष्ट्रांतील प्रथम ग्रंथकार आहेत. पूर्वीचे साधु एकदेशी होते, रामदास सर्वदेशी होते. पूर्वीच्या साधूंनीं ब्राह्मणांचे दोष दाखविल्यामुळें चातुर्वर्ण्य संपत आलें तर रामदासानें दोष दाखविले पण सुरक्षिततेचा रस्ता कोणता हेंहि चातुर्वर्ण्यघटित लोकांना कारुणिक बुद्धीनें दाखवून दिलें. इतर संतांनीं भक्ति व नीति यांकडेच विशेष लक्ष दिलें, रामदासांनीं राष्ट्रीय व राजकीय दिशेनें विचार केला. इतर संत व समर्थ यांच्यातील साम्यभेद सांगून झाल्यानंतर राजवाडे यांनीं दासबोधांतील शुद्धाशुद्धें, रामदास-शिवाजी संबंध, दासबोधांत योगमार्ग कां नाहीं वगैरे किरकोळ मुद्यांचा परामर्श घेऊन हा अप्रतीम निबंध संपविला आहे. या निबंधाच्या निमित्तानें रामदास व इतर संत यांच्या संबंधीं जे महत्त्वाचे मुद्दे उपस्थित झाले त्यांविषयीं पांगारकर, देव, फाटक, ज. स. करंदीकर इत्यादींनीं विस्तृतपणें विवेचन केलेलें असल्यामुळें व हा एक स्वतंत्र ग्रंथाचा विषय असल्यानें येथें त्याचा विस्तार एक अभिप्राय देऊन आवरतां घेणेंच युक्त होईल.

राजवाडे यांच्या या ‘ रामदास ’ निबंधाचें अति समर्पक व मर्मग्राही समालोचन म. म. द. वा. पोतदार यांनीं केलें आहे. ते लिहितात, “—रामदासांच्या दासबोधाविषयीं पुष्कळ विद्वानांनीं व विचारी पुरुषांनीं आजवर आपलें म्हणणें प्रसिद्ध केलें आहे. परंतु राजवाडे यांनीं रामदासहृदयाविष्कारांत जें क्रांतिदर्शित्व प्रकट केलें आहे त्याची योग्यता कोणाच्याहि एतद्विषयक निबंधास यावयाची नाहीं. हा निबंध प्रसिद्ध झाल्यानंतरच खऱ्या रामदासी संशोधनास शंकर श्रीकृष्ण देव प्रभृतींनीं आरंभ केला. आज रामदासी संशोधन हा एक कित्ता घेण्यासारखा नमुना झाला आहे. त्याचें मूळ राजवाडे ह्यांच्या वरील निबंधांत आहे असें म्हटलें तरी चालेल. दासांचा ग्रंथ म्हणजे इतिहासतत्त्वनिरूपणाचा ग्रंथ असून तें निरूपण आत्मिक स्वरूपाचें केलें आहे; हा अत्यंत मननीय सिद्धान्त राजवाडे यांनीं ह्या निबंधांत प्रसिद्ध केला आहे. त्यावरून त्यांचें एक प्रकारचें प्रज्ञाचक्षुत्व दिसून येतें असें म्हटलें पाहिजे.

“ दासबोध हा इतिहासतत्त्वनिरूपणपर असा मराठींतील पहिला ग्रंथ असें राजवाडे म्हणतात तें जितकें खरें तितकेंच राजवाडे हे ह्या ग्रंथाचें स्वरूप

समाजावून सांगणारे पाहिले तत्त्ववेत्ते होते हेंहि खरें. दासबोधांतहि वेदान्तविवेचन आहे; आणि इतर महाराष्ट्रीय साधु संतांच्याहि ग्रंथांत त्या विवेचनाच्या आनंदाची लूट मांडलेली आहे. परंतु दासांच्या विवेचनांत एकदेशीपणा कसा टाळला आहे आणि म्हणून तें दासकृत तत्त्वनिरूपण कसें सर्वदेशी आणि उपयुक्त झालें आहे याचें मार्मिक प्रतिपादन राजवाडे यांनीं आपल्या प्रतिभेच्या बळानें केलें आहे. किंबहुना ह्याच प्रतिभेच्या अथवा जिनिअसच्या बळावर दासांनीं आपला ग्रंथ रचला आणि त्याच प्रतिभेच्या साहाय्यानें राजवाडे ह्यांनीं त्याचें रहस्य आविष्कृत केलें "[१]

वरील 'रामदास' या निबंधाशिवाय 'रामदास-रामदासी' या मासिकांत राजवाडे यांनीं 'श्रीसमर्थांचा सांप्रदाय' व 'श्रीसमर्थसांप्रदायाचे हेतु, उगम व स्वरूप' या नांवांचे दोन लेख लिहिले त्यांचाहि उल्लेख याच संदर्भात करावयास हवा. श्रीसमर्थसांप्रदायाचें वैशिष्ट सांगतांना राजवाडे यांनीं सांगितलें आहे कीं रामदासांना मानवी गुरु कोणीहि नव्हता. इतर भागवतधर्मीय संतांची साक्ष याच्या उलट आहे. प्रत्येकास कोणी ना कोणी तरी गुरु असतोच. पण समर्थांनीं आपले गुरु खुद्द श्रीदाशरथी राम आहेत. असें मानलें आहे. हनुमंत हें त्यांचें दैवत, सांप्रदाय स्वरूपसांप्रदाय, मठ अयोध्येचा, उपासना मारुतीची, रामाखेरीज अन्य दैवत समर्थांना नाहीं. या दृष्टीनें समर्थांचा सांप्रदाय हा स्वतंत्र आहे. समर्थांनीं दाशरथी रामास आपला गुरु कां मानिलें? हेंच आराध्य दैवत त्यांना कां पसंत पडलें? केवळ घरीं रामाची उपासना होती म्हणून हें वरवरचें कारण ठरेल. राजवाडे अधिक खोलांत शिरले आहेत. समर्थसांप्रदायाचा हेतु कोणता असावा हें शोधतांना रामचंद्र या दैवताची उपासना समर्थांनीं कां आरंभिली याचा खुलासा त्यांनीं केला आहे. लोकोद्धार करावा, महाराष्ट्रांतील लोकांचा उद्धार करावा, स्वधर्मीयांचा उद्धार करावा अशी समर्थांची एक व्यावहारिक पण खंबीर दृष्टि होती. सनातन धर्माबद्दलचें प्रेम, देवप्रामाण्य, बीजक्षेत्रशुध्यर्थ जातिसंस्था, श्रुतिस्मृत्युक्त धर्म या परंपरेंत समर्थ वाढले. कृष्णातटाकीं राहून सनातनधर्मीयांचा उद्धार करण्याच्या समर्थहेतूंत राजवाडे यांना संकोचाची भावना वाटत नाहीं. उलट प्राप्त परिस्थितींत तीच व्यवहार्य वाटतें. मतमतांचा गलबला, भाषाभाषांचा गलबला, वंशावंशांचा गलबला सर्वत्र चालू आहे, समाजांत पाखंडें निर्माण झालीं आहेत, भय, क्रौर्य, असूया, कार्पण्य, अज्ञान, लोभ यांनीं ग्रस्त झालेल्या समाजास राष्ट्रधर्म शिकविण्यास समर्थांनीं आपलें क्षेत्र सीमित केलें; आणि मर्यादापुरुषोत्तम राम, उत्तम पुत्र, उत्तम भार्या, उत्तम भ्राता, उत्तम स्नेही, उत्तम लढता, उत्तम धनी, उत्तम असुरहंता, न्यायी, नीतिमान् अशा रामासच त्यांनीं आपलें उपास्य दैवत केलें. कार्य, कार्यदेश, कार्यसमाज उपास्य-

१. म. म. द. वा. पोतदार, श्रीसमर्थ रामदास, प्रस्तावना : सन १९२६

दैवत यांची निश्चिती झाल्यावर मंडलीकरण ऊर्फ समुदयन या कल्पनेस जोर देऊन समर्थांनीं शेकडों मठ स्थापिले. महंत निर्माण केले. त्यांना नित्य नैमित्तिक क्रम घालून दिले. हरिभजन, राजकारण व सामाजिक कर्मकौशल यांचा मार्ग आखून दिला. परमार्थ-साधनाबरोबरच स्वराज्यसाधन असें समर्थसांप्रदायाचें स्वरूप राजवाडे यांच्या मतें आहे.

राजवाडे यांचा आणखी एक गाजलेला निबंध म्हणजे 'कादंबरी' हा होय. वास्तविक ललित रम्य अशा कथाकादंबरीकडे वा नाटकाकडे लक्ष देण्याची प्रवृत्ति राजवाडे यांची नाहीं.परंतु त्यांनीं लिहिलेला कादंबरी हा टीका लेख आजहि एखाद्या मानदंडाप्रमाणें मार्गदर्शक आहे. कादंबरीसारख्या विषयावरहि त्यांचें वाचन किती होतें, चिंतन कशा प्रकारचें होतें, त्यांतील सामाजिक आशय किती प्रखर होता हें पाहून आपणांस एक प्रकारचें नवल वाटतें. लहान गोष्टी, अद्‌भुत कथा व वस्तुस्थित्यादर्शक कथानकें या तीन घटकांनीं सिद्ध झालेल्या कादंबरी सारस्वताची स्थूल कल्पना दिल्यानंतर व परकीय भाषांतील कथाग्रंथाची मर्यादा सांगून झाल्यावर राडवाडे अद्‌भुत कथांकडे वळले आहेत. मुक्तामाला, रत्नप्रभा, मंजुघोषा, विचित्रपुरी या अद्‌भुतरम्य वातावरणाच्या व कथावस्तूंच्या कादंबऱ्या मराठींत प्रारंभीं निर्माण झाल्या. या अद्‌भुताचा उगम कोठून आहे? अद्‌भुताबद्दलची माणसाची आवड ही राजवाड्यांच्या मतें माणसाच्या एक प्रकारच्या दुर्बलतेंतून निर्माण झालेली असते. या अनंत सृष्टींत ज्यांच्यावरती मनुष्याचा काडीचाहि ताबा नाहीं, ज्यांच्याशीं त्यांना यत्किंचित्‌हि ढवळाढवळ करतां येत नाहीं अशा परस्वाधीन जगतांशीं माणसास संबंध जोडावासा वाटतो. पण तो जोडला मात्र जात नाहीं. तेंव्हा मनुष्य प्राणी कल्पनेच्या सृष्टींत, अद्‌भुताच्या सृष्टींत प्रवेश करतो. वास्तविक सृष्टींत जें निव्वळ असंभवनीय तें तो अद्‌भुत सृष्टींत शक्य करून सोडतो. हवेंत चालणारी माणसें, सर्व सौंदर्यसंपन्न स्त्रिया, अखिलगुणालंकृत राजपुत्र, कोठेंहि न सापडणारें रामराज्य हीं सर्व अद्‌भुत सृष्टीची प्रजा आहे. ज्या ज्या वस्तूंत वास्तविक सृष्टींत व्यंग सापडतें, ती वस्तु अद्‌भुतांत सांग अशी हटकून मिळते. धर्म, नीति, वेदान्त, इतिहास, गणित, नाटक, कादंबरी, चित्रकला, मूर्तिकला, स्थापत्य, कायदा, कविता इत्यादि सर्व स्थलीं अद्‌भुतांचा संचार आहे 'धर्मांतील ईश्वराची कल्पना, नीतींतील आत्यंतिक सुखाची कल्पना, गणितांतील शून्याची कल्पना, वेदान्तांतील सच्चिदानंदाची कल्पना, इतिहासांतील सुराज्याची कल्पना, नाटकांतील अघटित घटना, चित्रकलेंतील सौंदर्यातिशयाची कल्पना, कायद्यांतील हक्काची कल्पना, ह्या सर्व वास्तविक सृष्टींतील नसून निव्वळ अद्‌भुत सृष्टीपैकीं आहेत; आणि असें असून, म्हणजे वास्तविक सृष्टींतील नसून त्याच्या इतका वास्तविकपणा दुसरा कोठेंच नाहीं.'[1]

शास्त्राचा विषय थोड्यांफार मर्यादेनें सोडून दिला तर काव्य, कादंबरी,

१. राजवाडे लेखसंग्रह : साहित्य अकादेमी; पृष्ठ २६९

चित्रकला, मूर्तिकला, स्थापत्य वगैरे ललितकला आपल्या अद्‌भुत देवींचीं माहेर-घरेंच होत. या अद्‌भुताची स्थूल माहिती दिल्यावर राजवाडे अद्‌भुताची ऐतिहासिक परंपरा दाखवितात. नवा करार, शिबी धर्मग्रंथ सारे अद्‌भुत कथांनीं भरून निघाले आहेत. या अद्‌भुताचा समाजावर आजहि फार मोठा ठसा आहे. बायबलमधील अद्‌भुतावरील चित्रपट व आपले पौराणिक चित्रपट यशस्वी होतात ते या अद्‌भुताच्या बळावर. राजवाडे यांच्या मतें 'गुरुचरित्र' ही सुद्धां एक अद्‌भुत कादंबरीच होय. या अद्‌भुत कथांचें वेड लोकांना कां आहे ? याचें कारण मानवाच्या स्वभावांत दडलेलें आहे. सर्वसामान्य माणसांना तर्कानें, बुद्धीनें, विवेकशक्तीनें, कांहीं पटतच नाहीं. एखादें तत्त्व देहधारी मानवाच्या वा त्यापेक्षां देवाच्या चरित्रांत थोडें वेगळ्या प्रकारचें दिसलें तर तें माणसांना पटतें. यांतून अद्‌भुताचा जन्म आहे. मराठी लोकहि राजवाड्यांच्या मतें अद्‌भुताला पारखे नाहींत. गीता, रामायण, महाभारत, पुराणें, संतचरित्रें यांच्या मराठी आख्यानांवर मराठी माणसे परिपुष्ट झालेली आहेत; आणि याच अद्‌भुता-वर पोसलेल्या आत्मलीन, बाह्य हेतुरहित कादंबऱ्या प्रारंभींच्या काळांत मराठीत निर्माण झाल्या. राजवाडे यांना अर्थात् या अद्‌भुत कथांची मातबरी वाटत नाहीं. हेतुविहीन लिहिण्याचा त्यांना मनस्वी तिटकारा. म्हणून विचित्रपुरी कादंबरींत अद्‌भुतता असली तरी तिच्यातील नायक भुताखेतांचे व पिशाच्चराक्षसांचे कट्टे शत्रु दाखविले आहेत. राजवाडे यांच्या मतें येथें अद्‌भुत व वास्तवता यांचा संगम आहे. अद्‌भुतावरून एकदम वास्तवावर येणें संभवनीय नसतें. बरवर अद्‌भुताचा पोषाख व आंत वास्तवाचा विचार असाच धागा सर्वत्र असतो.

अद्‌भुताकडून वास्तविकाकडे असणारा ओघ हा इंग्रजी कादंबऱ्यांवरून आमच्याकडे आला हेंहि राजवाडे यांनीं नेमकें हेरलें आहे. इंग्रजींतील अगदीं सामान्य वास्तव कादंबऱ्या हा आमचा झरा आहे. त्यामुळें आमचें प्रारंभींचें कादंबरी वाङ्मय वास्तवावर आधारलेलें असलें तरी निकृष्टच निघणार अशी राजवाडे यांची खात्री आहे. रेनाल्ड्स, मिसेस हेन्री वुड, लॉर्ड लिटन यांसारख्या तिसऱ्या दर्जाच्या कथाकारांकडे आमची ओढ राजवाडे यांना त्रस्त करणारी वाटते. अनुकरण कोणाचें व किती करावें हें समजण्याची पात्रताहि आपणांत नाहीं याचें राजवाडे यांना आश्चर्य वाटतें. आपल्या मनाची उथळ स्थिति व बालिश भाव केवळ भिकार अनुकरणावरच किती काळ जगणार ? परकी कादंबरीचें कथानक घ्यावें, पात्रांना मराठी नावें द्यावींत कीं झाली मराठी कादंबरी. तिकडील ग्रंथकारांचा स्पर्श झाल्याशिवाय आपल्या लेखकांना स्फुरण कां चढत नाहीं ? स्कॉट, डिकन्स, थॅकरे बॅल्झॅक, ह्यूगो, डूमा, झोला, टॉलस्टॉय, या वस्तादांच्या हातून उतरलेल्या कादंबऱ्यांच्या तोडीची एकहि कादंबरी आपले लेखक कां लिहूं शकत नाहींत ?

या प्रश्नाचें उत्तर शोधण्यासाठीं राजवाडे आणखी सूक्ष्मपणें विचार करीत

आहेत. पाश्चात्य कादंबरीविश्वाचें यासाठीं त्यांनीं थोडक्यांत चित्र उभें केलें आहे. व्यक्तिविषयक कादंबऱ्यांत मामुली डामडौल व क्षणिक करमणूक असते. या कादंबऱ्यांविषयीं राजवाडे यांना मनापासून प्रेम नाहीं. या हीन कादंबऱ्यांच्या खटाऱ्याचा मैला सोडून दिला म्हणजे पुढें मनुष्यमात्राच्या उच्च व नाजुक विचारांचें व विकारांचें प्रदर्शन ज्यांत आहे अशा व्यक्तिचित्रणात्मक कादंबऱ्यांची उत्तेजक हवा लागते. देशप्रीति, लोकोपकार, वात्सल्य, प्रेमबंधन, वगैरे उदात्त भावनांची चिकित्सा गोल्डस्मिथ, रिचर्डसन, स्कॉट, डिकन्स वगैरेंच्या कादंबऱ्यांतून असते. बॅल्झॅक व डयूमा यांच्या कादंबऱ्यांची राजवाडे यांनीं मोठी तारीफ केली आहे. कारण यांचें लक्ष व्यक्तीपेक्षां समाजाकडे विशेष असतें. यांचें कारणहि असें कीं फ्रान्स, रशिया, युनायटेड स्टेट्स इत्यादि देशांतील सामाजिक क्रांतीहि तितकीच भव्य व उदात्त असल्यामुळें तेथील कादंबरीकारांनाहि तीव्र स्पंदन प्राप्त होऊन कादंबरीच्या द्वारें समाजाच्या वेदना व आवेशभावना बाहेर आल्या. उलट इंग्लंडमध्यें आणीबाणीचे प्रसंग त्या मानानें फार कमी म्हणून त्यांचें कादंबरीवाङ्मयहि त्या मानानें तोटकें व कमी दर्जाचें आहे. या साम्राज्यवादी देशांत एका राजकीय व्यापारी महत्त्वाकांक्षेपुढें सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक सुधारणांकडे लक्ष देण्यास या देशास वेळच उरला नाहीं. साम्राज्यसत्तेपुढें उदात्त विचारांचे ग्रंथ लुप्त झाले असें राजवाडे यांचें निरीक्षण आहे. या उलट फ्रान्स, रशिया वगैरे देशांची स्थिति आहे. टॉलस्टॉय, झोला, ह्यूगो यांनीं लिहिलेल्या कादंबऱ्यांच्या तोडीची एकहि कादंबरी इंग्रजींत नाहीं.

या तुलनेनें आतां मराठीची अवस्था कशी आहे याकडे राजवाडे वळलेले दिसतात. त्यांना मराठींत फक्त हरि नारायण आपटेच दिसतात; आणि तें योग्यच आहे. ओक यांच्या शिरस्तेदार या कादंबरीचाहि त्यांनीं आवर्जून उल्लेख केला आहे. मराठींतील कादंबऱ्या युरोपीयन कादंबऱ्यांपेक्षां फार कमी दर्जाच्या हें राजवाड्यांना मान्य आहे. अद्भुत--रोमँटिक व वास्तववादी-रिॲलिस्टिक या कादंबऱ्यांचा संबंध वर्णन करतांना राजवाडे यांनीं एक मार्मिक वाक्य लिहिलें आहे. त्यांच्या मतें शुद्ध अद्भुत किंवा शुद्ध वास्तविक असें या जगांत कांहींच नाहीं. जगांत दोहोंचें मिश्रण आहे. म्हणून राजवाडे यांनीं स्पष्टपणें सांगितलें आहे कीं 'संसारांतील समाजांतील जीं तऱ्हतऱ्हेचीं कृत्यें त्यांपैकीं अनेकांचा लोप करून कांहीं तेवढीं प्रामुख्यानें, तीं मुळांत असतील त्यापेक्षां जास्त ठळठळीत करून दाखवावयाचीं हेंच कादंबरी रचनेचें मुख्य रहस्य आहे... चित्रकर्म्याप्रमाणें कादंबरीलेखन ही एक कला आहे आणि चित्रांत हुबेहूब वस्तु उठवून देणें हें जसें अशक्य असतें, पांढरे आणि काळे यांचें मिश्रण करून नेत्रांना हुबेहुब वस्तु दिसली असा भ्रम पडावयाचा असतो, तीच तऱ्हा कादंबरीचीहि असते.--"[१] राजवाडे यांच्या

१ राजवाडे लेखसंग्रह, साहित्य अकादेमी : पृष्ठ २८६

मनांतील याचा अर्थ असा कीं निव्वळ वास्तवता कादंबरीस पेलणारी नाहीं. राजवाडे यांचा हा विचार त्या वेळच्या कादंबरीटीकेनुसार किती तरी सूक्ष्म व मूलगामी आहे. प्रत्येक वास्तववादी कादंबरींत अद्‌भुत असावयाचेंच. पृथ्वीला सोडून जसें मनुष्यत्व नाहीं, तसें अद्‌भुताला सोडून कादंबरीत्वहि नाही. समाजांत जें आहे तें सर्व वास्तव म्हणून चितारावयाचें हेंहि कादंबरीकाराचें काम नव्हे असें राजवाडे पुनः पुनः सांगतात. त्यांत निवड व्हावयास हवी. मग या निवडींत दारिद्र्य, गलिच्छपणा, अज्ञान यांचें चित्रण आल्यास हरकत नाहीं. समाजांतील पतित लोकांचें चित्रणाहि कादंबरीकारानें करावयास हवें असें राजवाडे यांना वाटतें.

मराठी कादंबरी अजून फार मागें आहे याचें राजवाडे यांना वाईट वाटतें. ह्यूगो, टॉल्स्टॉय यांच्याशीं बरोबरी करण्यासाठीं काय करावयास हवें? राजवाडे नेमकें मर्मावर बोट ठेवून लिहितात, "ह्यूगो, टॉल्स्टॉय ह्यांच्यासारखी ग्रंथ-रचना व्हावी अशी इच्छा असेल तर त्याला एकच उपाय आहे. ह्यांच्यासारखी मनें या देशांतील कादंबरीकारांचीं बनलीं पाहिजेत. विधवचीं दुःखें पाहून जीव तिळतिळ तुटला पाहिजे. गरिबांची उपासमार पाहून स्वतःच्या घशाखालीं घांस उतरतां कामा नये. स्वदेशाचें दैन्य पाहून रात्रींची झोंप डोळ्यांवरून उडून जावी. स्त्रियांची बेअब्रु झालेली पाहून द्रौपदीच्या भीमाप्रमाणें त्वेष यावा. ही मनोवृत्ति ज्यांची झाली, ह्या ब्रह्मानंदीं ज्यांची टाळी लागली, त्यांनींच कप्तान ड्रेकूची बाजू घेऊन सर्व राष्ट्रांविरुद्ध भांडावें व रशियांतील पातशाहांनाहि चळवळ कापावयाला लावावें. इतरांची माय हीं कामें करणाऱ्या कादंबरीकरांना व्याली नाहीं! तेव्हां उत्तमोत्तम कादंबरीकार व्हावयाचें म्हणजे मनोवृत्ति अशी अत्यंत जाज्वल्य पाहिजे. श्रेष्ठ विद्या, विस्तृत वाचन, मोठा प्रवास, तीक्ष्ण निरीक्षण, कडक परीक्षण, थोडें औदार्य, गाढ सहानुभूति व नाटकी लेखणी हे गुण तर नांव घेण्यासारख्या प्रत्येक कादंबरीकारांत हवेतच; परंतु सर्वांत मुख्य गुण म्हटला म्हणजे जाज्वल्य मनोवृत्ति हवी. तिच्या अभावी वरील सर्व गुण व्यर्थ होत. ही मनोवृत्ति कृत्रिम तऱ्हेनें येणें नाहीं. ही ईश्वराची देणगी आहे. उत्तेजक मंडळ्यांच्या बक्षिसांनीं किंवा प्रोत्साहक सोसायट्यांच्या देणग्यांनीं रद्दड कविता, रद्दड कादंबऱ्या, रद्दड नाटकें, रद्दड चरित्रें अशी सर्व रद्दड ग्रंथप्रजा उत्पन्न होईल. तेजस्वी ग्रंथसंपत्ति निर्माण व्हावयाला जाज्वल्य अशा प्रखर मनोवृत्तीच्या जातीचा अंकुर पाहिजे. बक्षिसांनीं प्रासादिक ग्रंथ निर्माण होते तर बाळाजी बाजीरावानें म्हटल्या-प्रमाणें चुटक्यांनीं पोरेंहि झालीं असतीं."[1] राजवाडे यांचा हा अभिप्राय परखड व कडक असला तरी आजचे मराठी कादंबरीकार व त्यांचे समीक्षक यांना निश्चित् मार्गदर्शक होईल.

---

१. कित्ता : पृष्ठ, २९१

राजवाडे यांच्या साहित्यविषयक विचारांचा परामर्श पूर्ण होण्याच्या दृष्टीनें आणखी एकदोन लेखांचा उल्लेख येथें करावयास हवा. फादर स्टीफन्सच्या ख्रिस्त पुराणावरील राजवाडे यांची टीका मौलिक आहे. स्टीफन्सनें ख्रिस्तपुराण प्रथम पोर्तुगीज भाषेंत रचलें व पुढें सन १६१४ त्यानें त्यास मराठी वेष दिला. लिपि रोमन आहे. सन १९०६ मध्यें श्री. साल्ढाणा यांनीं ख्रिस्तपुराणाची एक आवृत्ति प्रसिद्ध केली. स्टीफन्सचा मराठीचा अभिमान प्रसिद्ध आहे. राजारामशास्त्री भागवत यांनीं या पुराणास महाकाव्य ठरविलें. तें राजवाडे यांना खपलें नाहीं. या पुराणाच्या भाषेसंबंधीं राजवाड्यांचें मत अनुकूल नव्हतें. त्यांच्या मतें हें पुराण गांवढळ व अशिष्ट अशा मराठी भाषेंतील आहे. तरी व्याकरणाच्या दृष्टीनें यांतील कांहीं शब्दांचीं रूपें अभ्यासण्यासारखीं आहेत असें मत त्यांनीं नमूद केलें आहेच.[१]

ग्रंथकारांचें संमेलन सन १९०९ मध्यें बडोदें येथें भरलें होतें. त्यावर एक लेख राजवाडे यांनीं ‘ राष्ट्रोदय ’ मासिकांत लिहून संमेलनास कांहीं विधायक सूचना केलेल्या आहेत. साहित्यपरिषदेचें कार्य किती विविधमार्गी असावें याचा तपशील त्यांनीं दिलेला आहे. राजवाडे यांनीं प्रथम सुचविलें आहे कीं परिषदेनें प्रतिभावंत साहित्यिकांचें अभिनंदन करावें, दरिद्री असल्यास द्रव्यसाहाय्य करावें, प्रतिभावंतांची संभावना हें एक महत्त्वाचें कार्य परिषदेनें मानावें. दुसरें असें कीं प्रतिभासंपन्न साहित्य निर्माण करणें अवघड आहे, पण प्रतिभेस आवश्यक अशी साधनसामग्रीची पूर्वतयारी परिषदेनें कां करूं नये? भूत व वर्तमान ग्रंथांचा संग्रह परिषदेनें करावा. भाषेचा सशास्त्र इतिहास, व्याकरण, कोश वगैरेंची सिद्धी, दरवर्षीच्या जंगम वा स्थाणु वाङ्मयाचें परीक्षण, हीं कामें साहित्यसंस्थेनें करावींत. पुस्तकांच्या द्वारा ज्ञानप्रसार सुलभ व्हावा म्हणूनहि साहित्य परिषदेला कार्य करतां येईल. या सर्व कामांसाठीं ग्रंथसंग्राहक मंडळ, साहित्यरचक मंडळ, ग्रंथपरीक्षक मंडळ, सुलभज्ञान-प्रसारक मंडळ अशीं चार मंडळें निर्माण व्हावींत असें राजवाडे यांनीं या लेखांत सुचविलें आहे. प्रत्येक मंडळाच्या कामाची स्थूल रूपरेखाहि त्यांनीं दिलेली आहे.[२]

राजवाडे यांनीं सुचविलेल्या किती योजना साहित्यसंस्थेनें गेल्या पन्नास वर्षांत मार्गस्थ केल्या हें पाहण्याचें येथें कारण नसलें तरी गाजून राहिलेली वाङ्मयेतिहासाची योजना मात्र येथें एका संदर्भासाठीं उल्लेखित करावयाची आहे. महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास, या नांवाचा एक लेख राजवाडे यांनीं लिहिला आहे व त्यांत भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास निराळा असतो हेंच महाराष्ट्र साहित्यपरिषदेच्या प्रमुखाग्रणींना कळलें नाहीं अशी

१. राजवाडे लेखसंग्रह, भाग तीन : पृष्ठ १५७

२. राजवाडे लेखसंग्रह, भाग दोन : पृष्ठ ९६

तक्रार त्यांनीं केलेली आहे. परिषदेच्या याविषयींच्या जाहिरातींतील वैगुण्यें दाखवून त्यांनीं भाषांचा इतिहास म्हणजे काय, वाङ्मयाचा इतिहास म्हणजे काय यांचा विस्तृत उहापोह केलेला आहे. भाषेच्या इतिहासासाठीं कोश उर्फ निघंटु, निरुक्त, व्याकरण, आदेशप्रक्रिया व वाक्येतिहास यांची सिद्धता व्हावयास हवी हें त्यांचें आग्रहाचें निवेदन आहे. नंतर राजवाडे वाङ्मयाच्या इतिहासाकडे वळले असून साहित्याचे त्यांनीं प्रामुख्यानें दोन विभाग केले आहेत. पहिल्या ऐहिक विभागांत शास्त्रादि विषय, व्यवहारोपकारक कलात्मक वाङ्मय आणि मनोरंजक वा मूलतत्त्वात्मक वाङ्मय अशा तीन प्रकाराचें साहित्य येतें; अणि दुसरा पारमार्थिक वाङ्मयाचा विभाग राजवाड्यांनीं कल्पिला आहे. शास्त्रेतिहास, कलेतिहास, बालोपयोगी शास्त्रकलाज्ञानप्रसारक वाङ्मयेतिहास, विदग्ध वाङ्मयेतिहास अथवा चमत्कृतिजनक वाङ्मयेतिहास व परलोक संबंध, वाङ्मयेतिहास या पांच खंडांत मराठी वाङ्मयाचा इतिहास व्हावयास हवा असें त्याचें मत त्यानीं नमूद केलें आहे. शेवटीं एकंदर या कार्याच्या खर्चाचा बेहेडा काय होतो याचाहि अंदाज त्यांनीं दिलेला आहे. संपादकांचें व मदतनीसांचें पांच वर्षांचें वेतन, प्रवास-खर्च इत्यादि धरून २,७०,००० रुपयांचा अंदाज दिलेला आहे. संपादकांचें वेतन दरमहा रुपये हजार धरलें आहे. हें चाळीस पन्नास वर्षांपूर्वींचें समजावयाचें! आणि हाहि खर्च भीतभीत राजवाडे यांनीं सांगितला आहे. हें काम फुकट होणार नाहीं असें त्यानीं निक्षून सांगितलें आहे. क्षुल्लक कामांत प्रतिभावंतांचे वा विद्वानांचे श्रम कसे वाया जातात याचें विदारक चित्र त्यांनीं या लेखाच्या शेवटीं काढलें आहे.[१]

यानंतर सन १९२६ मधील म्हणजे राजवाडे यांच्या मृत्यूच्या वर्षीतीलच एका त्यांच्या गाजलेल्या साहित्यविषयक भाषणाचा उल्लेख करावयाचा आहे. हें भाषण म्हणजे शारदोपासक संमेलनाच्या अध्यक्षीय पदावरून केलेलें त्यांनीं तळमळीचें वक्तव्य होय. मराठी भाषा, मराठी वाङ्मय यांविषयीं आपले विचार तीव्र शब्दांत त्यांनीं या भाषणांत मांडिले आहेत. भाषणाची सुरुवातच त्यांनीं मराठी भाषा मरणाच्या पंथास लागली आहे, तिचें संमेलन कसलें करतां ? अशा कडवट उद्गारांनीं स्पष्टपणें केली आहे. देशांतील राज्यकारभार परकीय भाषेंत चालतो, शिक्षित, अशिक्षित आपले व्यवहार इंग्रजींत करतात, सार्वजनिक संस्था आपला व्यवहार इंग्रजींत करतात, खाजगी शाळांतून, कॉलेजांतून बोधभाषा इंग्रजीच; सर्वत्र मराठी भाषा मरत असल्याचें चित्र राजवाडे यांनीं काढिलें. भाषेचा व त्यामुळें साहित्याचा संकोच त्यांना भारी दुःखकारक वाटला. तेव्हां मराठीला जगूं द्यावयाचें कीं मरूं द्यावयाचें हा मूलभूत प्रश्नच त्यांनीं निर्माण केला;

१. ऐतिहासिक विविध विषय, खंड पहिला : पृष्ठ ३४५–३७५

आणि मराठी भाषा जगवावयाची असेल तर तिचा वापर व्यवहारांत व्हावयास हवा, त्यासाठीं स्वराज्यसाधनाची जरूरी आहे वगैरे निर्णयाप्रत राजवाडे पोंचले आहेत. राजवाडे यांच्या भाषणांतील उद्वेगाचा अर्थ पुढल्याच वर्षीच्या याच व्यासपीठावरून केलेल्या भाषणांत अध्यक्ष डॉ. श्री. व्यं. केतकर यांनीं सहानुभूतीनें दिलेला आहे. शाळा, कोर्टें, रेल्वे यांचा कारभार या दोघांच्याहि मतें स्वभाषेंतून व्हावयास हवा. राजवाडे यांचें हें ज्वलंत अभिमानाचें व पोटतिडकीचें भाषण आज स्वराज्याच्या काळांतहि मन लज्जित करणारें वाटेल इतकें आपण आजहि परकी भाषेच्या आहारीं आहोंत. शासनाचीं पावलें प्रांतिक भाषेच्या द्वारें पडत आहेत ही बाब तेवढी अभिमानाची मानावी लागेल.

१५ : राजवाड्यांचें वाङ्मय-संशोधन : बखरसाहित्य

प्राचीन मराठी साहित्याच्या गद्य विभागांत बखरसाहित्य हा एक वैभवशाली उपविभाग आहे. महानुभावी ग्रंथकारांच्या गद्य वाङ्मयाची परंपरा नेटानें पुढें चालली नाहीं, पण बखर वाङ्मयास मात्र मराठे शाहींत वा पेशवाईत बहर आला. मराठींतील पहिली बखर कोणती, बखर म्हणजे काय ? बखरी किती प्रकारच्या, त्यांची भाषापद्धति कशी असते, बखरींचे वाङ्मयीन गुण कोणते, बखरींतून इतिहास कितपत मिळतो इत्यादि प्रश्नांची चर्चा होणें अगत्याचें आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांनीं बखरसाहित्याविषयीं वारंवार आपल्या प्रस्तावनांतून चर्चा केलेली आहे. मराठ्यांच्या पूर्वी शालिवाहनाची बखर, मानभावकृत सिंघणादि यादवांच्या बखरी, हेमाडपंतांची बखर इत्यादि नांवें सांगितलीं जातात. पण त्या उपलब्ध नसल्यानें त्यांचा विचार करणें जरूरीचें नाहीं. राजवाडे यांच्या पूर्वी ज्या बखरी मराठींत प्रसिद्ध झाल्या त्यांची नामावलीच त्यांनीं पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत दिलेली आहे. चिटणीसकृत शिवाजीचें सप्तप्रकरणात्मक चरित्र, संभाजी महाराजांची बखर, थोरले राजाराम महाराज यांची बखर, शाहूमहाराज यांची बखर, धाकटे राजाराम महाराज यांची बखर, सभासदरचित शिवछत्रपतींचें चरित्र, सोहनीकृत पेशव्यांची बखर, नारायणराव पेशवे बखर, भाऊसाहेबांची बखर, साष्टीची बखर, काशीराजाची बखर इत्यादि बखरग्रंथ प्रसिद्ध झाले होते.

या बखरींच्या आधारें इतिहास ग्रंथ तयार होऊं लागल्यामुळें व या इतिहासांत अनेक दोष निर्माण झाल्यामुळें बखरींचा तपास करून त्यांच्या इतिहासप्रामाण्याचा विचार करणें राजवाडे यांना अगत्याचें वाटलें. बखर शब्द बक्‌—बोलणें या धातू-पासून मराठींत आला असें राजवाडे यांनीं म्हटलें आहे.[१] पण राजवाडे यांची ही व्युत्पत्ति बरोबर नाहीं. बखर लिहिण्याची कल्पना सर्वस्वी परकीय म्हणजे मुसलमानी आहे. 'मुसलमानांच्या सहवासानें, त्यांच्या तवारिखा पाहून, मराठ्यांनींहि बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला' असें राजवाडे यांनींच मान्य केलें आहे.[२] खरें म्हणजे बखर हा शब्द अरबी 'खबर' यापासून वर्णविपर्यासानें मराठींत आलेला दिसतो. या शब्दाचा मराठी कोशांतील अर्थ, 'प्राकृत भाषेनें

१. ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ३४८

२. कित्ता : पृष्ठ २

राजादिकांचें गद्यरूप चरित लिहिलें असतें ती'[१] 'गद्य इतिहास; चरित्र'[२] 'बातमी, हकीगत, इतिहास,'[३] 'देशी भाषेंत, गद्यांत लिहिलेला इतिहास, कथानक, अगर चरित्र'[४] सारांश; बखर म्हणजे गद्यांत निवेदन केलेलें एखादें चरित्र वा एखादी हकीगत.

बखरींचे प्रकारहि पुष्कळ होण्यासारखे आहेत. व्यक्तिचरित्रें, घराण्यांच्या हकीगती, प्रसंगांच्या हकीगती, स्थलविषयक माहिती, संप्रदायांच्या बखरी, शिक्षणार्थ लिहिलेल्या बखरी, बातमी देण्यासाठीं निर्माण झालेल्या बखरी. मराठींत चांगल्या बखरींची संख्याहि फार मोठी असून भाषा व साहित्यगुण या दृष्टीने त्यांचें महत्त्व फार मोठें मानावें लागेल. परंतु यांतून इतिहास निर्माण करावयाचा म्हणजे फार अडचणी निर्माण होण्यासारख्या आहेत असें राजवाडे यांच्या ध्यानांत आलें व त्यांनीं इतर पत्रसाहित्याचा वा साधनांचा शोध घेण्याचा दीर्घ उद्योग आरंभिला. बखरींत कालविपर्यासाचा दोष बहुतेक ठिकाणीं असतो. पुराणांतील कल्पित कथांच्या संसर्गानें, मुद्रणकलेच्या अभावामुळें व ऐतिहासिक सत्यासत्यतेसंबंधीं लोक उदासीन असल्यामुळें बखरकारांचें लिहिणें अनेक प्रमादांनीं व उणिवांनीं भरलेलें असल्याचें राजवाडे यांनीं प्रथम गर्जून सांगितलें. बखरींतून स्थूल इतिहास मिळतो पण तो तपासून, इतर कागदपत्रांच्या साह्यानें परीक्षून घ्याव्या लागतो. रामरावणी कथांच्या श्रवणापासून निर्माण झालेली अतिशयोक्ति समजावून घ्यावी लागते. अनेक घटना वा प्रसंग इतिहासाशीं प्रतारणा करणारे असतात, इतकेंच नव्हे तर विसंगति निर्माण करणारेहि आढळतात. "सारांश, केवळ बखरींवर भिस्त ठेवून इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केल्यास, सत्यासत्यतेच्या निर्णयाची कसोटी जवळ नसल्यामुळें तो वायफळ जाण्याची बहुतेक खात्री आहे.......पुष्कळ ऐतिहासिक गोष्टींच्या अभावाचें साधारणत्व या बखरींतून सापडतें, परंतु तेवढ्यावरून या गोष्टी झाल्याच नाहींत असें विधान करणें मोठें धोक्याचें होईल. तात्पर्य, **एक अस्सल चिटोरें सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस्स आहे**[५]—" आणि म्हणूनच अशीं अस्सल चिटोरीं शोधून काढण्यासाठीं राजवाडे यांनीं जिवाचें रान केलें.

मराठींत दोनअडीचशें तरी बखरी निर्माण झाल्या असाव्यात असा राजवाडे यांचा तर्क आहे.[६] या संख्येंत पांचपंचवीस ओळींच्या टिपणांपासून

१. जगन्नाथशास्त्री क्रमवंत, महाराष्ट्र भाषेचा कोश : सन १८२९
२. वा. गो. आपटे, मराठी शब्दरत्नाकर
३. मा. त्रिं. पटवर्धन, फार्शी–मराठी कोश
४. महाराष्ट्र शब्दकोश
५. ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ४.
६. कित्ता : पृष्ठ ३४९.

हजार पानांच्या बाडापर्यंत संक्षिप्त व विस्तृत इतिहास आले आहेत. टिपणें, रोजनिशा, शकावली, वंशवेल, हकीगती, कुलपट, आत्मचरित्र, राजावलि अखबारा, दंतकथा, लोककथा, प्रशस्त्या, राजघराण्यांचीं वर्णनें, युद्धांचीं वर्णनें, मोहिमांचीं वर्णनें, राजनीति, स्मरणवह्या, ताम्रपट, शिलालेख, शिलशिले, दफाती, निवाडे, लेखसंग्रह, हीं सर्व बखरीचींच लहानमोठीं भावंडें होत. बखरींत कित्येक प्रसंग रसपूर्ण व वक्तृत्वपूर्ण शैलीनें रंगविलेले असतात. चटकदार सुभाषितांची मनोरम पेरणी बखरींत असते, जिवंत संवादकौशल्यामुळें बखरीस वाङ्मयीन रूप आलेलें असतें, रेखीव प्रसंगवर्णनामुळें व स्वभावचित्रणामुळें बखर साहित्यगुणांनीं मंडित असते. परंतु म्हणून तिच्यावरून इतिहास निर्माण करण्याचा मोह होणें बरोबर नाहीं. ग्रँट डफ सारख्यांनीं हा घोर प्रमाद केला म्हणून राजवाडे रागावलेले दिसतात. कारण बखरकारांच्या ज्ञानाची व्याप्ती अतिशय संकुचित होती. बखरकार हे खऱ्या अर्थानें इतिहासकार नव्हते हें प्रामुख्यानें ध्यानांत घ्यावयास हवें. परदेशी समाज, संस्कृति, व शास्त्र यांचीं तुलना स्वदेशांतील समाज, संस्कृति व शास्त्र यांशीं करावयाला न सांपडल्यामुळें मराठी बखरकारांच्या निवेदनांत इतिहासांतील पद्धति व शास्त्र यांचा अभावच आढळून येतो. सर्व बखरींचें रूप एक सारखेंच वाटतें. अवलोकन, पृथक्करण, टीका व पद्धति यांचा मागमूसहि या मराठी बखरींतून नाहीं.

संशोधनाचा अभाव हा बखरकारांचा आणखी एक दोष मानावा लागेल. आपल्या पूर्वीं कोणी काय लिहिलें आहे, आपण ज्यांची हकीगत लिहीत आहोंत त्यांचा पूर्व व प्राचीन इतिहास काय आहे, त्याचीं साधनें कोणतीं ही विवंचना बखरकारांना कधींच नव्हती. देश व काल या दोनहि दृष्टींनीं बखरकार पंगू होते. स्वदेशाचें स्वकालीन चरित्र स्वतःच्या प्रत्यक्ष किंवा ऐकीव माहितीनें जेवढें लिहितां येण्याजोगें होतें तेवढें मात्र त्यांनीं सत्यापलाप न करितां लिहिलें. या संकुचित एकदेशीयत्वाचा परिणाम कूपमंडुकन्यायानें बुद्धिमांद्याच्या रूपानें फळास आला. सकल मानव जातीच्या घटनेंत व भ्रमणांत आपली स्थिति दिक्कालावच्छेदानें कोठें आहे हें सूक्ष्म दृष्टीनें वारंवार पाहिल्यानें अवलोकनाची व तुलनेची मर्यादा विस्तार पावतें आणि स्वदेशाच्या व स्वसमाजाच्या चरित्राचें अनेक अंगांनीं वर्णन करण्याचें सामर्थ्य येतें. सारांश, तुलनेच्या साह्यानें अवलोकनाच्या बाबी वाढतात, ही गोष्ट बखरकारांच्या मनांत बिलकुल उतरली नव्हती.

साधन खंडांच्या चौथ्या विभागांत स्थल, काल, व्यक्ति व सामान्य सिद्धान्त ह्यांसंबंधीं बखरींच्या संदर्भात राजवाडे यांनीं विस्तृत समालोचन केलें आहे. यासाठीं त्यांनीं शिवचरित्रावरील प्रमुख बखरींतील मजकुराचा अनुक्रम विस्तारानें

१. कित्ता : पृष्ठ ३५१.

दिला आहे. शिवदिग्विजय, सप्तप्रकरणात्मक चरित्र, सभासदी बखर, चित्रगुप्ती बखर शिवप्रताप, रायरी बखर यांतील प्रसंगांचा क्रम पाहिल्यास पहिलीच शंका येते अशी कीं बखरींच्या प्रसंगांच्या अनुक्रमांत कांहीं मेळ नाहीं. चिकित्सेचा अभाव आहे. म्हणून बखरींवर संपूर्णपणें विश्वास ठेवणें बरोबर नाहीं असें राजवाडे मानतात इतकेंच नव्हे तर लक्ष्मणराव चिपळूणकरांनीं तो ठेविल्यामुळें ते त्यांस दूषण देतात.[1] सर्व विवेचन करून राजवाडे यांनीं बखरींच्या प्रामाण्याबद्दल खालील विधानें केलीं आहेत.

(१) बखरकारांनीं कालविपर्यासाचा दोष केला आहे.

(२) त्यांनीं स्थलविपर्यासाचा दोष केला आहे.

(३) त्यांनीं व्यक्तिविपर्यासाचा दोष केला आहे.

(४) त्यांनीं ह्या तिहींचा प्रत्येकीं व सामग्र्यानें लोप करण्याचा प्रयत्न केला आहे.

(५) त्यांना कोणत्याच प्रकारचें शास्त्रीय शिक्षण नव्हतें.

(६) त्यांना आपले विचार नीट प्रकट करतां येत नाहींत.

(७) त्यांना सामान्य सिद्धान्त स्पष्टपणें सांगण्याची ऐपत नाहीं.

मग या सर्व दोषांचें परिमार्जन कसें करतां येण्यासारखें आहे ? पाल्हाळ, अतिशयोक्ति, पुराणपद्धतीचें निरूपण, अद्‌भुताची आवड यांसारखे आणखीहि दुर्गुण बखरींत शिरलेले असतात. यांतून संशोधनाचा मार्ग कसा काढावयाचा याचेंहि दिग्दर्शन राजवाडे यांनीं केलें आहे, तें असें :—

(१) शक, सन, महिना, तीथ, वार, नक्षत्र, करण, इत्यादि जसजशी जास्त तपशीलवार माहिती दिली असेल तसतशी तिची विश्वसनीयता जास्त धरावी हा तोडगा कालापुरता तेवढा प्रमाण आहे.

(२) स्थलांचा किंवा व्यक्तींचा लोप किंवा विपर्यास झाला आहे, असा संशय आला असतां, व ह्या दोहोंसंबंधीं निरनिराळया बखरींत निरनिराळा मजकूर असल्यास, अमकाच अस्सल मानण्याच्या भरीस पडूं नये. अशा बाबतींत बहिःप्रमाणाचेंच साह्य हवें.

(३) बखरी अस्सल प्रमाण नाहींत. परंतु त्यापैकीं कांहीं भाग कोठे कोठे अस्सल प्रमाण असूं शकेल, तो तसा कोठे असूं शकेल हें बहिःप्रमाणांच्याच साह्यानें समजणार आहे.

(४) बखरींतील प्रत्येक वाक्यांचें कोठें ना कोठें तरी योग्य स्थल आहे. परंतु कोणत्या विशिष्ट वाक्याचें कोणतें विशिष्ट स्थळ असावें हें बहिःप्रमाणानें ठरवावें.

(५) कित्येक बखरींत सबंध प्रसंगाचा लोप झालेला आहे हें मुसलमानी

१. कित्ता : पृष्ठ २९६.

तवारिखांशीं ताडून पाहतां समजून येईल. मुसलमानी तवारिखांत जो प्रसंग जास्त दिला असेल त्याला मराठी किंवा मुसलमानी अस्सल पत्राचा आधार असल्याशिवाय तो खरा धरून चालू नये.

(६) परमार्थानें लिहिलेल्या अस्सल पत्रांतील सर्व मजकूर व महजरांतील बहुतेक सर्व मजकूर प्रमाण मानावा.

(७) ग्रँड डफचा इतिहास बहुत ठिकाणीं अप्रमाण आहे. त्याचीहि तडजोड बखरींच्या प्रमाणेंच कमीजास्त प्रमाणानें करावी. अस्सल पत्रांच्या आधारें जेवढा मजकूर किंवा मजकुराचा भाग लिहिला असेल तेवढा खरा भाग मानावा.

(८) समर्थांचा दासबोध व तुकारामांचे अभंग पूर्ण प्रमाण आहेत.

(९) पोवाडे बखरींपेक्षां जास्त प्रमाण आहेत.

(१०) महाराष्ट्राचें भूज्ञान हें बहिःप्रमाणाचें एक अंग आहे.

(११) बखरीचें बहुमत किंवा एकमत प्रमाण नाहीं.

(१२) तोंडी पुरावा प्रमाण नाहीं.

(१३) सुरत येथील व्यापाऱ्यांचे लेख प्रमाण नाहींत.

(१४) गोवें येथील पोर्तुगीज सरकारदप्तरांतील लेख इंग्रज व्यापाऱ्यांच्या लेखांपेक्षां जास्त विश्वसनीय समजावेत.

(१५) भूषण कवीच्या काव्यांतील उल्लेख बहुतेक प्रमाण समजावेत.

(१६) पूर्वग्रहानें अविष्ट होऊन किंवा मनोदेवतेचें प्राबल्य होऊन पूर्वींचे दोष झांकण्याकरितां किंवा राष्ट्रीय अभिरुचीला पसंत पडावें ह्या इच्छेनें किंवा परकीय लोकांच्या इच्छेला मान देणाऱ्या खोडीनें, ऐतिहासिक प्रामाण्यांची कसोटी दूषित होण्याचा संभव असतो. ही कसोटी जितकी शुद्ध ठेवितां येईल तितका ऐतिहासिक सत्यतेचा उद्गम जास्ती होईल.

अस्सल साधनें कशीं तपासावींत, कशीं प्रसिद्ध करावींत यासंबंधींच्या सर्व सूचना राजवाडे यांनीं आठव्या खंडाच्या प्रस्तावनेंत दिलेल्या आहेत. बखरीच्या व एकंदर मराठी कागदपत्रांच्या भाषेसंबंधीं सविस्तर विवेचन याच खंडांत त्यांनीं केलें आहे. मुसलमानी अंमलाबरोबर मराठी भाषेचें स्वरूप फारशी भाषेस अनुसरून होत गेलें याची चर्चा राजवाडे यांनीं ते स्वतः भाषातज्ज्ञ असल्यानें फार विस्तारानें व अनेक उदाहरणें देऊन केली आहे. त्यांच्या मतें फारशीचें निकट सान्निध्य ३३८ वर्षें मराठीस होतें. यामुळें मराठी भाषेचें स्वरूप बरेंचसें पालटून तिच्या कांहीं बाबी कायमच्या येऊन बसल्या. मुसलमानी रिवाज, त्यांची भाषा, त्यांचे देवधर्म, त्यांची राजकीय परिभाषा, त्यांचे विलास यांची छाप मराठी मनांवर कायमची आहे. भाषेवरून याची सिद्धता होण्यासारखी आहे. रोजच्या व्यवहारांत अनेक फारशी शब्द आले, खाना, दार, सराई, इमारत, झनाना, दरवाजा, दालन, हौद, दिवाणखाना, ओसरी, महाल, देवळी,

घुमट, जमीन, नक्त, कुलूप, किल्ली, छपर, तालीमखाना, खजीना, अंबर, बुरूज, गच्ची, पिंजरा, पलंग, खुर्ची, बाजार, दरबार, फौज, असे अनेक शब्द मराठी व्यवहारांत बखरींच्या मार्गें व प्रत्यक्ष संसर्गानें शिरले.

बस, हां, अलबत, बेशक, बेलाशक, खूप, वाहवा, छे, छी, अफसोस शाबास, खुश इत्यादि उद्‌गाराचे शब्द फारशीच आहेत. वा, व, मगर, अगर, या, कीं, बाकीं, सबब, लेकीन, इत्यादि उभयान्वयी अव्ययें व दर, बे, देखील, ते (चाळीस ते पन्नास), गैर, सबाई, अज्, ला, बिला, बद्दल, ऐवजी, बरोबर, शिवाय, नजदीक, माफक, व बरहुकूम, बाबत इत्यादि शब्दयोगी अव्ययें फारसी आहेत. हमेशा, बिलकुल, वारंवार, बेहत्तर, छान, अव्वल, जलद, दुय्यम, देखील इत्यादि क्रियाविशेषणें व खुद, फलाणा, हर, जण, हरएक इत्यादि सर्वनामें फारशी आहेत. विशेषण विशेष्याच्या नंतर येणाचा प्रघातहि फारशीनेंच मराठीस दिला. राजवाड्यांच्या मतें द्वितीयेचा 'चा' प्रत्यय हा फारशीच्या 'रा' वरून मराठीस मिळाला. कांहीं उच्चारांची तऱ्हाहि फारशी-वरून मराठींत आली. इतकेंच नाहीं तर सुलतानराव, सुभानराव, बाजीराव, शहाजीराव, शाहू, सर्जेराव, बाबा, मामा, नाना, नानी, काका, काकी, हीं नांवेंहि मराठींत फारशीपासून घेतलीं. सौदागर, सराफ, चिटणीस, फडणीस, पोतनीस, दिवाण, पेशवे, वाकनीस, दप्तरदार, कारखानीस, अशी आडनावेंहि आपण फारशीवरून उचललीं. मराठींतील बखरीवरून, नव्हे तर आजच्या रोजच्या व्यवहारावरूनहि फारशीमराठी संबंध किती निकट आहे हें ध्यानांत येईल. आपल्या पत्रांतील मायनेहि फारशीमिश्रित असण्याची पद्धति होती.

बखरींचें इतिहासप्रामाण्य व त्यांची भाषा यांवर राजवाडे यांचें समालोचन वरील प्रमाणें आहे. बखरींच्या वाङ्मयीन गुणांची मीमांसा राजवाडे यांनीं फारशी केलेली दिसत नाहीं. वर्णनशैली, विचारसौंदर्य, भावसौंदर्य, रसवत्ता, व्यक्तित्व, वक्तृत्व, सुबोधता, व्यक्तिचित्रण, स्वानुभवनिरूपण, सुभाषितांची पखरण, उदात्त विचार, रेखीव प्रसंगवर्णनें, जिवंत युद्धचित्रें, उपहास इत्यादि वाङ्मयीन गुणांनीं बखरी मंडित झालेल्या असतात त्याचें वर्णन राजवाडे यांनीं फारसें केलेलें नाहीं. बखरकार अतिशयोक्ति कां करतात, पाल्हाळ कां लावतात, इतिहासाशीं वा सत्यतेशीं फारकत कां करतात याची दुसरी एक मीमांसा करतां येण्यासारखी आहे. बखर हा इतिहास न मानतां एक वाङ्मयप्रकार मानल्यास बखरींतील अतिशयोक्ती व अद्‌भुतता यांचें रहस्य समजून येण्यासारखें आहे. वाङ्मयीन गुणांचें रूप रसिकतेनें ध्यानीं घेऊन बखरींचें तथाकथित अप्रामाण्य दूर होण्यास थोड्याफार प्रमाणांत हरकत नसावी. प्रत्यक्ष घटना, प्रसंग, व्यक्ती, स्थल यांच्या बाबतींत बखरीवर विसंबतां येणार नाहीं. परंतु बखरकाराच्या लिहिण्याचा रोख व त्याचें मतप्रदर्शन यांचें स्वरूप रसिकतेनें जाणल्यास इतिहासहि

समजण्यासारखा आहे. शिवाजीच्या मृत्यूनंतर भूकंप झाला, तळ्याचें पाणी लाल झालें वगैरे कल्पना नुसत्या भाकडकथा म्हणून दूर लोटण्यापेक्षां हीं वर्णनें करणाऱ्या बखरकाराच्या मनाची भूमिका समजावून घेण्यासारखी असते. बखरकार हा प्रकृतीनें साहित्यिक असेल तर त्याच्या साहित्यगुणांचें मूल्यमापन वेगळें होणें अगत्याचें आहे. अशा प्रकारचे प्रयत्न सारस्वतकार भावे, शं. गो. तुळपुळे, द. वा. पोतदार, गं. बा. ग्रामोपाध्ये, गो. स. सरदेसाई यांनीं केलेले आहेत. डॉ. र. बि. हेरवाडकर यांचें 'मराठी बखर' हें पुस्तक या दृष्टीनें फार महत्त्वाचें मानावें लागेल. प्राचीन मराठी गद्याच्या या वैभवशाली वाङ्मयप्रकाराचे साहित्यगुण हेरवाडकरांनीं सोदाहरण वर्णन केले आहेत. 'महाराष्ट्रसारस्वता'च्या नव्या पांचव्या आवृत्तींत डॉ. शं. गो. तुळपुळे यांनीं कै. शं. ना. जोशी यांच्या साह्यानें पुरवणींत प्रमुख मराठी बखरकारांची एक यादीच दिलेली आहे. लेखक, बखरीचें नांव, रूढ नांव, लेखनकाल, लेखनस्थळ यांच्या विषयींच्या नोंदी येथें महत्त्वाच्या आहेत. शिवाजी राजाच्या दहा बखरी, इतर बत्तीस बखरी, अप्रसिद्ध अशा पाचसहा बखरी यांचीं नोंद बखरवाङ्मयाच्या अभ्यासकांस उपयोगी पडेल अशीच आहे. प्राचीन मराठी गद्याचें व्याकरण निश्चित करण्याच्या दृष्टीनेंहि बखरींचें निरीक्षण व्हावयास हवें.

राजवाडे यांनीं स्वतः संपादित केलेली अशी महत्त्वाची बखर म्हणजे महिकावतीची बखर होय. बखरसंपादनाचा हा एक उत्कृष्ट नमुना मानावा लागेल. राजवाडे यांना ही बखर वसईचे हिरा हरी भंडारी शेषवंशी यांजकडून कल्याणचे सदाशिव महादेव दिवेकर यांच्या मार्फत मिळाली. बखरीच्या हस्तलिखिताचीं पानें ६९ व पृष्ठें १३८. पानाची लांबी १२ इंच व रुंदी ८ इंच. पृष्ठांत ओळी २५ पासून २०. अक्षर बाळबोध, टपोरें, लहान चिंचोक्या एव्हढें. ओळींत अक्षरें २५ पासून ३० पर्यंत. कागद फुलस्केप असून त्याच्या गर्भांत EAGNANI हीं रोमन अक्षरें, इतका तपशील राजवाडे यांनीं प्रथमच दिलेला आहे. बखरीची समाप्ती, 'शके १७४१ प्रमाथिनाम संवत्सरे माहे वैशाख शुद्ध प्रतिपदा रविवारे ते दिवशीं वंशावलि लेख समाप्त' अशा भाषेंत दिलेली आहे; आणि हस्ताक्षर 'वालजी पाटिल सिंधे शेषवंशि वस्तिवसइं बाहादरपुरा हे वंशावळिची पोथी राजश्री हीराजी रामजी राउत सिंधे शेषवंशि वस्ती वसइंबाहादरपुरा यांची असे' असा आणखी मालकीचा तपशील दिलेला आहे. राजवाड्यांनीं ही बखर शके १८४६ मध्यें छापून प्रसिद्ध केली; म्हणजे बखरीची नक्कल १०५ वर्षांपूर्वीची आहे.

ही बखर एक सलग ग्रंथ नाहीं. अनेक गद्य प्रकरणांचा हा समाहार आहे. या बखरींत निवाडे आहेत, गद्य आहे, पद्य आहे, हकीगती आहेत, लढायांचीं वर्णनें आहेत, वंशावळी आहेत व तीं प्रकरणें निरनिराळ्या काळीं लिहिलीं आहेत. पहिल्या प्रकरणांत वंशोत्पत्ति, वर्णावर्णव्याख्या हा विषय असून भविष्योत्तरपुराणा-

न्तर्गत ब्राह्मणोत्तर खंडाच्या व सह्याद्रि खंडाच्या आधारें वंशोत्पत्ति वर्णन आलेलें आहे. या प्रकरणाचा कर्ता भगवान दत्त आहे. दुसऱ्या प्रकरणांत राजवंशावळीचें वर्णन असून प्रकरणकर्त्याचें नांव केशवाचार्य आहे. तिसऱ्या प्रकरणांत निवाडे व हकीगती आहेत. चौथ्या प्रकरणांत श्रीचिंतामणिकौस्तुभ पुराण आलें असून याचा कर्ता भगवान दत्त आहे. पांचव्या प्रकरणांत पाठाराज्ञातिवंशावळीचें वर्णन व सहाव्यांत वंशावळी हे विषय आले आहेत. शक १३७० पासून १५०० पर्यंतच्या काळांत या बखरीच्या प्रकरणांचें लेखन झालें असावें. बखरींत मधून मधून ओवीबद्ध मजकूर आहे. शक १३७० मध्यें त्यावेळचा देसला नायकोराव याच्या सांगण्यावरून केशवाचार्यानें ही वंशावळ सांगितली. यावेळीं इस्लामी आक्रमणामुळें सर्वत्र भ्रष्टता माजली होती. लोक आचारहीन होऊन गेले होते. गोत्र, प्रवर, कुलस्वामी, कुलगुरु ह्यांची कोणासहि आठवण नव्हती. महाराष्ट्रधर्म बुडत चालला होता. " अश्या संकट समयीं श्रीदेवी कुलस्वामिनी, मालाडच्या देसला जो नायकोजीराव त्याच्या स्वप्नांत येऊन सांगती झाली कीं, नायकोरावा, ऊठ, महाराष्ट्रधर्म रक्षिण्याकरितां अठरा पगड जातीचा मेळावा कर आणि केळव्यापासून मुंबईपर्यंतच्या सर्व गांवचे, सर्व जातींचे व सर्व गोत्रांचे खलक जमवून त्यास केशवाचार्याच्या मुखें महाराष्ट्रधर्म सांगीव" देवीची ही आज्ञा मानून नायकोरावानें केशवाचार्याच्या संमतीनें मालाड उर्फ म्हालजापूर येथील जोंगेश्वरीच्या देवळापुढें विस्तीर मांडव घालून तीन हजार सहाशें पंचावन लोक जमा केले. हा भव्य समुदाय मालाडास एकवीस दिवस राहिला. ब्राह्मणांनीं लक्ष्मी सूक्तांनीं भगवती दुर्गादेवीचें स्तवन केलें. व श्रीदेवी आद्यशक्ति जगदंबिका महाराष्ट्रधर्म-रक्षिका जी जगन्माता दुर्गादेवी ती तुम्हां सर्वांवर प्रसन्न असो असा आशीर्वाद दिला नंतर केशवाचार्यानें प्रस्तुत वंशपद्धति निरूपण केली.[1]

बखर कोणत्या निमित्तानें निर्माण झाली हें सांगून राजवाडे यांनीं बखरीची वा तिच्या प्रतीची प्रामाण्यता ठरविली आहे. प्रथम कांहीं आकड्यांच्या व नांवांच्या चुका दुरुस्त करून स्थल, काल, व्यक्ति यांच्या संबंधींची निश्चिती करण्यांत आली आहे. राजवाडे किती तपशीलांत शिरतात याचा उत्कृष्ट नमुना म्हणजे बखरींत आलेल्या गांवांचीं, प्रांतांचीं, नद्यांचीं व किल्ल्याचीं नांवेंच त्यांनीं आद्याक्ष-रांच्या अनुक्रमानें सुमारे ३९६ पर्यंत दिलीं आहेत. पुढें बिंबराजे, नागरशा, यादव, नायत्या, अहमदाबादचे मुसलमान बादशाह, पोर्तुगीझ, देसाई, चौधरी, पाटील, पाठारे ऊर्फ पातेणे प्रभु इत्यादि संबंधींच्या व्यक्तिनामांचा राजवाडे यांनीं विचार केला आहे; आणि यानंतर एकंदर बखरींत आलेला राजकीय इतिहास संक्षेपानें त्यांनीं कथन केला आहे. शक १०६० मधील प्रतापबिंबाच्या आगमना-

१. महिकावतीची बखर; प्रस्तावना: पृष्ठ ५

पासून शक १४६० च्या सुमारास पट्टेकरास फिरंग्यांनीं स्थानबद्ध करीपर्यंतची हकीगत जी त्यांनीं दिली आहे त्यावरून चारशें वर्षांत बिंबराजे, नागरशादि राजे बिंबदेवादि यादव राजे, नायते राजे, दिल्लीचे मालीक, फिरंगी अशा राज्यकर्त्यांच्या मोहिमांचे उल्लेख या बखरींत आहेत हें स्पष्ट झालें. अल्लाउद्दीन व रामदेवराव यादव यांच्या लढाईचा वृत्तान्त इतर कोणत्याहि बखरींत नाहीं तो या महिकावतीच्या बखरींत आहे हा तिचा एक विशेष होय. सर्व मजकुराच्या वस्तुप्रामाण्याचीहि चिकित्सा राजवाडे यांनीं केलेली आहे. इतकेच नव्हे तर बिंब, भौम, तांडेला, भोज, इत्यादि नांवांचा इतिहासहि त्यांनीं शोधिला आहे. यानंतर प्रस्तावनेंत राजवाडे यांनीं कोंकणचा समाज कसा वसत राहिला व तेथील आदिवासांची वस्ती कशी झाली यांचें विस्तारानें विवेचन केलें आहे. या कोंकणवासीयांच्यावर परकीयानीं अनेक शतकें राज्यें केलीं तरी ते आत्मसंतुष्ट, उदासीन, व तुटक वृत्तीचे कां राहिले याचीहि त्यांनीं मीमांसा केली आहे. तिचा सविस्तर असा उल्लेख मागेंच केलेला आहे.

राजवाडे यांनीं संपादिलेल्या व संशोधिलेल्या या बखरीचे अनेक महत्त्वाचे विशेष आहेत. या बखरींत सात राजवटींचा इतिहास असून महाराष्ट्रधर्म रक्षिण्यासाठीं येथील वंशपद्धतीच्या निरूपणाचें निमित्त आहे. सुमारें चार शतकांचा इतिहास या बखरींत आलेला आहे. या बखरींत माहिम प्रांताचा इतिहास आलेला आहे. 'नापत्ता असलेल्या ह्या इतिहासप्रांताच्या आड येणारा पडदा प्रस्तुतच्या बखरीनें दूर सारला जाऊन इतिहासरंगभूमीवरील एक अज्ञात चित्रपट खुला होत आहे—' असें राजवाड्यांनीं प्रस्तावनेंत म्हटलें आहे. ताम्रपट, तवारीखा, टिपणें यांचा पडताळा बखरींतील राजघराण्यांशीं पडणारा आहे. बखरींतील हकीगती इतिहासाशीं बहुधा जुळणाऱ्या आहेत. प्रतापबिंब, महीबिंब, केशवदेव, नागरशा, रामदेवराय यादव, जैतचूरी, भागडचूरी यांचीं व्यक्तिचित्रें उठावदार झालेलीं आहेत. दवण, वाळुकेश्वर, महिकावती इत्यादि स्थळांचीं वर्णनें समर्पक व आटोपशीर आहेत. वर्णनपद्धति आकर्षक असून कित्येक प्रसंग चमत्कृतिपूर्ण आहेत. केशवदेवानें जरवधाच्या भैंसे दुर्गावर स्वारी केली, पण तो पुष्कळ काळपर्यंत हस्तगत होईना, तें पाहून लेखकानें लिहिलें आहे. "चिंचवली खादले खादले त्या चिंचोऱ्याचे वृक्ष झाले। त्याच्या चिंचा खादल्या। इतके दिवस राहिले ! परि गड हाति येत नाहीं।"[१] काळदृष्ट्या मराठींतील या पहिल्या बखरीचा राजवाडेकृत परिचय विस्तृत व विवेचक प्रस्तावनेमुळें लक्षांत राहण्यासारखा आहे. चित्तवेधक निवेदनशैली, साधी सोपी भाषा, सुसूत्र घटनांची गुंफण, व मनोरंजक वर्णनें या साहित्यगुणांनीं बखर महत्त्वाची वाटते.

१ माहिकावतीची बखर : पृष्ठ ४०

१६ : राजवाड्यांचें - वाङ्मय संशोधन - भाषा व व्याकरण

उत्तरायुष्यांत राजवाड्यांचें लक्ष इतिहाससंशोधनापेक्षां भाषाशास्त्र व व्याकरण या विषयांवर अधिक होतें. कोणत्याहि वस्तूचें मूल स्वरूप शोधून पाहण्याची जी मूळची इतिहासंशोधकाची वृत्ति ती व्याकरण, भाषाशास्त्र, व्युत्पत्ति, कोशादि कार्ये यांत त्यांना अधिक उपयोगी पडली. भाषा, व्याकरण याहि विषयांचा राजवाडे यांनीं इतिहास पाहिला, पूर्वपीठिका निश्चित केली. संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश या भाषांची व त्यांच्या व्याकरणाशीं राजवाडे यांची ओळख होती. फारसी भाषेचा अभ्यास त्यांनीं मुद्दाम केला होता. पाणिनि, यास्काचार्य, वररुचि, कात्यायन, पतंजलि इत्यादींशीं त्यांचा चांगला परिचय होता. देशहित, समाजहित साधावयाचें म्हणजे व्याकरण, भाषा यांचीहि जोपासना झालीच असें त्यांचें मत होतें. भाषेच्या जोपासनेनें लोकांचीं मनें तयार होतात. परकीय भाषेच्या संसर्गानें मन परकीय संस्कारानें कलुषित होतें. “ जेथें देशांतील विद्वानांनींहि स्वभाषेला सोडल्यासारखीच आहे तेथें तीनशेंच्या ऐवजीं शंभरदीडशें वर्षांतच स्वभाषेचा अंत झाल्यास नवल कसचें ? ... आणि स्वभाषा नष्ट होणें म्हणजे देशावर केवढी घोर आपत्ति येणें आहे ! ... बुडालों आहों त्याहून जास्त बुडावयाचें नसेल तर स्वभाषेला, म्हणजे स्वतंत्र विचाराला, म्हणजे स्वदेशाला, कायेनें, वाचेनें व मनानें आपण शब्दशः वाहून घेतलें पाहिजे. नाहीं तर प्रसंग कठिण आहे. ”[१] सन १९०३ सालची ही जी त्यांची वृत्ति तीच दिवसेंदिवस वाढत गेली. सन १९२६ मध्यें शारदोपासक संमेलनांत त्यांनीं मराठी भाषा बहुतेक मरणार असेंच भाकित केलें. भाषाशास्त्रदृष्ट्या भाषा कधीं मरत नसतें हें खरें असेल, व पुढल्या वर्षी त्याच व्यासपीठावरून राजवाड्यांच्या पोटतिडकीचा अर्थ ज्ञानकोशकार केतकर यांनीं समजावून दिला असेल; पण राजवाडे यांना भाषेविषयीं कमालीची अस्वस्थता वाटत असावी.

याच भाषेच्या अभ्यासास प्रवृत्त होऊन सन १९०९ मध्यें त्यांनीं आपली ज्ञानेश्वरी प्रसिद्ध केली. एकनाथपूर्वकालीन ज्ञानेश्वरीच्या या पाठांची भाषा यादवकाळाच्या भाषेशीं मिळतीजुळती आहे असें मानलें जातें. आपल्या ज्ञानेश्वरीस राजवाडे यांनीं भाषाशास्त्र, व्याकरण व मराठी भाषा यांची चर्चा

१ ऐतिहासिक प्रस्तावना : पृष्ठ ४३०

करणारी अति विस्तृत अशी प्रस्तावना लिहिली. व्याकरणाची व्याख्या, प्रांतकृत भाषाभेद, जातिकृत भाषाभेद, लिंगकृत भाषाभेद, प्रांतिक भाषा, अपभ्रंश भाषा, नागर व शिष्ट मराठी इत्यादि किरकोळ विषयांची स्थूल चर्चा करून राजवाडे यांनीं या प्रस्तावनेंत मराठीच्या ऐतिहासिक व तौलनिक व्याकरणाचें महत्त्व विशद केलें आहे. मराठी भाषेचा इतिहास शक ४१० मधे मंगळवेढे येथील ताम्रपटापासून शोधण्याचा त्यांचा प्रयत्न पुढें फसला असला तरी अनेक शिलालेखांच्या आधारें त्यांनीं प्राकृतअपभ्रंश भाषांचा दुवा शोधून काढला. युरोपीयन ग्रंथकार म्हणतात तितकी अर्वाचीन व राजवाडे म्हणतात तितकी प्राचीन अशी मराठी भाषा नसली तरी मराठी भाषा व वाङ्मय यांचीं आरंभस्थानें निश्चित करण्यास राजवाडे यांची मदत निश्चित होण्यासारखी आहे. पाली, शौरसेनी, मागधी, पैशाची, महाराष्ट्री या प्राकृत-अपभ्रंश भाषांच्या गोतावळ्यांत मराठी नेमकी कुठे बसते हें शोधण्याचाहि उद्योग राजवाडे यांनीं यशस्वी रीतीनें केलेला आहे. वैदिक संस्कृत, पाणिनीय संस्कृत, पाली, शौरसेनी, मागधी, पैशाची, महाराष्ट्री या प्राकृत भाषा, यांचे प्रत्येकीचे अपभ्रंश व यांतून प्रत्येकीच्या साह्यानें सिद्ध झालेली पांचव्यासहाव्या शतकांतील जुनी मराठी भाषा ही राजवाडेकृत पूर्वपीठिका वर्तमान भारतीय भाषांच्या इतिहासांत आजहि प्रमाण मानली जाते. मराठी भाषा व तिचा गोतावळा यांची देवाणघेवाण कशी झाली असावी व पुढें फारसी भाषेनें मराठीस काय काय दिलें याचाहि तपशील राजवाडे यांनीं दिलेला आहे.

आपल्या ज्ञानेश्वरीच्या जुन्या भाषेवर लुब्ध होऊन राजवाडे यांनीं सन १९०९ मध्यें आपलें ‘ ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण ’ हा ग्रंथ प्रसिद्ध केला. मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाचा पाया अशा रीतीनें राजवाडे यांनीं घातला. राजवाडे यांच्या या ऐतिहासिक विवेचनांत तौलनिक अभ्यासहि ओघानेंच आलेला आहे. वर्णेतिहास, आदेशेतिहास, नामविभक्तिप्रत्येतिहास, क्रियाविभक्तिप्रत्येतिहास, निपातेतिहास या क्रमानें ज्ञानेश्वरकालीन मराठीचें व्याकरण सांगण्याचा प्रयत्न राजवाडे यांनीं केला आहे. पैकीं आदेशप्रक्रिया वा तिचा इतिहास हें विस्तृत प्रकरण असल्यामुळें राजवाड्यांच्या या लहानशा पुस्तकांत समाविष्ट होऊं शकलें नाहीं. यामुळें युरोपीयन व्याकरणकार ज्या विषयास Phonlogy किंवा Phonetics म्हणतात त्या विषयाचा प्रपंच राहून गेला आहे. आपल्या या व्याकरणांत राजवाडे यांनीं प्रथमान्हिकांत वर्णेतिहास दिला आहे. चाळीस व्यंजनें, बारा स्वर आणि नासिक्यें यांचा तपास त्यांना ज्ञानेश्वरीच्या भाषेंत लागला आहे. अपभ्रंशांत नसलेला विसर्ग ज्ञानेश्वरींत आहे. ळ् हा वर्ण आर्ष भाषेंत आहे. संस्कृतांत नाहीं, प्राकृतांत व अपभ्रंशांत आहे. राजवाडे यांच्या मतें ळकार ज्ञानेश्वरींत नाहीं. या ‘ ळ् ’ बद्दल राजवाडे यांचे स्वतंत्र संशोधन आहे तें पुढें पाहूं. दुसऱ्या आन्हिकांत नामविभक्तिप्रत्येति-

हासाची त्यांनीं चर्चा केली आहे. ज्ञानेश्वरींतील नामें, विशेषणें स्वरान्त आहेत, द्विवचन नाहीं. विभक्त्या आठ आहेत. राजवाडे यांनीं सात विभक्त्यांचे दोनहि वचनांचे प्रत्यय कसे निर्माण झाले याविषयीं ऐतिहासिक विवेचन येथेंच केलेलें आहे. चतुर्थीचा 'ला' प्रत्यय फारशीच्या 'रा' वरून आला असल्याचें राजवाडे यांचें मत प्रसिद्ध आहे. तृतीयान्हिकांत अकारान्त पुल्लिंगी नामें, आकारान्त पुल्लिंगी नामें, इकारान्त पुल्लिंगी नामें, ईकारान्त पुल्लिंगी नामें, उ-ऊकारान्त पुल्लिंगी नामें यांचप्रमाणें नपुंसकलिंगी नामें, स्त्रीलिंगी नामें व त्यांचीं दोनहि वचनांतील सातहिं विभक्तींचीं रूपें यांचा विचार आलेला आहे. षष्ठमान्हिकांत सर्वनामांचा विचार आहे. वचन, विशेषण यांचाहि विचार येथेंच करून मग क्रियाविभक्तिप्रत्येतिहास सातव्या आन्हिकांत आलेला आहे. आठव्यांत कृदन्त विचार व नवव्यांत तद्धित विचार यांची सोदाहरण चर्चा त्यांनीं केलेली आहे. निपातेतिहासांत पादपूरक अव्ययें, उद्गारवाची, उभयान्वयी, वगैरेंचा विचार करून शेवटीं विशेषण–विशेष्य, संधि, समास, उपसर्ग, प्रयोग यांची संक्षेपानें ओळख करून देऊन राजवाड्यांनीं आपला ऐतिहासिक अभ्यास पूर्ण केला आहे.

दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्यानंतर नांव घेण्यासारखें मोठें मराठीचें व्याकरण प्रसिद्ध झालें तें मोरो केशव दामले यांचें 'शास्त्रीय मराठीव्याकरण.' सन १९११ मध्यें हें विस्तृत उहापोहांनीं समृद्ध असें मराठीचें व्याकरण प्रसिद्ध झालें. आज पन्नास वर्षांनंतर याच व्याकरणाची छाप मराठी अभ्यासकांवर आहे. या नंतर एवढें मोठेंव्व तपशीलवार व्याकरणहि मराठीस लाभलें नाहीं. हें व्याकरण प्रसिद्ध झाल्यानंतर 'सुबंतविचार'. 'तिङ्तविचार' या नांवांनीं सन १९१२ मध्यें दोन लेखमाला राजवाडे यांनीं लिहिल्या. मराठी व्याकरणाच्या आजच्या अभ्यासकांना राजवाड्यांच्या या दोनहि लेखमालांचा विचार करण्याशिवाय गत्यंतरच नाहीं इतक्या त्या महत्त्वाच्या आहेत. पैकीं 'तिङ्तविचार' या प्रसिद्ध लेखांत त्यांनीं प्रथम तर्खडकर, चिपळुणकर, गोडबोले, रा. भि. जोशी, गुंजीकर इत्यादि व्याकरणकारांचा थोडाफार उल्लेख करून लिहिलें आहे; "सारांश, भाषाशास्त्र माहित नाहीं, व्याकरणशास्त्र माहीत नाहीं, वैदिक भाषा माहित नाहीं, पाणिनीय माहित नाहीं, प्राकृत भाषांशीं गाढ परिचय नाहीं अशा स्थितींत मराठीचें व्याकरण रचिलें जाण्याची जितपत शक्यता होती तितपत ती ह्या सर्व लेखकांच्या लेखांतून गोचर झाली आहे. सगळेच आंधळे पडल्यानें, एक ज्या शब्दाला कर्ता म्हणतो, त्यालाच दुसरा कर्म म्हणतो, तिसरा क्रियापद म्हणतो व चौथा क्रियाविशेषण म्हणतो! अशा मौजेच्या स्थितींत मराठीचें व्याकरण आजपर्यंत गुंगत आहे. चमत्कार आहे कीं, एकच मराठी शब्द चार वैयाकरणमन्यांना चार प्रकारचा भासावा! एक तर

वैय्याकरण तरी भंगड असले पाहिजेत, नाहीं तर, मराठी भाषा तरी मोठी लबाड असली पाहिजे."[1]

याच लेखांत राजवाडे यांनीं आपल्या व्याकरणविषयक कल्पना स्पष्ट केल्या आहेत. व्याकरण हें प्रयोगिक शास्त्र नाहीं, आवलोकनिक शास्त्र आहे. वाक्य, शब्द व वर्ण हे व्याकरणाच्या अवलोकनाचे विषय होत, संपूर्ण शब्दोदधीचे अवलोकन करून वर्णांचें, शब्दांचें व वाक्यांचें वर्णन करणें हें व्याकरणशास्त्राचें एक प्रयोजन आहे. शब्दसिद्धी ज्या सामान्य नियमांनीं होते त्यांचीं अपवादांसहित परंपरा नमूद करणें हेंहि व्याकरणाचेंच कार्य आहे. पैकीं वर्णण व नियमपरंपरासंकलन या दोन सिद्धान्तांवरूनच त्यांनीं दामले यांच्या व्याकरणाचा परामर्श घेतला आहे. सर्व तपशीलाचा विचार येथें अर्थातच द्यावयाचा नाहीं. परंतु कर्ता, कर्म, क्रियापद, प्रयोग, संयुक्त क्रियापदें, कृदन्तें या विषयींचें राजवाडे यांचें विवेचन, सूक्ष्म विचारप्रवर्तक असें आहे. राजवाडे यांच्या मतें दामले यांच्या व्याकरणांत एक मोठी उणीव म्हणजे दामल्यांच्या व्याकरणांत भाषेंतील धातुपाठ नाहीं. 'प्राय : भाषेंत असा शब्द नाहीं कीं जो सीमान्त अशा कोणत्या तरी धातूला नेऊन भिडवितां येत नाहीं. यास्क निरुक्त तर या एका प्राणभूत कारणाकरितां निर्माण झालें. पाणिनीनें धातुपाठ एवढ्याच करितां रचिला. कित्येक सौत्र धातू तर रोजच्या बोलण्याच्या किंवा लिहिण्याच्या किंवा ग्रंथाच्या भाषेंत कधींच उपयोगांत येत नसून, तेहि या भाषापृथक्कारांना नमूद करून ठेवणें हिताचें वाटलें. त्यामुळें भाषाशास्त्रास केवढा थोरला फायदा झालेला आहे. ह्या सौत्र धातूंचा उपयोग इतर सजातीय व प्राचीन व अर्वाचीन भाषांच्या पृथक्करणाला अत्यंत होत असून मानवी इतिहासावरहि त्यांचा प्रकाश पडतो. सारांश, भाषेच्या सीमान्त धातूंचें संशोधन व संकलन अत्यन्त उपयोगाचें आहे.[2]"

मराठीस धातुपाठ नाहीं ही चिंता राजवाडे यांना पूर्वीपासूनच होती. स्वतः राजवाडे हे आयुष्याच्या अखेरीस याच धातुपाठाच्या प्रचंड उद्योगांत गुंतले होते. मराठी धातूंचा विषय नेहमीं त्यांच्या मनांत घोळत असे. "एकान्तांत असतांना स्वस्थ अंगमोडक्या लांकडाच्या फळीवर किंवा एखाद्या बाकावर उताणें पडून मराठी धातूंचीं मुळें ठरविणें, ती वारंवार जिभेवर घोळविणें, तीं मनास पटलीं कीं त्यांचा पडताळा लगेच निरनिराळ्या कोशांत अथवा जुन्या धातुपाठांत पाहणें व पडताळा मिळाला कीं त्यांचा या अर्थानें उपयोग जुन्या कवींनीं केला आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं जुनींपुराणीं बाडें धुंडाळणें किंवा त्याच्या उलट जुन्या बाडांतून आढळलेले चमत्कारिक धातु सध्यांच्या आधुनिक मराठींत कोणत्या रूपांत वावरातांना दिसतात हें पाहणें व नंतर त्यांना संस्कृत, प्राकृत, देशी भाषांतील त्यांच्या प्रतीकाचे

१. राजवाडे लेखसंग्रह भाग २ : पृष्ठ ११.

१. कित्ता : पृष्ठ ७०

दाखले देणें इत्यादि व्युत्पत्तीचे परिष्कार राजवाडे यांच्या डोक्यांत सारखे घोळत."[१] राजवाडे यांच्या विलक्षण ध्यासांतून त्यांच्या मनाप्रमाणें धातुपाठ तयार होत होता; पण तो त्यांच्या हयातींत प्रसिद्ध होऊं शकला नाहीं. पुढें शके १८५९ मध्यें त्यांच्या शिष्य मंडळीनीं तो प्रयत्नपूर्वक प्रसिद्ध केला. या धातुपाठास कै. प्रा. कृ. पा. कुलकर्णी यांची दीर्घ प्रस्तावना आहे. धातु किंवा नामादिक शब्द यांच्या व्युत्पत्तीकडे राजवाडे यांचें लक्ष फार पूर्वीपासून होतें. 'सरस्वतिमंदिर' नांवाच्या मासिकांत सन १९०४ पासूनच राजवाडे यांनीं कांहीं शब्दांच्या व्युत्पत्त्या दिल्या आहेत. भा. इ. सं. मंडळाच्या वार्षिक अहवालांतहि त्यांचे व्युत्पत्तिविषयक अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. एखाद्या चिठ्ठीवर धातु लिहावयाचा, त्याच्या रूपाचा इतिहास शोधावयाचा असा एक चाळाच त्यांच्या मनास लागलेला होता. सुमारें सोळा हजारपर्यंत धातूंची नोंद अशा रीतीनें राजवाडे यांनीं घेतली. राजवाडे यांचा हा दीर्घोद्योग व चिंतनाची, मननाची ही धार आज चकित करणारी आहे. धातु-कोशाच्या प्रसिद्धीनंतर चार वर्षांनीं म्हणजे सन १९४२ सालीं 'नामादिशब्द व्युत्पत्तिकोश' प्रसिद्ध झाला व त्यांत सर्वमान्य कामें, व्यक्तिनामें, उपनामें, जातिनामें, स्थलनामें यांच्या व्युत्पत्त्या राजवाडे यांनीं दिलेल्या आहेत.

राजवाडे यांच्या या धातुपाठाचें महत्त्व कृ. पा. कुलकर्णी यांनीं प्रस्तावनेंत विस्तारपूर्वक वर्णन केलें आहे. मानवशास्त्राच्या दृष्टीनें धातुपाठास विशेष महत्त्व आहे. भाषेचें ऐश्वर्य शब्दांवरून व शब्दांची संपत्ति धातुसंग्रहावरून ठरते. "भाषेंत जितका शब्दसमूह अधिक तितका भाषेचा विस्तार, प्रसार, व्याप अधिक हें उघड आहे. जेथें व्यापच नाहीं तेथें त्याच्या दर्शक शब्दाची जरूरी तरी काय ? त्यांतहि पुनः भाषेंत जितक्या क्रिया अधिक तितक्या लोकांच्या हालचाली अधिक, तितके त्यांचे व्यापार अधिक, आणि जितक्या क्रिया अधिक तितके धातु अधिक, तेव्हां शेवटीं आपणांस असें म्हणावें लागणार कीं ज्या भाषेंत धातु अधिक त्या भाषेंत क्रिया अधिक. ज्या राष्ट्रांत क्रिया अधिक त्या राष्ट्राचा व्याप अधिक, त्याच्या हालचाली अधिक, तितकें चैतन्य अधिक. शब्दाचें, त्यांतहि क्रियापदांचें, त्यांतहि धातूंचें प्राचुर्य आणि राष्ट्राच्या हालचाली त्यांचें उदयोन्मुखत्व ह्या सर्वांचा परस्पर संबंध कसा आहे हें वरील विवेचनावरून कळेल. एखादा समाज सुधारणेच्या कोणत्या अवस्थेंत आहे हें पाहावयाचें झालें तर त्या समाजाची भाषा पाहावी. त्यांतहि पुनः तिचा शब्दसमूह पाहावा; त्यांतहि तिचा धातुपाठ पाहावा."[२]

राजवाडे यांच्या भाषाशास्त्रीय संशोधनाचा व चिंतनाचा आणखी एक

---

१. राजवाडे मराठी धातुकोश; प्रस्तावना : पृष्ठ २, सन १९३७

२. राजवाडे धातुपाठ; प्रस्तावना : पृष्ठ ११

नमुना म्हणजे त्यांनीं लिहिलेला ‘ संस्कृत भाषेचा उलगडा ’ हा ग्रंथ होय. सन १९२० सालीं प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाच्या सन १९५७ सालच्या आवृत्तींत आजपर्यंत अप्रकाशित असा तिङ्‌त विचाराचा भागहि प्रसिद्ध झाला आहे. राजवाडे यांच्या मनांत नेहमीं एखादी शंका घर करून असे. तिचा आवडीनुसार ते पाठपुरावाहि करीत. संस्कृतांत द्विवचन आलें कोठून ? या प्रश्नाच्या विचारांतून या पुस्तकाचा जन्म झाला. पाणिनीय व्याकरणाचा ऐतिहासिक दृष्टीनें विचार राजवाडे यांनींच प्रथम केला आहे. ‘ संस्कृतांतील द्विवचनाचें कारण, हजारों वर्षांपूर्वीची अप्रत्यय भाषास्थिति, वैदिक त्रिकें, आणि अंकमापन, बहुवचन, अनेकवचन, संज्ञाभेद, द्विवचनाचें प्राकृतांतून उच्चाटन, वचनविकारदृष्टीनें कांहीं बाबतींत मराठी इंग्रजीच्या पुढें, संस्कृतांतील सामाजिक प्रत्ययरहित भाषेचा उत्तम नमुना, वैदिक भाषेंतील अपवादक रूपांवरून पूर्ववैदिक भाषेचें अनुमान, सुऔजस् या प्रत्ययांतील ‘ स् ’ चा वैदिककालीं ‘ ऱ्ह ’ उच्चार, त्यामुळें ‘ससजुषोरुः वगैरे पाणिनीय सूत्रांची उत्पत्ति, प्रथमेच्या तीन्ही प्रत्ययांवर अथवा वचनप्रत्ययावर साती विभक्त्यांची कलमें, सुबंतावरून तीन समाजांच्या मिलाफाचें अनुमान, सानुनासिक स्वर उच्चारणारा पूर्ववैदिक समाज, गो शब्दांच्या गौ, गो, गाव, या विधांवरून पूर्व वैदिक चार समाजांची कल्पना, अकारान्त स्त्रीलिंगी शब्दांचा वैदिक भाषेंतील भाग, वैदिक भाषेंतील स्त्री व पुल्लिंगी उभयलिंगी शब्दांवरून अनुमान, स्त्री व पति शब्दांचा ऐतिहासिक छडा, लिंगविहीन पूर्व वैदिक भाषेचा अवशेष– असे एकामागून एक अनेक मौलिक मुद्दे राजवाड्यांनीं प्रस्तुत ग्रंथात पुढें आणले आहेत. ’[१]

मराठी व्याकरण व भाषा यांतील स्फुट विषयांवरहि राजवाडे यांनीं अनेक लेख लिहिले आहेत. ‘प्राकृत ल व ळ आणि ण व ण्ण यांचीं मराठी रूपांतरें; ‘मराठींतील ‘ ल ’ प्रत्यय ’[२] हे दोन लेख छोटे असले तरी राजवाडे यांची संशोधकी दृष्टि दर्शविणारे आहेत. ‘ मराठींतील नामविभक्ति ’[३] या लेखांत राजवाडे यांनीं विभक्ति प्रत्ययांची ऐतिहासिक चर्चा केली आहे. मराठींतील अनुनासिकाची पूर्वपरंपरा ’[४] या लेखांत मराठींतील अनुनासिकांची व अनुस्वरांची मीमांसा आलेली आहे. पाणिनीय संस्कृत, महाराष्ट्रीप्राकृत, अपभ्रंश आदि अवस्थांतून अनुनासिकाचें उच्चार व कार्य कोणतें याचें ऐतिहासिक विवेचन मराठींत तरी हेंच प्रथम आहे. ‘मराठींतील शुद्धलेखनासंबंधीं व विराम चिन्हांसंबंधीं कांहीं

१. संस्कृत भाषेचा उलगडा, प्रस्तावना: शि. न. भावे, पृ. ३.
२. राजवाडे लेखसंग्रह : भाग ३, पृष्ठ१९४–२९६, २०६–२०९
३. राजवाडे लेखसंग्रह : भाग २, पृष्ठ १९२– २१२
४. कित्ता: पृष्ठ १८१–१९१

सूचना'[1] या आणखी महत्त्वाच्या लेखांत राजवाडे यांनीं मराठी लेखनाच्या शुद्धतेविषयीं व विरामचिन्हाविषयीं सविस्तर चर्चा केली आहे. प्रत्येक वेळीं राजवाडे यांची दृष्टि ऐतिहासिक आहे. राजवाडे यांच्या मतें प्रारंभीं ।, ॥, : हीं तीनच विराम चिन्हें होतीं. फार तर काकपद अशी खूण करून वापरीत. क्वचित कंस असे. मराठींत विरामचिन्हांचा जवळजवळ अभावच म्हणावा लागेल. इंग्रजी लेखनपद्धतींतील सर्व विरामचिन्हें आपण उचललीं असा राजवाडे यांचा निष्कर्ष आहे. स्वल्पविराम , अर्धविराम ; दीर्घविराम : पूर्णविराम . दीर्घविराम व तपशील :—, द्रुतपशील – –, लघुकंस ( ) चतुष्कोण कंस[ ] जोड अवतरण " " एकेरी अवतरण ' ' प्रश्नचिन्ह ?, उद्गार चिन्ह !, अधिक चिन्ह + + +, बिंदुमाला ..., चक्र ×, बिंदुचक्र ·×·, नक्षत्र *, रकाना, हरत ¶, अंगुली वगैरे चिन्हें व टीपा चिन्हें किंवा वक्रवर्ण, (Italics) हा सर्व प्रकार आपण इंग्रजीच्या संसर्गानें उचलला आहे. पण इंग्रजी विरामचिन्हांचा घोटाळा मात्र मराठींत येऊं नये याबद्दल ते सावधगिरीची सूचनाहि देतात, एकंदर हिशेब करून मराठींत राजवाडे यांनीं ३५ चिन्हांची आवश्यकता दर्शविली आहे.

आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळांत मध्यवर्ति सरकार व राज्य सरकार या दोनहि पातळीवर राष्ट्रीय कोश तयार करण्याच्या उद्योगांत आपण आहोत. डॉ. रघुवीर यांच्या प्रयत्नानें कांहीं कोशवाङ्मय तयारहि झालें आहे. 'पदनाम' कोशासारखे प्रयत्न महाराष्ट्र सरकार करीत आहे. स्वतंत्र राष्ट्राची ही गरज राजवाडे यांना साठ वर्षांपूर्वीच लक्षांत आलेली होती. 'सरस्वती मंदिर' नांवाच्या मासिकांत 'राष्ट्रीय मराठी कोश' नांवाचा एक उत्कृष्ट लेख त्यांनीं सन १९०५ सालच्या श्रावण महिन्याच्या अंकांत लिहिला आहे. मराठी कोशवाङ्मयाचा थोडक्यांत आढावा घेऊन त्यांनीं त्यांत राष्ट्रीय कोशाची अत्यावश्यकता प्रतिपादन केली आहे. मराठींतील पूर्वीच्या कोशांतील उणीवाहि त्यांनीं स्पष्ट केल्या आहेत. राजवाड्यांच्या मतें कोणत्याहि भाषेंत संपूर्ण कोश म्हटला म्हणजे त्यांत त्या भाषेंतील जुने व वर्तमान, लुप्त व प्रचलित, ग्राम्य व सभ्य, राष्ट्रीय व प्रांतिक, असे एकोन एक सर्व शब्द आले पाहिजेत. वेद, व्याकरण, न्याय, मीमांसा, वेदान्त, वैद्यक, रसायन, भूगोल, भूस्तर, खगोल, गणित, जल, वायु, विद्युत, उष्णता वगैरे अखिल शास्त्रांतील नव्या व जुन्या पारिभाषिक शब्दांचा स्थूल संग्रह त्यांत होणें आवश्यक आहे. परभाषांतून आलेले नवीन शब्द व एतद्देशीयांनीं निर्मिलेले नवीन शब्द यांचा समावेश त्यांत झाला पाहिजे. तात्पर्य, तोंडांतून उच्चारल्या जाणाऱ्या ज्या

१. किता: पृष्ठ: १६५–१८०

ज्या म्हणून रूढ शब्दाच्या अर्थाची प्रचीति स्वभाषेंत येते त्या त्या शब्दाला अवश्यमेव स्थल मिळालें पाहिजे."[१]

राजवाडे यांच्या मतें संपूर्ण राष्ट्रीय शब्दकोश अजून मराठीला लाभलेलाच नाहीं. राष्ट्रीय कोश करणाऱ्यांना त्यांनीं एकूण १८ सूचना दिलेल्या आहेत. नवीन कोशाचे या मार्गानें प्रयत्न करणारे जे कोणी असतील त्यांना या सूचना फार महत्त्वाच्या व उपयुक्त वाटतील यांत शंका नाहीं.

भाषा, व्याकरण यांवरील राजवाडे यांचें हें कार्य अशापैकीं होतें. राजवाडे यांच्या या कार्यांचा गुणगौरव अनेक भाषापंडितांनीं केला आहे. कै. कृ. पां. कुलकर्णी हे तर राजवाडे यांचे शिष्यच. त्यांनीं आपल्या गुरुवर्यासंबंधीं लिहिलें आहे, "राजवाडे यांनीं जवळजवळ तीस हजार धातूंची प्रक्रिया उलगडण्याचा प्रयत्न केला आहे तो तर अवर्णनीय आहे. भाषाशास्त्रामध्यें त्याचें महत्त्व फार आहे. रोथ आणि बोटलिंग यांनीं संस्कृत वैदिक कोश केला व त्या कोशानें ज्या प्रमाणें तिकडील भाषाशास्त्रामध्यें क्रांती केली, पाणिनीच्या अष्टाध्यायीच्या संशोधनाच्या जाणीवेनें ज्या प्रमाणें युरोपियन भाषाशास्त्राच्या जुन्या समजुती पार बदलून टाकल्या, तसाच कांहींसा प्रकार राजवाड्यांच्या धातुकोशानें मराठी भाषेंत झाला असता व त्यायोगें मराठी भाषेंत विशेष तेज अवतरलें असतें; परंतु दुर्दैव हें कीं तो प्रसिद्ध होण्यापूर्वीच त्यांचा काळ झाला व धातूंचीं प्रतीकें छापलीं गेलीं तरी त्यावर जी एक ५०० पानांची बहुमोल समालोचना येणार होती तिला मात्र आपण कायमचें अंतरलों! दुसऱ्यानें किती जरी श्रमाचा अटोकाट प्रयत्न केला तरी तसा परिस्कार होणें अशक्य आहे."[२] राजवाडे यांच्या व्युत्पत्तीविषयीं अनेकांना पुढें शंका आल्या. राजवाडे यांच्या धाडसी कल्पकतेची उडी सर्वांनाच संशयास्पद वाटली. निव्वळ प्रतिभेच्या तेजामुळें बिनबुडाच्या व काव्यमय कल्पना राजवाडे व्युत्पत्तिशास्त्रांत नेहमी करितात हेंहि पुष्कळ टीकाकारांनीं नमूद केलें आहे. पण याविषयीं प्रा. कृ. कुलकर्णी यांनीं म्हटलें आहे.

"त्यांनीं व्युत्पादिलेल्या धातूंच्या बाबतींत प्रथम ऐतिहासिक क्रमाची सत्यता दिसून येते. इतिहासाच्या वातावरणांत सारखा वावर असल्यामुळें ऐतिहासिक सत्याबद्दल त्यांच्या हातून प्रतारणा झाली नाहीं यांत कांहीं नवल नाहीं. कोणत्याहि शब्दाचें निर्वचन करतांना त्याला ऐतिहासिक पुरावा आपल्याजवळ आहे कीं नाहीं, निर्वचलेलें स्वरूपांत त्यांचा कोठे जुन्या ग्रंथांमध्यें उपयोग आहे कीं नाहीं हें तें पहात असत. उगाच कल्पनेच्या जोरावर निरुक्तीचा डोलारा त्यांनीं कधींहि उभारला नाहीं; व शास्त्राबद्दल गाफिलगिरी कधींहि दाखविली नाहीं.

१. राजवाडे लेखसंग्रह भाग २ : पृष्ठ ७८-७९

२. ब्राम्हण पत्रिकेचा राजवाडे तिलांजलि अंक: पृष्ट ३६

एव्हढेंच नव्हे तर पूर्वाचार्यांनीं गाफिलगिरी दाखविली याबद्दल ते बेमुर्वत लिहीतहि असत. निर्वचनास आधार पुराण, मराठी अपभ्रंश, प्राकृत-पाली इत्यादि भाषांतच शोधून ते थांबत नसत. त्याचा माग मागें काढीत थेट वैदिक भाषेपर्यंत पल्ला पोंचवीत."[1]

ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनीं राजवाडे यांच्या एकंदर कार्याविषयीं अचूक मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्ञानकोशकारांच्या मतें राजवाडे यांचें नांव इतिहाससंशोधकापेक्षां भाषाशास्त्रसंवर्धक या नात्यानें अधिक आहे. "राजवाड्यांची भाषाशास्त्रविषयक कामगिरी लक्षांत घेतली तर तीच्या पुढें अनेक मोठमोठ्या अभ्यासकांचे प्रयत्न फिके पडतील. राजवाड्यांच्या अनेक कामगिरी-पैकीं सर्वांत अधिक मोठी कोणती हें ठरवून राजवाड्यांचें वर्णन करावयाचें झालें तर त्यांस भाषाशास्त्रज्ञ म्हणावें लागेल, आणि त्यांची गणना अत्यंत मोठ्या वैय्या-करणांत करावी लागेल. हेमचंद्र आणि वररुचि यांचे प्रयत्न राजवाड्यांच्या प्रयत्नांच्या दृष्टीनें कांहींच नाहींत. इतिहासाचार्य किंवा इतिहाससंशोधक हें नांव राजवाडयांना देण्यांत आपण त्यांच्या कार्यांचें अज्ञान दाखवूं. त्यांच्या बौद्धिक कार्यांचें गुरुलघुत्व माझ्या मतें १ भाषाशास्त्रज्ञ, २ वैय्याकरण, ३ शब्द संग्राहक ४ इतिहास-संशोधक या अनुक्रमानें आहे.[2]"

राजवाडे यांच्या कर्तृत्वाचें चिकित्सापूर्वक गुणग्रहण करणाऱ्यांत कै. चिं. वि. वैद्य यांचें नांव प्रामुख्यानें घ्यावें लागेल. भाषा, व्याकरण, प्राचीन इतिहास या विषयांचा व्यासंग चिं. वि. वैद्य यांचा मोठाच होता. राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरींतील मराठीच्या व्याकरणावर त्यांनीं समालोचनात्मक चारपांच लेख लिहिले ते मराठी भाषा-व्याकरणाच्या इतिहासांत फार प्रसिद्ध आहेत. राजवाडे-संशोधन मंदिराच्या कोनशिलास्थापनेच्या समारंभानिमित्तानें केलेल्या अध्यक्षीय भाषणांत चिं. वि. वैद्य यांनीं सन १९२९ मध्यें उद्‌गार काढले आहेत कीं, "मराठीचा भाषादृष्ट्या तिचा इतिहास त्यांनीं फारच चांगला लावला आहे. भाषाशास्त्राकडे अलीकडे त्यांचें फारच लक्ष गेलें आणि या बाबतींत त्यांच्या बुद्धिमत्तेनें आणि निदिध्यासानें फारच मोठी कामगिरी त्यांनीं केली आहे. ज्ञानेश्व-रीची जुनी प्रत, म्हणजे एकनाथांनीं ज्ञानेश्वरीस अर्वाचीन रूप दिल्यापूर्वींची प्रत, त्यांस संशोधनांत सांपडलीं हा एक त्यांनीं अपूर्व शोध लाविला ...... स्टेनकोनाऊ हा तर स्वीडिश विद्वान आहे. ... या विद्वानाच्या जोडीला बसविण्यास हिंदुस्थानां-तील विद्वान मला राजवाड्यांशिवाय दुसरा दिसत नाहीं. त्यांनीं मानभावांच्या ग्रंथांतील अनेक संकेत उकलून काढले, नामांचीं व क्रियापदांचीं रूपें मराठींत कशीं

१. कित्ता : पृष्ठ ३७

२. भा. वा. भट, राजवाडे चरित्र : पृष्ठ ४९२

झालीं आहेत, याजवर त्यांनीं विचार केला. खोल इतिहास जसा लोकांच्या विज्ञासूस मनोहर वाटतो, तसा शब्दांचाहि वाटतो आणि म्हणून इतिहाससंशोधक राजवाडे शब्दांच्या इतिहासाकडे वळले. ... त्यांनीं अलीकडेच संस्कृताचाहि भाषाशास्त्राच्या दृष्टीनें फार खोल विचार केला. वैदिक संस्कृताच्याहि पलीकडे त्यांची विशाल बुद्धिमत्ता जाऊन वेदांच्या पूर्वकाळीं कसे शब्द असावे याचा त्यांनीं छडा लावला असें समजतें."[1]

राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेच्या व्याकरणावर तर कै. चिं. वि. वैद्य फार लुब्ध झाले आहेत. मराठी भाषेच्या इतिहासांत त्यांच्या मतें राजवाड्यांचें हें एक क्रांतिकारक व अत्यंत महत्त्वाचें केंद्रस्थान होईल. आधुनिक मराठी भाषेचें व्याकरण करण्याचा मान जसा दादोबा पांडुरंग यांस दिला पाहिजे, त्याचप्रमाणें मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण करण्याचा वा तसा त्याचा पाया घालण्याचा मान राजवाडे यांना द्यावयास हवा असें त्यांचें मत होतें. राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरींतील मराठीच्या व्याकरणाचें समालोचन करतांना त्यांनीं म्हटलें आहे, 'पाश्चात्य पंडितांनीं पाणिनीच्या आधारें तयार केलेलें आर्य भाषेचें तुलनात्मक व्याकरण, पाणिनीचें संस्कृत व्याकरण, वररुचीचें व हेमचंद्राचें प्राकृत व्याकरण, व ज्ञानेश्वरकालीन किंवा त्या काळाजवळची ज्ञानेश्वरीची प्रत - इतक्या साधनांच्या पायावर या लहानशा ग्रंथाची रचना झाली आहे, एवढें सांगितलें म्हणजे राजवाड्यांच्या या ग्रंथाचें महत्त्व किती आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल. जगद्वंद्य व्याकरणकार पाणिनि ज्या भारतवर्षीय आर्यांत निर्माण झाला, ज्या आर्यांत वररुचि, पतंजलि, हेमचंद्र, वामन, भर्तृहरि इत्यादि सन्मान्य व्याकरणशास्त्रशास्त्री उदयास आले, त्या आर्यांच्या वंशांत व्याकरणाचें ऐतिहासिक समालोचन करण्याचें सामर्थ्य अद्याप लुप्त झालेलें नाहीं, ही अभिमानास्पद गोष्ट राजवाड्यांचें ज्ञानेश्वरी मराठीचें व्याकरण पाहून वाचकांच्या प्रत्ययास आल्यावांचून राहणार नाहीं'[2]

राजवाडे यांच्या भाषाव्याकरणकर्तृत्वाचें समालोचन या प्रकारें अनेकांनीं गौरवपूर्ण रीतीनें केलें आहे. अर्थात् असा गौरव करतांना चिं. वि. वैद्य यांच्या सारख्या अभ्यासकांनीं राजवाड्यांच्या प्रयत्नांतील उणिवाहि दर्शविल्या आहेत. उणिवा नाहींत कोणत्या शास्त्रांत वा पुस्तकांत? राजवाड्यांच्या वेळीं भाषाशास्त्र मराठींत आकारास येत होतें. संस्कृत व इंग्रजी या भाषांतील भाषाशास्त्रज्ञांच्या मदतीनें मराठीचें भाषाशास्त्र सिद्ध होत राहिलें होतें. राजवाडे यांनीं आपल्या परीनें हातभार चांगल्या रीतीनें या विषयास लाविला आहे. राजवाडे यांचें कर्तृत्व त्या

१. वैद्यांचे ऐतिहासिक निबंध : खंड ३ रा; पृष्ठ १७१–७२

२. चिं. वि. वैद्य, निबंध आणि भाषणें : पृष्ठ १०५, सन १९१५.

वेळच्या परिस्थितिनुसारच मापावयास हवें. आज त्यांच्या कांहीं व्युत्पत्त्या चुकल्या आहेत असें आढळलें, अथवा नव्या शास्त्रीय प्रगतिनुसार त्यांचा प्रयत्न कमी प्रतीचा आहे असें ठरलें तरी योग्य तें मूल्यमापन साधार करून पुढें जावयास हवें. नव्या संशोधनानें जुनें अगदींच निकालांत काढावयाचें कीं काय? असा कांहींसा प्रयत्न अलीकडे मराठी साहित्याच्या सर्व शाखांतून झालेला दिसून येतो. येथें भाषाव्याकरणाचाच विचार प्रामुख्यानें आहे. त्यामुळें याच संदर्भात राजवाडे यांच्यावरील एका समालोचनाचा विचार करणें अगत्याचें आहे.

मराठी भाषा व व्याकरण यांच्याविषयीं युरोपीयन पंडितांनीं केलेल्या संशोधनाचा परिचय करून दिल्यानंतर श्री. ना. गो. कालेलकर लिहितात, "विसाव्या शतकाच्या प्रारंभानंतर श्री. वि. का. राजवाडे, श्री. राजारामशास्त्री भागवत, डॉ. पां. दा. गुणे यांसारखे भाषेचे कित्येक अभ्यासक झाले. पण त्यांतल्या कांहींची बैठक शास्त्रदृष्ट्या पायाशुद्ध नसल्यामुळें आणि इतरांनीं फक्त पाश्चात्य विद्वानांच्या ग्रंथांतून गोळा केलेली माहिती त्रोटक आणि असमाधानकारक रीतीनें मांडल्यामुळें त्यांचें लेखन मार्गदर्शक होऊं शकलें नाहीं, किंवा त्यामुळें नवें संशोधन करून एक स्वतंत्र परंपरा निर्माण करण्याची स्फूर्तिहि मिळूं शकली नाहीं. यांपैकीं विशेष गाजलेले श्री. राजवाडे यांचें लेखन दुराग्रहानें भरलेलें आहे. भाषेविषयींचें सत्य नियमानुसारी पद्धतीनेंच दाखवून दिलें पाहिजे. यांकडे पूर्ण दुर्लक्ष करून, मनाला वाटेल तसा तर्कवाद आणि सुचतील त्या कल्पना यांवर तें आधारलेलें आहे. त्यांच्या ज्ञानेश्वरीची प्रस्तावना आणि धातुपाठांत दिलेल्या व्युत्पत्ति यासारख्या लेखनांत ही गोष्ट स्पष्टपणें दिसून येतें. केंवळ पाणिनीचें व्याकरण मुखोद्गत असलें आणि संस्कृतावर प्रभुत्व असलें म्हणजे भाषाशास्त्रावर लिहितां येतें ही समजूत आतां मागें पडली पाहिजे; पण राजवाडे यांच्याइतकाहि व्यासंग नसलेले आणि भाषाशास्त्राचें मुळींच ज्ञान नसतां भाषाशास्त्रज्ञ म्हणून ख्यातनाम झालेले त्यांच्याच परंपरेंतील श्री. कृ. पां. कुलकर्णी यांनीं पुष्कळ लेखन केलेलें आहे; पण त्यांतलें कोणतेंहि कांहींहि किंमतीचें नाहीं असें निश्चितपणें म्हणतां येतें.[1]

राजवाडे आणि त्यांच्या परंपरेंतील प्रा कृ. पां. कुलकर्णी आदि भाषाशास्त्रज्ञांच्या कार्यावरील हें समालोचन 'दुराग्रहा'चें आहे असें म्हणावें लागतें. राजवाडे यांनीं आपल्या भाषाशास्त्रीय लिखाणांत व व्युत्पत्तिनिवेदनांत कित्येक वेळां तर्कावर, अनुमानावर, वा प्रतिभेच्या बळावर विसंबून विधानें केलीं असतील, तीं चुकीचींहि असतील. पण अशा चुकांना चुका कितपत म्हणावें? त्यांतील मतभेदाच्या स्वरूपांतील किती असतील? आणि राजवाडे यांच्या एकंदर लिखाणांत अशांचें प्रमाण किती आहे यांचा तपशीलवार विचार उदाहरणें देऊन करण्याऐवजीं

१ : महाराष्ट्र जीवन, खंड दुसरा : पृष्ठ २०६, सन १९६०

श्री. कालेलकर यांनींच ‘ मनाला वाटेल तसा तर्कवाद ’ केलेला दिसतो. भाषा-विषयींचें सत्य नियमानुसारी पद्धतीनेंच दाखवून दिलें पाहिजे या तत्त्वाचाच अवलंब राजवाडे यांनीं विसाव्या शतकाच्या आरंभींच्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत केलेला आहे. राजवाडे यांच्या संपूर्ण भाषाशास्त्रीय वा व्याकरणशास्त्रीय लेखांचा अभ्यास करून मग श्री. कालेलकर यांनीं उदाहरणें देऊन निष्कर्ष द्यावयास हवा होता. अगदीं अलीकडे म्हणजे दोन वर्षांपूर्वीं प्रसिद्ध झालेल्या आपल्या पुस्तकांतहि त्यांनीं असाच अभिप्राय दिलेला आहे. राजवाडे मनःपूत तर्कवाद आणि कल्पना-विलास यांच्या पूर्ण आहारी गेले आहेत असें त्यांचें मत पुनः त्यांनीं दिलें आहे.[1] परंपरागत भाषाशास्त्र व व्याकरण हें चुकीच्या मार्गावरील आहे असा त्यांचा दावा आहे. पण जें व्हावें म्हणूत श्री. कालेलकरांना वाटतें तें थोड्याफार प्रमाणांत पूर्वींहि होण्यास सुरुवात झालेली आहे हें त्यांच्या लक्षांत येण्यास हरकत नसावी. ‘ शुद्ध कसें लिहावें हें शिकविणारें शास्त्र ’ व्याकरण होय, असें दादोबांनीं म्हटलें हें खरें आहे. पण, शुद्ध कसें बोलावें हा सुद्धां व्याकरणाचा विषय होऊं शकत नाहीं, हें सर्व मान्य आहे. आणि शुद्ध बोलणें वा शुद्ध लिहिणें यांचा संबंध शंभर वर्षांपूर्वीं फक्त दादोबांनीं लाविला आहे. यानंतर कोणीहि या व्याख्येचा पुरस्कार केलेला नाहीं. स्वतः राजवाडे तर आपल्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत म्हणतात कीं विवक्षित लोक विवक्षित भाषा विविक्षित स्थलीं व विवक्षित कालीं कोणत्या पद्धतीनें बोलतात व (लिहिणें माहित असल्यास) लिहितात, हें ज्या नियमसरणीनें म्हणजे शास्त्रानें स्पष्ट केलेलें असतें त्यास त्या भाषेचें तत्स्थलीन, तत्कालीन, व तल्लोकीय व्याकरण म्हणतात. म्हणजे येथेंहि व्याकरण भाषेची शुद्धाशुद्धता लक्षांत घेते असें म्हटलेलें नाहीं.

श्री. कालेलकर यांच्यापेक्षां राजवाडे यांच्यावरील डॉ. पळसुळे यांची टीका अधिक समर्पक आहे. कारण त्यांनीं उदाहरणें देऊन समालोचन केलें आहे. ‘ संस्कृत भाषेचा उलगडा ’ या पुस्तकावर परीक्षण लिहितांना त्यांनीं म्हटलें आहे, “ राजवाड्यांनीं संस्कृत भाषेचा ऐतिहासिक पद्धतीनें काय उलगडा केला आहे, हें पाहूं गेलों तर दिसून येईल कीं त्यांत वस्तुतः ऐतिहासिक पद्धतीचें नांवनिशाणहि नाहीं. उदाहरणार्थ खालील विधानें पाहा १ अप्रत्यय भाषा बोलण्याच्या प्रारंभास आर्यांना किंवा आर्यांच्या पूर्वजांना फक्त तीनपर्यंत आंख मोजतां येत होते (पृष्ठ २) कशावरून ? २ अत्यंत जुनाट वैदिक भाषेंत ...जवळ जवळ ह च्यासारखा स चा उच्चार होत असे (पृष्ठ ८-९) ह्याला आधार काय ? ३ ‘ अनेक रानटी भाषांत ह चा व आणि ब् चा उ होत असतो ’ (पृष्ठ १०) कोणकोणत्या भाषांत ? त्याचीं उदाहरणें ? ४ पूर्व वैदिक आर्य समाजांत एक भाषा केवळ स्वरान्त शब्दांची असे व दुसरी भाषा व्यंजनान्त शब्दांची असे ’ (पृष्ठ २२) हें राजवाड्यांना कोणी

१. ना. गो. कालेलकर, भाषा आणि संस्कृति: पृष्ठ ९७, सन १९६२

सांगितलें ? ५ वैदिक भाषा ही देवांची भाषा असून ही अर्थात् अनादि आहे अशी पाणिनीची विचित्र समजूत होती (पृ. ४९) कोणत्या सूत्रांत हें राजवाड्यांना दिसलें ? ... केंवळ नमुन्यादाखल वरील उदाहरणें दिलीं आहेत. परंतु प्रस्तुत पुस्तकांतून अशीं शेकड्यांवारी उदाहरणें काढून दाखवितां येतील. राजवाडे नुसती बेछुट विधानें करतात. त्यांना कोठलाहि आधार देत नाहींत. आपल्या कोठल्याहि विधानाच्या पुष्टयर्थ त्यांनीं अवेस्ता, ग्रीक, लिथुएनियन, ओल्ड चर्च स्लॅव्हिक, इटॅलिक, केल्टिक, जरमॅनिक ह्या सारख्या सजातीय भाषांतून एकदांहि एकहि उदाहरण दिलेलें नाहीं. ऐतिहासिक दृष्टीनें संस्कृतचा उलगडा करूं पाहणाऱ्या पुस्तकांत ही उणीव अत्यंत विस्मयजनक आहे ... वस्तुस्थिति अशी आहे कीं ऐतिहासिक व्याकरणपद्धतीच्या कांहीं मूलतत्त्वांशीं राजवाडे यांचा परिचय झाला होता. पण ह्या पद्धतीच्या ज्या कसोट्या आहेत त्यांचें त्यांनीं कठोरपणें पालन न करतां स्वतःच्या कल्पनाशक्तीवरच सगळी भिस्त ठेवली "[1] आधार न देणें, कल्पनांवर विसंबणें हे राजवाडे यांच्या शास्त्रीय पद्धतींत दोष आहेत. त्यांचा तपशील देऊन विचार करण्यासाठीं स्वतंत्र विवेचन करावें लागेल.

पण या ठिकाणीं एक मुद्दा महत्त्वाचा असा कीं राजवाडे ज्या भाषेचें, व्याकरणाचें, वा व्युत्पत्तिशास्त्राचें स्वरूप वर्णन करीत होते तेंच मोह निर्माण करणारें आहे कीं काय ? राजवाडे यांच्या विवेचनपद्धतींत दोष असतील, पण जे विषय राजवाडे यांनीं अभ्यासासाठीं निवडले तेहि मोह उत्पन्न करणारे आहेत. या मोहापायी व्युत्पत्तिशास्त्रांत व भाषाशास्त्रीय पद्धतींत पुष्कळ प्रमाद व हास्यास्पद चुकाहि होण्याची शक्यता असते. संस्कृत व इंग्रजी भाषांतील अशा प्रमादपूर्ण निर्वाचनाची यादी 'राजवाडे धातुकोशा' च्या प्रस्तावनेंतच दिली आहे. या मोहांतून मोठमोठे वैय्याकरणहि सुटले नाहींत. राजवाडे यांना अशा तऱ्हेचे मोह अनेकदां झाले, ते क्षमा करणें न करणें या दृष्टीपेक्षां ते कां संभवतात हाहि एक चिंतनीय विषय आहे.

मराठी भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीने राजवाडे यांनीं आणखी एका दिशेनें प्रयत्न केला. ज्ञानेश्वर वा मुकुंदराज यांच्याहि आधीं मराठी भाषेंत गद्यांत व पद्यांत ग्रंथरचना होत होती ती महानुभावपंथाच्या आश्रयानें महानुभावीय पंथीयांनीं आपली साहित्यसंपदा गुप्त लिपींत वा सांकेतिक लिपींत बद्ध केल्यामुळें तिचा बाहेरील वाचकांस फार उशिरा बोध झाला. महानुभावांच्या सांकेतिक लिपीचा शोध घेऊन त्यांच्या साहित्याचा परिचय करून घेण्याचा प्रथम प्रयत्न राजवाडे यांनीं केला. आज महानुभावीय पंथ, वाङ्मय यांविषयीं पुष्कळच लिहिलें गेलें

---

१ डॉ. ग. बा. पळसुले, 'अनैतिहासिक पाणिनि व ऐतिहासिक राजवाडे; केसरी २६ नोव्हेंबर, १९६१

असलें तरी याचा आरंभ राजवाडे यांच्या कल्पक बुद्धींतून झाला आहे ही बाब ध्यानांत घेण्यासारखी आहे. या संबंधींची हकीकत अशी.

"राजवाडे १९१२ सालीं पुण्यांतील आनंदाश्रमांतील पोथ्या धुंडाळत असतां तिच्या ग्रंथांच्या यादींत 'अनिर्वचनीय' असा शेरा मारलेल्या अशा एका पोथीचा त्यांना आढळ झाला. त्यामुळें जिज्ञासा जागृत होऊन त्यांनीं ही 'अनिर्वचनीय' पोथी आहे तरी कसली, ह्याचा कसून उलगडा करून घेण्याचें ठरविलें. ह्या पोथीच्या शेवटीं एक आकडा लिहिलेला त्यांना आढळला. हा आकडा ग्रंथ समाप्तीच्या वर्षाचा असला पाहिजे असा अंदाज करून त्याच्या मागील दोन अक्षरेंहि 'शके' ह्याकरितां योजिलीं असलीं पाहिजेत हें निश्चित झाल्यावर त्याच्या पूर्वीचा आकडा तिथीचा व मासाचाच असावयाचा असें अनुमान करून 'मिति' आणि 'मास' ह्या अक्षरांऐवजीं कोणतीं अक्षरें ग्रंथकारानें योजिलीं आहेत तीं नक्कीं केलीं. संवत्सराचें नांव ग्रंथसमाप्तीच्या वेळीं नमूद करण्याचा प्रघात असतो, तो लक्षांत घेऊन संवत्सराचें नांव त्या शकांत कोणतें हें त्यांनीं नक्की केलें. त्यानंतर त्या संवत्सराच्या नांवाच्या अक्षरांऐवजीं कोणतीं अक्षरें वापरलीं आहेत तीं त्यांनीं नक्की केलीं. ह्या प्रमाणें अक्षरें नक्की केल्यावर क, ख, ग, घ, ङ ह्या पांच अक्षरांऐवजीं ग्रंथलेखक क्रमशः दुसरीं पांच अक्षरें वापरतो असें त्यांच्या निदर्शनास आलें व अशा रीतीनें त्या ग्रंथकारानें योजिलेला सर्व संकेत त्यांना उलगडतां आला."[1] या संकेताचा उलगडा होण्यासाठीं सतत तेरा दिवस एकसारखें त्यांचें चिंतन चाललें होतें. त्यांनीं संकेत उलगडून त्यांची परिभाषाहि बसविली. महानुभावी महंत व डॉ. भांडारकर यांनीं राजवाडे यांच्या बुद्धिसामर्थ्याचें कौतुक केलें. राजवाडे यांच्या या नव्या किल्लीनें मानभावांचा हा 'अनिर्वचनीय' ग्रंथ म्हणजे संस्थापक श्रीचक्रधर याचा लीलासंग्रह होय. राजवाडे यांची ही कामगिरी विशेष महनीय मानावी लागेल. यानंतर डॉ. य. खु. देशपांडे, वा. ना. देशपांडे, ह. ना. नेने, नी. ब. भवाळकर, वि. भि. कोलते यांची महानुभावीय साहित्याच्या अभ्यासाची एक परंपराच निर्माण झाली आहे.

महानुभावीयांच्या साहित्यविचारांवर राजवाडे यांच्या अनेक टिपण्या प्रसिद्ध होऊं लागल्या. महानुभवांच्या विषयींचा गैरसमजहि राजवाडे यांनीं दूर करण्याचा प्रयत्न केला. 'मानभाव' लोक आपले बहुतेक ग्रंथ पंथबाह्य लोकांना दाखवितात, इतकेंच नव्हे तर ते प्रसिद्ध करण्यास कोणी भेटल्यास त्यांत ते समाधान मानतात. त्यांच्या पंथांतील गुप्तलिपींत लिहिलेले बीजात्मक जे ग्रंथ आहेत ते मात्र पंथबाह्य लोकांना ते दाखवीत नाहींत.[2] मानभावांच्या ग्रंथाचें माहात्म्य राजवाडे यांना वाटलें

१. भा. बा. भट, 'राजवाडे व धातुकोश' : वियासेवक, मे १९२८

२. वि. का. राजवाडे, एक जुने मानभावी काव्य, प्रस्तावना : संकीर्ण लेख संग्रह

तें त्यांच्या प्राचीन मराठी भाषेमुळें, मानभावांच्या धर्ममताचा सामाजिक विचार त्यांनीं समजावून सांगितलाच, पण यादवकालीन भाषाविशेष समजण्यास मानभावी ग्रंथ उपयुक्त होईल हा लाभ त्यांना विशेष वाटला.

राजवाडे यांच्या भाषाभ्यासाचें आणखी एक साधन म्हणजे त्यांनीं केलेलें ताम्रपटशिलालेखांचें वाचन. त्यांच्या अखंड परिभ्रमणांत त्यांना पंचवीसतीस तरी शिलालेख उपलब्ध झाले. त्यांच्या अभ्यासानें त्यांनीं मराठी भाषेचा आदिकाल पांचव्या शतकापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. आपल्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत त्यांनीं शक ४१० मधील मंगळवेढे येथील मराठी ताम्रपट व शक ६५८ मधील चिकुर्डें येथील ताम्रपट यांपासून प्रारंभ करून शक ९०५ मधील चामुंडरायाचा शिलालेख, शक ११२८ मधील पाटण्याचा शिलालेख, शक ११९५-९८ मधील पंढरपूरचा चौऱ्याशीचा शिलालेख, इत्यादि महत्त्वाच्या अशा शिलालेखांची चिकित्सा करून मराठीचा आरंभकाळ त्यांनीं शक ४०० हा निश्चित केलेला आहे. मराठी भाषेच्या इतिहासांत ग्रंथनिर्मितीच्या पूर्वीचा हा शिलालेखांचा आधार राजवाडे यांनी फार महत्त्वाचा वाटला. मंगळवेढे, चिकुर्डें येथील ताम्रपट, व श्रवणबेळगोळ, पळसदेव, पाटण, आळंदी, पंढरपूर, करोली, आगासन, नांगाव, मठगांव, नागेशी इत्यादि ठिकाणचे शिलालेख राजवाडे यांनीं वाचले व त्यांवरून कांहीं अनुमानें बांधिलीं. राजवाडे यांनीं शोधलेल्या कोणत्याहि लेखाचा ठसा देण्याचा प्रयत्न केला नाहीं. राजवाडे यांनीं संशोधिलेल्या पहिल्या दोनहि ताम्रपटांचा काळ अनिश्चित ठरला. त्यांच्या खरेपणाविषयींहि शंका निर्माण झाली. श्रवणबेळगोळच्या शिलालेखाचें राजवाडे यांचें वाचन पाश्चात्य राईस हुल्ट्झ यांच्या किंवा आपल्या इकडील नरसिंहाचार यांच्या तुलनेनें मामुली आहे. 'पाटण'चा शिलालेख राजवाडे यांनीं कसून वाचलेला आहे. पंढरपूरच्या चौऱ्याऐंशीच्या शिलालेखाचें वाचनहि त्यांनीं केलें. त्यांतील उणीवा स्पष्ट असल्या तरी या अति विस्तृत अशा शिलालेखाचें निर्वचन करण्यांत राजवाडे यांनीं पुष्कळच यश मिळविलें आहे. आळंदीच्या लेखाचें त्यांचें वाचन चुकीचें असून त्यांत कल्पनाविलासाला खूपच वाव मिळालेला आहे. "आळंदीचा हा लेख वास्तविक पाहतां एका सतीच्या स्मारकाचा लेख आहे. परंतु त्यावरील हात जोडून उभें असलेलें दांपत्य आणि चंद्र सूर्य यांच्या खोदलेल्या आकृतींवरून अनुक्रमे विठ्ठल, भक्ति व नाथसंप्रदाय व्यक्त होतात असें राजवाडे यांना वाटतें व त्यावरून हा लेख ते आळंदीच्या हरिहरेंद्र स्वामींच्या परंपरेशीं संबद्ध ठरवितात. मूळ लेखांत या कल्पनेस कोणताहि आधार नाहीं."[1]

करोळी, आगासन हे लेखहि राजवाडयांच्या प्रमादशील वाचनाचे नमुने आहेत. शक १२३३ चा पंढरपूर शिलालेख त्यांनींच प्रथम संपादिला, पण

१. डॉ शं गो. तुळपुळे, प्राचीन मराठी कोरीव लेख, प्रस्तावना: पृष्ठ ३४, सन १९६३

त्यांतील वाचनांतहि बरेच दोष आहेत. नागांव, मठगांव, बांदोडें येथील शिलालेखांचें त्यांचें संशोधनहि सामान्य प्रतीचें आहे. सारांश, 'कीलहॉर्न किंवा फ्लीट यांच्यासारख्या तज्ज्ञांच्या तुलनेनें पाहतां राजवाडे यांचें कार्य डोळ्यांत भरण्यासारखें वाटत नाहीं. वरील विद्वद्वर्योंच्या अभ्यासांतील पद्धतशीरपणा, टापटीप, स्वतःची चूक वा अज्ञान कबूल करण्यांतील मोकळेपणा आणि वृत्तींतील विनय हे गुण राजवाड्यांत फार कमी प्रमाणांत दिसतात. एकंदरीतच त्यांच्या संपादनाला 'अहं' चा व अतिरिक्त कल्पनेचा वास अधिक मारतो. पण या सर्व उणिवा असूनहि राजवाडे यांचें या क्षेत्रांतील स्थान मोठें आहे हें मान्य करावेंच लागतें. त्यांचें मुख्य कार्य संशोधनाचें आहे, संपादनाचें नाहीं. भावी अभ्यासकांना संशोधनाची दृष्टि देणें हें त्यांचें मुख्य कार्य होय व म्हणूनच ते सर्व संशोधकांना गुरु ठरतात."[१]

भाषाव्याकरणाशींच संबंधित असणारा आणखी एक दुर्लक्षित विषय राजवाडे यांनीं हाताळलेला आहे. तो म्हणजे मराठींतील विविध छंद हा होय. संस्कृत वृत्तांचा अभ्यास संस्कृत पंडितांच्या द्वारें मराठींत आलेला होता. पण अभंग, दिंडी, साकी, घनाक्षरी, सवाई, छप्पा, ओवी, कटिबंध, चूर्णिका इत्यादि विविध छंद मराठींत आढळतात. यांतील निव्वळ मराठीचे किती, म्हणजे इतर कुठल्याहि भाषेंत न सापडणारे किती याचा शोध राजवाडे यांनीं घेतला आहे. राजवाडे यांच्या निरीक्षणावरून चूर्णिका ही संस्कृतांतून आलेली आहे. चूर्णिका, उत्कलिका, वृत्तगंधि व कडाका हे चूर्णिकेचे प्रकार- अमृतध्वनि, अश्वधाटी (७ तगण + ग), उमा (७ भगण + ग), मदिर (७ भगण + २ ग), दुसरी मदिरा (५ भगण + रगण + नगण + २ ग), तिसरी मदिरा (नगण + ६ जगण + लग) व सुंदरी हे मराठी सवाईचेच प्रकार होत. सवाई हा शब्द फारशी असून त्याचा अर्थ 'सारखा' असा आहे. एखाद्या वृत्तांत एकच गण वा वर्ण सारखा सारखा येतो म्हणून तें वृत्त सवाई.

छप्पा म्हणजे प्राकृतपिंगल मधील छप्पअ. छप्पअ शब्द षट्पद शब्दाचें प्राकृत रूप. साकी हा शब्द वैदिक 'शक्करी'पासून निघाल्याचें राजवाडे सांगतात; व पिंगलाचार्यविरचित छंदःशास्त्राचा दाखलाहि देतात. दिंडी शब्द डिंडिम् ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. डिंडिम् हें एक वाद्य. ह्या वाद्यासारखा ज्याचा आवाज ती दिंडी. हा महाराष्ट्री भाषेंतून मराठींत आला असावा. ज्यांत कर्णमधुर गण म्हणजे भंग नाहींत ते अभंग अशी व्याख्या देऊन राजवाडे अभंगाचें रूप गणविहीन वृत्तात्मक समचरण अथवा विषमचरण छंद समजतात; व नंतर मग अभंगांचे कांही प्रकारहि देतात. प्रतिष्ठा, सुप्रतिष्ठा, उष्णिग्, अनुष्टुब,

१. कित्ता : पृष्ठ ३५.

बृहती, पंक्ति, त्रिष्टुब, जगती इत्यादि अभंगप्रकारांचीं वर्णनें व उदाहरणें राजवाड्यांनीं दिलीं आहेत. राजवाडे यांनीं ओवीचीहि ऐतिहासिक कुळकथा सांगितलेली आहे. शक १५६० मध्यें मुऱ्हारिमल्ल बास नांवाच्या महानुभावीय ग्रंथकाराच्या दर्शनप्रकाश नामक ग्रंथांत 'ओवाणिका' शब्द असल्याचें त्यांनीं सांगितलें आहे. ऊम्—सूत्र ओंवणें यापासून त्यांच्या मतें ओवी शब्द निघाला. षडक्षरी ओवी, सप्ताक्षरी ओवी, अष्टाक्षरी ओवी, नवाक्षरी ओवी, दशाक्षरी ओवी, एकादशाक्षरी ओवी, द्वादशाक्षरी ओवी, त्रयोदशाक्षरी, चतुर्दशाक्षरी, षोडशाक्षरी असे ओवीचे अक्षरसंख्येवर त्यांनीं प्रकार मानिले आहेत. ओवीसंबंधींचें राजवाडे यांचें विवेचन ऐतिहासिक दृष्टीनें महत्त्वाचें आहे. "राजवाडे यांचा लेख म्हणजे ठसकेदार, प्रौढ आणि प्रत्ययकारोत्पादक पद्धतीनें लिहिलेला असावयाचा आणि त्यांतील विवेचन नेहमीं सर्वमान्य होण्याजोगें नसलें तरी तें अभिनव आणि मननीय असावयाचेंच असें समजण्यास चिंता नाहीं. मराठी छंदावरील प्रस्तुत लेख याच नमुन्याचा आहे. या विषयावर या तोलाचा दुसरा एकहि निबंध नाहीं असें मला वाटतें."[1] हा म. म. पोतदार यांचा अभिप्राय समर्पक नाहीं असें कोण म्हणेल?

या प्रमाणें राजवाडे यांना भाषा, व्याकरण, छंदःशास्त्र यांची महती वाटत होती. या विषयांच्या स्वरूपाचा अभ्यास त्यांनीं केलाच पण यांच्या ऐतिहासिक पूर्वपीठिकांची चिकित्साहि त्यांनीं केली. भाषा, वाङ्मय, लिपि, व्याकरण, पद्यशास्त्र हे सर्व अभ्यासविषय एकंदर राष्ट्राच्या उदयासहि कारणीभूत होतात असें त्यांना मनापासून वाटत होतें. व्याकरणाचा काय उपयोग? असा प्रश्न विचारणाऱ्या लोकांना उत्तर देण्यासाठीं म्हणून त्यांनीं 'सुबंतविचारां'त लिहिलें आहे.

"व्याकरणशास्त्रावांचून सध्यां काय अडलें आहे, असा बालिश प्रश्न जे कोणी विचारतात त्यांना उत्तर एवढेंच कीं हरएक शास्त्रावांचून तर ह्या देशांचें सर्वत्र नडत आहे. जितकें रसायनशास्त्रावांचून नडत आहे, जितकें राज्यशास्त्रावांचून नडत आहे. जितकें युद्धशास्त्रावांचून नडत आहे, तितकेंच व्याकरणशास्त्रावांचूनहि नडत आहे. येथें युद्धशास्त्राच्या जोडीला व्याकरणशास्त्रास नेऊन बसविलेलें पाहून, कित्येक सुज्ञांना अचंबा वाटेल. परंतु त्यांनीं अंमळ सबूरी करावी. त्यांच्याहून सहस्रपट मोठ्या अशा एका युद्धशास्त्रज्ञाच्या कृतीकडे सहृदय अंतःकरणानें पाहण्याची त्यांनीं कृपा करावी. ज्यूलियस कैझर हा योद्धा मोहिमेवर असतांनाहि लॅटिन भाषेच्या व्युत्पत्तीवर व व्याकरणावर शास्त्रीय ढिपणें मोठ्या काळजीनें लिहून ठेवी. हातांत तरवार ज्यानें लखलखावावी, त्यानें त्याच हातानें व त्याच वेळीं व त्याच स्थळीं लेखणीसारख्या तीक्ष्णतर आयुधाच्या साह्यानें व्याकरणाचा मान राखावा, हा काय चमत्कार

१ द. वा. पोतदार, मराठी छंद : प्रस्तावना पृष्ठ १, सन १९२६

आहे बरें ? ज्यांना सामान्य सुरीहि कशी ती धरितां येत नाहीं, ज्यांनीं साऱ्या जन्मांत सुपाखेरीज रसायन पाहिलेलें नाहीं, त्यांना व्याकरणाच्या योग्यतेची पारख कशी होणार ? व्याकरणशास्त्र हें मानवी व्यवहाराला फार उपकारक आहे. तद्-भावी केव्हां केव्हां तर मोठा अनर्थ गुदरतो व राजकीय उलाढाली करणाऱ्यांच्या प्राणावर येऊन बेततें. यास दृष्टान्त अनुभवावरून व इतिहासावरून शेकडों देतां येतील. परंतु परप्रत्ययनेय बुद्धि जे आमच्या इकडील खर्डेघाशे, त्यांच्या समाधानार्थ त्यांना मान्य अशा एका आधुनिक इंग्लिश मुत्सद्याचें व्याकरण व वैयाकरण यांसंबंधाचें मत सांगतों. हाल्डेन नांवाच्या एका पुढारी इंग्लिश मुत्सद्यानें The dedicated life नांवाच्या एका निबंधांत व्युत्पत्ति व वैयाकरण ह्यांच्या अभ्यासांत गर्क झालेल्या परंतु चवढाळ अशा मूर्ख लोकांच्या अवहेलनास पात्र झालेल्या एका वैयाकरणाचा दाखला देऊन आपल्या इंग्लिश श्रोतृवर्गाला असा उपदेश केला आहे कीं, ‘ बाबांनो, या वैय्याकरणाप्रमाणें कशाचीहि पर्वा न करितां एकनिष्ठेनें हातीं घेतलेलें महत्कृत्य करीत राहा ’ सुज्ञांनीं या वर दिलेल्या गोष्टीचें मनन करावें.”

परिशिष्ट क्र. १

कांहीं पत्रें, कांहीं टिपणें

राजवाडे यांनीं आपल्या इष्टमित्रांना अनेक पत्रें लिहिलीं आहेत. त्यांतून त्यांची ज्ञानपिपासा दिसून येते. त्यांच्या विचारांतीलहि अनेक छटा त्यांतून प्रकट झाल्या आहेत. मधून मधून त्यांनीं स्फुट विषयांचीं टिपणें केलेलीं आहेत. त्यांवरूनहि त्यांच्या मनांतील संकल्प व विचार यांची कल्पना येण्यासारखी आहे. भा. वा. भट यांच्या 'राजवाडेचरित्र' मधील कांहीं पत्रें व कांहीं टिपणें येथें निवडून दिलेलीं आहेत. संपूर्ण पत्रें वा टिपणें येथें दिलेलीं नाहींत. जरूर तेवढा भाग दिलेला आहे.

१ : एक अडचण पैशाची !

"शिवाजी, संभाजी व राजाराम यांच्या इतिहासाचा शोध सध्यां आपण करीत आहांत हें वाचून बहुत आनंद झाला. शहाजी, शिवाजी, संभाजी व राजाराम यांचा किंवा यांच्या वेळचा पत्रव्यवहार उपलब्ध होण्यासारखा आहे, अशी माझी दिवसेंदिवस ज्यास्त खात्री होत चालली आहे. ग्रांट डफचा शिवाजीचा व संभाजीचा व राजारामाचा इतिहास बराच किंबहुना फारच अपूर्व आहे असेंहि म्हणण्यास मजजवळ सबळ कारणें आहेत. 'मराठ्यांच्या इतिहासाच्या' साधनांचा दुसरा खंड मी सध्यां छापीत आहें, त्यांत शिवाजीच्या इतिहाससंबंधी कांहीं चर्चा करीत आहें. त्यावरून मी काय म्हणतों तें आपल्या ध्यानांत येईल. हा दुसरा खंड मे किंवा जून किंवा जुलईंत छापून तयार होईल. झाला म्हणजे एक प्रत आपल्याकडे अवश्य पाठवीन. शिवाजीसंबंधीं पत्रें महाराष्ट्रांत पुष्कळ ठिकाणीं आहेत. त्यापैकीं बरींच फारशींत आहेत. तीं सर्व मिळाल्यावांचून व त्याजवरून शिवाजीच्या चरित्राचा कार्यक्रम कळल्यावांचून शिवाजी इतिहास लिहूं जाणें बरेंच धोक्याचें, किंबहुना निरर्थक आहे. या पत्रांचा शोध लावण्याच्या खटपटींत मी सध्यां आहें. परंतु एका अडचणीमुळें सर्व गोष्टी मागें पडतात. ती गोष्ट पैशाची. तीं पत्रें मिळवायचीं म्हणजे सडकून प्रवास केला पाहिजे. हजारों ठिकाणांहून येक येक पत्र जमविलें पाहिजे. ह्याला पैसा पाहिजे. माझ्या तुटपुंज्या मिळकतींतून मी कांहीं पैसे खर्चतों, परंतु त्यानें काम अगदीं मुंगीच्या पायानें चालतें. सहा सहा महिन्यांनीं एखादा लेख हातीं आल्यास नशीब. इतर लोकांकडून कामें करून घ्यावीं लागतात. जें काम मी स्वतः गेलों असतां एका दिवसांत

होईल तें काम दुसऱ्याच्या हातून सहा महिन्यांतहि होऊन येत नाहीं. कारण तें काम करण्याची आवश्यकता त्याला तितकी नसते."[१]

२ : जास्त पैसे पाहिजेत कशासाठी ?

"माझ्या पुस्तकाला आपल्या संस्थानच्या Encouragement Dept. कडून साठ (६०) रुपये बक्षीस मिळालें. आपण जर महाराज सरकारकडून माझ्या पुस्तकाला कांहीं उत्तेजनार्थ साहाय्य करवाल तर ते पैसे मी शिवाजीच्या इतिहासाचीं साधनें शोधून काढण्याच्या कामीं लावीन. आपलें काम फार नाजूक आहे हें मी जाणून आहें. आपल्याला यासंबंधीं मी एक शब्दहि लिहिला नसता. परंतु कर्तव्यहि पैशाच्या आभावामुळें होत नाहीं. कोणाचे खाजगी किंवा सार्वजनिक काम न करितां घरीं बसून राहिल्यास कोणापाशींच याचना करण्याची जरूर नाहीं, परंतु कांहीं काम हातीं घेतलें म्हणजे त्याला पैसा पाहिजे. त्याशिवाय तें नांवारूपाला येत नाहीं. तेव्हां माझी अशी विनंती आपल्याला आहे कीं, महाराजसरकारला माझ्या वतीनें मोठे नम्रपणानें अशी विनंति आपण करावीं कीं, या कामीं ग्रंथाला उत्तेजन देऊन आपण कांहीं तरी मला मदत करावी, म्हणजे मिळालेला पैसा मी शिवाजीच्या इतिहासाचीं साधनें काढण्याकडे लावीन. माझा खाजगी खर्च फारच थोडा आहे. २५ रुपयांहून ज्यास्त नाहीं. बाकी सर्व मिळकत मी इतिहासाच्या कामीं लावितों, परंतु तेवढ्यानें काम भागत नाहीं. जास्त पैसे पाहिजेत, तर खटपट करून पहावी. आपण सहाय्य करून दिल्यास त्याचें चीज करून दाखविणें मजकडे आहे. हें सर्व सरकारमहाराजांस स्पष्टपणें विदित करावें. कळावें बहुत काय लिहिणें, कृपालोभ वृद्धिंगत असावा हे विनंति."[२]

३ : कोणास जबाबदार होऊं इच्छित नाहीं !

"आपण गेल्या जानेवारीपासून ऐतिहासिक पत्रें लिहून काढण्याच्या कारकुनाचा पगार म्हणून दरमहिना पंधरा रुपये पाठवितां त्या बद्दल अमुक काम झालेंच पाहिजे अशाबद्दल मी आपल्याला जबाबदार आहे किंवा काय तें कळवावें. आज माझ्या वयाला चाळीस वर्षे झालीं, मी कोणाला जबाबदार नाहीं. व पुढें होऊं इच्छीत नाहीं. तेव्हां आपल्याला एवढीच विनंती कीं, पंधरा रुपयांचें काय केलें असा जबाब वर्षाअंतीं आपण मला विचारणार असल्यास मला आपले पंधरा रुपये नकोत. बाकी जबाब विचारण्याचा संकल्प नसल्यास पंधरा रुपयांचें काम काय झालें तें ऐतिहासिक पत्रांच्या प्रकाशनावरून कळून येईल. मी वारंवार

---

१. गो. स. सरदेसाई यांना पत्र, २० मार्च १८९९

२. गो. स. सरदेसाई यांना पत्र, २० मार्च १८९९

दोन दोन चार चार महिने फिरतीवर असतों. त्यामुळें लेखक बंद ठेवावा लागतो. कारण लेखकाला मोडी शुद्ध व खरें वाचतां येत नाहीं. स्वतः लेखकाकडून पत्रें वाचून घेऊन किंवा स्वतः सांगून लेखकाकडून लिहून घ्यावयाचें असतें. तेव्हां माझी स्वतःची हजेरी लेखकापाशीं असावी लागते. सबब लिहावयाचें काम वेळों वेळीं तहकूब राहील असा अनुभव येत आहे. तेव्हां आपली मर्जी असल्यास पंधरा रुपये चालू ठेवावे, नसल्यास बंद करावे. म्हणजे तुमच्या आमच्या-मधला गोडपणा कायम राहील. पत्रोत्तर जलद व निश्चित यावें. भीड बिलकूल धरूं नये. माझ्या स्वतःखेरीज इतर कोणाला मी जबाबदार होऊं इच्छीत नाहीं. काम करावयाचें हा निश्चय आहे. तें काम स्वतःच्या सोईनें उत्तम होतें, असा अनुभव आहे. दुसऱ्याची सोय बघून भागत नाहीं, म्हणून लिहिलें आहे. आपण मदत करण्यास तयार झाला हें आपणास योग्य आहे. परंतु मला मदत माझ्या सोईला जुळेल अशी असल्यास घेतां येईल. हें वरील माहिती वरून ध्यानांत येईल."[१]

४ : आपण एवढें इंग्रजींत करावें !

"रा. किंकेड यांचा लेख अलाहाबाद रिव्ह्यूंत आला होता. त्याचें खंडन मी राष्ट्रोदयांत केलें आहे. तरी तें इंग्रजींत अलाहाबाद रिव्ह्यूंत झाल्याशिवाय योग्य गोष्ट होणार नाहीं. सर्व हिंदुस्थानभर आपल्या पूर्वजांची निंदा त्या गृहस्थानें केली आहे. ती खोटी आहे हें जगाच्या निदर्शनास आणणें हें आपलें कर्तव्य आहे. मी स्वतः इंग्रजींत लिहीत नाहीं, हें आपल्याला माहीत आहे. तेव्हां आपण हें काम करावें अशी माझी आपणांला आग्रहाची विनंति आहे. आपण मजपेक्षां इंग्रजी चांगलें लिहाल. तशांत मी मुळीं लिहीतच नाहीं. प्रतिज्ञाच आहे. राष्ट्रोदयांतील माझा लेख आधाराला घ्यावा. केसरींतील रा. आठल्ये यांचा लेख चंद्रग्रहणापुरता चुकलेला आहे. ही इशारत लक्षांत ठेवा." [२]

५ : १९५० मध्यें ब्रिटिश साम्राज्याचा अंत !

"-(9) The Maratha wars were mainly undertaken for conquest. They had nearly won the prize, the softened degenerated races of Madras, Bengal on the north had already succumed to the British. The Marathas alone remained and had to bear the brunt and fight the cause of the whole of India. It is really from the Marathas that the British conquered India.

---

१ न. चिं. केळकर यांना पत्र, सन १९०४–०५

२ न. चिं. केळकर यांना पत्र, दि. १३ नोव्हेंबर १९०९

15) 1800 - 1880 - England in Russia and Afaganistan

16) 1873 - 1907 - Germany, Bismark's colonial Empire

17) 1890 - 1907 - Rise of Japan who kills China and Russia in the East. Japan wants colonial Empire. So Germany, Japan, America and France were the possible riavls of England and England is weak in Ireland, India, Australia and Canada.

(18) 1950 would see the end of the British Empire.–"[१]

६ : उगांच भाकडें लिहूं नका !

" –१ आपलें मंडळ Antiquarian नसून Historical आहे हें लक्षांत ठेऊन मजकूर द्या. Critically examined जेवढा मजकूर असेल तेवढाच द्यावयाचा. उगांच भाकडें देऊन मतलब काय ? प्रत्येक ओळ इतिहासकाराच्या उपयोगी पडेल अशी खबरदारी घ्या. गांवच्या हकीकती, दंतकथा व गप्पागोष्टी Critical क्वचित्च असतात. तरी सहसा देऊंच नये. Critical मजकुराचा काय तोटा आहे ?

२ पंधरवड्याचीं टिपणें व निबंध भरपूर येतील. भिऊं नका. दर महिन्यास जेवढीं टिपणें व निबंध सभेपुढें येतील तेवढेच छापावयाचे, जास्त नाहीं व कमी नाहीं. एखाद्या महिन्याला अंक १०० पानांचा निघेल तर एखाद्या महिन्याला ४० पानांचा निघेल. कांहीं हरकत नाहीं.—"[२]

७. व्याकरणांतील शुद्धाशुद्ध विवेक !

" –आपण रंगीत पृष्ठांवर लेख लिहिला आहे, त्यांत व्याकरणदृष्ट्यां कांहीं दोष दिसतात ते दाखवितों, म्हणजे पुढील खेपेस ते होणार नाहींत.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
२	२	ठरविण्याकरितां	ठरविण्या करितां
		(शब्दयोगी अव्ययें तोडून लिहावीं. मुळें, शिवाय इ.)	
२	४	आणण्याकरितां	आणण्या करितां
२	५	आपले समाजाची प्रगति	आपल्या समाजाची प्रगति
		(आपले मित्र; परंतु आपल्या मित्रास. आपले मित्रास लिहूं नये)	
२	९	जोपासनेप्रीत्यर्थ	जोपासने प्रीत्यर्थ
			(जोपासने ही षष्ठी आहे)

---

१. गो. स. सरदेसाई यांना पत्र ९ मे १९०९.

२. श्री. गो. का. चांदोरकर यांना पत्र, ८ जुलै १९१६.

२	१०	त्यांचेपासून	त्यांच्या पासून
			(त्यांचे दोष; परंतु त्यांच्या दोषाकडे)
२	११	असतांनाच	असतांना च
			(च, हि इत्यादि अन्ययें निराळीं लिहावीं)
२	१२	संस्थांचे हिताचे दृष्टीनें	संस्थांच्या हिताच्या दृष्टीनें
२	१२	घातूक	घातुक
२	१४	संस्थांचे चालकांचे उद्योग	संस्थांच्या चालकांचे उद्योग
			संस्थांच्या चालकांच्या उद्योगांत
२	१५	राष्ट्रांमध्ये	राष्ट्रां मध्यें
२	१७	त्यांमध्यें	त्यां मध्यें
२	३०	वर्षानंतर	वर्षां नंतर
२	३२	देण्याकरितां	देण्या करितां
२	३२	अमेरिकेचे कांग्रेसनें	अमेरिकेच्या कांग्रेसनें
२	३३	इतिहासाचे अभ्यासाची वृद्धी	इतिहासाच्या अभ्यासाची वृद्धि
			(इतिहासाच्या अभ्यासाच्या वृद्धीकरितां)
३	७	व्हाइस प्रेसिडेंट, सेक्रेटरी आणि कार्यकारी मंडळांत	व्हाइस प्रेसिडेंटाच्या व सेक्रेटरीच्या जागीं आणि कार्यकारी मंडळांत
		(व्हाइसप्रेसिडेंट आणि सेक्रेटरी यांच्या रचनेंत विभक्ति नाहीं)	
३	८	कार्यकारी मंडळ	कारभारी मंडळ

"कारभारी मंडळ हा योग्य मराठी शब्द मूळचा आहेच तो सोडून, अलिकडे कित्येक बहुधा सर्व लोक कार्यकारी हा शब्द कोशांत पाहून योजतात. Managing चें भाषांतर कार्यकारी. वस्तुतः Manager म्हणजे कारभारी. पण सध्या लोक स्वभाषेंतील सामान्य शब्दहि विसरले आहेत."[1]

८ : फ्रेंच पुस्तक मी वाचतों !

"पत्र पावलें. चंद्रनगर व पारीस येथील सोसायट्यांना फ्रान्समधील सर्व इतिहासमंडळांच्या हकीकतीचें पुस्तक व माहिती कोठें मिळेल तें विचारावें, व त्यांनीं दिलेल्या पत्त्यावर पत्र पाठवून तें पुस्तक विकत आणावें, असें तात्यांना कळवावें. त्यांनीं सर्व जगांतील सर्व इतिहासमंडळांचा वृत्तांत देण्याचें अभिवचन

१. भा. वा. भट यांना पत्र दि. ३१ मार्च, १९१७.

ऐतिहासिक मासिक पुस्तकांत देऊन ठेविलें आहे तें खरें केलें पाहिजे. सबब इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी, रशिया, आस्ट्रिया, टर्की, स्पेन, पोर्तुगाल, आस्ट्रेलिया, सौथ आफ्रिका, सौथ अमेरिका, जपान, चीन, सयाम, सीलोन, फिलीपाईन इत्यादि देशांत पत्ते काढून पुस्तकें तात्यांनीं आणलीं पाहिजेत. फ्रेंच पुस्तक मी वाचतों. रामदासी अंक पावला. उशीर कां होतो? इतिहास मासिकाच्या रंगीत मजकुरांत योग्यसुधारणा करण्याची, ती करून छापालच.—"[१]

९ : सर्व जगांतून माहिती मिळवा !

"(१) आपलें पत्र पोंचलें. रंगीत पृष्ठाकरितां मजकूर रा. शंकरराव यांजकडे पाठवीत आहें. पोतदारांचें पत्र पावलें. छापत आहे तेव्हां संपेपर्यंत वाट पाहात राहिलें पाहिजे. शके १८३८ चें संशोधनवृत्त शके १८३९ च्या इतिवृत्ताच्या अगोदर निघावयास पाहिजे होतें. क्रम पूर्वापार असा होता. तो बदलला कां,— हा प्रश्न होता— असो.

(२) इतिहास मासिकांत मागें आपण जगावरील सर्व इतिहासमंडळांवरील हकीकत देण्याचें अभिवचन दिल्याचें लिहून चुकलां आहांत. त्याची तयारी काय केली आहे, तें कळविणें. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, रशिया, नार्वे, स्वीडन, हंगेरी, ऑस्ट्रिया, टर्की, इजिप्त, जपान, स्वीडन, ऑस्ट्रेलिया, साऊथ आफ्रिका इत्यादि सर्व ठिकाणांहून पत्रें काढून माहिती मागवा. ती मिळाल्याशिवाय अभिमान पुरे कसे होणार? अमेरिकेचें पुस्तक मागवा. हें पुस्तक मुंबईच्या सोसायटींत आहे. तें आपण मागविलें होतें काय? Bobliography of American Historical Societies, United States & Dominion of Canada 2nd Edition Revised, 1374 Pages, Paper binding, 90Cents (सुमारें ३ रु.) पत्ता:– Superintendent of Documents, United States of America. येथून मनिऑर्डर करावी लागते. तेथून V. P. येत नाहीं व करीत नाहींत.

द्रव्यार्थ खानदेशांतील व्यापारी गांठा. तुमचा या लोकांशीं संबंध येतो. प्रतापशेटाप्रमाणें चाळिसगावांत नारायणशेट आहे. त्यांच्या नांवानें इतिहासमंदिर बांधतों असें कळल्यास तो १०।१५ हजार रु. देईल अशी मला खात्री आहे. काम युक्तीनें करा. मध्यस्थ घाला व स्वतः शंकररावांना तें काम करूं द्या. असे ५।४ शेट गांठा. ५० हजारांची रक्कम जुळविली पाहिजे. म्हणजे एखादा विद्वान् संशोधक पैदा करतां येईल व मंदिरास स्थापन करतां येईल. नाहींतर शंकररावांचें काम कोण पुढें चालवील? चाळिसगांवांत तपस्वी वकील आहे. तो

१ : भा. वा. भट यांना पत्र, दि. ११ ऑगस्ट १९१७

शंकररावांचा शब्द मानील. तोहि कांहीं पैसे देईल. व्याख्यान करा. उठावणी शंकररावांनीं केली पाहिजे. कांहीं महत्कृत्य चाललें आहे असें लोकांत डंक्यानें कळलें पाहिजे. नंतर फंड काढा. त्यांत पैसा पैसा घ्या म्हणजे काम खात्रीनें होईल. मनांतल्या मनांत लाजत बसून कसें भागेल?"[1]

१० : आरोग्य मंडळ काढावें !

१ "पुण्यश्लोक डॉ. देव यांच्या दुखवट्याच्या सभेंत वाद निघावा हें त्या कामाला व प्रसंगाला अनुरूप नव्हतें.

२ आरोग्य मंडळ काढण्यासंबंधानें पुण्यास दोन तीन महिने मी कित्येक गृहस्थांबरोबर बोलत असें. त्यांत मेहेंदळे पोतदार वगैरे इतिहासमंडळाचे कांहीं सभासद होते. पुढें डॉ. देव यांच्याशीं गोष्ट काढतां त्यांना ही कल्पना पसंत पडली. नंतर पहिली प्रास्ताविक सभा मेंहेंदळे यांच्या वाड्यांत झाली व डॉ. देव यांना अध्यक्ष निवडले व सेक्रेटरी वगैरे निवड पुढें योग्य सुचली तशी रीतसर झाली. अशी हकीगत आहे. प्रथम मंडळांत अत्यंत मेहनत डॉ. वझे यांनीं केली. आपण रा. भटही पहिल्यापासून अति मेहनत करीतच आहांत, डॉ. देव यांच्या शांत कर्तृत्ववान स्वभावामुळें मंडळाच्या हातून जें कांहीं अल्पस्वल्प काम होतें तें झालें असें म्हणण्यास हरकत नाही.

खाजगी

माझ्याकडे मंडळाची वर्गणी दोन तीन वर्षांची थकली असेल, तरी माझें नांव आतां काढून टाका. कारण वर्गणी भरण्यास मजजवळ दमडीसुद्धां नाहीं. शिवाय मी तेथें नसल्यामुळें माझा कांहीं उपयोगहि नाहीं. कळावें, लोभ करावा हे विनंति.—"[2]

टिपण : १

या विसाला नवें ४६ वें वर्ष लागलें. ५४ राहिलीं. त्यांत सर्व जगताला हितकारक व राष्ट्राला पोषक अशी कृति होवो. आजपर्यंत फक्त स्मृति, राष्ट्रीय तयार करण्यांत काळ गेला. यापुढें कृती, कृती, कृती झाली पाहिजे,— नाहीं तर व्यर्थ ! चाळीस वर्षें आणीक सतत मेहनत झाली पाहिजे. आरोग्य, उत्तम हवा, उत्तम पाणी, उत्तम जागा, उत्तम शुद्ध अन्न हीं मिळालीं तर हेंही होईल. ईश्वराची कृपा अपरंपार हवी.

---

१. भा. वा. भट यांना पत्र, दि. ११ ऑगस्ट १९१७

२. आरोग्य मंडळाच्या चिटणिसांना पत्र, दि. १७ ऑक्टोबर १९१९

टिपणः २ (डॉ. केतकर यांच्या ज्ञानकोशांतील लेखाबद्दल करार)

१ १००० रुपये दर सहामाहीच्या आरंभास द्यावे.

२ मजकुरांत फेरफार करूं नये.

३ मराठ्यांचा इतिहास, मराठी वाङ्मयाचा इतिहास व मराठी भाषेचा इतिहास, तपशीलवार आजपर्यंतच्या शोधांबरहुकूम लिहीन, परंतु व्यक्तींचीं व प्रसंगांचीं चित्रें लिहिणार नाहीं.

४ तीन वर्षांच्या शेवटीं असें आढळून आल्यास कीं सहा हजार रुपयांहून जास्त खर्च आला, तर तो द्यावा, व तो तीन हजार रुपयांहून जास्त कधीं नसावा.

५ वय ५५ वर्षे.

६ विमा उतरण्यास हरकत नाहीं.

७ कायदेशीर करारास हरकत नाहीं.

८ कालगणना शकानें करीन.

९ प्रुफें शेवटचीं तपाशीन.

१० जसें कच्चें शुद्धलेखन लिहीन तसें छापावें.

११ फोटो व्यक्तींचे, अक्षरांचे व स्थलांचे द्यावे.

१२ अस्मानी सुलतानीनें पैसे व हप्ते बंद पडल्यास पैसे परत देणार नाहीं.

टिपणः ३

१ तीन लेख कऱ्हाडास पाठविणें.

२ हळद

३ मध

४ ट्रंक

५ केतकरांचीं पुस्तकें

६ Railway Passengers' Association.

७ ब्राह्मणसभा

८ मेणबत्त्या व स्टँड

टिपण ४

१ पुरुष माणूस पाठविणें.

२ कुळंबीण भांडीं धुते व खरकटें येथेंच कोठेंतरी टाकते.

३ फडकें नीट धुवून पाठविणें.

४ भांडीं स्वच्छ धुणें.

५ वांगीं, बटाटे, कांदे यांची भाजी पुरे.
पोळ्या नीट भाजणें. आतांशीं भाजत नाहींत.

टिपण : ५

१ ज्ञानकोश.
२ रामदासी संशोधन.
३ गीतारहस्य, राजवाडे.
४ इतिहास मंडळ,–पत्रें, ग्रंथ, नाणीं, शिलालेख.
५ मराठी भाषेचा कोश.
६ मराठी भाषेचें व्याकरण, ऐतिहासिक, तौलनिक.
७ संस्कृत भाषेचा उलगडा.
८ मराठ्यांचा इतिहास (१) संक्षिप्त गोषवारा (२) साद्यंत तपशील.
९ मोरोपंतांचे ग्रंथ संपविणें.
१० महाराष्ट्रसारस्वताचा इतिहास.
११ महाराष्ट्रांतील आडनांवें, कुळ्या व गोत्रें.
१२ वेदार्थयत्न.
१३ महाराष्ट्रसमाजशास्त्र.
१४ विवाह संस्थेचा इतिहास.

टिपण : ६

मानभावी सांकेतिक लिपीचा उलगडा

अ = र	क = ग्र	त = ट	य = क
आ	ख	थ = ठ	र = ख
इ = ह	ग = ल	द = ड	ल = ळ
ई	घ = व	ध = ड	व = घ
उ	छ	न = ण	श
ऊ	च = प	प = च	स = अ
ऋ = र	छ = फ	फ = छ	ह = उ
ॠ	ज = ब	ब =	ळ = = ग
ऌ	ञ = म	भ = झ	क्ष
ॡ	ट = त	म = स	ज्ञ = ज्ञ = ग्न
ए	ठ = थ		इ = भ
ऐ = ऐ	ड = द		ष = इ
ओ	ढ = ध		ठ = क्ष
औ	ण = न		

टिपण : ७

१ आपण दिलेल्या पोथ्यापैकीं पांचपंचवीस पोथ्या चांदोरकरांच्या असाव्यात.

२ बारामतीकर काळे यांचें दप्तर परत नेण्यांत हेतु असा होता कीं, काळ्यांची मालकी दप्तरावर शाबीत व्हावी. छापण्याची वगैरे भाषा केवळ दिखाऊ. रा. देव यांच्या लक्षांत ही गोष्ट आली, न आली, न कळे. पोथ्या प्रथम बारामतीहून नेल्या त्यावेळीं काळ्यांशीं परत देण्याचा करार नव्हता. कुजत पडलेल्या पोथ्या त्या सोडवून व छापून जतन करून मीं ठेवाव्या तेव्हां मालकी कोणाची ?

३ मी अनेक ठीकाणांहून पोथ्या कुजत पडलेल्या मिळविल्या. त्यांच्या-वरील मालकी माझी व मला वाटेल तें करण्यास मला हक्क आहे.

४ सातारकर महाराजांचे तबेल्यांत लिदीत रुमाल पडले होते. त्यांतून कांहीं कागद मीं आणले व निवडले. ते त्यांचे त्यास मागतील तेव्हां परत करण्याची बोली आहे. त्या कागदांची यादी त्यांच्या जवळ आहे. किंवा असावी. साताऱ्च्या कोण्या कऱ्हाडया गृहस्थानें केली. फडणीस असावा. त्याजवळ ही यादी असावी.

टिपण : ८

१ महाराष्ट्र सारस्वत, जुने ग्रंथ छापण्यास घेणें.
२ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.
३ मानभावी ग्रंथ
४ बृहत् सूचि.
५ ग्रंथ व ग्रंथकार
६ महाराष्ट्रेतिहास लिहिण्यास बागेंत सोय जमते कीं काय तें पाहाणें.
७ समाजशास्त्ररचना बागेंत जमते कीं काय तें पाहाणें.
८ मुकुंदराजाचा शोध करणें.
९ स्वार्थत्यागी विद्यार्थी संशोधनास आणि लेखनास बोलावणें.
१० संशोधन मासिक रूपानें काढणें.
११ दौलताबादेस जाणें, कन्नड येथें.
१२ चांदोरकर महाराष्ट्रसारस्वताचा इतिहास लिहीत असल्यास पाहाणें.
१३ देव रामदासीसंप्रदायाचा इतिहास लिहीत असल्यास पाहाणें.
१४ तात्या मराठी कायद्याचा अभ्यास कितपत करतात तें पाहाणें.
१५ उमरावतीस मंडळशाखा काढणें.
१६ नागपुरास शाखा काढणें.
१७ फारशी कोश तयार करणें.
१८ पंचांग छापून घेणें. चंद्रसूर्यांच्या ग्रहणांसुद्धां.

परिशिष्ट क्र. २

राजवाडे विचारगौरव !

राजवाडे यांच्या विचारांचा उचित असा गौरव समकालीन विद्वानांनीं केलेला दिसून येतो. राजवाडे यांचें कार्य व त्यांचें विचारवैभव यांचा समकालीनांकडून झालेल्या गौरवाची थोडी ओळख येथें करून दिली आहे.

१ : अभ्यासाचीं व्यापक क्षेत्रें !

" राजवाड्यांनीं या प्रमाणें आपलीं कार्यक्षेत्रें आणि अभ्यासक्षेत्रें निरनिराळीं कां केलीं याचें देखील कारण विचारण्याजोगें आहे. एक तऱ्हेचा अभ्यास करून मनुष्य कंटाळतो व तो दुसऱ्या तऱ्हेच्या अभ्यासास हात घालतो, असें आपणांस अनेक पंडितांच्या चरित्राकडे पाहिले असतां दिसतें. तथापि क्षेत्र बदलण्याचें कारण केवळ कुतूहलबुद्धीची व्यापकता एवढेंच नसतें. तेव्हां संस्कृतीस चालन देऊं इच्छिणारा एखादा लेखक स्पर्धाक्षेत्रांबाहेर जातो, तेव्हां खास असें वाटूं लागतें कीं, अभ्यासक्षेत्र कितीतरी विस्तीर्ण आहे; आणि आपल्या राष्ट्रात त्यापैकीं कोणत्याच अंगाची कल्पना नाहीं, तेव्हां त्या अशा लेखकांस निरनिराळ्या दिशांनीं प्रयत्न करून व तुडविलेली क्षेत्रें कांहीं अंशीं स्वतः तुडवून आपण पुढें जावें, आणि इतरांस आपल्या पाठोपाठ येऊन त्या क्षेत्राचें अधिक पद्धतशीर आक्रमण करण्यास तें क्षेत्र मोकळें ठेवावें असें वाटूं लागतें. राजवाड्यांमध्यें तर ही वृत्ति प्रामुख्यानें दिसत होती. राजवाड्यांनीं अनेक कल्पना करून अभ्यासाचें क्षेत्र किती विस्तीर्ण आहे याची वारंवार आठवण करून दिली आहे.[१]"

२ : समकालीन कागदांचें महत्त्व !

"कै. राजवाड्यांनीं संशोधनाच्या कामांत अतिशय व्यापक दृष्टि ठेविली होती हें प्रथम लक्षांत ठेविलें पाहिजे. इतिहास म्हणजे केवळ राजकीय वृत्त नसून त्यांत लोकस्थितीच्या सर्व बाबी येतात असा त्यांचा योग्य समज होता. सामाजिक वृत्तें, त्याचप्रमाणें राजशासनपद्धति, लोकांचे व्यापारव्यवहार, जमिनीच्या वसूलीच्या वगैरे व्यवस्था या सर्व बाबी फार महत्त्वाच्या आहेत आणि त्यांचा इतिहास समजणें आवश्यक असतें. या दृष्टीनें ते अनेक कागदांचा संग्रह करीत. जे कागदपत्र कित्येकांनीं गळाठा म्हणून टाकले ते त्यांनीं आस्थेनें तपासून पाहिले

१. डॉ. श्री. व्यं. केतकर; भटकृत राजवाडे चरित्र : पृष्ठ ४९१.

आणि महत्त्वाच्या कागदांचा त्यांनीं संग्रह केला. दुसरी महत्त्वाची त्यांच्या संशोधनाची बाब म्हणजे समकालीन कागदपत्र शोधून काढून तें छापणें व संगृहीत करणें. बखरी वगैरे इतिहासाचीं साधनें आहेत, पण त्याहिपेक्षां ज्यास्त किमतीचें साधन म्हणजे तत्कालीन लेख, मग कोणतेहि असोत. कारण खाजगी पत्रें, यादी, जमाखर्च इत्यादिकांवरून अनेक गोष्टींचा पत्ता आपल्यास लागतो व इतिहासाचा मुख्य जीव म्हणजे कालानुक्रम यावर चांगला प्रकाश पडतो. बखरीचा प्रथम दोष राजवाड्यांनीं सांगितल्याप्रमाणें कालविपर्यास हा असतो. तो दुरुस्त केल्याशिवाय खरा इतिहास जगतासमोर मांडतां येणार नाहीं हें उघड आहे. बखरी माहितगार लोकांनीं, अखबारनवीसांनीं लिहिलेल्या वृत्तावरून तयार केलेल्या असतात असें नसतें. किंबहुना अखबाराच्या उलट दिशेनें ऐकीव माहितीवरून लिहिल्या असल्यानें त्यास बखर असें वर्णव्यत्यासाचें नांव योग्य आहे. तेव्हां खरा इतिहास समजण्यांस, हीं त्या त्या वेळीं लिहिलेलीं साधनेंच पाहिजेत आणि म्हणूनच समकालीन लेखांचें महत्त्व आहे. दुसरा बखरीचा दोष राजवाड्यांनीं सांगितल्याप्रमाणें अतिशयोक्ति हा आहे. वर्ण्यविषय वाढवून फुगवून लिहावा, असें लेखकास साहाजिक वाटतें आणि या वृत्तीमुळेंच हिंदुस्थानांत इतिहासाची थोडीशी अवहेलना झाली आहे.—"[1]

३. एक अलौकिक ऋषि !

" राजवाड्यांनीं पुष्कळच प्रचंड काम केलें आहे, यांत संशय नाहीं. तरी इतिहास विषयांत यांच्यासारखी सर्वगामी बुद्धि व पूर्वतयारी इतरांचे ठिकाणीं नसल्यामुळें त्यांच्या हातून आणखी पुष्कळ होण्याजोगें काम झालें नाहीं. प्रत्येक विचारी माणसानें आपल्या जीविताच्या व कर्तृत्त्वाच्या मर्यादा ओळखून आणि तितकाच विषय आंखून घेऊन तो पुरा करणें यांत त्याच्या उद्योगाचें सार्थक होतें, परंतु अनेक अचाट कामें एकदम हातीं घेतल्यामुळें एकाचीही व्यवस्थित तड पोहोंचूं शकली नाहीं. मराठी भाषेचें व महाराष्ट्राच्या वसाहतकाळाचें मूळ हुडकीत ते वेदांच्याहि पूर्वकालांत शिरले. येणेंकरून तो प्रचंड विषय तर त्यांस दुर्गम राहिलाच, आणि हिंदुस्थानच्या इतिहासाची संपूर्ण रूपरेषा व त्याची भव्य व भरीव इमारत त्यांजकडून होऊं शकली असती, ती अपुरी राहिली. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें देशभर विखुरलेलीं त्यांनींच प्रथम हुडकून काढलीं आणि तीं प्रसिद्ध करून आपला राष्ट्रीय इतिहास आपणच बनविला पाहिजे, ग्रँट् डफ् वगैरेंनीं केलेलीं विधानें व विवेचनें मूळांतच विकृत आहेत, हा प्रकार राजवाड्यांनीं ठांसून सांगितला आणि उदाहरणांनीं सिद्ध केला; ही त्यांची सर्वांत मोठी चिरका-

---

१. चिं. वि. वैद्य, वैद्यांचे ऐतिहासिक निबंध: खंड ३, पृष्ठ १६६–'६७

लीन कामगिरी मी समजतों, आणि या कामगिरीबद्दल त्यांचें नांव अजरामर होण्यास पात्र आहे यांत संशय नाहीं. आणखी पुष्कळ कामगिरी शक्य असतां त्यांजकडून झाली नाहीं, एवढेंच वैगुण्य मला त्यांचें एकंदर उद्योगांत दिसतें, पण प्रत्येक मानवी व्यक्तींत गुणदोषांचा समुच्चय कमीअधिक प्रमाणांत असतो. तसाच तो राजवाड्यांतहि होता यांत नवल नाहीं. त्यांनीं केलेल्या कामगिरी बद्दल आपण सर्वांनीं त्यांचे ऋणी राहिलें पाहिजे, आणि आधुनिक युगांतील ते एक अलौकिक ऋषि होऊन गेले असेंच त्याजबद्दल माझें प्रतिपादन आहे."[1]

. प्रगल्भ बुद्धीचा विचार सम्राट !

"राजवाडे यांच्यासारखा प्रतिभासंपन्न, स्वतंत्र विचाराचा, बिनदिक्कत कल्पनेची भरारी मारून अज्ञात भागांचा ठाव घेणारा, निरलस व निरपेक्ष वाङ्मय-सेवक महाराष्ट्रांतच काय पण कोणत्याहि राष्ट्रांत दुर्मिळच असतो. इतिहास–संशोधनाच्या कार्यास सर्वस्वी वाहून घेतल्यानें सांपत्तिक दृष्ट्या ते अखेरपर्यंत अकिंचनच राहिले. पण त्यांना कल्पकतेचें व नवनवोन्मेषी प्रज्ञेचें दारिद्र्य कधींहि बाधलें नाहीं. त्यांच्या तीन तपांच्या लेखनव्यवसायांत त्यांनीं एकहि विचार किंवा कल्पना कोणाहि भूतपूर्व लेखकांपासून, उसनी घेतली नाहीं किंवा तिच्या अभावीं ते कधींहि अडून बसले नाहींत. त्यांच्या सगळ्या कार्याची उभारणी स्वयंप्रेरणेनें, स्वतःच्या प्रगल्भ बुद्धीच्या जोरावर आणि आत्मप्रत्ययाच्या पायावर झालेली होती. जो जो लेखनविषय त्यांनीं आपल्या हातीं घेतला त्यांत ते सर्वश्रेष्ठ किंबहुना विचारसम्राट होऊन झळकले. एवढें अगाध बुद्धिवैभव राजवाडे यांच्या मृत्यूनें एकाएकी लोपल्यानें महाराष्ट्र पुनः हतभागी झाला असें मानणें प्राप्त आहे."[2]

५ देशाभिमानी इतिहासकार !

"कुशाग्र बुद्धि, निरलसपणा, जबर कल्पनाशक्ति, देशाभिमान आणि कार्यैक-दृष्टि इत्यादि गुणांचें संमीलन त्यांच्या ठिकाणीं झालें असल्यामुळें महाराष्ट्राच्या इतिहासक्षेत्रांत त्यांना कायमच्या स्वरूपाची कामगिरी करतां आली. तिचें वर्णन 'त्यांनीं महाराष्ट्राच्या इतिहासाचें गुरुस्थान महाराष्ट्रांत आहे याची जाणीव उत्पन्न केली'! या शब्दांत करतां येईल. राजवाड्यांचा उदय होण्यापूर्वी ग्रँट डफविषयीं थोडीबहुत तक्रार सुरू होती व प्रतिक्रियारूपानें आमच्या पूर्वजांची निंदा करणारां-पेक्षां बखरकरांचा इतिहास खरा धरला पाहिजे असें मत रूढ होत चाललें होतें.

१. गो. स. सरदेसाई; भटकृत राजवाडे चरित्र पृष्ठ ५०१

२. ज. स. करंदीकर, ब्राह्मण पत्रिका : राजवाडे तिलांजलि अंक, पृष्ठ २०

परंतु हे दोघेहि अविश्वसनीय असून अस्सल कागदपत्र शोधून काढून त्या आधारावर आपल्या इतिहासाची मांडणी केली पाहिजे. ही गोष्ट कै. राजवाडे यांनीं तपशीलवार विवेचन करून पटवून दिली. संशोधनशास्त्राच्या कसोटीस उतरणारा इतिहास लिहिला पाहिजे हें पटवून देतांना ग्रँट डफच्या चुका दाखविणें त्यांना भाग पडले; आणि त्याबरोबरच असें करण्यानें महाराष्ट्राच्या इतिहासास गुरुस्थानीं मानला गेलेल्या परकीय ग्रंथकारांची छाप अनायसे उठणार आहे या जाणीवेनें त्यांना प्रोत्साहित केले. याशिवाय त्यांची विधायक स्वरूपाची कामगिरी ही कीं, महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्यास अत्यंत उपयोगी अशी सामग्री महाराष्ट्रांत गांवोगांव आहे हें त्यांनीं २५।३० ग्रंथ प्रकाशित करून हजारों लोकांना दाखवून दिलें."[1]

६ नवमतवादी राजवाडी परंपरा !

"राजवाडी परंपरा पुराणमतवादी नसून नवमतवादी आहे. तिला दिक्षाशिक्षांचे संस्कार त्याज्य आहेत. कोणताहि शोध अगर ज्ञान गूढ न ठेवतां मानवी उच्चनीच भावांचा किंवा वर्णावर्णाचा विचार न करितां जनताजनार्दनास स्पष्टास्पष्ट अर्पण करणें हाच तिचा बीजमंत्र आहे. ऐतिहासिक सत्याचें शोधन हेंच तिचें योगसाधन आहे. या परंपरेंत गुरुशिष्याच्या मालिकेला स्थान नाहीं व व्यक्तीला मान नाहीं. व्यक्तीच्या गुणदोषानें ती पवित्रापवित्र होणारी नाहीं. येथें गुरुबंधुत्वाचें नातें नाहीं म्हणून आपल्या योगसाधनांत एकमेकाबद्दल जिव्हाळा धरून सत्य निर्णयास बाध आणणारीं बंधनें नाहींत. राजवाडे या व्यक्तीचे सर्वच गुणदोष अनुसरणेंही खरी राजवाडी परंपरा नव्हे. जी परंपरा राजवाड्यांच्या कृतींत जन्म पावून महाराष्ट्रास प्राप्त झाली तिचें संगोपन करून ती उज्ज्वल करणें सर्वथैव महाराष्ट्राचे हातीं आले आहे. राजवाडे यांनीं या परंपरेस जन्म देऊन आपलें कार्य संपविलें. महाराष्ट्रानें या परंपरेचें संगोपन करतांना तिच्या जन्मदात्याचे गुणदोष गाऊन तिच्या जन्मदात्याच्या ऋणांतून मुक्त होण्याचा मामुली देखावा करण्याचें सोडलें पाहिजे. परंपरेच्या शीलाचे, तेजाचे, व विकासाचे साहाय्यार्थ सारखे झटले पाहिजे. जन्मदात्याच्या गुणदोषाला या संगोपनांत प्रधान स्थान न देतां जन्मदात्याच्या आकांक्षेकडे — इच्छेकडे लक्ष दिलें पाहिजे. जन्मदात्याचे असोत किंवा इतरांचे असोत गुण ते गुण व दोष ते दोष ही विवेचनपद्धतीच कायम राखिली पाहिजे. वर्तमान व्यक्तींची अगर गतात्म्यांची नसती भीड न बाळगतां सत्यच सांगत राहिलें पाहिजे. आजचा महाराष्ट्र या राजवाडी परंपरेचें कितपत संगोपन करूं शकेल हा प्रश्न सोडवावयाचा मिथ्यावाद

---

१. द. वि. आपटे, ब्राह्मणपत्रिका: राजवाडे तिलांजलि अंक, पृष्ठ १७

न घालतां आजचा महाराष्ट्र राजवाडी परंपरेची उज्ज्वलता कितपत राखूं शकतो हेंच दाखविण्यासाठीं कृतीची जरूर आहे. राजवाडी परंपरा म्हणजे राजवाड्यांनीं घालून दिलेल्या मर्यादा नव्हत. राजवाडे यांनीं राष्ट्रेतिहासाच्या नवीन विचार-सरणीस जन्म दिला तो फक्त मार्गदर्शक आहे. स्थलदर्शक नव्हे. राजवाडे यांनीं महाराष्ट्रास हा बिनतोड मार्ग सुचवून दिला, पुढील मार्ग शोधून आक्रमिणें हे परंपरेंतील लोकांच्या हातीं आहे. मराठ्यांच्या इतिहासाचें उज्ज्वल स्थल शोधतांना दिशाभूल करून न घेणें हें महाराष्ट्राचे कर्तबगारीवर अवलंबून राहील. दिशाभूल झाल्यास इच्छित स्थान प्राप्त होणें दुरापास्त होईल यात शंका नाहीं. "[1]

७ : भौगोलिक विद्यांतील प्राविण्य !

" पाश्चात्यांच्या भौतिक शास्त्रीय संस्कृतीचा व कर्तबगारीचा ते गौरव करीत. भौतिक विद्येतील प्राविण्य हें एक राष्ट्रीय जीवनाच्या वैभवाच्या दृष्टीनें मानवी संस्कृतीचें अवश्य अंग आहे, असें ते समजत आणि त्या संस्कृतीचा अंगिकार करण्याचा ते लोकांना उपदेशही करीत. आमच्या देशांतील निवृत्तिमार्गी तत्त्वज्ञानाचा त्यांना तिटकारा असे. हें तत्त्वज्ञान राष्ट्राला हतबल करतें या दृष्टीनें त्यांनीं भक्तिमार्गी साधुसंतांवरहि कडक टीका केली आहे. भौतिक शास्त्रीय दृष्टि सामान्य लोकांत प्रसृत होऊन जगाची राहाटी कार्यकारणभावाला धरून चालली आहे हा विश्वास लोकांत बाणल्याखेरीज अनेक देवदेवतांना नवससायास करून ऐहिक वैभवाची वांच्छा करण्याचा धर्मभोळेपणा समाजांतून नष्ट होणार नाहीं असें त्यांना वाटत असे, त्यामुळें त्यांनीं एके ठिकाणीं या भोळ्या धर्मभावनेच्या युगाला " देवकल्पनेचें असत्य युग " असेंहि म्हटलें आहे. पण यावरून राजवाडे पाश्चात्यांच्या जडवादी नास्तिक्याचा उपदेश करीत असत असें मानणें मात्र चुकीचें होईल. राजवाडे अद्वैत वेदान्तालाच सर्वोत्तम किंवा सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञान समजत असत. मात्र त्यांना निवृत्तिमार्गी अद्वैत वेदान्त नको होता. जगापासून पळून जाण्याचा उपदेश करणारा संन्यस्त वृत्तीचा वेदान्त हा रामकृष्णादि पराक्रमी आर्यांचा वेदान्त नव्हे, अशी त्यांची समजूत होती. श्रीकृष्णांनीं अर्जुनाला कुरुक्षेत्रावर सांगितलेली भगवद्गीता संन्यासमार्गी नसून कर्ममार्गी आहे. हा शोध त्यांनीं लोकमान्यांच्या आधींच बरीच वर्षें आपल्या रामदासावरील निबंधांत महाराष्ट्रापुढें मांडलेला आहे."[2]

८ आर्यांच्या विजयाचा इतिहास !

"—यापुढें त्यांना एक अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ निर्माण करावयाचा होता व

१. वा. वि. बेद्रे, ब्राह्मणपत्रिका : राजवाडे तिलांजलि अंक पृष्ठ ६१

२. शं द. जावडेकर; ब्राह्मण पत्रिका, राजवाडे तिलांजलि अंक : पृष्ठ, ४६-४७

त्याची रूपरेखा त्यांनीं बहुतेक आखलीही होती. हा ग्रंथ म्हणजे आर्य लोकांच्या विजयाचाच एक मोठा ग्रंथ होणार होता. या ग्रंथाची त्यांनीं जी रूपरेखा आखली होती ती अशीः–

(१) क्षेत्रांतील पंड्यांच्या वह्यांवरून अखिल हिंदुस्थानांतील आर्यांची आडनांवें संगतवार लिहून काढणें व त्यांचें सामाजिक वर्गीकरण फार काळजीपूर्वक करणें.

(२) नंतर हिंदुस्थानांतील बाहेरच्या देशांतील गांवांचीं नांवें पाहून त्या आडनांवांचा व त्या स्थानांचा संबंध इतिहासिक व सामाजिक दृष्टीनें निश्चित करणें.

(३) शक्य तितक्या अधिक गावांचें अति प्राचीन नांव शोधून काढून आर्यांच्या हालचालींच्या दृष्टीनें त्यांचें महत्त्व निश्चित करणें.

(४) या व अशा अनेक महत्त्वाच्या मुद्यांचें संगतीकरण करून आर्यांच्या एकंदर क्रांतीचें व विजयाचें स्वरूप दाखविणें.

(५) या कामाला त्यांनीं सुरुवातहि केली होती व नासिक मधील एक दोन उपाध्यांच्या वह्यांचें टांचण करून त्यांतील सर्व आडनांवें त्यांनीं टिपलेंलींही होतीं. सर्वक्षेत्रांतून अशी मिळतील तितकीं आडनांवें गोळा करण्याचा प्रयत्न ते करणार होते. या आडनांवांशी जोड मिळविण्यासाठीं हिंदुस्थानांतील सर्व खेड्यापाड्यांच्या नांवांचाही अभ्यास त्यांनीं चालविला होता. १।२ जिल्ह्यांच्या नावांचें वर्गीकरण करूनही त्यांनीं ठेवलें होतें. म्हणजे ह्या अति महत्त्वाच्या ग्रंथाच्या तयारीला त्यांनीं प्रारंभही केला होता. ”[१]

९: महाराष्ट्राला पुढारी नाहीं !

महाराष्ट्राचें स्वातंत्र्य नष्ट होऊन इंग्रजी सत्ता स्थापन झाल्यापासून, महाराष्ट्राच्या खऱ्या कल्याणाच्या दृष्टीनें ज्या तजविजी महाराष्ट्राच्या पुढाऱ्यांनीं करावयास पाहिजे होत्या तशा प्रकारच्या त्यांनीं केल्या नाहींत. असें ते स्पष्टपणें अनेकदा उच्चारून दाखवीत असत. इंग्रजांचें राज्य महाराष्ट्रांत स्थापन होण्यास भौतिक शास्त्रीय ज्ञानाच्या बाबतींत इंग्लंडाचे महाराष्ट्रीयांवर असलेलें वर्चस्व ही कारणीभूत झालेली आहे व तशा प्रकारचें ज्ञान महाराष्ट्रीयांनीं संपादन केल्याखेरीज त्यांची पारतंत्र्यांतून सुटका होणें दुरापास्त आहे असे त्यांचें ठाम मत होतें. या दृष्टीनें खटपट करणारा महाराष्ट्रांत इंग्रजी राज्य झाल्यापासून एकहि पुढारी निपजला नाहीं हें पाहून त्यांना अत्यंत खेद व उद्वेग होत असे. महाराष्ट्राच्या उन्नतीच्या दृष्टीनें त्यांचें मत ह्या स्वरूपाचें असल्याकारणानें पूर्वी होऊन गेलेल्या व

१. श्री. दा. सातवळेकर. ब्राह्मणपत्रिका, राजवाडे तिलांजलि अंक : पृष्ठ २३

प्रस्तुतच्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांबद्दल त्यांना विशेष आदर वाटत नसे व निर्भिडपणें ही त्यांची मनोभावना व्यक्त करण्याची संधि ते कधीं दवडत नसल्यामुळें कित्येक लोकांस त्यांचे विषयीं प्रेम वाटत नसे."[1]

१० : युरोपीयन पंडिताची मान्यता

"राजवाड्यांच्या योग्यतेचा मनुष्य महाराष्ट्रांत उत्पन्न झाला हें महाराष्ट्राला अत्यंत भूषणावह तर आहेच; परंतु सर्व-राष्ट्रीय कीर्तीचे म्हणून जे लोक निर्माण होतात त्यांच्यामध्यें गणना होण्यासारखी राजवाड्यांची योग्यता होती. आता मराठी भाषेला जिवंत ठेवण्यास राजसत्तेचें पाठबळ नसल्यामुळें, हिंदु समाजपद्धतींत जसे कर्ता यजमान निवर्तल्याबरोबर त्याच्या बरोबरीनें संसाराचे गाडे चालविणाऱ्या त्याच्या स्त्रीला सर्व प्रकारची मान्यता जाऊन सांधींत तोंड खुपसून बसावें लागतें त्याप्रमाणें मराठी भाषेचेंहि झालें आहे. इंग्रजी भाषेला केवळ राजसत्तेचा आधार म्हणून तिजमधील दुसऱ्या तिसऱ्या प्रतीचेहि ग्रंथ व ग्रंथकार हिंदुस्थानांत सर्वमान्यता पावतात आणि विशिष्ट मनोवृत्तीचे हिंदी विद्वान लोक त्यांना डोक्यावर घेऊन नाचतात व त्यांच्या पाया पडतात! पण बिचाऱ्या मराठी ग्रंथकारांना विचारतो कोण? इंग्रज सत्ताधीश म्हणून जन्मच्या जन्म घालवून आम्ही त्यांची भाषा शिकतों, व त्या भाषेंतील ग्रंथाचें कौतुक करतो. त्याचप्रमाणें मराठी ही जर एका स्वतंत्र राष्ट्राची भाषा असती तर युरोपीयन लोकहि मराठी ग्रंथांचें आस्थेनें परिशीलन करते व मराठी ग्रंथकारांची ख्याति युरोपभर झाली असती. नेबूर, मॉमसेन, फ्रूड, लेके, ग्रीन इत्यादि युरोपीयन इतिहाससंशोधक व इतिहासकार यांच्या नांवांना आम्ही जी मान्यता देतों तीच युरोपियन पंडितांनीं राजवाड्यांच्या नांवाला द्यावी इतकी त्यांची योग्यता मोठी होती."[2]

११ : विचारसंपत्तींत महत्त्वाची भर!

"—वयाच्या ३५ व्या वर्षी पानिपतच्या लढाईवरील पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत, त्यावेळीं उपलब्ध झालेल्या तुटक साधनांच्या जोरावर त्यांनीं जे सिद्धान्त प्रस्थापित केले, ते आजहि अबाधित राहिले आहेत. सहारा वाळवंटांत नित्य वाळूच्या नव्या टेकड्या उत्पन्न व जुन्या उध्वस्त होत असतात. तसाच चमत्कार संशोधनाच्याहि क्षेत्रांत नेहमीं घडत असतो. त्यांतहि राजवाडे हे एककल्ली असल्यामुळें त्यांच्या प्रतिपादनाला एक प्रकारचें आग्रही स्वरूप आपोआपच येत असे. ब्रह्मेंद्रस्वामींच्या कामगिरीच्या त्यांनीं केलेल्या मीमांसेंत हा दोष दृष्टीस

१. प्रबोध, धुळे, मृत्युलेख दि. २–१–१९२७.

२. केसरी, मृत्युलेख दि. ४–१–१९२७

पडतो. तथापि असल्या दोषानें डागळलेलेहि त्यांचें सिद्धांत कालांतरानें सर्वमान्य झाल्याविना रहात नसत. हिमगिरीच्या अंगाला चिकटलेले बर्फाचे प्रस्तर जरी झंझावातानें कोसळून पडले, तरी त्यामुळें त्या शैलश्रेष्ठाच्या उत्तुंग शिखरांना ढळ पोंचत नाहीं. संशोधन करण्याच्या बाबतींत राजवाड्यांची दृष्टि जशी गरुडासारखी तीक्ष्ण असे, तशीच संशोधिलेल्या व तत्संबद्ध ऐतिहासिक कालाचें आक्रमण करितांनाहि त्यांची प्रतिभा गरुडाप्रमाणें भराऱ्या मारीत असे. पानिपतच्या काळापासून मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनाला त्यांनीं प्रारंभ केला; आणि मराठी भाषेचा मागोवा घेत घेत अखेर वेदकाळापर्यंत जाऊन ते धडकले ! ते एककल्ली असले, तरी एकव्यवसायनिरत नव्हते. त्यामुळें महाराष्ट्राच्या इतिहासाचें संशोधन करितांना, इतिहास, भाषा, व्याकरण, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र इत्यादि अनेक शास्त्रांचें समालोचन व संशोधन करून त्यांनीं केवळ महाराष्ट्राच्याच नव्हें, तर एकंदर जगाच्याहि विचारसंपत्तींत महत्त्वाची भर घातली.[१] ”

१२ : साध्या राहणीचें व्रत !

“ नेणत्यांचा, गरिबांचा उद्धार व्हावा ही तळमळ. म्हणून राजवाडे नेहमीं साध्या राहणीनें राहत. सुशिक्षित लोक चार अक्षरें शिकलें कीं ‘ टाकम टिका ’ करूं लागतात. ह्याबद्दल त्यांना वाईट वाटे. प्रयोग शाळेमध्यें लंगोटी लावून काम केलें तर काय ऑक्सिजन काम करीत नाहीं ? असें त्यांचें एक वचन आहे. सुशिक्षितांनीं मंदारपर्वताप्रमाणें ज्ञानसमुद्राचा ठाव पहावा आणि तें ज्ञान शेतकऱ्यांच्या भाषेंत आणावें. शेतकऱ्यांप्रमाणें लंगोटी लावून सुशिक्षितांनीं आपलें ज्ञान-क्षेत्र नांगरावें. त्यांत मेहनत मशागत करून भरपूर पीक काढावें; आणि ज्या अशिक्षितांच्या जिवावर आमचें जीवन चाललें आहे, त्यांना त्या ज्ञानाचा भाग देऊन ऋणमुक्त व्हावें अशी त्यांची शिकवण होती.”[२]

१३ : राजवाड्यांची प्रतिभा–जान्हवी !

“ इतिहास म्हणजे तत्कालीन समाजाचें भौतिक व आत्मिक चरित्र, अशा व्यापक व्याख्येच्या पार्श्वभूमीवर कै. राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाबाबत काय काय महत्त्वाचें संशोधन केलें याची अल्पशी हकीगत येथवर सांगितली, परंतु कै. राजवाडे यांच्या प्रतिभेचा एकंदर अवाका असा जबरदस्त होता कीं, तो मराठ्यांच्या पुरताच मर्यादित राहील हें केवळ असंभवनीय होतें. यामुळेंच मराठ्यांचें हृद्गत त्यांनीं उत्कृष्टपणें ओळखलें, तरी केवळ त्यामध्येंच ते गुरफटून

१. महाराष्ट्र ; नागपूर : मृत्युलेख, ९–१–१९२७.

२. महाराष्ट्रधर्म, वर्धा : मृत्युलेख, १०–१–१९२७.

राहूं शकले नाहींत; मराठ्यांच्या इतिहासाचा शोध करीत असतां साऱ्या आर्य संस्कृतीचा इतिहास शोधण्याची आकांक्षा त्यांच्यात निर्माण झाली. इतिहास शास्त्राच्या अभ्यासांतून त्यांची दृष्टि भाषा, समाज, अशा अनेक गहन विषयांत शिरली आणि मग अशा तऱ्हेनें ऐतिहासिक कागदपत्रांवरून मराठींतील शब्द-संग्रहाकडे, शब्दसंग्रहावरून व्याकरणाकडे, व्याकरणाकडून मराठी भाषेच्या उगम-स्थानाकडे आणि मग अखेरीस भाषेवरून विकार व विचारप्रदर्शनाच्या साधनांच्या इतिहासपूर्व व इतिहासोत्तर उत्क्रांतीकडे त्यांची प्रगल्भ, व्यापक व तौलनिक बुद्धि संचरत गेली. गंगोत्रींत जन्म पावणारी व स्थलकालांनीं बद्ध झालेली जान्हवी आपल्या प्रवाहाचें पात्र विस्तृत करीत व भोंवतालचा प्रदेश समृद्ध करीत अखेरीस स्थल काल-क्रमातीत अशा सागरांत विलीन होऊन जावी त्याप्रमाणें कै. राजवाडे यांची बुद्धि-मत्ता प्रथम स्थलकालानें बद्ध होत्साती, शिवकालीन समाजरचना, रामदास, ज्ञानेश्व-रीची प्रस्तावना, महानुभाव पंथाच्या गुप्त लिपीचा उलगडा, मराठी धातुकोश, इत्यादींवर प्रकाश पाडून अखेरीस मराठ्यांची प्राथमिक वसाहत, गांवांचीं नांवें इत्यादि गहनगूढ समस्यांच्या महासागरांत विलीन झाली.”[१]

१. म. म. द. वा. पोतदार, ओळख, पृष्ठ १०५

परिशिष्ट अ

राजवाडेसाहित्य

(अ) राजवाडेलिखित ग्रंथ

१) प्लेटोकृत फीडो अथवा आत्म्याचें अमरत्व; क्रीटो अथवा कर्तव्यकर्म व सॉक्रेटिसाचें स्वात्मसमर्थन, पृष्ठें १६५, 'भाषांतर' मासिकातील प्रकरणें, सन १८९४

२) थॉमस पेनकृत सारासार विचार, 'भाषांतर' मासिकांतील प्रकरण, पृष्ठें ८६, सन १८९४–९६

३) ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण; सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, पृष्ठें १६०, सन १९०९

४) सुबंतविचारः (दामले यांच्या व्याकरणावर टीका) पृष्ठें ९०, सन १९१२

५) तिङ्त विचारः (दामले यांच्या व्याकरणावर टीका) पृष्ठें ३८, सन १९१२

६) ऐतिहासिक विविध विषय खंड १ : (२४ निबंध) पृष्ठें ३७५ सन १९१८

७) ऐतिहासिक विविध विषय खंड २ : (निबंध २५–२८) पृष्ठें १९२ सन १९१८–१९

८) ऐतिहासिक विविध विषय खंड ३ : (निबंध ३९–४४) पृष्ठें ३२, सन १९१९

९) संस्कृत भाषेचा उलगडा : पृष्ठें १३५, सन १९२०

१०) मराठी छंद : पृष्ठें २७, सन १९२६ (पुनर्मुद्रण)

११) श्रीसमर्थ रामदास : पृष्ठें ४९, सन १९२६ (पुनर्मुद्रण)

१२) कादंबरी : पृष्ठें ४१, सन १९२८ (पुनर्मुद्रण)

१३) कनिष्ठ, मध्यम व उच्च शालांतील स्वानुभव : पृष्ठें ४७, सन १९३१ (पुनर्मुद्रण)

१४) ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायांतील मराठी ओव्यांचें संस्कृत प्रतिशब्दशः भाषांतर पृष्ठें १९०, सन १९३४

१५) राजवाडे मराठी धातुकोश, पृष्ठें ३७४, सन १९३८

१६) राजवाडे नामादिशब्दव्युत्पत्तिकोश, पृष्ठें ३४६, सन १९४२

१७) संकीर्ण लेखसंग्रह ('ग्रंथमाला' मासिकांतील निबंध २८), पृष्ठें ४१२, सन १९०६

१८) राजवाडे लेखसंग्रह भाग १ (ऐतिहासिक प्रस्तावना), पृष्ठें ५००, सन १९२८

१९) राजवाडे लेखसंग्रह भाग २ (संकीर्ण निबंध २५) पृष्ठें ३००, सन १९३२

२०) राजवाडे लेखसंग्रह भाग ३ (संकीर्ण निबंध ३२) पृष्ठें २९०, सन १९३५

२१) राजवाडे लेखसंग्रह (साहित्य अकादेमी), पृष्ठें २९४, सन १९५८

(ब) राजवाडेसंपादित ग्रंथ

१) ज्ञानेश्वरी (अध्याय १ते १८), एकनाथ पूर्वककालीन प्रत; पृष्ठें ९४०, प्रस्तावना १०६ पृष्ठें, प्राचीन शब्दकोश, सुमारें ३० पृष्ठें; सन १९०९

२) राधामाधवविलासचंपू (जयराम पिंडयेविरचित शहाजीचरित्र), पृष्ठें २८७; प्रस्तावना पृष्ठें २०८ १९२२

३) महिकावतीची ऊर्फ माहिमची बखर (केशवाचार्यादिकृत विविध काळांतील सहा प्रकारणें) पृष्ठें २२५, प्रस्तावना ११० पृष्ठें, सन १९२४

(क) राजवाडेसंपादित साधन-ग्रंथ

१) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १ लाः—सन १७५० ते १७६१ पर्यंत. येरंडे, भानू (वाई), खरे शास्त्री (मिरज) व पैठण येथील ३०४ कागद; सटीक ; पानिपतपराभवमीमांसा, महाराष्ट्रधर्म, नाना, भाऊ, मल्हारराव, जयाप्पा शिंदे इत्यादिकांच्या हालचाली, प्रवासांचे मार्ग, ग्रँट डफच्या चुका इत्यादिविषयीं विवेचक प्रस्तावना, पृष्ठें १२७. खंडाची पृष्ठ संख्या ४०९. सन १८९८. वाई.

२ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २ राः—पेशव्यांची शकावली. इ.स. १७१४ ते १७६१ पर्यंतच्या काळांतील तीनहि पेशवे व फत्तेसिंग भोसले यांच्या-विषयीं तारीखवार वृत्तान्त. सन १९०० वाई.

३) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ३ रा :—पत्रें, यादी वगैरे इ. स. १७०७–१७६० धावडशी–भागवत, कायगावकर दीक्षित, पांडेवाडीचे कोल्हटकर, ओझर्डे पिसाळ, शांताश्रम मठ व भानू वाई, खरे-बावधन, शिर्के-सातारा, नागपूरकर भोसले इत्यादिकडील ५६८ पत्रे. आंग्रे, ब्रह्मेन्द्रस्वामी, नागपूरकर भोसले ह्यांसबंधीं माहिती, चेऊलची बखर, थोरातांची हकीगत, होळकरांची थैली, शिर्के, देशमूख, प्रतिनिधि इत्यादींची माहिती. ब्रह्मेन्द्रस्वामीविषयीं साधकबाधक विस्तृत चर्चा करणारी प्रस्तावना. पृष्ठें ६४. खंडाची पृष्ठसंख्या ५२२. सन १९०१, कोल्हापूर.

४)मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ४ थाः—नारायण व्यवहार शिक्षा, पेशव्यांची बखर, पेशवाईच्या अखेरची अखबार, रामस्वयंवर, १८१६ व१८१७ सालांतील हकीगत, पेशव्यांची वंशावळ, शिवाजी महाराजांच्या सर्व बखरीचें विस्तृत परीक्षण, पृष्ठें १३९ ; खंडाची पृष्ठसंख्या ३२६. सन १९००, पुणे.

५) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ५ वा:—पत्रें यादी वगैरे. इ. स. १७९५ जून ते आक्टोबर. खर्ड्यांच्या लढाईनंतर मराठे व निजाम ह्यांच्यामध्ये तह प्रकरणीं बोलणीं एतत्संबंधीं वृत्तांत—लेख, गोविंद कृष्ण काळे ह्यांजकडून सवाई माधवराव, नाना फडणीस ह्यांस आलेलीं २४२ पत्रें. पृष्ठ संख्या २९८. १९०२, कोल्हापूर.

६) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ६ वा:—पत्रें, यादी वगैरे, बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव ह्यांच्या कारकीर्दींतील पुरंदरे, हिंगणे, जाधव वगैरे सरदारांच्या संबंधीचे कागदपत्र ; रामदासस्वामींची वंशावळ, पुरंदरे ह्यांजकडील स्मरणें इत्यादि अनेक कागदपत्र. पौर्वात्य व पाश्चिमात्य इतिहासविषयक कल्पना, भागवत धर्म, इतिहास शास्त्राच्या बहुविध शाखा इत्यादि विषयांचें बिस्तृत विवेचन करणारी दीर्घ प्रस्तावना, पृष्ठें ९८. खंडाची पृष्ठसंख्या६७६. सन १९०५, कोल्हापूर.

७) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ७ वा:—इ. स. १७९२–१७९४ साहाय्यक ना. कृ. गद्रे, ज. र. घारपुरे, वा. रा. जोशी ; हैद्राबाद येथील पेशव्यांचे वकील गोविंदराव काळे यांच्या संग्रहांतील पत्रें, सरंजामे–सरदार यादी ; दुसऱ्या बाजीरावाविषयीं टिपणें, खर्ड्यांच्या लढाईसंबंधी पत्रव्यवहार, कांहीं मराठी शब्दांच्या व्युत्पत्ति, 'महाराष्ट्र इतिहास' मध्यें प्रसिद्ध झालेल्या प्रकरणाचें संकलन. खंडाची पृष्ठसंख्या ३८+१०+२२६+३२+१२८. सन १९०४ मुंबई

८) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ८ वा : इ. स. १६४९ ते १८१७ पर्यंतचे श्रीमंत गगनबावडेकर पंत अमात्य यांच्या दप्तरांतील लेख. फारशी आणि मराठी भाषा यांच्या परस्परसंबंधाचें विवेचन करणारी प्रस्तावना. खंडाची पृष्ठसंख्या १२२+२३०. सन १९०३ कोल्हापूर.

९) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ९ वा : तंजावरचा शिलालेख, धुळे येथील 'प्रभात' मासिकांत प्रसिद्ध झालेला. सन १९०६, धुळें.

१०) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १० वा : शके १६८३–१७३९ थोरले माधवराव ते दुसरे बाजीराव या चार पेशव्यांसंबंधींचा पत्रव्यवहार. वाईकर वैद्य ह्यांच्या संग्रहांतील पत्रें, खंडाची पृष्ठसंख्या ४९६ सन १९०६, पुणे,

११) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ११ वा : (किरकोळ) चास (जि. पुणे) येथील जोशी बाळाजी विश्वनाथाचे व्याही व सावकार आणि कल्याण इत्यादि प्रांतांचे अधिकारी ह्या घराण्यांतील इ. स. १६९७-१७१० पर्यंतचे कागद, मंगळवेढ्यासंबंधीं विस्तृत माहिती; लेखांक ११८, खंडाची पृष्ठसंख्या ८५. सन १९१२, पुणे.

१२) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ वा : रघुनाथ बाजीराव व बाजीराव रघुनाथ ह्यांचीं अस्सल पत्रें. चिंतो विठ्ठल रायरीकर यांच्या दप्तरांतील कागदपत्रकें, लेखांक ३८०. खंडाची पृष्ठसंख्या २३७. सन १९१२, पुणे.

१३) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १३ व १४ वा : रायरीकर

व खाजगीवाले दप्तरांतील पत्रें, खाजगीवाले संग्रह, रायरीकर व लिमिये यांची वंशावळ, थोरल्या माधवरावांच्या काळचीं पत्रें. खंडाची पृष्ठसंख्या १६५–८२. सन १९१८, पुणे.

१४) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १५ वा : शिवकालीन पत्रव्यवहार, मसूर—जगदाळे, निंब—सदानंद मठ, रोहिडखोरें—जेधे देशमुख व गुप्ते, देशपांडे, सातारा—राजोपाध्ये, चाकण-ब्रह्मे या सहा घराण्यांतील कागद. लेखांक ४५३. खंडाची पृष्ठसंख्या ४८८. सन १९१२ धुळे.

१५) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १६ वा : कानदरखोरें–मरळ देशमुख. 'इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध' झालेलीं शके १५३८ ते १७०३, लेखांक ८७. खंडाची पृष्ठसंख्या ८७. सन १९१२, मुंबई.

१६) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १७ वा : शिवकालीन घराणीं-मुरुम खोरें, सिलिमकर देशमुख 'इतिहाससंग्रहांत' प्रसिद्ध झालेली शके १४९८ ते १६७५, लेखांक ४४. खंडाची पृष्ठसंख्या ५४, सन १९१३, मुंबई.

१७) मराठ्यांच्या इतिहासांचीं साधनें खंड १८ वा : शिवकालीन घराणीं पुणे–देशपांडे. इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेलीं. लेखांक ६४. इ. स. १६०२ ते १६७२, जेधे शकावलीचीं कांहीं पानें. खंडाची पृष्ठसंख्या ९३. सन १९१४, मुंबई.

१८) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १९ वा : हैदर व टिपू ह्यांच्या दरबारांतील पत्रें अथवा कृष्णाजी नारायण जोशी, श्रीरंगपट्टण येथील पेशव्यांचे वकील ह्यांचा पत्रव्यवहार, इ. सन १७७९–८४ मधील. 'इतिहास–संग्रह' मासिकांत प्रसिद्ध झालेलीं. लेखांक २१२. खंडाची पृष्ठसंख्या १३८. सन १९१४, मुंबई.

१९) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० वा : शिवकालीन घराणीं,सुपें, शिरवळ, वाई इत्यादि सोळा ठिकाणचे कागदपत्र, शके १३५०–१६००. राजकारणी, भाषाविषयक, न्यायमनसुबी, मुलकी, धर्माधिकारी, वतनदार इत्यादिसंबंधीं, तसेंच शिवाजी, शहाजी, दादाजी कोंडदेव, रणदुल्लाखान, संभाजी शाहू वगैरे व्यक्तींची व सिंहगड, कोळी, चंद्रराव मोरे या प्रसंगांची माहिती देणारे अस्सल कागद. खंडाची पृष्ठसंख्या ४७६. सन १९१५, पुणे.

२०) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २१ वा : शिवकालीन घराणीं, प्रभानवल्ली–सरदेसाई, देवरुख–देसाई, कऱ्हाड–गिजरे. खंडाची पृष्ठसंख्या ३६०. सन १९१९. धुळे.

२१) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २२ वा : काले वकिलाती पत्रव्यवहार, शके १७१४ कार्तिक ते शके १७१५ वैशाख. 'इतिहाससंग्रहांत' प्रसिद्ध झालेली. लेख क्रमांक २४७. खंडाची पृष्ठसंख्या १३७. सन १९१७, मुंबई.

परिशिष्ट ब

संदर्भसाहित्य

Ambedkar B. R. : The Untouchables, Amrit Book Co. New Delhi, 1948

Ambedkar B. R. : Who Were the Shudras ? Thacker & Co. Ltd. Bombay 1946.

Bhandarkar R. G. : Early History of the Dekkan, 1884

Bogardus Emory : The Development of Social Thought, Longmans, Green and Co., New York, 1955

Collingwood R. G. : The Idea of History, Oxford University Press, 1946

Croce Benedetto : History as the Story of Liberty, George Allen and Unwin Ltd. 1941

Ghurye G. S. : Caste and Class in India, Popular Book Depot, Bombay 1957

Huntington Ellsworth : Mainsprings of Civilization, John Wiley and Sons. Inc. 1945

Hutton J. H. : Caste in India, Cambridge University Press, 1946

Piggott : Prehistoric India, Penguin Books, 1950

Sankalia : From History to Pre-History at Nevasa, 1960

Toynbee Arnold J : A Study of History, Oxford University Press, New Yark, 1947

Toynbee Arnold J : Civilization or Traial, Oxford University Press, New Yark, 1948

Toynbee Arnold J : East to West, Oxford University Press, 1958

Toynbee Arnold J : An Historian's Approach to Religion, Oxford University Press, London, 1955

The History of the Decline and Fall of the Roman Empire by Edward Gibbon, Vol. 1

The Historian's History of the World, Vol. 1

आपटे द. वि. : दत्तोपंत आपटे लेखसंग्रह. १९४५

कर्वे इरावती : मराठी लोकांची संस्कृति, देशमुख आणि कंपनी पुणे, १९५१

करकरे द. बा. : मराठ्यांचा इतिहास, १९२४
कालेलकर ना. गो. : भाषा आणि संस्कृत, मौज प्रकाशन, मुंबई १९६२
काळे दि. वि. : छत्रपति शिवाजीमहाराज, बहिःशाल शिक्षण ग्रंथमाला १९६०
कीर्तने नी. ज. : ग्रँट डफ कृत मराठ्यांच्या बखरीवरील टीका, १९२६
केतकर श्री. व्यं. : प्राचीन महाराष्ट्र भाग १, १९३५
केतकर श्री. व्यं. : प्राचीन महाराष्ट्र भाग २, व्हीनस प्रकाशन पुणे, १९६३
केतकर श्री. व्यं. : भारतीय समाजशास्त्र, नवभारत ग्रंथमाला, १९३६
केळकर न. चिं. : मराठे व इंग्रज १९१८
केळकर न. चिं. : इतिहासविहार १९१६
केळकर य. न. : वसईची मोहीम १९३९
खानोलकर गं. दे. : अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक षष्ठ खंड, व्हीनस प्रकाशन, पुणे २, १९६३
गुप्ते के. त्रि. : राजवाड्यांची गागाभट्टी, १९१९
जाधव भास्करराव : मराठे व त्यांची भाषा, १९३२
जोगळेकर स. आ. : सह्याद्रि, प्रसाद प्रकाशन, पुणें, १९५२
जोशी शं. बा. : मऱ्हाटी संस्कृति, आंतर भारती प्रकाशन, पुणे १९५२
ठाकरे के. सि. : कोदंडाचा चमत्कार, १९२५
तारकुंडे सी. र. : क्षत्रियु घराण्यांचा इतिहास भाग, १ व २, १९१८, १९३१
तळपुळे शं. गो. : प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ, १९६३
थत्ते प. ह. : वेदांच्या काळांचा इतिहास, १९२५
दांडेकर शं. वा. : सार्थ ज्ञानेश्वरी, प्रसाद प्रकाशन, १९५३
दिवेकर स. म. : परमानंदकृत श्रीशिवभारत, भा. इ. सं. मंडळ, पुणे, १९२७
देव शां. भा. : महाराष्ट्रांतील उत्खननें, पब्लिकेशन डिव्हिजन, दिल्ली १९६२
नेने वि. पां. (संपा.) : अर्वाचीन मराठी साहित्य, १९३५
पानसे मु. ग. : यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९६३
पेंडसे शं. दा. : श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान, के. भि. ढवळे, मुंबई, १९४१
पेंडसे शं. दा. : महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, नवभारत ग्रंथमाला १९३१
पेंडसे लालजी : धर्म कीं क्रांति
पोतदार द. वा. : ओळख, व्हीनस बुक स्टॉल, पुणे, १९६१

फाटक-पगडी : पानिपतचा संग्राम, भाग पहिला, मुंबई मराठी ग्रंथ-संग्रहालय, मुंबई, १९६१

भट भा. वा. : महाराष्ट्रधर्म, १९२५

भट भा. वा. : राजवाडेचरित्र, १९४६

भावे वा. कृ. : युगप्रवर्तक शिवाजीमहाराज, १९५५

भावे वा. कृ. : मुसलमानपूर्व महाराष्ट्र खंड–१ ला, सन १९४६

भावे वि. ल. : महाराष्ट्र सारस्वत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६३

माटे श्री. म. : अस्पृष्टांचा प्रश्न, १९३३

मिरजकर मु. ग. : मनुस्मृति (मराठी सुरस भाषांतरासह), चित्रशाळा प्रेस, पुणे १९२७

मिराशी वा. वि. : संशोधन मुक्तावलि (सर पहिला), मध्यप्रदेश संशोधन मंडळ, ग्रंथमाला क्र. ५, १९५४

मिराशी वा. वि. : संशोधन मुक्तावलि (सर दुसरा), मध्यप्रदेश संशोधन ग्रंथमाला, क्र. ६, १९५७

मिराशी वा. वि. : संशोधन मुक्तावलि (सर तिसरा), विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्र. १०, १९५८,

वैद्य चिं. वि. : मध्ययुगीन भारत, भाग पहिला, १९२०

वैद्य चिं. वि. : निबंध आणि भाषणें, १९१५

वैद्य चिं. वि. : वैद्यांचे ऐतिहासिक निबंध, १९३१

शेजवलकर त्र्यं. प्र. : शेजवलकरांचे लेख, पुस्तक दुसरें, ह. वि. मोटे प्रकाशन, मुंबई १९५९

शेजवलकर त्र्यं. प्र. : पानिपत १७६१, जोशी आणि लोखंडे, पुणे, १९६१

सरदेसाई गो. स. : माझी संसारयात्रा, के. भि. ढवळे, मुंबई १९५६

सरदेसाई गो. स. : मराठी रियासत, पेशवा बाळाजीराव, के. भि. ढवळे मुंबई, १९१३

सरदेसाई गो. स. : मराठी रियासत, पुण्य श्लोक शाहू, के. भि. ढवळे मुंबई, १९४२

सरदेसाई गो. स. : नानासाहेब पेशवे चरित्र, भारत गौरव ग्रंथमाला, १९२६

सरदेसाई गो. स. : शहाजी राजे भोसले, के. भि. ढवळे मुंबई, १९३५

महाराष्ट्रीय ज्ञानकोश, भाग ८ वा

महाराष्ट्र परिचय, प्रसाद प्रकाशन, पुणे २

महाराष्ट्रजीवन खंड, १ व २, जोशी–लोखंडे प्रकाशन–पुणे

शिवचरित्र निबंधावलि, भाग १–३ शिवचरित्र कार्यालय, पुणे
शिवचरित्र प्रदीप, भा. इ. सं. मंडळ, पुणे
विजयनगर स्मारक ग्रंथ, भा. इ. सं. मंडळ पुणे
शारदा विहार (महाराष्ट्र शारदामंदिराचा ग्रंथ), पुणे.
इतिहास : शास्त्र व तत्त्वज्ञान, कै. दत्तोपंत आपटे–स्मारक ग्रंथ
ब्राह्मण पत्रिका : राजवाडे तिलांजलि अंक
श्रीज्ञानेश्वरदर्शन; भाग १ व २

विशेष नामांची सूचि

(ग्रंथ, मासिकें, पुस्तकें, निबंध, ग्रंथमाला इत्यादि संदर्भांची नांवें अवतरणचिन्हांत)

ह

ज्ञ

महत्त्वाचें शुद्धिकरण :—

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
४०	१९	‘ ब्रह्मेंद्र स्वामींचें चारित्र ’	‘ ब्रह्मेंद्र स्वामींचें चरित्र ’
४२	२३	इतिहाचीं	इतिहासाचीं
९०	शीर्षक	राजावाड्यांचें	राजवाड्यांचें
१६१	३०	अत्यंज	अंत्यज
१८०	१८	जर	तर
२३८	२४	प्रा. कृ. कुलकर्णी	प्रा. कृ. पां. कुलकर्णी
२४५	२०	मदिर	मदिरा

पृष्ठ १४९ वरील टीप पृष्ठ १४८ वरील समजावी.